ARTHA, Poona 4

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ पुणे, बुधवार ४ जानेवारी, १९६७ अंक १

## विविध माहिती

**रशियाची नवी बॉम्बफेकी विमाने**—रशियाने आपल्या विमानदलात तीन नव्या प्रकारच्या बॉम्बफेकी विमानांची भर घातली आहे. रशियन तज्ज्ञांच्या मताने आवाजापेक्षाही अधिक वेगाने उड्डाण करणारी ही विमाने जगातील कोणत्याही लक्ष्यावर अचूक मारा करू शकतील. हवाई युद्धात उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्यास ती समर्थ आहेत. त्यांची जास्तीत जास्त गती तासाला १,८६० मैल असू शकेल आणि ती ९८ हजार फूट उंचीवरून भ्रमण करू शकतील. नवी विमाने चालविण्याचे अद्ययावत शिक्षणही रशियन वैमानिक घेत आहेत.

**रशियाची मोटारींची निर्यात**—गेल्या दहा वर्षांत रशियाने आपल्या मोटारींची निर्यात दुपटीने वाढविली आहे. आता रशियात तयार झालेल्या प्रवासी मोटारी आणि मालवाहू मोटारी पश्चिम युरोपात आपला शिरकाव करून घेत आहेत. १० वर्षांपूर्वी रशिया दरसाल सर्व प्रकारच्या मिळून ३५ हजार मोटारी निर्यात करीत असे. गेल्या वर्षी रशियाने ६३, ७०० मोटारी निर्यात केल्या.

**तारापूर येथील अणुशक्तिकेंद्र**—तारापूर येथे उभारण्यात येत असलेल्या अणुजनित विद्युत्-केंद्राचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. केंद्रासाठी सुमारे ६५ कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याशिवाय केंद्रातील अणु-इंधनाच्या पहिल्या हप्त्यासाठी आणखी १८ कोटी रुपये लागतील. केंद्राचे काम ठरल्या वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण होईल असे दिसते.

**वादळग्रस्तांना मदत**—रत्नागिरी जिल्ह्यात झालेल्या वादळात ज्यांची हानी झाली त्यांना मदत देण्यासाठी म्हणून महाराष्ट्र राज्याने १९.६१ लाख रुपये मंजूर केले आहेत. वादळात हानी झालेल्या फळबागांची पुनः लागवड करण्यासाठी ह्या मदतीचा उपयोग करण्यात यावयाचा आहे.

**गोंदिया जिल्ह्यातील भातगिरण्या**—गोंदिया जिल्ह्यात भाताची पैदास सुमारे १० लाख टनांपर्यंत झाली आहे. परंतु राज्य सरकारने फक्त भातसडीच्या ६९ गिरण्यांनाच भात सडण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे गिरण्यांवर फार ताण पडत आहे. जिल्ह्यातील आणखी ३०० गिरण्या अद्याप बंद आहेत. गिरणी मालकांनी ह्या बाबतीत सरकारकडे तक्रार केली आहे.

**मद्रासजवळ औद्योगिक वसाहत**—मद्रासपासून २० मैल अंतरावर राज्यसरकारने विजेच्या उपकरणांचे उत्पादन करणारी एक औद्योगिक वसाहत स्थापन करण्याचे ठरविले आहे. ह्या वसाहतीत प्रथम १६ घटकांची व अखेरीस ३२ घटकांची सोय करण्यात येईल. वसाहतीच्या स्थापनेसाठी २२.५१ लाख रुपये खर्च येईल व नंतर दरसाल ६६ हजार रुपये खर्च करावे लागतील.

**आर्थिक बहिष्कारामधील अडचण**—सीलोनने दक्षिण आफ्रिकेवरील संकल्पित आर्थिक बहिष्कारात भाग घेतला आणि त्या देशाशी व्यापार करण्याचे बंद केले, तर सीलोनच्या चहाच्या निर्यातीचे ९ कोटी रुपयांचे नुकसान होईल. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णभेदाच्या धोरणाला विरोध म्हणून भारताने त्या देशाला चहा पाठविण्यास बंदी केलेली आहे, त्यामुळे दक्षिण आफ्रिकेत फक्त सीलोनचाच चहा खपत आहे.

**दूरदर्शनिकाची यंत्रसामग्री**—भारत आणि पश्चिम जर्मनी ह्यांच्या दरम्यान करण्यात आलेल्या एका कराराप्रमाणे पश्चिम जर्मनी भारताला दूरदर्शनिक यंत्रांचा व उपकरणांचा पुरवठा करणार आहे. दूरदर्शनाच्या प्रक्षेपणासाठी लागणाऱ्या उपकरणांची ऑल इंडिया रेडिओला तातडीची गरज होती. उपकरणे ह्यापूर्वीच पुरविण्यात आली आहेत. भारतामधील तंत्रज्ञांना शिकवून तयार करण्याचीही व्यवस्था झाली आहे.

**नेपाळला चीनची मदत**—नेपाळची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व तांत्रिक विकास साधाण्यासाठी चीनने १५ कोटी नेपाळी रुपयांची मदत देण्याचे कबूल केले आहे. पौंडाच्या चलनात ह्या मदतीची किंमत ७० लाख पौंड होते. ती ४ वर्षांच्या अवधीत देण्यात येणार असून त्यात रोख रक्कम, माल व यंत्रसाहित्य ह्यांचा समावेश आहे.

**नवीन प्रकारचे विमान**—फ्रान्समध्ये तयार करण्यात आलेल्या एका नवीन प्रकारच्या विमानाची चाचणी घेण्यात आली आहे. विमानात १० माणसे बसण्याची सोय आहे. ते ३,६०० किलोमीटर अंतर इंधनाचा शिलकी साठा न घेता जाऊ शकते. आतील खुर्च्या घडीच्या असून त्यांचा उपयोग विचार-विनिमयासाठी, बैठक घेण्यासाठी करता येतो.

**मोडीच्या टंचाईचा परिणाम**—कैरो शहरात छोटया नाण्यांची टंचाई भासू लागल्यामुळे सरकारने अल्युमिनियम धातूची टोकन्स वापरात आणली आहेत. ही टोकन्स फक्त सार्वजनिक वाहतुकीच्या साधनासाठीच चालतात. त्यांना अधिकृत पैशाचा कायदेशीर दर्जा नाही. परंतु छोटया नाण्यांच्या टंचाईमुळे लोक ती इतर व्यवहारांतही वापरू लागले आहेत.

**अजिंठा येथे पाण्याची सोय**—जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पहाण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांची पाण्याची सोय करण्यासाठी भारत सरकारने २·२५ लाख रुपये खर्च येणारी योजना तयार केली आहे. अजिंठा लेण्याच्या पायथ्याशी एक हॉटेल आहे. परंतु तेथे पाण्याची अडचण आहे. नव्या योजनेत नजीकच्या ओढ्यातील पाणी खेचून, शुद्ध करून, पुरविले जाणार आहे.

**बँकॉक येथील व्यापारी प्रदर्शन**—बँकॉक येथे आशियातील देशांचे एक व्यापारी प्रदर्शन भरविण्यात आले होते. ते ३ आठवडे चालले होते. प्रदर्शनात ३४ आशियाई देशांनी भाग घेतला होता. जपान, भारत, हाँगकाँग, रशिया, ह्या देशांनी कापडाच्या विक्रीचे सौदे केले. रशिया, जपान व फ्रान्स ह्यांनी भारी यंत्रसामग्रीचेही सौदे केले.

**आर्कोणम येथे पोलाद कारखाना**—मद्रास सरकारने अर्कोणम येथे सार्वजनिक मालकीचा पोलादाचा कारखाना स्थापन करण्याचे ठरविले आहे. त्याची बरीचशी यंत्रसामग्री रशिया पुरविणार आहे व बाकीची रांची येथील कारखान्याकडून घेण्यात येणार आहे. संकल्पित कारखान्यात मुख्यतः जुन्यापान्या लोखंडाचा वापर करण्यात येईल.

**कच्छमध्ये हलक्या प्रतीचा कोळसा**—कच्छच्या रणात कोळसा सापडतो किंवा काय ह्याची भूस्तरविषयक पाहणी राज्य सरकारतर्फे चालू होती. पूर्व जर्मनीमधील काही तज्ज्ञांनी आता राज्य सरकारच्या शोधाला पाठिंबा दिला आहे. त्यांच्या मताने कच्छमध्ये ५० मेगॅवॅट विजेचे केंद्र निदान ४० वर्षे चालण्याइतका हलक्या प्रतीचा कोळसा सापडू शकेल.

**नागार्जुन सागराचे आकर्षण**—आंध्र राज्यात नागार्जुन-सागर येथे बांधण्यात येणारे भारतामधील सर्वांत मोठे दगडी धरण आहे. त्याच्या आसपासची सृष्टिशोभाही प्रेक्षणीय असल्यामुळे हौशी प्रवासी तेथे आकर्षिले जातात. दरमहा निदान ३० ते ३५ हजार प्रवासी धरणाचे काम पाहण्यास येतात. शनिवारी व रविवारी तर त्यांची संख्या ५ हजारांपर्यंत जाते. त्यात काही परदेशी प्रवासीही असतात.

**निर्यातीस योग्य अशी केळी**—भारताला परदेशीय चलन प्राप्त करून देणाऱ्या निर्यातीच्या मालात शेंगदाणा, एरंडाच्या बिया, मसाल्याचे पदार्थ, ह्या वस्तूंबरोबर केळ्यालाही स्थान मिळू लागले आहे. केळी निर्यात करण्यातील मोठी अडचण म्हणजे ती दीर्घकाल टिकत नाहीत ही आहे. ह्या अडचणीवर मात करण्यासाठी दीर्घकाल टिकू शकणाऱ्या केळ्यांच्या जातींची मुद्दाम लागवड करण्याच्या योजना आखण्यात येत आहेत.

**सिलोनची अडचणीची परिस्थिती**—सिलोनमध्ये तांदळाची चणचण तर फार भासत आहेच; पण त्याशिवाय त्या देशाला परदेशीय चलनाच्या जबरदस्त टंचाईलाही तोंड द्यावे लागत आहे. परदेशीय व्यापारात झालेली मोठी घट आणि मदत देणाऱ्या देशांनी केलेली अपुरी मदत ह्याच्यामुळे सिलोन-मध्ये आर्थिक संकट उद्भवले आहे.

**चांदीची चोरटी निर्यात**—गेल्या दोन वर्षांत भारतामधून चोरटया मार्गाने निर्यात करण्यात येणाऱ्या चांदीत खूप वाढ झाली आहे. १९६४ साली चोरटया मार्गाने ३०२ किलोग्रॅम चांदी निर्यात करण्यात आली. तिची किंमत १·१ लाख रुपये होती. १९६५ साली २,३२२ किलोग्रॅम वजनाची ११ लाख रुपयाची चोरटी चांदी निर्यात करण्यात आली. १९६६ च्या सप्टेंबर अखेर १६,१६७ किलोग्रॅम वजनाची ५६·५ लाख रुपयांची चांदी चोरून निर्यात करण्यात आली.

**युद्ध छायाचित्रांना बक्षिसे**—हेग येथील आंतरराष्ट्रीय वृत्तपत्र छायाचित्रांच्या प्रदर्शनात व्हिएटनाममधील दोन युद्धविषयक चित्रांना बक्षिसे मिळाली. त्यांपैकी एक चित्र व्हिएट कॉंग गनिमाचे एक प्रेत चिलखती गाडी ओढून नेत असल्याचे आहे. मारल्या गेलेल्यांची नोंदणी करण्यासाठी प्रेते मोजली जातात.

**साखरेच्या धंद्यातील उपपदार्थ**—गुजरात सरकार साखरेच्या धंद्याच्या आधाराने तयार होऊ शकणाऱ्या इतर उप-पदार्थांची निर्मिती करणारे उद्योगधंदे काढण्याचा विचार करीत आहे. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या मध्यवर्ती संघटनेत ह्या विषयी विचार विनिमय करण्यात आला. साखरेच्या कारखान्यातील मळीपासून अल्कोहल तयार करण्याचा कार-खाना काढण्याचाही विचार करण्यात आला.

# अर्थ

बुधवार, ४ जानेवारी, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## "अर्था"चे ३३ व्या वर्षात पदार्पण

"अर्थ एव प्रधानः" हे महाराष्ट्रीय जनतेला पटवून देण्यासाठी आणि सामाजिक संस्कृतीत ललित वाङमयास जे स्थान आहे, त्याच तोडीचे स्थान अर्थविषयक वाङ्मयास प्राप्त करून देण्यासाठी प्रा. वा. गो. काळे ह्यांनी १९३५ मध्ये "अर्था"ची स्थापना केली. त्यांच्या मृत्यूनंतर, १९४६ सालापासून, "अर्था" ची जबाबदारी प्रस्तुत संपादकाकडे आली आणि महाराष्ट्रीय जनतेने त्यालाही सक्रिय प्रोत्साहन दिले. म्हणूनच "अर्थाला"ला हे व्रत गेली ३२ वर्षे चालू ठेवता आले आहे. "अर्था"च्या वाचकांच्या अपेक्षा पुऱ्या पाडण्याचा आणि हितचिंतकांच्या साहाय्यास पात्र राहण्याचा आम्ही कसून प्रयत्न करीत आहो.

"अर्था"चे उद्दिष्ट, सामाजिक व राष्ट्रीय व्यापक उत्कर्षासाठी अर्थार्जनाचे महत्त्व व सुयोग्य पद्धती ह्यांचा प्रसार करणे हे आहे. "अर्थ" हे कोणत्याही संस्थेचे, समूहाचे, संकुचित हितसंबंधांचे पत्र नाही. म्हणून त्याची उपयुक्तता सर्वांना वाटते हे "अर्था"चे वैशिष्ट्य आहे. "अर्था"वरील जनतेचा हा लोभ असाच कायम राहील, इतकेच नव्हे तर वृद्धिंगत होईल, असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत अंकापासून "अर्था"च्या आकारात बदल करण्यात आलेला आहे. फुलस्केप ऐवजी डबल डेमीच्या अधिक सोईस्कर आकारात ह्यापुढे "अर्थ" छापण्यात येणार आहे. ह्या फरकामुळे पृष्ठसंख्येत भर पडून वाचकांना मिळणाऱ्या मजकुरात वाढच होणार आहे.

## एंजिनिअर्सच्या पदवीधरांची मागणी घटली

गेल्या काही महिन्यांत एंजिनिअरिंगची पदवी घेतलेल्या लोकांसाठी असणारी मागणी घटल्याचे आढळून आले आहे. ह्याचे एक कारण असे सांगण्यात येत आहे की उद्योगधंद्यात व इतर संलग्न कारखानदारीत जशी वाढ होईल असे वाटले होते तशी ती झाली नाही. उद्योगधंद्यात सुमारे ११ टक्के वाढ होईल अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्ष वाढ मात्र ६ ते ७ टक्क्यानेच झाली. साहजिकच एंजिनिअरिंगचे ज्ञान असणाऱ्या लोकांची मागणी कमी झाली. शिवाय देशाच्या काही भागांत तरी एंजिनिअर्सना देण्यात येणारे वेतन व नोकरीच्या इतर सवलती असाव्या तशा आकर्षक नाहीत. कारखान्यांना सामान्यतः अनुभवी एंजिनिअर्सची जरूर असते. बऱ्याच वेळा योग्य त्या अनुभवाची माणसे मिळत नाहीत. त्यामुळेही एंजिनिअर्सना काम न मिळाल्याचे दृश्य दिसून येते. कित्येकदा एंजिनिअरिंग शाखेतील पदवीधर दूर जाण्यास तयार नसतात. शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान पैदा केलेल्यांची जी अधिकृत यादी करण्यात आली आहे तीवरून असे दिसते की १ नोव्हेंबर १९६६ ह्या दिवशी ५७५ एंजिनिअर्सना नोकऱ्या मिळालेल्या नव्हत्या. त्यांपैकी ४५९ जणांना सहा महिन्यांपेक्षा कमी काळात नोकऱ्या नव्हत्या; ५७ जणांना ६ महिने ते वर्षभरात नोकऱ्या नव्हत्या आणि ५९ जणांना वर्षापेक्षा अधिक काळ नोकऱ्या नव्हत्या उद्योगविनिमय केंद्रात नोकरीसाठी नोंद करणाऱ्या एंजिनिअरिंगच्या पदवीधरांच्या संख्येत अलीकडे वाढ होत चालली आहे. १९६४ च्या जूनअखेर त्यांची संख्या १,९७५ होती ती १९६६ च्या जूनअखेर, ३,६५० पर्यंत वाढली आहे. काही एंजिनिअर्सनी केंद्रात नावे न नोंदविलेली असण्याची शक्यता आहे.

## कंपन्यांतील ठेवींवरील निर्बंध अनिष्ट

"रिझर्व्ह बँकेने कंपन्यांच्या ठेवींवर जबर निर्बंध लादले आहेत. त्यामुळे पुष्कळ कंपन्यांच्या आर्थिक स्थितीवर दूरगामी परिणाम होणार असून अत्यावश्यक अशा भांडवलाबाबत त्यांची उपासमार होणार आहे. म्हणून हे निर्बंध आहेत तसेच अमलात आणले तर केवळ सध्या अस्तित्वात असलेल्या कंपन्यांवरच नव्हे तर नव्याने निघणाऱ्या कंपन्यांवरही अतिशय अनिष्ट परिणाम होणार आहे. अशा ठेवी स्वीकारणाऱ्या कंपन्यांची संख्या महाराष्ट्रात सर्वात जास्त असल्याने महाराष्ट्र सरकारने या निर्बंधाबाबत आपला तीव्र विरोध रिझर्व्ह बँकेला कळवून या निर्बंधात योग्य त्या सुधारणा करण्याची निकड रिझर्व्ह बँकेला पटवावी अशी माझी मुख्य मंत्री ना. वसंतराव नाईक यांना विनंती आहे" अशा आशयाचे उद्गार श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांनी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीजच्या वार्षिक साधारण सभेतील अध्यक्षीय भाषणात काढले.

हे नवे वर्ष आमच्या वाचकांस व हितचिंतकांस सुखाचे व समृद्धीचे जावो.

## लोकरीच्या कापडाच्या धंद्याचे भवितव्य

चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालात राजस्थानात गुरांच्या व मेंढ्यांच्या पैदाशीचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. हा कार्यक्रम भारतामधील लोकरीच्या कापडाच्या धंद्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरणार आहे. कारण, देशातील लोकरीचे उत्पादन व त्याची प्रतवारी ठरविण्याची व्यवस्था ह्या दोन बाबींकडे कार्यक्रमात विशेष लक्ष देण्यात येणार आहे. हिंदमधील लोकरीच्या कापडाच्या धंद्याला अजूनही परदेशातील लोकरीवर अवलंबून राहावे लागते. लोकरीचे तलम कापड तयार करण्यासाठी चांगल्या प्रतीची ८ कोटी रुपयांची लोकर आयात करावी लागते. राजस्थानात हाती घेण्यात येणारी योजना पार पाडण्यात यश आले तर १९७१ च्या सुमारास भारत लोकरीच्या बाबतीत बराचसा स्वयंपूर्ण होण्याची शक्यता आहे. देशातील मेंढ्यांची संख्या ४ कोटी असून त्यापैकी एक पंचमांश जनावरे राजस्थानात आहेत. देशातील लोकरीच्या एकूण उत्पादनापैकी ४५ टक्के उत्पादन राजस्थानात होते. ३ कोटी पौंड लोकरीच्या उत्पादनापैकी अर्धे उत्पादन परदेशी निर्यात करण्यात येते. उत्पादित लोकरीची प्रतवारी ठरविण्यावर आता लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. गालिच्यासाठी लागणारी लोकर मुख्यतः निर्यात करण्यात येते. ही लोकर आणि चांगल्या कापडासाठी लागणारी लोकर वेगळी करण्यात आली तर लोकरीच्या कापडाच्या धंद्याचे परावलंबित्व नष्ट होण्याच्या मार्गाला लागेल. कापडासाठी लागणारी निम्मी लोकर तरी ह्या मार्गाने उपलब्ध होऊ शकेल. परंतु लोकरीची प्रतवारी शास्त्रशुद्ध रीतीने करण्यासाठी आधी मेंढ्यांचे नीट वर्गीकरण करण्यात आले पाहिजे. आतापर्यंत अवघ्या ८० लाख जनावरांची ह्या दृष्टीने वर्गवारी करण्यात आलेली आहे.

---

## कायद्याबद्दलच्या अनादराची कारणे आर्थिक

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेने कलकत्ता येथे औद्योगिक विकासासंबंधी विचार करण्यासाठी परिषद् आयोजित केली होती. ह्या परिषदेत बोलतांना श्री. बी. एम्. बिर्ला म्हणाले की देशात सध्या कायद्याविषयी अनादराची भावना बळावून अस्वस्थ वातावरण निर्माण झाले आहे. ह्या वातावरणाचे मूळ सरकारने स्वीकारलेल्या चलनवाढीत आणि त्यामुळे झालेल्या किमतीच्या अफाट वाढीत आहे. किमती चढत गेल्यामुळे लोकांचे जीवनमान खालावले आहे. हिंदी लोक काम करण्यास असमर्थ आहेत अगर उत्पादन करण्यास असमर्थ आहेत असे मुळीच नाही. लोकात कोणत्याही प्रकारचे दोष नाहीत. परंतु त्यांच्या क्रियाशीलतेवर कडक आणि असमंजस बंधने घालण्यात आलेली असल्यामुळे सध्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. जबर कर आणि नियंत्रणे ह्यांनी त्यांना जखडून टाकलेले आहे. खरे म्हणजे भारताला त्यागमय जीवनाची आवश्यकता नाही. त्याला समृद्धीची जरुरी आहे. ८० टक्के लोकांचे जीवनमान इतक्या कनिष्ठ दर्जाचे आहे की त्यात अधिक काटकसरीने राहण्यास जागाच राहिलेली नाही. बहुसंख्य लोकांना फक्त स्वस्त मिळणारे अन्नच खाणे परवडते. अशा स्थितीत खाण्याच्या पदार्थात विविधता आणण्याची भाषा बोलणे म्हणजे त्यांची क्रूर थट्टा करण्यासारखे आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर परदेशीय चलनाचा जो निधी लाभला होता तो मोठा होता. उद्योगधंद्यात करावयाची गुंतवणूक जर शहाणपणाने करण्यात आली असती आणि आर्थिक धोरण वास्तव व व्यवहाराला धरून आखण्यात आले असते तर सध्या ज्या मालाची आयात करण्यात येते त्या मालापैकी मोठा हिस्सा देशातच उत्पादन करता आला असता. त्याशिवाय सध्या कर्जाचा जो मोठा बोजा आहे तोही उत्पन्न झाला नसता.

---

## हिंदच्या औद्योगिक वाढीला प्रशस्तीपत्र

धातूंच्या ओतकामाच्या कारखान्यांची व इतर एंजिनिअरिंग कारखान्यांची पाहणी करण्यासाठी परदेशी तज्ज्ञांच्या एका मंडळाने दौरा काढला होता. ह्या धंद्यातील तज्ज्ञांची आंतरराष्ट्रीय परिषद् दिल्ली येथे भरविण्यात आली होती, तिला हे तज्ज्ञ दूरदूरच्या देशाहून आले होते. त्यांनी दुर्गापूर येथील पोलाद कारखाना, रांची येथील भारी यंत्रसामग्रीचा कारखाना, चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांचा कारखाना, कुल्टी येथील लोखंड व पोलादाचा कारखाना आणि जमशेटपूर येथील टाटा कंपनीचा कारखाना ह्या ठिकाणांना भेटी दिल्या. परिषदेचे अध्यक्ष दौऱ्यासंबंधी बोलतांना म्हणाले की गेल्या १७ वर्षांच्या अवधीत भारताने सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांत भारी व मूलभूत उद्योगधंदे उभारण्याच्या कामात केलेली प्रगती डोळ्यात भरण्यासारखी आहे. हे धंदे उभारण्यास १७ वर्षांचा काल अल्पच समजला पाहिजे. भारताने धातूच्या ओतकामाच्या उद्योगधंद्यात बरीच उत्पादनक्षमता संपादन केलेली आहे आणि उच्च प्रतीचे तंत्रज्ञानही पैदा केले आहे. परंतु उत्पादन वाढविण्याकडे आणि उत्पादनाचा खर्च कमी करण्याकडे मात्र पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही. सार्वजनिक विभागातील जास्त उत्पादनखर्चाचे एक कारण असे आहे की ह्या विभागातील कारखान्यात प्रारंभीच अवाढव्य उत्पादनक्षमता उभारण्यात येते, आणि तिचा पूर्ण उपयोग झाला नाही म्हणजे साहजिकच उत्पादनाचा खर्च वाढतो. शिवाय सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक संघटनात उत्पादकतेच्या महत्त्वाची जाणीवही पुरेशी असत नाही. हिंदमधील ओतकामाचे कारखाने विशिष्ट उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्यासाठी काढण्यात आलेले असल्यामुळे त्यांच्या उत्पादनात विविधता आणणे कठीण जाते. परिणामी, उत्पादनखर्चात वाढ होते.

## परदेशात शिकलेल्या शास्त्रज्ञांचा उपयोग

मध्यवर्ती सरकारने तंत्रज्ञांची व शास्त्रज्ञांची एक यादी तयार ठेवून जसजशा संधी उपलब्ध होतील तसतसा त्यांचा योग्य ठिकाणी उपयोग करून घेण्याचा उपक्रम केलेला आहे. काही महिन्यांपूर्वी ह्या यादीतील ५० शास्त्रज्ञांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. हे शास्त्रज्ञ स्वतःसाठी योग्य अशा जागा शोधण्याचा प्रयत्न करीत नाहीत अशी टीका सरकारतर्फे करण्यात आली होती व परदेशी शिकण्यास गेलेल्या शास्त्रज्ञांविरुद्ध काही आरोप करण्यात आले होते. तथापि, ह्या प्रश्नाची दुसरी बाजूही लक्षात घ्यावयास हवी. निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत असलेले अनेकजण अमेरिकेसारख्या प्रगत देशात नोकरीसाठी जातात. पण हा प्रकार फक्त भारतातच घडतो असे नाही. ब्रिटनमधूनही बुद्धिमान शास्त्रज्ञ अमेरिकेस जातातच. संयुक्त अरब प्रजासत्ताक सरकारचीही अशीच तक्रार आहे. भारतापुरतेच पाहावयाचे तर सध्या सुमारे ५,००० वरिष्ठ प्रतीचे हिंदी शास्त्रज्ञ अमेरिकेत व ब्रिटनमध्ये काम करीत आहेत. ह्यांपैकी पुष्कळजण भारतात येऊन आपल्या देशाला आपल्या ज्ञानाचा फायदा देण्यास उत्सुक असतात. पण भारतात आल्यावर त्यांना त्यांच्या खास शाखेतील काम मिळेलच ह्याची शाश्वती नसते. त्यामुळे कामाचे अभावी कुंचबणा होण्याचा धोका उत्पन्न होतो. परदेशात शास्त्रज्ञांना अधिक चांगले वेतन मिळते हे खरे असले तरी सर्वच वेतनावर नजर ठेवून यागतात असे म्हणता येणार नाही. परदे शिक्षणास गेलेले शास्त्रज्ञ आता अधिक प्रमाणात मायदेशी परत येऊ लागले आहेत. १९६१–६२ साली अवघे २०० परदेशी शिक्षण घेतलेले शास्त्रज्ञ परत आले. आता दरसाल १ हजार शास्त्रज्ञ परततात आणि त्यांच्यापैकी ७० टक्के लोकांना योग्य अशा नोकऱ्याही मिळतात.

---

## राजस्थानमधील अणुविद्युत्-केंद्राचा विस्तार

कॅनडा आणि भारत ह्यांच्या दरम्यान राजस्थानमध्ये बांधण्यात येत असलेल्या अणुविद्युत्-केंद्राचा विस्तार करण्यासाठी एक करार करण्यात आला आहे. विस्ताराचे काम पूर्ण झाल्यावर केंद्रात २ लाख किलोवॅट अधिक वीज निर्माण होऊ लागेल. आता त्याची विद्युत्-उत्पादनक्षमता ४ लाख किलोवॅट इतकी होईल. राजस्थान व त्याच्या शेजारी असलेली राज्ये ह्यांना मिळणाऱ्या वीजपुरवठ्यात त्यामुळे सुधारणा होईल. विस्ताराच्या कामाबद्दलच्या अटी १९६३ साली करण्यात आलेल्या कराराप्रमाणेच असतील. कॅनडाने ह्या कामासाठी भारताला ३·८५ कोटी डॉलर्स कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. कर्जाचा उपयोग करून जरूर ती यंत्रसामग्री व उपकरणे कॅनडात खरेदी करण्यात यावयाची आहेत. तथापि शक्य तितक्या अधिक प्रमाणात हिंदी तंत्रज्ञांचे आराखडे व हिंदी उपकरणे वापरण्यात येतील.

## जवळच्या निर्यात बाजारपेठेकडे दुर्लक्ष !

निर्यात व्यापारात वृद्धी करून परदेशीय चलनाची प्राप्ती वाढविण्याचे प्रयत्न निरनिराळ्या निर्यात–वाढ–मंडळातर्फे करण्यात येत आहेत. त्या मंडळाचे कार्य उपयुक्तही ठरते. परंतु काही वेळा जवळच्या बाजारपेठेचा फायदा घेण्याकडे अहेतुकपणे दुर्लक्ष होते असे दिसते. इंडियन मार्केटिंग असोसिएशनचे अध्यक्ष श्री. शिवराम नायर ह्यांनी एका पत्रकात मॅलेशिया आणि सिंगापूर येथील बाजारपेठांत हिंदी माल फारसा दिसत नसल्याची तक्रार केली आहे. ते म्हणतात की मॅलेशिया आणि सिंगापूरची बाजारपेठ भारतापासून अवघ्या १,६०० मैलांवर आहे. तेथील लोकसंख्येत हिंदमधून आलेल्या नागरिकांचे प्रमाण एक पंचमांशाइतके आहे. असे असूनही तेथील बाजारपेठेत भारतीय बनावटीचा माल फारच अल्प प्रमाणात दिसतो. नाही म्हणण्यास हिंदी बोलपट मात्र तेथील चित्रगृहातून दाखविण्यात येतात. ह्याच्या उलट जपानी व्यापारी कंपन्यांनी आपल्या कचेऱ्या तेथे थाटलेल्या आहेत आणि कोणत्याही भागात भपकेबाज व आकर्षक रीतीने आपल्या मालाचे प्रदर्शन मांडले आहे. मॅलेशियाच्या सरकारने आता औद्योगीकरणाचे धोरण स्वीकारलेले आहे. ह्या नव्या परिस्थितीत हिंदी व्यापाऱ्यांना व उद्योगपतींना तेथे बस्तान बसविण्यास चांगला वाव मिळू शकेल. मॅलेशियन उद्योगपतींशी सहकार्य करून तेथे कारखाने काढणे शक्य आहे. सिंगापूर आणि कुआलालंपूर सारख्या राजधानीच्या मोठ्या शहरांतून हिंदी कंपन्या अगर त्यांचे संघटित गट ह्यांना वाव मिळण्यासारखा आहे. हिंदमध्ये तयार होणाऱ्या मालाचे आणि निर्यात करता येणाऱ्या वस्तूंचे एखादे प्रदर्शन तेथे भरविल्यास ह्या देशांची बाजारपेठ हस्तगत करण्याच्या कामी पहिले पाऊल उचलल्यासारखे होईल.

---

## भूमिहीन शेतकऱ्यांसाठी चार वसाहती

महाराष्ट्र सरकारने यवतमाळ जिल्ह्यांतील भूमिहीन शेतकऱ्यांसाठी ४ नमुनेदार वसाहती स्थापन करण्याचे ठरविले आहे. वसाहतीच्या प्राथमिक तयारीचे काम लवकरच सुरू करण्यात येईल. सर्व वसाहतीसाठी मिळून १५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. वसाहतीसाठी ४ खेडी निवडण्यात आली असून त्यांच्या परिसरात ३,६५० एकर जमीन उपलब्ध होईल. ह्या जमिनीवर ३०० भूमिहीन शेतकरी कुटुंबांची सोय करण्यात येणार आहे. ज्याने ५ वर्षे शेती केली आहे अशा प्रत्येक शेतकऱ्याला २० एकर जमीन लागवडीसाठी मोफत देण्यात येणार आहे. त्याशिवाय बैल, बीबियाणे व शेतीच्या अवजारासाठी सरकारकडून कर्जाच्या व इतर रूपाने मदतही देण्यात येणार आहे. राहण्यासाठी घरे, पाणीपुरवठा व इस्पितळ ह्या सोईही करून देण्यात येतील.

### चहाचे ब्रिटिश मळेवाले मायदेशी चालले

आसाम राज्यातील चहाच्या मळ्यांचे ५० मालक व बंगालमधील २० मळेवाले अलीकडे मायदेशी परतले आहेत. त्यांनी ह्या महिन्याच्या आरंभी मुंबईहून बोटीने प्रयाण केले. रुपयाच्या अवमूल्यनामुळे आणि वाढत्या करामुळे त्यांना चहाच्या मळ्यावर काम करणे किफायतशीर वाटत नाही. मार्च अखेर आर्थिक वर्ष संपले म्हणजे आणखी ५० ब्रिटिश मळेवाले भारत सोडून जातील असा अंदाज आहे. आसाममध्ये ४०० ब्रिटिश मळेवाले असून उत्तर बंगालमधील त्यांची संख्या २०० आहे. आसाम राज्यात ७४६ चहाचे मळे आहेत. त्यांपैकी २६७ मळे ब्रिटिश नागरिकांच्या मालकीचे आहेत.

### पुरुषांना स्त्री होण्याची हौस

अमेरिकेतील कॅलिफोर्निआ विद्यापीठात स्त्री–पुरुषांवर लिंग बदलण्याची शस्त्रक्रिया करणारे खाते आहे. ह्या खात्याकडे शस्त्रक्रियेसाठी करण्यात येणाऱ्या १०० अर्जांत ६६ अर्ज पुरुषांचे असतात. त्यांना स्त्रिया व्हावेसे वाटत असते. अशा प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी स्त्रियांपेक्षा पुरुषांकडूनच अधिक अर्ज येतात. काही समाजशास्त्रज्ञांच्या मताने अमेरिकन समाज पद्धतीत स्त्रियांचे वर्चस्व अधिकाधिक वाढत असून पुरुषांचे वर्चस्व घसरगुंडीला लागले आहे. समाजात आर्थिक, सामाजिक आणि लैंगिक स्वातंत्र्य दृढमूल झाले अगर होऊ लागले की स्त्री–पुरुष समान पातळीवर येतात असे सामान्यतः मानण्यात येते. परंतु अमेरिकन स्त्री मात्र अधिक हक्क गाजवणारी आणि आक्रमक वृत्तीची होत चालली आहे. थोडक्यात, अमेरिकेत स्त्री–राज्य होऊ घातल्याचे दिसत आहे.


### भारत इलेक्ट्रॉनिक्स कारखान्याची प्रगती

भारत इलेक्ट्रॉनिक्स कारखान्याचा १९६५–६६ सालचा अहवाल वार्षिक सभेस सादर करण्यात आला. कारखान्याने वसूल भांडवलावर ६ टक्के नफा जाहीर केला आहे. गतसाली कारखान्याने ५ टक्केच नफा वाटला होता. अहवालाच्या वर्षी कारखान्यात ९२·६७ लाख रुपये किमतीची उपकरणे व यंत्रांचे सुटे भाग तयार करण्यात आले. गेल्या वर्षाच्या उत्पादनाशी तुलना करता उत्पादनात ३१ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. प्राप्तीवरील करांची तरतूद करण्यापूर्वीचा कंपनीचा नफा १४४ लाख रुपये आहे. मागील वर्षी हा नफ्याचा आकडा ९६·५९ लाख रुपये होता. कारखान्यात काम करणाऱ्या नोकरवर्गाला त्याच्या मूळ पगाराच्या व महागाई भत्त्याच्या २० टक्के बोनस जाहीर करण्यात आला आहे. कारखान्याच्या प्रारंभापासून १९६६ च्या मार्च अखेरीपर्यंत कारखान्यात झालेल्या उत्पादनामुळे १७·७८ कोटी रुपयांचे परदेशीय चलन वाचले आहे.

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?



धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...
परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...



बहुधा, प्रत्येक तीन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.
किर्लोस्कर
डिझेल एंन्जिन्स
३ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)
TOM & BAY KO:667-A MAR

## भारतातील मोटारधंद्याचे वाढते उत्पादन

| | १९५५ | १९६० | १९६१ | १९६२ | १९६३ | १९६४ |
|---|---|---|---|---|---|---|
| मोटारगाड्या ... | ९,४९२ | १९,०९२ | २१,६६० | २३,३२८ | १५,७०८ | २३,२३२ |
| जीप्स ... | ३,३३६ | ५,४९६ | ७,०५६ | ७,५९६ | ८,११२ | १०,३९२ |
| ट्रक्स ... | १०,२६० | २७,५२८ | २५,६०८ | २६,८२० | २८,३८० | ३३,४८० |
| मोटारसायकली ... | ४२० | ३,९९६ | ९,०८४ | ८,८३२ | ९,०३६ | १३,८६० |
| स्कूटर्स ... | ५२८ | १३,०२० | १५,३३६ | १४,३१६ | १५,४३२ | २०,०४० |
| तिचाकी वाहने ... | — | ४९२ | १,२७२ | १,४२८ | १,७०४ | २,४९६ |
| ट्रेलर्स ... | १,६८० | २,०१६ | ३,०४६ | २,०२८ | ३,३८४ | ६,७९२ |

### जपानच्या दोन बेटांना जोडणारा बोगदा

ब्रिटन व फ्रान्स ह्यांना जोडणारा व खाडीखालून जाणारा बोगदा खोदण्यात येणार असल्याचे प्रसिद्धच आहे. ह्या बोगद्याबद्दलची माहितीही मधून मधून येत असते. पण अशाच प्रकारच्या दुसऱ्या बोगद्याची माहिती फारशी प्रसिद्ध नाही. जपानमधील हॉनशू आणि होकाइडो ह्या बेटांना जोडणारा बोगदा काही जपानी कंपन्या मिळून बांधीत आहेत. ह्या दोन बेटांमधील खाडी १४ मैल रुंदीची आहे. इंग्लिश खाडीखालील संकल्पित बोगद्यापेक्षा ह्या बोगद्याची लांबी कमी असली, तरी तिचा समुद्राखालून जाणारा मार्ग तिपटीने अधिक खोल आहे. एंजिनिअरिंगच्या शास्त्राच्या दृष्टीने हे काम फार महत्त्वपूर्ण मानले जात आहे. जगातल्या अशा प्रकारच्या मोठ्या कामात त्याची गणना करण्यात येत आहे. बोगदा खणण्यासाठी करावयाच्या प्राथमिक कामाला २० वर्षांपूर्वीच सुरुवात करण्यात आलेली आहे. १९७५ च्या सुमारास बोगदा पूर्ण होऊन त्यातून वाहतुकीला प्रारंभ करण्यात येईल असा अंदाज आहे. बोगद्याचा खर्च २०० कोटी रुपयांच्या घरात जाईल. तथापि हा बोगदा खणण्यामागे आर्थिक हेतू आहे. एंजिनिअरिंगचे एक साहसी काम एवढेच त्याचे महत्त्व नाही. जपानच्या एकूण क्षेत्रफळापैकी २० टक्के जमीन होकाइडो ह्या बेटात सामावलेली आहे. परंतु एकूण लोकसंख्येपैकी ५ टक्केच लोक ह्या बेटाचे रहिवासी आहेत. होकाइडो बेटाचा आर्थिक विकास त्वरेने घडवून आणण्यासाठी समुद्राखालील ह्या नव्या मार्गाचा मोठा उपयोग होण्यासारखा आहे. सगळ्यात मौज म्हणजे बोगदा बांधण्याचा निर्णय अधिकृतरीत्या घेण्यात आलेला नाही, आणि तरीही बांधकामाशी संबंधित असलेल्या कंपन्या आपले काम करीत आहेतच. बोगद्याचे काम पूर्ण झाल्यावर त्याला अधिकृत मान्यता देण्यात येईल अशी त्यांची समजूत आहे. म्हणूनच त्यांनी ही जोखीम पतकरली आहे.

### रासायनिक खताचे आणखी दोन कारखाने

भारत सरकारच्या आर्थिक समितीने बिहारमध्ये एक आणि आसाममध्ये एक रासायनिक खताचा कारखाना काढण्याचा निर्णय घेतला आहे. कारखान्यासाठी लागणारे भांडवल सरकारच उभारणार आहे. कारखान्याची जागा ठरविण्याचे काम खनिज तेल आणि रसायन खात्याकडे सोपविण्यात आले आहे त्याचप्रमाणे पैसे उभारण्याचे कामही ह्याच खात्याने अर्थखात्याच्या सल्लामसलतीने करावयाचे आहे. देशातील खताचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने दुर्गापूर व कोचीन येथे दोन कारखाने उभारण्याचे काम ह्यापूर्वीच हाती घेण्यात आले आहे. बिहारमधील कारखाना बरौनी येथे स्थापन करण्यात येण्याचा संभव अधिक आहे. कारण, रासायनिक खताच्या निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल ह्या ठिकाणी सुलभतेने मिळण्यासारखा आहे. बरौनी येथील तेलशुद्धीचा कारखाना चालू झाला असल्याने खतांच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल तेथे तयार होऊ लागला आहे. आसाममधील कारखाना नैसर्गिक वायूच्या साह्याने स्थापन करण्यात येणार आहे. ह्या राज्यातील नामरूप भागात नैसर्गिक वायू विपुलतेने मिळण्यासारखा असल्याने नामरूप भागातच नवा खताचा कारखाना उभारण्यात येण्याची शक्यता अधिक आहे. दोन्ही कारखाने प्रत्येकी २ लाख टन अमोनियाचे उत्पादन करू शकतील. कारखान्यांच्या उभारणीसाठी लागणाऱ्या खर्चापैकी काही खर्च परदेशीय चलनात करावा लागेल परंतु त्याचा फारसा बोजा सरकारवर पडणार नाही. कारण कारखान्यासाठी जरूर असणाऱ्या परदेशी चलनापैकी ३ ते ३.५ कोटी डॉलर्स देण्याची तयारी इटालियन कंपन्यांनी दाखविली आहे. त्यामुळे भारत सरकारला ५० लाख ते १ कोटी डॉलर्सपेक्षा अधिक परदेशीय चलन उपलब्ध करून द्यावे लागणार नाही. इटालीने दिलेले कर्ज भारताला अर्थातच परत करावे लागेल.

### ग्रेटब्रिटनमधील परदेशी विद्यार्थ्यांच्या फीमध्ये वाढ

ग्रेटब्रिटनमधील कॉलेजामधील परदेशीय विद्यार्थ्यांची फी वाढविण्याचे त्या सरकारने ठरविले आहे. गेल्या वर्षी ३०,००० परदेशी विद्यार्थ्यांनी फीच्या रूपाने जेवढे पैसे दिले, त्यापेक्षा त्यांचेवर १ कोटी, ८० लक्ष पौंड खर्च जास्त झाला होता. ह्या ३०,००० विद्यार्थ्यांपैकी ७,००० विद्यार्थी ज्या ठिकाणी उच्च शिक्षणाची चांगली सोय आहे, अशा देशांतून आलेले होते. फीवाढ केली, तरी फीमधील सवलत पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात दिली जाईल.

### डॉलरची किंमत किती उतरली?

१९३९ साली डॉलरची जेवढी किंमत होती ( १०० सेंटस ) तिच्या मानाने आता ती ४४ सेंट्स उरली आहे, १९५५ च्या मानाने ८४ सेंट्स आहे, १९६० च्या मानानें ९४ सेंट्स आहे, १९६५ च्या मानाने ९९.५ सेंट्स आहे. म्हणजे डॉलरची किंमत गेल्या काही वर्षांत फारशी कमी झालेली नाही.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


### इंजिनिअरिंग मालाची वाढती निर्गत

| वर्ष | कोटी रु. |
| --- | --- |
| १९५६ | ३.२८ |
| १९५७ | ३.८९ |
| १९५८ | ३.८४ |
| १९५९ | ४.७२ |
| १९६० | ८.०८ |
| १९६१ | ९.३३ |
| १९६२ | ९.६३ |
| १९६३ | १२.८५ |
| १९६४ | १५.८६ |

### पुस्तक प्रकाशनात घट

१९६३-६४ मध्ये भारतात एकूण २४,५९६ पुस्तके प्रसिद्ध झाली. १९६४-६५ मध्ये ती संख्या २१,२६५ वर उतरली आणि १९६५-६६ मध्ये ती आणखी घटून २०,११५ वर आली. ह्या २०,११५ पुस्तकांपैकी १०,४२८ पुस्तके इंग्रजी भाषेतील होती.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## बिगर-बँकिंग कंपन्यांकडील ठेवी
### रिझर्व्ह बँकेचा खुलासा

बिगर-बँकिंग कंपन्यांकडील बिगर-सभासदांच्या ठेवींवर २५% चे बंधन घालण्यात आले आहे, ते १ जानेवारी, १९६९ पासून पूर्णपणे अमलात येईल. मध्यंतरीच्या काळात–ह्या दोन वर्षांचे काळात–कंपन्यांनी नवीन ठेवी घेण्यास हरकत नाही; मात्र त्यामुळे २५% ची मर्यादा ओलांडली जाता कामा नये. पण, १ जानेवारी, १९६७ पूर्वीच्या ठेवी रिन्यू करायला हरकत नाही. त्यामुळे २५% ची मर्यादा ओलांडली गेली, तरी आधीच घेतलेल्या काही ठेवींची परतफेडीची तारीख १ जानेवारी, १९६९ नंतर असेल, तर कंपन्यांनी काय करावे, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. अशा प्रकरणी रिझर्व्ह बँक अपवाद करू शकेल आणि परतफेडीच्या तारखेपर्यंत मर्यादाभंगास सवलत देईल. १ जानेवारी, १९६७ पूर्वी स्वीकारलेल्या ठेवींनाच ही सवलत मिळू शकेल. कंपन्यांचे सभासद, संचालक, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स, मॅनेजिंग एजंट्स ह्यांच्याकडून बिगर-तारणावर कंपन्या कर्जे घेऊ शकतील. त्याचप्रमाणे संचालकांनी, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्सनी किंवा मॅनेजिंग एजंटांनी हमी घेतलेल्या कर्जासही हरकत नाही.

## कुटुंबनियोजनाचा हुकमी उपाय
### स्त्रियांच्या विवाहाचे वय वाढविण्याची सूचना

सध्या अमलात असलेल्या शारदा कायद्याप्रमाणे विवाहाचे वेळी वधूचे किमान वय १६ वर्षांचे असावे लागते, ते २१ वर्षांचे करावे, अशी सूचना मध्यवर्ती कुटुंबनियोजन इन्स्टिट्यूटने केली आहे. मध्यवर्ती कुटुंबनियोजन कौन्सिल त्या सूचनेचा विचार करणार आहे. "शारदा कायद्याने विवाह वय १४ वर्षांपासून १६ वर्षांपर्यंत वाढवीत नेले आहे. कायद्याने सामाजिक सुधारणा घडवून आणता येते, असे शारदा कायद्याने दाखवून दिले आहे. विवाहच उशीरा झाला, म्हणजे त्याचा अपत्यसंख्येवर आपोआपच परिणाम होईल." असे इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर, डॉ. बी. एल. रैना ह्यांनी मत व्यक्त केले आहे.

सरकारने कायदा करून जरी स्त्रियांच्या विवाहास २१ वर्षांचे बंधन घातले, तरी त्याची अंमलबजावणी कठीण होईल. मुलींचे विवाह करून टाकून जबाबदारीतून मुक्त होण्याची पालकांची धडपड चालू असते; मुलीच्या भवितव्याची त्यामुळे काळजी उरत नाही. २१ व्या वर्षांपर्यंत मुलीला अविवाहित ठेवणे कितीतरी पालकांना आर्थिक दृष्ट्या परवडत नाही, हे सत्य आहे. शारदा कायदा मोडला जातो, त्याचेही कारण तेच आहे. जी गोष्ट आर्थिक परिस्थिती सुधारून आणि प्रचार करून घडवून आणता येत नाही, ती केवळ कायदा करून साध्य होणे कठीण व अनिष्ट ठरेल; कायदा करून आपले कर्तव्य पार पाडल्याचे सरकारला खोटे समाधान लाभेल, एवढेच.

## उमेदवारांसाठी तात्पुरते टेलिफोन

येत्या सार्वजनिक निवडणुकीचे वेळी निवडणूक लढविणाऱ्या सर्व पक्षांना तात्पुरते टेलिफोन मिळण्याच्या बाबतीत समान संधी मिळेल, असे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. सहा महिन्यांसाठी त्यांना तात्पुरते कनेक्शन मिळेल; प्रत्यक्ष उमेदवारांना, त्यांची उमेदवारी मंजूर झाल्यानंतर, स्वतःच्या निवडणूक विभागात तीन महिन्यांसाठी टेलिफोन मिळतील, एक लक्ष लोकवस्तीपेक्षा जास्त विभागातील उमेदवाराला प्रत्येकी दोन आणि इतर ठिकाणी एक टेलिफोन देण्यात येईल.

## वॉल्ट डिस्नेचे मृत्युपत्र

वॉल्ट डिस्ने गेल्या महिन्यात मृत्यू पावले. त्यांनी १८ मार्च, १९६६ रोजी करून ठेवलेल्या मृत्युपत्राप्रमाणे त्यांच्या पत्नीला इस्टेटीपैकी ४५% हिस्सा मिळणार आहे; आणखी ४५% हिस्सा डिस्ने फौंडेशनला मिळेल आणि उरलेला १०% हिस्सा त्यांच्या तीन भाच्या व एक बहीण ह्यांना मिळेल. त्यांच्या दोन्ही भावांसाठी त्यांनी काहीही ठेवलेले नाही.

## रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर

पंतप्रधानांचे सेक्रेटरी, श्री. एल. के. झा ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नेमणूक झाली आहे. ते आपल्या जागेवर १ जुलै रोजी रुजू होतील. सध्याचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य ह्यांची मुदत फेब्रुवारीअखेर संपत आहे, परंतु श्री. झा ह्यांच्या सोईसाठी ती जूनअखेर वाढविण्यात आली आहे.

## गोवा स्वातंत्र्याची पाच वर्षे*

साडेचार शतकांच्या पारतंत्र्यातून मुक्त झालेला आपला गोमंतक केंद्रशासित राहावा की तो महाराष्ट्रात विलीन व्हावा, ह्याचा निर्णय गोमंतकीय जनतेला लवकरच घ्यावा लागणार आहे. "गोव्यातील जनता स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून लोकशाहीची प्रगत राजवट स्वीकारणार, की केंद्र सत्तेच्या पंखाखाली राहून संकुचित, दबाबंद जीवन जगणार?" असा प्रश्न संपादक श्री. मु. शं. किर्लोस्कर ह्यांनी आपल्या प्रास्ताविकात गोमंतकीयांना विचारला आहे. गोमंतकीय जीवनाचा प्रवाह महाराष्ट्राच्या विशाल प्रवाहातच मिसळला पाहिजे, हेच निसर्ग व इतिहासक्रमास धरून आहे, असे त्यांनी त्याचे उत्तरही दिले आहे. प्रस्तुत प्रकाशनात श्री. दत्ता सराफ ह्यांनी घेतलेली गोव्याचे मुख्य मंत्री श्री. दयानंद बांदोडकर ह्यांची विशेष मुलाखत भाऊसाहेबांच्या सौजन्यशील व्यक्तिमत्त्वावर आणि त्यांच्या कर्तृत्वावर उत्कृष्ट प्रकाश पाडणारी आहे. पहिल्या लोकनियुक्त मंत्रिमंडळाची कामगिरी वर्णन करणारे आणि अनुषंगिक माहिती देणारे अनेक लेख ह्या प्रकाशनात प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

* किर्लोस्कर प्रेसचे विशेष प्रकाशन. ५० पैसे

### मुंबईच्या प्रश्नांचा वृथा बाऊ

" जागतिक प्रमाणकानुसार पाहिले, तर मुंबई मोठी किंवा फार गजबजलेली आहे असे नाही. मुंबईचे नागरी अधिकारी न्यूयॉर्क, टोकिओ किंवा बर्लिन यांच्याप्रमाणे योजनाबद्ध आखणी करीत नाहीत म्हणून मुंबईच्या प्रश्नांचा आपणास वृथा बाऊ वाटत आहे. अशा स्थितीत मुंबईत कारखाने काढण्यावर बंदी घालणे चुकीचे होईल असे मला वाटते. तशी बंदी घातली, तर ते कारखानदार इतर राज्यांत जातील व त्या प्रमाणात आपण त्या उद्योगांना मुकू. महाराष्ट्राच्या आंतरप्रदेशाचा विकास हा मुंबईच्या विकासावर बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे, हे आपण विसरता कामा नये. "—श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांच्या, मराठा चेंबरमधील अध्यक्षीय भाषणातील उतारा.

### शास्त्रीय संशोधकांना डॉ. रामन् ह्यांचा सल्ला

इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्स ह्या संघटनेची ३२ वी वार्षिक बैठक मदुरा येथे भरविण्यात आली होती. ह्या बैठकीत बोलताना डॉ. सी. व्ही. रामन् म्हणाले की, शास्त्रज्ञांनी आपआपल्या ज्ञान-शाखांचा विचार करतांना साकल्यदृष्टी ठेवली पाहिजे. रसायनशास्त्र, जीवशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, गणितशास्त्र इत्यादी शास्त्रे एकमेकांपासून अगदी निराळी आहेत असे मानता येत नाही. कोणत्याही एखाद्या शास्त्रशाखेत प्रगती करण्यात आली तर तिचा उपयोग इतर शास्त्रशाखांनाही झाल्याशिवाय राहात नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. शास्त्रीय संशोधन करताना परदेशातून आयात केलेली नाजूक व सूक्ष्मतम उपकरणेच वापरण्याचा कल काही संशोधकांत दिसून येतो. तथापि भारतातच तयार करण्यात आलेल्या योग्य उपकरणांच्या साह्याने संशोधन करता येणार नाही असे नाही. शास्त्राच्या उच्च क्षेत्रातही त्यांच्या साहाय्याने संशोधन करता येईल.

### शेतीच्या अवजारांसाठी संशोधन संस्था

इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल एंजिनिअरिंग ह्या संघटनेची ५ वी वार्षिक बैठक भोपाळ येथे भरविण्यात आली होती. शेतीशी संबंधित असणाऱ्या एंजिनिअरिंगसाठी एक संघटना स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. ह्या संस्थेने शेतीच्या अवजारांविषयी संशोधनाचे व नवेनवे नमुने हुडकून काढण्याचे काम करावयाचे आहे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या प्रकारच्या शेतीच्या अवजारांच्या कार्यक्षमतेची चाचणीही संस्थेने करावयाची आहे. हिंदमधील शेतीच्या धंद्याची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी यंत्रचलित साधनांचा वापर आवश्यक आहे. परंतु ही साधने वापरण्यासाठी जमीनधारणा कायद्यातील कमाल जमिनीची मर्यादा वाढविली पाहिजे असा इशारा बैठकीत देण्यात आला. प्रत्येक राज्याने भूगर्भात असलेल्या पाण्याचा शेतीसाठी वापर करण्यासाठी तपशीलवार पाहणी करावी अशीही शिफारस करण्यात आली.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ११.९१ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १६.०८ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४३८.०२ ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४९०.७३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८

दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड

मुख्य कचेरी : सातारा (महाराष्ट्र)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २० लाख |
| वसूल भांडवल | रु. १२ लाखांवर |
| खेळते भांडवल | रु. ६ कोटी, ५० लाखांवर |
| गंगाजळी | रु. ८ लाख, ५० हजारांवर |
| ठेवी | रु. ५ कोटी, ५० लाखांवर |

शाखा सत्तावीस

मुदतठेवी आकर्षक व्याजाने स्वीकारल्या जातात.

रा. ना. गोडबोले, अध्यक्ष संचालक मंडळ
वि. श्री. दामले, जनरल मॅनेजर

## भारतातील सहकारी चळवळींची प्रगती
## ( १९६४–६५ )

भारतातील एकूण सहकारी पतपेढ्यांची संख्या १९६४–६५ अखेर २,२४,४५४ होती. १९६३–६४ अखेर ती २,३२,९१६ होती. सर्वांत जास्त घट उत्तर प्रदेशात ( ६,४६३ ) आणि ओरिसात ( २,१६३ ) झाली.

प्राथमिक पतपेढ्यांची ( प्राथमिक लँड मॉर्गेज बँका धरून ) सभासद–संख्या ३४४·४२ लक्ष होती; म्हणजे पूर्वीच्या वर्षाच्या मानाने ती २४·११ लाखांनी अथवा ७·५३% ने वाढली.

त्यांचे स्वतःचे फंड ३२६ कोटी रु. चे ३७० कोटी रु. झाले. खेळते भांडवल १,६४८ कोटी रु. चे १,८९८ कोटी रु. झाले.

त्यांनी १९६४–६५ मध्ये ५८४ कोटी रु. ची कर्जे दिली; म्हणजे पूर्वीच्या वर्षापेक्षा ११·५७% कर्जे अधिक दिली.

वसुली ५०५ कोटी रु. ची झाली; येणे कर्ज ६६१ रु. होते.

थकबाकी पूर्वीच्या वर्षी ९२ कोटी रु. होती, ती ११२ कोटी रु. वर गेली. म्हणजे, येणे कर्जाशी थकबाकीचे प्रमाण १६·९% पडते. पूर्वीच्या वर्षी ते १५·६% होते.

१९६४–६५ मध्ये राज्य सहकारी बँकांत एका बँकेची ( अंदमान आणि निकोबर बेटांच्या बँकेची ) भर पडून त्यांची संख्या २२ झाली. त्यांची सभासद संख्या सुमारे २,००० नी कमी होऊन २१,१५७ झाली. व्यक्ती सभासदात ५४ ची भर पडली. त्या सर्व बँकांचे वसूल भांडवल १·९८ कोटी रु. नी वाढून २७·४६ कोटी रु. झाले. त्यापैकी १·१५ कोटी रु. सहकारी संस्थाचे होते आणि बाकीचे सरकारचे होते. खेळते भांडवल ३२८ कोटी रु. चे ३७० कोटी रु. झाले. त्यापैकी ५६% कर्जाऊ होते.

सर्व राज्य सहकारी बँकांत महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मोठी असून तिचे खेळते भांडवल ८४·४० कोटी रु. होते; तिची येणे कर्जे ६३·५६ कोटी रु. ची होती. तिच्या खालोखाल उत्तर प्रदेश आणि मद्रास केंद्रीय बँकांचा अनुक्रम येतो.

### मध्यवर्ती सहकारी बँका

मध्यवर्ती सहकारी बँकांची संख्या ३६० होती; म्हणजे ती १२ ने कमी झाली. त्यांची सभासद–संख्या ३,६५,३९४ होती. सहकारी संस्था सभासदात ४,७३७ ची भर पडली, तर व्यक्ती सभासद ४,३५२ ने कमी झाले; सभासदात २,६१,२८८ सहकारी संस्था होत्या आणि १,०४,१०६ व्यक्ती होत्या. मध्यवर्ती सहकारी बँकांचे खेळते भांडवल ४६० कोटी रु. चे ५२५ कोटी रु. झाले. खेळत्या भांडवलापैकी ७४·४%चा विनियोग कर्जे देण्याकडे झाला. ठेवींचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण महाराष्ट्रात सर्वांत जास्त ( ५४·०% ) होते.

स्वतःच्या फंड्सची दर मध्यवर्ती बँकेगणिक सरासरी सबंध भारताच्या बाबतीत २५·६२ लक्ष रु. आहे; मद्रास राज्यात ती सर्वांत अधिक, ७९·६१ लक्ष रु. होती; महाराष्ट्रात ६२·२५ लक्ष रु. होती. एकूण ३६० बँकांपैकी फक्त ४४ बँकांचे स्वतःच्या मालकीचे फंड्स प्रत्येकी ५० लक्ष रु. पेक्षा अधिक होते. १ कोटी रु. पेक्षा जास्त ठेवींच्या बँकांची संख्या ४५ ची ५५ झाली. त्यापैकी २२ महाराष्ट्रात होत्या. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सर्वांत जास्त ठेवी ( ५·७५ कोटी रु.) होत्या; त्या खालोखाल जळगाव जिल्हा बँकेचा (५·३२ कोटी रु.) आणि पुणे जिल्हा बँकेचा ( ५·१६ कोटी रु. ) अनुक्रम लागला. सुरत जिल्हा बँकेकडे ५·११ कोटी रु. च्या ठेवी होत्या.

मध्यवर्ती बँकांनी दिलेली कर्जे ६०७ कोटी रु. ची होती; त्यापूर्वीच्या वर्षी ती ५२९ कोटी रु. ची होती. अल्प मुदतीची कर्जे ५७६ कोटी रु. ची होती. थकबाकीचे प्रमाण १५·७% चे वाढून १६·९% झाले.

प्राथमिक शेतकी पतपेढ्यांची संख्या आणखी घटून २,०९,६२२ ची २,०१,०४६ झाली. त्यापैकी सुमारे दोन तृतीयांश मर्यादित जबाबदारीच्या आणि बाकीच्या अमर्यादित जबाबदारीच्या होत्या. सभासद संख्या २३७·२८ लाखांची २५४·११ लाखांवर गेली. कर्जदार सभासद १०९·५९ लाख होते. म्हणजे, एकूण सभासदांशी त्यांचे प्रमाण ४३% पडले. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि पंजाब ह्या राज्यांत ते ५०% पेक्षा जास्त होते. त्यांचे खेळते भांडवल ४६·२८ कोटी रु.नी वाढून ते ४८६·६७ कोटी रु. झाले. त्यांचे वसूल भांडवल १०३·८६ कोटी रु. होते, त्यापैकी सरकारचे ९·९३ कोटी रु. होते. त्यांनी ३२१ कोटी रु. कर्जाऊ घेतलेले होते. त्यातले ३०५ कोटी रु. मध्यवर्ती सहकारी बँकांनी दिलेले होते. थकबाकी ९५·८५ कोटी रु. म्हणजे २५·९% होती. त्यापूर्वीच्या वर्षी ती ७७·३१ कोटी रु. म्हणजे २२·५% होती.

बिगर–शेती पतपेढ्यांची ( ह्यात मुख्यतः अर्बन बँकांचा आणि नोकरांच्या पतपेढ्यांचा समावेश होतो ) संख्या १३,३२३ ची १३,७२९ झाली; त्यांची सभासद संख्या ५६·७७ लाखांची ६१·७३ लाख झाली. त्यांचे खेळते भांडवल ३३·१९ कोटी रु. नी वाढून २५१.०४ कोटी रु. झाले. त्यांच्याकडील एकूण ठेवींपैकी ( १५९·०९ कोटी रु. ) चार पंचमांश ठेवी महाराष्ट्र, प. बंगाल, मद्रास आणि गुजरात ह्या राज्यांतल्या आहेत. त्यांनी २३२·७५ कोटी रु. ची कर्जे दिली.


---

**कामगारांना शहरेच आवडतात**—गुजरात विद्यापीठातर्फे करण्यात आलेल्या पाहणीत असे आढळून आले की, बहुतेक कामगार ग्रामीण भागापेक्षा शहरात राहणेच पसंत करतात. कारण, शहरात त्यांना अधिक वेतन मिळते. कामगारांपैकी फक्त १८ टक्के कामगारच नोकरी संपल्यावर आपल्या मूळच्या गावी परतण्याची इच्छा करतात.

# शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें

भारतांतील निरनिराळ्या राज्यामधून वीज निर्मितीच्या योजना कार्यवाहीत आल्यामुळें शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें खुलीं झालीं आहेत. आज खेड्यापाड्यांतून शेतीसाठीं लिफ्ट इरिगेशन, शहरी व ग्रामीण पाणी पुरवठा व इतर लहानमोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा किर्लोस्कर पंपिंग सेटस कार्यक्षमतनें करूं शकतात. आपल्या योजनेसाठीं कोणता किर्लोस्कर पंप सेट निवडावा याबाबतचा तांत्रिक सल्ला आपल्याला आमचेकडून विनामूल्य मिळूं शकेल.






वैशिष्ट्यें :

- डबल सक्शन
- मजबूत बांधणी व दीर्घकाळ टिकाऊ
- कार्यक्षम व काटकसरी
- ग्रीज कमी व दुरुस्तीस सोपा

## किर्लोस्कर



टाइप "यूपी"
५ ते ३०० हॉ. पॉ. पंपिंग सेट

उत्पादक

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

"ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १८ जानेवारी, १९६७ | अंक २

## विविध माहिती

**आगगाड्या व विमाने ह्यांची स्पर्धा**—जपानमधील अंतर्गत विमानवाहतूक करणाऱ्या कंपन्यांना वेगवान आगगाड्यांची जोराची स्पर्धा जाणवत आहे. वेगाने धावणाऱ्या गाड्या सरकारच्या मालकीच्या आहेत. अशी एक अतिवेगवान गाडी टोकिओ ते ओसाका ह्यांच्या दरम्यान दर तासाला १२५ मैल वेगाने प्रवास ३ तासांत करते. दर अर्ध्या तासाला अशी एक गाडी सोडण्यात येते.

**राष्ट्रीय पुढाऱ्यांचा चरित्रकोश**—कलकत्ता येथील ऐतिहासिक अभ्यास संस्थेने हिंदच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांचा चरित्रकोश प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे. चरित्रकोशाच्या कामास १९६३ साली प्रारंभ करण्यात आलेला आहे. ह्या चरित्रकोशात १,२०० हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांची चरित्रे देण्यात येणार आहेत. ९५० पुढाऱ्यांची चरित्रे पूर्ण करण्यात आली आहेत.

**दातांची आरोग्यकेंद्रे**—दिल्ली येथे दंतवैद्यकारासंबंधी परिषद भरविण्यात आली होती. परिषदेचे उद्घाटन करताना उपराष्ट्रपती डॉ. झकीर हुसेन म्हणाले की हिंदच्या ५० कोटी प्रजेला पुरेशी दंतवैद्यकाची केंद्रे आज उपलब्ध नाहीत. परिषदेत अशी माहिती देण्यात आली की भारतात सध्या अवघी २५० केंद्रे आहेत. भारतामधील ८० हजार ते ९० हजार लोकांमागे एक दंतवैद्य असे प्रमाण आज आहे. दोन दोन लाख लोकवस्तीच्या कित्येक भागांत एकही दंतवैद्य आढळून येत नाही.

**फुफ्फुसाचा कॅन्सर हा मानवनिर्मित आहे**—अमेरिकेच्या कॅन्सरसंबंधी सल्ला देणाऱ्या संस्थेच्या मताने फुफ्फुसाचा कॅन्सर हा रोग अतिरिक्त धूम्रपानाचा परिणाम आहे. ह्या रोगाने आता साथीचे स्वरूप धारण केलेले आहे. ह्या वर्षी २ हजार पुरुष आणि २ हजार स्त्रिया ह्या रोगाला बळी पडतील असा संस्थेचा अंदाज आहे. ३० वर्षांपूर्वीच्या मानाने ही संख्या १० पट अधिक आहे.

**चहाच्या किमतीचे स्थैर्य**—सिलोनच्या परदेशीय हुंडणावळी[illegible]पैकी ६० टक्के प्राप्ती चहाच्या निर्यातीमुळे होते. परंतु गेल्या काही महिन्यांत जगातील चहाच्या बाजारपेठेत किमती घटत चालल्या आहेत. त्यामुळे सिलोनच्या सरकारला चिंता उत्पन्न झाली आहे. चहाच्या किमती स्थिर राखण्यासाठी सिलोनच्या मळेवाल्यांनी भारतामधील मळेवाल्यांशी वाटाघाटी चालू केल्या आहेत. सिलोनने आता वायद्याचे सौदे चालू केले आहेत.

**लष्करी वाहनांचे उत्पादन**—लष्कराला लागणारी वाहने तयार करण्याचा एक नवा कारखाना जबलपूर येथे स्थापन करण्यात येणार आहे. तो चालू झाल्यावर लष्करी वाहनांचे उत्पादन दुपटीने वाढेल. सध्यां 'शक्तिमान' व 'निसान' ह्या मोठ्या मोटारी आणि 'जीप्स' ह्यांचे दरमहाचे उत्पादन ६०० च्या घरात आहे. ते नंतर १,२०० पर्यंत होऊ लागेल.

**बल्गेरिआची भारताला मदत**—बल्गेरिआने भारताला १·५ कोटी डॉलर्सची मदत देण्याची तयारी दाखविली असून भारत सरकारने ह्या मदतीचा स्वीकार केला आहे. मदतीचा उपयोग करून भारताने बल्गेरिआत अवजड यंत्रसामग्री खरेदी करावयाची आहे. यंत्रसामग्रीचा उपयोग खाजगी व सार्वजनिक विभागात करण्यात येईल.

**किडीविषयी इषारा**—दिल्ली राज्यातील शेतकऱ्यांना पिकावर पडणाऱ्या रोगांविषयी आगाऊ इषारा देण्याचे काम इंडियन अग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूट ह्या संस्थेने चालू केले आहे. धान्य व भाजीपाला ह्यावर पडणाऱ्या किडीपासून त्यांचे संरक्षण करण्याचे काम शेतकऱ्यांना आता त्यामुळे अधिक चांगल्या रीतीने करता येईल.

**ताश्कंद येथे शास्त्रींचे स्मारक**—ताश्कंद येथे लालबहादूर शास्त्री ह्यांचे स्मारक उभारण्याचे उझबेकिस्तानच्या सरकारने ठरविले आहे. त्याप्रमाणे सरकारने स्मारकासाठी अनेक प्रकारचे नमुने गोळा केले आहेत. त्यापैकी १५ नमुने विचारासाठी निवडण्यात आले आहेत. ताश्कंदच्या जनतेच्या इच्छेला अनुसरून स्मारक उभारण्यात येत आहे.

### शहरांच्या वाढीमुळे लोकसंख्येला पायबंद

शास्त्राच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणारी एक अमेरिकन संघटना आहे. सदर संघटनेच्या वार्षिक बैठकीच्या वेळी लोकसंख्या ह्या विषयासंबंधी परिसंवाद भरविण्यात आला होता. वॉशिंग्टन येथे भरलेल्या ह्या परिसंवादांत डॉ. ओर्लीन ह्या स्त्री-डॉक्टरांचे भाषण झाले. त्या स्वीडिश असून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकसंख्या विभागात काम करतात. त्या आपल्या भाषणात म्हणाल्या की शहरांतील जीवनपद्धतीमुळे लोकांच्या मनावर व शरीरावर फार ताण पडतो. त्यामुळे माणसांच्या जननक्षमतेवर परिणाम होऊन ती कमी होते. हीच गोष्ट प्राण्यांच्या बाबतीतही खरी आहे. शहरातील लोकांची जननक्षमता ही त्याच्या जवळच्या ग्रामीण भागातील लोकांपेक्षा सातत्याने कमी असल्याचे आढळून येते. तथापि शहरातील राहणीचा लोकसंख्येच्या वाढीवर काय परिणाम होतो ह्यासंबंधी अधिक तपशीलवार पाहणी करण्यात आली पाहिजे. पूर्व युरोपातील काही देशांत शहराची वाढ झाल्यावर तेथील लोकांची जननक्षमता घटल्याचे आजच आढळून येत आहे. हंगेरीत लोकसंख्या घटत जाण्याची लक्षणे दिसत आहेत. भारतामधील लोकसंख्येच्या वाढीच्या वेगाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या की भारतामधील शहरांतून वसती करून असलेल्या लोकांपैकी बरेचजण नुकतेच ग्रामीण भागांतून आलेले आहेत. चीनचीही गोष्ट अशीच आहे. शहरांतील दाट लोकवस्तीमुळे आणि घाईगर्दीच्या जीवनामुळे लोकांची अपत्यांची इच्छा कमी होते आणि त्याचबरोबर जननक्षमताही कमी होते. लोकसंख्येच्या वाढीवर जाणीवपूर्वक नियंत्रण ठेवण्यात आले नाही तर त्याची काळजी निसर्गच घेईल. पण निसर्गनियमानुसार घडत जाणाऱ्या घटना माणसाला सुखकारक ठरतील अशी ग्वाही नाही.

---

### पैशापेक्षासुद्धा आत्मविश्वासाची अधिक गरज

इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. जी. एल. मेहता ह्यांनी मुंबई येथे रोटरी क्लबात भाषण करताना महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की आर्थिक मदत आणि तांत्रिक कौशल्य ह्यांच्यापेक्षाही आज भारताला आत्मविश्वासाची अधिक गरज आहे. त्याखेरीज सध्याच्या बिकट आर्थिक परिस्थितीतून वाट निघणे अवघड आहे. भारतासारख्या गरीब देशात लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल आणि सामान्य जनतेच्या दृष्टीने तिला काही अर्थ प्राप्त व्हावयाच असेल तर लोकशाहीचा गाभा आर्थिक व सामाजिक मूल्यावर आधारावयास हवा. भारतामधील मतदार हा ग्राहक आहे, उत्पादक आहे आणि करदाताही आहे. स्वतःच्या प्राथमिक गरजा पुरविल्या जातील आणि मुलाबाळांचा भविष्यकाळ अधिक चांगला होईल अशा मागण्या करण्याचा त्याचा हक्कच आहे. आज वाढत्या किंमतीमुळे आर्थिक दैन्य जोरावलेले आहे, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई जाणवत आहे, रोजगार मिळत नाही. ह्या सर्वांचा परिणाम राजकीय परिस्थितीवर व चळवळीवर होत आहे. परदेशाकडून मदत मिळविणे हा जणू काही आपला जन्मसिद्ध हक्कच आहे असे मानण्यात येत आहे. एखाद्या परदेशाने मदत नाकारली तर तो विश्वासघात झाला असे समजण्यात येते. परदेशाकडून मिळणारी मदत कृतज्ञता व्यक्त करून स्वीकारण्याचे आमच्या धोरणात बसत नाही. भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचा नेमका अर्थ सांगणे कठीण आहे. परंतु दिलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजे त्या पवित्र धोरणाशी बेइमानी करण्यासारखे आहे असे मानले जाते. आर्थिक विकासाच्या योजनांच्या मागण्या आर्थिक आणि तांत्रिक आधारावर न करता प्रांतीय हितसंबंध राखण्याच्या हेतूने करण्यात येत आहेत.

---

### अप्रगत देशांना भारताकडून मदत

पश्चिम युरोपातील देश, अमेरिका, रशिया, जपान, ह्यांच्याशी तुलना करता भारत हा औद्योगिकदृष्ट्या अप्रगत देश आहे. चीनच्या मानानेही भारत काहीसा मागासलेला असण्याचा संभव आहे. जगातील सर्वच देश औद्योगीकरणाच्या शर्यतीत गुंतले असले तरी ह्या बाबतीत पुढारलेले देश त्यांच्यापेक्षा मागे असलेल्या देशांना मदत करू शकतात. भारत स्वतःचा विकास साधण्यासाठी प्रगत देशांकडून तांत्रिक ज्ञान मिळवत आहे. त्याचप्रमाणे स्वतःपेक्षा मागे असलेल्या देशांना तांत्रिक मदत करीत आहे. चार खंडांत पसरलेल्या १८ अप्रगत देशांना भारताकडून तांत्रिक साह्य मिळत आहे. सर्व देशांत मिळून भारताने ४३ कारखाने स्थापण्यास मदत केली आहे अगर करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या १८ देशांपैकी ७ आफ्रिकेतील आहेत आणि ७ आशियातील आहेत. बाकीचे ४ देश म्हणजे उत्तर आयर्लंड, नोव्हास्कोशिआ, कॅनडा व कोलंबिया हे आहेत. ब्रिटनसारख्या पुढारलेल्या देशालाही हिंदी तांत्रिक ज्ञान उपयुक्त वाटत आहे. ब्रिटनमध्ये ॲस्बेस्टॉस सिमेंटच्या वस्तू तयार करण्याचा एक कारखाना भारताच्या साह्याने उभारण्यात येणार आहे. हिंदमधील खाजगी मालकीच्या विभागाकडून ही तांत्रिक मदत देण्यात येत आहे. ४३ कारखान्यांपैकी २३ आफ्रिकेतील देशांत आहेत, आणि १५ कारखाने आशियातील देशांत आहेत. कारखान्यांपैकी ७ कारखान्यांत उत्पादन चालू झालेले आहे. बाकीचे कारखाने अजून कमी-अधिक प्रमाणात पुरे व्हावयाचे आहेत. हलका एंजिनिअरिंगचा माल, दाढीची पाती, कापड, साबण, साखर, औषधे, कागद, छपाईची शाई, शिवणाची यंत्रे, इत्यादी प्रकारचा माल बनविण्याबद्दलचे तांत्रिक ज्ञान भारताने पुरविलेले आहे.

# अर्थ

बुधवार, १८ जानेवारी, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी शास्त्रज्ञांमधील राष्ट्रीय भावनेचा लोप

इंडियन सायन्स काँग्रेसच्या ५४ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष व दिल्ली विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक टी. आर. शेषाद्री ह्यांनी आपल्या भाषणात हिंदी शास्त्रज्ञांविषयी चिंतनीय उद्गार काढले आहेत. ते म्हणाले की हिंदमधून परदेशांत शिक्षणासाठी गेलेल्या काही शास्त्रज्ञांचा मानसिक तोल गेल्यासारखा वाटतो. त्यांना स्वतःच्या राष्ट्रीयत्वाची जाणीवही राहिलेली दिसत नाही. कित्येक हिंदी शास्त्रज्ञ तर अशा रीतीने वागतात—बोलतात कीं, त्यांना आपण भारतीय नागरिक आहोत असेही वाटत नसल्याचे वाटते. परदेशांत संशोधन करीत असलेले सर्वच शास्त्रज्ञ काही विलक्षण काम करीत असतात असे मानण्याचे कारण नाही. त्यांच्यापैकी कित्येकजण भारतातच अधिक चांगले काम करू शकतील अशी स्थिती आहे. काही वर्षांपूर्वी असा एक काळ होता की परदेशांत जाणारे हिंदी शास्त्रज्ञ ज्ञानाच्या ओढीनेच जात. आपल्या कामाचे खरे क्षेत्र भारतच आहे असे वाटत असल्यामुळे ते परत मायभूमीला येत असत. परंतु आता वातावरण बदलले आहे. पुष्कळ शास्त्रज्ञ परदेशांत गेल्यावर तेथेच स्थानिक होण्याची आकांक्षा धरतात. म्हणून शास्त्रज्ञांच्या परदेशीय वास्तव्यावर दोन अगर तीन वर्षांची मर्यादा घालण्यात यावी. खुद्द भारतामधील शास्त्रज्ञांत चांगल्या नौकऱ्या व पैसा ह्यांच्यासाठी तीव्र स्पर्धा चालू असते, आणि त्यामुळेच स्वतःच्या कामाबद्दलची त्यांची निष्ठा असावी तितकी प्रखर नसते. एका पिढीपूर्वी असे नव्हते. तथापि हा दोष शास्त्रज्ञांचाच फक्त आहे असे म्हणता येणार नाही. आज सर्वच समाजांत सत्ता आणि पैसा ह्यांचे जबरदस्त आकर्षण बोकाळले आहे. कोणताही व्यवसाय त्यापासून मुक्त नाही. अशा परिस्थितीत शास्त्रज्ञांचीही पावले त्याच दिशेने वळल्यास त्यांना बोल लावता येणार नाही.

---

## शेतकऱ्यांकडे अधिक लक्ष देण्याची विनंती

अमेरिकेचे भारतामधील वकील मि. चेस्टर बौल्स ह्यांचे मद्रास येथील रोटरी क्लबच्या विद्यमाने भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, हिंदमधील शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा वाढविण्यावर देशात घडवून आणावयाच्या ग्रामीण क्रांतीचे भवितव्य अवलंबून आहे. भारतामधील धंदेवाल्यांनी आणि नागरिकांनी शेतकऱ्यांना अधिक चांगली राहणी उपलब्ध करून देण्यासाठी झटणे जरूर आहे. आतापर्यंत उद्योगधंद्यांना प्राधान्य देण्यात आले आणि शेतीला कनिष्ठ स्थान देण्यात आलेले आहे. अलीकडे अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणण्यात येत आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे धान्याचे उत्पादन वाढूनही ते अपुरे पडत आहे. तथापि, गेल्या काही वर्षांत भारताने शेतीच्या व्यवसायात क्रांतिकारक बदल घडविण्यासाठी पावले उचलली आहेत. भविष्यकालाच्या दृष्टीने ही घटना चांगली आहे. भारताच्या लोकांना मोठ्या सामायिक बाजारपेठेचा लाभ झालेला आहे. फारच थोड्या देशांना हा लाभ मिळालेला आहे. गेल्या पंधरा वर्षांत भारतात मोठे बदल झाले आहेत. आज भारतात पंधरा वर्षांपूर्वीपेक्षां ५ पट अधिक विद्युतनिर्मिती करण्यात येत आहे. रेल्वे एंजिने, भारी विद्युत् यंत्रसामग्री तयार करण्यात येत आहे. शिक्षणाच्या बाबतीतही प्रगती झाली आहे. ह्या सर्व गोष्टींची दखल लोकांनी घेतली पाहिजे. तथापि, अजून बरेच शिकण्याची आवश्यकता आहे. प्रगती करणारा कोणताही देश चुका करतोच. भारतालाही त्या टाळता येणार नाहीत. कम्युनिस्ट देशांत चुका झाल्या तरी त्या लोकांना समजत नाहीत इतकेच. अमेरिकेत तर चुकांची प्रसिद्धीच होते. त्यांपैकी काही थोड्या सरकारकडून होतात आणि बऱ्याचशा खाजगी कारखानदार करीत असतात.

---

## हस्तव्यवसायाच्या उद्योगधंद्यांत अडचणी

अखिल भारतीय हस्तोद्योग मंडळाच्या अध्यक्ष श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय ह्यांनी ह्या उद्योगधंद्याच्या अडचणीकडे लक्ष वेधले आहे. आंध्र राज्यातील हस्तोद्योगाच्या काही केंद्रांना त्यांनी भेटी दिल्या. त्यानंतर वृत्तपत्रप्रतिनिधींशी बोलताना त्या म्हणाल्या की हस्तोद्योगांत तयार होणाऱ्या वस्तूंना परदेशांत चांगली मागणी आहे. परंतु ही मागणी हस्तोद्योगांना पुरी करता येत नाही. ह्या उद्योगधंद्याची वाढ पुरेशा पैशाच्या अभावी खुंटित झालेली आहे. ह्या वर्षी त्यांना मिळणाऱ्या मदतीत १४ लाख रुपयांची कपात करण्यात आलेली आहे. हिंदी अर्थव्यवस्थेत हस्तोद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे, ह्या गोष्टीची अद्याप पुरेशी जाणीव झालेली नाही. त्यामुळे त्याला नियोजनात दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. सध्या ह्या उद्योगधंद्यांना कच्च्या मालाच्या अपुऱ्या पुरवठ्याचीही अडचण भासत आहे. हस्तोद्योगांमुळे भारताला दरसाल ३० कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळते.

## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( रजिस्टर्ड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

**स्थापना : १६ सप्टेंबर १९३५**

| | १९५५ | १९६० | १९६६ |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. १६ लक्ष | रु. ३२ लक्ष | रु. १ कोटी |
| गंगाजळी | रु. ७·७५ लक्ष | रु. १७ लक्ष | रु. ३७ लक्ष |
| ठेवी | रु. ५ कोटी | रु. १५ कोटी | रु. ५० कोटींहून अधिक |

## आपल्या ११२ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टी सेवा यांच्यासह बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सविस्तर माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

कर्वे रोड, ( पुणे-४ ), क्रॉफर्ड मार्केट ( मुंबई ) येथे लौकरच शाखा सुरू होत आहेत.

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लिमिटेड

**चेअरमन, श्री. रामनिवासजी रामनारायणजी रुईया यांनी कंपनीच्या ३३ व्या वार्षिक साधारण सभेमध्ये केलेल्या भाषणाचा गोषवारा.**

आपल्या भाषणाच्या सुरुवातीस भारताचे दिवंगत पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्रीजी यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करून, सध्याच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या त्यांच्या योग्य वारसदार आहेत असे श्री. रामनिवासजी यांनी सांगितले. तसेच श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी संरक्षण मंत्री म्हणून बजावलेल्या कामगिरीचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला व गृहमंत्री म्हणून त्यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून श्री. रामनिवासजी म्हणाले—

"तिसऱ्या पंचवार्षिक योजनेने ठरवून दिलेल्या साखर उत्पादनाच्या उद्दिष्टापेक्षा जास्त उत्पादन करून साखर उद्योगाने आपली जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली आहे. चौथ्या योजनेने साखर उत्पादनाचे उद्दिष्ट पंचेचाळीस लक्ष टनांचे ठरविले असून त्यासाठी सरकारने मुख्यत: सहकारी साखरकारखान्यांची वाढ करण्याचे व नवीन सहकारी साखरकारखाने काढण्याचे परवाने दिलेले आहेत. मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे खासगी व सहकारी क्षेत्रांतील साखर कारखाने हे दोन्हीही एका राष्ट्रीय उद्योगाचाच अविभाज्य भाग आहेत व त्या दृष्टीने पाहता स्वामिनाथन् कमिटीचा अहवाल हा एकांगी स्वरूपाचा आहे असे म्हणावे लागते. गेल्या साली पडलेल्या अवर्षणामुळे महाराष्ट्रातील साखरकारखान्यांच्या साखरेच्या उताऱ्यात घट झाली. या कारखान्यांचा उतारा ११·७२ टक्के होता. गेल्या कित्येक वर्षात इतका कमी उतारा आलेला नाही. उत्तर प्रदेश व बिहार राज्यांत यंदा पडलेल्या अवर्षणामुळे व कित्येक राज्य सरकारांनी उसाच्या क्षेत्रात कपात करण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे १९६६–६७ च्या चालू हंगामात साखरेचे उत्पादन सुमारे वीस टक्क्यांनी घटेल असा अंदाज आहे."

केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या उसाच्या एक्स फॅक्टरी (कारखाना पोहोच) दरापेक्षा जास्त दर मिळण्याबद्दल ऊसकरी शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीमुळे निर्माण झालेल्या प्रश्नाचा उल्लेख करून श्री. रुईया पुढे म्हणाले—

"उसाचे दर हे मागील वर्षाच्या साखरेच्या उताऱ्यावर ठरवून दिले जातात हे आपणांस माहीत आहेच. गेल्या तीन वर्षापासून ऊसकरी शेतकरी उसासाठी भरमसाट दराची मागणी करीत आहेत. १९६४-६५च्या हंगामात गुळाचे भाव खूपच वाढले असताना विशिष्ट परिस्थितीत उसाचा दर वाढवून मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी केलेली मागणी काही अंशी रास्त होती असे म्हणता येईल. पण सरकारने ठरवून दिलेल्या एक्स-फॅक्टरी दराने कारखान्यास ऊसपुरवठा करण्याबद्दल शेतकऱ्यांनी करून दिलेल्या कायदेशीर करारांची दखल न घेता जादा दर मिळावा म्हणून त्यांनी केलेल्या चळवळीमुळे राजकीय परिस्थितीच्या दडपणाखाली जर राज्य सरकारने उसाचे दर वाढवून दिले तर मग कायदेशीर करारांना काही अर्थच राहिला नाही असे म्हणावे लागेल.

"या वर्षीही उसाची किंमत वाढवून मिळण्याची मागणी अशीच पुन्हा ऐन हंगाम सुरू होण्याच्या वेळी करण्यात आली आणि हंगामाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा एक महिन्याचा कालावधी गमावल्यानंतर, केन्द्र सरकारने ठरवून दिलेल्या, फॅक्टरी डिलिव्हरी दर मेट्रिक टनास रु. ५९–२० पैसे या दराऐवजी दर मेट्रिक टनी रु. ६९/– देण्याबद्दल आम्हाला सांगण्यात आले आहे.

"साखर उत्पादनाचा खर्च विचारात न घेता शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त दर वाढवून देण्याबद्दल राज्य सरकार अगदी उत्सुक आहे. कामगारांनाही कारखान्यास झालेल्या नफा-तोटयाचा विचार न करता जास्तीत जास्त बोनस हवा आहे. कामगारांच्या महागाई भत्त्यात झालेली वाढ, स्टोअर मालाच्या वाढलेल्या किमती, वगैरेंमुळे उत्पादन खर्चात दिवसेंदिवस वाढ होत आहे. परंतु केन्द्र सरकार त्या प्रमाणात साखर विक्रीची किंमत वाढवून देण्यास तयार नाही. अशा परिस्थितीत साखरेची किंमत वाढवून मिळाल्याखेरीज उसाला देण्याच्या जादा किमतीचा हा बोजा कारखाना कसा सहन करू शकेल हे मला कळू शकत नाही.

"सहकारी कारखान्यांचे उदाहरण देऊन राज्य सरकारकडून आम्हांला नेहमी विचारणा केली जाते की जर सहकारी कारखाने उसाला एक्स-फील्ड पद्धतीने दर देऊ शकतात तर आमच्या कारखान्यास तो का देता येऊ नये? प्रत्येक वर्षी मी या प्रश्नाचे उत्तर देत आलो आहे. सहकारी कारखान्याच्या घटनेनुसार कारखान्यास ऊस पुरविणारे शेतकरी हेच कारखान्याचे भागीदार असतात. त्यामुळे उसाला जादा किंमत देऊन शेअरवर अगदी कमी डिव्हिडंड दिले तरी त्यामुळे कारखान्याचे किंवा भागीदारांचे कांहीच नुकसान होत नाही. सहकारी कारखान्यांना अनेक सोयी व सवलती देण्यात येतात पण खाजगी कारखान्यांना त्या मिळत नाहीत. आमच्या कारखान्याचे बाबतीत तशी परिस्थिती नसून आमचे भागीदार हे निराळे आहेत आणि ऊसपुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हिताबरोबर आम्हांला त्यांचे व त्याचप्रमाणे कामगारवर्ग आणि मॅनेजिंग एजंट्स यांच्याही योग्य हिताकडे लक्ष द्यावे लागते.

"गेल्या वर्षी मी स्वत: नामदार मुख्य मंत्र्यांशी या बाबतीत चर्चा केली व गेल्या सिझनसाठी केन्द्र सरकारने ठरवून दिलेल्या

रु. ६२·८० पैसे या दरापेक्षा टनामागे रु. ४·३० पैसे अधिक म्हणजे एकूण दर टनी रु. ६७·१० पैसे असा ठरविण्यात आला. त्याच वेळी, अशा प्रकारे कसल्याच तत्त्वाचा विचार न करता केवळ मोघम पद्धतीने उसाचे दर वाढवून देणे ही गोष्ट आमच्यावर अन्याय करणारी असून, साखरनिर्मिती व ऊस याबद्दलच्या सर्व गोष्टींचा अभ्यास केलेल्या अशा स्वतंत्र व निःपक्षपाती समितीकडे हा प्रश्न सोपविण्यात यावा व अशा समितीने सर्व गोष्टी विचारात घेऊन उसाला किती दर द्यावा याबद्दलची एक सुसूत्र पद्धती ठरवून द्यावी अशी विनंती मी नामदार मुख्य मंत्र्यांना केली होती व त्यानंतर त्यांना त्याप्रमाणे लिहिलेही होते. माझ्या सूचनेचा विचार करण्याचे त्यावेळी तत्त्वतः मान्यही करण्यात आले. पण गेल्या सबंध वर्षात या बाबतीत प्रत्यक्षात काहीच झाले नाही आणि पुन्हा या वर्षी शेतकऱ्यांकडून चळवळीच्याच मार्गाचा अवलंब करण्यात आला.

"या वर्षी मला शेतकी मंत्री व उपमंत्री यांना व मुख्य मंत्री यांना स्वतंत्रपणे या बाबतीत भेटावे लागले. त्या वेळी पुन्हा गेल्या वर्षीच्याच सर्व गोष्टींची पुनरावृत्ती झाली व या वर्षी अशी तज्ज्ञांची समिति नेमण्याबद्दल सरकार विचार करील तोपर्यन्त यंदाही आम्ही मोघमपणेच उसाचा दर वाढवून द्यावा असे सांगण्यात आले. त्या वेळी, अशा रीतीने केवळ आमच्या एकट्या कारखान्यास सरकारशी तोंड द्यावे लागणे व कसल्याच तत्त्वाचा आधार न घेता निरंकुश पद्धतीने उसाचा दर वाढवून देण्याबद्दल मंत्र्यांकडुन आमच्या एकट्याच कारखान्यावर दडपण आणले जाणे योग्य नाही ही गोष्ट मी नामदार मंत्र्यांच्या निदर्शनास आणली.

"यंदाचे वर्ष हे निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे त्या दृष्टीने अडचणीचे आहे हे मी जाणतो, पण अशा प्रकारे आपणांला योग्य वाटेल तो किंवा शेतकऱ्यांनी मागणी केलेला दर आम्ही उसाला दिला आणि त्या प्रमाणात जर साखरेची किंमत वाढवून मिळाली नाही तर हा कारखाना अशा रीतीने किती दिवस चालू शकेल या गोष्टीचा आपण विचार केला पाहिजे असेही मी मंत्रीमहाशयांना सांगितले. सर्व महत्त्वाच्या उद्योगधंद्यांतील कारखान्यांच्या संघटना असतात व अशा संघटना त्या त्या उद्योगधंद्यांतील सर्व अडीअडचणींचा विचार करतात. साखर धंद्यातही अशी संघटना आहे. असे असता त्या संघटनेशी काहीच विचारविनिमय न करता एकाकी कोल्हापूर शुगर मिल्सबरोबर हा झगडा का चालविला जात आहे? जोपर्यन्त कारखान्यास योग्य नफा मिळत आहे तोपर्यन्त निःपक्षपाती तज्ज्ञांच्या समितीकडून ठरविण्यात येईल ती योग्य किंमत उसासाठी शेतकऱ्यांना द्यावी व कामगारांनाही त्याचप्रमाणे योग्य वेतन आणि बोनस द्यावा असे मला स्वतःला वाटते. पण माझ्या या सूचनांचा सरकारकडून काहीच विचार झाला नाही हे सांगण्यास मला खेद वाटतो. मिलच्या नफा-तोट्याचा काहीच विचार न करता, त्यांना योग्य वाटेल तो दर आम्ही द्यावा एवढेच त्यांचे म्हणणे दिसते. कारखान्याच्या हिताहिताचा विचार आमचा आम्ही करावा, सरकारला त्याच्याशी काहीच कर्तव्य नाही; असेच सरकारचे या प्रश्नाबाबतचे धोरण दिसते.

"शेवटी या सर्व वाटाघाटीनंतर, गेल्या वर्षाचा आपल्या कारखान्याचा उतारा कमी असल्यामुळे यंदाच्या वर्षासाठी केन्द्र सरकारने आमच्या कारखान्यासाठी ठरवून दिलेली उसाची किंमत दर टनामागे चार रुपयांनी कमी असूनही, आम्ही गेल्या वर्षी प्रत्यक्ष जो दर दिला त्यापेक्षा दोन रुपये जास्त म्हणजेच दर टनी सुमारे रु. १०/- या वर्षी जादा देण्याचे आम्हांला मान्य करावे लागले.

"या सर्व प्रकारात भरीस भर म्हणजे महाराष्ट्र सरकारच्या 'जमीन धारणा नियंत्रण' कायद्यानुसार कारखान्याकडील जमिनी काढून घेऊन त्या महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कार्पोरेशनकडे सुपूर्त करतेवेळी देण्यात आलेले आश्वासन बाजूस सारून यंदा महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कार्पोरेशनने, केन्द्र सरकारने ठरवून दिलेल्या एक्स-फॅक्टरी दरापेक्षा आपल्या उसास पंचवीस टक्के जादा दर आकारला जाईल असे एकतर्फी जाहीर केले आहे. साखरविक्रीची किंमत ही सरकारने ठरवून दिलेल्या उसाच्या एक्स-फॅक्टरी किमतीवरच आधारलेली असल्यामुळे उसाला अशा रीतीने जादा दर द्यावा लागला तर साखरेची किंमत ठरविण्याच्या तत्त्वाचा मूळ पायाच ढासळून पडणार आहे. एकंदरीत पाहता, महाराष्ट्रासाठी उसाचे किंवा साखरेचे दर ठरवून देताना केन्द्र सरकार, सर्व गोष्टींचा विचार करून योग्य अशा धोरणांचा अवलंब करीत आहे असे मला वाटत नाही.

"साखर धंद्याच्या आर्थिक बाबींचा विचार करताना, उसाचे एकरी उत्पादन जास्तीत जास्त कसे वाढेल व साखरउत्पादनाच्या एकूण खर्चात उसाच्या किमतीचे सध्या असणारे फार मोठे प्रमाण असे कमी करता येईल, अशी द्विविध उद्दिष्टे नजरेसमोर ठेवली पाहिजेत.

"महाराष्ट्रासाठी ठरवून दिलेली साखर विक्रीची सध्याची रु. १२४·३५ पैसे ही किंमत अत्यंत कमी व अयोग्य आहे. साखर धंद्याचे एकूण ठोक उत्पन्न हे इतर धंद्यांच्या मानाने सर्वात कमी आहे ही गोष्ट रिझर्व्ह बँकेनेही मान्य केली आहे. म्हणून, महाराष्ट्रातील खासगी व सहकारी अशा दोन्ही क्षेत्रांतील साखरकारखान्यांनी साखरेची किंमत क्विंटलमागे निदान चौदा रुपयांनी वाढवून मिळावी म्हणून मागणी केली असून महाराष्ट्र सरकारने ही मागणी मान्य करून घेण्याचे कामी पुढाकार घ्यावा अशी त्यांनी राज्य सरकारला विनंती केली आहे."

साखर निर्यातीसंबंधी बोलताना श्री. रामनिवासजी रुईयांनी कोल्हापूर शुगर मिल्सने तयार केलेल्या कच्च्या साखरेच्या उच्च प्रतीचा उल्लेख केला व साखरेची आंतरराष्ट्रीय किंमत कमी

असली तरीही साखरेची निर्यात चालू ठेवण्याची आवश्यकता त्यांनी जोरदारपणे प्रतिपादन केली. ब्रिटन व अमेरिकेला करारानुसार द्यावयाच्या साखरेची ठरलेली किंमत निश्चितपणे फायदेशीर असल्याचे सांगून ते म्हणाले—

"जर आपण एकदा साखरेच्या निर्यातीमधून अंग काढून घेतले तर मग पुन्हा आपणांस साखर निर्यात करणे अशक्य होईल. या बाबतीत तात्पुरत्या फायद्याकडे लक्ष देऊन अवलंबिलेले धोरण अंती हितकारक होणार नाही."

कोल्हापूर शुगर मिल्सविषयी बोलताना श्री. रुईया म्हणाले—

"मला सांगण्यास अभिमान वाटतो की आपला कारखाना हा उत्पादनातील तांत्रिक कार्यक्षमतेच्याच नव्हे तर इतर बाबतींतही सर्वश्रेष्ठ आहे आणि कारखान्यास भेट दिलेल्या अनेक तंत्रविशारदांनी, सरकारी प्रतिनिधींनी आणि परदेशीय पाहुण्यांनीही याबद्दल कारखान्याची वाखाणणी केली आहे. पण ही गोष्ट काही एका दिवसात घडून आलेली नाही. या कारखान्याच्या मॅनेजिंग एजंट्सनी, कारखान्यास झालेला नफा व स्वतःला मिळालेला नफा यांचा विनियोग या कारखान्याच्या वाढीसाठीच करण्याचे योग्य धोरण ठेवले व त्यामुळेच एके काळी रोज ५०० टन ऊसगाळप शक्ती असलेला हा छोटा कारखाना आज २,५०० टन उसाचे गाळप करतो आहे. कारखान्याच्या या प्रगतीमुळे केवळ आपल्यासारख्या भागधारक किंवा मॅनेजिंग एजंट्स यांचाच फायदा झाला नसून त्याबरोबरच या भागातील शेतकरी वर्ग व कारखान्याचा कामगारवर्ग यांचाही खूपच फायदा झालेला आहे.

"या कारखान्याकडून निरनिराळ्या करांच्या रूपाने केन्द्र सरकारला व राज्य सरकारला आतापर्यंत कोट्यवधी रुपये मिळाले असून कोल्हापूर नगरपालिकेलाही ऑक्ट्रायच्या व घरफाळा वगैरेच्या रूपाने लाखो रुपये मिळाले आहेत. साखरकारखान्याकडून एखाद्या नगरपालिकेला असे मोठे उत्पन्न मिळत असल्याचे हे एकमेव उदाहरण असावे असे मला वाटते. इतके असूनही आमच्या बाबतीत केन्द्र व राज्य सरकार सापत्न मातेच्या भावनेने वागत आहे असे मला खेदपूर्वक म्हणावे लागते."

त्यानंतर कंपनीच्या या वर्षीच्या नफा-तोट्याकडे वळून यंदा साखरकारखाना, डिस्टिलरी व ऑईल मिल्स या विभागांत झालेला थोडाबहुत नफा हा केमिकल डिव्हिजनला झालेल्या तोट्यात वजा होऊन गेल्याचे त्यांनी सांगितले व केमिकल डिव्हिजनकडून लौकरच नफा मिळू शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कारखान्यामार्फत चालू असलेल्या क्रीडाविषयक व सांस्कृतिक कार्याविषयी बोलताना श्री. रामनिवासजी रुईया म्हणाले—

"कारखान्याशी संलग्न असलेल्या शुगर मिल्स जिमखाना व जीवन कल्याण या क्रीडाविषयक व सांस्कृतिक संस्थांचे कार्य उत्तम प्रकारे चालू आहे हे पाहून मला फार आनंद वाटतो. टेबल टेनिसमध्ये मद्रास येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धात महाराष्ट्राच्या 'ब' विभागाचे नेतृत्व करण्यासाठी आपल्या जिमखान्याच्या खेळाडूंची निवड झाली आहे. बॅडमिंटनमध्ये आमच्या खेळाडूंनी आपला नेहमीचा उच्च दर्जा कायम ठेवला आहे. क्रिकेट व हॉकीसारख्या मैदानी खेळांतही आमच्या खेळाडूंनी चांगलेच प्रावीण्य दाखविले आहे. 'जीवन कल्याण' संस्थेतर्फे यंदा श्रीगणेशोत्सव हा नेहमीप्रमाणेच उत्साहाने साजरा करण्यात आला. या वर्षी 'मृच्छकटिक', 'सौभद्र' व 'दुसरा पेशवा' अशा तीन नाटकांचे प्रयोग सादर करण्यात आले. या प्रयोगांतून आमच्या कलाकारांच्या अंगचे उत्तम अभिनयकौशल्य व्यक्त झाले. माझ्या सहकारी डायरेक्टर्सतर्फे व माझ्या स्वतःतर्फे मी या सर्व खेळाडूंचे व कलाकारांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो."

त्यानंतर श्री. रामनिवासजी रुईया यांनी कंपनीच्या संचालक मंडळातील आपल्या सहकाऱ्यांनी बिकट प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कामी आपल्याला जो बहुमोल सल्ला दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानले व आपल्या भाषणाच्या शेवटी ते म्हणाले—

"शेवटी मी गेल्या वर्षीच्या माझ्या भाषणात उल्लेख केल्याप्रमाणे, ज्यांच्या ठिकाणी कर्तव्याबद्दलची निस्सीम निष्ठा, कार्यक्षमता, सौंदर्यदृष्टी व समतोल वृत्तीने कार्य करण्याचे कौशल्य या गुणांचा सुंदर समन्वय झाला आहे, असे आपल्या कारखान्याचे जनरल मॅनेजर, श्री. लोहिया, यांनी जे उत्तम कार्य केले त्याबद्दल व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी व कंपनीच्या इतर नोकर वर्गानेही त्यांना जे सहकार्य दिले त्याबद्दल संचालक मंडळाला अत्यंत समाधान वाटते हे मी आनंदाने नमूद करतो."

---

**मिऱ्याची नवी जात**—केरळमधील मिऱ्याच्या संशोधनकेंद्राने अधिक निपज होणारी मिऱ्याची नवीन जात शोधून काढली आहे. सध्या लागवडीत असलेल्या मिऱ्याच्या वेलापेक्षा नव्या जातीच्या वेलामुळे उत्पादनात ४ पट वाढ होईल अशी अपेक्षा आहे. ही जात रोगराईला प्रतिकार करणारी आहे. लागवड केल्यापासून दुसऱ्या वर्षी ती उत्पादनक्षम होते. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात नव्या प्रकारचे १० हजार वेल लावण्यासाठी केरळ सरकारचे शेतकी खाते शेतकऱ्यांना मदत करणार आहे.

**१९६७ ची भीतिप्रद भविष्ये**—फ्रान्समधील ४ ज्योतिषांनी १९६७ सालात घडणाऱ्या घटनांची काही भीतिप्रद भविष्ये वर्तविली आहेत. त्यांच्या होऱ्याप्रमाणे जपानमध्ये ज्वालामुखी जागृत होतील, भारतात धार्मिक दंगली होतील, ब्रिटनमध्ये आर्थिक परिस्थिती बिघडेल, व्हिएटनाममध्ये शांतता स्थापन होणार नाही आणि नवनवीन शस्त्रास्त्रांच्या बाबतीत चीन भयानक प्रगती करील.

## लिमिटेड कंपन्यांतील ठेवी : राज्यवार आकडे

३१ मार्च, १९६५

| | कंपन्यांची संख्या | ठेवीची रकम (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १ आंध्र प्रदेश | १७ ( ०.९ ) | ५६ ( ०.३ ) |
| २ बिहार | ७ ( ०.४ ) | २३ ( ०.१ ) |
| ३ महाराष्ट्र | ६५० ( ३४.० ) | ६८,७४ ( ३२.९ ) |
| ४ केरळ | ३५ ( १.८ ) | १,४८ ( ०.७ ) |
| ५ मध्य-प्रदेश | १९ ( १.० ) | ३,३० ( १.६ ) |
| ६ मद्रास | २६३ ( १३.८ ) | ३२,६० ( १५.६ ) |
| ७ म्हैसूर | ३६ ( १.९ ) | २,०८ ( १.० ) |
| ८ ओरिसा | ३ ( ०.२ ) | २१ ( ०.१ ) |
| ९ पंजाब | ८० ( ४.२ ) | ५,६८ ( २.७ ) |
| १० राजस्थान | २३ ( १.२ ) | १,५२ ( ०.७ ) |
| ११ उत्तर प्रदेश | ७४ ( ३.९ ) | ६,१३ ( २.९ ) |
| १२ प. बंगाल | ३६२ ( १९.० ) | ३८,१७ ( १८.३ ) |
| १३ गुजरात | १३४ ( ७.० ) | २१,६९ ( १०.४ ) |
| १४ दिल्ली | २०० ( १०.५ ) | २५,३३ ( १२.१ ) |
| १५ इतर राज्ये, इ. | ६ ( ०.३ ) | १,४३ ( ०.७ ) |
| एकूण | १,९०९ | २,०९,१५ |

सूचना :– कंसांतील आकडे प्रत्येक राज्याचा एकूण कंपन्यांतील व ठेवींतील % वाटा दर्शवितात.

### ठेवींची मुदतीनुसार छाननी
( ३१ मार्च, १९६५ )

| ठेवींची मुदत | ठेवींची खाती | ठेवींची रकम (लक्ष रु.) |
|---|---|---|
| १. ३ महिन्यांपर्यंत | २,९०० | ३,८० |
| २. ३ ते ६ महिने | १२,८०० | ११,५४ |
| ३. ६ ते १२ महिने | ७७,९०० | ५१,९९ |
| ४. १२ ते २४ महिने | २१,१०० | १३,७८ |
| ५. २४ ते ३६ महिने | १६,३०० | ६,३९ |
| ६. ३६ महिन्यांपेक्षा जास्त | २२,५०० | १६,६६ |
| ७. इतर ठेवी * | १,२७,७०० | १,०४,९९ |
| एकूण | २,८१,२०० | २,०९,१५ |

* ज्यांना निश्चित मुदत नाही; तत्काळ मागता येण्याजोग्या किंवा ठराविक नोटिशीने मागता येण्याजोग्या ठेवी.

### सांगली बँकेचा सुवर्ण महोत्सव

सांगली बँक लि. चा सुवर्ण महोत्सव दि. ५ जानेवारी रोजी महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?



धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...
परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...

बहुधा, प्रत्येक पीक शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली आहे. ती निराळीच.



किर्लोस्कर
डिझेल एंन्जिन्स
३ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)
TOM & BAY
K.O. 467-A MAR

## सहकारी शेतीसंबंधी मार्गदर्शक शिफारशी

सहकारी शेतीची प्रगती घडवून आणण्यासाठी कोणती कार्यपद्धती स्वीकारावी हा प्रश्न अद्याप नीटसा सुटलेला नाही. सहकारी शेती संघटनांद्वारा शेतीचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले पाहिजेत ह्याविषयी आता वाद राहिलेला नाही. सहकारी शेतीला मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या नेतृत्वाखाली एक कमिटी मध्यवर्ती सरकारने नेमली होती. कमिटीने सहकारी शेतीविषयी केलेल्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या आहेत. चौथ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी शेतीसंबंधी स्वीकारावयाच्या धोरणाची दिशा दाखविणारे एक पत्र नियोजन समितीने राज्य सरकारांकडे पाठविले आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर सुमारे ६ लाख एकर जमीन सहकारी शेती संघटनांमार्फत लागवडीखाली आणण्यात आली आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात आणखी १० लाख एकर जमीन सहकारी शेतीच्या कक्षेत येणार आहे. ह्या कार्यक्रमात अस्तित्वात येणाऱ्या सहकारी संस्थांबाबत काही विशेष दृष्टिकोण स्वीकारण्यात यावयाचा आहे. भारतामधील शेतीचा व्यवसाय आतबट्ट्याचा होण्यास छोटी व आर्थिकदृष्ट्या न परवडणारी शेते मुख्यतः कारण आहेत. हे लक्षात घेऊन अशा शेतकऱ्यांना मदत देण्यावर ४ थ्या कार्यक्रमात विशेष जोर देण्यात येणार आहे. त्याशिवाय शेतीच्या व्यवसायाला आनुषंगिक असणाऱ्या जोडधंद्यांनाही उत्तेजन देण्यात येणार आहे. शेळ्यामेंढ्यांची पैदास आणि दुभत्याचा धंदा ह्यांचा त्यात समावेश आहे. प्रत्येक सहकारी सोसायटीचा विकास साधण्यासाठी दीर्घ मुदतीचा एक कार्यक्रम प्रथमपासूनच आखण्यात येईल. ह्या कार्यक्रमात जमिनीची सुधारणा आणि विकास ह्यांच्याबरोबरच शेतकऱ्यांच्या कुटुंबांतील माणसांना हंगाम नसणाऱ्या काळात रोजगारी मिळवून देण्याची सोय करण्यात येईल.

## हिंदी कलाकारांचा ब्रिटनचा दौरा

भारतीय नृत्यकलाकारांचा व संगीत कलाकारांचा एक संघ लवकरच ब्रिटनला भेट देणार आहे. ह्या कलापथकात १५ ते १७ कलाकार असतील. हिंदी नृत्यकलेतील सर्व प्रकार, म्हणजे भरतनाट्य, कथ्थक, कथकली आणि मणिपुरी नृत्यप्रकारांचे दर्शन घडविणारे कलाकार संघात घेण्यात आले आहेत. आतापर्यंत हिंदी संगीताचे व नृत्याचे प्रयोग ब्रिटनमध्ये काही निवडक प्रेक्षकांसमोर करण्यात आले आहेत. ह्या खेपेला मात्र सर्वसाधारण ब्रिटिश नागरिकाला त्यांची ओळख करून देण्यात येणार आहे. खुद्द लंडनमध्ये संघाचे २१ कार्यक्रम ठरलेले आहेत. त्यानंतर ब्रिटनमधील आणखी काही शहरांत कार्यक्रम करून संघ युरोपात जाणार आहे. नृत्यांच्या कार्यक्रमातील मध्यंतरात हिंदी संगीतज्ञ वाद्यवृंदाच्या द्वारा लोकांची करमणूक करतील, त्यासाठी श्री. रविशंकर ह्यांनी खास चाली दिल्या आहेत.

## एअर इंडियापुढील भयानक समस्या

"५०० उतारूंची सोय असणारी फार मोठी सब सॉनिक जेट विमाने लवकरच इतर देशांच्या विमानकंपन्या आंतरराष्ट्रीय दळणवळणासाठी वापरू लागतील. म्हणजे, एअर इंडियाच्या सध्याच्या बोइंग विमानाच्या मानाने ही विमाने तिप्पट उतारू वाहतील. ज्या मार्गावर वाहतूक मोठी आहे, अशाच मार्गावर ही विमाने किफायतशीर ठरतील, हे उघड आहे. मोठमोठ्या कंपन्यांना ही प्रचंड विमाने खरीदणे परवडेल, पण एअर इंडियाला ते शक्य होणार नाही. परदेशी हुंडणावळीची अडचण, हीही मोठीच समस्या आहे. आजवर एअर इंडिया इतर जागतिक कंपन्यांशी स्पर्धा करू शकले, ह्याचे कारण त्याच्याजवळील विमाने तोडीस तोड होती. येत्या दहा वर्षांत परिस्थिति पार पालटणार आहे. नव्या विमानांच्या खरेदीचा भयानक प्रश्न आजच भेडसावू लागला आहे; तो कसा सोडविला जातो, ह्यावर एअर इंडियाचे स्थान अवलंबून राहील." एअर इंडियाचे चेअरमन, श्री. जे. आर. डी. टाटा.

## इंजिनिअर्सना असलेली मागणी कमी होत चालली

इंजिनिअरिंगच्या पदवीधरांना असलेली मागणी आता कमी झाली आहे, त्याचे कारण औद्योगिक वाढ ११% अपेक्षित होती, तीपेक्षा ती खूपच कमी झालेली आहे. १ नोव्हेंबर रोजी ५७५ इंजिनिअर्सना काम नव्हते. उद्योग विनिमय केंद्रात नोकरीसाठी नोंदलेल्या इंजिनिअर्सची संख्या ३० जून, १९६४ रोजी १,९७५ होती ती ३० जून, १९६५ रोजी ३,६५० झाली. भिलई पोलाद कारखाना, हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचा कारखाना, इत्यादींच्या उभारणीची कामे संपल्यामुळे इंजिनिअर्सच्या नोकरीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## हिंदी रेल्वेजचा १८·५६ कोटी रु. वाढावा

हिंदी रेल्वेजचा १९६५–६६ चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्याप्रमाणे वाहतुकीपासून रेल्वेजना ७३२ कोटी रु. म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा ७३ कोटी रु. जास्त उत्पन्न मिळाले. खर्च वजा जाता, मध्यवर्ती महसुलाकडे १०४ कोटी रु. वर्ग करून, उतारूंच्या भाड्यावरील कराचे १२·५ कोटी रु. देऊन टाकून १८·५६ कोटी रु. निवळ वाढावा उरला. ह्या वर्षी ७१२ किलोमीटर लांबीचे नवे मार्ग सुरू करण्यात आले.

## कॅथॉलिक पाद्र्यांचा विवाहाकडे कल

परवानगी मिळाली, तर अमेरिकेतील सुमारे एक तृतीयांश रोमन कॅथॉलिक पाद्री विवाह करतील, असा एका जेसुइटच्या पाहणीचा निष्कर्ष आहे. विवाह करावयाचा, की अविवाहित राहावयाचे हे ठरविण्याची ज्याची त्याला मुभा असावी आणि पाद्री झाल्यानंतरही अविवाहितांना विवाह करण्याची परवानगी असावी, असा उत्तरांचा सूर आढळून आला.

**संकरित बियाणांचा उपयोग**– रशिअन शास्त्रज्ञांचे एक प्रतिनिधी मंडळ भारताच्या शास्त्रज्ञांशी विचारविनिमय करण्याकरता आले आहे. त्यात ७ शास्त्रज्ञ आहेत. मंडळाच्या पुढाऱ्याने अशी माहिती दिली की संकरित बियाण्याचा वापर केल्यास धान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढविता येईल. अशा बियाण्याच्या वापराने २॥ एकरांत ६ ते ७ टन धान्य पिकविता येते.

**पाकिस्तानचा असहकार**—इंडिअन सायन्स कॉंग्रेसचे ५४ वे अधिवेशन हैद्राबाद येथे ३ ते ९ जानेवारीपर्यंत भरविण्यात आले. ह्या अधिवेशनासाठी प्रतिनिधी पाठविणे आपणांस शक्य होणार नाही, असे पाकिस्तान सरकारने कळविले आहे. निरनिराळ्या २७ देशांच्या प्रमुख शास्त्रीय संघटनांनी आपले प्रत्येकी दोन प्रतिनिधी पाठवावेत अशी विनंती भारताने केली होती.

**अर्थव्यवस्थेत गोंधळाचे राज्य** - मुंबई येथे कॉमर्स ग्रॅज्युएट असोसिएशनपुढे बोलताना उजव्या कम्युनिस्ट गटाचे अध्यक्ष श्री. डांगे म्हणाले की भारताच्या अर्थव्यवस्थेत सध्या पूर्ण बजबजपुरी माजलेली आहे. एकूण अर्थव्यवस्थेच्या नऊदशांश भागावर अगदी थोड्या खाजगी भांडवलवाल्यांची हुकमत आहे. फक्त काही उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे आहेत.

**स्वस्तिक रबर कारखान्याकडे मागणी**—रबराचा माल बनविणाऱ्या स्वस्तिक रबर ह्या कारखान्याकडे रशिआकडून शस्त्रक्रियेच्या वेळी डॉक्टर्सना लागणारे रबरी हातमोजे पुरविण्याची मागणी वर्षारंभी नोंदविण्यात आली आहे. ह्या व इतर मालाचा पुरवठा कारखान्याने चालू वर्षात करावयाचा आहे. मालाची किंमत सुमारे २० लाख रुपये होईल.

**कलकत्याभोवती रिंगण रेल्वे**—कलकत्ता शहराभोवताली रिंगण घालणारा रेल्वेरस्ता बांधण्याच्या कामाची पाहणी करण्याचे ठरले आहे. ह्या बाबतीत मध्यवर्ती सरकार व बंगाल सरकार ह्यांनी करार केला आहे. पाहणी करणारे तज्ज्ञ लवकरच कलकत्त्यात दाखल होतील. रेल्वेबोर्ड पाहणीचा खर्च सोसणार आहे. कलकत्ता शहराच्या उपनगरी वाहतुकीची अधिक चांगली सोय करण्यासाठी हा उपक्रम आहे.

**पॅरिसच्या सोनेबाजारात तेजी**—पॅरिसच्या सोन्याच्या बाजारात तेजीची विलक्षण लाट उसळली आहे. गेल्या १५ वर्षांत वाढली नव्हती इतकी सोन्याची किंमत भडकली आहे. सोन्याचा भाव आणखी वाढेल ह्या अपेक्षेने सोने घेणाऱ्यांची गर्दी उडाली आहे. अमेरिका सोन्याचा भाव वाढवील ह्या अपेक्षेने ही खरेदी होत आहे. १९३४ पासून अमेरिकेने सोन्याची किंमत दर औंसाला ३५ डॉलर्स ठेवलेली आहे. तीच अद्याप चालू आहे.


**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.**
**मुंबई**
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४-७५,
२५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक


| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,७८,२५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ३,१९,७१,००० |
| ठेवी | ... | रु. | ४९,५८,९६,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | ९९,८७,२५,००० |

: शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शिव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. घु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES




GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

## रशिया-चीन संबंध अधिक दुरावत चालले

१९६७ सालच्या नोव्हेंबर महिन्यात रशिअन राज्यक्रांतीचा ५० वा वाढदिवस मॉस्कोत थाटाने साजरा करण्यात येणार आहे. रशिअन राज्यक्रांतीचे लोक चीनच्या मार्गाने भारतात पसरतील असे भाकित रशिअन क्रांतीचा नेता लेनिन ह्याने करून ठेवले होते. पण रशिया व चीन ह्यांचे दुरावत जाणारे संबंध पाहता हे भाकित खरे ठरविण्याची लक्षणे दिसत नाहीत. रशिया व चीन ह्यांना जगभर कम्युनिस्ट क्रांति पसरावी अशी इच्छा असली तरी ही घटना स्वतःमार्फत व स्वतःच्या राजकीय तत्त्वज्ञानावर आधारलेली व्हावी असे उभयतांचे प्रयत्न असतात. ह्याचा अर्थ असा की, कम्युनिस्ट विचारसरणीची आता एकाऐवजी दोन केंद्रे झालेली आहेत. कम्युनिस्ट देशांत पडलेल्या ह्या फुटीमुळे अमेरिकेला व्हिएटनाममधील युद्ध अनिर्बंधपणे लढता येत आहे असे मत काही आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी व्यक्त केले आहे. खुद्द उत्तर व्हिएटनाम सरकारला तर कम्युनिस्ट देशांमधील दुहीचा प्रत्यक्ष उपसर्गच पोचत आहे. उत्तर व्हिएटनामला चीनकडून मिळणारी मदत अपुरी आहे. रशिया मदत पोचविण्याचा प्रयत्न करीत आहे. पण रशियाकडून खुष्कीच्या मार्गाने येणारी मदत चिनी प्रदेशांतून यावी लागते. मदतीचा मार्ग सुकर करण्याऐवजी चीन त्यात अडथळेच आणत आहे अशी रशियाची तक्रार आहे. चीन इतक्यावरच थांबलेला नाही. रशियाकडून व्हिएटनामला देण्यात येणाऱ्या शस्त्रास्त्रांपैकी काही अत्याधुनिक साधने चीनने परस्पर लांबविल्याच्या वार्ता आहेत. ह्यापैकी काही साधने अणुशक्तीच्या साह्याने चालणारी आहेत. ती सुटी करून चीनने काही अद्ययावत शास्त्रीय माहिती मिळविली आणि गेल्या ऑक्टोबरमधील अग्निबाण साधला असे म्हणतात. समुद्रमार्गाने उत्तर व्हिएटनाम सरकारला मदत पाठवावी तर ती अमेरिकेच्या हातात पडण्याचा धोका पत्करावा लागेल. रशिया असा कोंडीत सापडलेला आहे.

---

## स्कर्टची लांबी तेजी दर्शविते

बॉस्टन (अमेरिका) येथील एका शेअर ब्रोकरने आपल्या गिऱ्हाइकांना स्त्रियांच्या पायाकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला आहे. कारण, स्कर्टच्या उंचीवरून शेअर मार्केटच्या तेजी-मंदीचा अंदाज बांधता येतो! १९३९ साली आणि गेल्या युद्धकाळात स्कर्ट आखूड होते आणि शेअरमार्केट तेजीत होते. आताही तशीच परिस्थिती आहे. १९३०-३६ च्या मंदीच्या वेळी आणि गेल्या युद्धानंतरच्या मंदीच्या वेळी स्कर्ट घोट्यापर्यंत होते. स्कर्ट लांब होत चालल्याची लक्षणे दिसू लागताच शेअर विकून टाकावेत, असा ह्या ब्रोकरने सल्ला दिला आहे.

---

## क्रिकेटमधील वर्णद्वेष

इंग्लंडचा क्रिकेट संघ १९६८-६९ मध्ये दक्षिण आफ्रिकेचा दौरा करणार आहे. पण, इंग्लंडच्या संघात बी. डी ऑलिव्हीरा ह्याचा समावेश झाल्यास त्याला दक्षिण आफ्रिकेत प्रवेश मिळणार नाही, असे खात्रीलायक वृत्त आहे. कारण, तो ब्रिटिश प्रजाजन असला तरी कृष्णवर्णीय आहे. इंग्लंडचा तो आजचा पहिल्या प्रतीचा ऑलराउंड क्रिकेटर आहे. डी ऑलिव्हीरा हा सध्या आफ्रिकेत केपटाऊन येथे एका कृष्णवर्णीय संघाचा कप्तान म्हणून दुसऱ्या कृष्णवर्णीय संघाविरुद्ध खेळत आहे. हा सामना पाहण्याची श्वेतवर्णीयांना बंदी आहे.

---

## कपड्यासाठी धक्काबुक्की – दोन गरीब स्त्रियांचा मृत्यू

तिरुची येथील एका विडी व्यापाऱ्याने रमझान ईदनिमित्त गरीब स्त्री-पुरुषांना कपडे वाटले. वाटपाच्या वेळेच्या आधीच, पहाटेच, कितीतरी स्त्री-पुरुष जमले होते. वाटप सुरू होताच त्यांनी कापडासाठी धक्काबुक्की करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे तीन स्त्रिया तुडवल्या गेल्या. त्यांतील दोघी मरण पावल्या.

---

## जपानी मदतीने संततिप्रतिबंधक साधनांचा कारखाना

त्रिवेंद्रम येथे पब्लिक सेक्टरमध्ये एका जपानी कंपनीच्या सहकार्याने संततिप्रतिबंधक रबरी साधनांचा कारखाना उभारण्यासाठी करारमदार झाले आहेत. जरूर ती यंत्रसामग्री, इंजिनिअरिंग व तांत्रिक सल्लामसलत, डिझाईन्स, इत्यादी बाबतीत जपानी कंपनी मदत करील. दररोज ३,००० ग्रोस साधने तयार होतील.

## प्रख्यात जुगाऱ्याचे निधन

अमेरिकेतील आणि कदाचित जगातील सर्वांत प्रख्यात जुगारी निकोलस डांडोलास हा आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी एका इस्पितळात निधन पावला. त्याने आपल्या आयुष्यात जवळजवळ ५० कोटी डॉलर्स जिंकले व गमावले. १९२० आणि १९३० सालाच्या दरम्यान त्याच्या जुगारी आयुष्याचा कळस झाला होता. अमेरिकेत तो सारखा फिरत असे आणि कोणताही प्रसिद्ध जुगारी अड्डा असा नव्हता की ज्याला त्याने त्या अवधीत भेट दिली नाही. कडे फेकण्याच्या एका प्रकारच्या जुगाराच्या खेळात त्याने एकदा १६ लाख डॉलर्स मिळविले होते. दुसऱ्या एका जुगाराच्या खेळात त्याने एकदम ६ लाख डॉलर्स गमावले होते; आणि एका खेळात त्याने साडेपाच लाख डॉलर्सचा पण लावला होता. मृत्युसमयी तो लास व्हेगास ह्या जुगाराकरता प्रसिद्ध असलेल्या गावी साधेपणाने राहत असे. जुगार हा त्याचा शौक होता.

## सार्वत्रिक निवडणुकांसाठी ६·७ कोटी अधिक मतपत्रिका

पुढील महिन्यात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २४कोटी मतपत्रिका छापण्यात येणार आहेत. १९५७ साली लागलेल्या मतपत्रिकांपेक्षा ही संख्या ८·५ कोटींनी व १९६२ साली लागलेल्या मतपत्रिकांपेक्षा ६·७ कोटींनी अधिक आहे. १९५७ साली मतदारांची संख्या सुमारे १९·४ कोटी होती. १९६२ साली ती सुमारे २१·६ कोटी होती. १९५७ साली १५·५ कोटी व १९६२ साली १७·३ कोटी मतपत्रिका छापण्यात आल्या होत्या. मतदारांच्या संख्येइतक्या मतपत्रिका छापण्यात आल्या नाहीत. कारण, निवडणूक मंडळाच्या अनुभवाप्रमाणे एकूण मतांच्या ८० टक्के मतेच निवडणुकीत देण्यात येतात. १९६७ च्या निवडणुकीत मतदारांची संख्या तर वाढलेली आहेच; पण शिवाय प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदारांच्या संख्येची दशकात पूर्णता करून तितक्या मतपत्रिका त्या केंद्राला देण्यात येणार आहेत. त्यामुळेही अधिक मतपत्रिका छापाव्या लागत आहेत.

## सिमेंटच्या किमती पुन्हा वाढण्याचा संभव

सिमेंटचे वितरण करणाऱ्या मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष श्री. जी. डी. सोमाणी ह्यांनी सिमेंटच्या किमती वाढविण्यात येण्याची शक्यता सूचित केली. १९६७च्या जुलैपासून सिमेंटच्या किमती वाढविण्यात याव्या अशी मागणी सरकारकडे करण्यात येणार आहे. सिमेंटच्या उत्पादनाच्या खर्चात अलीकडे वाढ झालेली आहे. शिवाय, ह्या धंद्याच्या वाढीचा जो कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे त्यावर रुपयाच्या अवमूल्यनाचा परिणाम झाला आहे. गेल्या वर्षी सिमेंटवरील नियंत्रणे उठविण्यात आली. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमुळे ह्या वर्षी धंद्याच्या विस्तारासाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या पैशात गेल्या वर्षीच्या मानाने बरीच घट झालेली आहे.

## पश्चिम जर्मनीची भारताला मदत

पश्चिम जर्मनीच्या भारतामधील वकिलांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की गेल्या ६ ते १० वर्षांच्या कालावधीत भारताने शेतीचा विकास मोठ्या प्रमाणावर घडवून आणण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. ते असेही म्हणाले की ह्यापुढे पश्चिम जर्मनीकडून भारताला देण्यात येणाऱ्या मदतीत बदल करण्यात येण्याची शक्यता आहे. मोठमोठे कारखाने काढण्याच्या ऐवजी शेतीच्या विकास कार्यासाठी मदत देण्यावर अधिक जोर देण्यात येईल. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षी २४ कोटी मार्कची मदत देण्यासंबंधी लवकरच एक करार उभयता देशांत करण्यात येईल. पश्चिम जर्मनीमधून रासायनिक खते आयात करण्यासाठी त्यातील बहुतेक रक्कम भारताने वापरावयाची आहे. केरळ राज्यात खाजगी विभागात एक खतकारखाना उभारण्यासंबंधी सध्या वाटाघाटी चालू आहेत.

## नेफाच्या विकासाला लष्कराचे साह्य

नेफामधील जमाती व हिंदी लष्कर ह्यांच्यात अधिक निकटचे संबंध स्थापन करून ह्या मागासलेल्या भागाचा विकास साधण्याची योजना भारत सरकारच्या संरक्षण खात्याने आखली आहे. हे कार्य करण्यासाठी नेफा विभागात एक सैनिकविकास गट स्थापन करण्यात आला आहे. नेफामधील मुलकी जनतेकडून अधिक सहकार्य मिळविण्यासाठी आणि तिचा विश्वास संपादन करण्यासाठी भारत सरकारकडून काही तरी कार्य व्हावे अशी अपेक्षा करण्यात येत आहे. लष्कराने विकासाच्या कामात प्रत्यक्ष भाग घेतला व नेफातील जमातींना जरूर तो सल्ला व माहिती दिली तर ही अपेक्षा पूर्ण होण्यासारखी आहे. नवी संघटना आपले काम प्रथम कामेंग जिल्ह्यात सुरू करील. सैनिकांचे १० गट शेती, गुरांची पैदास, गुरांचे आरोग्य, एंजिनिअरिंग व वैद्यकीय कामे ह्या बाबतींत स्थानिक लोकांना मार्गदर्शन करतील.

## युद्धविषयक खेळण्यांना मागणी उतरली

सैनिक, पिस्तुले, मशीनगन्स, इत्यादि युद्धविषयक खेळण्यांना अमेरिकेत मागणी उतरली आहे. १९६५ मधील नाताळाचे मानाने १९६६ च्या नाताळात त्यांची विक्री १५ ते ५०% कमी झाली. शांतता-निदर्शक खेळण्यांचा खप मात्र वाढला. व्हिएटनाम युद्ध अमेरिकेत अप्रिय होत चालल्याचा हा पुरावा आहे.

पांचगणी
जि. सातारा येथे
२६ जानेवारीस
★ नवीन शाखा सुरू. ★
दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.
सातारा

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

..CENCED 10 POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १ फेब्रुवारी १९६७ | अंक ३

## विविध माहिती

**भारत-पूर्वजर्मनी व्यापार**—भारत आणि पूर्वजर्मनी ह्यांच्यांत नवा व्यापारी करार करण्यात येणार आहे. त्यामुळे चालू सालात उभयता देशांत ६५ कोटी रुपयांची व्यापारी देवघेव होईल. गेल्या वर्षाच्या मानाने ही वाढ १५ टक्के आहे. भारताला पूर्वजर्मनीपासून मोठ्या प्रमाणावर खतांचा पुरवठा होणार आहे. त्याशिवाय यांत्रिक हत्यारे, खास प्रकारचे पोलाद, रसायने, तांबे, इत्यादी मालही मिळणार आहे.

**चित्रपटाची लोकप्रियता**—मेट्रो गोल्डविन मेयर कंपनीने निर्माण केलेला 'डॉ. झिव्हगो' हा चित्रपट अमेरिकेत अत्यंत लोकप्रिय झालेला आहे. रशिअन राज्यक्रांतीच्या पार्श्वभूमीची कथा चित्रपटात आहे. एका वर्षापूर्वी अमेरिकेत हा चित्रपट पहिल्याने दाखविण्यात आला. तेव्हापासून चित्रपटाला २·२ कोटी डॉलर्स उत्पन्न झाले आहे. अमेरिकेत १५० शहरांतून तो अद्यापही दाखविण्यात येत आहे. चित्रपटाची तिकिटे अजूनही राखून ठेवावी लागतात.

**रशिआकडून गहू रवाना**—रशिआने भारताला २ लाख टन गहू मदतीदाखल देऊ केला आहे. गहू बोटीत चढविण्याचे काम काळ्या समुद्रावरील एका बंदरात चालू आहे. भारताला गहू पोचविण्यासाठी जलद गतीच्या बोटींची योजना करण्यात आली असून वाहतुकीचा खर्चही रशिआ घेणार नाही. फेब्रुवारी अखेर सर्व गहू भारतात पोचविण्यात येईल.

**स्वस्त ट्रॅंझिस्टर**—दिल्ली येथील सुपर बाजारात मध्यम लहरीचे स्वस्त ट्रॅंझिस्टर रेडिओ विक्रीला ठेवण्यात आले आहेत. हे रेडिओ मुंबईच्या एका कंपनीने मुद्दाम तयार केले आहेत. त्यांची किंमत अवघी ८५ रुपये आहे. रेडिओ दिसण्यात आकर्षक असून फिकट पिवळ्या प्लॅस्टिकच्या पेटीत बसविण्यात आला आहे. सुपर बाजारातील गृहोपयोगी मालाचे खाते दरसाल अशा ६० हजार रेडिओ सेट्सची विक्री करील असा अंदाज आहे.

**गुजरात राज्यात द्राक्षाची लागवड**—जुनागड जवळ मंग्रोल ह्या ठिकाणी द्राक्षाचे मळे लावण्यास योग्य हवापाणी आहे. मात्र त्यासाठी योग्य खत घालणे आणि रोगप्रतिबंधक औषधे फवारणे ह्यांची जरूर आहे. मंग्रोल येथील प्रयोगकेंद्रात आतापर्यंत ६९ जातींच्या द्राक्षांची लागवड करण्यात आली. त्यांपैकी ५६ जाती लागवडीयोग्य आहेत असे आढळून आले.

**वैमानिकांना शिकविण्याचे विमान**—दिल्ली येथील मुलकी विमानखात्याच्या संशोधन केंद्राने वैमानिकांना शिक्षण देण्यासाठी 'रेवती' ह्या नावाचे विमान तयार केले आहे. त्यात ३ माणसे बसण्याची सोय आहे. ते जास्तीत जास्त ताशी १३४ मैल वेगाने प्रवास करू शकेल आणि अधिकात अधिक १५ हजार फूट उंच जाऊ शकेल.

**पाकिस्तानी सरकारात विरोधकांना वाव?**—१९५८ साली लष्करी क्रांती करून प्रे. आयूबखान ह्यांनी सत्ता हाती घेतली. तेव्हापासून त्यांच्या विरोधकांना सरकारातून वगळण्यात आलेले आहे. परंतु विरोधकांच्या काही प्रतिनिधींना सरकारात घेण्यात येण्याची शक्यता आता उत्पन्न झाली आहे. पाकिस्तानातील वाढती महागाई, अन्नधान्याची टंचाई व इतर प्रश्नांमुळे प्रे. आयूबखान हा विचार करीत आहेत.

**पाकिस्तानला चीनची अन्नधान्याची मदत**—पाकिस्तानमधील अन्नधान्याची टंचाई लक्षात घेऊन चीन पाकिस्तानला १॥ लाख टन धान्य आता पाठविणार आहे. अमेरिकाही पाकिस्तानला ३॥ लाख टन अन्नधान्याची मदत करणार आहे. पुढील पिके हाती येईपर्यंत एवढ्या मदतीवर निभेल असा अंदाज आहे.

**पाकिस्तानचा पोलादाचा कारखाना**—जपानच्या कोबे पोलाद कारखान्याच्या मदतीने पूर्व पाकिस्तानात चितगाव ह्या ठिकाणी पोलादाचा कारखाना उभारण्यात आला आहे. त्याची वार्षिक उत्पादनक्षमता १॥ लाख टनांची आहे. पण ती वाढवून २ लाख टन करण्यात येणार आहे.

## महाराष्ट्रातील नवे प्रचंड विद्युत्‌केंद्र

चौथ्या पंचवार्षिक योजनेत नागपूर–सावनेर रस्त्यावर नागपूरपासून ८ मैलांवर उष्णतेच्या साह्याने वीज निर्माण करणारे एक प्रचंड केंद्र उभारण्यात येणार आहे. केंद्रासंबंधीची योजना महाराष्ट्र विद्युत्–मंडळाने मंजूर केली आहे. त्याच्या उभारणीसाठी ५० कोटी रुपये खर्च येणार आहे. विद्युत्‌केंद्रापासून ४ लाख, ८० हजार किलोवॅट वीज मिळू शकेल. विदर्भ आणि मराठवाडा ह्या भागांत विजेची मागणी सारखी वाढत चाललेली आहे. ती भागविण्यासाठी ही योजना हाती घेण्यात आली आहे. केंद्रात प्रत्येकी १ लाख, २० हजार किलोवॅट वीज निर्माण करू शकणारे ४ टर्बोजनरेटर्स बसविण्यात यावयाचे आहेत. ह्या केंद्रात वीज निर्माण होऊ लागली की पारस आणि खापरखेडा येथील केंद्रांवर सध्या पडणारा ताण बराच कमी होऊ लागेल. भोपाळ येथील भारी वीजसामग्रीच्या कारखान्याकडून दोन जनरेटर्स मिळविण्यात येणार असून उरलेले दोन एका ब्रिटिश कंपनीकडून खरेदी करण्यात येणार आहेत. ही कंपनी संपूर्ण विद्युत्‌केंद्राचा आराखडाही पुरविणार आहे. ह्या संकल्पित वीजकेंद्राची मूळची उत्पादनक्षमता ५ लाख, ६० हजार किलोवॅटची ठेवण्यात येणार होती व त्यावर ७० कोटी रुपये खर्च करण्यात येणार होते. परंतु परदेशीय चलनाची चणचण आणि इतर अकल्पित अडचणी आल्याने त्याची उत्पादनक्षमता कमी करावी लागली. केंद्रासंबंधीचा स्थानिक तपशील ठरविण्यासाठी भोपाळ येथील कारखान्याचा एक डायरेक्टर महाराष्ट्र विद्युत्–मंडळाच्या अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करीत आहे. विदर्भ आणि मराठवाडा भागात उद्योगधंदे वाढविण्यास चांगला वाव आहे. नवे विद्युत्‌केंद्र सुरू झाल्यावर औद्योगिक शक्तीचा प्रश्न चांगल्या रीतीने सुटण्यास मदत होईल.

---

## विकासाच्या कामासाठी लागणारी यंत्रसामग्री

भारतात धरणे, कालवे, सडका इत्यादी प्रकारची विकासाची कामे मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. ही कामे त्वरेने उरकण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री देशात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. अर्थातच, अशी अवजड यंत्रसामग्री परदेशांकडून मिळवावी लागते. ती यंत्रसामग्री मिळविण्याचा एक करार म्हैसूर सरकारने रशियाशी केला आहे. मातीची खोदाई करणे, ती हलविणे, इत्यादी कामे करणारी भारी यंत्रसामग्री रशिया कराराप्रमाणे पुरविणार आहे. यंत्रसामग्रीची किंमत सुमारे १·२० कोटी रुपयांची आहे. घटप्रभा पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठी ती मुख्यतः वापरण्यात यावयाची आहे. माती वाहून नेणाऱ्या मोटारगाड्या, माती ढकलणारी खोरी, याऱ्या, इत्यादी यंत्रसामग्रीचा पुरवठ्यात समावेश आहे. रशियाचे एक व्यापारी–मंडळ सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे. विकासाच्या कामासाठी भारताला लागणाऱ्या यंत्रसामग्रीविषयी मंडळ पाहणी करणार आहे. मंडळाने हैदराबाद शहराला भेट दिली असून लवकरच ते पाटणा व रांची भागात जाणार आहे. करारात ठरविण्यात आलेल्या यंत्रसामग्रीचा पहिला हप्ता पोचता झाला म्हणजे एकूण किमतीच्या १५ टक्के किंमत आदा करावयाची आहे. बाकीची रक्कम १० वार्षिक हप्त्यांनी चुकती करावयाची आहे. हप्त्यांच्या रकमेवर ३ टक्क्यांनी व्याजाची आकारणी करण्यात येईल. यंत्रसामग्री कामाच्या ठिकाणी पोचल्यावर तिची देखरेख व दुरुस्ती करण्याचे काम मद्रासच्या एका कंपनीकडे सोपविण्यात आले आहे. अशाच प्रकारची यंत्रसामग्री मिळविण्याचा एक करार म्हैसूर सरकारने काही महिन्यांपूर्वी एका फ्रेंच कंपनीशीही केला आहे. पुढील वर्षाच्या पहिल्या तिमाहीत रशियाकडील यंत्रसामग्री भारतात येऊ लागेल.

---

## कॅनडाकडून भारताला मिळत असणारी मदत

कॅनडा आणि भारत ह्यांच्या दरम्यान रेल्वेंना मदत देण्यासाठी आणखी एक करार करण्यात आला आहे. करारातील अटीप्रमाणे कॅनडा भारताला अरुंद रुळांची रेल्वेची एंजिने खरेदी करण्यासाठी ७० लाख डॉलर्सचे कर्ज देणार आहे. ७० लाख डॉलर्सची रुपयाच्या चलनातील किंमत सुमारे ५·२ कोटी रुपये होईल. कॅनडाकडून मिळणारी रेल्वे एंजिने डिझेल इलेक्ट्रिक पद्धतीची असतील. त्यांची अश्वशक्ती १,४०० असून जास्तीत जास्त वेग दर तासाला ९५ किलोमीटर असेल. भारतामधील रेल्वेमार्गावर धावणाऱ्या रेल्वेगाड्यांची गती वाढविण्यासाठी अधिक शक्तिमान रेल्वे एंजिनांची गरज आहे. गाड्यांची गती वाढल्यास रेल्वेचे डबे अधिक काळ फिरते राहून वाहतुकीच्या कालात घट होण्यास मदत होईल. त्या दृष्टीने हळूहळू सर्वच मार्गांवर डिझेल इलेक्ट्रिक एंजिने सुरू करण्याचा रेल्वेचा इरादा आहे. सध्या हिंदी रेल्वे मार्गावर रुंद व अरुंद रुळांवर धावणारी मिळून ७०९ अशा प्रकारची एंजिने आहेत. कॅनडाकडून मिळणारे हे कर्ज बिनव्याजी आहे. त्याची परतफेड ५० वर्षांत करावयाची असून त्याशिवाय १० वर्षांची सवलतीची मुदत परतफेडीसाठी ठेवण्यात आली आहे. कॅनडा भारताला विकासकार्यासाठी अनेक प्रकारची मदत करीत आहे. भारताला त्या देशाकडून गहू व इतर अन्नपदार्थ मिळत असतात. त्याशिवाय, औद्योगिक यंत्रसामग्री व उपकरणे, तांत्रिक साह्य, ह्यांचीही मदत मिळत असते. कॅनडाकडून भारताला मिळत असलेल्या सर्व प्रकारच्या मदतीची रक्कम दरसाल १२ कोटी डॉलर्स अथवा साली्ना ९० कोटी रुपयांची आहे.

---

# अर्थ

बुधवार, १ फेब्रुवारी, १९६७





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## दूधदुभत्याच्या धंद्याचे भवितव्य चांगल्या जनावरांवर अवलंबून

काही दिवसांपूर्वी लखनौ येथे दूधदुभत्याच्या व्यवसायाची परिषद भरविण्यात आली होती. अलीकडे काही मोठ्या शहरांतून सरकार दूधपुरवठ्याच्या योजना हाती घेत आहे. तरी सुद्धा भारतामधील दरडोई दुधाचा खप प्रगत देशांच्या मानाने बराच कमी आहे. तेव्हा अर्थातच ह्या धंद्याची योजनापूर्वक विकास करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. भारतात गुरांची संख्या मोठी आहे. परंतु त्यांतील कितीतरी जनावरे भाकड आणि कित्येक अल्पस्वल्प दूध देणारी असतात. परिषदेने ह्या मुद्द्याकडे लक्ष वेधले आणि निरुपयोगी जनावरांची संख्या कमी करून जातिवंत जनावरांची पैदास व जोपासना ह्यांवर भर देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. ह्या बाबतीत वेळीच योग्य पावले टाकण्यात आली नाहीत तर दूधदुभत्याच्या व्यवसायाचे भवितव्य तर धोक्यात येईलच; पण शेतीची अर्थ-व्यवस्थाचे संकटग्रस्त होईल असा इशाराही परिषदेने दिला आहे. देशातील जमीन आणि त्यापासून उत्पादन करण्यात येणारा माल ह्या दोहींवर अलीकडे गुरे आणि माणसे ह्यांच्या वाढत्या संख्येचा दाब वाढत चाललेला आहे. त्यामुळे जरुरी-पेक्षा जास्त असणाऱ्या गुरांची विल्हेवाट लावण्याचा कार्यक्षम कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे असे सुचविण्यात आले आहे. दूधदुभत्याच्या धंद्यासाठी देशात तयार करण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीची व साधनांची किंमत फार असते. ही यंत्रसामग्री तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालावरील व सुट्या भागांवरील जकातीचा प्रश्न सरकारने पुन्हा विचारासाठी घ्यावा आणि यंत्रसामग्री वाजवी किमतीत मिळण्याची व्यवस्था करावी अशी विनंती करण्यात आली आहे.

---

## औद्योगिक संशोधनातील दोषस्थळांवर प्रकाश

हिंदमधील औद्योगिक संशोधनाविषयी इकॉनॉमिक अँड सायंटिफिक रिसर्च फौंडेशनने तयार केलेला अहवाल उद्बोधक असून ह्या संशोधनातील दोषस्थळांवर प्रकाश टाकणारा आहे. अहवालात असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, भारतात औद्योगिक संशोधनावर बराच पैसा खर्च करण्यात येत असला तरी त्याचा व्यापारी दृष्टीने फारसा उपयोग होत नाही. सरकारने औद्योगिक संशोधनाची जी चाकोरी घालून दिलेली आहे ती बाजारपेठांकडे लक्ष देऊन घालण्यात आलेली नाही. देशात विविध शास्त्रांच्या प्रयोगशाळा आहेत, आणि त्यांच्या-वर मोठाल्या रकमाही खर्च होतात; परंतु ह्या प्रयोगशाळांच्या अंदाजपत्रकापैकी फारच थोडे उत्पन्न त्यांनी उद्योगधंद्यांना केलेल्या मदतीपासून त्यांना मिळते. म्हणून प्रयोगशाळांसाठी देण्यात येणाऱ्या पैशाची लोकांना प्रत्यक्ष होणाऱ्या त्यांच्या उपयोगाशी सांगड घालण्यात आली पाहिजे. देशातील एकूण औद्योगिक उत्पादनाशी तुलना करता राष्ट्रीय प्रयोगशाळां-कडून मिळणाऱ्या तांत्रिक उत्पादक ज्ञानाची मदत फारच अल्प आहे. ही मदत सोडली तर देशातील जवळजवळ सर्व तांत्रिक ज्ञान सध्या परदेशांतून आयात केलेले असते. भारत औद्योगिक संशोधनावर दरसाल सुमारे ५० कोटी रुपये खर्च करीत आहे. ही रक्कम श्रीमंत देशांच्या मानाने कमी असली तरी उपेक्षणीय नाही. इतक्या मोठ्या रकमेच्या मानाने भारताला औद्योगिक संशोधनाबाबत फारशी प्रगती मात्र करता आलेली नाही. ह्याचे कारण असे नमूद करण्यात आले आहे की, औद्योगिक संशो-धनाचा व्यवहारातील प्रश्नांशी संबंध नसतो. त्यामुळे पुष्कळदा संशोधक शास्त्रज्ञांचे लक्ष उद्योगधंद्यांना व्यावहारिक उपयोग होईल असे संशोधन करण्यापेक्षा अधिक निबंध वाचण्याकडे लागते.

---

## शिक्षणावरील खर्चात १६१ कोटी रुपयांची कपात

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात शिक्षणासाठी १२१० कोटी रुपयांची रक्कम नियोजन समितीने निर्दिष्ट केलेली आहे. परंतु आता ह्या रकमेत १६१ कोटी रुपयांची कपात करण्यात आल्याची वार्ता आहे. पैशाच्या टंचाईमुळे हा निर्णय घ्यावा लागला आहे. भारत सरकारचे शिक्षण खाते आता चौथ्या कार्यक्रमात १,०४९ कोटी रुपयेच शिक्षणावर खर्च करील. मध्यवर्ती सरकारचे शिक्षण खाते ही कपात रद्द करून घेण्याची खटपट करीत आहे. परंतु ह्या खटपटीला यश येण्याची लक्षणे दिसत नाहीत. शिक्षण खात्यासाठी नियोजन समितीने मंजूर केलेली मूळची रकमच ५० कोटींनी कमी करण्यात आलेली होती. अशा परिस्थितीत करण्यात आलेली जादा कपात जाणवण्यासारखी आहे. भडकत चाललेल्या किमतीचा विचार करता चौथ्या कार्यक्रमातील रक्कम तिसऱ्या कार्यक्रमापेक्षाही कमीच भरणारी आहे.

---

## वृद्धवेतनाची योजना पैशाअभावी स्थगित


काही काळापूर्वी भारत सरकारच्या गृह, अर्थ व मजूर खात्यांनी मिळून वृद्धांना निवृत्तिवेतन देण्याची एक योजना तयार केली होती. ह्या योजनेस नियोजन समितीने मंजुरीही दिली होती. परंतु मध्यवर्ती मंत्रिमंडळाने योजना अमलात आणण्यासंबंधीचा निर्णय पुढे ढकलला आहे. आता काही वर्षे तरी अशा प्रकारची काही योजना पुढे येईल असे वाटत नाही. पुरेसा पैसा उपलब्ध नसल्याने योजना तहकूब करावी लागली आहे. ६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या निराधार वृद्धांना दरमहा २० रुपये मुशाहिरा देण्याची आणि ६० वर्षांच्या पुढील परंतु काम करण्यास असमर्थ असलेल्या वृद्धांनाही तितकीच दरमहा रक्कम द्यावयाची सूचना योजनेत करण्यात आली होती. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात योजनेसाठी १२० कोटी रुपयांची व्यवस्था करण्यात आली होती. त्याशिवाय ज्यांना अत्यंत अपुरे उत्पन्न आहे अगर जे अंशतः असमर्थ आहेत अशांनाही निवृत्तिवेतन देण्यात यावयाचे होते. निवृत्तिवेतनाची योजना तहकूब करण्याबद्दल बोलताना सोशल सिक्युरिटी खात्याचे मंत्री श्री. अशोक मेहता म्हणाले की निवृत्तिवेतनावर खर्च होणारा पैसा वृद्धांसाठी खर्च न करता मुलांवर खर्च करणे अधिक इष्ट होईल. वृद्धांना म्हातारपणचे वेतन देण्याच्या योजना सध्या आंध्र प्रदेश, केरळ, मद्रास, पंजाब, आणि उत्तर प्रदेश राज्यांतून अमलात आहेत. राजस्थान सरकारनेही अशा योजनेची घोषणा केली आहे. मध्यवर्ती सरकारच्या योजनेप्रमाणे वृद्धवेतनावर होणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम राज्यांना मिळणार होती.

---

## पाकिस्तानातही अन्नधान्याची वाढती टंचाई

पाकिस्तानात अन्नधान्याची वाढती तूट जाणवू लागली आहे. १९४८ साली पाकिस्तानला अन्नधान्याची आयात करावी लागली नाही. तेव्हापासून पाकिस्तानात झालेली लोकसंख्येची वाढ लक्षात घेऊनही अलीकडे अन्नधान्याची अधिकाधिक आयात करावी लागत आहे. १९५० साली पाकिस्तानने फक्त ४८ हजार टन अन्नधान्याची आयात केली. १९६५–६६ साली २० लाख टन धान्य आयात करण्यात आले; आणि चालू साली त्याच्या दुप्पट आयात करावी लागेल अशी लक्षणे दिसत आहेत. पाकिस्तानचे एका काळचे पंतप्रधान चौधरी महमद अली ह्यांनी ह्या संबंधी केलेला खुलासा उद्बोधक आहे. पकिस्तान सरकारने गेल्या काही वर्षांत नगदी पिकांना उत्तेजन दिले. त्यामुळे कापूस आणि ताग ह्यांचे उत्पादन वाढले. परंतु गहू आणि तांदूळ ह्यांचे उत्पादन घटले. पश्चिम पाकिस्तानातील गव्हाच्या लागवडीखालील जमीन कमी झाली आणि पूर्व पाकिस्तानातील भातपिकी जमिनीत अधिक प्रमाणात ताग पिकविण्यात येऊ लागला.

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?


धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...
परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...

बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
विनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलविता येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.
किर्लोस्कर
डिझेल एंन्जिन्स
३ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)
TOM & BAY KO: 667-A MAR

## मदत देणारांना भारताच्या निर्लज्जपणाचा वीट आला आहे

**"समजावून सांगू, धक्के देऊ, अखेर धमकी देऊं."**

भारतामधील उपासमारीचे कारण काय ? काय बिघडले आहे ? त्याबाबत काय करता येण्याजोगे आहे ?

१९४३ नंतर आजवर दुष्काळ जाणवला नाही, पण आता तो जाणवू लागणार, हे दिसत आहे. एप्रिल, १९६१ मध्ये भारताची लोकसंख्या ४४ कोटी होती; आता ती ५० कोटी झाली आहे. ह्या मुदतीत धान्याचे उत्पादन खालीलप्रमाणे झाले :—

| | |
|---|---|
| १९६०–६१ | ८·२ कोटी टन |
| १९६१–६२ | ८·३ कोटी टन |
| १९६२–६३ | ७·८ कोटी टन |
| १९६३–६४ | ८·० कोटी टन |
| १९६४–६५ | ८·८ कोटी टन |
| १९६५–६६ | ७·२ कोटी टन |

चालू वर्षी धान्याचे उत्पादन ८ ते ८·५ कोटी टन भरेल, अशी अपेक्षा आहे.

अशा परिस्थितीत, दुष्काळाचा चटका ह्यापूर्वीच जाणवू लागायला हवा होता. पण अमेरिकेने गहू पाठवून तो जाणवू दिला नाही. दरसाल २० ते ३० लक्ष टन गहू अमेरिका पाठवीत गेली; १९६५ साली तर अमेरिकेने ६० लक्ष टन गहू धाडला. चालू वर्षी धान्याची मदत ९० लक्ष टनांवर जाईल.

भारतातील धान्याचे उत्पादन का वाढत नाही ? शेतीवरील खर्च वाढवला म्हणजे पीक जास्त येईल; पावसाने मात्र सहकार्य केले पाहिजे, असा नव्या दिल्लीचा आशावाद कायम टिकून आहे. पण सहा वर्षांच्या अनुभवानंतर तो आता डळमळू लागला आहे. पावसाच्या अभावामुळेच गेल्या वर्षी अडचण निर्माण झाली; यंदाचा बिहार आणि उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागातील दुष्काळाचे कारण अवर्षण हेच आहे.

भूतकालीन चुका कबूल करण्याला भारताचे नियोजक कचरत नाहीत. पण भलतीच, बिनबुडाची आशा दाखविण्यास मात्र लाज बाळगीत नाहीत. ट्यूब विहिरी, छोटी धरणे, मोठ्या धरणांचे पाणी वाहून नेणारे कालवे, इत्यादींचा तुटवडा, खतांचा अपुरा पुरवठा, उत्पादकाला प्रोत्साहन न देणाऱ्या किंमती, अपुरा कर्जपुरवठा, इत्यादी कारणमालिका नेहमी तयार असतेच. ही सर्व कारणे दीर्घ काळ सर्वांना माहीत आहेत; पण ती माहीत असणे म्हणजे त्यावर मात करणे नव्हे. चूक समजणे आणि ती दुरुस्त करणे ह्यातील अंतर इतर देशांचे मानाने भारतात फारच मोठे आहे.

हा प्रश्न पैशाचा नसून माणसांच्या आणि त्यांच्या प्रवृत्तीचा आहे. कित्येक हिंदी शेतकरी शेतीच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करून उत्पादन वाढवीत आहेत. पण त्यांची संख्या अत्यल्प आहे. वरच्या राजकीय आणि कारभारी पातळीत मात्र वाईट संवयी चांगल्या संवयीवर मात करीत आहेत.

अमेरिकेच्या अध्यक्षांनी धान्याच्या मदतीचे बाबतीत चालविलेल्या दिरंगाईने ही लक्तरे बाहेर आणली आहेत. त्या दिरंगाईला इतरही कारणे आहेत. ९० लक्ष टन गहू म्हणजे अमेरिकेच्या गव्हाच्या वार्षिक उत्पादनाच्या एक चतुर्थांश एवढा होतो; गेल्या दोन वर्षांत अमेरिकन सरकारच्या हातातील गव्हाचा साठा २·४ कोटी टनांवरून १·१ कोटी टनांवर उतरला आहे. जगांतील इतर देशातील, विशेषतः रशियातील उत्पादन वाढले आहे. तेव्हा बाकीच्या देशांनीही भारताची उपासमार थांबविण्यास हातभार का लावू नये, असे अमेरिकन सरकारचे म्हणणे आहे. भारताच्या प्रजेला अन्न पाठवून खाऊ घालण्याखेरीज गत्यंतर नाही.

हा झाला तात्कालिक उपाय. दीर्घकालीन उपाय म्हणजे भारताने धान्याच्या बाबतीत स्वावलंबी व्हावे, ह्यासाठी त्याला समजावून सांगणे; तेवढ्याने भागले नाही तर त्याला धक्के द्यावेत; तेवढ्यानेही भागले नाही तर त्याला दमदाटी करावी ! कळते पण वळत नाही, अशी भारताची स्थिती आहे आणि अमेरिका धान्य देत आहे त्यामुळे प्रश्नाचे गांभीर्य आणि तांतडी ह्याकडे कुणी लक्ष देत नाही. ह्यासाठी प्रेसिडेंट जॉन्सन बुध्ध्याच जरा ताणून धरीत आहेत. त्यासून काही राजकीच लाभही ते अपेक्षित असले तर त्यात नवल नाही. व्हिएटनामबाबत भारताचे धोरण अमेरिका-विरोधी राहू नये, भारताने अमेरिकन पद्धतींचा आणि खत कंपन्यांचा स्वीकार करावा, असे त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. अमेरिकेचे हे धोरण बिगर-अमेरिकनांना स्वागतार्ह वाटणार नाही. पण प्रेसिडेंट जॉन्सन ह्यांच्या उद्देशाबद्दल ( भारताने स्वतःच्या पायावर उभे राहावे ) शंका वाटण्याचे कारण नाही.

अमेरिकेच्या उपाययोजना पत्करून भारत स्वावलंबी होऊ शकेल, अथवा "आम्हांला तुमच्या मदतीची गरज नाही" असे सांगता येण्याइतपत भारतीय लोक रक्त ओकेपर्यंत श्रम करण्याचे मान्य करतील आणि प्रत्यक्ष कृती करून दाखवितील. हा दुसरा उपाय कठीणच दिसतो, त्यामुळे प्रत्येक भारतीयाच्या वाट्याला सध्यापेक्षा कमी धान्य येईल; कारण थांबलेल्या मदतीची जागा घेणारे भांडवल दुसऱ्या कशातून निर्माण होणार ? ह्या दोहोपैकी काही होवो, त्यामुळे भारताचा दीर्घकालीन फायदाच होणार आहे. एरव्ही आपले पुढारी भिक्षेची झोळी घेऊन जगभर भिक्षा मागत हिंडत असणे भारतीयांना लज्जास्पदच वाटत राहील.

भारताला मदत करण्याचे बाबतीत पाश्चात्त्य देशांचे दातृ

आटू लागले आहे; आधी दिलेला पैसा वाया गेला, त्यात आणखी भर कशाला ? असे त्यांना वाटू न लागले तरच नवल. जागतिक बँकेने भारताने उभारलेल्या कारखान्यांची व धरणांची तपासणी करण्याचे योजिले त्याला भारतांत विरोध आहे. पाकिस्तानचे मात्र जागतिक बँकेशी व दात्या देशांशी संबंध फार सलोख्याचे आहेत. भारताच्या अडचणींशी झटापट करण्याच्या मानाने पाकिस्तानला मदत करणे म्हणजे शीळ घालून विनोदन करण्याइतके सोपे आहे असे त्या देशांना वाटते. आपल्या गरजा पुढे मांडण्यात पाकिस्तानी हुषारी दाखवितात.

१९५० मध्ये परिस्थिती अशी होती की दाते देश पाकिस्तानला भारताचा पद्धतशीर विकास आदर्श म्हणून दाखवीत असत. विकसित देशांना आता भारताच्या मागणीची अवाढव्यता मदत नाकारण्यास प्रवृत्त करू लागली आहे. अद्याप चर्चेच्या अवस्थेत असणाऱ्या चौथ्य पंचवार्षिक योजनेसाठी एकूण खर्चाच्या एक चतुर्थांशाइतकी मदत भारत परदेशाकडे मागत आहे. पाकिस्तानला मिळणारी दर माणशी मदत भारताला मिळणाऱ्या मदतीच्या दुप्पट आहे. पाकिस्तानची एकूण मागणी भारताच्या मागणीचे मानाने लहान आहे, तेथील सरकार अधिक भक्कम आहे, खाजगी भांडवलदारांचे बाबतीत पाकिस्तान सरकार ज्यास्त उदार आहे, पाकिस्तानची मागणी लहानातून मोठ्या करावयाच्या योजनांसाठी असते. भारत भव्य योजना आखून तेथूनच मागणीचा आकार ठरवितो. भारताचा जागतिक बँकेला आता वीट आला आहे; त्याचा परिणाम इतर देशांवर होतो. हिंदी आर्थिक धोरणात ढवळाढवळ करीत असल्याचा आरोप जागतिक बँकेवर भारतात केला जातो. गेल्या मार्चमध्ये श्रीमती गांधी वॉशिंग्टनला गेल्या, तेव्हाचे मानाने आता प्रेसिडेंट जॉन्सन भारत सरकारचे भक्त मुळीच उरलेले नाहीत.

## आसामधील मुसलमानांची वाढलेली संख्या

आसामच्या लोकसंख्येविषयी १९६१ च्या शिरगणतीच्या अहवालात अशी माहिती देण्यात आली आहे की १९५१ ते १९६१ च्या दहा वर्षांच्या अवधीत राज्यांतील मुसलमानांची संख्या ७ लाख, ६९ हजारांनी वाढली. १९५१ साली मुसलमानांची लोकसंख्या १९ लाख, ९५ हजार होती ती १९६१ साली २७ लाख, ६५ हजार झाली. मुसलमानांची लोकसंख्या वाढण्याची इतर कारणे लक्षात घेऊन सुद्धा झालेली वाढ जादा आहे असा कमिशनचा अभिप्राय आहे. पाकिस्तानातून भारतात बेकायदा घुसणाऱ्या मुसलमानांची वाढलेल्या लोकसंख्येत मोठी भर पडली आहे असे कमिशनचे म्हणणे आहे. बेकायदा घुसलेल्या मुसलमानांची संख्या २॥ लाख तरी असावी असा कमिशनचा अंदाज आहे. कमिशनच्या अभिप्रायाचा पडताळा पाहण्यासाठी आसामच्या सरहद्दीवरील भागांची तरी पुन्हा शिरगणती करण्यात यावी अशी सूचना मध्यवर्ती शिक्षणमंत्री मि. फक्रुद्दिन अली अहमद ह्यांनी केली आहे.

## सहकारी शीतगृह आणि बर्फाचा कारखाना

ठाणे जिल्हा मच्छीमार सहकारी संस्थेने पालघर येथे एका बर्फाच्या कारखान्याची व मासे टिकविण्यासाठी शीतगृहाची स्थापना केली आहे. बर्फाचा कारखाना व शीतगृह ह्यांच्यासाठी ८·५० लाख रुपये भांडवल उभारावे लागले. त्यापैकी ५·२० लाख रुपये भांडवल सरकारने कर्जरूपाने पुरविले आहे. पालघर मुंबईपासून ८७ किलोमीटर अंतरावर असून तेथे आसपासच्या खेड्यांतील कोळी मासे विकावयास आणीत असतात. शीतगृहात मासे टिकविण्याची सोय झाल्यामुळे त्यांच्या मालाला अधिक चांगला भाव मिळविण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. ठाणे जिल्ह्यात मच्छीमारीचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. परंतु त्यात गुंतलेल्या कोळ्यांची अवजारे बहुधा जुन्या पुराण्या पद्धतीची असतात. खोल समुद्रात मच्छीमारी करणाऱ्या बोटी वापरण्यात आल्यास धंदा फोफावेल. सरकार अद्यावत पद्धतीची मच्छीमारीची साधने सहकारी संस्थांसाठी आयात करणार आहे.



## चित्रपटांची निर्गत करणारे प्रमुख देश

| | वार्षिक निर्गतीची किंमत |
|---|---|
| अमेरिका | २२·५ कोटी डॉलर्स |
| इटली | ४·० कोटी डॉलर्स |
| ग्रेट ब्रिटन | १·५ कोटी डॉलर्स |
| फ्रान्स | १·३ कोटी डॉलर्स |
| मेक्सिको | ६० लक्ष डॉलर्स |
| जपान | ५० लक्ष डॉलर्स |
| भारत ( अवमूल्यनापूर्वी ) | ४० लक्ष डॉलर्स |

जागतिक बाजारपेठेत रंगीत चित्रपटांनाच विशेष मागणी असते. भारतीय चित्रपटांची बाजारपेठ विकसनशील देशांतच प्रामुख्याने असल्यामुळे ती बाजारपेठ भारतीय चित्रपटांना हळू-हळू मुकावी लागणार आहे. तेव्हा अमेरिका, युरोप आणि जपान येथे आपले चित्रपट लोकप्रिय कसे होतील, हे पाहणे जरुरीचे आहे.

हिंदी चित्रपटांना परदेशांत मिळणारे सर्व पैसे स्वदेशात आणलेच जात नाहीत. खरोखर मिळणाऱ्या रकमांपेक्षा कागदावर कमी रकमा दाखविल्या जातात आणि त्यामुळे परदेशी हुंडणावळीच्या मिळकतीस गळती लागते, अशी तक्रार ऐकू येते. त्यामुळे निर्गतीचे उत्पन्न वाढावयास पाहिजे, तसे वाढत नाही.

### महात्माजींच्या जीवनावरील चित्रपट

महात्मा गांधींच्या जीवनावर एक दीर्घ चित्रपट लंडनमधील कंपनी काढीत आहे. १९६९ मध्ये, गांधी जन्मशताब्दी वर्षात, तो प्रदर्शित केला जाईल. श्री. मोतीलाल कोठारी हे त्याचे निर्माते–दिग्दर्शक असून मि. रॉबर्ट बोल्ट ह्यांचे कथानक आहे.

### अन्न आघाडीवरील सीलोनचे प्रयत्न

सीलोनमध्ये अन्नपदार्थांचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न जारीने करण्यात येत आहेत. नेहमीच्या अन्नधान्याचा तुटवडा असल्यामुळे उपपदार्थांच्या उत्पादनाकडे लक्ष देण्यात येत आहे. सीलोनमध्ये बेकारांची संख्या बरीच आहे. अशा तरुण बेकारांतून एक भूमिसेना उभारण्यात आली आहे. सीलोनला बटाटे, डाळी, इत्यादी पदार्थ परदेशातून आयात करावे लागतात. ह्या उपपदार्थांचे उत्पादन अधिक करण्यासाठी भूमिसेना कारणी लावण्यात येत आहे. ज्या भागात पाऊस पुरेसा पडत नाही अशा भागात विहिरीतील व तळ्यातील पाणी उपसून पिके काढण्याचे प्रयत्न होत आहेत. सीलोनला लागणारा कांदा भारताकडून मोठ्या प्रमाणात आयात करण्यात येतो. आता कांद्याची लागवड करण्याची कोशीस करण्यात येत आहे. पूरक अन्नपदार्थांचे उत्पादन वाढवून अन्नधान्याच्या पुरवठ्यावरील ताण कमी करण्याचा हा उपक्रम आहे.

### उंदरांच्या संहाराची जोरदार मोहीम

भारतामधील अन्नधान्याच्या टंचाईच्या अनेक कारणांपैकी उत्पादित धान्याचा उंदीर आणि तत्सम प्राणी ह्यांच्याकडून होणारा नाश, हे एक आहे. ह्या धान्यनाशक प्राण्यांची नक्की संख्या किती आहे हे सांगणे अर्थातच अशक्य आहे. पण त्यांची संख्या २४० कोटी असावी असा अंदाज आहे. त्यांच्याकडून होणाऱ्या धान्याच्या भक्षणाचा अंदाज करणेही कठीण आहे. एकूण उत्पादनाच्या २·४ टक्के धान्य त्यांच्या भक्ष्यस्थानी पडत असावे असा कयास आहे. उंदरांच्या पोटी जाणारे हे धान्य वाचविण्यासाठी त्यांचा संहार करण्याची एक जोरदार मोहीम भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्याने तयार केली असून, राज्य सरकारांना तिची कसोशीने अंमलबजावणी करण्यास सुचविले आहे. १९६६–६७ साली अंमलात आणावयाच्या ह्या मोहीमेसाठी १२·९ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. उंदरांना पकडण्यासाठी अगर विषाने मारण्यासाठी येणारा सर्व खर्च मध्यवर्ती सरकार देणार आहे. मध्यवर्ती अन्न खात्याच्या योजनेस अनुसरून ह्या वर्षी ६५ लाख एकर जमिनीत ही योजना सुरू करण्यात येईल. भारत सरकारच्या वनस्पती संरक्षक सल्लागाराने उंदरांच्या संख्येला आळा घालण्यासाठी एक प्रायोगिक कार्यक्रम आखला असून तो राज्य सरकारांकडे मार्गदर्शनासाठी धाडण्यात आला आहे. ह्या कार्यक्रमात उंदरांच्या संख्येला आळा घालण्याचे मार्ग, त्यांना आकर्षित करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू आणि पोटांत देण्याचे विष ह्या बाबतीत तपशीलवार सूचना देण्यात आल्या आहेत. उंदरांच्या संख्येला आळा घालण्याचे प्रयत्न एकट्या दुकट्याने करून यशस्वी होत नाहीत. त्यासाठी असे प्रयत्न पद्धतशीर रीतीने तयार करून सामुदायिक रीत्या अंमलात आणले पाहिजेत, असे खात्याने स्पष्ट केले आहे.

### उच्च शिक्षणसंस्था स्थापण्यासाठी जर्मनीची मदत


हिंदमधील हुशार विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी पाठविण्यात येतात. त्यांच्यातील अनेक विद्यार्थ्यांचा कल मायदेशी परत न येता परदेशीच स्थायिक होण्याचा असतो. त्यामुळे भारतामधील बुद्धिसंपत्तीचा परदेशांना फायदा मिळतो. हे थांबविण्यासाठी पश्चिम जर्मनीतील एका विद्यापीठाने मदत देऊ केली आहे. बॉन विद्यापीठाचे डॉ. ग्रॉथ ह्यांच्या नेतृत्वाखाली जर्मन शिक्षणतज्ज्ञांचे एक मंडळ सध्या भारताच्या दौऱ्यावर आले आहे. मंडळाने अशी सूचना केली आहे की, उच्च शिक्षणाच्या अधिक सवलती भारतातच उपलब्ध करून देण्यात आल्या तर परदेशात जाणाऱ्या हिंदी बुद्धिमत्तेचा ओघ थांबविता येईल. कारण, मग विद्यार्थ्यांना परदेशी जाण्याचे कारणच उरणार नाही. जर्मन प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली भारतात उच्च शिक्षणाच्या संस्था स्थापन करण्याची तयारी जर्मन शिक्षणतज्ज्ञांनी दाखविली आहे.

**स्ट्रेप्टोमायसिनचा तुटवडा तात्पुरता**–क्षयरोगावर गुणकारी असलेल्या स्ट्रेप्टोमायसिनचा सध्याचा तुटवडा तात्पुरता असून तो लवकरच नाहीसा होईल. ह्या औषधाचे उत्पादन वाढविण्यात येत असून काही प्रमाणात ते आयातही करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी स्ट्रेप्टोमायसिनपेक्षा कमी प्रभावी औषधाने भागण्यासारखे असते तेथेही हे औषध देण्यामुळे तुटवडा पडल्याचे सांगण्यात येत आहे.

**पाणी खराब करण्यास बंदी**—बोटीतून बाहेर फेकण्यात येणाऱ्या तेलामुळे समुद्राचे पाणी खराब होऊ नये म्हणून जपानच्या वाहतूक खात्याने नवीन कायदा करण्याचे ठरविले आहे. सध्या किनाऱ्यापासून १० हजार मीटर अंतराच्या आत तेल, वंगण, इत्यादी पदार्थ समुद्रात सोडण्यास मनाई आहे. हे अंतर वाढवून ९० किलोमीटर करण्याचा खात्याचा इरादा आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म–शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.
फोन नं. :–२८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग


तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०१
( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.
अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर



### श्री. रामराव मारुतीराव चव्हाण

नगर जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रांत श्री. रामराव चव्हाण यांना फार मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे. त्यांच्या सामाजिक जीवनातील त्यांचे आजचे श्रेय हे लादलेले नसून स्वकर्तृत्वाने, तपश्चर्येने व निष्ठेवर त्यांनी मिळविलेले आहे. "हाती घ्याल ते तडीस न्या" या उक्तीप्रमाणे त्यांचे सेवेचे व्रत चालू असते.

दिनांक २६-४-१९२२ रोजी खडांबा, ता. राहुरी, जि. अहमदनगर, येथे त्यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण सोसायटी हायस्कूल नगर, शिवाजी मराठा हायस्कूल, पुणे, डी. एम्. पेटिट हायस्कूल, संगमनेर येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेज व लॉ कॉलेज पुणे येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षणक्रम संपल्यावर त्यांनी वकिलीचा पेशा पत्करला. सन १९४० मध्ये ते काँग्रेसच्या ध्येय-धोरणाशी व्रतबद्ध झाले. तेव्हापासून काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून ते जिल्ह्यात व इतरत्र वावरत आहेत.

अहमदनगर जिल्हा विकास मंडळाचे सन १९५२ ते ६२ पर्यंत सन्मान्य चिटणीस म्हणून त्यांनी काम केले. या मुदतीतील त्यांच्या तपश्चर्येने सेवेचे क्षितिज उंचावले, कार्याची व्याप्ती वाढली. अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळ, यशवंत हौसिंग सोसायटी, जिल्हा भूविकास बँक इ. विविध संस्थांत ते सेवा करीत आहेत.

१९५३ ते ५५ पर्यंत जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी काम केले. समाजकारण, राजकारण यांबरोबर सहकाराच्या क्षेत्रानेही त्यांना आकर्षून घेतले. याचे मुख्य कारण म्हणजे सहकारी तत्त्वप्रणालीवरील त्यांची अढळ निष्ठा हे होय.

नगर जिल्हा सहकारी भूविकास बँकेचे ते स्थापनेपासून चेअरमन आहेत. त्यांच्या कारकीर्दीत ही बँक महाराष्ट्रातील एक नामवंत, प्रगतिशील सहकारी संस्था म्हणून नावारूपास आली आहे. याचे श्रेय संचालक मंडळ, जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्ते यांना तर आहेच, तथापि ही धुरा वाहण्याची, पेलण्याची फार मोठी कामगिरी श्री. रामराव चव्हाण यांनी यशस्वीरीत्या बजावली आहे, यात शंका नाही.

नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते संचालक असून यशवंत को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीचे चेअरमन आहेत. प्रथम सरकारनियुक्त व आता लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून ते काम पाहात आहेत.

नगर जिल्ह्याच्या सहकारी साखर कारखान्याच्या व सहकारी चळवळीच्या पार्श्वभूमीवर श्री. रामराव चव्हाण स्फटिकाप्रमाणे चमकू लागले व त्यांनी आपल्या कार्याची अवीट गोडी सहकारी कार्यकर्त्यांत निर्माण केली.


समाज शिक्षणमालेचे आगामी प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २० २-६७ रोजी प्रसिद्ध होईल.



**दि बँक ऑफ कराड लि.**

रजिस्टर्ड ऑफिस : १५ रविवार पेठ, कराड.

**— वर्षअखेरची वस्तुस्थिती —**

| ३१-१२-१९६५ | | ३१-१२-१९६६ |
|---|---|---|
| रु. | | रु. |
| ५,४१,१०० | पेडअप कॅपिटल | ५,४१,१०० |
| २,२७,७०० | रिझर्व्हज व इतर फंडस् | २,५१,००० |
| १,००,३३,६०० | एकूण ठेवी | १,०८,३१,००० |

६% करपात्र) ३१-१२-६६ या सालाकरितां- ६%(करपात्र)
सुचविलेले नफा वाटप.

आठ —: एकूण शाखा :— आठ

डिपॉझिट्समध्ये एकूण आठ लाखांनी वाढ झाली.

रिझर्व्हसमध्ये तेवीस हजारांनी वाढ झाली.

एकूण—१·१६ लाख रु. नफा (करपात्र)

# जपानमधील बँकांतील सुरम्य वातावरण आणि विविध सेवा

जपानमधील क्यूशू शहरातील बँकेच्या शाखेत, ओळख व खाते नसतानादेखील एखादी व्यक्ती प्रवेश करते, आपले पासबुक व क्रेडिट कार्ड काउंटरवरील कर्मचाऱ्याला देते, काउंटरवरचा कर्मचारी पासबुक क्रेडिट कार्ड घेतो. पासबुकचा ठराविक कोपरा एका यंत्राच्या साहाय्याने तपासतो व क्षणार्धात एक लाख येन इतकी रक्कम आलेल्या व्यक्तीला मोजून देतो; असे प्रसंग वारंवार घडतात.

जपानमधल्या बँकेत असा व्यवहार मुळीच नवा नाही. बँकेच्या एका शाखेत खाते असले म्हणजे बँकेच्या देशभर पसरलेल्या २१० ठिकाणच्या कोणत्याही शाखेतून एक लाख येन इतकी रक्कम खातेदार काढू शकतो. बँकेला फक्त 'सर्कल डिपॉझिट अकाउंट' ठेवावा लागतो. जपानच्या फ्युजी बँकेने सर्कल डिपॉझिट अकाउंटची सुरवात करून नवा उपक्रम सुरू केला. खातेदारांना देता येईल इतकी सोय करून देणे व बँकेचा व्यवहार खातेदारांच्या दृष्टीने विनासायास करणे या दोन मुख्य गोष्टींकडे लक्ष देणे, हेच फ्युजी बँकेचे वैशिष्ट्य आहे.

वर उल्लेखिलेल्या सर्कल डिपॉझिट अकाउंटमध्ये खास 'गुप्त सहीचा' उपयोग केलेला असतो. खातेदार याकरिता केवळ आपल्या नावाच्या सहीचाच उपयोग करतो असे नव्हे तर सहीऐवजी इतर कोणतेही चिन्ह अथवा जपानी अगर इंग्रजी भाषेतील कोणतीही चार अक्षरे याचा तो 'गुप्त सही' म्हणून उपयोग करू शकतो. अशी गुप्त सही बँकेला प्रथम कळवावी लागते इतकेच! 'सर्कल डिपॉझिट अकाउंट' असणाऱ्या खातेदाराला बँकेकडून एक ओळखपत्र देण्यात येते. हे ओळखपत्र व पासबुक बँकेच्या कोणत्याही खात्यात दाखवून खातेदाराला पैसे काढता येतात. खातेदाराची गुप्त सही पासबुकाच्या एका कोपऱ्यावर केलेली असते व ही सही फक्त यंत्राच्याच साहाय्याने दिसू शकेल अशी योजना केलेली असते. काउंटरवरचा कर्मचारी आलेल्या खातेदाराला एका कागदाच्या तुकड्यावर गुप्त सही करायला सांगतो. ही सही पासबुकवरच्या गुप्त सहीशी जुळली की खातेदाराला पैसे मिळू शकतात. पासबुकवर करण्याची नोंदही यंत्राच्या साहाय्यानेच केली जाते.

बँकेचा लोकांनी जास्तीतजास्त फायदा घ्यावा व लोकांना बँकेतर्फे व्यवहार करण्याची सवय व्हावी म्हणून जपानमधील प्रत्येक बँक प्रयत्न करत असते. बँकेची इमारत भव्य व आकर्षक ठेवण्याकडे लक्ष दिले जाते. लोखंडी जाळीत बसलेला कॅशियर जपानच्या बँकेत सहसा आढळणार नाही.

टोकियो शहरात फ्यूजी बँकेची सोळा मजली इमारत आहे! तळमजल्यावर प्रशस्त हॉल आहे. बसण्याकरता सुंदर कोच आहेत. रुंद काउंटर्स आहेत. इमारतीबाहेरच्या हालचाली आतून दिसाव्यात म्हणून काचेच्या भिंती आहेत! सुरेख पडद्यांनी आकर्षकपणा वाढवला आहे! सुंदर पोषाखांनी नटलेला व विनम्रभावाने सेवेस तत्पर असलेला स्त्रीसेवकवर्ग आहे! आलेल्या लोकांचे स्वागत करणे व हवी असलेली माहिती देणे हे काम स्त्रीसेवकवर्ग करतो. सोळाव्या मजल्यावर बँकेचे रेस्टॉरंट व बार आहे. शिवाय छोट्या छोट्या खोल्या आहेत. महत्त्वाच्या बाबतीत बँकेतील अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याकरता या खोल्यांचा उपयोग करण्यात येतो. अशा वेळी लंचदेखील आयोजित केलेला असतो. इमारतीला चारी बाजूला उंच मनोरे आहेत. आलेल्या लोकांना टोकियोचे सौंदर्य मनोऱ्यातून पाहता येते. तळमजल्यावर सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व व्हाल्ट्स अतिशय कार्यक्षम आहेत. ६६ सेंटिमीटर जाडीच्या पोलादी दरवाज्यांनी ती मजबूत केली आहेत.

जपानमधल्या प्रत्येक बँकेला आपापले वैशिष्ट्य आहे. परंतु फ्युजी बँक ही सर्वांत आघाडीवर आहे. फ्युजीची मालमत्ता जपानमधील कोणत्याही बँकेच्या मालमत्तेपेक्षा अधिक आहे. फ्युजीची एकूण मालमत्ता ७,०,००,००,००० डॉलर इतकी आहे. साऱ्या जगात फ्युजी बँकेचा दहावा क्रमांक लागतो. 'तुमची बँक' या शब्दांत फ्युजी बँक आपलं वर्णन करते. या बँकेने अगदी लहान लहान ठेवीदार करून घेतले आहेत. त्यामुळे बँकेला फारच मोठा फायदा झाला आहे. या वर्षी तर एक लाख येन बचत करणारे मिळवता येतील तितके अधिक खातेदार मिळवण्याचं बँकेनं ठरवलं आहे व हे खातेदार पगारी कामगार आहेत.

बँकेची शाखा ही शाखा वाटत नाही तर मुख्य कचेरी वाटावी इतकी ती भव्य आणि आकर्षक असते. टोकियोत व आसपासच्या जिल्ह्यांत अशा शाखा सर्वत्र विखुरल्या आहेत. कोणत्याही खातेदाराचा दोन मिनिटांपेक्षा अधिक वेळ घेतला जात नाही. फारच गर्दी असेल तर जास्तीतजास्त दहा मिनिटे थांबावं लागतं इतकंच! कार्यक्षम सेवकवर्ग असल्यामुळंच हे शक्य होतं. फ्युजी बँकेत देशी व विदेशी बँकेचे सर्व प्रकारचे व्यवहार चालतात. म्युनिसिपालटीला भरावी लागणारी पाणीपट्टी, गॅसचं बिल, टेलिफोन बिल, अशी सर्व बिलं प्रत्येकाच्या घरी न पाठवता थेट बँकेकडेच पाठवली जातात व बँकेमार्फतच सर्व बिले चुकती केली जातात. बँक खातेदारांना त्याप्रमाणे कळवून टाकते.

काही बँका मोठमोठ्या कंपन्यांना व व्यापारी संस्थांना आर्थिक सल्ला देण्याचेही कार्य करतात. त्याकरता बँकेतील सल्ला देणारे अधिकारी कंपन्यांना भेट देऊन कंपनीच्या परिस्थितीचा अभ्यास करून योग्य तो सल्ला देतात. काही लोक आपल्या कामात अगर धंद्यात इतके गुंतलेले असतात की त्यांना बँकेत जाण्यास खरोखरच वेळ नसतो. अशा वेळी बँका स्वतः आपल्या सेवकांना खातेदारांकडे पाठवतात व ठेव

गोळा करण्याचे वा पैसे काढून देण्याचे काम करतात. ' फिरत्या बँका ' असा त्यांचा उल्लेख केला जातो.

खातेदारांना अनेक तऱ्हेने कर्जे पुरवली जातात. पुरेसे पैसे नसतानादेखील आपली पत बँकेला कळवून मोटार घेण्यासाठी कर्ज मिळविता येते. बँक मात्र हप्त्याहप्त्याने दीर्घ काळात खातेदाराकडून कर्ज वसूल करते. त्याकरता व्याजही फक्त आठ टक्के इतकेच आकारले जाते. न्हाव्याला आपले नवीन दुकान थाटायचे असते. विशिष्ट प्रकारच्या खुर्च्या व हत्यारे घेण्यासाठी लागणारे भांडवल त्याला बँकेकडून सहज मिळू शकते. गृहिणींना लागणारा रेफ्रिजरेटर, करमणूक करणारा टेलिव्हिजन सेट, या वस्तू घेण्याकरतादेखील बँकेकडून कर्ज मिळते.

गिफ्ट चेक हा नवा प्रकार बँकांनी सुरू केला आहे. प्रवासी चेकसारखाच त्याचा उपयोग केला जातो. प्रवासी चेक वटवण्याकरता सही आवश्यक असते. गिफ्ट चेकसाठी सहीची देखील गरज नसते. डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गिफ्ट चेक घेऊन वस्तू विकत घेता येते. काही डिपार्टमेंटल स्टोअर्स स्वतःचेच गिफ्ट चेक्स व्यवहारात आणते. पण डिपार्टमेंटलच्या गिफ्ट चेकवर दहा टक्के कर भरावा लागतो. बँकेचे गिफ्ट चेक मात्र करमुक्त असतात. विवाहसमारंभाच्या वेळी भेट देण्याकरता किंवा अशाच इतर प्रसंगांच्या वेळी बँकेच्या गिफ्ट चेक्सचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो. बँकिंगचे सर्व व्यवहार करून शिवाय वर उल्लेखिलेले अधिक कार्य जपानच्या बँका करत असतात. बँकेत सुबक व नीटनेटके फर्निचर तर असतेच शिवाय बँकेचीच जाहिरात असलेली काडेपेटी व सिगरेटची राख टाकण्याकरता रक्षापात्रे याही वस्तू प्रत्येक बँकेत आढळतात. छोट्या डायऱ्या, स्मरणवह्या, या देखील खातेदारांना वाटण्यात येतात. काही ठिकाणी बँका लहान लहान टॉवेल देतात. बँकेची नवी शाखा उघडल्यावर अथवा बँक नव्या इमारतीत गेल्यावर बॉलपेनसारख्या वस्तू वाटल्या जातात. अशा छोट्या वस्तू भेट देऊनदेखील आपापसातील स्पर्धा वाढण्याचा धोका असतो. परंतु असा धोका टाळण्यासाठी सर्व बँका मिळून एक धोरण ठरवतात व ते अमलात आणतात. एखादी बँक आपली जाहिरात वृत्तपत्रात छापू शकते. परंतु टेलिव्हिजनवर अगर रेडिओवर कार्यक्रम सादर करायचा असेल तर मात्र असा कार्यक्रम बँकसंघटनेमार्फतच केला जातो.

---

**परदेशीय चलनात बचत**—बंगलोर येथील इंडिअन टेलिफोन इंटस्ट्रीज कंपनीने १९६५–६६ च्या उत्पादकता वर्षात ५५ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत केली आहे. देशात उपलब्ध होणाऱ्या कच्च्या मालाचा अधिकात अधिक वापर करून आणि नासधूस टाळून बचत करण्यात कारखान्याने यश मिळविले.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५,
२५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,७८,२५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ३,१९,७१,००० |
| ठेवी | ... | रु. | ४९,५८,९६,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | ९९,८७,२५,००० |

: शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( पूर्व ) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.


ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

# नहीं –
## यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार


### सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।


हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**


डबल सोडा वाटर यंत्र




घरेलु सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ७६१०२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ पुणे, बुधवार १५ फेब्रुवारी, १९६७ अंक ४

## विविध माहिती

**हिंदी माशांच्या आयातीस बंदी**—आस्ट्रेलिया भारताकडून दरसाल १·५ कोटी रुपये किमतीच्या 'प्रॉन' ह्या माशांची आयात करतो. हे मासे साफ करणाऱ्या कारखान्यातील कामगारांच्या अस्वच्छतेमुळे ऑस्ट्रेलियाने आता त्यांच्या आयातीवर बंदी घातली आहे. मासे साफ करण्याचे अगर ते गोठविण्याचे काम हातानेच करण्यात येते. असे मासे खाण्यात आल्यास पोटाचे विकार होतात असे आस्ट्रेलियाचे म्हणणे आहे.

**यांत्रिक हत्यारांचे उद्दिष्ट**—४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात यांत्रिक हत्यारांच्या उत्पादनाचे उद्दिष्ट दरसाल १०० कोटी रुपयांचे ठेवण्यात येण्याची शक्यता आहे. यांत्रिक हत्यारे तयार करणाऱ्या कारखानदारांच्या २० व्या सर्वसाधारण सभेत ही माहिती सांगण्यात आली. ह्या प्रसंगी बोलताना उद्योगमंत्री श्री. संजीवय्या ह्यांनी अधिकाधिक गुंतागुंतीची यंत्रे करण्यास कारखानदारांना आवाहन केले.

**ब्रिटन कारखाना बांधणार**—रशियाची लोकसंख्या सुमारे २३ कोटी आहे, परंतु त्या मानाने तेथे मोटारी कमी आहेत. रशियातील मोटारींची संख्या पाच लाखांच्या आसपास आहे. गेल्या वर्षी इटलीच्या फिआट कंपनीने रशियात एक मोटार कारखाना बांधण्याचे कंत्राट मिळविले. फ्रान्सही एक कारखाना बांधणार आहे. आता ब्रिटिश मोटार कॉर्पोरेशननेही मोटारीचा कारखाना उभारण्याची तयारी दाखविली आहे.

**सागर विद्यापीठाला देणगी**—मध्य प्रदेशातील सागर विद्यापीठाला ब्रिटनकडून शास्त्रीय उपकरणांची देणगी मिळणार आहे. उपकरणांची किंमत सुमारे ८ हजार पौंड आहे. उच्च अभ्यासक्रमाला मदत देण्यासाठी ब्रिटन कोलंबो योजनेप्रमाणे तांत्रिक मदत देते. त्याशिवाय पाठ्यपुस्तके आणि शास्त्रीय नियतकालिकेही पुरविण्यात येतात. सागर विद्यापीठातील भूस्तर विषयाच्या अध्यापनासाठी ब्रिटनच्या मदतीचा उपयोग करून घेण्यात यावयाचा आहे.

**सोयाबीनच्या तेलाची खरेदी**—हिंदच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला अमेरिकेकडून पी. एल. ४८० कायद्याप्रमाणे २० हजार टन सोयाबीनचे तेल खरेदी करण्याची परवानगी मिळाली आहे. त्यांपैकी ७ हजार टन तेल नुकतेच खरेदी करण्यात आले. खाद्यतेलाचा देशातील साठा वाढविण्याच्या प्रयत्नाचा हा भाग आहे.

**पाणी पुरविण्यासाठी १ लाख विहिरी**—म्हैसूर राज्याच्या ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात शेतीला पाणी पुरविण्यासाठी एक लाख नव्या विहिरी खोदण्यात यावयाच्या आहेत. त्यासाठी सुमारे ४० कोटी रुपये खर्च करण्यात येतील. ह्या कामासाठी लागणारा पैसा म्हैसूर सेंट्रल को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँकेमार्फत पुरविण्यात येणार आहे.

**धान्यबंदीचा परिणाम**—क्यूबा आणि उत्तर व्हिएटनाम ह्या देशांशी युगोस्लाव्हिया व्यापार करीत असल्यामुळे अमेरिकेने गेल्या वर्षी त्या देशाला अन्नधान्य पाठविण्यास बंदी केली होती. त्यामुळे युगोस्लाव्हियाला इतर देशांकडून गहू मिळविण्यासाठी अधिक रक्कम द्यावी लागणार आहे. ही रक्कम उभारण्यासाठी त्या देशात सिगारेट्स व दारू ह्यांच्या किमती वाढविण्यात आल्या आहेत.

**अमेरिकेची शस्त्रास्त्रांची निर्यात**—अमेरिकेच्या संरक्षण खात्याने अमेरिका करीत असलेल्या शस्त्रास्त्रांच्या निर्यातीला १९५० पासून जोराचा हातभार लावल्याचे प्रकट करण्यात आले आहे. १९५० पासून अमेरिकेची शस्त्रास्त्रांची विक्री ६०० टक्क्यांनी वाढलेली आहे.

**रशियाने दिलेली मदत**—रशियाचे भारतामधील वकील मि. बेनेडिक्टॉव्ह ह्यांनी दिल्ली येथे पत्रकारांशी बोलताना अशी माहिती सांगितली की, गेल्या १२ वर्षांत रशियाने भारताला १०० कोटी रुपयांपेक्षाही अधिक मदत दिलेली आहे. अलीकडे भारताला मदतीदाखल देऊ करण्यात आलेला गहू रशियन बोटी मुंबई, कांडला, मद्रास, विशाखापट्टम, कलकत्ता व भावनगर ह्या बंदरांतून उतरविणार आहेत.

### कलकत्त्यामधील बँकेत आर्ट गॅलरी

भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण आर्ट गॅलरी एका बँकेत आहे. बँकेतील सेफ्टी व्हॉल्टकडे जाणाऱ्या वाटेवरील १२० चौरस फूट भिंतीवर तिला जागा देण्यात आलेली आहे. भिंतीवर लावलेली चित्रे प्रेक्षकांचे चित्त वेधून घेतात. प्रत्येक दोन महिन्यांनी ही चित्रे बदलण्यात येतात. प्रत्येक चित्राची किंमत २५० रु. ते ७५० रु. असते. मार्च, १९६६ मध्ये ह्या आर्ट गॅलरीची योजना करण्यात आली, तेव्हापासून आतापर्यंत ३,००० रु. किमतीच्या सहा चित्रांची विक्री झाली आहे. चित्रांच्या प्रदर्शनासाठी बँक काहीही चार्ज घेत नाही; विक्रीच्या व्यवहाराशी तिचा संबंध नसतो. प्रत्येक चित्रावर चित्रकाराने सांगितलेली किंमत लिहिलेली असते. बँकेच्या इमारतीच्या अंतर्गत भागास आकर्षकता प्राप्त व्हावी, त्याचबरोबर उदयोन्मुख कलाकारांना आपल्या कलाकृती मांडण्यास विनामूल्य चांगली जागा मिळावी, असा दुहेरी हेतू ह्या उपक्रमामागे आहे. आतापर्यंत विकली गेलेली सर्व चित्रे परदेशीयांनी घेतली आहेत; म्हणजे त्यांनी भारताला परदेशी हुंडणावळ मिळवून दिली आहे. ह्या उपक्रमाच्या नियोजक कुमारी रूथ आयझॅक्स ह्या असून, त्यांच्या प्रयत्नांवर कलाकार खूष आहेत. बँकेच्या गिऱ्हाइकांनाही ह्यामुळे आयता आनंद मिळतो.

फर्स्ट नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयार्कच्या कलकत्ता येथील ब्रेबर्न रोडवरील शाखेत ही आर्ट गॅलरी आहे. "बँकिंगमध्ये आम्ही जसे अग्रेसर आहोत, तसे नव्या कल्पनांचे बाबतीतही आहोत" असे बँकेचे चीफ अकौंटंट श्री. कृष्णन् हे अभिमानाने सांगतात.

---

### पोस्टाची नवी तिकिटे काढण्यात येणार

पोस्ट आणि तार खाते चालू वर्षी नव्या चित्रांची काही तिकिटे काढणार आहे. ५ पैशांचे 'कुटुंबनियोजन' तिकीट सध्याच्या भारताचा नकाशा असलेल्या तिकिटाची जागा घेईल. आठ पैशांच्या तिकिटावर ठिपके असलेले हरीण असेल, ३० पैशांच्या तिकिटावर दोन बाहुल्या असतील, ५० पैशांच्या तिकिटावर आंबे असतील आणि ७० पैशांच्या तिकिटावर हंपी येथील रथ चित्रित केलेला असेल. दोन रुपयांच्या तिकिटावर दाल तलाव आणि पाच रुपयांच्या तिकिटावर भाक्रा धरण पाहावयास मिळेल.

---

### संततिप्रतिबंधक साधनांच्या वापराचे शाळेत शिक्षण

रॉकडेल (इंग्लंड) येथील एका शाळेतील १४ आणि १५ वर्षांच्या मुलामुलींच्या मिश्र वर्गात संततिनियमनाची साधने वापरण्याचे शिक्षण दिले जाणार आहे. त्यासंबंधी एक चित्रपट दाखविण्यात येऊन डॉक्टर आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचा कार्यकर्ता प्रत्यक्ष माहिती सांगेल. ह्या उपक्रमास मुलामुलींच्या एक वगळून बाकी सर्व पालकांनी संमती दिली आहे.


समाज शिक्षणमालेचे आगामी प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'


किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध होईल.





**धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...** परंतु

किर्लोस्कर डिझेल एंजिन वापरण्यानें धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहींत...



बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी **किर्लोस्कर डिझेल एंजिनचा** मालक असतो.

शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळे संपादन केला आहे.

बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलविता येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.

किर्लोस्कर डिझेल एंजिन्स

३ ते १५ हॉर्स पॉवर

**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.**

एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)

TOM & BAY KO: 667-A MAR

# अर्थ

बुधवार, १५ फेब्रुवारी, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानी बँकेचा परदेशांत जाहिरातींतून भारतविरोधी प्रचार

पाकिस्तानचा राजकीय खोटानाटा प्रचार व्यापारी बँकांच्या परदेशांतील जाहिरातींमधूनही कसा केला जातो आणि करून दिला जातो, ह्याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे "दि बँकर" ह्या लंडन येथे प्रसिद्ध होणाऱ्या मासिकातील हबिब बँकेची जाहिरात. आपल्या परंपरेचे वर्णन करताना ही जाहिरात सांगते, "पाकिस्तानची स्वतःची संस्कृती बॅबिलॉनच्याही पूर्वीची आहे... ईस्ट इंडिया कंपनीच्या पाठोपाठ परदेशीयांचा अंमल सुरू झाला आणि बिगर–मुस्लिमांनी त्यापुढे मान तुकवून सरकारकडून फायदे मिळविले. त्यामुळे सर्व क्षेत्रांत त्यांना प्राधान्य मिळाले. आपल्या स्वाभिमानामुळे आपणास आर्थिक दुःस्थिती प्राप्त होत आहे, हे माहीत असूनही मुस्लिमांनी राज्यकर्त्यांची बिगर-मुस्लिमांप्रमाणे थुंकी झेलण्याचे नाकारले. त्यामुळे, सर्व आर्थिक संस्थांवर बिगर-मुस्लिमांची सत्ता राहिली. आर्थिक संस्था चालविण्यास व त्यांचा कारभार करण्यास मुस्लिम पात्रच नाहीत, अशी चुकीची समजूत त्यामुळे प्रसृत झाली. स्वतःचे राष्ट्र मुस्लिमांना हवे होते, ते केवळ राजकीय संघटनेसाठी नव्हे; तर सबंद मुस्लिम समाजाची अगदी मुळापासून पुनर्घटना करावयाची होती. मुस्लिमांनी आपले आर्थिक क्षेत्रातील कर्तृत्व आता जगाला दाखवून दिले आहे. पाकिस्तानातील अल्पसंख्याक जमातीचे लोक सरहद्दीपलीकडील जणू पूर्वनियोजित संदेशाचीच वाट पाहात होते; त्यांनी आपल्याबरोबर सर्व संपत्ती नेली त्याचा उद्देशच पाकिस्तानांत व्यापार, उद्योगधंदे आणि इतर सर्व आर्थिक व्यवहारास खीळ पडावी; आर्थिक घडी पार बिघडून जावी; असा होता. त्यामुळे हबिब बँकेच्या शाखांची संख्या ६३१ ची २१२ वर आली. नव्या मुस्लिम राज्याच्या पुनर्रचनेसाठी आपल्यास काय कार्य करावे लागेल, ते हबिब बँकेने ओळखून तिने तात्काळ प्रारंभही केला. ७ ऑगस्ट रोजी बँकेची नोंदलेली कचेरी मुंबईहून कराचीला नेण्यात आली."

हबिब बँकेचे आजचे वसूल भांडवल ५ कोटी रु. असून तिची गंगाजळी ३·१ कोटी रुपयांची आहे. ठेवी २२५ कोटी रुपयांच्या असून शाखांची संख्या ४७५ आहे. जगातील बँकांत तिचा २६२ वा अनुक्रम लागतो. बँकेची मुंबई येथेही एक शाखा आहे.

---

## प्रगत देश ही जबाबदारी स्वीकारतील काय?

आजच्या जगात शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानात पुढारलेले आणि म्हणूनच औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असलेले देश आणि मागासलेले देश ह्यांच्या जीवनमानात खूप तफावत आहे. पुढारलेल्या देशांनी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा अधिक हिस्सा मागासलेल्या देशांना मदत म्हणून द्यावा असेही सुचविण्यात येत असते. पुढारलेल्या देशांतील दोन प्रबल देशांत म्हणजे रशिया आणि अमेरिका ह्यांच्यामध्ये गेली २० वर्षे थंडे युद्ध चालू आहे. त्यामुळे उभयता देशात शस्त्रास्त्र संभाराचीही तीव्र स्पर्धा चालू आहे. ही स्पर्धा कमी झाली तरीसुद्धा ह्या देशांना मागासलेल्या देशांना अधिक मदत देता येणे शक्य होईल. ह्या दृष्टीने अमेरिकेने स्वागतार्ह पाऊल उचलले आहे. अमेरिकेने रशियात नेमलेल्या नव्या वकिलाने आपली अधिकारपत्रे सादर करताना केलेल्या भाषणात शस्त्रास्त्र–स्पर्धेवर नियंत्रण घालण्यापासून ते दुष्काळ निवारणापर्यंत, सर्व क्षेत्रांत अमेरिका रशियाशी सहकार्य करण्यास तयार असल्याचे जाहीर केले आहे. शस्त्रास्त्रांच्या निर्मितीत होणारी स्पर्धा दोन्ही देशांना डोईजड होत असल्याने त्यांनी परस्परांतील मतभेदांपेक्षा दोघांना समान असणाऱ्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे असे अमेरिकेचे म्हणणे आहे. मास्कोमधील नवे अमेरिकन वकील मि. थॉमसन म्हणाले की जगातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत देश आणि अविकसित देश ह्यांच्यातील जीवनमानात सध्या फार मोठी तफावत आहे. त्यातच अविकसित देशांतील लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढत आहे की अन्नाच्या उत्पादनाचा वेग ह्या वाढीला तोंड देऊ शकत नाहीत. अमेरिका आणि रशिया ह्या दोन्ही देशांपुढे हा प्रश्न सारखाच उभा आहे. ह्या प्रश्नावर तोड नाही, असे नाही. परंतु ती शोधून काढून अंमलात आणण्यासाठी उभयता देशांनी सहकार्य करणे जरूर आहे.

---

## मोनॅकोत व अमेरिकेत प्रत्येक दांपत्यागणिक एक टेलिफोन

जगात एकूण २० कोटी टेलिफोन आहेत. त्यांपैकी ९·३७ कोटी (४८%) एकट्या अमेरिकेत आहेत. दर माणशी टेलिफोन्सचे प्रमाण मोनॅकोमध्ये जास्त आहे. तेथील प्रत्येक १०० लोकांगणिक ५३·४५ टेलिफोन आहेत. अमेरिकेत ते प्रमाण ४७·८२ एवढे आहे. स्वीडनमध्ये ४५·९६, बर्मुडात ४४·१३, रशियात ३·४० आहे. कॅनडामधील लोकांचे कॉल्सचे प्रमाण दरसाल दरमाणशी ६३६ आहे; अमेरिकेत ते ६२० आहे. भूतानमध्ये एकही टेलिफोन नाही.

## युनिट ट्रस्ट रोख्यांतील गुंतवणुकीचे स्वरूप

युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. आर. एस. भट्ट ह्यांनी मुंबई येथे बोलताना ह्या रोख्यांतील गुंतवणुकीच्या स्वरूपासंबंधी माहिती सांगितली. ते म्हणाले की ज्या लोकांचे उत्पन्न मध्यम अगर लहान असते अशा लोकांना भांडवलगुंतवणूक करण्याची संधी युनिट ट्रस्टच्या रोख्यामुळे मिळू शकते. ट्रस्टमध्ये गुंतवणूक करणारांची संख्या आता १ लाख, ६३ हजारपर्यंत आली आहे. त्यापैकी ३५ ते ४० हजार लोकांनी १०० रुपयांपर्यंत रोखे खरेदी केलेले आहेत. सुमारे २५ ते ३० हजार लोकांनी ५० रुपयांपर्यंत खरेदी केलेले आहेत. गुंतवणूक करणारांच्या व्यवसायाच्या दृष्टीने पाहता असे दिसते की ४० ते ५० टक्के पैसे गुंतविणारे लोक हे पगारी उत्पन्न असणारे आहेत. १५ टक्के विद्यार्थी आहेत. युनिट ट्रस्ट मध्ये पैसे गुंतविण्यास चार प्रलोभने आहेत. एक तर पैसे थोडे असले तरी ते गुंतविता येतात. गुंतविलेले पैसे परत पाहिजे असल्यास ते सुलभतेने मिळतात. गुंतवणुकीवर निश्चित प्राप्ती होते आणि भांडवलाचा संचय होतो. युनिट ट्रस्टला बँका आणि इतर कंपन्या ह्यांच्याशी स्पर्धा करावी लागते. बँकांकडून मिळणाऱ्या व्याजाच्या दरात वाढ झाल्यामुळे युनिट ट्रस्टविषयीही लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. ह्या रोख्यात पैसे गुंतविण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांनाही उत्तेजन देण्यात येत असते. परंतु उत्तेजनाला मिळावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. भारतामधील ५ मोठ्या शहरांतूनच ह्या रोख्यात अधिकांश रक्कम गुंतविण्यात आलेली आहे. एकट्या मुंबई शहरानेच युनिट ट्रस्टच्या रोख्यात एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के रक्कम गुंतविलेली आहे. त्यावरून शहरातच रोख्यांचा प्रसार झाल्याचे दिसते.

---

## पादत्राणांच्या निर्यातीच्या बाजारपेठा

भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन पादत्राणांच्या निर्यातीसाठी नव्या बाजारपेठा मिळविण्याची खटपट करीत आहे. रशिया भारताकडून बुटांच्या जोड्या विकत घेत असतो. दरसाल सुमारे १० लाख बूटजोड्या रशियाला निर्यात करण्यात येतात. मात्र ह्या निर्यातीत वाढ होत असलेली दिसत नाही. रशियाला लागणाऱ्या बूटजोड्या पुरविण्यात इटली, युगोस्लाव्हिया आणि ब्रिटन ह्यांचाही वाटा आहे. बूट हे पाश्चात्त्य पद्धतीचे पादत्राण असल्याने त्याची बनावट वरील देशांतून अधिक चांगली होत असावी. कारण, अलीकडे रशियाने त्या देशांकडून अधिक मोठ्या प्रमाणावर बूटजोड्या घेण्यास सुरुवात केली आहे. युरोपमधील बुटांचे कारखाने यंत्राच्या साहाय्याने चालविण्यात येतात. त्यामुळे त्यांचा दर्जा अधिक चांगला व आकर्षक असतो. भारतामधील बूट तयार करण्याचा धंदा अजूनही ग्रामोद्योगाच्या स्वरूपाचा असून रोजगार पुरविण्याच्या दृष्टीने तो चालविण्यात येतो. पादत्राणांच्या निर्यातीच्या बाबतीत रशियासारख्या एकट्यादुकट्या बाजारपेठेवर अवलंबून राहणे भारताच्या हिताचे नाही. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी आता कोल्हापूरच्या चपलेला अमेरिकेत व कॅनडात बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न चालविले असून त्यांच्या प्रयत्नांना यशही येत आहे. चालू वर्षी १० लाख चपला जोड अमेरिकेला पाठविणे शक्य होईल असा त्यांचा अंदाज आहे. इतक्या चपला न खपल्या तरीसुद्धा अमेरिकेत कोल्हापुरी चपलांनी चंचुप्रवेश केला असे म्हणता येईल. त्याचबरोबर रशियाला पाठवावयाच्या बूटजोड्याच्या धंद्यात यंत्रे वापरून त्यांची गुणवत्ता वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

---

## सध्याची मंदी निरोगीपणाचे लक्षण ?

आर्थिक व्यवहारात सध्या आलेली मंदी लक्षात घेता, नियोजनाच्या मूलभूत तत्त्वात आणि विकासाच्या कार्यक्रमात मोठा बदल घडवून आणला पाहिजे असे मत खाजगी विभागातील अर्थशास्त्रज्ञ व्यक्त करीत आहेत. परंतु सरकारी अर्थशास्त्रज्ञांना मंदीची ही मीमांसा मान्य नाही. त्यांच्या मताने आर्थिक व्यवहारात आलेला मंदपणा उलट स्वागतार्ह असून अर्थव्यवस्थेच्या निरोगीपणाचे ते एक लक्षणच आहे. मात्र मंदीची तीव्रता अधिक वाढता कामा नये आणि तिचा कालही फार लांबता कामा नये. गेल्या एक–दोन वर्षात आर्थिक जीवनाची गती मंदावत चाललेली होती. त्याचा परिणाम म्हणून मंदीची लाट उसळणे स्वाभाविकच होते. भांडवलगुंतवणुकीच्या दृष्टीने पाहता सध्याचा काळ हा अवस्थांतराचा आहे. मोठ्या प्रमाणावर भांडवलगुंतवणुकीचा काळ आता संपलेला असून अगदी जरुरीची, किमान भांडवलगुंतवणूक करण्याचा काळ आला आहे. ह्या दोन काळांतील मध्यंतरात अर्थव्यवस्थेत थोड्याबहुत प्रमाणात चलबिचल निर्माण होणे सामान्यतः अपरिहार्यच असते. सध्याची मंदी दोन प्रकारांनी जाणवत आहे. शेतीपासून मिळणाऱ्या कच्च्या मालावर अवलंबून असणाऱ्या उद्योगधंद्यांना कच्च्या मालाची चणचण भासत आहे. उदाहरणार्थ, कापडगिरण्यांना कापसाची टंचाई जाणवत आहे. अवजड उद्योगधंद्यात तयार होणाऱ्या पक्क्या मालाची मागणी घटत चालली आहे. मंदीचा हा दुसरा प्रकार आहे. पहिल्या प्रकारची मंदी शेतीच्या मालाच्या उत्पादनात सुधारणा होऊ लागल्यावर नाहीशी होण्याची शक्यता आहे. मंदीचा दुसरा प्रकार मात्र अधिक काळ चालू राहण्याची शक्यता आहे. अर्थव्यवस्थेची विवक्षित वाढ होण्यासाठी जरूर असलेली भांडवलाची जेव्हा गुंतवणूक पुन्हा होऊ लागेल, त्याच वेळी ही मंदी ओसरू लागण्याचा संभव आहे.

---

## अमेरिकेच्या मदतीत भारताला मोठा वाटा

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांनी काँग्रेसला वार्षिक अंदाज-पत्रकाच्या निमित्ताने धाडलेल्या संदेशात अमेरिकेकडून परदेशांना देण्यात येणाऱ्या मदतीबद्दल ऊहापोह केला आहे. १९६७–६८ ह्या साली अमेरिका परदेशांना ७५·८ कोटी डॉलर्सची मदत करणार आहे. मदत देण्यात यावयाच्या देशात पश्चिम आशिआ आणि दक्षिण आशिआ ह्या भूभागातील देशांचा समावेश आहे. एकूण मदतीपैकी ९० टक्के मदत भारत, पाकिस्तान आणि तुर्कस्तान ह्या देशांना मिळणार आहे. १९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यात सशस्त्र संघर्ष सुरू झाल्यावर उभयता देशांची मदत अमेरिकेने थांबविली होती. १९६४-६५ मध्ये देण्यात यावयाची मदत संघर्ष थांबल्यावर १९६६ साली देण्यात आली. अमेरिकेकडून परदेशांना मिळणाऱ्या मदतीसंबंधी काही मार्गदर्शक सूत्रे आता घालून देण्यात आली आहेत. मदत घेणारे देश आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी ज्या मानाने प्रयत्नशील राहतील त्या मानाने मदतीचे प्रमाण कमी–अधिक होणार आहे. मदतीबद्दलचे हे धोरण शेती, आरोग्य आणि शिक्षण ह्या तीन बाबतींत विशेष कटाक्षाने पाळण्यात यावयाचे आहे. गेल्या काही वर्षात खुद्द अमेरिकेतील अन्नधान्याचा व इतर अन्नपदार्थांचा साठा बराच कमी झालेला आहे. त्यामुळे मदत घेणाऱ्या देशांनी स्वतःच्या अन्नाचा पुरवठा वाढविण्यावर जोर द्यावा असे अमेरिका आग्रहाने सुचवीत आहे. अविकसित देश अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करीत आहेत. तथापि, लोकसंख्येची वाढ झपाट्याने होत असल्यामुळे अन्न-धान्याच्या उत्पादनात होणारी वाढ पुरेशी होणार नाही; निदान अल्पावधीत तरी ते शक्य होणार नाही. म्हणून गरज आणि पुरवठा ह्यांच्यातील तफावत भरून काढण्यास अमेरिका मदत करणार आहे.

## फ्रेंच फ्रँक बंधनमुक्त झाला

फ्रान्सच्या अर्थखात्याने फ्रेंच फ्रँकवरील बहुतेक सर्व बंधने नुकतीच दूर केली आहेत. त्यामुळे फ्रेंच नागरिकांना चलनांची, सोन्याची, रोख्यांची आयात–निर्गत करण्यास मुभा राहिली आहे. फ्रेंच बँकेवर चेक काढून फ्रेंच लोक आता परदेशातील देणी भागवू शकतील; परदेशातील बँकांत खाती उघडून त्यात ठेवी ठेवू शकतील. स्वित्झर्लंड, बेल्जम आणि पश्चिम जर्मनी ह्या देशांतील चलनावर ज्या प्रकारची बंधने आहेत, तेवढीच बंधने फ्रेंच फ्रँकवर ह्यापुढे राहतील. राष्ट्रीय परदेशी देण्याघेण्यावर नजर राहावी आणि भांडवलाची ये–जा लक्षात यावी, ह्यासाठी मात्र म्हणजे आकडेवारीसाठी ह्या व्यवहारांची सर्व बँकांनी, व्यापाऱ्यांनी व व्यक्तींनी अर्थखात्याला माहिती पुरविली पाहिजे.

## गोवध थांबविण्याचा मासलेवाईक उपाय

हिंदू समाजातील सनातनी मनोवृत्तीच्या लोकांनी भारतात गोवधबंदीच्या मागणीचा जोराने पुरस्कार चालविला आहे. अशी बंदी घालण्यास अनुकूल असणारे लोक कमी–अधिक प्रमाणात सर्वच राजकीय पक्षात आहेत, तसे ते काँग्रेसपक्षातही आहेत. गोवधबंदीविषयी साकल्याने विचार करण्यासाठी एक कमिटीही नेमण्यात यावयाची आहे. दरम्यान, बंदीचा उद्देश साध्य करण्या-साठी राजकीय व सामाजिक पुढारी अनेक उपाय सुचवीत आहेत पण अशा उपायात भारत सरकारचे रेल्वे मंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनी सुचविलेला उपाय मासलेवाईकच नव्हे तर अजबच म्हटला पाहिजे. पाटील म्हणतात की, गोवध थांबविण्याचा उद्देश गोह-त्येवर केवळ बंदी घालण्याने साध्या होणार नाही. बैल आणि गाई म्हातारे झाल्यावर निरुपयोगी होतात आणि त्यांच्यावर उपास-मारीचा प्रसंग ओढवतो. तेव्हा अशी परिस्थिती उत्पन्न न होऊ देण्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे; अशा अनुपयुक्त जनावरांची वृद्धापकालीन दैना उद्भवू न देण्यासाठी त्यांचे विमे उतरण्यात यावेत व विम्याचे हप्ते शेतकऱ्यांनी भरावे. ह्या योजने-मुळे गोहत्या कशी थांबेल, हे समजणे कठीण आहे. खरा प्रश्न वेगळाच आहे. भारतातील गुरांची संख्या त्यांना उपलब्ध होऊ शकणाऱ्या चारापाण्याच्या मानाने फार मोठी आहे. त्यामुळे पाऊसपाणी ठीक झाले तरीसुद्धा अनेक गुरांची उपासमार नेहमीच होत असते. अशा स्थितीत त्यापैकी किती गुरे पाटलांनी सुच-विलेल्या वृद्धवेतनाचा उपभोग घेण्यास शिल्लक राहतील हा प्रश्नच आहे. शिवाय, ज्या देशांत दुष्काळाने लाखो लोक जेमतेम जगत असतात त्या देशात माणसांच्या भुकेचा प्रश्न वास्तविक अधिक महत्त्वाचा गणला पाहिजे. गोधन आणि माणसे ह्यांच्या हितात विरोध उत्पन्न झाल्यास माणसांच्या हिताला प्राधान्य द्यावयास हवे, हाच विचार समंजसपणाचा ठरतो.

## सोबर्स–अंजु प्रेमकहाणीचा लघुपट

वेस्ट इंडीज क्रिकेट संघाचा कप्तान, गारफील्ड सोबर्स आणि त्याची प्रेयसी चित्रपटतारका अंजु ह्यांच्या प्रेमाची रम्य कहाणी चित्रित करणारा दोन रिळांचा एक लघुपट मुंबईत तयार होत आहे. त्यात त्या दोघांच्या प्रेमप्रकरणाशी संबंधित व्यक्ती आणि स्थळे ह्यांचेही दर्शन प्रेक्षकांना घडेल. 'उसकी कहानी' ह्या चित्रपटात काम करून अंजूचा चित्रपटसृष्टीत प्रवेश होणार आहे. तो चित्रपट येत्या एप्रिलमध्ये प्रदर्शित केला जाईल. त्या चित्रपटाबरोबरच हा लघुपट दाखविण्यात येईल. ह्या लघुपटात गारफील्ड सोबर्स, अंजु आणि त्यांची मित्रमंडळी ह्यांनी निःसंकोच आणि विनामोबदला काम केल्याबद्दल चित्रपट-निर्माते एच्. एम्. सेथिया आणि आ. के. शर्मा ह्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

### शास्त्रीय प्रयोगशाळांना अवमूल्यनाचा फटका

भारताच्या रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यावर आयात मालाची किंमत साहजिकच वाढलेली आहे. अवमूल्यनाचे उद्योगधंद्यावर होणारे परिणाम लवकर लक्षात येण्यासारखे असतात. आधुनिक उद्योगधंद्यांची प्रगती ही अखेर मूलभूत संशोधनावर व त्याच्या व्यावहारिक उपयोगावर अवलंबून आहे. म्हणून शास्त्रीय संशोधन हे कसेही करून चालू ठेवणे अगत्याचे आहे. पण ह्याही क्षेत्रात आता अवमूल्यनाचे विपरीत परिणाम दिसू लागले आहेत. भारतामधील अनेक संशोधन संस्थांना अवमूल्यनाचा फटका बसत आहे. संशोधनासाठी लागणारी अनेक प्रकारची उपकरणे आणि रसायने ह्यांच्या किंमती अवमूल्यनामुळे भडकत चालल्या आहेत. कारण, त्यांची आयात केल्याशिवाय संशोधन संस्थांचे काम चालू शकणार नाही. संशोधन संस्थांना उत्पन्न वाढविण्याची साधने नसतात. अर्थातच वाढत्या किमती देऊन जरूर ते साहित्य घेणे त्यांना अवघड होत चालले आहे. उद्योगधंद्यासाठी व संशोधनासाठी लागणारी रसायने आयात करण्यासाठी परवाना पद्धती सध्या अंमलात आहे. अगोदरच अवमूल्यनानंतर ह्या मालाच्या परदेशातील किंमती वाढलेल्या आहेत. त्यातच परवाना घेऊन आयात करणाऱ्यांची एक प्रकारची मक्तेदारी उत्पन्न झालेली आहे. त्यामुळे टंचाई असलेला हा माल ज्याच्याजवळ असेल तो भरमसाठ किंमती मागत आहे. तीच परिस्थिती आयात केलेल्या संशोधनविषयक शास्त्रीय उपकरणांची आहे. बायोकेमिकल संशोधनात लागणाऱ्या एका आयात पदार्थाची किंमत १० मिलिग्रॅमला ३ हजार रुपये इतकी द्यावी लागते. ह्यावरून संशोधन संस्थांच्या अडचणींची काहीशी कल्पना येईल. भारत सरकारच्या शिक्षण खात्याने ह्या बाबीकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

---

### लष्करी मदत मंडळाच्या कार्यात कपात

१९६२ मध्ये भारताच्या उत्तर सरहद्दीवर चीनने हल्ला केल्यानंतर अमेरिकेने दिल्ली येथे एका लष्करी मदत मंडळाची स्थापना केली होती. हिंदला द्यावयाच्या लष्करी मदतीसंबंधीचे कामकाज मंडळ पाहते. चीनच्या आक्रमणानंतर ह्या मंडळात काम करणाऱ्या लष्करी लोकांची संख्या जास्तीत जास्त १२० पर्यंत पोचली होती. आता मंडळातील लोकांची संख्या लवकरच अवघी २० ठेवण्यात येणार आहे. भारत व पाकिस्तान ह्यांच्यात १९६५ साली झालेल्या युद्धानंतर अमेरिकेने उभयता देशांना संहारक लष्करी साहित्य पुरवावयाचे नाही असे ठरविले आहे. त्यामुळे मंडळाला फारसे काम राहिलेले नाही. ह्या मंडळाचा खर्च अमेरिकेच्या भारतामधील इतर कचेऱ्यांप्रमाणे भागविण्यात येत असतो. भारताला पब्लिक लॉ ४८० प्रमाणे देण्यात येणाऱ्या मदतीतून उपलब्ध होणाऱ्या पैशातून लष्करी मंडळाचा खच चालविण्यात येतो.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
### मुंबई

( द्वि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
९, वेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५,
२५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,७८,२५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ३,१९,७१,००० |
| ठेवी | ... | रु. | ४९,५८,९६,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | ९९,८७,२५,००० |


: शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सितावर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.


ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

### पेट्रोलजन्य पदार्थांची निर्यात करण्यास प्रारंभ

इंडिअन ऑइल कॉर्पोरेशन ह्या सरकारी मालकीच्या कंपनीकडून पेट्रोलजन्य पदार्थांची निर्यात करण्यास प्रारंभ झाला आहे. कोचीन येथील तेलशुद्धी कारखान्यात निर्माण करण्यात आलेले ५ हजार टन पेट्रोल अलीकडेच थायलँडकडे रवाना करण्यात आले. ह्या सौद्याची किंमत ८ लाख रुपयांची आहे. चालू वर्षी कॉर्पोरेशनजवळ २ लाख टन पेट्रोल, २० हजार टन डिझेल तेल आणि २० हजार टन भट्टयांना लागणारे जळाऊ तेल शिल्लक राहील असा अंदाज आहे. ह्या मालासाठीही बाजारपेठा शोधण्यात येतील. कोचीनचा कारखाना आणि फिलिप्स पेट्रोलिअम कंपनी ह्यांच्या दरम्यान असलेल्या करारा-प्रमाणे फिलिप्स कंपनीने शिलकी मालाला बाजारपेठा मिळवून द्यावयाच्या आहेत. कोचीन येथील कारखान्याची जास्तीत जास्त उत्पादनक्षमता २५ लाख टन तेल शुद्ध करण्याची आहे. सध्या कारखान्याची ८० टक्के उत्पादनक्षमताच वापरली जात आहे. भारतामधील तेलशुद्धीच्या कारखान्यात अद्याप देशाच्या गरजेइतके रॉकेल तयार होत नाही. त्यामुळे गरज आणि उत्पादन ह्यात तफावत आहे. ही तफावत रशिआकडून रॉकेल आयात करून भरून काढण्यात येणार आहे. टाटा कंपनीच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रांना दरमहा ८ हजार टन जळाऊ तेल पुरविण्याचा करार कॉर्पोरेशनने केलेला आहे. गुजरात राज्यातील तेलशुद्धीच्या कारखान्याचे उत्पादन त्यामुळे १२ लाख टनावरून २० लाख टनापर्यंत वाढेल. शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ह्या कंपनीच्या बोटींना लागणारे वंगणाचे तेल इंडिअन ऑइल कंपनी पुरविणार आहे. कंपनीचा व्याप वाढत चालला आहे. गेल्या वर्षी तेलाच्या धंद्यातील ४० टक्के धंदा कॉर्पोरेशनने केला.

### स्त्रियांना अर्ध वेळ काम देण्याची व्यवस्था हवी

सोशल वेलफेअर बोर्डाच्या माजी अध्यक्ष श्रीमती दुर्गाबाई देशमुख ह्यांनी एका महत्त्वाच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. भारतात शिक्षणाचा प्रसार होत आहे. त्याचबरोबर शिकलेल्या स्त्रियांची संख्याही वाढत आहे. बहुतेक स्त्रियांना विवाहानंतर गृहकृत्यात आपला काळ घालवावा लागतो. त्यांपैकी पुष्कळशा स्त्रियांना शक्य असेल तर द्रव्यार्जन करून कुटुंबाच्या प्राप्तीत भर घालण्याची इच्छाही असते. परंतु घराची जबाबदारी संभाळून शिवाय अर्थार्जन करता येईल अशा सोयीच्या नोकऱ्या उपलब्ध नसतात. त्यामुळे त्यांचा नाइलाज होतो. गेल्या काही वर्षांत भारताचा आर्थिक विकास झाला असला तरी त्याचबरोबर महागाईही भडकत चालली आहे. सर्वसामान्य कुटुंबांना एकापेक्षा अधिक मिळवित्या माणसांची गरज तीव्रतेने भासत आहे. अशा परिस्थितीत लग्नाच्या बाजारात मिळवित्या वधूंची अपेक्षा करणाऱ्या तरुणांची संख्या वाढणे साहाजिक आहे. श्रीमती देशमुख ह्यांनी अशी सूचना केली आहे की शिक्षित स्त्रियांची राष्ट्रीय नोंदणी करण्यात यावी म्हणजे त्यांना काम देणे अधिक सुलभ जाईल. श्रीमती देशमुख ह्यांच्या माहिती प्रमाणे एस. एस. सी. अगर त्यापेक्षा अधिक शिकलेल्या भारतामधील स्त्रियांची संख्या १५ लाखाच्या जवळपास आहे. इतक्या स्त्रियांना अर्धवेळ काम पुरविण्याची व्यवस्था करणे हे अर्थातच सोपे काम नाही. शिवाय त्याबाबतीत काही अडचणीही उघड दिसणाऱ्या आहेत. घरकामाच्या चाकोरीत एकदा शिरल्यावर काही वर्षांनी पुन्हा बाहेरचे काम करणे किती स्त्रियांना शक्य होईल हाही प्रश्नच आहे. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशांतून अशा स्त्रियांना प्रशिक्षित करण्यासाठी खास सोयी व सवलती असतात. तशा त्या हिंदमध्येही उपलब्ध कराव्या लागतील.

### सहकारी औद्योगिक संघटनांची वाटचाल

महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशन लि. ह्या संघटनेतर्फे औरंगाबाद येथे सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारा एक खताचा कारखाना स्थापन करण्यात येणार आहे. ह्या कारखान्यात दरसाल ६०हजार टन खत तयार करता येईल. पिकांवरील किडीचा व रोगराईचा नाश करण्यासाठी अलीकडे जंतुनाशक औषधांचे फवारे मारण्याची पद्धत पसरत चालली आहे. त्यामुळे अशा औषधांचाही तुटवडा भासत असतो. फेडरेशन कीडनाशक द्रव्ये तयार करणारा एक कारखानाही काढणार आहे. महाराष्ट्र राज्यात सध्या १० सहकारी सुताच्या गिरण्या आहेत. त्यात आणखी ११ सहकारी गिरण्यांची भर घालण्यात येणार आहे. ह्या गिरण्यांना कापसाच्या शेतकऱ्यांच्या सहकारी संघटनांमार्फत कापूस पुरविण्याची योजनाही फेडरेशनने आखली आहे. ऑईल एंजिने, पंप, ट्रॅक्टरचे सुटे भाग, इत्यादी तयार करणारा सहकारी कारखाना कोल्हापूर येथे उभारण्यात आला आहे.

### कोळशाच्या खोल खाणी

बंगाल-बिहार भागात कोळशाच्या खोल खाणी खोदण्याची योजना राष्ट्रीय कोळसाविकास मंडळाच्या विचाराधीन आहे. पोलादाच्या कारखान्यांसाठी लागणारा अधिक कोळसा पुरविता यावा म्हणून ही तयारी करण्यात येत आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस कोळशाची मागणी सध्यापेक्षा दुपटीने अधिक होईल असा अंदाज आहे. सध्या खाजगी व सार्वजनिक मालकीच्या कोळशाच्या खाणीतून दरसाल १·७ कोटी टन कोळसा बाहेर काढण्यात येतो. परंतु १९७०-७१ च्या सुमारास पोलाद कारखान्यांना व ओतकामाच्या कारखान्यांना लागणाऱ्या कोळशाची गरज ३·३ कोटी टनांपर्यंत वाढणार आहे

### सहकारी प्रशिक्षण शिखर संस्थेस वैकुंठभाईंचे नाव

भारत सरकारतर्फे स्थापन होणार असलेल्या सहकारी प्रशिक्षण शिखर संस्थेला सहकार महर्षी कै. वैकुंठभाई मेहता ह्यांचे नाव देण्यात येणार आहे. जर ह्या संस्थेला कै. वैकुंठभाईंचे नाव देण्यात आले, तर संस्थेच्या भांडवली खर्चासाठी लागणाऱ्या रकमेपैकी किमान तीन ते चार लक्ष रुपये उभे राहू शकतील, असे डॉ. धनंजयराव गाडगीळ ह्यांनी भारत सरकारचे अन्न आणि शेतकी खात्याचे मंत्री ह्यांना कळविले होते. ह्या केंद्राला पुणे विद्यापीठाने आपल्या परिसरात जागा देऊ केली आहे. अशा रीतीने डॉ. गाडगीळ ह्यांच्या प्रयत्नांमुळे सहकारी प्रशिक्षण शिखर संस्था महाराष्ट्रात पुणे येथे स्थापन होत असून कै. वैकुंठभाईंचे ते उत्कृष्ट स्मारक होणार आहे.

### कस्टम्सची मिळकत

भारतातील कस्टम्स अधिकाऱ्यांनी १९६६ मध्ये एकूण ६.२६ कोटी रुपयांचा माल (सोने धरून) पकडला. १९६५ साली ४.६३ कोटी रुपये किमतीचा माल पकडण्यात आला होता.

### "कमी पगार चालेल पण गोळी नियमित मिळावी"

व्हिएटनाममधील एक दांपत्य एका इंग्रज डॉक्टराकडे नोकरीला होते. पाच अपत्ये असणाऱ्या ह्या नोकर दांपत्याला त्यांचा मालक दर आठवड्याच्या पगाराबरोबर संततिप्रतिबंधक गोळ्यांचे एक पाकीटही देत असे. हा डॉक्टर निघून गेल्यावर, त्यापेक्षा ऐपतवान अशा अमेरिकन घरी हे दांपत्य नोकरीस राहून ज्यास्त पगार मिळवू शकले असते. पण त्याऐवजी त्या दोघांनी दुसऱ्या एका डॉक्टरकडे नोकरी धरली. त्यांची अट एकच होती—"आम्हांला कमी पगार चालेल, पण गोळी नियमित मिळावी."

### एकत्र राहण्यासाठी घटस्फोट

'माझी पत्नी मला अतिशय आवडते परंतु आम्हा दोघांना एकत्र राहता यावं म्हणून मला तिच्यापासून घटस्फोट घेतलाच पाहिजे' असं फॉर्मोसाच्या वई यंग-संग या सत्तावीस वर्षांच्या तरुणानं सांगितलं आहे. खरं म्हटलं तर त्याचं नुकतंच लग्न झालं आहे. तरी तो घटस्फोट घेणार आहे. पतीपत्नी दोघंही एका प्राथमिक शाळेत शिक्षक आहेत. प्राथमिक शाळेत नवरा व बायको दोघांना एकाच वेळी नोकरीवर ठेवता येत नाही असा चीनमध्ये कायदा आहे. म्हणून नवीन जोडप्याला घटस्फोट घेतल्यानंतरच एकत्र नोकरी करता येणार आहे; एकत्र राहता येणार आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(रजिस्टर्ड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २)

## स्थापना : १६ सप्टेंबर १९३५

| | १९५५ | १९६० | १९६६ |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. १६ लक्ष | रु. ३२ लक्ष | रु. १ कोटी |
| गंगाजळी | रु. ७.७५ लक्ष | रु. १७ लक्ष | रु. ३७ लक्ष |
| ठेवी | रु. ५ कोटी | रु. १५ कोटी | रु. ५० कोटींहून अधिक |

## आपल्या ११३ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टी सेवा यांच्यासह बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सविस्तर माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

कर्वे रोड, (पुणे-४), क्रॉफर्ड मार्केट (मुंबई) येथे लौकरच शाखा सुरू होत आहेत.

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

## युनायटेड वेस्टर्न बँकेची १९६६ सालातील स्पृहणीय प्रगती

सातारा येथील युनायटेड वेस्टर्न बँकेने १९६६ सालातही स्पृहणीय अशी प्रगती केली आहे. या बँकेच्या एकूण व्यवहारात दरवर्षी निश्चित अशी प्रगती होत असून आता ती बँक महाराष्ट्रातील एक प्रमुख बँक म्हणून मान्यता पावली आहे. ३० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या बँकेने महाराष्ट्रात आपल्या शाखांचे जाळे पसरविले असून आणखीहि नवीन शाखा उघडण्याचा कार्यक्रम निश्चित केला आहे. सध्या बँकेच्या एकूण २७ शाखा आहेत.

सन १९६६ च्या ऑडिटपूर्व हिशेबानुसार बँकेच्या ठेवीत रु. ६९ लाखांची वाढ होऊन त्या ५ कोटी ९४ लाख रु. च्या झाल्या. तसेच गुंतवणूक व कर्जव्यवहार यातही अनुक्रमे रु. १२ लाख व ६८ लाख इतकी वाढ होऊन १९६६ अखेर गुंतवणूक रु. १९७ लाख व कर्जव्यवहार रु. ३५४ लाख इतका झाला आहे. इन्कम-टॅक्स वगैरे संबंधीच्या सर्व तरतूदी केल्यानंतर उरणाऱ्या नफ्यातही वाढ झालेली असून तो रु. २ लाख, १५ हजार झाला आहे. राखीव निधीत या वर्षी रु. ५०,००० वर्ग केल्यावर एकूण राखीव निधी रु. ८ लाख, ८० हजार होत असून १९६५चे प्रमाणात बँकेच्या नोकरवर्गास बोनस देण्यात येणार आहे. गेल्या वर्षाप्रमाणेच भागधारकांना ९ टक्के लाभांश वाटण्याबद्दल संचालक मंडळाने सुचविले आहे.

---

### टॅन्झॅनियामधील सर्व बँका सरकारने स्वतःच्या मालकीच्या केल्या

टॅन्झॅनियामधील सर्व बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. सरकारी मालकीच्या ह्या तडाख्यात विदेशी बँकाही सापडल्या आहेत. त्यात मुख्यतः बार्कलेज बँक, स्टँडर्ड बँक, नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक, ह्या प्रमुख आहेत. बँक ऑफ बरोडा, बँक ऑफ इंडिया, ह्यावरही त्याचा परिणाम होणार आहे.

---

### रेणिगुंठा–तिरुपती ब्रॉडगेज रेल्वे

रेणिगुंठा जंक्शन ते तिरुपती हा रेल्वे मार्ग ब्रॉड गेजचा करण्यासाठी तिरुपती देवस्थानाने सरकारला १५ लक्ष रुपये बिनशर्त देऊ केले आहेत. तिरुपतीमधील रेल्वे स्टेशनाच्या आवारात धर्मशाळांच्या समोर एक पूल बांधण्यासाठी देवस्थानाने ह्यापूर्वी १० लक्ष रुपये दिलेले आहेत. ह्या महिन्याचे अखेरीस त्याचे काम पुरे होईल, अशी अपेक्षा आहे.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... | रु. | १२·८४ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् ... | रु. | १६·७० ,, |
| ठेवी ... | रु. | ४८५·३३ ,, |
| खेळते भांडवल ... | रु. | ५४७·२६ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



पना १९१८

३०

वर्षांतील आमचे कार्य

आता सर्वत्र आमचीच

—निवड—

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

सातारा (महाराष्ट्र)


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें




भारतांतील निरनिराळ्या राज्यामधून वीज निर्मितीच्या योजना कार्यवाहीत आल्यामुळें शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें खुलीं झालीं आहेत. आज खेड्यापाड्यांतून शेतीसाठीं लिफ्ट इरिगेशन, शहरी व ग्रामीण पाणी पुरवठा व इतर लहानमोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा किर्लोस्कर पंपिंग सेटस कार्यक्षमतनें करूं शकतात. आपल्या योजनेसाठीं कोणता किर्लोस्कर पंप सेट निवडावा याबाबतचा तांत्रिक सल्ला आपल्याला आमच्याकडून विनामूल्य मिळूं शकेल.



वैशिष्ट्यें :

- डबल सक्शन
- मजबूत बांधणी व दीर्घकाल टिकाऊं
- कार्यक्षम व काटकसरी
- झीज कमी व दुरुस्तीस सोपा

## किर्लोस्कर



टाइप "यूपी"
५ ते ३०० हॉ. पॉ. पंपिंग सेट
उत्पादक

## किर्लोस्कर ब्रदर्स लि.

किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली

STUSA KN 17/63 M


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १ मार्च, १९६७ | अंक ५

## विविध माहिती

**कोळशाच्या खाजगी खाणींना मदत**—राष्ट्रीय कोळसा मंडळाला देण्यात यावयाच्या मदतीत भारत सरकारने ५० टक्के वाढ करण्याचे ठरविले आहे. १९६६–६७ सालात मूळ ७ कोटी रुपये मदतीदाखल देण्यात येणार होते. आता १०·५० कोटी रुपये देण्यात येतील. खाजगी मालकीच्या कोळशाच्या खाणींना यावयाच्या मदतीत वाढ करण्यासाठी जादा मदत वापरण्यात येईल.

**शिवणयंत्राची निर्यात**—भारत व युगोस्लाव्हिया ह्यांच्यांत नव्याने करण्यात आलेल्या कराराप्रमाणे २० हजार शिवणयंत्रांची युगोस्लाव्हियाला निर्यात करण्यात येणार आहे. यंत्रांना आतापर्यंत आलेली ही सर्वात मोठी मागणी आहे. त्यांची किंमत सुमारे २२ लाख रुपये होईल. युगोस्लाव्हियाने ह्यापूर्वी १० हजार शिवणयंत्रे घेतलेली आहेत.

**शेतीच्या अवजारांसाठी मागणी**—आफ्रिकेमधील घानाच्या सरकारने भारताकडे २७ हजार पौंड किमतीच्या शेतीच्या अवजारांची मागणी केली आहे. घाना ह्या देशात एक आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्या प्रदर्शनात भारताचेही एक दालन होते. दालनात ठेवलेल्या हिंदी शेती अवजारांचा चांगला परिणाम झाला. मागणी केलेल्या अवजारांत शेंगा फोडण्याची यंत्रे, बैलांचे नांगर, भात सडण्याची यंत्रे इत्यादींचा समावेश आहे.

**युगोस्लाव्हियाकडून बोटी मिळणार**—१९६९ पर्यंत युगोस्लाव्हिया भारताला दोन मोठ्या मालवाहू बोटी पुरविणार आहे. त्यांचे वजन प्रत्येकी ४३ हजार टनांचे असेल. बोटींची किंमत रुपयाच्या चलनात द्यावयाची आहे. त्याशिवाय भारताच्या जहाज वाहतूक मंडळाला दोन मोठी तेलवाहू जहाजे पुरविण्याविषयी युगोस्लाव्हियाशी वाटाघाटी चालू आहेत. प्रत्येक बोट ८० हजार टन तेल वाहून नेण्याइतकी मोठी असेल.

**निसर्गोपचारासंबंधी परिसंवाद**—वर्ध्याजवळील पवनार आश्रमात निसर्गोपचाराविषयी तीन दिवसांचा परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादांत २० निसर्गोपचारतज्ज्ञांनी भाग घेतला होता. निसर्गोपचार पद्धती लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत आणि फिरती निसर्गोपचार केंद्रे चालू करण्यात यावीत असे परिसंवादाच्या अखेर ठरविण्यात आले.

**ट्युनिशिआ भारताचा चहा घेणार**—ट्युनिशिआ आणि भारत ह्यांच्या दरम्यानचा व्यापार वाढविण्यासाठी उभयता देशात वाटाघाटी चालू आहेत. ट्युनिशिआ भारताकडून अधिक प्रमाणात चहा घेईल अशी अपेक्षा आहे. परंतु, भारत ट्युनिशिआकडून किती माल घेतो ह्यावर चहाच्या खरेदीचे प्रमाण अवलंबून आहे.

**पाकिस्तानला रशियाची मदत**—पश्चिम व पूर्व पाकिस्तानात १५ नवीन नभोवाणी केंद्रे स्थापन करण्यासाठी रशिया पाकिस्तानला आर्थिक मदत करणार आहे. ह्या योजनेच्या खर्चाची अजून निश्चिती झालेली नाही. पूर्व पाकिस्तानात एक व पश्चिम पाकिस्तानात एक अशी दोन १,००० किलोवॅट शक्तीची केंद्रे वरील योजनेत समाविष्ट आहेत.

**आधुनिक भातगिरण्या**—चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत सार्वजनिक मालकीच्या विभागांत २ हजार आधुनिक भातगिरण्या उभारण्याचे मध्यवर्ती सरकारने ठरविले आहे. ह्या गिरण्या दरसाल २ कोटी टन भात भरडू शकतील. गिरण्यांच्या सुधारलेल्या यंत्रसामग्रीमुळे तांदळाचा उतारा वाढेल. १९७०–७१ मध्ये त्या चालू होतील.

**एअर इंडियाचे नवे विमान**—एअर इंडिया इंटरनॅशनलने ७०७ बोइंग जेट जातीचे नवे विमान मागविले होते. ते नुकतेच मुंबईला आले आहे. विमानाची बांधणी अशी आहे की त्यातून वाटल्यास फक्त उतारू नेता येतात अगर मालही नेता येतो; किंवा वाटल्यास उतारू व माल ह्यांचीही वाहतूक एकाच वेळी करता येते. विमान ९० हजार पौंड वजन पेलू शकते.

**आंध्र प्रदेशाकडून तांदुळाचा पुरवठा**—गोवा, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, केरळ, मद्रास आणि म्हैसूर ह्या राज्यांना आंध्र-प्रदेशाकडून तांदुळाचा पुरवठा करण्यात येत आहे. चालू महिन्याच्या ४ तारखेपर्यंत आंध्रने केरळला १ लाख टन तांदूळ पाठविला आहे. त्याशिवाय मद्रासला ६,५०० टन, म्हैसूरला ८,००० टन, गोव्याला १८०० टन, पश्चिम बंगालला ४,१०० टन आणि महाराष्ट्राला ३,००० टन तांदूळ पुरविण्यात आला आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शन**– लिपझिग येथे पुढील महिन्यात भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शनात भारतामधील कारखानदार मोठ्या प्रमाणावर भाग घेणार आहेत. २०० हिंदी कंपन्या आपआपला माल ह्या प्रदर्शनात मांडणार आहेत. जगातील १० हजार प्रसिद्ध कंपन्या प्रदर्शनात सामील होणार आहेत.

**तेजाबाचा पहिला कारखाना**—भारतामधील पहिला तेजाब तयार करण्याचा कारखाना उभारण्याचे काम सिंद्री येथे सुरू करण्यात आले आहे. कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल देशातूनच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी ४ कोटी रुपये खर्च येईल. रोज ४०० टन तेजाबाचे उत्पादन त्यात होऊ शकेल. १९६८ च्या मध्यास उत्पादनास प्रारंभ होईल.


**अपघाताचे कारण अज्ञातच**— गेल्या जानेवारीत एअर इंडिया कंपनीचे बोइंग ७०७ विमान आल्प्स पर्वताच्या मॉटब्लॉ शिखरावर आदळून ११७ लोक प्राणाला मुकले होते. अपघाताचे कारण शोधण्यासाठी नेमलेल्या मंडळाला त्या बाबतीत अपयश आले आहे. शिखराजवळ आल्यावर विमानाच्या उड्डाणाची उंची कमी झाली इतकेच निश्चित करता आले. ह्या अपघातात भारताचे थोर अर्थशास्त्रज्ञ डॉ. भाभा स्वर्गवासी झाले.

**चीनमधील घडामोडींनी सीलोन अस्वस्थ**—सीलोनमधील तांदूळवाटपाचे सध्याचे प्रमाण कायम राखण्यासाठी सीलोनचे सरकार चीनकडून मिळावयाच्या २० हजार टन तांदुळावर अवलंबून आहे. परंतु चीनमधील यादवीच्या परिस्थितीने हा तांदूळ मिळेल की नाही, ह्याविषयी आता शंका उत्पन्न झाली आहे. यादवीमुळे चीनमधील अर्थव्यवस्था विस्कळित झाल्याच्या वार्ता येत आहेत.

**दिल्लीजवळ नवे विद्युत्केंद्र**—उत्तर विभागातील विद्युत्-पुरवठ्याची टंचाई लक्षात घेऊन दिल्लीजवळ एक नवीन औष्णिक विद्युत्केन्द्र उभारण्यात येत आहे. केन्द्रात ३०० मेगॅवॅट वीज निर्माण करण्यात येईल. त्याच्या उभारणीसाठी ४० कोटी रुपये खर्च येणार आहे. केंद्रासाठी लागणारे टर्बो जनरेटर्स हरद्वार येथील भारी विद्युत्यंत्रसामग्रीचे कारखाने तयार करण्यात येत आहेत.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, ' अर्थ '
किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.


धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...
परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...


बहुधा, प्रत्येक तीन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
विश्वासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील, शिवाय ती ठिकठिकाणीं सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
१ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड
फर्ग्युसन रोड, पुणे-४ (भारत)
TOM & BAY KO. 667-A MAB

# अर्थ

बुधवार, १ मार्च, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सार्वत्रिक निवडणुकीचे अर्थपूर्ण निकाल

सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल अर्थपूर्ण आहेत. मतदार आतां जागृत होऊ लागले असून त्यांनी आपल्या मतदानाने आपला असंतोष व्यक्त केला आहे. तथापि, त्यांना नेमके काय हवे आहे, ह्याबद्दल मात्र एकवाक्यता नाही. काही राज्यांतून कम्युनिस्टांना निर्विवाद सत्ता प्राप्त होणार आहे आणि त्या राज्यांचे धोरण केंद्र सरकारच्या धोरणाशी मिळते असण्याचा संभव नाही. त्यांचे सवतेसुभे निर्माण होण्याचा धोका दिसत आहे. केंद्र सरकारचा त्यांच्यावर परिणाम होण्याऐवजी त्यांच्या धोरणाचा व कारभाराचा परिणाम केंद्रावर व इतर राज्यांवर होण्याची शक्यता आहे. लाचलुचपत, भ्रष्टाकार, हे प्रश्न तेथे कसे सोडविले जातील, ह्याकडे सबंध देशाचे लक्ष वेधून राहील. परदेशांवरील आर्थिक अवलंबनाचा काळ आता संपत आला आहे. त्यामुळे देशातील उत्पादक घटकांनाच ह्यापुढे प्राधान्य मिळत जायला हवे. मतदानाने असंतोष व्यक्त करणे वेगळे आणि नव्या, कडक उपाययोजनेचा अनुभव घेणे वेगळे. कारण, ऐदी व कामचुकार लोक—मग ते मालक, जमीनदार, कर्मचारी, कामगार, कोणीहि असोत—खड्यासारखे वेचून काढले जाणे अपरिहार्यच होईल. असे करू शकणारे सरकारच आर्थिक अभ्युदय घडवून आणू शकेल. एकाच देशातील दोन वेगवेगळ्या प्रणालींची सरकारे ह्या बाबतीत काय करतील, त्याची तुलना होत राहील. लोकशाहीची ही मोठीच कसोटीची वेळ आहे. देशापुढील आर्थिक प्रश्न केवळ मतदानाने सुटू शकणार नाहीत; त्यासाठी प्रत्येकाला कष्टांची शिकस्त करावी लागेल आणि त्या शिकस्तीचे चीज होईल असा त्याला विश्वास वाटायला हवा. हे वातावरण निर्माण करण्यात केंद्र सरकार यशस्वी होवो !

## बड्या राष्ट्रांचा शस्त्रास्त्रे पुरविण्याचा धंदा

आशिआ, आफ्रिकेसारख्या मागासलेल्या भूभागातील देशांत उद्योगधंदे ह्या शब्दप्रयोगाला विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला आहे. युरोप आणि अमेरिका ह्यांसारख्या पुढारलेल्या देशांतील भरभराट उद्योगधंद्यांमुळे झालेली असल्याने तसेच उद्योगधंदे काढून आर्थिक उन्नति साधण्याचे प्रयत्न अनेक मागासलेले देश करीत आहेत. पण पुढारलेल्या देशांतील एका महत्त्वाच्या उद्योगधंद्याकडे मागासलेल्या देशांतील लोकांचे व सरकारांचेही फारसे लक्ष जात नाही. हा धंदा म्हणजे शस्त्रास्त्रांच्या निर्मितीचा व त्यांच्या विक्रीचा. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अनेक नवीन स्वतंत्र देश उदयाला आले आणि त्यांना स्वसंरक्षणासाठी किंवा प्रसंगी आक्रमणासाठीही शस्त्रस्त्रांची गरज भासू लागली. अर्थात ती तयार करण्याचे तंत्रज्ञान त्यांच्यापाशी नव्हते. बड्या उद्योगप्रधान राष्ट्रांनी ही गरज तत्परतेने भागविण्यास प्रारंभ केला. लंडनमधील इन्स्टिटयूट ऑफ स्ट्रॅटेजिक स्टडीज ह्या संघटनेने शस्त्रास्त्रांच्या खरेदी-विक्रीसंबंधी प्रसिद्ध केलेली माहिती चिंतनीय म्हणावी लागेल. ही बडी राष्ट्रे मागासलेल्या अविकसित देशांना दरसाल १०० कोटी डॉलर्स अथवा ७५० कोटी रुपये किमतीची शस्त्रास्त्रे विकतात. त्यांच्या दृष्टीने शस्त्रास्त्रांचा धंदा हा इतर धंद्यासारखाच एक धंदा आहे. औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असलेल्या बड्या देशांनी १९४५ पासून अविकसित देशांना ४,५०० जेटवर चालणारी लढाऊ विमाने, ५ हजार रणगाडे, २२४ युद्धनौका आणि अनेक प्रकारची प्रेरित क्षेपणास्त्रे विकत अगर देणगीदाखल पुरविलेली आहेत. शस्त्रास्त्रे पुरविणाऱ्या देशांत ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका आणि रशिआ हे प्रमुख आहेत.

---

## जॉइंट स्टॉक कंपन्यांविषयी आकडेवार माहिती
## ( १९५०–५१ ते १९६२–६३ )

रिझर्व्ह बँकेने सुमारे १० वर्षांपूर्वी आपल्या मासिक बुलेटिनमध्ये जॉइंट स्टॉक कंपन्यांसंबंधी आकडेवार माहिती देण्यास प्रारंभ केला. प्रारंभी, प्रत्येकी किमान ५ लक्ष रु. वसूल भांडवल असलेल्या बिन-सरकारी कंपन्यांची माहिती देण्यात येऊ लागली. हळूहळू व्याप्ती वाढवीत नेऊन मध्यम आणि मोठ्या आकाराच्या प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या, लहान पब्लिक लिमिटेड कंपन्या, विदेशी कंपन्यांच्या शाखा, परदेशी नियंत्रणाखालील भारतीय कंपन्या, इनव्हेस्टमेंट कंपन्या, इत्यादींची माहितीही दिली जाऊ लागली. ही वेळोवेळ प्रसिद्ध केलेली आकडेवार माहिती आता एकत्रित करून पुस्तकरूपाने रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केली आहे. सुरुवातीला, नंतर दिलेल्या ९१ तक्त्यांचे आकलन होण्यास आवश्यक असे एक खुलाशाचे प्रकरण दिलेले आहे. कापडी बांधणीच्या ह्या डबल डेमी आकाराच्या पुस्तकात २०५ पृष्ठे असून त्याची किंमत १५ रु. ( टपाल हशील वेगळे ) ठेवण्यात आली आहे, आणि ते ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, इकॉनॉमिक डिपार्टमेंट, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मुंबई १ ह्यांचेकडे मिळू शकेल.

# कराड अर्बन को. बँकेचा सुवर्णमहोत्सव

दि कराड अर्बन को. बँक लि. चा सुवर्ण महोत्सव रविवार, दि. १९ फेब्रुवारी, १९६७ रोजीं भारताचे गृहमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण ह्यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या थाटात साजरा झाला. कराड औद्योगिक प्रदर्शन, स्मृति ग्रंथ, श्री. वा. पुं. वर्दे ह्यांच्या अध्यक्षतेखालील "लोकशाही समाजवादातील नागरी सहकारी बँकांचे स्थान" ह्या विषयावरील परिसंवाद, नागरी बँकांच्या प्रतिनिधींची अनौपचारिक चर्चा, इत्यादि सहकारी बँकिंगविषयक उपक्रमांस श्री. देवठणकर ह्यांचे सनईवादन, पं. भीमसेन जोशी ह्यांचे सुश्राव्य गायन, ललितकलादर्शचे संगीत नाटक, इत्यादि करमणुकीच्या कार्यक्रमांची जोड देण्यात आली होती. बँकेचे चेअरमन, श्री. वि. कृ. तांबवेकर, ह्यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत बँकेच्या कार्याचा आढावा घेतला :—

## चेअरमन, श्री. तांबवेकर, ह्यांचे भाषण

बँकेच्या प्रगतीचा त्रोटक अहवाल आपणापुढे सादर करण्यापूर्वी मी आत्मविश्वासाने आणि अभिमानाने सांगू इच्छितो की, आपल्या बँकेच्या कार्याची वाटचाल योग्य दिशेनेच होत आहे आणि म्हणून तर आज सुवर्ण-महोत्सव साजरा करण्याचे भाग्य आपणास लाभले आहे.

सहकार हा आजच्या युगाचा धर्म आहे हे जाणून २४ जानेवारी १९१७ रोजी आपल्या बँकेची स्थापना झाली. कराड शहराच्या विविध क्षेत्रांतील सोळा सन्माननीय सद्‌गृहस्थांनी बँकेची उभारणी केली, त्यापैकी वयोवृद्ध सहकार-महर्षी श्री. नानासाहेब देशपांडे, तात्यासाहेब भाटे, बापूसाहेब वाघमारे आणि वामनराव फडके ह्या थोर मंडळीचे आशीर्वाद आजही आपल्या पाठीशी उभे आहेत, हे आपले भाग्य आहे असे मी मानतो.

पांच रुपयांचा एक शेअर ठेवला होता. पहिल्या वर्षांत बँकेस चाळीस सभासद मिळाले. वर्षाच्या शेवटी एक हजार अठ्याण्णव रुपये भांडवल झाले. वार्षिक नफा अकरा रुपये, रिझर्व्ह फंड बारा रुपये आणि खर्च १० रुपये असा आमचा व्यवहाराचा छोटा संसार. नोकर नाही की चाकर नाही. सारा सटाटोप स्वावलंबनाचा आणि सहकार्याचा. शेअरसाठी काय, ठेवीसाठी काय, की कर्ज घेण्याकरिता काय, आम्हाला प्रथमावस्थेत लोकांच्या पाठीशी लागावे लागे. पण त्या वेळच्या चालकांची चिकाटी मोठी दांडगी होती. सततोद्योगाने नि निःस्वार्थपणाने कष्ट करून त्यांनी बँकेस बाळसे आणले. आज पन्नास वर्षांनंतर बँकेच्या व्यवहाराचे मूल्यमापन केले तर क्षणभर अचंबा वाटतो आणि अभिमान तर खचितच वाटल्याशिवाय राहात नाही. चौदाशे सभासद, एक लक्ष साठ हजार भाग-भांडवल, दोन लक्ष छपन्न हजार गंगाजळी, तीन लक्ष दहा हजार इतर निधी, सहासष्ट लाखांच्या ठेवी, चाळीस लाखांची दिलेली कर्जे, एक कोटीच्या आसपास खेळतें भांडवल, सत्तर हजारांचा वार्षिक खर्च, ऐंशी हजार रुपये सालिना नफा, पाच लाखांच्या स्वतःच्या इमारती, नऊ टक्के भाग-नफा आणि बँकेस सतत मिळत असलेला 'अ' वर्ग ही बँकेच्या यशाची ठसठशीत गमकेच आहेत.

सहकारी बँक म्हणजे सेवाधर्माचे स्थान. नफ्याबरोबर नीतीला येथे प्राधान्य अधिक असते. सभासदांची प्रथम सोय साधावयाची; हितसंरक्षण करायचे आणि त्यांचे जीवन उन्नत करून सामाजिक आणि आर्थिक स्थान अधिक कसे उंचावेल यासाठी प्रयत्न तर करायचाच नि त्यासाठी साधने निर्माण करावयाची, ही नागरी बँकांची खरी कसोटी. आपल्या बँकेत ग्रंथालय, रुग्ण साहित्य संग्रह, स्वल्प संचय योजना, तिजोरी घर, कृष्णा कोयना इमारती, विद्यानगर शाखा, सभागृह, वगैरे सेवा केंद्रे आपण उघडली आहेत. बँकेचे भांडवल किती आणि व्यवहाराचा विस्तार किती या मोजमापापेक्षा लोकांची मनोगते बँकेत किती आहेत या गोष्टीला आपण अधिक महत्त्व देतो. आपल्या बँकेत सभासद आणि विविध प्रकारचे ठेवीदार या नात्याने दहा हजार लोकांचा पैसा आणि मने प्रेमाने गुंतली आहेत. म्हणजे कराडच्या वस्तीच्या एक तृतीयांश लोकांचे हितसंबंध आपणांशी निगडित आहेत. एवढा मोठा लोकसंग्रह फारच थोड्या बँकांच्या वाट्यास येत असेल आणि ते भाग्य आपणांस लाभले आहे.

जनतेचा विश्वास आपण संपादन केला आहे असे मी अभिमानाने सांगतो. अधिकाधिक ठेवी स्वीकारून सामाजिक कल्याण साधण्यासाठी आपल्यासारख्या बँकेला अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. शेतीचे उत्पादन, छोट्या मोठ्या धंद्यांची उभारणी, मध्यम वर्गीयांसाठी घर बांधण्याची योजना वगैरेसाठी आर्थिक साहाय्य देण्यास आम्ही समर्थ नि उत्सुक आहोत. पण सरकारी कायद्याच्या अडसरामुळे आमच्या आशा-आकांक्षा मनातल्या मनात विरघळून जातात याबद्दल दुःख होते.

आपल्या या सुवर्णमहोत्सवाचे भाग्य मिळवून देण्याच्या कामी कै. अप्पासाहेब अळतेकर, कै. पांडुअण्णा शिराळकर, श्री. नानासाहेब देशपांडे, श्री तात्यासाहेब भाटे, श्री. नानासाहेब बुधकर आणि श्री. बाबुरावजी गोखले यांनी बहुमोल परिश्रम केले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

## शहरांतील जमिनीच्या वाढत्या किंमती

दिल्ली येथे बांधकामाच्या धंद्याविषयींचा उत्पादकता हा परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादाचे उद्घाटन करताना नियोजन समितीचे सभासद प्रा. थँकर म्हणाले की, इमारती बांधण्यास उपयुक्त असणाऱ्या शहरांतील जमिनीच्या किंमती भडकत चाललेल्या आहेत. त्यामुळे शहरातील घरटंचाईचा प्रश्न सुटण्याच्या मार्गात फार मोठी अडचण निर्माण झाली आहे. जमिनीच्या किंमती वाढण्याचे एक कारण असे आहे की, जमिनीची खरेदी-विक्री इमारती बांधण्यासाठी करण्याऐवजी केवळ जादा नफा मिळविण्याच्या दृष्टीने करण्याची प्रवृत्ति अलीकडे वाढलेली आहे. त्यामुळे जमिनीच्या किंमती प्रमाणाबाहेर फुगत चालल्या आहेत. शहरांतील जमिनींच्या किंमतींना आळा घालण्यासाठी एखादी खास संघटना स्थापन करण्याचा विचार नियोजन समिती करीत आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात राहण्याच्या जागा उपलब्ध करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात येणार आहेत. ह्या कामासाठी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात मिळून सुमारे १८० कोटी रुपये खर्च करण्यात येतील असा अंदाज आहे. ह्यावरून बांधकामाच्या इंजिनिअरिंगला किती मोठे कार्य करावयाचे आहे ते लक्षात येते. ह्या बाबतीत जरूर असणारे तंत्रज्ञान आणि कार्यक्षमता भारतात नाही असे नाही. परंतु त्यांची योग्य रीतीने सांगड घातली जात नाही. बांधकामाच्या बाबतीत अनेक क्षेत्रांतील उत्पादकतेचा उपयोग करून घ्यावा लागतो. निरनिराळ्या क्षेत्रातील उत्पादकतेची नीट जुळणी करण्यात आली तर बांधकामाच्या विकासाचा वेग खूपच वाढविता येण्यासारखा आहे. बांधकामाच्या धंद्याची उभारणी शास्त्रशुद्ध पायावर करण्याची फार गरज आहे.

---

## ट्यूब विहिरी आणि पंपासाठी अधिक रक्कम

भारत सरकारच्या पाणीपुरवठा खात्याने निरनिराळ्या राज्यातील ट्यूब विहिरी आणि पाणी उपसण्याचे पंप चालू करण्यासाठी आणखी ११ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. ही रक्कम चालू आर्थिक वर्षासाठी वापरावयाची आहे. ह्या कार्यक्रमाप्रमाणे ३२ हजार पंप व ट्यूब विहिरी कार्यप्रवण करण्यात यावयाच्या आहेत. त्यातील ५ हजार आंध्र प्रदेशात, ४ हजार गुजरात राज्यात, मद्रास राज्यात १० हजार, मध्यप्रदेशात ३ हजार, म्हैसूर राज्यात ४ हजार, पंजाबात ३ हजार, हरियानात २ हजार आणि राजस्थानात १ हजार आहेत. त्याशिवाय पश्चिम बंगालमध्ये २०० खोल विहिरी खोदण्यात यावयाच्या आहेत. आंध्र प्रदेश, गुजरात, मद्रास, म्हैसूर आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांना प्रत्येकी १५० लाख रुपये जादा देण्यात येणार आहेत. मध्यप्रदेश, पंजाब व हरियाना राज्यांना प्रत्येकी १०० लाख रुपये मिळणार आहेत.

## दर महिन्याला ३०० सतारींची निर्यात

कला आणि रुक्ष व्यवहार ह्यांचे गोत्र सहसा पटत नाही. अनेक क्षेत्रांतील कलावंतांना व्यवहार न जमल्यामुळे दारिद्र्याच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्याची कितीतरी उदाहरणे दाखविता येतील. तथापि, कलावंतांची कला जनमनावर मोहिनी घालू शकली तर कलेचा संसार करतानाहि धनप्राप्ती कधीच होत नाही असे म्हणता येणार नाही. भारतामधील सुप्रसिद्ध सतारवादक श्री. रविशंकर ह्यांना ही किमया जमलेली दिसते. इंग्लंड–अमेरिकेसारख्या परदेशांत हिंदी संगीताला कौतुकाचे स्थान मिळवून देण्यात त्यांचे श्रम कारणीभूत झालेले आहेत. अलीकडेच ते पुन्हा अमेरिकेच्या व युरोपच्या दौऱ्यावर गेले आहेत. त्यांचा हा दौरा वर्षभराचा असून त्या मुदतीत ते हिंदी संगीताच्या मैफिली गाजवितील आणि पाश्चात्त्य शिष्यांना शिकविण्याचेही काम करतील. त्यांच्याबरोबर प्रसिद्ध तबलापटू श्री. अल्ला रखाही जात आहेत. न्यूयार्क, लॉस अँजेलिस, बोस्टन आणि मिशीगन ह्या अमेरिकन विद्यापीठात ते हिंदी संगीताचे धडे देणार आहेत. त्याचबरोबर लंडन व हॉलीवुडमध्ये तयार करण्यात येत असलेल्या काही चित्रपटांसाठी ते संगीत-रचना करणार आहेत. श्री. रविशंकर ह्यांच्या सतारवादनाने पाश्चात्त्यामधील संगीतज्ञ मुग्ध झालेले आहेत; आणि त्याचा परिणाम म्हणून भारताची सतार त्या देशांतून लोकप्रिय होत चालली आहे. परिणामी, सतारींना वाढती मागणी येत आहे. दरमहा सुमारे ३००. सतारी ब्रिटन व अमेरिकेला निर्यात करण्यात येत आहेत. गेले वर्षभर तरी ही निर्यात चालू आहे. चांगली सतार तयार करणे हे कसबी काम आहे. महाराष्ट्रात मिरज ह्या वाद्याच्या बनावटीसाठी प्रसिद्ध आहे. एका चांगल्या सतारीला परदेशात १ हजार रुपये किंमत येते. सतारीच्या धुंद स्वरालापातून परदेशीय नाण्यांचा आवाज निर्माण करण्याचे श्रेय मात्र श्री. रविशंकर ह्यांनाच द्यावे लागेल.

---

## मतदानात वापरण्यात येणारी पक्की शाई

सार्वत्रिक निवडणुकीत मतदाराच्या डाव्या हाताच्या अंगठ्या-शेजारील बोटाच्या मुळाशी पक्क्या शाईची खूण करण्यात येते. त्यामुळे एकदा मतदान केल्यावर पुन्हा मतदान करता येणे अशक्य होते. न पुसली जाणारी ही पक्की शाई म्हैसूर राज्यात तयार केलेली आहे. शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळाने दिलेल्या एका फॉर्म्युल्याप्रमाणे ती करण्यात येते. शाई तयार करण्याचे काम म्हैसूरमधील एक निमसरकारी कारखाना करतो. एका बाटलीतील शाईने ७५० मतदारांना चिन्हांकित करता येते. म्हैसूर राज्यातील मतदानासाठी अशा २० हजार कुप्या पुरविण्यात आल्या. १९६२ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत निरनिराळ्या राज्यांना मिळून ३·७३ लाख कुप्या पुरविण्यात आल्या होत्या. १९५७ साली ३·१६ लाख आणि १९५२ साली ३·८९ लाख कुप्या पुरविण्यात आल्या होत्या.

## तुटीचा अर्थभरणा समाजवादाशी विसंगत

मुंबई येथील फोरम ऑफ फ्री एंटरप्राइज ह्या संघटनेने सार्वत्रिक निवडणुकीशी संबंध असलेल्या आर्थिक प्रश्नांची चर्चा करण्यासाठी एक परिसंवाद भरविला होता. मतदारांना देशापुढील आर्थिक समस्यांची माहिती देण्याचा परिसंवादाचा हेतू होता. परिसंवादात बोलताना प्रा. सी. एन. वकील म्हणाले की भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांनी तुटीचा अर्थभरणा न करण्याचे आश्वासन दिलेले असले, तरी चालू आर्थिक वर्ष संपण्याच्या आतच सरकारला ३०० कोटी रुपयांची तूट भरून काढावी लागेल. ती भरून काढण्यासाठी चलनवाढ करावीच लागणार. वास्तविक चलनवाढीचा उपाय हा समाजवादाच्या कल्पनेशी विरोधी असाच आहे. कारण, चलनवाढीमुळे आर्थिक विषमता उत्पन्न होण्यास मदत होते. उलट, समाजवादाचे ध्येय मात्र ही विषमता नाहीशी करण्याचे असते. चलनवाढीला वा त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीला सरकारच सर्वस्वी जबाबदार आहे. तरीसुद्धा सरकारची वृत्ती चलनवाढीचे खापर दुसऱ्यावर फोडण्याची असते. सरकार एकीकडे किमती रोखून धरण्याची भाषा करीत असते आणि दुसरीकडे चलनवृद्धीचे धोरण स्वीकारून किमती चढण्यास मदत करीत असते. सुपर बाजार अगर डिपार्टमेंट स्टोअर्स ह्या गोष्टी लोकांचे लक्ष वेधण्याच्या दृष्टीने ठीक असल्या, तरी किंमती ठराविक पातळीवर स्थिर राखण्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग होत नाही. सरकारच्या आर्थिक धोरणाचा अर्थ समजणे कठीण आहे तोंडाने किंमती स्थिर ठेवण्याची भाषा चालू असताच चलनवृद्धी, तुटीचा अर्थभरणा इत्यादी उपाय अवलंबण्यात येत आहेत. उदा. अलीकडेच सरकारी नोकरांचा महागाईभत्ता वाढवून देण्यात आला. निवडणुका तोंडावर आल्यानेच हा निर्णय घेण्यात आला असावा.

---

## अमेरिकन पत्रपंडिताचे चीनवरील नवे पुस्तक

न्यूयॉर्क टाइम्स ह्या वृत्तपत्राचे उपकार्यकारी संपादक श्री. हॅरिसन सॅलिस्बरी ह्यांनी 'चीनची कक्षा' ह्या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. चीनमधील राजकर्त्या कम्युनिस्ट पक्षात सध्या चाललेल्या सत्तासंपादनाच्या झगड्यामुळे तेथील परिस्थिती गोंधळाची झालेली आहे. मि. सॅलिस्बरी ह्यांनी आपल्या पुस्तकात झगड्याला कारणीभूत असणाऱ्या आर्थिक परिस्थितीवर चांगला प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात की चीनची लोकसंख्या दरसाल २ कोटींनी वाढत आहे. येत्या दहा वर्षात चीनच्या सरकारवर प्रचंड वेगाने वाढणाऱ्या ह्या लोकसंख्येचे दडपण असह्य होणार आहे. त्यामुळे चीनच्या राज्यकर्त्यांना अन्नासाठी शेजारील राष्ट्रांवर आक्रमण करण्याशिवाय मार्ग राहणार नाही. चीनच्या सरकारला वाढती लोकसंख्या आणि अन्नाची टंचाई ह्या प्रश्नांना तोंड दिल्याशिवाय गत्यंतर नाही. चीनवर अणुयुद्धाचा प्रसंग ओढवला तर त्या देशांतील ३० कोटी लोक मृत्युमुखी पडतील, पण उरलेले लोक युद्ध चालूच ठेवतील आणि त्यात अखेरीस विजयी होतील असा हिशोब मि. माओ-त्से-तुंग ह्यांनी केलेला आहे आणि तो चीनमधील लोकांनी मानलेला आहे. अशा परिस्थितीत चीनच्या जगाबद्दलच्या वृत्तीत एक प्रकारची आक्रमणाची वृत्ती दिसून येते ह्यात नवल नाही. चीनमुळे उत्पन्न होणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यासाठी काही मार्ग आहे की नाही असा प्रश्न करून मि सॅलिस्बरी पुढे म्हणतात की, चीनमधील अन्नाचा व लोकसंख्येचा प्रश्न सोडविणे हाच त्यावर एकमेव उपाय आहे. चीनमधील दुष्काळाचे संकट टाळण्यासाठी अन्न आणि तांत्रिक सहकार्य देणे अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर अणुयुद्धाचा धोका अटळ आहे.

---

## देशांदेशांतील आर्थिक विषमतेचा गंभीर प्रश्न

मुंबई येथील भारतीय विद्याभवनामध्ये बोलताना संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सरचिटणिसांच्या सल्लागारांचे प्रमुख श्री. सी. व्ही. नरसिंहन् ह्यांनी महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. श्री. नरसिंहन् आपल्या भाषणात म्हणाले की, सध्या जगातील देशांची विभागणी सधन देश आणि दरिद्री देश अशी झालेली आहे. ह्या विभागणीमुळे जगातील देशांचे पुढे गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. देशादेशांमधील गरीबी श्रीमंतीचा प्रश्न हा अतिशय महत्त्वाचा झालेला आहे. त्यामानाने राजकीय तत्त्वज्ञानांचा झगडाही कमी महत्त्वाचा मानावा लागतो. कारण राजकीय पंथांचा आपआपसातील दुजाभाव व कडवटपणा ह्यांची धार अलीकडे कमी झालेली आहे. जगात आज प्रत्येकाला पुरण्यासारखे धन आहे. परंतु त्याची वाटणी नीट करण्यात येत नाही. अशी वाटणी करण्याची इच्छाच दिसून येत नाही. आर्थिक विकास साध्य करून घेण्यासाठी वास्तविक आंतरराष्ट्रीय सहकाराची आवश्यकता आहे. परंतु आजच्या जगात राष्ट्रीय हितसंबंधांना अधिक प्राधान्य देण्यात येते. सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती कठीण आहे. आज जगात चार प्रकारचे विरोध दिसून येतात. राजकीय विचारप्रणालीचा झगडा, वांशिक भिन्नतेवर आधारलेले तंटे, अविकसित देश आणि विकसित देश ह्यांमधील विरोध आणि वसाहतवाल्या देशांनी वसाहती मुक्त केल्यामुळे तेथे उत्पन्न झालेली पोकळी असे त्यांचे वर्गीकरण करता येईल. त्यापैकी वंशभेदावर आधारलेल्या धोरणाविरुद्ध ठराव मंजूर करण्यापलीकडे संयुक्त-राष्ट्र-संघटना आज फारसे काही करू शकत नाही. चीनमधील सध्याचा कलह आर्थिक धोरणातील मतभिन्नतेमुळे उत्पन्न झालेला आहे.

## तांब्याच्या खाणींसाठी नवी सरकारी कंपनी

भारतामधील तांब्याच्या खाणींचा विकास करून त्या चालविण्यासाठी मध्यवर्ती सरकारने सार्वजनिक मालकीच्या विभागात एक नवीन कंपनी स्थापन करण्याचे ठरविले आहे. वास्तविक हे काम नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या कक्षेतील आहे. परंतु, कॉर्पोरेशनला इतर खनिजांच्या विकासाकडेही लक्ष द्यावे लागते. त्यामुळे तांब्याच्या खाणींच्या विकासासाठी स्वतंत्र कंपनी काढण्याचे ठरविण्यात आले आहे. भारताला तांब्याची आयात परदेशांतून करावी लागते. औद्योगिक विकास साधण्यात तांबे ह्या धातूला मोठे महत्त्व आहे. पण भारतातील कच्च्या तांब्याचे साठे शोधून काढण्याचे काम अद्याप नीटसे मार्गी लागलेले नाही. आतापर्यंत करण्यात आलेल्या संशोधनाप्रमाणे तीन ठिकाणी तांब्याच्या खाणी काढता येण्यासारख्या आहेत. राजस्थानात खेत्री ह्या ठिकाणी, बिहारमध्ये राखा ह्या ठिकाणी, आणि आंध्र प्रदेशात अग्निगुंडला ह्या ठिकाणी तांब्याच्या खनिजाचे साठे आहेत. ह्या व इतर खाणी चालू करण्याचे काम कॉर्पोरेशनकडे सोपविण्यात येणार आहे. ज्या राज्यांत थोड्याफार प्रमाणात तांबे सापडू शकेल त्यांना खाणींबाबत सल्ला देऊन मार्गदर्शन करण्याचे कामही कॉर्पोरेशन करणार आहे. राजस्थानातील खेत्री ह्या ठिकाणच्या खाणी १९७२–७३ सालात चालू करण्याचा सरकारचा इरादा आहे. ह्या खाणींतून दरसाल ३१ हजार टन तांबे मिळू शकेल असा अंदाज करण्यात आला आहे. त्याशिवाय तांबे उत्पादन करताना सुमारे ३ लाख टन गंधकमिश्रित खते उपपदार्थ म्हणून तयार करता येतील. खेत्री येथील खाणींचा विकास घडवून आणण्यासाठी सुमारे ९० कोटी रुपये भांडवली खर्च करावा लागेल. बिहार आणि आंध्र प्रदेशांतील तांब्याच्या साठ्याची तपशीलवार पाहणी सध्या चालू आहे. ह्या दोन्ही ठिकाणी छोट्या प्रमाणावर तांब्याची निर्मिती करण्यात येणार आहे.

---

## राज्य सरकारांनी ओव्हरड्राफ्ट्सवर अवलंबून राहू नये.

अहमदाबाद इकॉनॉमिक असोसिएशनने पुरस्कारलेल्या एका व्याख्यानमालेत बोलतांना रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनी पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंबंधी महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत आणि अनुषंगाने देशाच्या आर्थिक परिस्थितीविषयीही चर्चा केली आहे. श्री. अय्यंगार म्हणाले की राज्यसरकारांत ओव्हरड्राफ्टसवर अवलंबून राहण्याची वृत्ति बळावलेली आहे. त्यांनी ही वृत्ति सोडून दिली पाहिजे. अशा तऱ्हेने पैसे काढण्यास ह्यापुढे त्यांना परवानगी असता कामा नये. तसा इशारा देण्यात आल्यावरही त्यांनी ओव्हरड्राफ्टस काढल्यास त्यांच्या चेक्सचे पैसे देण्यात येणार नाहीत अशी समज देण्यात आली पाहिजे. भारतामधील घटक राज्ये राजकीयदृष्ट्या अधिकाधिक समर्थ बनत चालली आहेत. त्यामुळेच त्यांच्यांत ओव्हरड्राफ्टसवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती बळावत चालली आहे. पंचवार्षिक कार्यक्रमांच्या गेल्या १५ वर्षांच्या काळात खूप मोठे बदल घडून आले आहेत. औद्योगिक उत्पादनात २५० टक्क्यांनी वाढ झाली आहे पण उत्पादनवाढीपेक्षाही उद्योगधंद्यांच्या स्वरूपात झालेला बदल अधिक महत्त्वाचा आहे. आज भारतात यंत्रे आणि यांत्रिक हत्यारांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. शेतीच्या उत्पादनात वाढ झालेली नाही अशी टीका सर्वच करीत आहेत. परंतु अन्नधान्य, ऊस, ताग आणि कापूस ह्यांच्या उत्पादनात झालेली वाढ कोणीच लक्षात घेत नाही. लोकसंख्येच्या वाढीवर आळा घालण्यात आला असता तर भारताची प्रगति भरीव झालेली आहे असे दिसले असते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न देशातील परिस्थिती लक्षात घेऊन सोडविला पाहिजे फ्रान्समध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यावरही त्या सरकारी हस्तक्षेपाशिवाय कार्य करीत आहेत.

---

## शास्त्रींच्या स्मारकासाठी कॅनडाचे सहकार्य

१९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या सशस्त्र संघर्षानंतर सोव्हिएट रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंद करार घडवून आणण्यात लालबहादूर शास्त्रीजी ह्यांनी यश मिळविले. करारावर सही केल्यानंतर अल्पावधीतच शास्त्री निधन पावले. त्यांची स्मृती कायम ठेवण्यासाठी ताश्कंदच्या जनतेने स्मारक उभारण्याचे ठरविले असून त्याचा नमुनाही मंजूर करण्यात आला आहे. आता शास्त्रीजींचे निराळ्या पद्धतीचे स्मारक करण्यासाठी कॅनडाने सहकार्य देण्याचे ठरविले आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भारत व कॅनडा ह्यांनी शास्त्री मेमोरियल फौंडेशन स्थापन करण्याचे ठरविले आहे. भारताच्या संस्कृतीच्या अभ्यासाला उत्तेजन देणे हे फौंडेशनचे ध्येय आहे. ह्या ध्येयास अनुसरून हिंदी संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी काही कॅनेडियन विद्वान भारतात येणार आहेत. उलटपक्षी काही भारतीय विद्वानही कॅनडात व्याख्याने देण्यासाठी जाणे उचित होईल. भारतामधील दुष्काळी परिस्थितीचे चटके सह्य व्हावे म्हणून कॅनडाने भारताला देणगी म्हणून काही अन्नधान्य दिलेले आहे. त्या धान्याची व इतर अन्नपदार्थांची विक्री करून भारतात जो पैसा उभा राहील त्यातून फौंडेशनसाठी लागणारी रक्कम जमविण्यात येणार आहे. कॅनडाने भारताला आतापर्यंत १६.६ कोटी डॉलर्सचे अन्नपदार्थ देणगी म्हणून दिलेले आहेत. त्याशिवाय, हिंदमधील अनेक विकास प्रकल्पांना कॅनडा कित्येक वर्षे साह्य करीत आहे. भारत व पाकिस्तान ह्यांच्यातील तंट्याचा फायदा घेऊनच पाकिस्तान परदेशात भारताची बदनामी करण्याची कोणतीही संधी सोडीत नाही. हिंदी संस्कृतीचा परदेशांना अधिक चांगला परिचय झाला तर पाकिस्तानच्या प्रचाराची धार बोथट होण्यास मदत होईल.

### लष्करी मदत देण्यास अमेरिकेचा नकार

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांनी दक्षिण आशियांतील देशांना आर्थिक मदत देण्यासाठी अमेरिकेच्या काँग्रेसकडे ७५·८ कोटी डॉलर्सची मागणी केली आहे. ह्यापैकी ९१ टके मदत भारत, पाकिस्तान आणि तुर्कस्तान ह्या देशांसाठी राखून ठेवण्यात आलेली आहे. परंतु परदेशांना द्यावयाच्या मदतीसाठी त्यांनी काँग्रेसला जो संदेश धाडला होता त्यात भारत व पाकिस्तान ह्यांच्याकडून लष्करी मदतीसाठी करण्यात आलेल्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. पाकिस्तान आणि भारत ह्यांनी मिळून जवळजवळ २३·४ कोटी डॉलर्सच्या लष्करी मदतीची मागणी केलेली होती. आता ही सर्व रक्कम ग्रीस, तुर्कस्तान आणि इराण ह्या देशांना लष्करी मदत देण्यासाठी वापरण्यात येईल अशी वार्ता आहे. ग्रीस, इराण आणि तुर्कस्तान ह्या देशांनी १२ वर्षेपर्यंत एकमेकांच्या सुरक्षिततेसाठी पडणारा बोजा सहकार्याने स्वीकारला आहे असे अमेरिकेचे म्हणणे आहे. संभाव्य रशियन आक्रमणाला तोंड देण्यासाठी ह्या देशांनी अमेरिकेशी सहकार्य केले, इतकाच त्याचा खरा अर्थ आहे. १९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत संघर्ष झाल्यावर अमेरिकेने दोन्ही देशांची लष्करी मदत बंद केलेली आहे. संघर्षाबद्दल भारत व पाकिस्तान ह्या दोन्ही देशांना सारखेच जबाबदार धरण्याचे अमेरिकेचे धोरण अद्यापही चालूच आहे. वास्तविक पाकिस्तान-बरोबर झालेल्या युद्धात भारताने अमेरिकेची लष्करी सामग्री वापरलेली नाही. पण ह्या वस्तुस्थितीची दखल घेण्यास अमेरिका अजूनही तयार नाही. प्रे. जॉन्सन ह्यांच्या मताने भारत, पाकिस्तान व तुर्कस्तान ह्या देशांतील दारिद्र्याचे उच्चाटन इतर प्रश्नांच्या मानाने अधिक महत्त्वाची बाब आहे.

---

### चौथ्या पंचवार्षिक योजनेतील पाणीपुरवठा

नियोजन समितीमधील पाणीपुरवठा व पूरनियंत्रण अभ्यास गटाचा सल्ला घेऊन मध्यवर्ती सरकारने राज्यसरकारांनी चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात वरील दोन्ही बाबतीत करावयाच्या खर्चाचा आकडा ठरविला आहे. चौथ्या कार्यक्रमांच्या मसुद्यात पाणीपुरवठा व पूरनियंत्रणासंबंधी जी रूपरेषा ठरविण्यात आली आहे त्याचा आधार घेऊन सर्व राज्यांनी मिळून ९६० कोटी रुपये खर्च करावे असे सुचविण्यात आले आहे. ह्या रकमेपैकी ८४९ कोटी रुपये पाणीपुरवठ्याच्या कामावर खर्च करण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली आहे. आसाम राज्यात ह्या कामावर २५·७७ कोटी रुपये खर्च करण्यात यावयाचे आहेत. त्यापैकी १७ कोटी रुपये पूरनियंत्रणावर खर्च करावयाचे आहेत. आसाम राज्यातील पुराचे धोके लक्षात घेऊन इतर कोणत्याही राज्यापेक्षा पूरनियंत्रक कामासाठी तेथे अधिक रक्कम खर्च करण्यात येईल.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
### मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४, २५४७८१ | फार्मर बँक |

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,७८,२५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ३,१९,७१,००० |
| ठेवी | ... | रु. | ४९,५८,९६,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | ९९,८७,२५,००० |

: शाखा :


(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

### पाडलेल्या विमानाबद्दल नुकसानभरपाईची मागणी

गेल्या महिन्यात पाकिस्तानचे एक विमान पंजाबमधील भारताच्या हद्दींत घुसले होते. हिंदी हवाई दलाच्या विमानाने त्या विमानाला खाली उतरण्याचा आदेश देऊनही ते उतरले नाही. उलट, पाकिस्तानच्या हद्दीत पळून जाण्याचा प्रयत्न वैमानिकाने केला. हे विमान शिकाऊ होते व त्याचा वैमानिकही शिकाऊ होता असा पाकिस्तानचा दावा आहे. पाकिस्तानच्या दिल्ली येथील प्रतिनिधीने भारत सरकारकडे विमान पाडल्याबद्दल व वैमानिक मृत्युमुखी पडल्याबद्दल नुकसानभरपाईची मागणी केली आहे. वैमानिकाच्या मृत्युबद्दल १० लाख रुपये आणि विमानाबद्दल ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. पाकिस्तानच्या ह्या मागणीचा भारत सरकार विचार करीत आहे.

---

### कापडगिरण्यांच्या अडचणींसंबंधी इशारा

मुंबई येथील मिल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. आर. आर. रुइआ ह्यांनी कापडगिरण्यांपुढील अडचणींबद्दल इशारा दिला आहे. दक्षिण भारतीय कापड संशोधन मंडळाच्या ७ व्या तांत्रिक परिषदेचे ते उद्घाटन करीत होते. ते म्हणाले की कापडगिरण्यांपुढे आज अनेक अडचणी उभ्या आहेत. गिरण्यांना द्याव्या लागणाऱ्या मजुरीत वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे यंत्रसामग्री व इतर साधनांच्या किंमतीही वाढल्या आहेत. कापसाची टंचाई भासत असून पैशाचा तुटवडाही जाणवू लागला आहे. कामगारांना देण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याची राहणीच्या निर्देशांकाशी सांगड घालण्यात आल्यामुळे गिरण्यांच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. कापसाची टंचाई तर ह्या धंद्याची कायमची डोकेदुखी झालेली आहे. महागाईच्या कापसाचा काटकसरीने वापर करण्यात आला तरच उत्पादनाचा खर्च वाजवी पातळीवर ठेवता येईल.

---

### भाषांच्या विविधतेमुळे करावा लागणारा खर्च

संयुक्त राष्ट्रसंघटनेत अनेक भाषा असणारे देश सामील झालेले आहेत. त्यामुळे संघटनेत कामकाज अनेक भाषांतून करावे लागणे अपरिहार्य झालेले आहे. आंतरराष्ट्रीय संबंध राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेला अनेक कागदपत्रांची विविध भाषांतून भाषांतरे करावी लागतात. त्याशिवाय प्रतिनिधींच्या भाषणांचे तर्जुमे अनेक भाषांतून तत्काळ करावे लागतात. ह्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येतो. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक व सामाजिक मंडळाची बैठक १९६५ च्या उन्हाळ्यात भरली होती. ह्या एकाच बैठकीचे काम निरनिराळ्या भाषांतून चालविण्यासाठी १० लाख डॉलर्स खर्च आला. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या एका उपसंघटनेच्या एका बैठकीसाठी येणाऱ्या खर्चाचा हा आकडा पाहिला म्हणजे भिन्न भाषांच्या वापरामुळे संघटनेला केवढा प्रचंड खर्च करावा लागत असेल त्याची कल्पना येते.


दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड
(जि. सातारा)

**सुवर्ण-महोत्सव**

बँकेचे सन्मान्य सभासद व भारत सरकारचे गृहमंत्री
**ना. यशवंतरावजी चव्हाण,** यांचे शुभ हस्ते
रविवार दि. १९-२-१९६७ रोजी सुवर्णमहोत्सव साजरा करण्यांत आला.

देखरेख समिती–श्री. वि. पां. काळे (अध्यक्ष) श्री. बं. हु. मोहिरे, डॉ. द. मो. देशपांडे.

: कार्यकारी मंडळ :

श्री. वि. कृ. तांबवेकर, [चेअरमन]
श्री. कृ. गो. सरडे,
श्री. प्र. ल. करंबेळकर,
श्री. जी. ध. पटेल,
श्री. य. ज. मोहिते, [व्हा. चेअरमन]
श्री. पां. न. वळवडे,
श्री. डॉ. वा. रा. जोशी, श्री. ग. गो. कुलकर्णी,
श्री. द. बं. जोशी

या शुभ प्रसंगी बँक सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांचे अभीष्ट चिंतन करीत आहे.

शं. पु. कुलकर्णी, मॅनेजिंग डायरेक्टर.

## १० हजार रु. वरील भाग भांडवलाच्या सोसायटीची निवडणूक

### बॅलट पद्धतीनेच झाली पाहिजे

पिसादेवी येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक दि. २८–८–६५ ला झाली. ती निवडणूक रद्द ठरविण्यासाठीं दगडूने वाद दाखल केला.

दगडूने दाखल केलेला वाद नॉमिनीकडे निकालासांठी पाठविण्यात आला. दगडूने दिलेली कारणे नॉमिनीला पटली नाहीत म्हणून नॉमिनीने तो वाद फेटाळून लावला. त्यावर दगडूने हे अपील केले होते.

प्रस्तुतच्या अपिलात दगडूच्या वकिलांनी फक्त एकाच मुद्यावर भर दिली. तो मुद्दा असा कीं, नियम नं. ६० ( ५ ) अन्वये निवडणूक मतपत्रिकांच्या द्वारे ( बॅलट ) व्हावयास पाहिजे होती; परंतु दि. २८–८–६५ च्या निवडणुकीच्या वेळी मतपत्रिकांचा उपयोग करण्यांत आला नसल्यामुळे ती निवडणूक बेकायदेशीर ठरते.

ज्या सोसायटीचे भाग भांडवल १० हजार रुपयांहून अधिक आहे अशा सोसायटीने निवडणुकीच्या वेळी मतपत्रिकांचा ( बॅलट ) अवलंब केला पाहिजे, अशी स्पष्ट तरतूद महाराष्ट्र सहकारी नियम नं. ६० ( ५ ) मध्ये करण्यात आली आहे. वादांतील सोसायटीचे भाग भांडवल १० हजार रुपयांहून अधिक आहे ह्याबद्दल वाद नाही. परंतु सोसायटीचे म्हणणे असे आहे की, निवडणूक मतपत्रिकांच्या द्वारे करण्यात यावी असा नियम सोसायटीने केला नसल्यामुळे पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीनेच सोसायटीने दि. २८–८–६५ ची निवडणूक केली असल्यामुळे ती कायदेशीर ठरते. नॉमिनिला सोसायटीचा हा युक्तिवाद पटला. हा युक्तिवाद स्वीकारण्यात नॉमिनीने चूक केली. नियम ६० ( ५ ) मध्ये जी तरतूद करण्यात आली आहे ती सक्तीची तरतूद आहे. त्या तरतुदीला अपवाद असू शकत नाही. म्हणजे असे की, सोसायटीचे भाग भांडवल जर १० हजार रुपयांहून अधिक असेल तर सोसायटीने निवडणुकीचे वेळी मतपत्रिकांचाच अवलंब केला पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने सोसायटीला निवडणूक करता येत नाही. सोसायटीने ह्या नियमाचे पालन केलेच पाहिजे. सोसायटीच्या बायलॉत अथवा निवडणुकीसंबंधीच्या नियमात निवडणुकीसाठी दुसरी एखादी पद्धत नेमून देण्यात आली असेल, तरीदेखील सोसायट्यांबाबत सोसायटीला कोणतीही सबब सांगता येणार नाही.

" नॉमिनीने दिलेला निकाल रद्द करून आम्ही हे अपील खर्चासह मंजूर करतो व ता. २८–८–६५ ची निवडणूक रद्द ठरवितो. सोसायटीने पुन्हा निवडणूक करावी असे आपोआपच ठरते. " असा सहकारी ट्रायब्यूनलने कौल दिला.

---

### महाराष्ट्रात मोटारींची संख्या सर्वांत अधिक

असोसिएशन ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स ह्या संघटनेच्या चिटणिसांनी भारतामधील निरनिराळ्या राज्यांतील मोटारींच्या संख्येविषयी माहिती जमा केली आहे. १९६६ च्या डिसेंबर अखेरपर्यंतचे आकडे त्यांनी एकत्र केले आहेत. सदर माहितीप्रमाणे महाराष्ट्रातील मोटारींची संख्या इतर कोणत्याही राज्यांतील संख्येपेक्षा अधिक आहे. राज्यांत १ लाख, ५४ हजार, ७६२ मोटारी वापरात आहेत. महाराष्ट्राच्या खालोखाल पश्चिम-बंगालमध्ये १ लाख, ३५ हजार, १५३ मोटारी आहेत. त्यानंतरचे राज्यवार आकडे असे आहेत — मद्रास : ७४,६१९; म्हैसूर : ६५,९४८; गुजरात : ६५,७५६; उत्तर प्रदेश : ६४,५११; आंध्र : ६३,१९९ आणि दिल्ली : ५८,८४९. महाराष्ट्रातील मोटारींची संख्या बहुधा मुंबई शहरांतील मोटारींच्या संख्येने फुगलेली असावी. मोटारींच्या बाबतीत पुढारलेला महाराष्ट्र अन्नधान्याच्या पुरवठ्याच्या बाबतीत मात्र मागासलेला आहे.

---

**भारताला मिळालेली मदत**—जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय विकास मंडळ ह्या संघटनांनी भारताच्या उद्योगीकरणासाठी आतापर्यंत ७८ कोटी रुपयांची कर्जाऊ मदत दिलेली आहे. त्याशिवाय इंटरनॅशनल फायनॅन्स कॉर्पोरेशनने १·१९ कोटी डॉलर्स भांडवल भारतात गुंतविण्याचे ठरविले आहे. जून १९६६ अखेर जागतिक बँकेकडून कर्जे मिळालेल्या देशांत भारताचा नंबर पहिला लागतो.


सहकारातून समृद्धि—

**कृष्णा सहकारी साखर कारखाना लि.**

रेठरे बुद्रुक.

महाराष्ट्रात सहकारी समाजवादावर आधारलेली नव-निर्मिती द्रुतगतीने पार पाडण्यात सक्रिय साथ देत आहे.

• • •

दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि. कराडच्या सुवर्णमहोत्सवात हा कारखाना सहर्ष सहभागी होत आहे.

• • •

जयवंतराव भोसले
चेअरमन

म. रा. वरणगावकर — सहकारी संचालक

दि. पां. मोहिते — व्हाईस चेअरमन

### कुष्ठ रोगावरील उपचार व संशोधन केंद्र

आग्रा शहराजवळ जपानच्या सहकार्याने कुष्ठ रोगावर उपचार करण्याचे व त्या रोगासंबंधी संशोधन करण्याचे एक केंद्र स्थापन करण्यात आले आहे. भारतात कुष्ठरोग्यांची संख्या सुमारे २० ते ३० लाख असावी असा अंदाज आहे. सहा ते आठ राज्यांत त्यांची संख्या विशेष दिसून येते आणि त्यांपैकी ५० टक्के रोगी मद्रास व आंध्र प्रदेशात आढळून येतात. जपानने ह्या रोगाचे निर्मूलन करण्यात बरेच यश मिळविलेले आहे. ५० वर्षांपूर्वी जपानमध्ये जवळजवळ २ लाख लोकांना कुष्ठरोगाने पछाडलेले होते. आता त्यांची संख्या १० हजारांच्या आसपास आहे. भारताच्या चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ज्या भागात हा रोग आढळून येतो, त्या भागातील १९.५ कोटी लोकवस्तीची पाहाणी करण्यात येणार आहे. त्यासाठी ११७ नियंत्रण केंद्रे खालण्यात येतील.

### माशांपासून तयार केलेली खाण्याची भुकटी

अविकसित देशांतील बहुसंख्य लोकांना अपुरे अन्न मिळते; आणि त्यांच्या आहारात प्रथिनयुक्त पदार्थांची फार वाण असते. सकस आहारात प्रथिनयुक्त पदार्थांना महत्त्वाचे स्थान आहे. बहुसंख्य लोकांना असे पदार्थ घेणे परवडत नाही. अमेरिकन शास्त्रज्ञ माशापासून भुकटी करण्याचे प्रयत्न कित्येक वर्षे करीत होते. त्यांच्या ह्या प्रयत्नांना यश आल्याची वार्ता आहे. त्यांनी बनविलेल्या माशांच्या भुकटीत ८० टक्के प्रथिन असते आणि ते शुद्ध स्वरूपात असते. भुकटीला कोणत्याही प्रकारची चव नाही अगर वासही नाही. आर्थिक दृष्टीने ती परवडण्यासारखी असून कोणत्याही अन्नपदार्थांत मिसळता येण्यासारखी आहे. अमेरिकेच्या अन्नखात्याने भुकटीचे उत्पादन मंजूर केले आहे.


---

**अमेरिकेतील गुन्हेगारी**— प्रे. जॉन्सन ह्यांनी अमेरिकन काँग्रेसला धाडलेल्या संदेशात बंदुकीसारख्या शस्त्रास्त्रांच्या विक्रीवर नियंत्रण घालण्याची जरुरी प्रतिपादन केली आहे. प्रे. केनेडी ह्यांचा खून झाल्यापासून ह्या विषयासंबंधी अमेरिकेत बरीच चर्चा होत आहे. प्रे. जॉन्सन ह्यांच्या मताने अमेरिकेत गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असून ह्या गुन्ह्यामुळे होणारी मालमत्तेची हानी दरसाल ३०० कोटी डॉलर्सच्या घरात गेली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.
फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग





तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्





१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

# शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें

भारतांतील निरनिराळ्या राज्यामधून वीज निर्मितीच्या योजना कार्यवाहीत आल्यामुळें शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें खुलीं झालीं आहेत. आज खेड्यापाड्यांतून शेतीसाठीं लिफ्ट इरिगेशन, शहरी व ग्रामीण पाणी पुरवठा व इतर लहानमोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा किर्लोस्कर पंपिंग सेटस कार्यक्षमतनें करूं शकतात. आपल्या योजनेसाठीं कोणता किर्लोस्कर पंप सेट निवडावा याबाबतचा तांत्रिक सल्ला आपल्याला आमचेकडून विनामूल्य मिळूं शकेल.






वैशिष्ट्यें :

- डबल सक्शन
- मजबूत बांधणी व दीर्घकाल टिकाऊ
- कार्यक्षम व काटकसरी
- झीज कमी व दुरुस्तीस सोपा

## किर्लोस्कर



टाइप "यूपी"
५ ते ३०० हॉ. पॉ. पंपिंग सेट
उत्पादक

## किर्लोस्कर ब्रदर्स लि.

किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेकन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

'अर्थ एव प्रधान:' इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १५ मार्च, १९६७ | अंक ६

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०१

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**रशिअन सेनापतींची भेट**—रशिआचे उपसंरक्षणमंत्री व चीफ ऑफ स्टाफ भारताच्या ९ दिवसांच्या दौऱ्यावर आले आहेत. भारताने अलीकडे रशिआकडून काही अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी केली आहेत. त्याचप्रमाणे भारतात मिग लढाऊ विमानांची बांधणीही चालू झाली आहे. भारताचे सेनापती व इतर अधिकारी ह्यांच्याशी होणाऱ्या त्यांच्या चर्चेत वरील बाबींवर विचारविनिमय होण्याची शक्यता आहे.

**जुने वैद्यकीय हस्तलिखित**—इराणमध्ये ७१ वर्षांपूर्वीचे एक वैद्यकीय हस्तलिखित सापडले आहे. ह्या ग्रंथात अनेक प्रकारच्या रोगांवर उपचार ग्रथित करण्यात आले आहेत. त्यात कर्करोगावरही एक उपाय दिलेला आहे. त्याशिवाय वेड आणि महारोग ह्या रोगावरील औषधे दिलेली आहेत. काही काढे दिलेले असून त्यात सशाचे दूध आणि सुसरीच्या प्लीहेचे तेल ह्यांचा उपयोग सांगितलेला आहे.

**आशिया ओलांडणारा रेल्वेमार्ग**—इस्तंबूलपासून निघून सायगांवपर्यंत आशिया ओलांडून जाणाऱ्या रेल्वेमार्गाची एक योजना आखण्यात आलेली आहे. ह्या योजनेला सक्रिय पाठिंबा देण्याचे जपानच्या सरकारने ठरविले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आशिया आर्थिक मंडळाच्या येत्या बैठकीत ह्या योजनेविषयी विचारविनिमय होण्याची शक्यता आहे.

**बँकांचे राष्ट्रीयीकरण**—लोकसभेचे सभासद आणि पंजाब नॅशनल बँकेचे अध्यक्ष श्री. कमलनयन बजाज म्हणाले की, बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यामुळे देशाचे हित होणार असेल तर राष्ट्रीयीकरणाला पाठिंबा देण्यास काहीच हरकत असू नये. तथापि ह्यासंबंधीचा विचार केवळ तात्त्विक भूमिकेवरून न करता व्यवहारवादी दृष्टीने करण्यात आला पाहिजे.

**१३ कोटी रुपयांची कर्जे**—चालू सहकारी वर्ष संपण्यापूर्वी म्हणजे जूनअखेर गुजरात को ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक १३ कोटी रुपयांची कर्जे देणार आहे. गेल्या महिन्याच्या अखेरीपर्यंत बँकेकडे कर्जासाठी ३० हजार अर्ज आलेले होते. अर्जांची तपासणी सध्या चालू असून मार्चअखेर २ ते २॥ कोटी रुपयांची कर्जे मंजूर करण्यात येतील असा अंदाज आहे. एप्रिलअखेर सर्व अर्ज निकाली काढण्यात येतील. मगच नवे अर्ज दाखल करून घेतले जातील.

**वीज कामगारांच्या संपाचा परिणाम**—महाराष्ट्र राज्य वीज बोर्डाच्या कामगारांनी गेले कित्येक दिवस आपल्या मागण्यांसाठी संप पुकारलेला आहे. मोठ्या शहरांतून संपाचा परिणाम दिसून येत नसला तरी ग्रामीण भागांतील शेतीवर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. वीज नसल्यामुळे पाणी उपसण्याचे पंप बंद पडू लागले आहेत. डहाणू तालुक्यातील रब्बी पिकांपैकी व चिकूच्या फळांपैकी ३० टके पिकाला पाण्याच्या अभावी धोका पोचत आहे.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन


आपली चलनी नोट

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.



धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण... परंतु किर्लोस्कर डिझेल एंजिन वापरण्यानें धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहींत...



किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.

विनभरवशाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ही निराळीच.

किर्लोस्कर

डिझेल एंन्जिन्स

२ ते १५ हॉर्स पॉवर

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.

पुणें-३ (भारत)

TOM & BAY

# अर्थ

बुधवार, १५ मार्च, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## संस्थानिकांचे तनखे बंद करणे घटनादुरुस्तीविना अशक्य

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामधील सुमारे ५०० संस्थानांचे विलीनीकरण घडवून आणण्यात आले. स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल ह्यांनी हे काम चातुर्याने आणि क्वचित् प्रसंगी सत्तेचा वापर करून उरकले. संस्थानिकांनी आपले राजेपण आणि आनुषंगिक अधिकार सोडावे म्हणून त्यांना तनखा देण्याचे ठरविण्यात आले. घटनेच्या २९१ व्या कलमाप्रमाणे तनखा पद्धतीला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे संस्थानिकांचे तनखे बंद करण्याचा विचार पुढे आल्यास प्रथम घटना दुरुस्तीचा प्रश्न हाती घ्यावा लागेल. तनख्याबाबत संस्थानिकांशी निरनिराळे करार करण्यात आले आहेत. ज्या संस्थानिकांना दरसाल १० लाखांपेक्षा अधिक तनखा मिळतो त्यांच्या वारसांना मिळणारा तनखा कमी करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारला आहे. तथापि वारसांचा तनखा ठरवितांना सरकार प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र तपासणी करील असे ठरलेले आहे. संस्थानिकांना मिळणाऱ्या तनख्यावर कराची आकारणी करता येत नाही. मूळच्या कराराप्रमाणे तनखा घेणारे आता चारच संस्थानिक राहिले आहेत. म्हैसूर, त्रावणकोर, जयपूर व पतियाळा हे ते होत. बाकीच्या संस्थानिकांच्या तनख्यात कमीअधिक कपात करण्यात आलेली आहे. एकूण ११ संस्थानिकांचे तनखे सालिना १० लाखांपेक्षा अधिक होते. त्यापैकी हैद्राबाद, बडोदा, ग्वाल्हेर, इंदोर, जोधपूर, बिकानेर आणि भोपाळ ह्या संस्थानिकांच्या वारसांचे तनखे कमी करण्यात आले आहेत. त्याचा तक्ता असा—

| संस्थान | मूळचा तनखा | कमी केलेला तनखा |
|---|---|---|
| बडोदा | रु. २६·५ लाख | रु. १४·५४ लाख |
| ग्वाल्हेर | रु. २५ ,, | रु. १० ,, |
| इंदोर | रु. १५ ,, | रु. ५ ,, |
| बिकानेर | रु. १७·५ ,, | रु. १० ,, |
| भोपाळ | रु. ११ ,, | रु. ६·७ ,, |
| हैद्राबाद | रु. ४२·८५ ,, | रु. २० ,, |

संस्थानिकांत श्रीमंतीच्या बाबतीत हैद्राबादच्या निझामाचा अनुक्रम पहिला मानला जात असे. आता ऐश्वर्याच्या बाबतीतले पहिले स्थान ग्वाल्हेरच्या महाराजांना लाभले आहे. ग्वाल्हेरच्या महाराजांनी आपल्या उत्पन्नापैकी बराचसा भाग चांगल्या भांडवली गुंतवणुकीत खर्च केला आहे असे म्हणतात. १९४९ पासून आतापर्यंत संस्थानिकांच्या तनख्यांत ज्या कपाती करण्यात आल्या त्यामुळे सुमारे ८० लाख रुपयांची बचत झाली आहे. अक्कलकोट, नांदगावसारख्या काही संस्थानांचे अधिपति निपुत्रिक वारल्यामुळे आणखी ५·०५ लाख रुपयांची बचत झाली आहे. बस्तार, भोपाळ, इंदोर आणि सांगली ह्या संस्थानाधिपतींशी झालेल्या करारात तनख्यांचा फेरविचार करण्याची तरतूद नव्हती. परंतु प्रसंग आला त्या त्या वेळी त्यांच्या वारसांशी विचारविनिमय करून भारत सरकारने तनख्यात कपात केली. भारत सरकारच्या १,८०० कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकापैकी फक्त ४·७५ कोटी रुपयांची रक्कमच तनख्यासाठी खर्च करावी लागते. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सात आठ घटक राज्यांत काँग्रेसपक्षाला निर्णायक बहुमत मिळालेले नाही. तथापि मध्यवर्ती सरकारात काँग्रेसच सत्तारूढ असल्याने संस्थानिकांना तनखाबंदीची भीती आजच वाटण्याचे कारण नाही. तरीसुद्धा बदलती राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन उत्पन्नाचे दुसरे मार्ग शोधण्याची जरुरी त्यांना टाळता येण्यासारखी नाही.

## ओव्हरड्रॉफ्टची रक्कम परत मागू नका

डाव्या कम्युनिस्ट गटाचे केरळमधील पुढारी श्री. ए. के. गोपालन् ह्यांनी एका मुलाखतीत मध्यवर्ती सरकारशी होणाऱ्या तेढींतील पहिली सूचना दिली आहे. त्यांच्या मताने केरळ राज्याच्या बिकट आर्थिक परिस्थितीला राज्यांतील काँग्रेस-पक्षाचा कारभार जबाबदार आहे. १९६० सालापासून केरळ राज्यात काँग्रेसचे मंत्रिमंडळ अगर राष्ट्राध्यक्षांची राजवट चालू आहे. ह्या काळात झालेल्या उधळपट्टीमुळे केरळ अडचणीत आलेले आहे. संयुक्त आघाडीच्या नव्या राजवटीला कारभार चालविता येण्यासाठी, मध्यवर्ती सरकारने केरळ राज्याला रिझर्व्ह बँकेने दिलेली ओव्हरड्रॉफ्टची रक्कम परत मागू नये अशी सूचना त्यांनी केली आहे. केरळ राज्याच्या बिगरराजपत्रित नौकरांना द्यावयाच्या वाढत्या महागाई भत्त्यापोटी व स्वस्ताईने तांदूळ विकण्यासाठी राज्य सरकारला ४० कोटी रुपयांची तूट भासत आहे.

## चहाचे उत्पादन फाजील होण्याचा इशारा

चहाच्या उत्पादनाची आणि खपाची आजची प्रवृत्ती लक्षात घेता, १८७५ च्या सुमारास दरसाल १,००,००० ते २,००,००० टन चहाचे उत्पादन फाजील ठरेल, असा एफ. ए. ओ. च्या बैठकीत संयुक्त राष्ट्र संघटनेचे एक शेतीतज्ज्ञ, डॉ. ए. व्हिटन ह्यांनी इशारा दिला. गेल्या वर्षी चहाच्या किंमतीची घसरगुंडी थांबली नाही; जागतिक उत्पादन मात्र २% वाढले.

## मोटारींच्या सुट्या भागांच्या निर्यातीसाठी प्रयत्न

एंजिनिअरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल ऑफ इंडिया आणि मोटार कारखान्याची अखिल भारतीय संघटना ह्यांनी मिळून आपले एक प्रतिनिधी मंडळ परदेशांच्या दौऱ्यावर पाठविले आहे. त्याच्या दौऱ्यात आग्नेय आशियातील सिंगापूर, इंडोनेशिया, कुआलालंपूर, बँकॉक आणि हाँगकाँग ह्या देशांचा समावेश करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत भारतामधील मोटारी तयार करण्याच्या धंद्याची वाढ झाली आहे. मोटार कारखान्यात तयार होणाऱ्या मोटारीच्या सामानासाठी आणि सुट्या भागांसाठी वरील देशात बाजारपेठ मिळण्याची शक्यता अजमावण्याचा प्रयत्न मंडळ करणार आहे. त्याच्या दौऱ्याचा हेतू विक्री वाढविण्याचा व बाजारपेठेचा अभ्यास करण्याचा आहे. मंडळ सीलोनमधील बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्नही करणार आहे. भारतात तयार होणाऱ्या मालाबद्दल ग्राहकांचा विश्वास संपादन करणे अगत्याचे असल्याने मालाच्या दर्जाबद्दल अधिक काळजी घेण्याची आवश्यकता मंडळाने प्रतिपादन केली आहे. १९६५ साली भारतामधील मोटार कारखान्यांनी मोटारीचे सुटे भाग व इतर सामान मिळून ६० कोटी रुपयांचा माल तयार केला होता. ह्या मालापैकी अवघा ६० लाख रुपयांचा माल परदेशात निर्यात करण्यात आला. चालू वर्षी एकूण उत्पादनाच्या १० टक्के माल परदेशी निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. ह्याच म्हणजे १९६५ साली भारताने सीलोनला ४ लाख २९ हजार, ८०५ रुपयांचे सुटे भाग निर्यात केले. सीलोनमधील मोटार धंद्यांतील आयात-व्यापारी व कारखानदार, त्याचप्रमाणे सीलोन सरकारचे वाहतूक मंडळ ह्यांच्याशी प्रतिनिधी मंडळाने वाटाघाटी केल्या.

---

## अन्नासाठी जपानची भारताला मदत

हिंदमधील अन्नधान्याची टंचाई दूर करण्यातील मोठा वाटा आतापर्यंत अमेरिकेने उचललेला आहे. तथापि, खुद्द अमेरिकेतील अन्नधान्याच्या साठ्यावरच अलीकडे खूप ताण पडला आहे आणि टंचाई असलेल्या देशांनी स्वतःचे अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न जारीने केले पाहिजेत, असा आग्रह अमेरिकेने धरला आहे. त्याबरोबरच हिंदला इतर सधन देशांनीही मदत केली पाहिजे असे अमेरिकेचे म्हणणे आहे. अलीकडे रशियाने भारताला २ लाख टन गहू पाठविण्याचे कबूल केले व त्यातील काही हजार टन गहू तातडीने धाडण्यातही आला आहे. आग्नेय आशिआंतील देशांत कम्युनिस्टांचा शिरकाव होऊ नये म्हणून अमेरिकेने व्हिएटनाममधील युद्ध चालविले आहे. आशिआतील देशांना अमेरिकेकडून मिळणारी आर्थिक मदत ह्याच हेतूने प्रेरित झालेली आहे. गेल्या महायुद्धानंतर जपानमध्ये अमेरिकेचा प्रभाव वाढलेला आहे. तेव्हा अमेरिकेने भारताला देण्यात यावयाच्या मदतीचे स्वरूप आंतरराष्ट्रीय असावे अशी भूमिका घेतल्यावर जपानला तिकडे काणाडोळा करता येण्यासारखा नव्हता. जपानच्या परराष्ट्रखात्याने भारताला अन्नासाठी ७० लाख डालर्सची मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. जपानच्या परराष्ट्रखात्याने मुळात २·५ कोटी डॉलर्सची मदत देण्याची सूचना केली होती. परंतु जपानच्या अर्थखात्याने मदतीची रक्कम कमी करून ७० लाख डॉलर्स केली आहे. खुद्द भारताने आपले अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याची पराकाष्ठा करावी अशी जपानचीही भूमिका आहे. त्यामुळे ह्या मदतीचा उपयोग करून भारताने खतांची आयात करावी व शेतीच्या सुधारणेची कामे करावी अशी अपेक्षा करण्यात येत आहे. जपानच्या ह्या मदतकर्जाची मुदत १५ वर्षांची असून त्यावर ५·७५ टक्के दराने व्याज आकारण्यात यावयाचे आहे.

---

## कोऑपरेटिव्ह मार्केटिंग संस्थांबाबत काही शिफारसी

कोऑपरेटिव्ह मार्केटिंग संस्थांना बळकटी आणण्यासाठी दातवाला कमिटीने आपल्या अहवालात काही शिफारसी केल्या आहेत. ह्या संस्थांना कमी मुदतीसाठी वापरावयाच्या खेळत्या भांडवलाची अडचण पडते असा अनुभव येतो. संस्थांची ही गरज भागविण्यासाठी पी. एल. ४८० करारामुळे उभा राहणाऱ्या पैशातून काही तरतूद करता येईल काय हे पाहण्याचे आवाहन कमिटीने मध्यवर्ती सरकारला केले आहे. कमिटीने आपला अहवाल नुकताच सादर केला आहे. कमिटीच्या अंदाजाप्रमाणे सर्वसामान्य प्राथमिक सहकारी मार्केटिंग सोसायटीला पुरेशी व्यापारी उलाढाल करण्यासाठी २ लाख रुपये भांडवलाची आवश्यकता असते. त्यापैकी कमीत कमी १ लाख रुपयाचे भांडवल सरकारने पुरवावे आणि बाकीचे सोसायटीने जमवावे अशी सूचना करण्यात आली आहे. प्रत्येक सहकारी मार्केटिंग सोसायटीला इतक्या भांडवलाचा पुरवठा झाला तर त्या बळकट पायावर उभ्या राहू शकतील असे कमिटीचे म्हणणे आहे. स्टेट बँकेने सरकारशी विचारविनिमय करून सोसायट्यांना योग्य तितका पैसा पुरविण्यासाठी व्यवस्था करावी अशीही एक शिफारस कमिटीने केली आहे. स्टेट बँकांना ह्या कामासाठी लागणारा पैसा रिझर्व्ह बँकेने कर्जाऊ देण्याची सोय करता आल्यास पाहावी असे सुचविण्यात आले आहे. ह्याशिवाय आणखी काही शिफारसी करण्यात आल्या आहेत. त्यात एक महत्त्वाची शिफारस अशी आहे की शेतीला बी-बियाणांचा पुरवठा करण्याचे काम सोसायट्यांनी करावे. त्याचप्रमाणे शेतकऱ्याला लागणारा रोजखपाचा मालही त्यांनी पुरवावा. ज्या ठिकाणी सहकारी संस्था चांगले काम करीत आहेत त्या ठिकाणचा खताचा पुरवठा खाजगी एजंटांनी न करता सहकारी संस्थांमार्फतच करण्यात यावा.

# खडकवासला - पानशेत धरणांच्या पुनर्बांधणीची प्रगती

महाराष्ट्र राज्य सरकारने नियुक्त केलेल्या उच्चाधिकार तंत्रज्ञ समितीने शिफारस केल्याप्रमाणे जो निर्णय घेण्यात आला त्याप्रमाणे १९६४ सालापासून सुरू झालेल्या व हल्ली चालू असलेल्या कामाचा तपशील येथे दिला आहे.

### खडकवासला धरण

खडकवासला जुन्या दगडी धरणाची वाहून गेलेली भिंत पुनः बांधून सर्व धरणाची उंची पूर्वीपेक्षा ६ फुटांनी वाढविण्याचे काम पुरे झाले आहे.

पूर्वीची विश्वेश्वरअय्या गेट्स व सांडपाण्याचा इतर भाग पाडून त्या जागी जास्त बळकट बांधकाम ५०० फूट लांबीचे बांधून त्यावर ४० × १४ अशा मापाची फिरती गेट्स बसविण्याचे ठरले. त्यापैकी खालचे बांधकाम पुरे होऊन गेट्स बसविण्याचे काम चालू आहे.

ह्या सांडीच्या पलीकडे १,००० फूट मातीचा भराव घालून १९६१ सालासारखा अचानक महापूर आल्यास बाकीचे बांधकाम शाबूत राहील अशी तजवीज केलेली आहे.

जुन्या दगडी धरणाला खालच्या बाजूने मातीचा पाण्याच्या लेव्हलपर्यंत टेकू देऊन त्यावर रस्ता करणे, हे काम चालू आहे.

### पानशेत धरण

वाहून न गेलेल्या धरणाच्या मातीचे भरावाच्या दोन्ही बाजूंचे उतार बळकट करून व पडलेल्या खिंडारानजिक जरूर तो भाग पाडून पुन्हा बळकट करण्याचे काम चालू आहे, ते १९६९ पर्यंत पुरे होईल.

डावीकडच्या वाहून गेलेल्या भागांत खडक वर असल्याने तेथे दगडी बांधकाम करून त्यांत एक पॉवर हाउसकडे जाण्यास फाटक व पाणी सोडण्यासाठी दोन लोखंडी नळ्या टाकाव्या; धरणाचे खालचे बाजूस एक पॉवर हाउस बांधून त्यात पानशेत व वरसगाव ह्या दोन्ही तलावांचे पाणी घेण्याची बोगद्यांतून सोय करावी, अशी योजना आहे. ह्यापैकी पॉवरहाउसची खोदाई पुऱ्या खोलीइतकी जाईपर्यंत पूर्वी वाहून गेलेला बोगद्याचा भाग व हल्ली ज्यातून सर्व पाणी काढून दिले आहे तो बंद करता येत नाही. १९६९ च्या पावसाळ्यापर्यंत सर्व ११००० दशलक्ष घनफुटांचा साठा पुरा होईल. त्यानंतर लगेच वरसगावच्या १३००० दशलक्ष घनफूट साठ्याच्या तलावाचे काम सुरू करण्याची तयारी करण्यात येत आहे.

---

**अॅडव्होकेट जनरलचा राजिनामा** मद्रास राज्याचे अॅडव्होकेट जनरल श्री. मोहन कुमार मंगलम् ह्यांनी आपल्या जागेचा राजिनामा दिला आहे. नव्याने अधिकारावर येणाऱ्या सरकारच्या मर्जीवर त्यांना पुन्हा नेमणे अगर न नेमणे अवलंबून आहे.

### पाकिस्तानच्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी मदत

पाकिस्तानच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील दुसऱ्या वर्षासाठी जपान ३ कोटी डॉलर्सचे कर्ज देणार आहे. ह्या संबंधीच्या करारावर टोकिओ येथे नुकत्याच सह्या करण्यात आल्या. पूर्व पाकिस्तानांत चितगांव येथे एक पोलादाचा कारखाना काढण्यासाठी आणि पूर्व पाकिस्तानांतच आणखी एका ठिकाणी खताचा कारखाना काढण्यासाठी कर्जाचा उपयोग करण्यात येणार आहे. त्याशिवाय पाकिस्तानातील मध्यम व छोट्या उद्योगधंद्यांना मदत देण्यासाठीही कर्ज वापरण्यात येईल. कर्जापैकी दोन तृतीयांश रक्कम १५ वर्षे मुदतीने देण्यात आली आहे. परंतु ही मुदत ५ वर्षे वाढविण्याची सवलत ठेवण्यात आली आहे. एक तृतीयांश रक्कम १८ वर्षाच्या मूळ मुदतीने व ५ वर्षाच्या सवलतीच्या मुदतीने देण्यात आली आहे. व्याजाचा दर ५.७५ टक्के आहे. जपानने पाकिस्तानला आतापर्यंत १६.६ कोटी डॉलर्स कर्ज दिले आहे.

---

### ब्रिटनमध्ये विद्यार्थ्यांच्या फीत वाढ

ब्रिटिश सरकारने विद्यापीठांतून व कॉलेजांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या फीत वाढ केल्यामुळे विद्यार्थिवर्गांत असंतोष पसरला आहे. फीवाढीविरुद्ध विद्यार्थ्यांनी प्रचंड निदर्शने केली आणि १० डाऊनिंग स्ट्रीट ह्या लंडनमधील पंतप्रधानांच्या निवासस्थानी जाऊन २॥ लाख सह्यांचा अर्ज दिला. फीवाढ करताना विद्यापीठांच्या अधिकाऱ्यांचा सल्ला न घेता ती ८० पौंडांवरून एकदम २५० पौंडांपर्यंत वाढविण्यात आली. अविकसित देशांतून ब्रिटनमध्ये शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना तर फीवाढ फारच जाचक होणार आहे. ह्यासंबंधी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी एका सभासदाने अशी टीका केली की, सरकारच्या ह्या धोरणामुळे अप्रगत देशांतील विद्यार्थ्यांचा ओढा रशिआ व इतर कम्युनिस्ट देश ह्यांच्याकडे वळेल.

---

### निझामाच्या तनख्यात कपात

नुकतेच पैगंबरवासी झालेले हैदराबादचे निझाम जगातील एक अतिशय धनवंत म्हणून प्रसिद्ध होते. पण आता त्यांच्या गादीवर आलेल्या त्यांच्या नातवाच्या मताने निझामसाहेब इतके श्रीमंत नाहीत असे जाहीर केले गेले आहे. नव्या निझामाचे नाव नबाब मीर बरकत अलीखान बहादुर असे आहे. सन १७१२ साली पहिल्या निझामाने स्वतंत्र राज्य स्थापन केले. गादीवर आलेले नवे निझाम ८ वे आहेत. त्यांना भारत सरकारने मान्यता दिली असून त्यांचा वार्षिक तनखा २० लाख रुपये ठरविण्यात आला आहे. दिवंगत झालेल्या निझामांचा तनखा ५० लाख रुपये होता. त्याशिवाय आंध्र सरकार त्यांना २५ लाख रुपये देत असे. १९४८ मध्ये हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाल्यावर त्यांचा सारावसुलीचा हक्क रद्द झाला. त्याच्या बदला आंध्र सरकार वरील रकम देत होते.

## वाढत्या लोकसंख्येमुळे राहणीचे मान खालावले

दिल्ली येथे आझाद स्मारक व्याख्यानमालेत बोलताना डॉ० पॉलिंग ह्या अमेरिकन शास्त्रज्ञाने भारतामधील सध्याच्या परिस्थितीचे काहीसे निराशाजनकपणे वस्तुस्थितिनिदर्शक चित्र रेखाटले आहे. डॉ० पॉलिंग ह्यांनी रसायनशास्त्राचे नोबेल पारितोषक मिळविलेले आहे. आपल्या भाषणात ते म्हणाले की, १९५० ते १९६१ ह्या काळात भारतामधील लोकसंख्या १० टक्क्यांनी वाढली आहे. त्यामुळे १८ वर्षापूर्वी लोकांची जी परिस्थिती होती त्यापेक्षाही आजची परिस्थिती अधिक खालावलेली आहे. सध्या भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नसल्याने त्याला धान्यासाठी परदेशांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे परदेशांचे दडपण भारतावर पडते. आधुनिक वैद्यकीय शोधांचा वापर करून गेल्या १२ वर्षात ५ कोटी जादा लोकांना जगविण्यात आले. त्यामुळे खाणाऱ्या तोंडांत इतकी मोठी भर पडली. ह्या कालात दर हजारी मृत्यूचे प्रमाण २७ पासून १८ पर्यंत खाली आले. दर हजारी जननाचे प्रमाण मात्र ४० इतके स्थिरच राहिले. काही थोड्या पिढ्यांतच भारताची सध्याची ५० कोटींची लोकसंख्या ४० कोटीवर आणण्यात आली पाहिजे. त्यासाठी कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम अंमलात आणला पाहिजे. सरकारतर्फे जी आकडेवारी देण्यात येते त्यावरून असे दिसते की, १९४८ ते १९६६ च्या दरम्यान हिंदी लोकांचे राहणीचे मान राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊनही अधिकच खालावले आहे. चलनवृद्धीचा हा परिणाम आहे. लोकांच्या खरेदीशक्तीत घट झालेली आहे. कारण, लष्करावरील खर्चात अलीकडे खूपच वाढ झालेली आहे. शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून भारताची लोकसंख्या ४० कोटीपर्यंत खाली आणता येणे शक्य आहे.

भारतच काय पण अमेरिका आणि ब्रिटनलाही लोकसंख्येची अंतिम मर्यादा ठरवावी लागणार आहे. कारण, ह्या देशामधील सध्याच्या लोकसंख्येला सुखी जीवनाचा लाभ करून देण्यासाठी आवश्यक असलेली नैसर्गिक संपत्ति उपलब्ध नाही. अमेरिकेत राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत असली तरीसुद्धा श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालले असून गरीब आणखीच गरीब होत आहेत. पं. नेहरूंना साम्राज्यवादाचा आणि माणसाने माणसाच्या चालविलेल्या पिळवणुकीचा तिटकारा होता. असे असले तरी भारताला दक्षिण अमेरिकेतील देशांपासून शिकण्यासारखे आहे. ह्या देशांत प्रथम काही थोडे परदेशीय भांडवल गुंतविण्यात आले. परंतु नंतर देशांतर्गत भांडवलाच्या संचयात अधिकाधिक प्रमाणात वाढ होत असलेली तेथे दिसून येते. ह्या देशांच्या भरभराटीचा फायदा इतर परदेशांनाही झालेला आहे. काही बाबतीत स्वीडन आणि नॉर्वे ह्या देशांचे उदाहरणही भारताने लक्षात ठेवण्यासारखे आहे. ह्या देशातील कायद्याप्रमाणे कोणत्याही परकीय नागरिकाला उद्योगधंद्यात मालकी हक्क संपादन करता येत नाहीत; इतकेच नाही, तर एखादा स्वीडीश अगर नॉर्वेजियन नागरिक जर कायमचा परदेशात राहणारा असेल तर त्यालासुद्धा अशी मालकी संपादन करता येत नाही. साक्षरतेचा प्रसार हा उत्पादनाच्या वाढीसाठी अत्यंत आवश्यक आहे. परंतु, भारत सरकारने साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले नाहीत. ह्या बाबतीत क्यूबाचे उदाहरण मार्गदर्शक ठरण्यासारखे आहे. कॅस्ट्रोची राजवट सुरू झाली तेव्हा त्या देशातील ४० टक्के लोकच साक्षर होते. पण नव्या राजवटीने हे प्रमाण आता ९० टक्क्यांवर आणले आहे.

---

## हिंदी मालाची परदेशांत चांगली प्रसिद्धी पाहिजे

सिमेन्स ह्या जर्मन कंपनीचे डायरेक्टर मि. हॉसमन अलीकडे भारतात येऊन गेले. जर्मनीमधील बाजारपेठेसंबंधी बोलताना ते म्हणाले की ही बाजारपेठ कोणत्याही देशाच्या मालाला खुली आहे. परदेशांच्या बाजारपेठांसंबंधी भारताने संशोधन केले पाहिजे आणि अद्ययावत पद्धतीचा नमुनेदार माल त्या पेठांतून पाठविला पाहिजे. हिंदने आपल्या मालाची अधिक चांगली प्रसिद्धी केली पाहिजे. त्यासाठी जाहिरातींच्या माध्यमाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यात आला पाहिजे. भारतामधील मजुरीचे दर हे युरोपच्या मानाने कमी असल्याचे सांगण्यात येते. पण व्यवहारात तसे आढळत नाहीत. पश्चिम युरोपात खपण्यासारखा माल तयार करण्याचे कामी पश्चिम जर्मनी हिंदी कारखानदारांशी सहकार्य करण्यास तयार आहे. हिंद व जर्मनी ह्यांच्या सहकार्याने चाललेला सिमेन्स हा सर्वात मोठा कारखाना असून त्यात ३,५५० कामगार आहेत. त्यांपैकी अवघे २४ जर्मन आहेत.

---

## शेतकऱ्यांना सधन शेतीचे शिक्षण

मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेती खात्याने शेतकऱ्यांना सधन शेतीचे सशास्त्र शिक्षण देण्यासाठी अनेक केंद्रे उभारण्याचे ठरविले आहे शेतकऱ्यांना आधुनिक सधन शेतीचे शिक्षण दिल्याखेरीज अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होणार नाही ह्याची जाणीव आता तीव्रतेने झालेली आहे. १९६७–६८ मध्ये अशा प्रकारची ५ केंद्रे निरनिराळ्या राज्यांत स्थापन करण्यात येणार आहेत. ज्या राज्यांनी एकापेक्षा अधिक पिके घेण्याच्या योजना आखल्या आहेत त्या राज्यांतून १९६८–६९ सालात अशा प्रकारची २५ केंद्रे स्थापन करण्याचा सरकारचा मानस आहे. प्रत्येक शिक्षण केंद्रासाठी ६ लाख रुपये खर्च येणार असून तो भारत सरकार करणार आहे. १९६७–६८ सालात गुजरात राज्यात दोन केंद्रांची स्थापना करण्यात येणार आहे.

---

## स्विस बँकांचे ' नंबरी ' ठेवीदार

"केवळ पैसे आहेत, म्हणून सुख मिळत नाही. पण ते स्विस बँकेत ठेवले, तर मात्र हमखास ते मिळते." अशी एक जर्मन म्हण आहे.

झुरिच ( स्वित्झरलंड ) चा आर्थिक केंद्र ह्या दृष्टीने जगात न्यूयॉर्क आणि लंडन ह्यांच्या खालोखाल अनुक्रम लागतो. तेथील बँकांत परदेशीयांच्या फार मोठ्या ठेवी असतात आणि त्या बँकांनी पैसेही जगभर गुंतविलेले असतात. स्वित्झरलंडमधील बँकिंगचा कायदा ह्याला पोषक असाच आहे. इतर देशांतील लोकांनी वाममार्गाने कमाविलेला पैसा स्विस बँकांत सुरक्षित राहतो, ह्याबद्दल अमेरिका व युरोपातील देश आता जोराच्या तक्रारी करू लागले आहेत. "आर्थिक चाचेगिरीसाठी स्वित्झरलंडचा आसरा म्हणून अधिकाधिक उपयोग केला जाऊ लागला आहे" असे लंडनच्या फिनॅन्शिअल टाइम्सने नुकतेच म्हटले आहे. स्वित्झरलंडजवळ स्वतःची नैसर्गिक संपत्ती नाही, बंदरे नाहीत, मोठी फौज नाही; तरीसुद्धा इतरांच्या पैशाची व्यवस्था ठेवून स्वित्झरलंड हा एक बलशाली देश झाला आहे.

परदेशीयांच्या ठेवींवर स्विस बँका व्याज देत नाहीत. काही ठेवींवर तर त्या द. सा. द. श. एक ह्या दराने चार्ज लावतात. स्वित्झरलंडमध्ये प्रत्येक १,३०० नागरिकांमागणिक एक बँक कचेरी आहे. स्विस बँकांची बळकटी, सुरक्षितता, गुप्तता, परंपराप्रियता, ह्याचबरोबर त्यांची नंबर दिलेली खाती ही त्यांच्या आकर्षकतेची प्रमुख कारणे आहेत. ठेवीदाराचे नाव बँकेच्या दोन किंवा तीन अधिकाऱ्यांखेरीज कुणालाही कळू शकत नाही. त्यामुळे किती तरी लबाड आणि बदमाश लोक स्विस बँकेत पैसे ठेवतात. त्याची माहिती परदेशीय पोलिसांना देण्यास स्विस बँका स्पष्ट नकार देतात.

हे ' नंबरी ' खाते उघडावयाचे झाल्यास प्रथमच किमान ७५,००० रुपये तरी ठेवावे लागतात.

खाते उघडण्यापूर्वी, ठेवीदाराने पैसे चोरून आणलेले नाहीतना, ह्याची बँका खात्री करून घेतात; कर चुकविण्याचा आपला उद्देश नसल्याचे ठेवीदार लिहून देतात. शंकास्पद ठेवीदारांच्या ठेवी घेणाऱ्याही कित्येक बँका आहेत.

परदेशी ठेवीदारांना स्वतःच्या नावाने खाते उघडता येते; त्यांना तसे नको असेल तर त्यांना ओळखीचा नंबर दिला जातो. हा नंबर म्हणजेच त्यांची सही! पत्रव्यवहार गुप्त भाषेत केला जातो आणि खास जासुदांच्या द्वारा हाताने ठेवीदाराकडे टपाल पोचविले जाते. बँकेत जाण्यासाठी खास चोरदरवाजे आहेत; शेजारच्या इमारतीतून बँकेत जाण्यासाठी भुयारातून वाटा आहेत. ठेवीदाराशी बोलणी करण्यासाठी आवाज बाहेर जाऊ शकणार नाही अशा बंदिस्त खोल्यांचा उपयोग केला जातो.

**अण्वस्त्रे व पश्चिम जर्मनी**—ज्या देशांजवळ अण्वस्त्रे नाहीत त्यांच्या सुरक्षिततेची योग्य हमी मिळाल्याखेरीज पश्चिम जर्मन सरकार अण्वस्त्रप्रसाराला आळा घालण्यासंबंधीच्या कोठल्याही करारावर सही करणार नाही असे घोषित करण्यात आले आहे. त्याशिवाय अणुविज्ञान संशोधन आणि अणुविज्ञानाचा शांततामय उपयोग ह्या बाबतीतही पश्चिम जर्मन सरकारला स्वातंत्र्य पाहिजे आहे. जिनीव्हा येथे सुरु झालेल्या निशस्त्रीकरण परिषदेला उद्देशून हे धोरण ठरविण्यात आले आहे.

**कॅनडाची भारताला मदत**—कॅनडा व भारत ह्यांनी परस्परात एक आर्थिक करार केला आहे. कराराला अनुसरून कॅनडा भारताला १ कोटी, १८ लाख, ५० हजार डॉलर्सचे बिनव्याजी कर्ज देणार आहे. कर्जाचा उपयोग करून भारताने औद्योगिक कच्च्या मालाची आयात करावयाची आहे. कॅनडाने भारताला सतत मदत करण्याचे जे धोरण स्वीकारले आहे त्याचाच भाग म्हणून हा करार झाला आहे.

**कारखान्यांना गॅसचा पुरवठा**—अंकलेश्वर येथील तेलविहिरीतून मिळणाऱ्या खनिज गॅसचा पुरवठा बडोदा म्युनिसिपल कॉर्पोरेशनला आणि इतर उद्योगधंद्यांना करण्यात येणार आहे. गॅस पुरविण्यासाठी लागणारे नळ घालण्याचे काम ह्यापूर्वीच पूर्ण करण्यात आले आहे. गॅसच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारी व त्याची मोजदाद करणारी यंत्रसामग्री परदेशांतून मागविण्यात आली आहे. तिची उभारणी झाल्यावर पुरवठा सुरू होईल.


Statement about ownership and other particulars about newspaper **'ARTHA'** to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

( See Rule 8 )

1. Place of publication **823, Shivajinagar, Poona 4**
2. Periodicity of its publication **Fortnightly**
3. Printer's name **S. V. Kale.**
   Nationality **Indian**
   Address **823, Shivajinagar, Poona 4**
4. Publisher's name **S. V. Kale**
   Nationality **Indian**
   Address **823, Shivajinagar, Poona 4**
5. Editor's name **S. V. Kale**
   Nationality **Indian**
   Address **823, Shivajinagar, Poona 4**
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital **S. V. Kale 823, Shivajinagar, Poona 4**

I, **Shripad Vaman Kale**, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date **1-3-1967**

**S V Kale**
Signature of Publisher.

### नेत्रवैद्यकासाठी संशोधन केंद्र

ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायसेन्स ह्या संस्थेतर्फे दिल्ली येथे नेत्रवैद्यकासंबंधी संशोधन करणारे एक केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. संशोधनकेंद्राला डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांचे नाव देण्यात येईल. नेत्रवैद्यांना व नेत्रवैद्यकासाठी लागणाऱ्या इतर मदतनिसांना शिक्षण देण्याचे कार्यही केंद्रांत करण्यात येणार आहे. नेत्ररोगांचे निदान करण्यासाठी आणि ते बरे करण्यासाठी लागणारी उपकरणे तयार करण्याचे काम केंद्र हाती घेणार आहे. नेत्ररोग्यांसाठी १५० खाटांचे एक इस्पितळ चालविण्यात येणार आहे. त्याशिवाय एक डोळ्यांची बँकही उघडण्यात येणार आहे. नेत्रांचे आरोग्य राखण्यासाठी कोणते उपाय करावे त्याचे प्रशिक्षण देण्याची सोय केंद्रांत करण्यात येणार आहे. अंधांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग उघडण्यात येणार आहे.


### बंगालमधील तांदळाच्या किंमती घटल्या

कलकत्त्यात सार्वत्रिक निवडणुका होण्यापूर्वी रोज खपाच्या वस्तूंच्या किंमतींनी उच्चांक गाठला होता. परंतु डाव्या गटाचे मंत्रिमंडळ अधिकारावर येण्याची चिन्हे दिसूं लागताच किंमती घसरण्यास सुरवात झाली आहे. तांदूळ, मोहरीचे तेल, वनस्पतीचे तूप, बटाटे, इत्यादींच्या किमती घसरण्याची प्रवृत्ति स्पष्टपणे दिसून येत आहे. डाव्या गटाचे मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यास ते वाढत्या किंमती रोखण्यासाठी व खाली आणण्यासाठी कडक उपाययोजना करील अशी भीती व्यापाऱ्यांना वाटत आहे. त्यामुळे ते जवळचा साठा बाजारात आणू लागले असावेत. निरनिराळया जातीच्या भाताच्या किमती मणामागे ५ रुपयांनी उतरल्या आहेत. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस बाजारभाव २० ते २२ रुपये मण होता. पण हीही किंमत सरकारने ठरविलेल्या वसुलीच्या किमतीपेक्षा अधिकच आहे.

### उत्तर व्हिएटनामला हवाई मार्गाने पुरवठा

व्हिएटनाममध्ये चालू असलेल्या युद्धात उत्तर व्हिएटनाम सरकारला चीन व रशिया मदत करीत असतात. परंतु त्या देशांचे आपसात बिनसल्यामुळे रशियाला चीनमधील खुष्कीच्या रस्त्याचे अगर रेल्वेमार्गाने लष्करी साहित्य पाठविणे अवघड जाते. पुष्कळदा पुरवठा अडवून ठेवण्यात येतो. चीनच्या प्रदेशावरून हवाई मार्गाने पुरवठा करण्यासही चीन पुरेसे सहकार्य देत नाही. त्यामुळे रशियाला समुद्रमार्गाने पुरवठा करावा लागतो. अमेरिकेने रशियन बोटी अडविण्याचे ठरविले अगर हैफाँग बंदरात सुरुंग पेरले तर हाही मार्ग बंद पडेल. अशा परिस्थितीत अगदी आवश्यक अशी माणसे आणि साहित्य भारत-ब्रह्मदेश-लाओस ह्या हवाई मार्गाने पाठविण्याचा प्रयत्न रशिया करणार आहे. भारतावरून व ब्रह्मदेशावरून वाहतूक करण्याचे हक्क रशियाला आहेतच.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –

( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

३०
वर्षांतील आमचे कार्य
आता सर्वत्र आमचीच
–निवड–
दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.
सातारा ( महाराष्ट्र )

## महागाई भत्त्याच्या वाढीचा नियोजनावर परिणाम

भारत सरकार आणि राज्यसरकारे ह्यांनी आपल्या नौकरांच्या महागाई भत्त्यांत अलीकडे वाढ केलेली आहे. त्यामुळे नियोजन समितीने चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणाऱ्या पैशासंबंधी जो अंदाज बांधला होता तो बराचसा चुकू लागला आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात वाढलेल्या महागाईभत्त्यासाठी ४२८ कोटी रुपयांची रक्कम खर्च करावी लागणार आहे. कार्यक्रमाचा मसुदा तयार करण्यात आला त्यावेळी महागाईभत्त्यात इतकी वाढ करावी लागेल अशी कल्पना लागलेली नव्हती. कार्यक्रमासाठी लागणाऱ्या पैशावर आता ह्या वाढीव महागाईभत्त्याचा ताण पडणार असल्यामुळे आर्थिक विकासाच्या कामासाठी जरूर असणारा पैसा अपुरा पडणार आहे. कार्यक्रमाचा मसुदा प्रसिद्ध झाल्यावर मध्यवर्ती सरकारने वाढीव महागाईभत्त्याची जी घोषणा केली आहे तीमुळे सरकारी तिजोरीवर १७५ कोटी रुपयांचा बोजा वाढणार आहे. त्याशिवाय १३ राज्यसरकारांनी आपआपल्या नौकरांच्या महागाईभत्त्यात वाढ केली आहे. त्यांच्यापैकी काही सरकारांनी शिक्षकांना व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नौकरांना द्यावयाच्या वाढत्या महागाईभत्त्यापैकी काही हिस्सा देण्याचे मान्य केलेले आहे. राज्यसरकारांनी स्वीकारलेल्या ह्या नव्या जबाबदारीपायी २५३ कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणाऱ्या पैशांत कपात न करता महागाईभत्त्यांच्या वाढीचा खर्च कसा उभा करावा हा प्रश्न आता नियोजन समितीपुढे उभा राहिला आहे. उत्तर प्रदेश व केरळ सरकारने राज्याच्या नौकरांच्या महागाई भत्त्याबाबत चौकशी करण्यासाठी मंडळे नेमलेली आहेत. मंडळाच्या शिफारसींनी महागाईभत्त्यांचा बोजा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

---

## सवत्या सुभ्याची पहिली पावले ?

केरळ राज्यात कम्युनिस्ट पक्षांच्या नेतृत्वाखाली संयुक्त पक्षोपक्षांचे सरकार अधिकारावर आल्यावर राज्य सरकारचा मध्यवर्ती सरकारशी संघर्ष सुरू होण्याचा संभव दिसू लागला आहे. केरळमध्ये स्वस्त धान्याच्या दुकानातून वाटल्या जाणाऱ्या तांदुळाची किंमत दर किलोग्रॅम मागे १० ते १२ पैशांनी वाढविण्यात आली आहे. केरळचे मुख्यमंत्री श्री. नंबुद्रीपाय ह्यांनी ह्या भाववाढीचे लहरी असे वर्णन केले असून ही भाववाढ म्हणजे सर्व केरळी जनतेचा अपमान आहे असे उद्गार काढले आहेत. भारतामधील सर्वच राज्यात कमीअधिक प्रमाणात तांदुळाची टंचाई आहे. दक्षिण भारतात तांदुळ हेच मुख्य अन्न असल्यामुळे टंचाई अधिक तीव्रतेने जाणवत असते. खुद्द केरळमध्ये पुरेसा तांदूळ मिळत नसल्याने आंध्रासारख्या मुबलक तांदुळ पिकविणाऱ्या राज्यातून केरळला तांदुळचा पुरवठा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. पण श्री. नंबुद्रीपाद ह्यांचे समाधान त्यामुळें झालेले दिसत नाही. अधिकार ग्रहण केल्यावर भरविण्यात आलेल्या पहिल्याच सभेत बोलताना त्यांनी भारत सरकारशी करावयाच्या लढ्याची नांदीच म्हटली आहे असे वाटते. श्री. नंबुद्रीपाद म्हणाले की केरळमधील श्रमिक लोक मेहनत करून मिरी आणि इतर पिके घेतात. ह्या पिकांच्या विक्रीमुळे येणारा पैसा मध्यवर्ती सरकार आपल्या खिशात घालते. पण केरळला पुरेसा तांदूळ मात्र देत नाही. सरकारला तांदुळ देणे जमत नसेल तर केरळीय जनतेच पैसा त्यांनी राज्यसरकारच्या स्वाधीन करावा. मग राज्यसरकार तांदुळ कोठूनही आणण्याची व्यवस्था करील. तांदुळाचा प्रश्न हा काही राज्यसरकारांच्या १३ मंत्र्यांचा अगर संयुक्त आघाडीतील ७ पक्षांचा नाही. तो सर्व केरळीय जनतेचा आहे.

---

## अन्नपदार्थ टिकविण्याच्या कारखान्यापुढील प्रश्न

ऑल इंडिया फुड प्रिझर्व्हर्स असोसिएशनची २४ वी वार्षिक परिषद हैद्राबाद येथे भरविण्यात आली होती. त्या प्रसंगी बोलतांना प्रो. एम्. एस्. थॅकर म्हणाले की अन्नपदार्थ टिकविणाऱ्या कारखान्यांनी आपल्या मालासाठी अधिक मागणी उत्पन्न केली पाहिजे. जरूर तर त्यांनी आपल्या स्वतःच्या मालकीच्या फळबागाही तयार कराव्या. अन्नपदार्थ टिकविणाऱ्या कारखान्यांनी ह्या बाबतीत जितके कार्य करण्यास पाहिजे तितके केलेले नाही. केरळमध्ये ह्या धंद्याची संघटना नीटशी झालेली नाही. केरळ राज्यात अनेक ठिकाणी माशांचा खत म्हणून उपयोग करण्यात येतो. वास्तविक मासे डबाबंद करून ज्या ठिकाणी त्यांची जरूरी असेल तिकडे पाठविण्यात आले पाहिजेत. त्यामुळे अन्नधान्यावर पडणारा ताण काही प्रमाणात कमी होईल.

---

## लघु उद्योग योजनेत फिल्म स्टुडिओ

मध्य प्रदेश सरकारचा लघु उद्योग योजनेखाली जबलपूर येथे एक फिल्म स्टुडिओ स्थापन केला जाणार आहे.

---

## जीवनावश्यक जिनसांची जगभर वाढ

जीवनाश्यक जिनसांचे बाजारभाव जगातील बहुतेक सर्व देशांत वाढले आहेत. १९६०–६५ मधील ह्या वाढीच्या सरासरीपेक्षा जास्त वाढ ६०% देशांतून झाली. १६ देशांत १०% पेक्षा जास्त बाजारभाव वाढले. दक्षिण व्हिएटनाम आणि युराग्वे येथील वाढ ६०% एवढी प्रचंड आहे. अर्जेंटिना ब्राझील आणि इंडोनेशिया येथे मात्र भाववाढीची गती कमी झाली आणि अल्जेरिया, कँबोडिया, इक्वेडोर, फिजी, सोमालिया, आणि युगांडा ह्या देशांत भाव उतरले.

---

### ताजमहालाचे आकर्षण सर्वांत मोठे

परदेशीय हौशी प्रवासी भारतात आल्यामुळे देशाला परदेशीय चलनाची प्राप्ती होते. हौशी पर्यटकांत अमेरिकन प्रवाशांचा भरणा मोठ्या प्रमाणावर असतो. भारतासारख्या प्राचीन पौर्वात्य देशांतील ऐतिहासिक स्मारके त्यांना आकर्षित करतात. त्याचबरोबर हिमालयाचे दर्शन घेण्यासाठीही ते अतिशय उत्सुक असतात. हिमालय पर्वताची भव्यता अनुभवण्यासाठी त्यांच्यातील पुष्कळजण वेळात वेळ काढून काठमांडूला जातात. तथापि ह्या सर्व ठिकाणांच्या आकर्षणापेक्षा ताजमहाल पाहण्याची उत्कंठा विशेष तीव्र असते. बऱ्याच अमेरिकन प्रवाशांच्या मनात ताजमहाल पाहाण्याचे स्वप्न खोल रुजलेले असते.

### सुकार्नोंचे अपत्य

इंडोनेशियाचे प्रेसिडेंट सुकार्नो ह्यांची पत्नी रत्नसरी देवी ही प्रसूत होऊन तिला कन्या झाली. ६५ वर्षांच्या ह्या नामधारी अध्यक्षाला काढून टाकावे किंवा कसे ह्याची इंडोनेशियन काँग्रेस चर्चा करीत होती, त्यावेळी विद्यापीठ इस्पितळात हे अपत्य जन्मले. त्याची आई ही सुकार्नोंची ४ थी पत्नी असून ती २७ वर्षांची आहे. ती पूर्वी टोकियोतील नाइट क्लबात काम करीत असे.

### चढ्या किंमतीमुळे चहाची निर्यात घटली

भारतात तयार होणाऱ्या चहाच्या किंमती चढ्या असल्यामुळे अमेरिकेला भारतामधून निर्यात होणाऱ्या चहाच्या निर्यातीत घट झाली आहे. १९६५ मध्ये भारताने २ कोटी १० लाख पौंड चहाची निर्यात केली होती. ह्या वर्षी १ कोटी ६२ लाख पौंड चहाच निर्यात करण्यात आला. अमेरिकेला निर्यात करण्यात येणाऱ्या चहात गेल्या एकदोन वर्षांत वाढ झालेली आहे. पण, ह्या वाढीबरोबर भारताच्या निर्यातीत वाढ झालेली नाही. दरम्यान सीलोनच्या निर्यातीत मात्र वाढ झालेली आहे. ह्याचा अर्थ असा की भारताच्या निर्यातीत झालेली घट सीलोनच्या चहाने भरून काढली आहे. कारण सीलोनचा चहा अमेरिकेला स्वस्त पडतो.

### घामाला अमेरिकेत बाजारपेठ

मनुष्याचा घाम एका क्वार्टला ३,२७० रु. ह्या दराने अमेरिकेत विकत घेतला जात आहे. अवकाशातील उड्डाणाचे काळात उड्डाण करणाराचा घाम व त्यात वाढणारे जंतू ह्यांपासून होणाऱ्या धोक्याचा अंदाज घेण्यासाठी ह्या घामाचा उपयोग केला जातो. घामाची दुर्गंधी घालविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दुर्गंधीनाशकांपेक्षा प्रत्यक्ष घाम १०० पट महाग आहे !


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( रजिस्टर्ड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

### प्रगतीचे बोलके आंकडे

( आंकडे कोटी रुपयांत )

| | १९६३ | १९६४ | १९६५ | १९६६ |
|---|---|---|---|---|
| वसूल भांडवल व गंगाजळी ( लाभांश निधी सोडून ) | ० ९१ | १·१३ | १·३५ | १·५१ |
| ठेवी | २९·७१ | ३६·९३ | ४४·९६ | ५५·५० |
| गुंतवणूक | १३·४० | १६·३६ | १६·३७ | १९·८४ |
| कर्जे | १४·३० | १९·१९ | २६·११ | ३५·७० |
| नक्त नफा लक्ष रुपयांत ( प्राप्तीकर दिल्यानंतरचा ) | ११·०० | १३·३८ | १६ ८८ | १८·२२ |
| भाग धारकांची संख्या | ४,६५३ | ४,८४१ | ५,००५ | ८,००० सुमारे |
| शाखा | ८९ | ९३ | १००· | ११२ |

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

शं. ल. किर्लोस्कर,
अध्यक्ष.


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ पुणे, बुधवार ५ एप्रिल, १९६७ अंक ७

## विविध माहिती

**नवे अणुशक्ती वीजकेंद्र**—न्यूयॉर्क राज्यात ऑंटेरिओ सरोवराच्या काठी अणुशक्तीवर चालणारे एक वीजकेंद्र उभारण्यात येत आहे. केंद्रासाठी लागणाऱ्या अणुभट्टीचे वजन ६५० टन आहे. १९६८ च्या उत्तरार्धात त्याची बांधणी पुरी होईल असा अंदाज आहे. केंद्रास ६ लाख किलोवॅट वीज निर्माण करता येईल आणि त्यासाठी ११५ टन युरेनिअमचे जळण लागेल. इतकी वीज निर्माण करण्यासाठी ६० लाख टन कोळसा लागला असता.

**रासायनिक खतांची आयात**— परदेशांतून रासायनिक खतांची आयात करण्यासाठी आतापर्यंत काही परदेशीय चलन मंजूर करण्यात आले आहे. त्याचा उपयोग करून १९६७-६८ सालात भारत निरनिराळ्या प्रकारची ८ लाख, ७६ हजार टन रासायनिक खते आयात करणार आहे. आयात अमेरिका, कॅनडा, पश्चिम युरोप, पूर्व जर्मनी, रशिआ, पोलंड आणि जपान ह्या देशांकडून करण्यात यावयाची आहे.

**दिल्लीत वेंकटेश्वराचे देऊळ**— दिल्लीत रामकृष्णपुरम् ह्या भागात वेंकटेश्वराचे देऊळ बांधण्यात आले आहे. देवळात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याचा समारंभ पुढील महिन्यात साजरा करण्यात येणार आहे. मूर्तीची शिल्पकृती दक्षिण भारतामधील एका प्रख्यात मूर्तिकाराकडून करवून घेण्यात आली आहे. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याच्या धार्मिक समारंभास १५ हजार रुपये खर्च येईल.

**पाव भाजण्याच्या भट्ट्या**—आधुनिक यंत्रसामग्रीच्या साह्याने चालणाऱ्या पाव भाजण्याच्या ९ भट्ट्या सार्वजनिक मालकीच्या विभागात उभारण्यात येणार आहेत. त्या दररोज ३·५ लाख पाव भाजू शकतील. प्रत्येक पाव ४०० ग्रॅम वजनाचा असेल. भट्ट्यांची यंत्रसामग्री ऑस्ट्रेलियाकडून देणगीदाखल मिळणार आहे.

**पाकिस्तानला मदत**—जागतिक बँकेने पाकिस्तानला एका मोठ्या मातीच्या धरणाच्या बांधणीसाठी १८·९ कोटी डॉलर्स कर्ज देण्यास मंजुरी दिली आहे. हे धरण आशिआतील सर्वात मोठे मातीचे धरण होईल. रावळपिंडीच्या वायव्येला सुमारे ६० मैलांवर सिंधू नदीवर ते बांधण्यात येणार आहे.

**तांदळाच्या आयातीची सवलत**—मद्रास राज्याचे मुख्यमंत्री श्री. अण्णा दुराय ब्रह्मदेशाकडून तांदूळ आयात करण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारकडे मागणार आहेत. ब्रह्मदेशाने भारतात परत पाठविलेले बहुतेक नागरिक तामीळनाडमधील आहेत. त्यांना ब्रह्मदेशाकडून नुकसानभरपाई मिळावयाची आहे. नुकसानभरपाईच्या रकमेच्या बदली तांदूळ मागविण्यात यावा अशी सूचना त्यातील काही लोकांनी केली आहे.

**पाकिस्तानची भारताला विनंती**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा समितीवर लवकरच एक जागा रिकामी होणार आहे. ह्या जागेसाठी निवडणूक लढविण्याचा पाकिस्तानचा विचार असून भारताने आपणास पाठिंबा द्यावा अशी विनंती पाकिस्तानने केली आहे. निवडणूक चालू वर्षअखेर होईल. सर्व उमेदवारांची नावे कळल्याशिवाय भारत कोणताच निर्णय घेणार नाही, आणि तोही निवडणूक जवळ आल्यावर घेईल.

**गिरण्या चालविण्यासाठी कॉर्पोरेशन**—खासगी मालकीच्या ज्या कापडगिरण्या चालविण्यासाठी भारत सरकारने ताब्यात घेतल्या आहेत त्यांचा कारभार हाकण्यासाठी एक स्वतंत्र कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा विचार चालू आहे. आर्थिकदृष्ट्या तोट्यात असलेल्या २३ गिरण्या सरकारने ताब्यात घेतलेल्या आहेत. त्यांपैकी काही आता किफायतशीर रीतीने चालू आहेत. पण, त्या खाजगी मालकांना पुन्हा देण्याचा सरकारचा विचार नाही.

## मॉंट्रील येथे भरणारे अभिनव प्रदर्शन

कॅनडामधील मॉंट्रील येथे एप्रिलच्या २८ तारखेस एका अभिनव आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. प्रदर्शनाचा विषय 'मनुष्य आणि त्याच्या भोवतालचे जग' असा ठरविण्यात आलेला आहे. प्रदर्शनात ७० देश भाग घेणार असून ते आपआपल्या दृष्टिकोनातून स्वतंत्रपणे विषयाची मांडणी करणार आहेत. विषयाचे आणखी विभाग पाडण्यात आले आहेत. त्यांत मनुष्याच्या नवनिर्मितीक्षमतेविषयी एक विभाग आहे. शिवाय उत्पादक व उपभोक्ता ह्या नात्यानेही मनुष्याचे चित्र रेखाटण्यात येणार आहे. सदर प्रदर्शनात भारताने सहभागी होण्याचे ठरविले आहे. न्यूयॉर्क येथील जागतिक प्रदर्शनात भारताचे जेवढे दालन होते त्याच्या दुपटीने मोठे दालन ह्या प्रदर्शनात भारत उघडणार आहे. त्याच्या उभारणीसाठी ३ कोटी रुपये खर्च येणार आहे. प्रदर्शनाची मुदत ६ महिन्यांची आहे. ह्या अवधीत कॅनडा, अमेरिका, युरोप आणि इतर भागांतून निदान ३ कोटी प्रेक्षक प्रदर्शन पाहण्यासाठी येतील असा अंदाज आहे. हिंदी दालनात भारतीय संस्कृतीची विविधता आणि वैभव पाहण्यास सापडेल. त्याचप्रमाणे नियोजित अर्थव्यवस्थेच्या आधाराने भारताने केलेल्या प्रगतीचे दर्शनही तेथे घडेल. त्याशिवाय भारताच्या निर्यात व्यापारातील परंपरागत माल, निर्यातीसाठी उपलब्ध होऊ शकणारा संभाव्य नवा माल, शास्त्रीय प्रगती आणि औद्योगिक यंत्रसामग्री ह्यांची कथा सांगणारा एक विभाग प्रदर्शनात असेल. दालनाच्या उभारणीसाठी भारतामधील संगमरवरी दगड व निरनिराळ्या प्रकारचे लाकूड ह्यांचा उपयोग करण्यात येणार आहे.

---

## चलनवाढीविरुद्ध तातडीची उपाययोजना हवी

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य मुंबई येथे एका प्रसंगी बोलताना म्हणाले की भारताची सध्याची आर्थिक परिस्थिती अडचणीची आहे. ह्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली महत्त्वाची गोष्ट चलनवाढीचे संपूर्णतया निर्मूलन करणे ही आहे. देशाच्या परदेशीय चलनाच्या साठ्यावर अलीकडे अतिशय ताण पडलेला आहे. तो कमी करण्यासाठी निर्यातीची वाढ करणे ही दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे. चलनवृद्धीविरुद्ध ताबडतोबीचा उपाय म्हणून मागणीचा प्रचंड दाब कमी करण्यात आला पाहिजे. त्याचबरोबर खर्चात आणि भांडवलगुंतवणुकीतही कपात करण्यात आली पाहिजे. सार्वजनिक आणि खाजगी मालकीच्या विभागात हे धोरण अवलंबण्यात आले पाहिजे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचा उपयोग करून मोकळे उत्पन्न कमी करण्यात आले पाहिजे आणि बहुसंख्य लोकांकडून पैसा जमविण्यात आला पाहिजे.

## घटस्फोट अवघड करण्याचा प्रयत्न

सर्व सुसंस्कृत समाजाच्या जीवनात विवाहसंस्थेवर आधारलेल्या कुटुंबसंस्थेला महत्त्वाचे स्थान असते. कारण, सामान्यतः असे आढळून येते की सुस्थिर कुटुंबसंस्था सामाजिक स्वास्थ्याला पोषक असते. तथापि, काही अपवादात्मक परिस्थितीत विवाहाची बंधने तोडण्यास समाजालाही मान्यता द्यावी लागते. अशा उच्छेद झालेल्या विवाहांची संख्या वाढत गेली तर कौटुंबिक जीवन उध्वस्त होऊन भावी पिढ्यांचे व पर्यायाने देशाचेही नुकसान होते. भारतात अजूनही घटस्फोट ही घटना अल्प प्रमाणात घडून येते. पाश्चात्त्य समाजात मात्र वेगळी परिस्थिती आहे. उद्योगप्रधान देशांतून स्त्री-पुरुषांची समता व्यावहारिकदृष्ट्या मान्य झालेली असते. रशियासारख्या समाजवादी देशातील घटस्फोटाची संख्या अलीकडे वाढू लागली आहे. त्यामुळे तेथील समाजधुरीण काहीसे अस्वस्थ झाल्याचे दिसते. घटस्फोटांची संख्या कमी करण्यासाठी रशियात एक नवा प्रयोग करून पाहण्यात येत आहे. रशियात विवाहबद्ध होण्यासाठी वधूवरांना सरकारी परवाना घ्यावा लागतो. नव्या रशियन प्रयोगात परवान्याची मागणी करण्यात आल्यापासून विवाहेच्छूंना सहा महिनेपर्यंत थांबावे लागते. त्यामुळे विवाह अर्थातच लांबणीवर पडतो व लग्नाच्या बेडीत अडकवून घेण्यासाठी आतुर झालेल्या तरुणतरुणींना अनिच्छेने का होईना पण एकमेकांच्या अनुरूपतेविषयी आणि गुणावगुणाविषयी थंड डोक्याने विचार करण्याची संधी मिळते. रशियात ज्या मर्यादित क्षेत्रात हा प्रयोग करण्यात आला, तेथील घटस्फोटांची संख्या उतरणीला लागल्याचे आढळून आले आहे. आता हा प्रयोग दोन मोठ्या शहरांतूनही करण्यात येणार आहे.

---

## पॅरिसमध्येही उंदरांचा उच्छाद आहेच

आशिया, आफ्रिका खंडांतील मागासलेल्या देशांत उंदीर, घुशीसारख्या प्राण्यांना मोकळे रान असावे ह्यात आश्चर्य नाही. भारतात ह्या व इतर प्राण्यांच्या भक्ष्यस्थानी कितीतरी अन्नपदार्थ पडतात. त्यांचा नायनाट करणेही शक्य होत नाही. पॅरिससारख्या सौंदर्यनगरीतही उंदरांनी धुमाकूळ घालावा ही मात्र आश्चर्यकारक घटना म्हणावी लागेल. पॅरिसमधील एका कुटुंबाला उंदरांविरुद्ध पोलिसांचे संरक्षण घ्यावे लागले. ह्या कुटुंबाच्या बिऱ्हाडावर भुयारी गटारांतून बाहेर पडलेल्या उंदरांनी अक्षरशः हल्लाच चढविला. अखेर पोलिसांची मदत घेऊन बिऱ्हाडातील लोक बाहेर पडले. भुयारी उंदरांचा नाश करण्यासाठी अनेक प्रकारच्या जालीम विषांचा उपयोग करूनही पॅरिसमधील उंदीर त्याला पुरून उरले आहेत.

---

# अर्थ

बुधवार, ५ एप्रिल, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आयात परवान्यांचा अपुरा फायदा घेतला

रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यानंतर भारत सरकारने आयातीबद्दल सढळ धोरण स्वीकारले. त्यामुळे औद्योगिक उत्पादनाचा वेग वाढेल अशी अपेक्षा होती; परंतु तसे घडून आलेले नाही. गेल्या जुलै महिन्यापासून ६५० कोटी रुपये किमतीचा औद्योगिकदृष्ट्या उपयुक्त असलेला माल आयात करण्याचे परवाने देण्यात आले होते. परंतु त्यापैकी निम्मे परवाने परत करण्यात आले आहेत अगर त्यांचा उपयोगच करण्यात आलेला नाही. परवान्यांचा उपयोग करून औद्योगिक संघटना कच्चा माल व जरूर ती बदली यंत्रसामग्री व साधने आयात करतील असा सरकारचा कयास होता. भारत-मदत मित्र संघाने निर्बंधरहित द्रव्यसाह्य देण्याचे आश्वासन दिल्यामुळे तर औद्योगिक उत्पादनासाठी आवश्यक असणारी आयात वाढेलच असा विश्वास वाटू लागला होता. पण तो आता फोल ठरला. भारतामधील औद्योगिक वाढ अपेक्षेपेक्षा फारच कमी होत असल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. औद्योगिक वाढीचा वेग ४ टक्क्यांपेक्षा अधिक असण्याची शक्यता दिसत नाही. अनेक कारणांनी औद्योगिक वाढ मंदावली आहे. पण, रुपयांची टंचाई, आयातीच्या वाढलेल्या किमती आणि एंजिनिअरिंगच्या धंद्यात आलेली मंदी ही कारणे प्रमुख आहेत. आयात मालाच्या किमती वाढण्यात अवमूल्यनाचा बराच वाटा आहे. अवमूल्यनामुळे जरुरीच्या औद्योगिक आयात मालाच्या किमती एकदम ५७.५ टक्क्यांनी वाढल्या. निर्बंधरहित परदेशीय मदत, (ही मदत देणाऱ्या देशांतून माल विकत घेण्यासाठीच वापरावयाची असते.) अशी बहुतेक मदत अमेरिकेकडून मिळालेली आहे. खुद्द अमेरिकेतच मालाच्या किमती ३० ते ४० टक्क्यांनी वाढल्यामुळे भारताला औद्योगिक आयातीसाठी १०० टक्के अधिक किमती द्याव्या लागत आहेत.

## अवमूल्यनामुळे कर्जाचा भार वाढला

१९५०-५१ मध्ये भारत सरकारला एकूण २,०५४ कोटी रुपयांचे कर्ज होते, ते १९६५-६६ मध्ये ८,००९ कोटी रु. झाले आणि १९६६-६७ मध्ये त्याची रक्कम १०,८४१ कोटी रु. झाली. भारताने परदेशाकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम आता ४,६२३ कोटी रु. झाली आहे; अंतर्गत कर्ज १,२१८ कोटी रु. आहे. गेल्या वर्षीच्या मानाने परदेशांचे देणे २,०३३ कोटी रुपयांनी वाढले आहे. त्याचे मुख्य कारण रुपयाचे अवमूल्यन, हे होय. पी. एल्. ४८० खालील कर्जे वगळून बाकी सर्व कर्जाची रक्कम ६ जून, १९६६ रोजी रुपयाच्या अवमूल्यनामुळे आपोआपच ५७.५%नी वाढली. कर्जाची रक्कम वाढली, म्हणजे त्यावर रुपयांच्या स्वरूपात द्यावे लागणारे व्याजही वाढणार, हे उघड आहे.

भारताचे प्रमुख परदेशी सावकार आणि त्यांना भारताचे असलेले कर्ज, ह्यांचा तपशील येथे दिला आहे. —

| सावकार | कर्जे ( कोटी रु. ) |
|---|---|
| अमेरिका | १,४१६ |
| यु. स्टे. इंपोर्ट-एक्सपोर्ट बँक | १५३ |
| पी. एल्. ४८० खालील कर्जे | ८७८ |
| ग्रेट ब्रिटन | ४८२ |
| रशिया | ३६५ |
| प. जर्मनी | ३४६ |
| जपान | १२२ |
| जागतिक बँक | २७४ |
| इं. डे. असोसिएशन | ४१६ |

## टेलिव्हिजनच्या सेट्सच्या उत्पादनाची योजना

पिलानी येथील सेंट्रल इलेक्ट्रॉनिक्स रिचर्स इंस्टिटयूटच्या तांत्रिक सहकार्याने भारतात टेलिव्हिजनचे सेट्स उत्पादन करण्यास प्रारंभ होणार आहे. संस्थेच्या संशोधन विभागाने ह्या बाबतीत मिळविलेल्या तंत्रज्ञानाचा उत्पादनात चांगला उपयोग करता येईल आणि व्यापारी सेट्चे उत्पादन होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. १९६८ च्या सुमारास प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात होईल. दरसाल ३० हजार सेट्स उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. ह्याशिवाय दोन खाजगी मालकीच्या कंपन्यांनाही सेट्सचे उत्पादन करण्याचा परवाना देण्यात आला आहे. ह्या कंपन्या दरसाल प्रत्येकी दहा हजार सेट्स तयार करतील. खाजगी कंपन्यांसाठी लागणारी यंत्रसामग्री आयात करून उभारण्यात आल्यावर ९ महिन्यांत उत्पादनास प्रारंभ करण्यात येईल. शिवाय छोट्या उद्योगधंद्यांच्यामार्फत १० हजार सेट्स निर्माण करण्यात येतील.

## अमेरिकन बँकांनी व्याजाचा दर उतरविला

प्रेसिडेंट जॉन्सन ह्यांनी सुचविल्याप्रमाणे सात प्रमुख अमेरिकन बँकांनी आपला कर्जावरील व्याजाचा दर ५¾ आणि ६% चा ५½% केला आहे.

## ठेवी स्वीकारण्यावरील रिझर्व्ह बँकेचे निर्बंध

"ठेवीदारांचे हितसंबंधाची जपणूक रिझर्व्ह बँकेने अवश्य केली पाहिजे ह्याबद्दल दुमत नाही. परंतु जपणूक करण्याचे दृष्टीने अवलंबिलेला मार्ग मात्र कितपत योग्य आहे, हा प्रश्न आहे. ठेवी स्वीकारणाऱ्या कंपन्यांचे हिशेबाची काटेकोर छाननी करून फक्त मुनाफ्यात चालणाऱ्या, हिस्सेदारास सतत डिव्हिडंड वाटणाऱ्या, ठेवीदारांची रक्कम परत करण्याची पात्रता असणाऱ्या, भरपूर प्रवाही निधी बाळगणाऱ्या कंपन्यांना ठेवी स्वीकारण्याचा परवाना देणे व ठेवीदारास द्यावयाचे व्याजाचे दरावर निर्बंध घालणे की ज्यामुळे अयोग्य स्पर्धा होऊ नये, अशा प्रकारची बंधने ही जास्त सयुक्तिक व हितकारक आहेत; भाग भांडवलाचे काही प्रमाणातच फक्त ठेवी स्वीकारण्याची परवानगी देणे किंवा ठेवींच्या मुदतीवर बंधने घालणे हा मार्ग नव्हे. ठेवी स्वीकारून कर्जविषयक व गुंतवणूकविषयक कारभार करणाऱ्या कंपन्यांनी बँकिंग कंपनीचे पूरक कार्य केलेले आहे व त्या समाजहितोपयोगी काम करीत आहेत. सरकारी अल्पबचत योजना अगर बँकांशी स्पर्धा करण्याची आमची इच्छा नाही. समाजाची आर्थिक घडीच विस्कळीत झाली आहे. औद्योगीकरणाच्या व उत्पादनवाढीच्या योजनांना लागणारा पैसा पुरेशा प्रमाणात खाजगी क्षेत्रातील कारखानदार कंपन्यांना बँका किंवा इतर सरकारी संस्थातून उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून उत्पादक व धंदेवाईक कंपन्या जनतेकडून बँकांपेक्षा जास्त व्याजाचे दराने ठेवी आकृष्ट करीत आहेत. सर्व जाचक नियंत्रणे व मक्तेदारी नाहीशी करून सर्व क्षेत्रांत निरोगी स्पर्धा राखल्यास उत्पादनवाढ होऊन आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल, ह्यांत संदेह नाही. लहान कंपन्या निव्वळ खेळत्या भांडवलाच्या आकारमानाने लहान आहेत म्हणून आर्थिकदृष्ट्या कमकुवत व निकृष्ट दर्ज्याच्या, हा कसोटीचा निष्कर्ष मुळातच चुकीचा आहे. कंपन्यांनी घेतलेल्या ठेवींच्या व इतर जबाबदाऱ्या पार पाडण्याचा त्यांनी चालविलेल्या कारभारात मगदूर आहे किंवा नाही ही मुख्य कसोटी असावयास पाहिजे." — हिंद फिनॅन्स इंडस्ट्रीज अँड इनव्हेस्टमेंट लि., नागपूर, च्या १५ व्या वार्षिक साधारण सभेत मॅनेजिंग डायरेक्टर श्री. गो. रा औती ह्यांचे भाषण.

## इमारतीखालील जमिनीच्या किमतीवर घसारा काढता येणार नाही

"इन्कम टॅक्स कायद्यातील घसाऱ्यासंबंधीच्या तरतुदींचा उद्देश धंद्याची करपात्र प्राप्ती ठरविणे हा असतो. जमीन झिजत नाही आणि तिच्या घसाऱ्यास मान्यता दिली तर खऱ्या प्राप्तीची रकम निघणार नाही. शब्दकोशातील अर्थाप्रमाणे 'झीज, दर्जा कमी होणे, जुनीपुराणी होणे, इत्यादी कारणांमुळे मालमत्तेची किंमत कमी होते, आणि त्याची तरतूद केली जाते, तिला घसारा म्हणतात.' ह्या अर्थाने, जमीन घसारा पावत नाही."—पंजाब हायकोर्टाचा ताजा निर्णय.

## लिपझिग प्रदर्शनात भारताचे प्रेक्षणीय दालन

लिपझिग येथे भरविण्यात आलेले औद्योगिक प्रदर्शन म्हणजे एक मोठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठच म्हणावी लागेल. ह्या प्रदर्शनात सर्व जगातून आलेला विविध प्रकारचा माल पाहण्यास मिळतो आणि व्यापारी सौदे करण्याची संधीही मिळते. प्रदर्शनाचा विस्तार ३ लाख ५५ हजार चौरस मीटरवर पसरलेला असून त्यापैकी १ लाख २२ हजार चौरस मीटर जागा परदेशांच्या दालनांनी व्यापलेली आहे. त्यापैकी ४० हजार चौरस मीटर जागा ९ समाजवादी देशांनी, ३४ हजार चौरस मीटर पश्चिम जर्मनीने आणि ४१ हजार चौरस मीटर इतर भांडवलदारी देशांनी व्यापलेली आहे. ३० अविकसित देशांनी मिळून ७ हजार चौरस मीटर जागा घेतली आहे. ह्या देशांच्या दालनात भारताचे दालन सर्वात मोठे म्हणजे १ हजार चौरस मीटर आहे. आपल्या औद्योगिक प्रगतीची जगाला कल्पना देण्यासाठी भारताने केलेला हा एक मोठा प्रयत्न आहे. भारतामधील २०० कंपन्यांनी प्रदर्शनात आपापला माल मांडलेला आहे. भारताच्या दालनापैकी ७० टक्के जागा बिगर–औद्योगिक मालाला देण्यात आली आहे. भारताच्या दालनात जीप गाड्या, मोटारींचे सुटे भाग, घरसामान, कापड, अन्नपदार्थ, इत्यादी अनेक प्रकारचा माल आहे. ह्या दालनाकडे अनेक लोक आकृष्ट होत आहेत. भारत हा देश मुख्यत: कच्च्या मालाची निर्यात करणारा आहे, हा समज अजूनही परदेशात रूढ आहे. परंतु, प्रदर्शनातील मालाच्या देखाव्यामुळे तो दूर होण्यास बरीच मदत होत आहे. मालाचा खप होण्याच्या दृष्टीने प्रदर्शनाचा कितपत उपयोग होईल ते आजच सांगता येणार नाही. गेल्या वर्षी भरलेल्या प्रदर्शनाचे वेळी भारताने २·४ कोटी रुपये किमतीच्या मालाची विक्री केली होती. ह्या वर्षी त्यापेक्षा अधिक विक्री होण्याची शक्यता आहे.

## पश्चिम रेल्वेच्या मार्गाचे विद्युतीकरण

पश्चिम रेल्वेवरील मुंबई ते अहमदाबाद ह्या मार्गाचे विद्युतीकरण करण्याची योजना आखण्यात आली आहे. सध्या विरारपर्यंत विजेची एंजिने वापरता येण्याची सोय आहे. विरारपासून अहमदाबादपर्यंतचे अंतर ४५२ किलोमीटर आहे. ह्या अंतराची विद्युतीकरणाच्या दृष्टीने पाहणी करण्याचे काम पुढील १२ महिन्यांत हाती घेण्यात येणार आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात ह्या मार्गाचे विद्युतीकरण पूर्ण करण्यात येईल. पश्चिम रेल्वेवरील वाफेच्या एंजिनांच्या जागी डिझेल तेलावर अगर विजेवर चालणारी एंजिने वापरण्यात येणार आहेत. काही मालगाड्या आता डिझेलच्या एंजिनाने ओढण्यात येऊ लागल्या आहेत. मुंबईतील तेलशुद्धीच्या कारखान्यांना अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्यासाठी ३ खास गाड्या सोडण्यात येणार आहेत.

## साखरकारखान्यांना उसाचा अपुरा पुरवठा

साखरकारखान्यांना लागणारा उसाचा पुरवठा अपुरा होत असल्याच्या वार्ता अलीकडे आल्या आहेत. कारखान्यांना ऊस देऊन मिळणाऱ्या नफ्यापेक्षा त्याच उसाचा गूळ केल्यास सध्यातरी अधिक नफा सुटत असल्यामुळे शेतकरी तिकडे वळला आहे. त्यामुळे साखरकारखान्यांपुढे अडचणीची परिस्थिती उत्पन्न होत आहे. ह्यासंबंधी आंध्र राज्याच्या शेतीमंत्र्यांनी भारत सरकारला अशी सूचना केली आहे की, सध्या साखरेच्या प्रत्येक पोत्यामागे जो अबकारी कर घेण्यात येतो त्यात कपात करण्यात यावी. सध्या दर पोत्यामागे ३२ रुपये अबकारी कर घेण्यात येतो. ह्या करात २० ते २५ रुपये सूट देण्यात आली तर साखरकारखान्यांना उसाला अधिक किंमत देणे परवडेल, आणि त्यामुळे उसाचा पुरवठा करून घेता येईल असे त्यांचे मत आहे. आंध्र राज्यातील कारखान्यांसंबंधी माहिती देताना ते म्हणाले की राज्यांत १९ साखरकारखाने आहेत; आणि त्यांचे एकूण उत्पादन ३ लाख टनांच्या जवळपास आहे. चालू हंगामात मात्र उसाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे फक्त २ लाख टन साखरेचे उत्पादन होण्याची शक्यता आहे. आंध्र राज्यातील परिस्थितीच थोड्याबहुत फरकाने इतर राज्यांतही आहे. इतर राज्यांतूनही साखरकारखान्यांना पुरेसा ऊस मिळविणे कठीण होत चालले आहे. साखरेच्या उत्पादनाबाबतीत बिहार आणि उत्तर प्रदेश ही राज्ये आघाडीवर आहेत. परंतु त्या दोन्ही राज्यांत अवर्षणजन्य दुष्काळ पडला आहे. परिणामी तेथील साखरेच्या उत्पादनात बरीच घट होण्याचा संभव उघड दिसत आहे. त्यातून अलीकडे काही साखर कारखान्यांनी अधिक ऊस गाळण्यासाठी विस्तारयोजना हाती घेतल्या आहेत. त्यांतील काही पुऱ्याही झाल्या आहेत. म्हणजे, साखरकारखान्यांची उसाची गरज वाढली आहे आणि त्याच वेळी पुरवठा मात्र अनिश्चित झालेला आहे.

---

## विमेदारांच्या संघटनेच्या मागण्या

कलकत्ता येथे आयुर्विम्याच्या पॉलिसीसंबंधी संशोधन करणारी व विमेदारांना मार्गदर्शन करून सल्ला देणारी एक संस्था आहे. विमेदार हा सामान्यपणे असंघटित असतो. त्यामुळे विमापत्रकासंबंधी त्याच्या अडचणींची दाद लागणे कठीण जाते. संघटनेचे चिटणीस श्री. दासगुप्ता ह्यांनी अशी तक्रार केली आहे की, विमा उतरताना विमेदाराच्या माहितीचे जे पत्रक भरून घेण्यात येते ते सदोष असल्याच्या कारणावरून आयुर्विमा कॉर्पोरेशन पॉलिसीवर आधारलेल्या हक्कासबंधी वाद निर्माण करते. म्हणून विमेदारांची माहिती घेताना ती अशा रीतीने नमूद करण्यात यावी की, भविष्यकालात विमापत्रकासंबंधी कोणतीही शंका उपस्थित होऊ नये. विमापत्रकातील रकमेची पैशाच्या बदलत्या किमतीशी सांगड घालण्यात यावी, अशीही सूचना त्यांनी केली आहे.

## टेलिफोनची सामग्री निर्माण करण्याचा नवा कारखाना

औद्योगीकरणाची वाटचाल करीत असलेल्या देशात दळणवळणाच्या जलद साधनांना फार मोठे महत्त्व प्राप्त होणे साहजिक असते. टेलिफोनचे साधन वापरून त्वरित निर्णय घेणे किती सोपे जाते ते सर्वपरिचितच आहे. बंगलोर येथील इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज हा कारखाना टेलिफोन व त्याला लागणारी इतर सामग्री निर्माण करीत असतो. पण, ह्या कारखान्याचे उत्पादन वाढत्या मागणीला अपुरे पडत आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत तर मागणी अधिकच वाढत जाणार असल्यामुळे टेलिफोनची सामग्री तयार करणारा आणखी एक कारखाना काढण्यात येणार आहे. बंगलोर येथील कारखान्यात सुमारे ३० कोटी रुपयांचे साहित्य तयार होईल, असा अंदाज आहे. परंतु मागणी ५६ कोटी रुपये किमतीच्या सामग्रीची आहे. नवा कारखाना उभारून मागणी आणि पुरवठ्यामधील तफावत भरून काढण्यात येणार आहे. नव्या कारखान्यात पहिल्या पाच वर्षांत सुमारे १३.५ कोटी रुपयांची यंत्रसामग्री निर्माण करण्यात येईल. त्यानंतर कारखान्याचे उत्पादन दरसाल १५ टक्के प्रमाणे पाच वर्षेपर्यंत वाढविण्यात येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत बंगलोरच्या कारखान्याने एकूण ९.६१ कोटी रुपये किमतीचा माल निर्माण केला. ह्या कारखान्यात मुख्यतः दूर अंतरावरील टेलिफोनसाठी लागणारी सामग्री बनविण्यात येते. नव्या संकल्पित कारखान्याच्या उभारणीसाठी अंदाजे २४ कोटी रुपये भांडवली खर्च करावा लागेल. त्यापैकी ६४ लाख रुपयांचा खर्च परदेशीय चलनाच्या रूपात करावा लागणार आहे.

---

## नॅट लढाऊ विमानांचे उत्पादन

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. ह्या कारखान्यात आता नॅट लढाऊ विमानांचे उत्पादन पूर्ण वेगाने चालू झाले आहे. १९६६-६७ सालात कारखान्याने हिंदी विमानदलाला काही नवीन नॅट विमाने पुरविली. १९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत झालेल्या संघर्षात ह्या विमानांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ह्याच कारखान्यात जेटवर चालणारी लढाऊ विमाने देशातील साधनसामग्रीचा उपयोग करून बनविण्यात येणार आहेत. कारखान्यात मिग विमानांच्या उत्पादनास प्रारंभ करण्यात आला आहे. अशी काही लढाऊ विमानेही हिंदी विमानदलाला पुरविण्यात आली आहेत. १९६७–६८ सालात हेलिकॉप्टर्सचे उत्पादन हाती घेण्यात येणार आहे. सध्या त्यांच्या जुळणीचे काम सुरू झाले आहे.

---

## १४,५०० चौ. मैल मुलूख गमावला

चीनने भारतावर आक्रमण करून १४,५०० चौरस मैल एवढा लदाखचा भारतीय मुलूख आत्मसात केला आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्री श्री. छगला ह्यांनी राज्यसभेत सांगितली.

### एंजिनांचे सुटे भाग तयार करण्यात विलंब

रेल्वे खात्यासंबंधीचा ऑडिट रिपोर्ट लोकसभेला सादर करण्यात आला आहे. भारतात विजेची आणि डिझेल तेलावर चालणारी रेल्वे एंजिने तयार करण्यात येतात. परंतु त्यांतील सर्वच्या सर्व भाग अद्याप कारखान्यांतून तयार करता येत नाहीत. चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनाच्या कारखान्यात विजेची एंजिने तयार करण्यासाठी एका परदेशी कंपनीशी १९६२ साली करार करण्यात आला आहे. करार झाल्यापासून ५ ते ६ वर्षांच्या अवधीत ९० ते १०० टक्के भाग देशातील साधनसंपत्तीचा उपयोग करुन तयार करण्यात यावे असे ठरविण्यात आले होते. पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. एंजिनांचे भाग तयार करण्यास लागलेल्या विलंबामुळे मार्च १९६६ अखेर ३.२१ कोटी रुपयांचे परदेशी चलन ह्या भागांच्या आयातीसाठी खर्च करावे लागले. डिझेल एंजिनांतील देशी भागांचे प्रमाण तर ऑगस्ट १९६६ अखेर अवघे २९ टक्के होते.

---

### तांब्याच्या उत्पादनासाठी कंपनीची स्थापना

तांब्याच्या उत्पादनाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी हिंदुस्थान कॉपर लि. ह्या नावाच्या कंपनीची स्थापना करण्यात येणार आहे. भारतामधील सार्वजनिक मालकीच्या तांब्याच्या खाणींची सर्व व्यवस्था ह्या कंपनीकडे सोपविण्यात येणार आहे. राजस्थानमधील खेत्री, बिहारमधील राखा आणि आंध्रमधील अग्निगुंडला ह्या ठिकाणी तांब्याच्या खाणी सापडल्या आहेत. त्यांपैकी खेत्री येथील तांब्याच्या खाणीमधून दरसाल ३२ हजार टन तांबे निर्माण करता येईल. शिवाय खाण चालविताना रासायनिक खते आणि इतर काही उपपदार्थही निर्माण करता येतील. खेत्री येथील खाण उत्पादनक्षम करण्यासाठी सुमारे ७९ कोटी रुपये भांडवली खर्च करावा लागेल. प्रत्यक्ष उत्पादनास १९६९-७० साली प्रारंभ होईल. इतर दोन्ही ठिकाणच्या खाणींची अद्याप प्राथमिक पाहणी चालू आहे. तरी तेथे लवकरच तांब्याच्या प्रायोगिक उत्पादनास सुरुवात करण्यात येईल.

---

### बिहारमधील किमती उतरू लागल्या

बिहारमधील दुष्काळामुळे तेथील जीवनावश्यक वस्तूंच्या किमती चढत चालल्या होत्या. परंतु गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बिहारमधील काँग्रेस पक्षाचा पराभव झाल्यावर तेथे काँग्रेसेतर पक्षांचे संयुक्त सरकार अधिकारावर आले आहे. नव्या सरकारच्या धोरणाचा धसका राज्यातील घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांनी घेतलेला दिसतो. फेब्रुवारीच्या मध्याच्या सुमारास बिहार राज्यात तांदळाची क्विंटलची घाऊक किंमत सुमारे १८० रुपये होती, ती मार्चच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत १६७ रुपयांपर्यंत खाली आली. पाटण्यात तांदळाची किरकोळीतील किंमत क्विंटलमागे २५ रुपयांनी घसरली. मोहरीच्या तेलाचे भावही उतरले आहेत.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.





**धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...** परंतु

**किर्लोस्कर डिझेल एंजिन वापरण्यानें धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहींत...**

बहुधा, प्रत्येक शेत शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो. शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळे संपादन केला आहे. बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.



किर्लोस्कर

डिझेल एंन्जिन्स

२ ते १५ हॉर्स पॉवर

**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,**

एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

TOM & BAY KO:467-A MAR

## बँकिंगच्या धंद्यापुढील समस्या

### श्री. शंतनुराव किर्लोस्कर, चेअरमन, बँक ऑफ महाराष्ट्र लि., ह्यांचे सुस्पष्ट विवेचन

बँकिंगच्या धंद्याच्या क्षेत्राचा विचार केल्यास सध्याचे वातावरण विश्वासजनक नाही. पाश्चात्त्य व इतर देशातही बँकांपुढे अडचणी व समस्या उभ्या आहेत, यात शंका नाही. आपल्या देशातील बँकांपुढे काहीच प्रश्न नसावेत असे मला तिळमात्रसुद्धा म्हणावयाचे नाही; परंतु व्यवसायाच्या भवितव्याविषयी आपल्या देशातील बँकांना सध्या भविष्यकालातील अनिश्चिततेबद्दल सर्वगामी भावनेने पछाडलेले आहे. राष्ट्रीयीकरणाच्या धाकाची तलवार त्यांच्या डोक्यावर सारखीच टांगलेली आहे. राष्ट्रीयीकरणाच्या विरुद्ध असलेल्यांनी अगदी मुद्देसूद व बिनतोड युक्तिवाद जरी केलेला असला तरीसुद्धा राष्ट्रीयीकरण केव्हा केले जाईल याचा भरवसा नाही. व्यापारी व औद्योगिक क्षेत्रातील माझ्या प्रदीर्घ व विविध अनुभवांवरून माझी पक्की खात्री झाली आहे, की बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची अगर त्यांच्यावर अधिक सामाजिक नियंत्रण लादण्याची मुळीच गरज नाही.

### विकेंद्रीकरण झालेले आहे

रिझर्व्ह बँकेला कायद्याने अगोदरच बँकांचे सर्व व्यवहारावर सर्वंकष तपासणीचे व नियंत्रणाचे अमर्याद अधिकार सुपूर्त केले आहेत. या अधिकारांचा न्यायबुद्धीने व विवेकाने वापर केल्यास बँकांवरील सामाजिक नियंत्रणाचा पुरस्कार ज्या उद्दिष्टांसाठी केला जातो ती रिझर्व्ह बँकेस सहज हस्तगत करता येतील. या अधिकारांच्या साहाय्याने गेल्या दहा वर्षात रिझर्व्ह बँकेने अकार्यक्षम व स्वतःच्या पायावर उभे राहण्यास असमर्थ अशा कित्येक बँका गुंडाळल्या आहेत. त्यामुळे एकंदर बँकांची संख्या ४२३ वरून आता १०० वर येऊन ठेपली आहे. बँकांच्या संचालकांपैकी ज्यांचे हितसंबंध इतर कंपन्यांत गुंतलेले आहेत अशा कंपन्यांना जी कर्जे दिली जातात त्यांवर रिझर्व्ह बँकेची सतत नजर असते. सध्या बँकांचे ठेवीदार ११० लाखांचे वर आहेत व कर्जदारांची संख्या ११ लाखांच्या घरात मोडते. हे सर्व ठेवीदार व कर्जदार सर्व देशभर पसरलेले आहेत. यावरून बँकिंगच्या व्यवसायात किती विकेंद्रीकरण झालेले आहे हे दिसून येईल.

### ठेवीवरील व्याजाच्या दरात कपात हवी

गेल्या पाच वर्षात बँकांकडील बचत ठेवीत वाढ होत आहे आणि बचत ही मिळकतीच्या पातळीवर अवलंबून असल्याने ही बचतवाढ अशीच चालू राहील असे दिसते. तेव्हा या ठेवीवरील व्याजाचे किमान दर बांधून देणे आवश्यक आहे की काय याबाबत विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. बचत ठेवीवरील व्याजाचा किमान दर कायम केल्यामुळे व्याजाच्या दरांची चढती भांजणी झालेली आहे. मुदत ठेवीवरील व्याजाचे दर आपोआपच वाढवावे लागतात आणि साहजिकच शेअर्समध्ये गुंतविलेल्या रकमांवर अधिक दराने व्याज सुटावे ही अपेक्षाही बळावत जाते. बँकांमार्फत होणाऱ्या पतपुरवठ्यावर व त्याचा कोणत्या कामासाठी वापर होतो त्यावर जर पुरेसे नियंत्रण ठेवले तर मला वाटते, साधनसंपत्तीची योजनाबद्ध वाटणी करता येईल आणि मग व्याजाचे दर कमी करता येतील. त्यामुळे अर्थव्यवस्थेला आधार मिळेल आणि साहजिकच किमती उतरू लागतील. तेव्हा व्याजाचे दरात सरसकट कपात करण्याबाबत विचार करण्याची आता वेळ आली आहे. गेली तीन वर्षे आम्ही याच धोरणाचा पुरस्कार करीत आहोत. या संबंधात स्टेट बँक ऑफ इंडियाचे श्री. व्ही. टी. देहेजिया यांनी काही महिन्यांपूर्वी मांडलेला विचार स्वागतार्ह आहे.

### बँकिंग व्यवसायातील उत्पादकता

बँकिंगच्या व्यवसायातील नोकरवर्गांना देण्यात येणाऱ्या वेतनाविषयीच्या प्रश्नावरून नुकताच जो एक उभयपक्षी करार झाला आहे त्यामुळे शांततापूर्ण वाटाघाटीचा एक नवा मनू सुरू झाला आहे असे म्हणावयास हरकत नाही. मात्र आता नोकरवर्गाने आपली कार्यक्षमता अधिकाअधिक कशी वाढविता येईल यावर लक्ष केंद्रित करणे इष्ट आहे. त्यामुळे धंद्याचा आणखी विस्तार होईल आणि परिणामी त्यांचाच नव्हे तर अर्थव्यवस्थेचाही अधिक फायदा होईल. उत्पादकता अगर कार्यक्षमता या शब्दप्रयोगाचा रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. भट्टाचार्य यांनी जो अर्थ लावला आहे तोच या ठिकाणी मी अभिप्रेत धरलेला आहे. "बँकिंग व्यवसायातील उत्पादकता," या विषयावर भरविलेल्या एका चर्चात्मक परिसंवादाचे उद्घाटन प्रसंगी केलेल्या आपल्या भाषणात श्री. भट्टाचार्य यांनी एखाद्या बँकेच्या उत्पादकतेचे मोजमाप करताना ती आपल्या कार्यक्षेत्रातील ग्राहकवर्गाची काय दर्जाची व किती स्वस्तात सेवा करते ते लक्षात घेतले पाहिजे असे प्रतिपादले आहे. सध्यातरी या गोष्टीकडे योग्य त्या दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. बचतसंचय वाढत जावा व बँकांना ग्राहकांची अधिक चांगल्या प्रकारे सेवा करता यावी व परिणामकारकरीत्या ठेवी वाढविता याव्यात यासाठी नोकरवर्गाने चालकांना संपूर्ण सहकार्य देणे इष्ट आहे.

### प्रमुख व मोठ्या शहरी अधिक शाखा हव्यात

मला आणखीही एक सूचना करावीशी वाटते. ती म्हणजे राजधानीसारख्या प्रमुख व इतर मोठ्या शहरी बँकांना अधिक शाखा उघडू देण्याच्या इष्टतेवर रिझर्व्ह बँकेने गंभीरपणे विचार करावा. या भागातील लोकांच्या उत्पन्नात आणि उत्पन्न वाढण्याच्या क्षमतेत वाढ झालेली आहे. परंतु तेथे सध्या उपलब्ध असलेल्या बँकव्यवहाराच्या सोयीत मात्र त्या प्रमाणात वाढ होत नाही. त्याचबरोबर ग्रामीण भागात उघडलेल्या शाखांची मुळे

रुजण्यास व त्या स्वयंपूर्ण होण्यास शहरातील शाखांपेक्षा प्रदीर्घ कालावधी लागतो. तेव्हा ग्रामीण भागात बँकिंगच्या सोईचा प्रसार करण्याच्या कामी व्यापारी बँका जे परिश्रम घेत आहेत त्याची भरपाई म्हणून बँकांना राजधानीसारख्या व इतर मोठ्या शहरी अधिकाधिक शाखा उघडण्याची परवानगी देणे हे उचित व न्याय्य ठरेल. कारण नागरी विभाग हा ठेवसंचयक्षमतेत जास्त समृद्ध असल्याने तेथे अधिक शाखा उघडल्यास बँकांना आपली साधनसंपत्ती अधिक वेगाने वाढविण्यास संधी मिळेल.

### शेती व्यवसायास मोठ्या प्रमाणावर साह्य अशक्य

शेतीसाठी बँकांनी कर्जपुरवठा करावा असा जो विचारप्रवाह सध्या दिसतो त्याबाबत विचार केला तर स्वतःच्या देण्याचे एकंदर स्वरूप व जिंदगीची सुरक्षितता व तरतेपणा सदैव अबाधित ठेवण्याची गरज लक्षात घेऊन बँका त्यांना शक्य होईल तेवढे साह्य शेतीच्या व्यवसायास देतच आहेत. यासेरीज अन्य मार्गांनी शेतीस मोठ्या प्रमाणावर साह्य करणे बँकांना शक्य होणार नाही व त्यास बरीच कारणे आहेत.

पहिले कारण म्हणजे व्यापार व उद्योगधंद्यांच्या पतपुरवठ्याच्या वाजवी गरजा सारख्या वाढत आहेत. परंतु त्या प्रमाणात बँकांकडील ठेवी वाढत नाहीत. त्यामुळे औद्योगिक उत्पादन व व्यापार यांची कर्जविषयक मदतीबाबतची सतत वाढणारी गरज पुरी करणे व्यापारी बँकांना कठीण होऊ लागले आहे. दुसरे कारण म्हणजे नागरी भागातील नगरपालिका, महामंडळे, विद्यापीठे, आणि तत्सम स्वायत्त व अर्धस्वायत्त संस्था यांच्याकडील (ठेवी) रकमा आपल्याकडे आकर्षित करून घेणे बँकांना अवघड जाऊ लागले आहे. आपल्या ठेवी त्यांनी स्टेट बँका किंवा निमनागरी प्रदेशातील सहकारी बँका यांचेकडे ठेवाव्यात असे त्यांच्यावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष वजन येत आहे किंवा असे पक्षपाती आदेश दिले जात आहेत. तिसरे कारण म्हणजे शेतकऱ्यांना कर्जे देण्याचे बाबतीत, तारण घेण्यात व वसुलीचे मार्गात जबरदस्त अडचणी उभ्या आहेत. व्यापारी बँकांनी शेतकऱ्यांना वैयक्तिक कर्जाच्या गरजा भागवावयाचे ठरविल्यास हे कायदे बदलावे लागतील.

### आवाहन सहकारी संघटनांना करा !

या पार्श्वभूमीवर विचार केल्यास अलीकडे सहकारी बँका व व्यापारी बँका यांचे संघटनात्मक ऐक्य प्रस्थापित केले जावे असा जो विचार मांडला जात आहे तो अस्थानी आहे हे दिसून येईल. लोकांचा बचतसंचय गोळा करण्याचे कामी सहकारी बँका व पतपेढ्या दुर्दैवाने अयशस्वी ठरल्या आहेत हे आता निखालसपणे मान्य केले पाहिजे. अगदी अलीकडे उपलब्ध असलेली आकडेवारी बघितली तर या संघटनांच्या साधनसंपत्तीपैकी ६७ टक्के रकम बाहेरून घेतलेल्या कर्जाची असून, फक्त २७ टक्के रकम स्वनिधीची आहे तर केवळ ६ टक्के रकम जनतेच्या ठेवीची आहे. या संघटनांना भासत असलेली साधनसंपत्तीची तूट भरून काढण्याचे आवाहन व्यापारी बँकांना करण्याऐवजी, ग्रामीण विभागातील बचतसंचय आपल्याच भगीरथ प्रयत्नाने जमा करून आपली साधनसंपत्ती वाढवा असे या सहकारी संघटनांना बजावणेच बरोबर व उचित होणार नाही का? सुदैवाने या संस्था सुसूत्र असून ग्रामीण भागात दूरवर पसरलेल्या आहेत आणि शेतकऱ्यांची शेतीविषयक गरज भागविण्याच्या दृष्टीनेच त्यांची आयोजना करण्यात आलेली आहे.

---

## महाराष्ट्र बँकेची अखंड प्रगती

१९६६ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र लि. कडील ठेवी २३% ने वाढून त्यांची रकम ५५·६० कोटी रु. झाली. भारतातील सर्व बँकांचा एकत्रित विचार केला, तर त्यांच्या ठेवीतील वाढ १७% आहे. म्हणजे, बँक ऑफ महाराष्ट्राच्या ठेवीतील वाढ ३५% अधिक आहे. बँकेच्या शाखांत १२ नवीन शाखांची भर पडून त्यांची संख्या ११२ झाली. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांत आता बँकेच्या शाखांचे जाळे पसरले असून महाराष्ट्राबाहेरील बडोदे-इंदूरसारख्या औद्योगिक केंद्रातही बँकेने शाखा उघडल्या आहेत. बँकेचे खेळते भांडवल १९६५ अखेरच्या मानाने १४ कोटींनी वाढून ते ६८·५४ कोटींवर गेले आहे. भागदारांची संख्या ५,००० वरून ९,००० वर गेली आहे. बँकेने करपात्र १०% डिव्हिडंड कायम ठेवले आहे.

---

## पावसाळ्याच्या लहरीपणावर अजूनही उपाय नाही

हिंदमधील शेती बहुतांशी पाऊसपाणी योग्य वेळी व योग्य प्रमाणात होण्यावर अवलंबून आहे. पावसाच्या लहरीपणावर उपाय म्हणून लहान-मोठी धरणे व बंधारे बांधून जास्तीत-जास्त जमीन ओलीताखाली आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. पण अखेर धरणे-बंधारेही पावसावरच अवलंबून असतात. असे म्हणतात की हिंदी महासागरातील पावसाळी वाऱ्यांची माहिती प्रथम एका ग्रीक दर्यावर्दीने करून घेतली. पण तेव्हापासून ह्या वाऱ्यासंबंधी खास संशोधन अजूनही झालेले नाही. सध्याच्या तांत्रिक आणि शास्त्रीय प्रगतीच्या युगात हे काहीसे अनपेक्षितच मानावे लागेल. पावसाळी वाऱ्यांचा अभ्यास करून त्यांच्या गतीबद्दल आणि व्याप्तीबद्दल अचूक अंदाज करता आल्यास शेतकऱ्यांचा फार मोठा फायदा होईल. त्याला आपली पिके व त्यांची पेरणी-मळणी अधिक निश्चितपणाने करता येईल. त्यामुळे भारतापुढील अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न सोडविण्यासही मदत होईल. पुण्यातील वेधशाळेमार्फत पावसाळी वाऱ्यांचा अभ्यास करण्यात येत आहे. मद्रासमध्येही अशाच प्रकारचे एक अभ्यासकेंद्र स्थापन करण्यात येणार आहे. भारताभोवताली असलेल्या समुद्रावरील हवामानाचा अभ्यास करण्याचे काम दोन्ही केंद्रांत चालणार आहे. शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी धरण-बंधाऱ्यात साठविण्यात येणाऱ्या

पाण्यापैकी पुष्कळसे पाणी बाष्पीभवनाने नष्ट होते. त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. जोराच्या वाऱ्याने पाण्याची वाफ होण्याची क्रिया बळावते. पाण्याच्या साठ्याभोवती दाट झाडी केल्यास ही क्रिया मंदावते. पाण्याच्या जलाशयावर काही विशिष्ट रसायन मारल्यास बाष्पीभवन कमी प्रमाणात होते असा शोध अलीकडे लागला आहे.

### एअर इंडियासाठी स्वनातीत वेगाची विमाने

जगातील विमानप्रवासात अतिशय झपाट्याने बदल घडून येत आहे. ब्रिटन, फ्रान्स, रशिया, अमेरिका ह्यांसारखे मोठे देश ध्वनीपेक्षाही अधिक वेगाने उड्डाण करणारी विमाने बांधीत आहेत. ह्या स्पर्धेत मागे पडू नये म्हणून एअर इंडिया इंटरनॅशनल कंपनीने अशा प्रकारची पाच विमाने मिळविण्यासाठी प्राथमिक बोलणी चालू केली आहेत. विमाने मिळविण्यासाठी आगाऊ द्यावी लागणारी रक्कम देण्यात आली आहे. पाचांपैकी दोन विमाने अमेरिकन बनावटीची असतील आणि बाकीची तीन ब्रिटन–फ्रान्समधील कारखान्यांत तयार झालेली असतील. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा जो कच्चा मसुदा तयार करण्यात आला आहे, त्यात २६.९३ कोटी रुपयांची तरतूद नव्या विमानांच्या खरेदीसाठी करण्यात आली आहे. एअर इंडियाने दोन ७०७ बोईंग विमानांची मागणीही नोंदविली आहे.

### स्वतंत्र पक्षाच्या पुढाऱ्याचा इषारा

गुजरात कायदेमंडळातील स्वतंत्र पक्षाचे उपनेते श्री. वाडीलाल मेहता ह्यांनी सरकारच्या सध्याच्या आर्थिक धोरणाविषयी धोक्याचा इषारा दिला आहे. अहमदाबाद येथे एका व्यापारी संघटनेसमोर भाषण करताना ते म्हणाले की सध्या प्रतिवर्षी ३०० ते ४०० कोटी रुपयांची चलनवाढ करण्यात येत आहे. हा प्रकार ह्यापुढेही असाच चालला, तर लवकरच अशी वेळ येईल की लोक कागदाच्या चलनी नोटा हातांत धरण्यासदुद्धा तयार होणार नाहीत. त्याचबरोबर बाजारातून मालही नाहीसा होईल. ह्या परिस्थितीत आर्थिक अराजक निर्माण होण्यास फारसा अवधी लागणार नाही. म्हणून सरकारने आपल्या अवाढव्य खर्चाला कात्री लावली पाहिजे आणि जरुरी नसणारे अनेक कायदे रद्द केले पाहिजेत.

### जनावरांचा १०,००० मैलांचा विमान प्रवास

अमेरिकेने भारताला देणगीदाखल दिलेल्या उत्कृष्ट जातीच्या ६२ कालवडी आणि २८ वळू न्यूयॉर्कहून मुंबईला विमानाने आले. त्यांनी हा १०,००० मैलांचा प्रवास के. एल. एम. (डच) च्या एअरकंडिशण्ड डी सी–८ विमानातून केला. त्यांना पोचविण्यासाठी न्यू इंग्लंड कमिटी फॉर हीफर प्रॉजेक्टचे दोन प्रतिनिधी त्यांचेबरोबरच आले.


महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
१, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,९८,३८,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | ५,५२,७१,००० |
| ठेवी | ... | रु. | ४८,२९,९५,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | १,१८,८९,६२,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)


: नागपूर विभागातील शाखा :
(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES -
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## महाराष्ट्र बँकेची गेल्या पाच वर्षांतील प्रगती

(आकडे लक्ष रुपयांचे)

| | १९६६ | १९६५ | १९६४ | १९६३ | १९६२ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | १,१०,७२ | ९७,५६ | ७९,४२ | ६०,३० | ४९,७५ |
| रिझर्व्हजस् | ५०,८१ | ४६,३२ | ४०,८७ | ३५,९० | २६,८० |
| ठेवी | ५५,६६,३५ | ४४,९६,६९ | ३६,६२,९२ | २९,७१,१२ | २४,७६,६७ |
| कर्जे | ३५,२२,८७ | २६,१०,५७ | १९,१९,४० | १४,३०,२५ | ११,८३,४२ |
| गुंतवणूक | १९,७७,०० | १६,३७,८१ | १६,३६,२६ | १३,४०,०५ | ९,५०,१० |
| रोख | ४,२७,०१ | ५,३७,२९ | ४,२०,०० | ३,२२,०२ | ४,२६,८० |
| ताळेबंदाची बेरीज | ६८,५३,९९ | ५४,५४,४३ | ४८,०२,७४ | ३७,१२;६४ | ३०,५५,४८ |
| कर्जांचे ठेवींशी प्रमाण | ६३,२९ | ५८,०५ | ५२,४० | ४८,१४ | ४७,७८ |
| गुंतवणुकीचे ठेवीशी प्रमाण | ३५,५१ | ३६,४२ | ४४,६७ | ४५,१० | ३८,२६ |
| कॅश | ७,६७ | ११,९५ | ११,४६ | १०,८४ | १७,२३ |
| मिळालेले व्याज व डिस्कौंट | ३,२०,९९ | २,४३,४१ | १,६२,८३ | १,३२,१३ | १,०४,५२ |
| कमिशन, एक्सचेंज, ब्रोकेरज | ३१,९३ | २७,०४ | २१,०९ | १८,२९ | १६,२७ |
| इतर उत्पन्न | १,३५ | १,०९ | १,०१ | १,०६ | १,११ |
| दिलेले व्याज | २,१९,१५ | १,६२,०५ | १,०१,८७ | ८२,३३ | ६३,०८ |
| नोकरवर्गावरील खर्च | ८५,२० | ६६,४३ | ४९,५१ | ४२,२५ | ३५,२४ |
| इतर खर्च | २९,१५ | २३,५५ | १७,९९ | १५,३८ | १३,६२ |
| घसारा | ३,१२ | २,६४ | २,१८ | १,८७ | १,६४ |
| निव्वळ नफा | १७,६५* | १६,८८* | १३,३८ | ९,०० | ८,४३ |
| रिझर्व्हकडे वर्ग | २,५५ | ३,४० | २,७० | ४,०० | ४,५० |
| नोकर वर्गास बोनस | — | — | ३,२५ | — | — |
| स्टाफ ग्रॅच्यु. फंड | ०,५० | ०,५० | ०,०० | — | — |
| स्टाफ बेनिफिट फंड | ०,०६ | — | — | — | — |
| डिव्हिडंड रिझर्व्ह | १०,०० | ९,१० | ७,०० | ५,०० | ३,८९ |
| पुढील वर्षात | ४,१३* | ४,३८* | ०,५० | ०,४८ | ०४६ |
| | ह्यातून बोनस | द्यावयाचा आहे. | | | |

### राज्य सरकारांना मध्यवर्ती सरकारची मदत

चालू आर्थिक वर्षात राज्य सरकारांच्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी मदत म्हणून भारत सरकारकडून एकूण ५२५ कोटी रुपयांची रक्कम मुकर करण्यात आली आहे. नागालँडसाठी मंजूर केलेल्या ६ कोटी रुपयांचा त्यात समावेश आहे. एकूण रकमेपैकी १५६ कोटी रुपयांची रक्कम शेतीसुधारणांच्या कार्यक्रमासाठी आहे. पाटबंधाऱ्याची छोटी कामे, जमीन-सुधारणा, पशुसंवर्धन, दुधदुभत्याचा व्यवसाय, मच्छीमारी इत्यादी बाबींवर ती खर्च करण्यात येईल. भारतामधील अनेक भागांना गेल्या दोन वर्षांत अवर्षणाचा तडाखा सहन करावा लागला. तो लक्षात घेऊन जवळजवळ निम्म्यापेक्षाही अधिक म्हणजे ८४·८२ कोटी रुपये छोट्या पाणीपुरवठा योजनावर खर्च होतील.

### चौथ्या पंचवार्षिक योजनेतलि पाणीपुरवठा

नियोजन समितीमधील पाणीपुरवठा व पूरनियंत्रण अभ्यास गटाचा सल्ला घेऊन मध्यवर्ती सरकारने राज्यसरकारांनी चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात वरील दोन्ही बाबतीत करावयाच्या खर्चाचा आकडा ठरविला आहे. चौथ्या कार्यक्रमाच्या मसुद्यात पाणीपुरवठा व पूरनियंत्रणासंबंधी जी रूपरेषा ठरविण्यात आली आहे त्याचा आधार घेऊन सर्व राज्यांनी मिळून ९६० कोटी रुपये खर्च करावे असे सुचविण्यात आले आहे. ह्या रकमेपैकी ८४९ कोटी रुपये पाणीपुरवठ्याच्या कामावर खर्च करण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली आहे. आसाम राज्यात ह्या कामावर २५·७७ कोटी रुपये खर्च करण्यात यावयाचे आहेत. त्यापैकी १७ कोटी रुपये पूरनियंत्रणावर खर्च करावयाचे आहेत.

### लष्करी मदत देण्यास अमेरिकेचा नकार

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांनी दक्षिण आशियांतील देशांना आर्थिक मदत देण्यासाठी अमेरिकेच्या काँग्रेसकडे ७५·८ कोटी डॉलर्सची मागणी केली आहे. ह्यापैकी ९१ टक्के मदत भारत, पाकिस्तान आणि तुर्कस्तान ह्या देशांसाठी राखून ठेवण्यात आलेली आहे. परंतु परदेशांना द्यावयाच्या मदतीसाठी त्यांनी काँग्रेसला जो संदेश धाडला होता त्यात भारत व पाकिस्तान ह्यांच्याकडून लष्करी मदतीसाठी करण्यात आलेल्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. पाकिस्तान आणि भारत ह्यांनी मिळून जवळजवळ २३·४ कोटी डॉलर्सच्या लष्करी मदतीची मागणी केलेली होती. आता ही सर्व रक्कम ग्रीस, तुर्कस्तान आणि इराण ह्या देशांना लष्करी मदत देण्यासाठी वापरण्यात येईल अशी वार्ता आहे. ग्रीस, इराण आणि तुर्कस्तान ह्या देशांनी १२ वर्षेपर्यंत एकमेकांच्या सुरक्षिततेसाठी पडणारा बोजा सहकार्याने स्वीकारला आहे असे अमेरिकेचे म्हणणे आहे. संभाव्य रशियन आक्रमणाला तोंड देण्यासाठी ह्या देशांनी अमेरिकेशी सहकार्य केले, इतकाच त्याचा खरा अर्थ आहे. १९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत संघर्ष झाल्यावर अमेरिकेने दोन्ही देशांची लष्करी मदत बंद केलेली आहे. संघर्षाबद्दल भारत व पाकिस्तान ह्या दोन्ही देशांना सारखेच जबाबदार धरण्याचे अमेरिकेचे धोरण अद्यापही चालूच आहे. वास्तविक पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धात भारताने अमेरिकेची लष्करी सामग्री वापरलेली नाही. पण ह्या वस्तुस्थितीची दखल घेण्यास अमेरिका अजूनही तयार नाही. प्रे. जॉन्सन ह्यांच्या मताने भारत, पाकिस्तान व तुर्कस्तान ह्या देशांतील दारिद्र्याचे उच्चाटन इतर प्रश्नांच्या मानाने अधिक महत्त्वाची बाब आहे.

### रबराच्या आयातीसंबंधींचे धोरण

कोटायम् येथे रबरबोर्डाची ५६ वी वार्षिक बैठक भरविण्यात आली होती. त्या प्रसंगी बोलताना बोर्डाच्या अध्यक्षांनी रबराच्या मळेवाल्यांपुढे उभ्या राहिलेल्या अडचणींचा उल्लेख केला. ते म्हणाले की रबराची लागवड करणाऱ्यांना काहीशा कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. कारण अलीकडे नैसर्गिक रबराच्या किमती घटलेल्या आहेत. भारतामधील रबराचे उत्पादन वाढत चाललेले आहे. अशा स्थितीत परदेशांतून रबर आयात करण्यास परवाने देणे उचित ठरणार नाही. रबराचा माल तयार करणाऱ्या कारखान्यांतून रबर पडून आहे, ह्या गोष्टीकडे बोर्डाने सरकारचे लक्ष वेधले आहे. १९६६ च्या सप्टेंबरपासून १९६७ च्या जानेवारीपर्यंत १६,८७९ टन रबराची आयात करण्यात आली. ही आयात १९६४–६५ आणि १९६५–६६ ह्या वर्षांतील आयातीपेक्षा जास्त आहे. टायर्स तयार करणाऱ्या कंपन्यांनी देशांतील रबराची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली नाही तर रबराच्या किमत आणखीही खाली घसरण्याचा संभव आहे. म्हणून रबराच्या आयातीसंबंधी काहीतरी निश्चित धोरण स्वीकारण्याची गरज आहे. १९६६–६७ ह्या वर्षात रबराचे उत्पादन सुमारे ५४,७०० टनाच्या आसपास होईल असा अंदाज आहे. त्यापुढील वर्षी तर उत्पादन ६४,००० टनाच्या जवळपास जाण्याची शक्यता आहे. रबराच्या लागवडीत आधुनिक पद्धती वापरण्याची आवश्यकता आहे. कारण, भारतामधील रबराचे उत्पादन गरज भागविण्याइतके वाढेतोपर्यंत आयात करावी लागणार आहे. रबराची लागवड मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या मळेवाल्यांना मदत देण्यासाठी बोर्डाने एक योजना तयार केली आहे. रबराची किंमत ठरवून देण्याची वेळ अद्याप आलेली नाही. कृत्रिम रबराच्या उत्पादनावर सरकारने घातलेले निर्बंध इष्ट आहेत.

### नवीन निजाम तैनात वाढवून मागणार

नवीन निजाम आपली तैनात वाढवून मागणार असल्याची बातमी आहे. आपल्याला मिळावयाची वार्षिक २० लक्ष रुपयांची तैनात माजी निजामाचा वारस म्हणून राहण्यास पुरणार नाही, असे त्याचे म्हणणे आहे. त्याच्या राजवाड्यात ९,००० नोकर असून त्यातले ३,९०० राजवाड्याचे संरक्षक आहेत.

### पंत प्रधानांची भेटण्याची वेळ

श्रीमती इंदिरा गांधी ह्यांना भेटण्यासाठी कुणाही नागरिकाला आठवड्यातील दोन दिवशी (गुरुवारी व शुक्रवारी) सकाळी ८–३० ते ९–३० च्या दरम्यान जाता येईल.

वर्षभरात
सत्तर लाख
रुपयांची
ठेवीत वाढ
हेच आमच्यावरील वाढत्या
विश्वासाचे प्रतीक
दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.
सातारा [ महाराष्ट्र ]

★★★★★★★

# नहीं –
# यह कोई
# साधारण कार्य नहीं !

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना : ७११०२

★★★★★★★★

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १९ एप्रिल, १९६७ | अंक ८

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

दातांच्या स्वच्छतेसाठी

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

**सुताच्या सहकारी गिरण्या**—आंध्र राज्यात सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या सुताच्या तीन गिरण्या स्थापन करण्यात येणार आहेत. गिरण्या उभारण्यासाठी १२ कोटी रुपयांचे भांडवल लागणार आहे. त्याशिवाय मेहबूबनगर ह्या ठिकाणी लोकरीचे सूत व कापड निर्माण करणारी एक गिरणीही काढण्यात येणार आहे. ह्या गिरणीत मुख्यत: लष्करासाठी लागणारी लोकरीची पांघरुणे तयार करण्यात येतील.

**नेपाळमधील कापडाची गिरणी**—खाटमांडूपासून सहा मैलांवर सुती कापडाची गिरणी काढण्याचे काम बिर्ला गटाकडे सोपविण्यात आले होते. भारतीय रुपयाचे अवमूल्यन झाल्यावर नेपाळी रुपयाची किंमत बदलल्यामुळे गिरणीच्या उभारणीचे काम स्थगित करण्यात आले होते. हे काम आता ६ महिन्यांच्या आत पूर्ण करण्यास बिर्ला गटाला सांगण्यात आले आहे.

**सौराष्ट्रात पाण्याची टंचाई**—चालू उन्हाळ्यात सौराष्ट्रातील पाण्याची टंचाई फार बिकट होण्याची लक्षणे दिसत आहेत. पूर्व सौराष्ट्रात उपलब्ध होऊ शकणाऱ्या पाण्याची नुकतीच पाहणी करण्यात आली असता चालू वर्षी फक्त ३५ हजार एकर जमिनीलाच पाण्याचा पुरवठा करता येईल असे आढळून आले. पूर्व सौराष्ट्रात पाणीपुरवठा करण्यासाठी १६ धरणे बांधण्यात आलेली आहेत. गेल्या वर्षी धरणातील पाण्याचा वापर करून ६९ हजार एकर जमीन भिजविण्यात आली होती.

**डी. डी. टी. च्या उत्पादनाचा उच्चांक**—१९६६–६७ साली हिंदुस्थान इन्सेक्टीसाइडस ह्या कारखान्याने डी. डी. टी. उत्पादन करण्याच्या बाबतीत उच्चांक गाठला. ह्या सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक संघटनेचे दोन कारखाने दिल्ली व अलवाये येथे आहेत. दोन्ही कारखान्यांत मिळून ३,०९७ टन डी. डी. टी. चे उत्पादन करण्यात आले. कारखान्याला ५६·६२ लाख रुपये ठोक नफा होईल असा अंदाज आहे.

**किंमती उतरू लागल्या**— उत्तरप्रदेशात काँग्रेसचे मंत्रिमंडळ अधिकारभ्रष्ट झाल्याबरोबर अन्नधान्याच्या किंमती उतरू लागल्या आहेत. काही शहरातून क्विंटल धान्याच्या किंमती १० रुपयांनी कमी झाल्या आहेत. ग्रामीण भागात गहू-तांदूळ दिसत नव्हता. आता बाजारात त्यांची खुली विक्री होत आहे.

**युगांडात तागाची गिरणी** - पूर्व आफ्रिकेतील युगांडा हा देश भारताच्या मदतीने तागाची गिरणी उभारण्याच्या खटपटीत आहे. युगांडामधील शेती चांगली भरभराटीत आहे; त्याचा फायदा घेऊन युगांडातील एक हिंदी कारखानदार गिरणी काढण्याच्या कामी सहकार्य करणार आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या एक कोटी रुपये भांडवलापैकी १५ लाख रुपयेच हिंदी कारखान्याला घालावे लागतील.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'


किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.



**धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...**

परंतु

किर्लोस्कर डिझेल एंजिन वापरण्यानें धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहींत...



बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.

शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.

विनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.

किर्लोस्कर

डिझेल एंन्जिन्स

३ ते १५ हॉर्स पॉवर

**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.**

एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)

BOM & BAY KOE 467-A MAR

# अर्थ

बुधवार, १९ एप्रिल, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेचे उत्पादन घटण्याचा इषारा

दक्षिण भारतामधील साखरकारखान्यांच्या मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष श्री. कोठारी ह्यांनी साखरेच्या उत्पादनात पुढील हंगामात घट होण्याच्या शक्यतेकडे लक्ष वेधले आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात की, उसाखालील लागवडीचे क्षेत्र आणि साखरेचा उतारा ह्यांतील सध्याचाच कल चालू राहिला, तर पुढील गळिताच्या हंगामात साखरेचे उत्पादन आतापर्यंत गेले नव्हते इतक्या पातळीपर्यंत खाली जाईल. आगामी हंगामात साखरेचे उत्पादन जेमतेम २० लाख टनाच्या आसपास होईल. गेल्या हंगामात ३२ लाख टन साखर उत्पादन करण्यात येऊन उच्चांक गाठण्यात आला होता. त्याच्याशी तुलना करता पुढील हंगामाचे उत्पादन ४४ टक्क्यांनी कमी होईल. नुकत्याच संपलेल्या हंगामात अवघ्या २२ लाख टन साखरेचे उत्पादन झाले. दक्षिण भारतामधील साखरेचे उत्पादन ४ लाख टन होईल असा अंदाज आहे. पण, एकंदर देशाचा विचार करता गंभीर परिस्थिती आकार घेत आहे. साखरेच्या निर्यातीसंबंधी केलेल्या आंतरराष्ट्रीय करारास अनुसरून सरकारने साखरेची निर्यात करण्याचे धोरण चालूच ठेवले तर आधीच बिकट असलेली परिस्थिती विकोपास जाण्याची शक्यता आहे. साखरेच्या धंद्यासंबंधीची कारभारयंत्रणा सुधारण्यात आली नाही तर ह्या अवघड परिस्थितीतून मार्ग निघणे कठीण आहे. साखरकारखान्यांना उसाचा अधिक पुरवठा करण्यात आला पाहिजे. तसे करण्यात न आल्यास लोकांच्या किमान गरजा भागविण्यासाठी परदेशांतून साखर आयात करण्याची पाळी येण्याचा संभव आहे. चालू हंगामातील उत्पादनापेक्षा पुढील हंगामातील उत्पादन १० टक्के घटेल असे दिसते.

## बिहारमधील पाणीपुरवठ्यासाठी तातडीचे यत्न

बिहारमध्ये गेली तीन वर्षे कमीअधिक प्रमाणात अवर्षण पडल्यामुळे अतिशय बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या राज्यातील काँग्रेसेतर सरकारला ह्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. अवर्षणामुळे बिहारचे ४ कोटी लोक अन्नाला मोताद होतात की काय असे भय व्यक्त करण्यात येत आहे. मध्यवर्ती सरकार आणि खाजगी संस्था ह्यांच्याकडून येणारी मदत अपुरी पडत चालली आहे. दुष्काळग्रस्त बिहारमधील मदत योजनांची पाहणी करून आलेल्यांच्या मताने येत्या जुलै-ऑगस्ट-पर्यंत परिस्थिती भयानक होण्याची शक्यता आहे. दुष्काळ केवळ धान्याच्या नापिकीपुरता मर्यादित राहिलेला नाही. राज्यात एकूण ७० हजार खेडी आहेत. त्या पैकी १८ हजार खेड्यांत तर पिण्याचे पाणीसुद्धा मिळत नाही. डोंगराळ भागात पाण्याची टंचाई विशेष जाणवत आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी राज्य सरकारने तातडीच्या योजना हाती घेतल्या आहेत. त्यासाठी ५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. प्रत्येक नागरिकाला दररोज निदान २ गॅलन पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शिकस्तीचे प्रयत्न करण्यात येत आहेत. गया जिल्ह्यात नलिकाकूप खोदण्यासाठी लष्कराची मदत घेण्यात आली आहे. येते दोन महिने आणीबाणीचे असल्यामुळे ह्या काळात १० हजार विहिरी खोदण्यात येणार असून ४ हजार विहिरींची दुरुस्ती करण्यात यावयाची आहे. छोटा नागपूर विभागात पाण्याची विशेष टंचाई असल्याने तेथे निदान ७५० विहिरी खोदण्याचा सरकारचा मानस आहे. बिहारमधील अवर्षणजन्य प्रश्न बिकट असून ते सोडविण्याच्या कामी राजकीय पक्षभेद आड येणार नाहीत अशी लक्षणे दिसत आहेत.

## माणसांच्या केसांच्या टोपांची निर्गत

तिरुपती देवस्थानाने जमा केलेल्या, माणसांच्या केसापासून मद्रास येथे बनविण्यांत येणाऱ्या टोपास अमेरिकेने ऑर्डर दिली आहे, तिची किंमत १७·२५ कोटी रु. आहे. कारखान्यात एकूण ३५ वेगवेगळ्या छटांचे टोप केले जातील. प्रत्येक टोपाची किंमत २०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत असेल. कारखान्यासाठी विशिष्ट प्रकारची शिवण्याची यंत्रे परदेशातून आणावी लागली. हाँगकाँगच्या लायन रॉक ट्रेडिंग कंपनीने टोप करण्याचे तज्ज्ञ पुरविले आहेत. लवकरच आंध्र प्रदेशातही टोपांचा कारखाना स्थापन केला जाणार आहे. अमेरिकन स्त्रियांत टोपांची लोकप्रियता वाढत असल्याने हिंदी कारखान्याच्या मालास चांगली मागणी येईल.

## संततिप्रतिबंधक साधनांस अमेरिकेची मदत

संततिप्रतिबंधक साधने किंवा ती उत्पादन करण्यासाठी आवश्यक त्या जिनसा ही पुरविण्यास अमेरिका आता लवकरच तयार होईल, अशी चिन्हे दिसत आहेत. आतापर्यंत ह्या बाबतीत अमेरिकन धोरण पुराणप्रिय असेच होते. सध्याची लोकसंख्येच्या वाढीची गती लक्षात घेता, आता अन्नाचे उत्पादन केवळ वाढवून पुरणार नाही.

# हिंदी बँकिंगचा आढावा आणि प्रगतीच्या दिशा

**श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी ह्यांचे इंडियन बँक्स असोसिएशनच्या वार्षिक सभेत भाषण**

(१) हिंदी बँकांनी १९६६ मध्ये ४७५ नव्या कचेऱ्या उघडल्या; १९६५ मध्ये त्यांनी ४२५ नव्या कचेऱ्या उघडल्या होत्या. ह्यांपैकी किमान एक तृतीयांश तरी कचेऱ्या जेथे पूर्वी कोणत्याही बँकेची एकही कचेरी नव्हती, अशा ठिकाणी उघडण्यात आल्या.

(२) १९६५ चे अखेरीचे मानाने १९६६ चे अखेरीस शेडयूल्ड बँकांकडील ठेवीत ४६१ कोटी रु. ची (१६%) वाढ झाली; २,८८६ कोटी रु. वरून त्या ३,३४७ कोटी रुपयांवर गेल्या. आर्थिक व्यवहार, शेतीचे उत्पादन आणि औद्योगिक उत्पादन कुचंबले होते आणि किमतीत तीव्रतेने वाढ होत गेली, अशा वर्षात ही वाढ झाली, ह्याबद्दल बँकांना अभिमान वाटतो.

(३) उपलब्ध असलेल्या प्रमुख १८ प्रातिनिधिक बँकांचे आकडे पाहिले तर कराची तरतूद करून उरलेला नफा १३·६१ कोटी रु. म्हणजे पूर्वीच्या वर्षापेक्षा ५८ लक्ष रु. अधिक (४·४८%अधिक) झाला असे दिसून येईल. स्टेट बँक (नफ्यात वाढ ४९ लक्ष रु.) वगळली तर बाकीच्या १७ बँकांच्या नफ्यात फक्त ९ लक्ष रु. ची (०·९३%) वाढ झाली.

(४) बँकांचा खर्च वाढत गेला, पण बँकांजवळील वाढता पैसा त्या वापरू शकल्या नाहीत. कर्जाचे ठेवीशी प्रमाण १९६६ च्या पहिल्या सहामाहीत १९६५ च्या पहिल्या सहामाहीच्या मानाने कमी होते. बँकांना बरीच मोठी रक्कम कमी व्याज देणाऱ्या ट्रेझरी बिलांत गुंतवावी लागली.

(५) ह्या १८ बँकांनी १९६५ साली २·८० कोटी रुपये गंगाजळीकडे वर्ग केले होते. १९६६ साली त्यांनी २·७४ कोटी रु. वर्ग केले. कायद्याने घालून दिलेल्या किमान रकमेपेक्षा विशेष जास्त रक्कम त्या वर्ग करू शकल्या नाहीत.

(६) ह्या १८ बँकांनी १९६५ इतकेच डिव्हिडंड जाहीर केले; फक्त एका बँकेने डिव्हिडंड २% ने वाढविले प्रत्यक्ष वाटले जाणारे डिव्हिडंड ५·२६ कोटी रु. होईल. मागील वर्षी ते ५·१८ कोटी रु. होते.

(७) १९६५ चे मानाने १९६६ साली शेडयूल्ड बँकांनी ३०८ कोटी रु. अधिक (१५%) कर्ज दिले; त्याची एकूण रक्कम २,४१३ कोटी रु. झाली. मार्च १९६१ ते मार्च १९६६ चे आकडे पाहिले, तर ह्या मुदतीत बँकांची कर्जे १,३०६ कोटी रु. ची २,३४७ कोटी रु. झाली. म्हणजे त्यात ८०% वाढ झाली. ह्याच मुदतीत कारखान्यांना दिलेली कर्जे ११९% वाढून ती ६८८ कोटी रु. ची १,५१० कोटी रु. झाली. एकूण कर्जातील औद्योगिक कर्जाचा हिस्सा ५२·७% चा ६४·३% झाला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतीत कर्जवाढीपैकी ७०% वाढ औद्योगिक कर्जात झाली. ह्याच काळात कर्जदारांची संख्या फक्त ४१% ने वाढली तरी दिलेल्या कर्जात ११९% ची वाढ झाली. म्हणजे, दर कर्जदारागणिक कर्जाची रक्कम झपाट्याने वाढली.

(८) ऑक्टोबर, १९६६ अखेर ते मार्च १९६७ अखेरच्या मोसमात बँकांनी दिलेल्या कर्जातील वाढीपैकी ८०% वाढ औद्योगिक कर्जाची आणि/अथवा आयात व निर्यात बिलांच्या तारणावरील कर्जाची असावी ही अट रिझर्व्ह बँकेने ५० कोटी रु. वरील ठेवींच्या बँकांवर लादली आहे.

(९) कर्जावरील व्याजाचे दर थोडे वाढवलेले आहेत. मिळालेले व्याज आणि दिलेले व्याज ह्यांमधील अंतर वाढविण्यासाठी बँका उपायांचा विचार करीत आहेत. त्यामुळे बँकांची नफा मिळविण्याची क्षमता वाढेल अशी अपेक्षा आहे. बँककर्जावर कमिटमेंट चार्ज आकारण्यात यावा, अशीही एक सूचना आहे. त्यामुळे बँकांची प्राप्ती वाढेल आणि कर्जदारांतही अधिक शिस्त निर्माण होईल.

(१०) बँकांनी कर्मचाऱ्यांच्या पगाराचे बाबतीत आणि सोईसवलतींचे बाबतीत स्वखुषीच्या उभयपक्षी कराराचे द्वारा पुष्कळच पुढे पाऊल टाकले आहे; तेव्हा ठेवीवरील व्याजाचे दर शक्यतेप्रमाणे उतरविणे आणि सेव्हिंग्ज ठेवींची खाती चालविण्यावर काही बंधने घालून बँकांचा खर्च उतरविणे आवश्यक झाले आहे.

---

## पाणीपुरवठ्यासाठी अधिक पैशाची मागणी

मद्रास राज्याचे मुख्य मंत्री श्री. अण्णादुराई ह्यांनी मध्यवर्ती सरकारकडे पाणीपुरवठ्याची अधिक कामे करण्यासाठी जादा रकमेची मागणी केली आहे. मद्रासच्या पंचवार्षिक कार्यक्रमात पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी जी रक्कम मंजूर करण्यात आली आहे तीपेक्षा १० कोटी रुपये जादा रक्कम त्यांना पाहिजे आहे. मध्यवर्ती सरकारने ही रक्कम दिली तर पुढील वर्षी मध्यवर्ती सरकारच्या अन्नधान्याच्या साठ्यात ३ लाख टन तांदूळ भरणा करण्याची तयारी त्यांनी दाखविली आहे. ब्रह्मदेशातून भारतात परत आलेल्या तामीळ नागरिकांना तेथील जमिनी सोडून याव्या लागल्या. त्या जमिनीपासून दरसाल ५० कोटी रुपयांचे अन्नधान्य पैदा होते. भारत सरकारने ब्रह्मदेशाच्या सरकारचे मन वळवून तांदळाच्या रूपात रकमेची फेड करून घेण्याचे प्रयत्न करावेत अशी सूचना त्यांनी केली आहे.

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

## श्री. रा. ना. गोडबोले, अध्यक्ष, संचालक मंडळ, यांचे भागीदारांच्या वार्षिक सभेतील भाषण

वेस्टर्न इंडिया ट्रस्टी आणि एक्झिक्युटर कंपनी ही बँकेची संलग्न ( सबसिडिअरी ) कंपनी करण्याचा निर्णय बँकेच्या संचालक मंडळाने घेतला आहे, हे जाहीर करण्यास मला आनंद वाटतो. कै. विमा-महर्षी आण्णासाहेब चिरमुले यांनी स्थापन केलेल्या या दोन्ही संस्था अशा रीतीने पुन्हा जवळ येत आहेत याबद्दल सर्वांनाच आनंद वाटेल. ट्रस्टी कंपनी पूर्वी वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची सबसिडिअरी कंपनी होतीच. आता ती आपले बँकेची सबसिडिअरी कंपनी होत आहे. बँकेचा व ट्रस्टी कंपनीचा व्यवसाय लोकांच्या विश्वासावरच अवलंबून असल्याने हे दोन्ही व्यवसाय एकमेकांचे जवळ येणे हे केव्हाही सयुक्तिकच ठरेल. सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, वगैरे बँकांच्याही सबसिडिअरी ट्रस्टी कंपन्या आहेतच. आपली बँक व ट्रस्टी कंपनी या दोन्ही संस्था एकमेकांना पूरक ठरतील व त्यामुळे दोन्ही संस्थांची भरभराट होण्यास मदत होईल याविषयी मला शंका नाही. चालू साली हा निर्णय प्रत्यक्ष कार्यवाहीत येईल.

### बँकेची समाधानकारक प्रगती

१९६६ सालात भागभांडवलात रुपये ११,२०० ची भर पडली आहे. ठेवींमध्ये झालेली, रु. ६९,३३,५८७ ची वाढ समाधानकारक असून तिचे प्रमाण शे. १३ टक्के पडते. कर्ज व्यवहारात भरघोस म्हणजे रु. ६८,५२,०६८ ची वाढ झाली असून ती जवळजवळ शे. २४ टक्के पडते. कर्जव्यवहारांचे प्रमाणात बँकेने पुष्कळच वाढ केली असून ठेवीशी त्याचे प्रमाण जवळजवळ शे. ६० टक्के पडते. हेच प्रमाण १९६५ सालात शे. ५४ टक्के होते. बँकेच्या खर्चामध्ये एकसारखी वाढ होत असताना नफ्याचे प्रमाण टिकवावयाचे झाल्यास कर्जव्यवहाराचे प्रमाणात जास्तीत जास्त वाढ करणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीने बँक करीत असलेल्या प्रयत्नास यश प्राप्त झाले आहे हे सांगण्यास मला आनंद होतो.

### सरकारचे दीर्घकालीन धोरण हवे

सध्याची शेअर बाजाराची परिस्थिती पाहता लोकांना कंपन्यांचे शेअर्समधील गुंतवणुकीबाबत फारसा उत्साह वाटत नाही असे दिसते. या बाबतीत सरकारने केलेल्या प्रयत्नासही फारसे यश आलेले नाही. तसेच नाणेबाजाराची परिस्थिती फारशी समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. रुपयाच्या अवमूल्यनामुळे अंतर्गत किमतीतही खूपच वाढ झाली असून त्याचा परिणाम ठेवीवर, विशेषतः मर्यादित उत्पन्न असलेल्या ठेवीदार वर्गावर होणे साहजिकच आहे. त्याचप्रमाणे नोकर वर्गाचा महागाई भत्ता किमतीच्या निर्देशांकावर अवलंबून असल्यामुळे त्यातील वाढीबरोबरच बँकेच्या नोकरखर्चातही वाढ होत असते. सरकारने आर्थिक आणि औद्योगिक विकासासंबंधी धोरण ठरविताना पुढील २०-२५ वर्षांचा काल डोळ्यांपुढे ठेवावा. प्रश्न जसजसे उपस्थित होतील तसतसे ते सोडविण्याचे धोरण अवलंबिले जात आहे असा जो समज झाला आहे तो दूर होणे आवश्यक आहे.

### बँकांचे राष्ट्रीयीकरण अनावश्यक

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाविषयी आज काही लोकांकडून मागणी केली जात आहे. हा प्रश्न केवळ भावनात्मक दृष्टिकोनातून सोडविला गेला तर ते एक राष्ट्रीय संकटच ठरेल. बँका या देशाच्या आर्थिक नाड्या आहेत ही गोष्ट सर्वमान्यच आहे. तसेच बँकांवर काही प्रमाणात, सामाजिक नियंत्रण असणे आवश्यक आहे हे बँकाही मान्य करतात. परंतु ही नियंत्रणे ठेवताना हे अवश्य पाहिले गेले पाहिजे की, या नाड्यांमधील प्रवाहच त्यामुळे बंद पडणार नाही. आपण संमिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था एकदा मान्य केल्यानंतर खाजगी क्षेत्रातील व्यापार व उद्योगधंद्यांना जगविणे हे कर्तव्यच ठरते आणि त्याकरिता बँका खाजगी क्षेत्रातच असणे आवश्यक आहे. वास्तविक पाहता सर्व व्यापारी बँकांवर रिझर्व बँकेची सध्या इतकी बंधने आहेत आणि आणखीही बन्धने घालण्याचे त्या बँकेस इतके व्यापक अधिकार आहेत की आणखी वेगळे सामाजिक नियंत्रण ठेवण्याची जरुरीच नाही.

### लहान बँकांच्या नवीन शाखांना सवलती

चालू हंगामाकरिता रिझर्व बँकेने जे धोरण जाहीर केले आहे त्याचे मी स्वागत करतो. बँकांना रिझर्व बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाबाबतचे धोरणात झालेला बदल निश्चितच स्वागतार्ह असून यापुढेही या बाबतीत व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार केला जाईल अशी मला आशा वाटते. मी माझ्या या पूर्वीच्या भाषणात वारंवार सांगत आलेलो आहे की, रिझर्व बँकेने नियंत्रणे ठेवताना लहान व मोठ्या अशा सर्व बँकांना एकाच मापाने मोजू नये. रिझर्व बँकेची नियंत्रणे आवश्यकच आहेत आणि त्याविषयी माझी काहीच तक्रार नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की लहान बँकांची आर्थिक कुवत ध्यानात घेतली जावी. विशेषतः नवीन शाखा उघडण्याबाबत परवानगी देताना लहान बँकांना सवलत देणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी इतर कोणतीही व्यापारी बँक नाही अशा ठिकाणी शाखा उघडणे हे जास्त खर्चाचे असते आणि तो बोजा सहन करण्याची लहान बँकांची ताकदही इतर मोठ्या बँकांच्यापेक्षा निश्चितच कमी असते. तेव्हा अशा ठिकाणी शाखा उघडण्याबाबत रिझर्व बँकेचे जे बंधन आहे ते लहान बँकांचे बाबतीत सैल केले जावे अशी माझी आग्रहाची विनंती आहे. त्याचप्रमाणे कर्जव्यवहारावर नियंत्रणे घालतानासुद्धा लहान बँकांचे कार्यक्षेत्र व त्यांच्या गिऱ्हाइकांच्या विशिष्ट गरजा यांची अवश्य दखल घेतली जावी.

### दुधाची किंमत वाढविण्यासाठी १५ हजार गाईंची हत्या

दुधाच्या किमती वाढविता याव्यात ह्यासाठी अमेरिकेतील शेतकऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनेने आपल्या सभासदांना आपल्या सुमारे १५,००० दुभत्या गाईंची हत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. दुधाचा पुरवठा कमी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या पत्नींनी स्नानासाठी दूध वापरून पाहिले, मोटारी धुण्यासाठी दूध वापरले, गटारात दूध ओतले, तरी किमती वाढेनात. तेव्हा, दूध देणाऱ्या गाईच, ठार मारून टाकून, कमी करण्यात आल्या.

### जपान भारताकडून ५२ लक्ष टन लोखंड घेणार

जपानमधील नऊ प्रमुख पोलाद कारखानदारांनी भारताकडून चालू वर्षी ५२,००,००० टन लोखंडाचे खनिज आयात करण्याचा करार केला आहे. ह्या खनिजात ६५% लोखंड असायला हवे. प्रत्येक टनाची किंमत ६८ शिलिंग म्हणजे मागील वर्षापेक्षा ५% कमी आहे.

### पतौडीचे नबाब कोंबड्या पाळणार

पतौडीचे नबाब बनासकांठा जिल्ह्यात पोल्ट्री फार्म सुरू करण्याचा विचार करीत आहेत. "इंग्लंडच्या क्रिकेटच्या दौऱ्यावरून परत आल्यावर मी पक्का निर्णय घेईन" असे त्यांनी अहमदाबाद येथे पत्रकारांना सांगितले.

### उतारूंसाठी होटेल्सवर ३ कोटी रु. खर्च

होटेलांत आणखी १,२०० उतारूंची सोय करण्यासाठी इंडियन टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ९ होटेलांवर ३ कोटी रु. खर्च करणार आहे. ह्या योजनेत ८ नवी होटेल्स बांधण्याचा व एका चालू होटेलात आणखी १०० खाटांची सोय करण्याचा समावेश आहे.

### कचेरीतील शिपाई रोजंदारीवर

नवे शिपाई भरती करण्याची भारत सरकारने आपल्या खात्यांना बंदी केली, त्यातून पळवाट काढून कित्येक खाती रोजंदारीवर शिपाई नेमीत असल्याचे उघडकीस आले आहे.

### इजिप्तकडून कापसाची आयात करणार ?

सुती कापड गिरण्यांना लागणाऱ्या कापसाची टंचाई दूर करण्यासाठी परदेशातून कापसाची आयात करावी लागणार आहे. अर्थात ह्यासाठी परदेशीय चलन खर्चावे लागेल. तथापि इजिप्त व सूडान ह्या देशांकडून कापूस आयात केल्यास परदेशीय चलनाचा प्रश्न उपस्थित होणार नाही. म्हणून त्यांच्याकडून कापूस आयात करण्याच्या शक्यतेचा सरकारी पातळीवर विचार चालूआहे. भारत आणि इजिप्त ह्यांच्यात व्यापारी व पैशाच्या देवघेवीचा करार आहे. करारातील कलमांना अनुसरून इजिप्त भारताकडून काही माल खरेदी करण्यास बांधला गेलेला आहे. ह्या मालाची किंमत चुकती करण्यासाठी इजिप्त कापूस पुरविण्यास तयार होण्याची शक्यता आहे. नवी दिल्ली येथे अलीकडे झालेल्या अलिप्त देशांच्या परिषदेत भारत, युगोस्लाव्हिआ आणि इजिप्त ह्यांनी परस्परातील व्यापार वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

## रिझर्व्ह बँकेच्या नव्या चलनी नोटा

सोमवार, दि. १७ एप्रिल १९६७ रोजी रिझर्व्ह बँकेने २ रु., ५ रु., १० रु. आणि १०० रु. ह्या किमतीच्या नव्या स्वरूपाच्या चलनी नोटा प्रसृत करण्यास प्रारंभ केला. सध्याच्या अशोक स्तंभाच्या डिझाइनच्या चलनी नोटाही कायदेशीर चलन राहातीलच.

**कागद :** नव्या चलनी नोटांचा कागद जुन्या चलनी नोटांच्या कागदाप्रमाणेच आहे.

**आकार :** जुन्या नोटापेक्षा नवीन नोटांचा आकार लहान आहे, तो खालील प्रमाणे :

२ रु. ची नोट ... १०७ मि. मि. × ६३ मि. मि.
५ रु. ची नोट ... ११७ मि. मि. × ६३ मि. मि.
१० रु. ची नोट ... १३७ मि. मि. × ६३ मि. मि.
१०० रु. ची नोट ... १५७ मि. मि. × ७३ मि. मि.

**वॉटरमार्क :** डाव्या बाजूला सध्यापेक्षा लहान आकारात, नव्या नोटांवर अशोक स्तंभाची वॉटरमार्क आहे.

**सुरक्षितता धागा :** ५ रु., १० आणि १०० रु. च्या नोटांच्या उजव्या बाजूस उभा सिक्युरिटी थ्रेड आहे.

२ रु. च्या नोटेस हा थ्रेड नाही.

## १२९६ व्यक्ती आणि फर्म्स ह्यांची परदेशी बँकांत खाती आहेत

परदेशांत, मुख्यत: अमेरिकेत व ग्रेटब्रिटनमध्ये बँकांत खाती असणाऱ्या हिंदी व्यक्तींची व फर्म्सची संख्या १,२९६ आहे. पूर्वीच्या ४९ संस्थानिकांची तेथील बँकांत खाती असून त्यांतील रक्कम १,५६,००,००० रु. आहे. व्यक्तींची ग्रेट ब्रिटनमध्ये २१० व अमेरिकेत २११ खाती आहेत. कंपन्या व फर्म्स ह्यांची ग्रेट ब्रिटनमध्ये ३९५ व अमेरिकेत १७४ खाती आहेत. इतर देशांतील खात्यांची संख्या अशी आहे:—मलेशिया ९ व्यक्ती आणि ३२ फर्म्स, कॅनडा २४ फर्म्स, पूर्व अफ्रिकेतील देश ३६ व्यक्ती, सिंगापूर ६ व्यक्ती, बर्मा ६ व्यक्ती आणि १३ फर्म्स, प. जर्मनी ८ फर्म्स, हाँगकाँग ६ फर्म्स, स्वित्झरलंड १ फर्म, पोर्तुगाल २ व्यक्ती. ही सर्व खाती रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीनेच ठेवलेली आहेत.

## ११४ मिशन्स; ४,२१४ मिशनरी

१९६२ ते १९६७ ह्या मुदतीत भारतातील एकूण ८३०५ जणांनी आपला धर्म सोडून ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. १ जानेवारी १९६६ रोजी भारतात एकूण ११४ विदेशी ख्रिस्ती मिशन्स काम करीत होती आणि ४,२१४ मिशनरी होते.


तुमची जिव्हाळयाची बँक

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

**आपल्या ११६ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध.**

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टीसेवा यांच्यासह

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात*

अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

चिं. वि. जोग, जनरल मॅनेजर.

शं. ल. किर्लोस्कर, अध्यक्ष.

## इंडियन बँक्स असोसिएशनचे नवे पदाधिकारी

इंडियन बँक्स असोसिएशनच्या मॅनेजिंग कमिटीने श्री. कृष्णराज ठाकरसी ( बँक ऑफ इंडिया लि. ), ह्यांची चेअरमनचे जागी, श्री बी. बी. शहा ( युनायटेड कमर्शिअल बँक लि. ) ह्यांची व श्री. व्ही. सी. पटेल ( सेंट्रल ऑफ इंडिया लि.) ह्यांची डेप्युटी चेअरमनचे जागी आणि श्री. सी. कामथ ( कॅनरा बँक लि. ) ह्यांची ऑनररी सेक्रेटरी म्हणून फेरनिवड केली आहे. मॅनेजिंग कमिटीवरील इतर जागी खालील प्रतिनिधी आहेत:—

श्री. टी. डी. कन्सारा ( बँक ऑफ इंडिया लि. )
श्री. एन. एम. चोक्सी ( बँक ऑफ बरोडा लि. )
श्री. एस. के. हंडू ( पंजाब नॅशनल बँक लि. )
श्री. बी. के. दत्त ( युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. )
श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी ( देना बँक लि. )
श्री. एस. व्ही. सुंदरम् ( इंडियन ओव्हरसीज बँक लि. )
श्री. के. के. पै ( सिंडिकेट बँक लि. )
श्री. सी. व्ही. जोग ( बँक ऑफ महाराष्ट्र लि. )
श्री. सी. आर. श्रीनिवासन् ( इंडियन बँक लि. )
श्री. टी. आर. भागवत ( आंध्र बँक लि. )
श्री. आर. वाय. गर्ग ( बँक ऑफ राजस्थान लि. )
श्री. के. रामदास नायर ( कॅनरा बँकिंग कॉ. लि. )
श्री. एस. डी. वर्मा ( स्टेट सबसिडिअरी बँक्स )

---

## बंगाललाही इंग्रजी पाहिजे

हिंदी मातृभाषा नसलेले लोक जोपर्यंत हिंदी ही राष्ट्रीय भाषा म्हणून स्वीकारण्यास तयार नाहीत तोपर्यंत जोडभाषा म्हणून इंग्रजीचा वापर करण्यास मुभा असावी असे मत पश्चिम बंगालचे मुख्य मंत्री श्री. अजय मुखर्जी ह्यांनी व्यक्त केले आहे. सर्व भारतभर सरकारी कारभाराची भाषा म्हणून हिंदीला आजच मान्यता देणे शक्य होणार नाही, असा अभिप्रायही त्यांनी व्यक्त केला. हिंदी भाषेला विरोध करण्यात मुख्यतः दक्षिण भारतामधील राज्येच प्रमुख होती. आता त्यात बंगालची भर पडली आहे.

---

**क्रुप कारखान्याचे कॉर्पोरेशन**—पश्चिम जर्मनीतील सुप्रसिद्ध क्रुपचा पोलादाचा कारखाना खाजगी मालकीचा आहे. पण आता त्याचे सार्वजनिक मालकीच्या कॉर्पोरेशनमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. त्यासाठी सध्याचे मालक आल्फ्रेड क्रुप ह्यांच्या मुलाने कारखान्यावरील आपला वारसाहक्क सोडून दिला आहे.

**रशिआत गव्हाचे अमाप पीक**—रशिआतील गव्हाच्या उत्पादनात वाढ होत चालली आहे. गेल्या वर्षी रशिआचे गव्हाचे उत्पादन आतापर्यंत सर्वांत अधिक म्हणजे १० कोटी टन झाले. त्यापूर्वी एका वर्षी गव्हाच्या उत्पादनाने ७.५ कोटी टनाचा आकडा गाठला होता. अलीकडे रशिआत शेतीकडे अधिक लक्ष देण्यात येत आहे.

## मुदतीपूर्वी परत केलेल्या ठेवींवरील व्याज

### रिझर्व्ह बँकेचे बिगर-बँकिंग कंपन्यांवर निर्बंध

बिगर-बँकिंग कंपन्यांना ठेवीची मुदत संपण्यापूर्वी त्या परत करतेवेळी त्यावरील साचलेले व्याज देण्याची सामान्यतः परवानगी नाही. परंतु काही अटींवर साचलेले व्याज देण्याची परवानगी देण्याचा रिझर्व्ह बँकेला अधिकार आहे. त्याला अनुसरून रिझर्व्ह बँकेने दोन ऑर्डरी काढल्या आहेत. त्याअन्वये, हायर परचेस फिनॅन्स कंपन्यांना, मुदत ठेवल्यापासून सहा महिन्यांत मुदतीपूर्वी ठेव परत केल्यास, त्यावर मुळीच व्याज देता येणार नाही. इतर फिनॅन्शिअल व नॉन-फिनॅन्शिअल कंपन्यांना मुदत ठेवल्यापासून एक वर्षाच्या आत, मुदत संपण्यापूर्वी ठेव परत केल्यास तीवर मुळीच व्याज देता येणार नाही. मुदतीपूर्वी ठेव परत केली तरी किती काळ ती ठेव कंपनीकडे राहिली त्यातून हे सहा महिने किंवा बारा महिने वजा करून त्या मुदतीवर कोणत्या दराने व्याज देता येईल त्याचे दर रिझर्व्ह बँकेने ठरवून दिले आहेत. अशा परिस्थितीत प्रमुख व्यापारी बँका कोणत्या दराने व्याज देतील, ते लक्षात घेऊन व्याजाचे दर निश्चित केले आहेत. बिगर-बँकिंग कंपनी कोणत्या कमाल दराने व्याज देऊ शकेल, ते येथे स्पष्ट केले आहे.

| | द. सा. द. शे. कमाल दर |
|---|---|
| ( अ ) ठेव ठेवल्यापासून एका वर्षानंतर पण दोन वर्षांपूर्वी ठेव परत केल्यास | ५ |
| ( ब ) ठेव ठेवल्यापासून दोन वर्षानंतर पण तीन वर्षांपूर्वी ठेव परत केल्यास | ५½ |
| ( क ) ठेव ठेवल्यापासून तीन वर्षानंतर पण पाच वर्षांपूर्वी ठेव परत केल्यास | ५¾ |
| ( ड ) ठेव ठेवल्यापासून पाच वर्षानंतर पण ठेवीच्या मुदतीपूर्वी ठेव परत केल्यास | ६ |


ठेवीच्या मुदतीपूर्वी ठेव परत केली, तरच तिचेवरील व्याजास ही बंधने लागू आहेत. मुदत संपेपर्यंत राहणाऱ्या ठेवीवर कोणत्या दराने व केव्हा व्याज द्यावे, ह्यावर रिझर्व्ह बँकेने अजून निर्बंध घातलेले नाहीत.


---

## राहणीचा दर्जा वाढविणे शक्य

एसो तेल कंपनीचे जनरल मॅनेजर मि. जी. पी. केस मुंबई येथे बोलताना म्हणाले की हिंदी लोकांचे राहणीचे मान सध्यापेक्षा दुपटीने सुधारणे शक्य आहे. सध्या सर्व जगात तंत्रविद्येची वाढ अतिशय वेगाने होत आहे. भारताने जर ह्या विद्येच्या आघाडीवर राहण्याचे साध्य केले तर संकल्पित हेतू प्रत्यक्षात उतरविणे शक्य आहे. मात्र परदेशातून मिळणारी मदत वा सार्वजनिक मालकीचा विभाग ह्यांच्याच द्वारा हेतूची पूर्तता होणार नाही. त्यासाठी खाजगी भांडवलाचीही मदत लागेल.

---


किर्लोस्कर
शेतकी यंत्रें
तुमच्या सेवेस हजर
नांगर
कल्टिवेटर
पेरणी यंत्र
इलेक्ट्रिक पंपसेट
ऑइल इंजिन पंपसेट
स्लूस व्हाल्व
फूट व्हाल्व
STUSA 11/66
नांगर, पंपिंग सेट, पेरणी यंत्रें, कल्टिवेटर, ऊसांचे चरक, स्लूस व्हाल्व, शेगायंत्रें यांसारख्या किर्लोस्कर यंत्रांवर महत्त्वाकांक्षी शेतकरी व बागाईतदार आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं भरंवसा ठेवतात. शेती व बागाईत यांचें उत्पादन वाढविण्यांत हीं यंत्रें महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी, जिल्हा-सांगली




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेकन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार ३ मे, १९६७ | अंक ८

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्टये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

**इंडोनेशिआचे व्यापारमंडळ**—भारत सरकारने इंडोनेशिआला १० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारताशी व्यापार कसा वाढविता येईल ह्याची पाहणी करण्यासाठी इंडोनेशिआचे एक व्यापारमंडळ भारताला भेट देणार आहे. इंडोनेशिआला माल निर्यात करण्यास अद्याप प्रारंभ झालेला नाही. पण मालासंबंधी विचारणा करण्यात येत आहे.

**जवानांसाठी गोठविलेले मांस**—भारताच्या उत्तर सरहद्दीवर राखण करणाऱ्या सैनिकांना गोठविलेल्या डबाबंद मांसाचा पुरवठा करण्याची योजना संरक्षण खात्याने तयार केली आहे. आग्रा येथे असे अन्न तयार करण्याचा एक कारखाना उभारण्यात येत आहे. ह्या कारखान्यात फक्त बोकडांचे मांस तयार करण्यात येईल. जवानांना अन्नाचा पुरवठा करणे त्यामुळे सोपे होणार आहे.

**श्रीमंतांना स्वस्त धान्य द्यावे काय ?**—पश्चिम बंगालचे अन्नमंत्री डॉ. पी. सी. घोष ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे की राज्यातील ४ लाख, २० हजार प्राप्तिकर भरणाऱ्या लोकांना शिधावाटपाच्या दुकानांतून स्वस्त दरानें धान्याचा पुरवठा करण्यात येऊ नये. त्यांच्या मताने ह्या लोकांना जास्त पैसे देऊन धान्य विकत घेता येईल. राज्य सरकारने ह्या बाबतीत अद्याप निश्चित धोरण ठरविलेले नाही.

**पाकिस्तानामधील नफेबाजी**—लाहोरमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या एका नियतकालिकाने पाकिस्तानमधील मोटार सर्व्हिसच्या मालकांनी केलेल्या नफेबाजीवर प्रकाश टाकला आहे. गेल्या महिन्यात पाकिस्तानमधील रेल्वे कामगारांनी संप केला होता. त्या वेळी मोटार सर्व्हिसच्या मालकांनी उतारूंकडून भरमसाठ दराने पैसे घेतले. लाहोर ते गुजराणवाला हे ४० मैलांचे अंतर जाण्यासाठी प्रवाशांकडून १० रुपये दर आकारण्यात आला. पूर्वी ह्याच प्रवासासाठी काही आणेच द्यावे लागत.

**मोटारींच्या चोऱ्यांत वाढ**—गेल्या १२ महिन्यांच्या अवधीत भारतामधील मोटारींच्या चोऱ्या ७ ते ८ टक्क्यांनी वाढल्या आहेत. बहुतेक मोठ्या शहरांतून म्हणजे दिल्ली, मुंबई, कलकत्ता व मद्रास ह्या शहरांतून ही वाढ अधिक झाली आहे. आंतरराष्ट्रीय पोलिस संघटनेने मोटारीच्या चोऱ्या थांबविण्यासाठी उपाय शोधण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

**खताचा सहकारी कारखाना**—सहकारी तत्त्वावर चालविण्यात यावयाच्या एका रासायनिक खताच्या उभारणीविषयी अमेरिकेतून आलेल्या एका तुकडीने प्राथमिक पाहणी केली आहे. संकल्पित कारखान्याच्या उभारणीसाठी ९ कोटी डॉलर्स अथवा ६७·५ कोटी रुपये खर्च येणार आहे. कारखान्यात दरसाल २ लाख टन नत्रयुक्त खते उत्पादन करू शकणारी यंत्रसामग्री बसविण्यात यावयाची आहे.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'


किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.





**धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...**

परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...



बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.

शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.

बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.

किर्लोस्कर

डिझेल एंजिन्स
३ ते १५ हॉर्स पॉवर

**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.**
एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)

TOM & BAY

# अर्थ

बुधवार, ३ मे, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## राहणीचे मान सुधारण्यास अवकाश आहे
### भारताच्या अर्थव्यवस्थेचा संक्रमणकाल

मध्यवर्ती सरकारचे नियोजन मंत्री श्री. अशोक मेहता ह्यांनी एका परदेशी वार्ताहराला दिलेल्या मुलाखतीत भारताच्या अर्थव्यवस्थेची सद्यःस्थिती आणि भवितव्य ह्यांविषयी विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की, गेली १५ वर्षे भारतामधील उत्पादनाच्या पद्धतीत बदल घडून येत आहे. बदल घडून येण्याची ही अवस्था आणखी १५ वर्षे चालू राहण्याची शक्यता आहे. भारताची अर्थव्यवस्था सध्या अशा एका संक्रमणकालातून जात आहे की ज्या अवस्थेत मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. परंतु ह्या गुंतवणुकीपासून लोकांच्या राहणीच्या मानात त्वरित सुधारणा मात्र होऊ शकणार नाही. ह्याचाच अर्थ असा की, लोकांच्या उपभोग्य वस्तूंच्या वापरात येत्या १०–१२ वर्षांत तरी विशेष वाढ होणार नाही. ह्या परिस्थितीची योग्य ती जाणीव परदेशांना तर झाली पाहिजेच; परंतु देशातील लोकांकडूनही अशा जाणिवेचा प्रतिसाद मिळाला पाहिजे. ह्या बाबतीत रशियाचे उदाहरण समजून घेण्यासारखे आहे. रशियन अर्थव्यवस्थेच्याही प्राथमिक अवस्थेत मोठी भांडवल-गुंतवणूक करावी लागली आणि लोकांच्या उपभोगावर नियंत्रण ठेवावे लागले. जर्मनीच्या लोकांनाही ह्या अवस्थेतून जावे लागलेले आहे. अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना लोकांत नवनवीन कौशल्ये प्रसृत होत जातात, अधिक रोजगार मिळण्याच्या संधी उपलब्ध होत जातात आणि सर्व अर्थरचनेचे संक्रमण होऊ लागते. लोकांच्या उत्पन्नात भर घालण्याची भारताची इच्छा आहेच; पण त्याचबरोबर त्यांना नवीन दिशा दाखविण्याचे प्रयत्नही करण्यात येतील. असे असले तरी लोकांच्या राहणीच्या मानात लक्षात भरण्यासारखा फरक पडण्यास १९७५ साल उजाडेल, ही वस्तुस्थिती आहे.

ह्या सुमारास भारताचे राष्ट्रीय उत्पन्न तर वाढलेले असेलच पण वाढत्या उत्पन्नाबरोबर बचतीचा दरही वाढत जाईल. परदेशांकडून मदत घेण्याच्या अवस्थेबाहेर भारत कधी पडेल असा प्रश्न विचारण्यात आला असता श्री. मेहता म्हणाले की, भारत हा देश वसाहतीच्या मागासलेल्या स्थितीतून बाहेर पडत आहे. त्यामुळे तो अर्थातच गरीब आहे. ह्या दारिद्र्याचा परिणाम दोन तऱ्हेने दिसून येतो. दारिद्र्यामुळे देशातील साधनसंपत्तीची बचत करणे साधत नाही. शिवाय आर्थिक विकासाला लागणारे सर्व परदेशीय चलनही मिळविता येत नाही. तथापि बचतीचा दर वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत. १९५१ साली बचतीचा दर राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्के होता. १९७०-७१ च्या सुमारास हा दर १५ ते १६ टक्क्यांपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेअखेर हा दर गाठण्यात यश आले तर १९७५-७६ च्या सुमारास म्हणजे पाचव्या पंचवार्षिक योजने अखेर तो २० टक्क्यापर्यंत जाणे शक्यतेच्या कोटीत येईल. तसे झाल्यास ह्यानंतरच्या काळात भारत घेतलेली परदेशीय कर्जे परत देण्यास प्रारंभ करील. ह्याचा अर्थ असा की ह्या कालखंडात त्या वेळी भांडवल गुंतवणुकीचा दर हा बचतीच्या दरापेक्षा कमी झालेला असेल. परंतु येत्या १० वर्षांच्या अवधीत मात्र भारताला केवळ स्वतःच्याच साधनसंपत्तीवर विसंबून राहता येणार नाही. कारण ह्या काळात हिंदी अर्थव्यवस्थेची मूलभूत रचनाच बदलत जात जाईल. हा बदल घडून येत असताना लोकांना फार मोठ्या प्रमाणावर स्वार्थत्याग करावा लागेल. तथापि, मित्र देशांकडून भारताला मदत मिळत राहिली तर लोकांना सध्यापेक्षाही अधिक त्याग करण्याची पाळी येणार नाही, अशी अपेक्षा आहे.

---

## लष्करी करारातून बाहेर पडण्याची सूचना

भारत–पाकिस्तान संघर्षाचे जनक व पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री मि. झुल्फिकार अली भुत्तो ह्यांनी पाकिस्तानने सैटो आणि सिएटो ह्या लष्करी करारातून आपले अंग काढून घ्यावे अशी सूचना केली आहे. अमेरिकेने पाकिस्तानला व भारताला लष्करी मदत चालू न करण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो त्यांना नापसंत आहे. रावळपिंडी येथील वकिलांच्या सभेत बोलताना ते म्हणाले की अमेरिकेच्या ह्या निर्णयाचा हेतू पाकिस्तान व भारत ह्यांना चीनविरोधी दावणीत बांधण्याचा आहे. अमेरिकेच्या जागतिक लष्करी डावपेचातील एक पाऊल म्हणूनच ह्या निर्णयाकडे पाहिले पाहिजे. चीनविरुद्ध पाश्चिमात्य देशांनी जी आघाडी उघडली आहे, त्यात पाकिस्तानला गोवण्याचा अमेरिकेचा उद्देश आहे. पाकिस्तानने आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे; कारण, परदेशीय मदतीमागोमाग परदेशीय हस्तक्षेपही आलाच.

## रशिया व भारत यांच्यांतील वाढता व्यापार

१९५३ पासून भारत व रशिया ह्यांच्यांतील व्यापार लक्षात येण्यासारख्या गतीने वाढत चाललेला आहे. परस्परांना फायद्याचे ठरतील अशा प्रकारचे व्यापार करून हे साधण्यात आले आहे. १९५३ साली उभयता देशांत पहिला दीर्घ मुदतीचा म्हणजे ५ वर्षांचा करार करण्यात आला. व्यापारी संबंध वाढून आर्थिक देवाण-घेवाण अधिक प्रमाणावर व्हावी म्हणून दुसरा व्यापारी करार १९५८ साली करण्यात आला. त्यामुळे उभयता देशांतील व्यापारी सहकार्य खूपच वाढीला लागले. १९५३ साली दोन्ही देशांमधील व्यापार १ कोटी रुपयांचा झाला होता, तो १९५८ साली ८८ कोटी रुपयांपर्यंत वाढला आणि १९६४ साली तर हा आकडा १५० कोटी रुपयांच्या घरात गेला. १९६३ च्या जूनमध्ये उभायता देशांच्या दरम्यान तिसरा व्यापारी करार करण्यात आला. त्याच्या अंमलबजावणीस जानेवारी १९६४ पासून सुरुवात झाली. त्याची मुदत ५ वर्षांची आहे. १९६६ मध्ये ह्या कराराची मुदत वाढवून ती १९७० अखेरपर्यंतची करण्यात आली. नव्या दुरुस्त करारात ठरविण्यात आल्याप्रमाणे उभयता देशांतील व्यापारी देवाण-घेवाण २,०४८ कोटी रुपयांपर्यंत होईल. त्यात १,०२४ रुपये किमतीच्या मालाची निर्यात होईल आणि १,०२४ रुपये किमतीच्या मालाची आयात होईल. दुरुस्त करारात एक बाब महत्त्वाची आहे. भारतातून निर्यात करण्यात येणाऱ्या मालात अधिक विविधता आणण्यात येणार आहे. नेहमीच्या परंपरागत निर्यात मालाची निर्यात वाढविण्यासही अधिक सवड ठेवण्यात आली आहे. आता रशिया हे भारताचे तिसऱ्या क्रमांकाचे गिऱ्हाईक झाले आहे.

---

## केरळ राज्यात दारूबंदी रद्द होणार?

राज्य सरकारांच्या मुख्य मंत्र्यांची दिल्ली येथे एक परिषद भरविण्यात आली होती. त्या वेळी अनेक मुख्य मंत्र्यांनी आपआपल्या राज्यांतील आर्थिक परिस्थितीचा आढावा मध्यवर्ती सरकारला सादर केला. केरळचे मुख्य मंत्री श्री. नंबुद्रीपाद ह्यांनी मध्यवर्ती सरकारशी बोलणी करताना राज्यातील दारूबंदी रद्द करण्याचा आपला मनोदय कळविला. राज्य सरकारला जरूर असणारा अधिक पैसा ह्या मार्गाने गोळा करता येईल असे त्यांचे म्हणणे आहे. केरळच्या सरकारी नोकरांना जादा महागाई भत्ता देण्यात यावयाचा आहे. पण त्यासाठी लागणारा पैसा राज्य सरकारलाच उभारावा लागणार आहे. मध्यवर्ती सरकार वाढीव महागाई भत्त्याची जबाबदारी स्वीकारण्यास तयार नाही. राज्यांतील दारूबंदी रद्द केली तर उत्पन्न ९ कोटी रुपयांनी वाढेल आणि जादा महागाई भत्ता देणे शक्य होईल असे श्री. नंबुद्रीपाद ह्यांना वाटते.

---

## लाखेच्या धंद्यावर ओढवलेले संकट

हिंदमधील लाखेचा धंदा संकटग्रस्त झाला आहे. लाखेच्या किमती तर घसरल्या आहेतच; पण प्रतिकूल हवामानामुळे लाखेचे उत्पादनही घटले आहे. ह्याच वेळी निर्यातीतही घट होत आहे. त्यामुळे ह्या धंद्यात गुंतलेल्या ४० लाख लोकांच्या पुढे बिकट प्रसंग ठाकला आहे. आसाम, गुजरात, मध्यप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा आणि महाराष्ट्र ह्या राज्यांतील आदिवासीच ह्या धंद्यात मुख्यतः काम करतात. ह्या आदिवासींच्या कित्येक पिढ्यांना दुसरा व्यवसायच माहीत नाही. त्यामुळे उदरभरणासाठी दुसरे काही काम करणे त्यांना अशक्य झालेले आहे. लाखेच्या धंद्याचे एक वैशिष्ट्य असे की तो निर्यातीवरील चढउतारावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांत जगातील लाखेची मागणी झपाट्याने कमी होत चालली आहे. १९५५ साली भारताने २८ हजार, ८०० टन लाखेची निर्यात केली. ती कमी होता होता १९६५ साली अवघी १४ हजार टनच निर्यात झाली. गेल्या तीस वर्षांत निर्यातीचा हा सगळ्यात कमी आकडा आहे. भारताशिवाय थायलंड हा एकच देश लाख उत्पादन करतो. गेल्या काही वर्षांत थायलँडची लाखेची निर्यात मात्र वाढत आहे. भारताच्या ह्या वस्तूच्या बाजारपेठेत तो देश आपला जम बसवीत चालला आहे. अमेरिका भारताच्या लाखेचे प्रमुख गिऱ्हाईक आहे. १९५९-६० सालात अमेरिकेने भारताकडून ११,४५१ टन लाख विकत घेतली. पण पुढील सहा वर्षांच्या अवधीत अमेरिकेची खरेदी अवघी १,९८४ टनांपर्यंत खाली घसरली. ह्याच अवधीत रशियाकडून होणारी खरेदी मात्र वाढली. १९५९-६० साली रशिआने ८२१ टन लाख घेतली होती. १९६५-६६ साली रशिआने २,६४९ टन लाख खरेदी केली. हा धंदा वाचविण्यासाठी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन प्रयत्न करीत आहे.

---

## बिहारमधील दुष्काळग्रस्तांना परदेशांची मदत

बिहारमधील दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी परदेशांतील लोक झटत आहेत. हॉलंड, अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांतील काही संघटनांनी मिळून संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे ही मदत देण्याचे ठरविले आहे. सुमारे २४ लाख रुपयांची रक्कम गोळा करण्यात आली आहे. त्यापैकी ७ लाख रुपयांची रक्कम लवकरच बिहार राज्य सरकारच्या हवाली करण्यात येईल आणि बाकीची संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत मदत कार्यासाठी खर्च करण्यात येईल. बिहारमध्ये केवळ धान्याचा तुटवडा आहे असे नाही. अनेक खेड्यांतून पाण्याचीही अतिशय टंचाई आहे. पाणीटंचाईला तोंड देण्यासाठी एक चतुरस्र योजना आखण्यात आली आहे. मदतीचा उपयोग करून नलिकाकूप खोदण्याचे व भूमिगत पाणी उपलब्ध करून देण्याचे कार्य करण्यात येणार आहे. देणगीदारांना योग्य वाटल्यास शेतीचा विकास साधण्यासाठीही तिचा विनियोग करण्यात येईल.

## दिल्ली शहरातील गुन्हेगारीत झालेली वाढ

मोठ्या शहरांतून दाटीवाटीने वस्ती करून राहणाऱ्या लोकांची संख्या गेल्या काही वर्षांत वाढत चालली आहे. लोकसंख्येचे केंद्रीकरण झाल्यामुळे अशा शहरांत अनेक प्रकारचे बिकट प्रश्न उत्पन्न होतात. गलिच्छ वस्त्यांचा प्रश्न हा त्यांपैकीच एक आहे. तथापि ह्या प्रश्नाकडे केवळ आरोग्याच्या दृष्टीने पाहून चालणार नाही. ह्या वस्त्यांतून गुन्हेगारीला पोषक असे वातावरण निर्माण होते, हेही लक्षात घेतले पाहिजे. दिल्ली-सारखी भारताची राजधानीसुद्धा वाढत्या गुन्हेगारीने कलंकित झालेली आहे. मध्यवर्ती सरकारच्या अमलाखाली असलेल्या ह्या शहरांतील गुन्हेगारी तेथील अधिकाऱ्यांना डोकेदुखी होऊन बसली आहे. गुन्हेगारांच्या वाढत्या हालचालीमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कामही अवघड होत चालले आहे. काही खुनाचे गुन्हे आणि स्त्रियांच्या अपहरणाचे गुन्हे सर्वांच्या तोंडी झालेले आहेत. दिल्लीच्या प्रमुख शासकाने दिलेल्या माहितीप्रमाणे गेल्या १५ महिन्यांच्या अवधीत दिल्लीतून २४९ तरुणींचे अपहरण करण्यात आले. त्यांपैकी २२० जणींचा पत्ता लावून त्यांना स्वस्थानी परत आणण्यात पोलिसांना यश आले आहे. दिल्ली शहराच्या गरजेच्या मानाने पोलिसांच्या संख्येत व्हावी तितकी वाढ झालेली नाही. सध्या शहरातील पोलिसांची संख्या १६ हजार आहे. दोन वर्षांपूर्वी तर ती १४ हजारच होती. ह्या दोन वर्षांच्या कालात शहरातील नव्या वस्तीत खूपच वाढ झालेली आहे. अपुऱ्या संख्येमुळे पोलिसांना सगळीकडे नीट लक्ष देणे अर्थातच कठीण जात आहे. अलीकडे दिल्लीमधील पोलिसांनी जो संप केला होता त्याला अनेक कारणे आहेत. कामाचा जबरदस्त ताण पडल्यामुळेही संपाला पोषक वातावरण तयार झाले असावे.

---

## व्हिएटनाममधील युद्धाला पाकिस्तानचा विरोध

पाकिस्तानचे अमेरिकेतील वकील मि. आगा हिलाली ह्यांनी व्हिएटनाममधील युद्धाला पाकिस्तानचा विरोध व्यक्त केला आहे. आग्नेय आशिया लष्करी करारातील देशांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत ते बोलत होते. ते म्हणाले की, आशियात गेली कित्येक वर्षे हे युद्ध चालू आहे, इतकेच नव्हे, तर त्याची तीव्रता वाढतच चाललेली आहे. ह्या युद्धातून सध्यापेक्षाही मोठ्या युद्धाचा प्रसंग ओढविण्याची शक्यता दिसत आहे. पाकिस्तानमधील लोकांचे राहणीचे मान वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी पाकिस्तानच्या साधनसंपत्तीचा विकास घडवून आणण्याचे कार्य महत्त्वाचे आहे. तसे न झाल्यास आर्थिक भरभराट साधण्याचे काम कठीण, किंबहुना अशक्य होणार आहे. व्हिएटनाममध्ये चालू असलेल्या युद्धामुळे पाकिस्तानची औद्योगिक प्रगती खुंटत आहे.

---

## अमेरिकेच्या मदतीच्या परतफेडीचा हिशोब

संपन्नतेच्या आणि समृद्धीच्या शिखरावर असणारा एक मोठा देश ह्या नात्याने अमेरिका जगातील गरजू देशांना आर्थिक मदत देत आहे. मदतीपैकी काही भाग देणगीदाखल असला तरी मोठा हिस्सा परतफेडीच्या अटीवर देण्यात येत असतो. आर्थिक व्यवहारांच्या प्रचलित नियमांना धरून परतफेड करणे हे रास्तच ठरते. तथापि, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेचे प्राध्यापक टिटमस ह्यांनी ह्या प्रकरणी नवाच दृष्टिकोण मांडला आहे. त्यांच्या मताने अमेरिकेने परदेशांना दिलेली मदत केव्हाच परतफेड करण्यात आलेली आहे. युद्धोत्तरकालात १९४८ पासून अमेरिकेने परदेशांना मदत देण्यास प्रारंभ केला तेव्हापासूनच्या अठरा वर्षांच्या अवधीत अमेरिकेने परदेशांतील १ लाख डॉक्टर्स आणि शास्त्रज्ञ ह्यांना अमेरिकेत आकृष्ट केले आहे. इतक्याजणांना अमेरिकेतच शिक्षण द्यावे लागले असते तर निदान ३ हजार कोटी रुपये खर्च करावे लागले असते. म्हणजे त्यांच्या शिक्षणासाठी इतर देशांनी केलेल्या खर्चाचा फायदा मात्र अमेरिका घेत आहे. ह्याचाच अर्थ असा होतो की, अमेरिकेला इतकी रक्कम मदतीच्या परतफेडीपोटी मिळालेली आहे. अमेरिकेतील उच्च राहणीच्या मानाचे व तेथे मिळू शकणाऱ्या संधीचे आकर्षण वाटून अनेक परदेशी तज्ज्ञ तेथे जातात व स्थायिक होण्याचा प्रयत्न करतात. बुद्धिमान व कुशल लोकांचा अमेरिकेत वाहणारा हा ओघ इतर देशांना नुकसानकारक ठरतो. प्राध्यापक टिटमस ह्यांनी असा हिशोब केला आहे की, इंग्लंडमध्ये एका डॉक्टरचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी २ लाख रुपये खर्च करावे लागतात. ब्रिटनसारख्या प्रगत देशाला जर बुद्धीची ही निर्यात परवडत नाही तर भारतासारख्या गरीब देशाला ती किती जाचक होत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी.

---

## बिहारमधील धरणांमुळे दुष्काळ टळला नाही

बिहारमध्ये गेल्या १०० वर्षांत पडला नाही असा भयंकर दुष्काळ पडला आहे. लक्षावधी लोक हाडांच्या सापळ्यासारखे दिसत आहेत. ज्या भागात दुष्काळाची तीव्रता सर्वांत अधिक आहे त्या भागापासून दामोदर नदी योजनेतील मोठमोठे तलाव फारसे दूर नाहीत. बोधगंगा जिल्हा दुष्काळग्रस्त आहे. तेथून तिलया धरण ३० मैलांपेक्षाही कमी अंतरावर आहे. कोनार धरण ५० मैलांवर आहे. आणखी ३० मैलांवर बोकॅरो धरण आहे. पाण्याने भरलेल्या ह्या तलावांचा दुष्काळ टाळण्याच्या कामी काही उपयोग होण्यासारखा नाही. एक कारण असे की, दुष्काळग्रस्त भागापेक्षा धरणे ही खालच्या पातळीवर आहेत. दुसरे असे की, धरणांची बांधणीच मुळी पूरनियंत्रण करण्यासाठी आणि वीजनिर्मितीसाठी करण्यात आलेली आहे. दुष्काळग्रस्त भागांतील भूमिगत पाणी शोधण्याचे फारसे प्रयत्न करण्यात आलेले नाहीत.

### उद्योगपती जे. आर. डी. टाटांची स्पष्टोक्ती

सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनी देशाचा आर्थिक व्यवहार सुसूत्र चालण्यासंबंधी आपले विचार स्पष्टपणे व्यक्त केले आहेत. श्री. टाटा म्हणतात की देशाची अर्थव्यवस्था नीट चालविण्याचे काम तज्ज्ञांचे आहे. त्यांच्याकडेच हे काम सोपविण्यात आले पाहिजे. पुढारलेल्या देशांतील ह्याबाबतचे धोरण लक्षात घेण्यासारखे आहे. अमेरिका, फ्रान्स, रशिआसारख्या प्रगत देशांतून आर्थिक जीवनाची सूत्रे धंदेवाईक तज्ज्ञांकडे सोपविण्याची वृत्ती वाढत आहे. व्यावसायिक कौशल्य आणि मुरब्बीपणा ह्यांना तेथे अधिकाधिक महत्त्व देण्यात येऊ लागले आहे. भारतामधील सध्याच्या सरकारात असलेले लोक ध्येयवादी असतील; परंतु अर्थव्यवहारांची जबाबदारी सांभाळण्याच्या बाबतीत ते नवखेच म्हणावे लागतील. त्यांना नवखे म्हणण्याने त्यांचा अपमान होतो असे मानण्याचे कारण नाही. सध्या देशापुढे एकापेक्षा एक मोठे आणि अवघड असे प्रश्न उभे राहिलेले आहेत. ह्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम केवळ राजकारणी लोकांकडे सोपवून भागणार नाही. उद्योगधंद्यांच्या संचालनाचा ज्यांना अनुभव नाही तेही ह्या कामी उपयोगी पडण्यासारखे नाहीत. अलीकडे समाजवाद हा शब्दप्रयोग अनेक वेळा वापरण्यात येतो. पण समाजवादाच्या लोकांच्या कल्पना मात्र फार जुन्या झालेल्या आहेत. कित्येक सरकारी नोकरांच्या समाजवादासंबंधीच्या कल्पनाही जुन्या झालेल्या आहेत. त्यांपैकी कित्येकांच्या समाजवादाच्या कल्पना ५० ते ६० वर्षांपूर्वीच्या आहेत. मार्क्सपासून उचललेल्या कल्पनांच्या पलीकडे अद्याप त्यांची मजल गेलेली नाही. मार्क्सनंतर खुद्द युरोपमध्ये समाजवादाच्या कल्पनेचा कसा विकास झाला हे त्यांना माहीत नाही.

---

### कोळशाच्या उत्पादनातील वाढीमुळे लाभ नाही

हिंद रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यापासून देशातील कोळशाला परदेशांतील बाजारपेठांत स्पर्धा करण्याचे अधिक सामर्थ्य आलेले आहे. परंतु त्याचा फायदा घेऊन परदेशीय चलन मिळविण्याच्या बाबतीत मात्र प्रगती झालेली नाही. कोळशाच्या खाणीच्या तोंडाशी कोळशाच्या मोठमोठ्या राशी पडून राहिलेल्या आहेत. त्याची देशात ठिकठिकाणी पाठवणी वेळेवर होत नाही आणि परदेशांत मोठ्या प्रमाणावर निर्यातही होत नाही. १९६५ साली दगडी कोळशाचे एकूण उत्पादन ६ कोटी, ९५ लाख टन झाले होते. गेल्या वर्षी कोळशाचे उत्पादन वाढून ते ७ कोटी, ५ लाख टनापर्यंत आले. १९६५ मध्ये भारत-पाक संघर्ष झाला. तेव्हापासून पाकिस्तानची बाजारपेठ भारताला बंद झाली. पाकिस्तान त्याला लागणारा कोळसा आता चीन व पूर्व अफ्रिकेतून आयात करीत आहे. त्याशिवाय इटली, डेनमार्क, अर्जेंटिना, इत्यादी देशांच्या बाजारपेठांनाही भारत मुकला आहे.

### सोन्याच्या उत्पादनात झालेली घट

कोलार येथील सोन्याच्या खाणीतील उत्पादन चालू वर्षी खूपच घटले आहे. त्यामुळे त्याच्या उत्पादनाचा खर्चही साहजिकच वाढला आहे. अधिकाऱ्यांच्या अंदाजाप्रमाणे ह्या वर्षी खाणीतून ९१,५०० औंस सोने निर्माण करण्यात येईल. गेल्या सहा वर्षांत झालेल्या सोन्याच्या उत्पादनाच्या मानाने हे उत्पादन सर्वांत कमी आहे. सोन्याच्या प्रत्येक औंसाच्या उत्पादनाची किंमत ४५० रुपयापर्यंत वाढली आहे. १९६१ पासून किमतीत झालेली ही वाढ अधिकात अधिक आहे. खाणीच्या विभागात पडलेल्या पावसामुळे खाणीत पाणी साचले. त्यामुळे आणि कामगारांच्या महागाईभत्त्यात वाढ केल्यामुळे सोन्याच्या उत्पादनाचा खर्च वाढला आहे. पुढील वर्षी १ लाख औंस सोन्याचे उत्पादन होईल असा अंदाज करण्यात आला आहे.

---

### टेलिफोनच्या देशी भाषांतील डायरेक्टऱ्या

टेलिफोन डायरेक्टरीच्या तामीळ व कन्नड भाषांतील आवृत्त्या अनुक्रमे मद्रास व म्हैसूर राज्यांतून लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. उत्तर प्रदेशात पोस्ट व टेलिग्राफ खात्याने पहिल्या प्रथमच हिंदी भाषेतील डायरेक्टरी प्रसिद्ध केली आहे. ह्या डायरेक्टरीत ८०० पृष्ठे आहेत आणि त्यात राज्यातील २६० टेलिफोन एक्चेंजमधील सर्व टेलिफोन ग्राहकांची नावे छापण्यात आली आहेत. अशाच प्रकारच्या हिंदी आवृत्त्या राजस्थान व मध्यप्रदेशात लवकरच प्रकाशित करण्यात येणार आहेत. पोस्ट व तार खात्याने भारतामधील सर्व प्रादेशिक भाषांतून अशा डायरेक्टऱ्या प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतलेला असून त्याप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

---

### अवमूल्यनाचा उद्देश साध्य झाला नाही

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेने भारताच्या निर्यातीसंबंधीचे एक विवरण प्रसिद्ध केले आहे. त्यात दिलेल्या माहितीप्रमाणे रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यानंतर निर्यातीत वाढ होईल ही अपेक्षा फोल ठरली आहे. अवमूल्यनाने निर्यातीला जोराची चालना मिळण्याचे तर बाजूलाच राहिले, उलट ताग, कापड व चहासारख्या प्रमुख निर्यातीत मोठ्या प्रमाणावर घट मात्र झालेली आहे. १९६६-६७ सालात निर्यात व्यापारात त्या पूर्वीच्या वर्षाच्या मानाने १४·२ कोटी डॉलर्स किमतीच्या मालाची घट झालेली आहे. देशातच अनेक प्रकारच्या मालाची तूट असली तरी निर्यात वाढविण्याचे प्रयत्न सातत्याने करण्यात आले असते तर त्यांना यश आले असते. भारतामधून निर्यात होणाऱ्या परंपरागत मालावर अवमूल्यनानंतर निर्यात कर बसविल्यामुळे निर्यात घटली असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

---

## आशियाच्या मदतीसाठी जपान तयार

आग्नेय आशियातील मागासलेले देश आपली आर्थिक भरभराट घडवून आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. ह्या विकसनशील देशांना मदत करण्याची तयारी जपानने दाखविली आहे. आग्नेय आशियातील देशांच्या विकासाचा विचार करण्यासाठी सरकारी पातळीवर जी परिषद मॅनिला येथे भरविण्यात आली, तिला हजर राहण्यासाठी जपानचे परराष्ट्रमंत्री आले होते. त्यांनी मदतीची ही घोषणा केली. जपानच्या ठोक राष्ट्रीय उत्पन्नापैकी ०.७३ टक्के ते १ टक्का उत्पन्न ह्या कामी वेचण्याची जपानची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, ही मदत आशिया विकास बँकेतर्फे देण्यात येईल आणि मदत जरूर असणाऱ्या देशांना ती सुलभ अटीवर उपलब्ध करण्यात येईल. पॅसिफिक महासागरावरील परिसरात असणाऱ्या सर्व देशांचे हितसंबंध लक्षात घेऊन ह्या प्रश्नाकडे विशाल दृष्टीने पाहण्यात आले पाहिजे. कारण, ह्या भागातील देशांना स्थैर्य आणि भरभराट ह्यांचा लाभ झाल्याशिवाय जगात खऱ्या अर्थाने स्थैर्य आणि समृद्धी स्थापन होणार नाही. आर्थिक विकासासाठी आशियातील देशांनी परस्परांशी सहकार्य केले पाहिजे. अशा सहकार्याच्या पायावरच आशियातील देश आपली भरभराट घडवून आणू शकतील. ही भरभराट साध्य झाली तर आशियातील देशांतील लोकांना सुखी जीवनाचा लाभ तर करून देता येईलच; पण शिवाय त्या देशांनी आपली प्रादेशिक जबाबदारी पार पाडल्याचे समाधानही त्यांना लाभेल. जपान आशियातील देशांचे औद्योगीकरण लांबविण्याचा प्रयत्न करील आणि त्या देशांच्या कच्च्या मालाची पुरवठा केंद्रे म्हणून उपयोग करील ही टीका निराधार आहे.

## रेल्वे फाटकावर होणाऱ्या अपघातांविरुद्ध इलाज

भारतात पसरलेल्या विस्तीर्ण रेल्वे मार्गावर अनेक ठिकाणी रूळ ओलांडण्यासाठी रस्त्यावर फाटकांची व्यवस्था असते. सर्वच फाटकांवर उघडझाप करण्यासाठी माणूस ठेवणे अगर पूल बांधणे खर्चाच्या दृष्टीने परवडत नाही. परिणामी बैलगाड्या, मोटारी अगर पादचारी अचानक गाडीखाली सापडतात व दगावतात. बंगलोर येथील टेलिफोन इंडस्ट्रीज कारखान्याने अशा फाटकावर बसविण्यासाठी एक दिवा तयार केला आहे. रूळावरून येणारी गाडी फाटकापासून काही ठराविक अंतरावर आल्यावर हा दिवा कित्येक मिनिटे सारखी उघडझाप करीत राहतो. त्यामुळे रूळ ओलांडणाऱ्या वाहनांना व माणसांना थांबण्याचा इशारा मिळतो. अशा प्रकारचे १२ दिवे रेल्वे फाटकावर बसविण्यासाठी नुकतेच रेल्वेच्या हवाली करण्यात आले आहेत.

## १९६६ साली कापडाच्या निर्यातीत बरीच घट

रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यानंतर भारताच्या कापडाच्या निर्यातीत बरीच घट झाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले आहे. १९६६ साली निर्यातीत १६.७ टक्के घट झाली. जानेवारी १९६७ मध्ये ३१५.७ लाख चौरस मीटर कापड निर्यात करण्यात आले. १९६६ च्या जानेवारी महिन्यात ३९८.९ लाख चौरस मीटर कापडाची निर्यात झाली होती. सुताच्या निर्यातीतही अशीच घट झालेली आहे. १९६६ साली जानेवारी महिन्यात १०.७ लाख किलोग्रॅम वजनाचे सूत निर्यात करण्यात आले होते, तर १९६७ साली जानेवारीत ८ लाख किलोग्रॅम सुताचीच निर्यात झाली. १९६५ साली निरनिराळ्या देशांना कापडाची जी निर्यात करण्यात आली त्या मानाने १९६६ साली कमी करण्यात आली. ब्रिटन, एडन, इराणच्या आखातामधील बंदरे, केनिया, टॅन्झानिया, सुडान आणि मलेशिआ ह्या देशांना करण्यात आलेल्या निर्यातीत विशेष घट झाली आहे. १९६६ सालच्या दुसऱ्या सहामाहीत ब्रिटनकडील निर्यातीत चांगलीच घट झाली. कापडावरील जकाती व निर्यातीमधील हिस्सेदारी युरोपिअन सामायिक बाजारपेठेतील देशांनी पूर्णपणे रद्द केली आहे. त्यामुळे पश्चिम युरोपात हिंदी कापडाला तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. फ्रान्स व इटली ह्या देशांकडील भारताची निर्यात बरी आहे. पण, आर्थिक मंदीमुळे बेल्जम, पश्चिम जर्मनी व हॉलंड ह्या देशांकडील निर्यात घटली आहे. पूर्व युरोपातील देशांना करण्यात येणाऱ्या कापडाच्या निर्यातीत मात्र बरीच वाढ झालेली आहे. रशियाकडील निर्यातही वाढली आहे. १९६७ साली ह्या देशांना होणारी कापडाची निर्यात वाढेल अशी अपेक्षा आहे.

## हस्तव्यवसायाच्या वस्तूंचे प्रदर्शन

जपानमधील टोकिओ शहरात हिंदमधील हस्तव्यवसायाच्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ते आठवडाभर सुरू होते. प्रदर्शन भरविण्यात जपानमधील हिंदी वकिलातीने व एअर इंडिआने मदत केली. हातमाग व हस्तव्यवसायाच्या वस्तूंच्या निर्यातीला प्रोत्साहन देणाऱ्या मंडळाच्या पुरस्काराने प्रदर्शन आयोजण्यात आले होते. प्रदर्शनात ग्रामोद्योगातील वस्तू, हातमागावरील कापड आणि इतर कलापूर्ण वस्तू ठेवण्यात आल्या होत्या. जपानमधील मित्सुकोशी डिपार्टमेंट स्टोअरमध्ये भरविण्यात आलेले हे प्रदर्शन मोठ्या प्रमाणावर होते. प्रदर्शनात मांडलेल्या वस्तूंनी जपानमधील लोकांचे लक्ष ताबडतोब वेधून घेतले. अनेक नागरिकांनी प्रदर्शनातील वस्तू विकत घेतल्या. वस्तू स्वस्त असल्या तरी त्यांच्या दर्जाबद्दल अधिक कसोशी राखण्यात आली पाहिजे, असे मत व्यक्त करण्यात आले.

## यंत्राइतकाच यंत्रे चालविणाराही महत्त्वाचा

पिलानी येथील बिर्ला इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलजी ह्या संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्याचा समारंभ श्री. जी. एल्. मेहता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. ह्या प्रसंगी बोलताना श्री. मेहता ह्यांनी मोलाचे विचार व्यक्त केले आहेत. भारताच्या उद्योगीकरणात तंत्रज्ञानाला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर असाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. आधुनिक उत्पादनात अद्ययावत् यंत्रांचा व ती चालविण्यासाठी लागणाऱ्या तांत्रिक ज्ञानाचा प्रभाव मोठा आहे. परंतु देशी अगर परदेशी यंत्रांची उभारणी करणे म्हणजे उद्योगीकरण नव्हे. ही यंत्रे चालविण्यासाठी लागणारी माणसे मुद्दाम शिकवून तयार केली नाहीत तर त्यांच्यापासून अपेक्षित फलप्राप्ती होणार नाही. म्हणूनच श्री. मेहता ह्यांनी यंत्रकौशल्यात तरबेज असलेल्या माणसांचे 'भांडवल' सर्वांत मोलाचे आहे असे म्हटले आहे. त्याचबरोबर त्यांनी आणखी एका मुद्यावर जोर दिला आहे. औद्योगिक प्रगती साधताना भारतासारख्या मागासलेल्या देशाला परदेशांतील तंत्रज्ञानावर सर्वस्वी भिस्त टाकून भागणार नाही, हे श्री. मेहता ह्यांनी स्पष्ट केले आहे. परदेशांतील तंत्रज्ञान त्या त्या देशांतील परिस्थितीतून उगम पावलेले असते. म्हणजे असे की, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन ह्या ज्ञानाचा श्रीगणेशा घातला गेलेला असतो. भारतात मात्र पुष्कळदा वेगळे दृश्य दिसते. परदेशांतील तंत्रज्ञान व ते वापरण्याच्या पद्धती जशाच्या तशा भारतात आणल्या जातात. देश-काल-परिस्थितीचा विचार न करता त्यांचा उपयोग केला जातो. शिवाय बदलणारी आर्थिक परिस्थिती आणि लोकांच्या आकांक्षा याचीही दखल घेतली जात नाही. त्यामुळे भारताच्या पंचवार्षिक योजनांचा जितका फायदा व्हावयास पाहिजे तितका होत नाही, असे मत श्री. मेहता ह्यांनी व्यक्त केले.

## खनिज संपत्तीचा आधुनिक पद्धतीने शोध

हिंदमधील खनिज संपत्तीच्या शोधाला अद्याप पुष्कळ वाव आहे. आधुनिक जीवनात खनिज संपत्तीला महत्त्वाचे स्थान असल्यामुळे ह्या संपत्तीचा शोध त्वरेने लावण्याची गरज आहे. खनिज तेलाच्या साठ्याबाबत आतापर्यंत बरेच काम झाले आहे. परंतु इतर खनिजाबाबत अशी स्थिती नाही. मध्यवर्ती सरकारच्या खाणी व खनिज खात्याने ह्या संपत्तीची पाहणी व शोध करण्यासाठी नव्या पद्धतीचा स्वीकार करण्याचे ठरविले आहे. ह्या पद्धतीत अद्ययावत् साधनाबरोबरच विमानाचाही वापर करण्यात येतो. खनिजाच्या पाहणीच्या कामात अमेरिकेचे सहकार्य मिळविण्यात आले आहे. आंध्र प्रदेश, राजस्थान आणि बिहार ह्या राज्यांना पाहणीत प्राधान्य देण्यात येईल. कारण तेथे खनिज संपत्ती अधिक विपुल आहे. पाहणीसाठी ४·५ कोटी रुपये खर्च येईल.

## खादीची सक्ती नाही

पंजाब सरकारने एक हुकूम काढून सरकारी खात्यावरील खादीच्या कापडास प्राधान्य देण्याची सक्ती काढून टाकली आहे. टिकाऊपणा आणि स्वस्तपणा ह्या दृष्टीने त्यांनी ह्यापुढे कोणतेही कापड घेण्यास हरकत नाही; खादी घेण्यासही मज्जाव नाही.

## इंजिनिअर्समधील बेकारी

ओरिसा सरकारने आपल्या राज्यातील इंजिनिअरिंग शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या पन्नास टक्क्यांनी कमी करण्याचे ठरविले आहे. इंजिनिअरिंग ओव्हरसिअर्समधील वाढत्या बेकारीचा हा परिणाम आहे.

## कमिशन मिळविण्यासाठी १५ वर्षांच्या मुलावर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया

मद्रासमधील कुटुंबनियोजनाच्या एका अधिकृत फील्ड वर्करने एका १५ वर्षांच्या मुलावर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया घडवून आणली, त्याबद्दल मुलाच्या वडिलांनी तक्रार नोंदविल्यावरून त्या फील्ड वर्करला अटक करण्यात आली आहे. मुलाकडून शस्त्रक्रियेसाठी अर्जावर अंगठा घेतला, त्यात त्याचे वय २७ वर्षांचे दिले असून त्याला तीन अपत्ये आहेत असे खोटेच लिहून घेण्यात आले आहे. कुटुंबनियोजनाच्या प्रचारासाठी, शस्त्रक्रियेकरिता जे पेशंट मिळविण्यात येतात, त्या प्रत्येकाच्या बाबतीत एजंटाला सरकारकडून ३० रुपये कमिशन मिळते. ते मिळविण्यासाठी एजंट कोणत्या थराला जाऊ शकतात त्याचे हे विदारक उदाहरण आहे.


द. सा. द. शे. रुपये

७·६२/–

पर्यंत व्याज आपण मिळवू शकता

ठेवींची मुदत मोठी म्हणजे व्याज मोठे

एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते

इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते.


दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी :—सातारा

सत्तावीस शाखा

**साखरेच्या उत्पादनातील घटीचा परिणाम**

साखरेचे चालू हंगामातील उत्पादन १२ लाख टनांनी घटणार असल्याने रासायनिक कारखान्यांपैकी काही कारखान्यांवर आपत्ती ओढवणार आहे. साखरेचे उत्पादन करणारे काही कारखाने अल्कोहलची निर्मिती करीत असतात. पण, साखरेचे उत्पादनच घटल्यामुळे अल्कोहलच्या उत्पादनातही घट होणे अपरिहार्य आहे. सुमारे २ कोटी गॅलन कमी अल्कोहल होईल असा अंदाज करण्यात आला आहे. हा सरकारी अंदाज असला तरी अगदी अलीकडील माहितीप्रमाणे अल्कोहलच्या उत्पादनात ह्यापेक्षाही अधिक घट होण्याची शक्यता आहे. कारण, साखरेचे उत्पादन १२ लाख टनांनी घटण्याचा जबरदस्त संभव आहे. पण तसे झाले नाही आणि अल्कोहलचे उत्पादन २ कोटी गॅलन्सनी घटले तरीही अल्कोहल लागणाऱ्या रासायनिक कारखान्यांना ते जाचक ठरणार आहे. सध्याच कृत्रिम रासायनिक द्रव्ये तयार करणारे काही कारखाने बंद पडले आहेत. अल्कोहल आणि उसाच्या रसाची मळी हे पदार्थ राज्य सरकारांच्या अधिकार-कक्षेत आहेत. त्यामुळे त्याच्या वाटपाची एकसूत्री व्यवस्था करणे अवघड आहे. दुसरे असे की ह्या पदार्थांच्या निर्मितीच्या बाबतीत अधिक उत्पादन करणारी व तुटवडा असणारी राज्ये परस्परांपासून फार अंतरावर आहेत. त्यामुळे त्यांची वाहतूक अडचणीची व अव्यवहार्य आहे. महाराष्ट्र आणि म्हैसूर ही राज्ये ह्या बाबतीत शिलकीची आहेत. उत्तर प्रदेश आणि बिहार ही राज्ये तुटीची आहेत. परदेशांतून आयात करण्यासही परिस्थिती अनुकूल नाही. त्यांची वाहतूक अतिशय महागात पडेल हे तर झाले. पण परदेशांतून आयात करावयाची तर त्यासाठी परदेशीय चलन द्यावे लागेल. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळे ही गोष्ट शक्यतेच्या कोटीत नाही.





नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

# ठाकरसी फॅब्रिक्स्


फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड ·SANFORIZED·

THACKERSEY FABRICS

**ठाकरसी ग्रूप**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग अॅण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.



TM-56 MR


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १७ मे, १९६७ | अंक १०

## विविध माहिती

**रशियाला मदतीची विनंती**—बिहारचे मुख्य मंत्री श्री. महामाया प्रसादसिंह ह्यांनी बिहारमधील दुष्काळग्रस्तांना मोठ्या प्रमाणावर मदत करण्याची विनंती रशियाला केली आहे. बिहारच्या ५ कोटी लोकसंख्येपैकी ४ कोटी लोक अन्नाच्या व पाण्याच्या टंचाईने गांजून गेलेले आहेत. अशा प्रकारच्या मोठ्या आपत्तीत प्रत्येक देशाने माणुसकीच्या नात्याने मदतीस धावावे अशी त्यांची कळकळीची विनंती आहे.

**टेलिव्हिजनचा उंचच उंच मनोरा**—मॉस्को शहराजवळ टेलिव्हिजनचे कार्यक्रम प्रक्षेपित करण्यासाठी एक उंच मनोरा बांधण्यात येत आहे. त्याची उंची ५३३ मीटर म्हणजे सुप्रसिद्ध चिऑपच्या पिरॅमिडपेक्षा २॥ पटीने अधिक आहे. इतक्या उंचीच्या मनोऱ्यावरून प्रक्षेपित होणारे कार्यक्रम १५० किलोमीटरच्या त्रिज्येत पडद्यावर पाहता येतील.

**एकशिंगी गेंड्यांचे जतन**—गोहाटीपासून १३० मैलावर गेंड्यांच्या जतनासाठी १९०८ साली एक राखीव जंगल विभाग स्थापन करण्यात आला. नाकावर एकच शिंग असलेला गेंडा फक्त भारतांतच सापडतो. शिकारी लोकांनी ह्या प्राण्यांची हत्या करून त्यांचा नाश होण्याची पाळी आणली होती. गेल्या वर्षी गेंड्यांची संख्या ३७० असल्याचे आढळून आले. त्यांची संख्या अवघ्या १२ वर आली होती.

**मद्रासमधील शिक्षण स्वस्त**—भारतामध्ये परदेशांतून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मद्रासमध्ये शिक्षण घेणे इतर ठिकाणांच्या मानाने अधिक स्वस्त पडते असा दावा मद्रास विद्यापीठातर्फे करण्यात आला आहे. मद्रास शहरात शिक्षण घेणाऱ्या विद्यापीठ विद्यार्थ्यांपैकी २ टक्के विद्यार्थी परदेशांतील आहेत, व त्यांपैकी एकतृतीआंश मुली आहेत. मद्रास विद्यापीठात सध्या १४०० परदेशीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ते सर्व आफ्रिका, मॅलेशिआ कीनिआ व फिजी ह्या देशांतून आलेले आहेत.

**दोन वर्षे मुले नकोत**—मध्यवर्ती सरकारचे आरोग्यमंत्री डॉ. चंद्रशेखर हैद्राबाद येथे बोलताना म्हणाले की, नवपरिणितांनी दोन वर्षे तरी मूल होऊ देऊ नये. त्याचप्रमाणे एखाद्या जोडप्याला तिनापेक्षा अधिक अपत्ये झाल्यास ही कृती देशाभिमानाशी विसंगत अशी समजण्यात यावी. तरच लोकसंख्येला आळा बसण्याची शक्यता आहे.

**सोने गाळण्याच्या भट्ट्या**—मद्रास राज्यात सोन्याच्या कांबी तयार करण्याच्या ४ भट्ट्या उभारण्याचे परवाने देण्यात आले आहेत. त्यांपैकी दोन खुद्द मद्रास शहरांत आणि उरलेल्या दोन अनुक्रमे कोइमतूर व तिरुवायर ह्या ठिकाणी उभारण्यात यावयाच्या आहेत. मुंबई येथील टाकसाळीत साच्यांची मागणी नोंदण्यात आली आहे.

**संकटकालाचे भविष्यकथन** — इंग्लंडमध्ये स्थायिक झालेले एक ज्योतिषी श्री. एम्. के. गांधी ह्यांनी असे भविष्य वर्तविले आहे की, येता मे व नोव्हेंबर महिना भारताला अतिशय वाईट जाणार आहेत. पाश्चात्त्य देशात ज्योतिष शास्त्राचा कसून अभ्यास होत असून अमेरिकेंत तर अवकाश संशोधनाच्या कामी हवामानाचा अंदाज करण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले.

**पवई येथील विद्यार्थ्यांचे साह्य**—मुंबईमधील पवई येथील तांत्रिक संस्थेत शिकणारे विद्यार्थी बिहारमधील दुष्काळग्रस्त भागांत विहिरी खोदण्याच्या व पाटबंधारे बांधण्याच्या कामी मदत करणार आहेत. विद्यार्थ्यांची पहिली तुकडी लवकरच तिकडे रवाना होईल. एका आठवड्यानंतर त्यांच्या जागी दुसरी तुकडी जाईल. प्रत्येक तुकडीत १२ ते १५ विद्यार्थी असतील.

**स्वयंचलित कारखान्यांना प्राधान्य**—रशियाने आपल्या कारखान्यांत स्वयंचलित यंत्रसामग्री बसविण्यावर भर दिला आहे. त्यामुळे ह्या वर्षी ७० कोटी रुबल्स अथवा २८ कोटी पौंडांची बचत होणार आहे. रशियाची उत्पादनव्यवस्था अजूनही अमेरिकेच्या मानाने मागासलेली आहे. स्वयंचलित यंत्रसाहित्याच्या साह्याने ती अद्ययावत करण्याचे प्रयत्न जोरात चालू आहेत.

### करमणुकीवरील खर्चात काटछाट होऊं लागली

अलीकडील एकदोन वर्षांत जीवनावश्यक वस्तूंचे भाव भडकत चाललेले असून ते खाली येण्याची चिन्हें अद्याप दिसत नाहीत. अशा परिस्थितीत सामान्य माणसाला आपल्या आयव्ययाकडे अधिक दक्षतेने लक्ष पुरविणे भाग पडत असते. पुण्यातील सिनेमाशोकिनांनी असे केलेले दिसते. इतरही कांही क्षेत्रांत वाढत्या महागाईचा परिणाम दिसू लागला आहे. सिनेमाच्या प्रेक्षकांची संख्या घटत चालली आहे. त्याचप्रमाणे मासिके, छायाचित्रणाची साधने, खेळणी, ह्यांची मागणी कमी होऊ लागली आहे. हौशीने छायाचित्रण करणारे आपली हौस बेताबेताने भागवीत असावे. त्यांच्याकडून होणारी छायाचित्रणाच्या साधनांची मागणी ४० टक्क्यांनी घटली आहे. पुणे शहरात व त्याच्या उपनगरांत २५ चित्रगृहे आहेत. चित्रगृहांना करमणुकीवरील कराच्या निमित्ताने प्रेक्षकांची आंकडेवारी जमवावी लागते. अशा रीतीने जमा झालेली माहिती उद्बोधक आहे. १९६५ च्या डिसेंबर महिन्यात १० लाख, ३४ हजारांवर प्रेक्षकांनी चित्रगृहांना भेटी दिल्या. त्यानंतरच्या तिमाहींत एकूण २७ लाख, ६१ हजारांवर प्रेक्षकांची नोंद करण्यात आली आहे. म्हणजे प्रेक्षकांची मासिक सरासरी ९ लाख, २० हजारांवर पडते. १९६७ च्या पहिल्या तिमाहीत प्रेक्षकांची एकूण संख्या २७ लाख, १९ हजार होती. ह्याचा अर्थ असा की १९६६ च्या पहिल्या तिमाहीशी तुलना करता १९६७ च्या पहिल्या तिमाहीतील प्रेक्षकांची संख्या १.६ टक्क्यांनी घटली. अर्थात प्रेक्षकांच्या संख्येत झालेली घट फार मोठी आहे अशातला भाग नाही. परंतु त्यामुळे चित्रगृहांच्या धंद्यावर मंदीची सावली पडू लागल्याची भीती निर्माण झाली आहे. गेल्या वर्षी चित्रगृहांच्या मालकांनी तिकिटांचे दर वाढविले असतांनासुद्धा प्रेक्षकांच्या संख्येत अशी घट झाली नव्हती.

### टिकाऊ अन्नपदार्थांचे वाढते महत्त्व

विविध प्रकारचे हवामान असणाऱ्या भारतासारख्या खंडप्राय देशात अन्नपदार्थांचे अनेक प्रकार आहेत. त्यांपैकी पुष्कळसे पदार्थ ऋतुमानाप्रमाणे ठराविक काळातच उपलब्ध होतात. पीकपाणी चांगले झाले तर कांही पदार्थ काही ठिकाणी विपुलही मिळू शकतात. परंतु असे पदार्थ टिकाऊ स्वरूपात साठवण्याचा धंदा अजून फारसा विकसित झालेला नाही. फळे हवाबंद डब्यांतून भरण्याचा धंदा काहीसा वाढीला लागला आहे. टिकाऊ अन्नपदार्थ करण्याची दुसरी एक पद्धत म्हणजे अन्नपदार्थ निर्जल करून टिकविणे. वाटाणे, कांदे, बटाटे आणि इतर काही भाज्या अशा रीतीनें टिकविता येतात. ह्या पद्धतीने कारखान्याला फार मोठे भांडवल लागत नाही. वरखर्चही बेताचा लागतो. त्यामुळे असे टिकाऊ पदार्थ सामान्य लोकांना घेणे परवडते. अमेरिकेत अशा टिकाऊ अन्नपदार्थांचे ८,००० प्रकार मिळू शकतात.


## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

दातांच्या स्वच्छतेसाठी

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

# अर्थ

बुधवार, १७ मे, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताला मिळणाऱ्या परदेशी मदतीचे तुलनात्मक स्वरूप

### चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमावरील एक चर्चा

भारताच्या ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मसुद्यावर देशात बरीच चर्चा झालेली आहे. त्यात कार्यक्रमात काटछाट करून तो आटोपशीर करावा असे म्हणणारे तज्ज्ञ आहेत, त्याचप्रमाणे संकल्पित मोठ्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस पाठिंबा देणारेही आहेत. ह्या कार्यक्रमासंबंधी ससेक्स विद्यापीठाने ब्रिटनमध्ये एक परिसंवाद घडवून आणला. परिसंवादात भाग घेण्यासाठी भारताच्या नियोजनात भाग घेणारे तीन तज्ज्ञ गेले होते. परिसंवादात झालेल्या टीकेचे त्यांनी स्वागत केले आणि भारतापुढील प्रश्नांची बरोबर उत्तरे शोधून काढण्याचा प्रयत्न केला. परिसंवादात झालेल्या चर्चेवरून असे दिसून आले की कोणतेही मोजमाप लावले तरी भारताला जगाकडून आणि ब्रिटनकडून मिळणाऱ्या मदतीचे प्रमाण फारच अल्प आहे. भारत हा देश जगातील सर्वांत गरीब आणि निकस आहारावर जगणारा आहे. आर्थिक विकासासाठी मदत घेणाऱ्या देशात भारताचे आर्थिक नियोजन सर्वांत अधिक कार्यक्षम आणि भ्रष्टाचारापासून अलिप्त आहे. राजकीय अगर सांस्कृतिक मागासलेपणामुळे त्याची प्रगती खुंटलेली नाही. परदेशीय चलनाची आणि परदेशीय तज्ज्ञांची टंचाई भारताला भोवत आहे. म्हणून त्याची प्रगती खुंटलेली आहे. ह्याच दोन गोष्टी परदेशांच्या मदतीच्या द्वारे मिळत असतात. मदत घेणाऱ्या देशात राजकीय दृष्ट्या भारतामधील लोकशाही ही विशेष स्वरूपाची आहे. भारताला चीनसारख्या हुकुमशाही देशाकडून तर धोका उत्पन्न झाला आहेच. परंतु खुद्द देशातील धार्मिक भावनावर आधारलेल्या चळवळी आणि फुटून निघण्याच्या चळवळी ह्यांचाही धोका उत्पन्न झालेला आहे.

असे असूनसुद्धा १९६२–६४ ह्या कालात भारताला परदेशांतून दरडोई अवघी २·१ डॉलर्सची मदत मिळाली. इतर देशांना मिळालेल्या मदतीचे पुढील आकडे उद्बोधक वाटतील ह्यात शंका नाही. १९६२–६४ ह्या कालात पाकिस्तानला दरडोई ५·० डॉलर्स, मलावीला ५·० डॉलर्स, कीनिआला ५·९ डॉलर्स, बोलिव्हिआला ११·१ डॉलर्स, चिलीला १७·४ डॉलर्स आणि फिलिपाइन्सला ५३·० डॉलर्स मदत मिळाली. १९६४–६५ सालात ब्रिटनने दिलेल्या मदतीचे आकडे असे आहेत. भारत ०·१९ डॉलर्स, पाकिस्तान ०·२७ डॉलर्स, मलावी ७·७ डॉलर्स, कीनिआ ५·४ डॉलर्स, चिली ०·३१ डॉलर्स. मागासलेल्या देशांना प्रगत देशांकडून मिळणाऱ्या मदतीत अलीकडे घट होत चाललेली आहे. त्यातही भारताला मिळणाऱ्या मदतीत आणखीच कपात होत आहे. ह्या परिस्थितीची कारणमीमांसा करताना दोन कारणांवर बोट ठेवण्यात आले. भारताच्या भवितव्याविषयी घनघोर निराशा आणि परदेशी मदतीमुळे काय साधता येईल ह्याविषयी नीटशी माहिती नसणे, अशी ती कारणे आहेत. ही निराशा भोळसट राजकारण आणि अदूरदृष्टीची आर्थिक धोरणे ह्यांतून उगम पावलेली आहे. भारताच्या स्थैर्याला खरा धोका आहे तो आर्थिक विस्कळीतपणापासून आहे. भारत आपल्या गरजेपैकी ९० टक्के अन्नधान्याची गरज सामान्यतः स्वतःच्या उत्पादनातून भागवू शकतो. परंतु अन्नधान्याच्या टंचाईचे संकट उत्पन्न झाल्यावर परदेशीय चलनाचा आधार घेतल्याशिवाय भारत सरकारला लोकांच्या गरजा भागविता येत नाहीत. परदेशीय चलनाच्या वाटणीवर नियंत्रण ठेवूनच मध्यवर्ती सरकारला राज्य सरकारांना शिस्त लावणे शक्य होते. भारताच्या राजकीय अस्थैर्याच्या भीतिप्रद वार्तांचा बाऊ करून पाश्चिमात्य देश आर्थिक मदत आखडती घेत आहेत. खरे म्हणजे ह्या वार्तांमुळेच अधिक आर्थिक मदत देण्यास त्यांनी सिद्ध झाले पाहिजे.

---

### नव्या मदतीतून कर्जाची फेड करण्याची सवलत

भारताला मदत करणाऱ्या मित्रराष्ट्रांच्या संघटनेने ९० कोटी डॉलर्सची मदत देण्याचे आश्वासन दिलेले आहे. ही सर्व मदत कोणत्याही विकास प्रकल्पासाठी अशी देण्यात आलेली नाही. म्हणजे ती निर्बंधांनी जखडलेली नाही. ह्या मदतीपैकी ४० कोटी डॉलर्सची मदत भारताने १९६७–६८ साली परतफेड करावयाच्या परदेशी कर्जासाठी वापरता येईल. ह्या वर्षी भारताने ३६·५ कोटी डॉलर्सची रक्कम दात्या देशांना परत करावयाची आहे. आतापर्यंत वेगळी परिस्थिती होती. निर्बंधरहित असणारी मदतसुद्धा विशिष्ट प्रकारचा माल दात्या देशांकडूनच विकत घेण्याची अट घालण्यात येत असे. ह्या वर्षी दात्या देशांकडून मिळणारी मदत त्या त्या देशातच माल खरेदीसाठी वापरण्यात यावी अशी अट आहेच. परंतु, अमुक एक मालच घेतला पाहिजे असे बंधन मात्र नाही. त्यामुळे भारताला नवीन मदत कर्जफेडीपोटी वापरता येईल.

---

## जेट विमानांसाठी इंधनाची निर्मिती

१९६२ मध्ये चीनशी झालेल्या समरप्रसंगाच्या वेळी आणि नंतर १९६५ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धाच्या वेळी लष्करासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीच्या बाबतीत भारत परावलंबी असल्याचें तीव्रतेने जाणवले. आधुनिक युद्धात आवश्यक असणाऱ्या अनेक वस्तूंचे उत्पादन भारतातच करण्याचे प्रयत्न तेव्हापासून जोराने सुरू झाले आहेत. अशा अनेक वस्तूंत जेट विमानांना लागणाऱ्या इंधनाचे स्थान महत्त्वाचे आहे. ह्या इंधनाची गरज आतापर्यंत परदेशांतून आयात करून भागवावी लागत असे. आता भारतात कोयाली, बरौनी आणि नूनमती या तीन ठिकाणच्या तेलशुद्धी कारखान्यांतून जेट विमानांना लागणारे इंधन तयार होऊ लागले आहे. त्यापैकी पहिल्या दोन कारखान्यांतून इंधनाचे उत्पादन सुरू होऊन दोन तीन महिने झाले आहेत. नूनमती येथील कारखान्यात आता उत्पादन सुरू झाले आहे. तिन्ही कारखान्यांत होणाऱ्या उत्पादनामुळे ह्या इंधनाच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गास लागला आहे. नूनमनी येथील कारखान्यात दरसाल २५ हजार मेट्रिक टन इंधन तयार होईल. त्यामुळे ६० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊ लागेल. नूनमती येथील कारखान्यात होणाऱ्या उत्पादनासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. ह्या कारखान्यात जी यंत्रसामग्री आहे ती मुळात जेटचे इंधन तयार करणारी नाही. त्याच यंत्रसामग्रीत जरूर तो फरक करून हिंदी तंत्रज्ञांनी ती नव्या प्रकारच्या उत्पादनास जुळती करून घेतली आहे. हे काम कारखान्यातील तंत्रज्ञांनी ४ महिन्यांच्या अवधीत पार पाडले. खनिज तेलाच्या निर्मितीचे तंत्र भारतात अद्याप नवीन आहे. त्या दृष्टीने हिंदी तंत्रज्ञांची कर्तबगारी वाखाणण्यासारखी आहे.

---

## धूम्रपानाचे व्यसन कमी होईल काय ?

१९६४ मध्ये अमेरिकेच्या सरकारने धूम्रपानापासून होणाऱ्या हानिकारक रोगांसंबंधी एक अहवाल प्रसिद्ध केला होता. धूम्रपानामुळे कॅन्सरसारखे रोग होतात; निदान अशा रोगांना पोषक परिस्थिती निर्माण होते असा अभिप्राय अहवालात व्यक्त करण्यात आला होता. अहवालाचा परिणाम म्हणूनच की काय तेव्हापासून १.९ कोटी अमेरिकनांनी धूम्रपान वर्ज्य केले होते. त्यामुळे सिगारेटसचे कारखानदार साहजिकच चिंतामग्न झाले होते. पण त्यांना तसे होण्याचे काही कारण दिसत नाही. कारण गेल्या वर्षी अमेरिकेत सुमारे ५४,१०० कोटी सिगारेटसचा खप झाला. अमेरिकन तरुणांत सिगारेटस ओढण्याची लाट पसरतच चालल्यासारखी दिसते. सिगारेटसच्या कारखान्यांच्या जाहिराती बहुधा त्यांना उद्देशूनच केलेल्या असतात. कारखानदार सिगारेटस धोकारहित करण्याचे प्रयत्नही करीत आहेत. दोन ब्रिटिश कारखानदार ह्यासाठी मोठ्या प्रमाणावर संशोधनही करीत आहेत.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, ' अर्थ '


किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.





**धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...**

परंतु किर्लोस्कर डिझेल एंजिन वापरण्यानें धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहींत...



बहुधा, प्रत्येक तीन शेतकऱ्यांमागे एकजण **किर्लोस्कर डिझेल एंजिनचा** मालक असतो.

शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.

बिनत्रासाची व अखंड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर पाडील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यात आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाही. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.

किर्लोस्कर डिझेल एंजिन्स

३ ते १५ हॉर्स पॉवर

**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.**

एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)

TOM & BAY KO: 667-A MAR

### जेट विमानांसाठी इंधनाची निर्मिती

१९६२ मध्ये चीनशी झालेल्या समरप्रसंगाच्या वेळी आणि नंतर १९६५ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धाच्या वेळी लष्करासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीच्या बाबतीत भारत परावलंबी असल्याचे तीव्रतेने जाणवले. आधुनिक युद्धात आवश्यक असणाऱ्या अनेक वस्तूंचे उत्पादन भारतातच करण्याचे प्रयत्न तेव्हापासून जोराने सुरू झाले आहेत. अशा अनेक वस्तूंत जेट विमानांना लागणाऱ्या इंधनाचे स्थान महत्त्वाचे आहे. ह्या इंधनाची गरज आतापर्यंत परदेशांतून आयात करून भागवावी लागत असे. आता भारतात कोयाली, बरौनी आणि नूनमती या तीन ठिकाणच्या तेलशुद्धी कारखान्यांतून जेट विमानांना लागणारे इंधन तयार होऊ लागले आहे. त्यापैकी पहिल्या दोन कारखान्यांतून इंधनाचे उत्पादन सुरू होऊन दोन तीन महिने झाले आहेत. नूनमती येथील कारखान्यात आता उत्पादन सुरू झाले आहे. तिन्ही कारखान्यांत होणाऱ्या उत्पादनामुळे ह्या इंधनाच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण होण्याच्या मार्गास लागला आहे. नूनमती येथील कारखान्यात दरसाल २५ हजार मेट्रिक टन इंधन तयार होईल. त्यामुळे ६० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊ लागेल. नूनमती येथील कारखान्यात होणाऱ्या उत्पादनासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. ह्या कारखान्यात जी यंत्रसामग्री आहे ती मुळात जेटचे इंधन तयार करणारी नाही. त्याच यंत्रसामग्रीत जरूर तो फरक करून हिंदी तंत्रज्ञांनी ती नव्या प्रकारच्या उत्पादनास जुळती करून घेतली आहे. हे काम कारखान्यातील तंत्रज्ञांनी ४ महिन्यांच्या अवधीत पार पाडले. खनिज तेलाच्या निर्मितीचे तंत्र भारतात अद्याप नवीन आहे. त्या दृष्टीने हिंदी तंत्रज्ञांची कर्तबगारी वाखाणण्यासारखी आहे.

---

### धूम्रपानाचे व्यसन कमी होईल काय ?

१९६४ मध्ये अमेरिकेच्या सरकारने धूम्रपानापासून होणाऱ्या हानिकारक रोगांसंबंधी एक अहवाल प्रसिद्ध केला होता. धूम्रपानामुळे कॅन्सरसारखे रोग होतात; निदान अशा रोगांना पोषक परिस्थिती निर्माण होते असा अभिप्राय अहवालात व्यक्त करण्यात आला होता. अहवालाचा परिणाम म्हणूनच की काय तेव्हापासून १·९ कोटी अमेरिकनांनी धूम्रपान वर्ज्य केले होते. त्यामुळे सिगारेटसचे कारखानदार साहजिकच चिंतामग्न झाले होते. पण त्यांना तसे होण्याचे काही कारण दिसत नाही. कारण गेल्या वर्षी अमेरिकेत सुमारे ५४,१०० कोटी सिगारेटसचा खप झाला. अमेरिकन तरुणांत सिगारेटस् ओढण्याची लाट पसरतच चालल्यासारखी दिसते. सिगारेटस्च्या कारखान्यांच्या जाहिराती बहुधा त्यांना उद्देशूनच केलेल्या असतात. कारखानदार सिगारेटस् धोकारहित करण्याचे प्रयत्नही करीत आहेत. दोन ब्रिटिश कारखानदार ह्यासाठी मोठ्या प्रमाणावर संशोधनही करीत आहेत.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

आपली चलनी नोट

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, ' अर्थ '


किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.





धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...

परंतु किर्लोस्कर डिझेल एंजिन वापरण्याने धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहीत...



बहुधा, प्रत्येक शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.

शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळे संपादन केला आहे.

बिनत्रासाची व अखंड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर पाडील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरीत्या हलविता येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाही. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.

किर्लोस्कर

डिझेल एंजिन्स

३ ते १५ हॉर्स पॉवर

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड

एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)

TOM & BAY KO: 667-A MAR

## श्री. शंकरराव थत्ते ह्यांचा उद्यान प्रासाद

पुण्यातील 'उद्यान प्रासादा' चे कल्पक निर्माते श्री. शंकरराव थत्ते ह्यांनी एका अत्यंत उपयुक्त समाजोपयोगी संस्थेची भर घातली आहे. त्यांची दृष्टी केवळ पैसे कमाविण्याची नसून त्यात ध्येयवाद आहे, समाजाची गरज उत्कृष्ट रीतीने भागवीत असताना सामाजिक समारंभांना इष्ट ते वळण नकळत लावण्याचीही त्यांची मनीषा आहे. ह्या दृष्टीनेच त्यांनी उद्यान प्रासादाची रचना केलेली आहे. प्रत्येक लहानसहान गोष्टही आदर्श करण्याचा त्यांचा निश्चय असतो, आणि तो सफल होण्यास सुयोग्य अशी स्वतःची इमारत असणे अत्यावश्यकच होते. स्वतःच्या सेवावृत्तीच्या, उद्यमाच्या आणि चिकाटीच्या तपश्चर्येवर त्यांनी हा प्रासाद उभा केला असून विविध सुखसोयींनी सुसज्ज केला आहे. त्यांना समाजाचा मिळत असलेला पाठिंबा त्यांच्यावरील जनविश्वासाचेच प्रतीक आहे. श्री. शंकररावांची यापुढील स्वप्नेही सफल होवोत, असे आम्ही चिंतितो.

## ५ कोटी रुपयांची फळे दरसाल नासधूस होते

आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी नियमित फलाहाराची आवश्यकता असते असे आहारशास्त्रातील तज्ज्ञ सांगतात. भारताच्या विविध प्रकारच्या हवामानांत ऋतुमानाप्रमाणे अनेक तऱ्हेची फळे पिकतात. परंतु ती साठवून ठेवण्याची व्यवस्था नीट नसल्याने, त्यांचे पॅकिंग करण्याची व्यवस्था सदोष असल्याने आणि वाहतुकीची साधने अपुरी असल्यामुळे भारतात दरसाल १० लाख टन फळे कोणाच्याही मुखी न पडता नासधूस होऊन वाया जातात. किमतीच्या दृष्टीने विचार करता दरसाल ५ ते ६ कोटी रुपयांची हानी होते. भारत सरकारच्या शेतीखात्याने कलकत्ता, मुंबई, दिल्ली व मद्रास ह्या चार बाजारपेठांतील माहिती गोळा करून वरील निष्कर्ष काढला आहे. ह्या माहितीवरून असे लक्षात येते की दरसाल निरनिराळ्या ७ प्रकारची ७,६६४ टन फळे ह्या बाजारपेठांतून वाया जातात. बाजारात येणाऱ्या फळांपैकी ८ टक्के फळे अशा रीतीने नष्ट होतात. वरीलसारख्या मोठ्या शहरांतून फळे साठविण्याच्या सोयी काही प्रमाणात उपलब्ध असतात. तरीही इतकी नासधूस होते. पण, फळे प्रत्यक्ष पिकविण्यात येतात त्या ठिकाणी इतक्याही सोयी नसतात. हे लक्षात घेऊन असा अंदाज करण्यात आला आहे की देशात उत्पन्न होणाऱ्या फळांच्या १० टक्के हिस्सा वाया जात असावा. भारतात फळांच्या लागवडीखाली असणारी जमीन सुमारे २८ लाख एकर आहे. लागवडीखाली असणाऱ्या एकूण जमिनीशी हे प्रमाण ०.८ टक्के पडते. फळांचे एकूण उत्पादन सुमारे १ कोटी टन होते. ही सर्व फळे लोकांच्या आहारात आली असे धरले तरी प्रत्येक व्यक्तीला दररोज अवघी एकचतुर्थांश औंस फळे मिळतात असे होईल.

## कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमांना अमेरिकेची मदत

अविकसित देशांच्या कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला संततिप्रतिबंधक साधने पुरविण्यासाठी आणि त्यांचे उत्पादन करण्यासाठी आर्थिक मदत करण्याचे अमेरिकन सरकारने ठरविले आहे. १९४८ सालापासून अमलात असलेले धोरण आता बदलण्यात आले आहे. मदतीच्या कार्यक्रमात, बसविण्याचे लूप आणि खायच्या गोळ्या ह्यांचा समावेश आहे. १ जुलै, १९६७ रोजी सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात ह्या मदतीवर ७.५ कोटी रु. खर्च केले जातील.

## संततिप्रतिबंधक गोळ्यांना अपवाद नाही

लंडनमधील ग्रीक वकिलातीवर हल्ला केल्याबद्दल लंडनमध्ये पाच स्त्रियांना अटक करण्यात आली. तेव्हा आपल्याजवळील संततिप्रतिबंधक गोळ्या पोलिसांनी जप्त केल्याबद्दल त्यांनी सरकारकडे तक्रार केली. ह्या गोळ्या सतत २८ दिवस घ्याव्याच्या असतात आणि त्यात दोन दिवस खंड पडला तर बाळंतपणाचा धोका संभवतो, असे त्या स्त्रियांचे म्हणणे होते. "आरोपीजवळील सर्व तऱ्हेच्या गोळ्या काढून घेण्याची पद्धतच आहे." असे सरकारच्या गृहखात्याने त्याचे समर्थन केले.

## मंदिरांचे अधिकारी लग्ने रजिस्टर करणार

मंदिरांच्या अधिकाऱ्यांची १९५५ च्या हिंदू मॅरेज ॲक्टखाली 'मॅरेज रजिस्ट्रार' म्हणून मद्रास सरकारने नेमणुका केल्या आहेत. मंदिरांत साजऱ्या होणाऱ्या विवाहाच्या खर्चात त्यामुळे बचत होण्यास प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा आहे.

## डॉ. हुसेनना शृंगेरीच्या स्वामींचा आशीर्वाद

डॉ. झाकिर हुसेन ह्यांनी अध्यक्षपदाची शपथ घेण्यापूर्वी शृंगेरीचे जगद्गुरू श्रीशंकराचार्य ह्यांची भेट घेऊन त्यांचा आशीर्वाद मागितला. त्यानंतर त्यांनी जैन मुनी सुशीलकुमार ह्यांचेही आशीर्वाद घेतले.

## बुटपॉलिशवाल्यांची बिहार फंडाला मदत

मध्य रेल्वेच्या दादर ते मुलुंड मार्गावरील स्टेशनांवर बुटपॉलिश करणाऱ्या मुलांनी गेल्या शुक्रवारी व शनिवारी त्यांना झालेली सर्व प्राप्ती बिहार दुष्काळ निवारण फंडाला दिली. प्रत्येक बुटपॉलिशवाल्याची रोजची मिळकत १० ते २० रु. असते आणि अशा १०० मुलांनी ह्या मोहिमेत भाग घेतला. बुटपॉलिशिंग वर्कर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीने निधी जमविण्याचा हा उपक्रम पार पाडला. प्रत्येक मुलाजवळ सील केलेला डबा ठेवलेला होता, त्यात गिऱ्हाइकाने पॉलिशचे पैसे टाकावेत, अशी योजना होती.

### श्री. शंकरराव थत्ते ह्यांचा उद्यान प्रासाद

पुण्यातील 'उद्यान प्रासादा' चे कल्पक निर्माते श्री. शंकरराव थत्ते ह्यांनी एका अत्यंत उपयुक्त समाजोपयोगी संस्थेची भर घातली आहे. त्यांची दृष्टी केवळ पैसे कमाविण्याची नसून त्यात ध्येयवाद आहे, समाजाची गरज उत्कृष्ट रीतीने भागवीत असताना सामाजिक समारंभांना इष्ट ते वळण नकळत लावण्याचीही त्यांची मनीषा आहे. ह्या दृष्टीनेच त्यांनी उद्यान प्रासादाची रचना केलेली आहे. प्रत्येक लहानसहान गोष्टही आदर्श करण्याचा त्यांचा निश्चय असतो, आणि तो सफल होण्यास सुयोग्य अशी स्वतःची इमारत असणे अत्यावश्यकच होते. स्वतःच्या सेवावृत्तीच्या, उद्यमाच्या आणि चिकाटीच्या तपश्चर्येवर त्यांनी हा प्रासाद उभा केला असून विविध सुखसोयींनी सुसज्ज केला आहे. त्यांना समाजाचा मिळत असलेला पाठिंबा त्यांच्यावरील जनविश्वासाचेच प्रतीक आहे. श्री. शंकररावांची ह्यापुढील स्वप्नेही सफल होवोत, असे आम्ही चिंतितो.

---

### ५ कोटी फळांची दरसाल नासधूस होते

आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी नियमित फलाहाराची आवश्यकता असते असे आहारशास्त्रातील तज्ज्ञ सांगतात. भारताच्या विविध प्रकारच्या हवामानांत ऋतुमानाप्रमाणे अनेक तऱ्हेची फळे पिकतात. परंतु ती साठवून ठेवण्याची व्यवस्था नीट नसल्याने, त्यांचे पॅकिंग करण्याची व्यवस्था सदोष असल्याने आणि वाहतुकीची साधने अपुरी असल्यामुळे भारतात दरसाल १० लाख टन फळे कोणाच्याही मुखी न पडता नासधूस होऊन वाया जातात. किमतीच्या दृष्टीने विचार करता दरसाल ५ ते ६ कोटी रुपयांची हानी होते. भारत सरकारच्या शेतीखात्याने कलकत्ता, मुंबई, दिल्ली व मद्रास ह्या चार बाजारपेठांतील माहिती गोळा करून वरील निष्कर्ष काढला आहे. ह्या माहितीवरून असे लक्षात येते की दरसाल निरनिराळ्या ७ प्रकारची ७,६६४ टन फळे ह्या बाजारपेठांतून वाया जातात. बाजारात येणाऱ्या फळांपैकी ८ टक्के फळे अशा रीतीने नष्ट होतात. वरीलसारख्या मोठ्या शहरांतून फळे साठविण्याच्या सोयी काही प्रमाणात उपलब्ध असतात. तरीही इतकी नासधूस होते. पण, फळे प्रत्यक्ष पिकविण्यात येतात त्या ठिकाणी इतक्याही सोयी नसतात. हे लक्षात घेऊन असा अंदाज करण्यात आला आहे की देशात उत्पन्न होणाऱ्या फळांच्या १० टक्के हिस्सा वाया जात असावा. भारतात फळांच्या लागवडीखाली असणारी जमीन सुमारे २८ लाख एकर आहे. लागवडीखाली असणाऱ्या एकूण जमिनीशी हे प्रमाण ०·८ टक्के पडते. फळांचे एकूण उत्पादन सुमारे १ कोटी टन होते. ही सर्व फळे लोकांच्या आहारात आली असे धरले तरी प्रत्येक व्यक्तीला दररोज अन्नाची एकचतुर्थांश औंस फळे मिळतात असे होईल.

---

### कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमांना अमेरिकेची मदत

अविकसित देशांच्या कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला संततिप्रतिबंधक साधने पुरविण्यासाठी आणि त्यांचे उत्पादन करण्यासाठी आर्थिक मदत करण्याचे अमेरिकन सरकारने ठरविले आहे. १९४८ सालापासून अमलात असलेले धोरण आता बदलण्यात आले आहे. मदतीच्या कार्यक्रमात, बसविण्याचे लूप आणि खायच्या गोळ्या ह्यांचा समावेश आहे. १ जुलै, १९६७ रोजी सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात ह्या मदतीवर ७·५ कोटी रु. खर्च केले जातील.

---

### संततिप्रतिबंधक गोळ्यांना अपवाद नाही

लंडनमधील ग्रीक वकिलातीवर हल्ला केल्याबद्दल लंडनमध्ये पाच स्त्रियांना अटक करण्यात आली. तेव्हा आपल्याजवळील संततिप्रतिबंधक गोळ्या पोलिसांनी जप्त केल्याबद्दल त्यांनी सरकारकडे तक्रार केली. ह्या गोळ्या सतत २८ दिवस घ्यावयाच्या असतात आणि त्यात दोन दिवस खंड पडला तर बाळंतपणाचा धोका संभवतो, असे त्या स्त्रियांचे म्हणणे होते. "आरोपीजवळील सर्व तऱ्हेच्या गोळ्या काढून घेण्याची पद्धतच आहे." असे सरकारच्या गृहखात्याने त्याचे समर्थन केले.

### मंदिरांचे अधिकारी लग्ने रजिस्टर करणार

मंदिरांच्या अधिकाऱ्यांची १९५५ च्या हिंदू मॅरेज ॲक्टखाली 'मॅरेज रजिस्ट्रार' म्हणून मद्रास सरकारने नेमणुका केल्या आहेत. मंदिरांत साजऱ्या होणाऱ्या विवाहाच्या खर्चात त्यामुळे बचत होण्यास प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा आहे.

---

### डॉ. हुसेनना शृंगेरीच्या स्वामींचा आशीर्वाद

डॉ. झाकिर हुसेन ह्यांनी अध्यक्षपदाची शपथ घेण्यापूर्वी शृंगेरीचे जगद्गुरू श्रीशंकराचार्य ह्यांची भेट घेऊन त्यांचा आशीर्वाद मागितला. त्यानंतर त्यांनी जैन मुनी सुशीलकुमार ह्यांचेही आशीर्वाद घेतले.

---

### बुटपॉलिशवाल्यांची बिहार फंडाला मदत

मध्य रेल्वेच्या दादर ते मुलुंड मार्गावरील स्टेशनांवर बुटपॉलिश करणाऱ्या मुलांनी गेल्या शुक्रवारी व शनिवारी त्यांना झालेली सर्व प्राप्ती बिहार दुष्काळ निवारण फंडाला दिली. प्रत्येक बुटपॉलिशवाल्याची रोजची मिळकत १० ते २० रु. असते आणि अशा १०० मुलांनी ह्या मोहिमेत भाग घेतला. बुटपॉलिशिंग वर्कर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीने निधी जमविण्याचा हा उपक्रम पार पाडला. प्रत्येक मुलाजवळ सील केलेला डबा ठेवलेला होता, त्यात गिऱ्हाइकाने पॉलिशचे पैसे टाकावेत, अशी योजना होती.

## मच्छीमारीच्या धंद्यासाठी उपयुक्त शोध

अन्नधान्याच्या टंचाईला तोंड देण्यासाठी अनेक उपाय सुचविण्यात येत असतात. अशा उपायांत मच्छीमारीच्या धंद्याचा विकास करून खाद्यपदार्थात माशावर अधिक जोर देण्यात यावा असा एक उपाय सुचविण्यात येतो. परंतु मच्छीमारीचा धंदा हा काहीसा अनिश्चित स्वरूपाचा असतो. खोल समुद्रात मच्छीमारीसाठी जाणाऱ्या अद्ययावत बोटींवरील कोळ्यांनासुद्धा माशांची हमखास व विपुल प्राप्ती होईल अशी खात्री नसते. समुद्रात कोणत्या ठिकाणी माशांचे थवे सापडतील, त्यांचा आकार लहानमोठा कसा असेल, इत्यादी बाबींची खात्रीशीर माहिती मिळणे कठीण जाते. ह्या अडचणीवर उपाय म्हणून बंगलोर येथील भारत इलेक्ट्रॉनिक्स कंपनीने एक प्रकारचा मत्स्यशोधक तयार केला आहे. त्याच्या साह्याने जरूर ती माहिती मिळू शकते. अशा प्रकारचे यांत्रिक साधन भारतात पहिल्यानेच बनविण्यात आले आहे. मच्छीमारीच्या बोटींवर ते बसविता येते, आणि ३०० फूट खोल पाण्यातील मत्स्यसमूहांची माहिती ते गोळा करू शकते. केरळ राज्याच्या मच्छीमारी खात्याने ह्या उपकरणाचा उपयोग करून पाहिला असून ते समाधानकारक कार्य करीत असल्याचे आढळून आले आहे. ह्या उपकरणाचा उपयोग समुद्रतीरींच्या अनेक राज्यांतून करण्यात येत आहे. ठिकठिकाणी येणाऱ्या अनुभवांची चिकित्सा करण्याचे कार्य भारत सरकारमार्फत होत आहे. बंगलोर येथील कारखान्यांतून ६०० फूट खोल पाण्यातील मत्स्यांचा शोध लावणारे उपकरण तयार करण्यात येणार आहे. समुद्राच्या पाण्याने ह्या उपकरणाला गंज चढत नाही अगर इतर प्रकाराने त्याची हानी होत नाही. नव्या साधनाच्या साह्याने माशांची अधिक प्रमाणात प्राप्ती झाली तर धान्यावरील ताण कमी होण्यास मदत होईल.

## अल्युमिनमच्या उत्पादनाचे दोन कारखाने


भारताची अल्युमिनमची गरज भागविण्यासाठी कोयनेवरील विजेच्या साह्याने अल्युमिनमचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांत १९७१-७२ मध्ये प्रत्यक्ष उत्पादन करण्यात येऊ लागेल. मध्यप्रदेशातील कोरबा येथील कोळशाच्या खाणी विभागातही असाच एक कारखाना बांधण्यात येत आहे. तोही १९७१-७२ मध्ये उत्पादनक्षम अवस्थेत येईल. हे दोन्ही कारखाने सार्वजनिक मालकीचे राहणार आहेत. भारत सरकारच्या अर्थ खात्याने कोयना कारखान्यासाठी लागणारे परदेशीय चलन मंजूर केले आहे. पश्चिम जर्मनी, फ्रान्स व इटली ह्या देशांनी दिलेल्या कर्जाचा उपयोग करून परदेशीय चलनाची गरज भागविण्यात येणार आहे. कोयना कारखान्यासाठी एकूण ७३·५ कोटी रुपये खर्च येणार असून त्यापैकी २०·७ कोटी रुपयांचा खर्च परदेशीय चलनात करावा लागणार आहे. कोयना कारखान्यासंबंधीचा तपशीलवार आराखडा पश्चिम जर्मनीतील एका कारखान्याने तयार केला आहे. त्याची सध्या तपासणी चालू आहे. कारखान्याच्या प्राथमिक कामास चालू वर्षी प्रारंभ होईल असा अंदाज आहे. कोरबा येथील कारखान्याच्या उभारणीसाठी हंगेरी आणि रशिया ह्यांचे सहकार्य घेण्यात येत आहे. कारखान्यासाठी लागणारी वीज कोरबा विद्युत-केंद्राकडून घेण्यात येईल. त्याच्या दराबद्दल वाटाघाटी चालू आहेत. कोरबा अल्युमिनम कारखान्यासाठी सुमारे १०० कोटी रुपये खर्च येईल. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात दोन्ही कारखान्यासाठी म्हणून ८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तरी पण, नियोजन समितीने जरूर लागल्यास आणखी साह्य देण्याची तयारी दाखविली आहे.

## नागार्जुनसागर धरणात पाणी अडविणार

आंध्रमधील नागार्जुनसागर धरणाचे काम जवळजवळ पुरे होत आले आहे. पुढील पावसाळ्यात कृष्णा नदीला आलेल्या पुराचे पाणी आता अडवण्यात येणार आहे. हे धरण जगातील सर्वांत मोठे आणि सर्वांत उंच आहे. धरणाचे बांधकाम पायापासूनच दगडाचे करण्यात आलेले आहे. धरणाचा पाया जमिनीत १६ फुटांपर्यंत खोल गेलेला आहे. धरणाच्या पाण्याचा विस्तार ६० लाख एकरावर पसरेल. साठवलेल्या पाण्यातील निम्मे पाणी शेतीसाठी उपलब्ध करून देण्यात येईल. धरणाच्या भिंतीची सरासरी उंची पायापासून ३६० फूट राहील. भिंतीची ठरलेली पूर्ण उंची गाठण्याचे काम पावसाळ्यापूर्वी पुरे करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. सर्व काम पूर्ण झाल्यावर ११० चौरस मैलांवर पसरलेला एक मोठा जलाशयच अस्तित्वात येईल, व त्याची गणना जगातील एका मोठ्या जलाशयात करावी लागेल. नागार्जुनसागर धरणाचे काम १२ वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेले आहे. त्याच्या प्राथमिक खर्चासाठीच १४० कोटी रुपये खर्च करावे लागले. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय विकास मंडळातर्फे ह्या धरणासाठी ६० कोटी रुपये मदत मिळालेली आहे. त्याशिवाय भारत सरकारकडून १०० कोटी रुपयांची कर्जे मिळालेली आहेत. धरणापासून निघणाऱ्या उजव्या बाजूच्या कालव्याचे काम सध्या चालू आहे. ह्या कालव्याच्या पाण्याने ११·७४ लाख एकर जमीन ओलिताखाली येईल. आंध्र राज्यातील गुंटुर, कुर्नूल आणि नेलोर जिल्ह्यांतील शेतीला ह्या कालव्याचे पाणी मिळेल. डाव्या बाजूच्या १११ मैल लांबीच्या कालव्याचे कामही चालू झाले आहे. ते पूर्ण झाल्यावर सुमारे ८·८ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊ शकेल.

## दि बेळगाव बँक लि.

दि बेळगाव बँक लि. ला १९६६ साली बोनस देऊन १,३७,७६४ रु. नफा उरला. ठेवीची रक्कम ३·२१ कोटी रु. ची ३·६६ कोटी रुपयांवर गेली आणि खेळते भांडवल ३·८२ कोटी रु. वरून ४·४१ कोटी रु. वर गेले.




पुण्याच्या वैभवात भर टाकणारी एक नवी संस्था

## उद्यान प्रासाद

लेखक :—श्री. दत्तात्रय हरी थत्ते, साहित्याचार्य

आजकाल पुण्यात ज्या अनेक उलाढाली चालू आहेत त्यांत विवाह समारंभ नि तज्जन्य धावपळी नि चर्चा प्रमुख आहेत. लग्न म्हटले की कार्यालय आलेच. रास्ता पेठेतल्या खरोखरच दोन-तीन खोल्यांच्या कार्यालयापासून तो जिमखान्यावरल्या भपकेबाज नावाची कैक कार्यालये पुण्यात आहेत. पण आजकालच्या अद्ययावत सुखसोईंनी परिपूर्ण, केवळ भपकेबाज नव्हे तर खरोखर वैभवशाली नि सर्वांचे आवडते असे उद्यानप्रासादातील 'उद्यान कार्यालय' कसे उभे राहिले याचा परिचय मोठा उद्बोधक आहे.

उद्यान कार्यालयाचे संचालक रा. शंकरराव थत्ते हे प्राचीन प्रथेप्रमाणे, चाळीस वर्षांपूर्वी व्यवसायासाठी नि नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी कोकणातून पुण्यास आले. आर्थिक विपत्तीमुळे उच्च शिक्षणाचा विचार सोडून त्यांना व्यवसायात पदार्पण करावे लागले. भोजनालय, लघुलेखन वर्ग, घरोघर फिरून सोन्याचांदीचे दागिने विकणे, वगैरे अनेक उद्योग त्यांनी करून पाहिले; पण शंकररावांचे महत्त्वाकांक्षी मन कुठेच रमले नाही. पुढे १०१ रुपयांत संपूर्ण कार्य करण्याची योजना आखून त्याचा त्यांनी धडाक्याने प्रचार चालविला नि ती कार्ये ते इतकी थाटात नि यशस्वी करू लागले की मोठी मोठी कार्येही त्यांजकडे येऊ लागली. या कार्यांना जागा अपुरी पडू लागल्याने मनासारखे कार्य करावयाचे तर आपल्या मनासारखी सर्व सुखसोयींनी युक्त अशी इमारतही असावयास पाहिजे, या विचाराने मूळ धरले. म्हणून शंकरराव योग्य जागा शोधू लागले. अनेक दिवसांच्या प्रयत्नांनंतर आजची ही जागा त्यांच्या मनात भरली पण ती खरेदी करणे हेही मोठे चिकाटीचे, जिकिरीचे नि बुद्धिचातुर्याचे काम होते. त्यांनी सर्व शक्ती पणाला लावून भूमी तर खरेदी केली पण जागा साफ करणे, विहीर बांधणे आणि मुख्य म्हणजे आपली वहिवाट चालू करणे म्हणजे भावी ब्रह्मपदासाठी का होईना पण लोखंडाचे चणे खावे लागत होते. त्याही दिव्यातून पार पडल्यावर कल्पनेतल्या नमुन्याप्रमाणे इमारत बांधायची तर खर्चाचा अंदाज केवळ फक्त अक्षरी 'सात लक्ष रुपये' होत होता ! ! नुसत्या ह्या आकड्यानेच दुसऱ्या एखाद्या माणसाची छाती दडपून गेली असती, पण शंकरराव कच्च्या दिलाचे नव्हते की कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांची त्यांच्या ईश्वरावर नितांत श्रद्धा होती नि तो प्रयत्नांतीच पावतो यावरही त्यांचा विश्वास होता. शंकररावांनी खरोखरच भगीरथ प्रयत्न केले आणि ईश्वरानेच कुणाच्या तरी मनात प्रेरणा उत्पन्न केल्याने वेळोवेळी अवश्य त्या धनाच्या राशीच्या राशी त्यांच्या पुढे येऊन पडू लागल्या ! म्हणूनच अल्पावधीत, एकाच वेळी तीन, तीन मंगल कार्ये करता येतील एवढा केवळ प्रासादतुल्यच नव्हे तर खराखुरा "उद्यान प्रासाद" उभा राहिला.

शक्य होईल तेव्हा मध्यमवर्गासाठी काही दिनांक राखून ठेऊन बेताच्या भाड्याने जागा देणे, गरजू वधूपित्यांची अवश्य तर विनामूल्य राहण्याची सोय करणे आणि उद्यान प्रासादाचे संस्थान न बनविता ट्रस्ट करून 'संस्था' बनविणे, ही त्यांची मनोराज्ये त्यांच्या समाजसेवी, धीरोदात्त स्वभावाचीच निदर्शक नाहीत काय ?

---

### बडोद्यातील राहत्या घरांचा प्रश्न

बडोदा म्युनिसिपालिटीने शहरातील राहत्या घरांची एक पाहणी केली आहे. त्यावरून हा प्रश्न किती बिकट झाला आहे हे लक्षात येते. १९६१ साली शहरातील २५,६९६ घरांपैकी ७५ टक्के घरे राहण्यास योग्य अशा परिस्थितीत नव्हती. अशा घरांतून ४३ हजार बिऱ्हाडे कशीबशी राहात होती. १९६१ मध्ये बडोद्याची लोकसंख्या सुमारे ३ लाख होती. ती वाढत जाऊन १९६६ मध्ये ३ लाख, ७५ हजारांपर्यंत आली आहे. त्यामुळे असलेल्या घरांतच अधिक गर्दी झाली आहे. बडोदे शहराजवळ आता खनिज तेल व रासायनिक उद्योगधंदे निघणार आहेत. त्यामुळे शहरातील कामगारांची संख्या खूपच फुगत जाणार आहे.

---

### विजेच्या उत्पादनात दुप्पट वाढ करणार

नियोजन समितीचे सभासद प्रा. थॅकर बंगलोर येथे बोलताना म्हणाले की, देशातील विजेची गरज एकसारखी वाढत चाललेली आहे. ती पूर्ण करावयाची असेल तर चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पाच वर्षांच्या कालात विजेचे उत्पादन दुपटीने वाढविण्यात आले पाहिजे. ही गोष्ट साध्य करणे अशक्य नाही. परंतु त्याकरता वीजनिर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रसामग्रीच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला पाहिजे.

---

## कोणत्याही जामीनदाराकडून सावकाराला कर्ज वसूल करता येते

### मनोहर नाडगौडा वि. इस्लामपूर अर्बन को. बँक

एका इसमाने इस्लामपूर अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेपासून काही कर्ज काढले होते. त्या कर्जाचा जामीन दोन जामीन-दारांनी घेतला होता. मनोहर हा त्या दोघांपैकी एक जामीनदार होता. ज्याने कर्ज घेतले होते तो इसम (मूळ ऋणको) कर्ज काढल्यानंतर मरण पावला. त्यानंतर बँकेने त्या कर्जाबाबत वाद दाखल केला. त्या वादात मूळ ऋणकोचे वारस व दोघे जामीनदार यांना प्रतिवादी म्हणून जोडण्यात आले. मनोहर हा जामीनदार होता म्हणून त्यालाही प्रतिवादी म्हणून जोडण्यात आले. मनोहरच्या मालकीचे एक घर होते. बँकेने मूळ कर्जाच्या वसूलीसाठी वाद दाखल केल्याबरोबर अॅवॉर्ड पूर्वीच ते घर जप्त करून मागितले. नॉमिनीने अॅवॉर्डपूर्वी जप्तीचा हुकूम दिला व त्या हुकमाच्या अंमलबजावणीत ते घर जप्त करण्यात आले. त्यावर मनोहरने हे अपील केले होते.

मनोहरचे म्हणणे असे आहे की बँकेने दुसऱ्या जामीनदाराला सोडून दिले व फक्त आपलेच (मनोहरचे) घर जप्त केले. परंतु मनोहरला तसे म्हणता येत नाही. जामीनदारावरील जबाबदारी संयुक्त व विभक्त अशा दोन्ही स्वरूपाची असते. म्हणजे असे की दोन जामीनदारांपैकी कोणत्याही एकापासून अथवा दोघांपासून सावकाराला कर्ज वसूल करता येते. सबब मूळ ऋणकोवरील अर्जाचे फेडीत बँकेला मनोहरचे घर जप्त करता येत होते, ह्या विषयी शंका नाही.

एकट्या मनोहरपासून कर्ज वसूल करण्यात आले तर त्याला दुसऱ्या जामीनदारापासून त्याच्या हिश्याचे कर्ज वसूल करण्याची मोकळीक आहे. तात्पर्य असे की, कोणत्याही दृष्टीने विचार केला तरी मनोहरच्या अपिलात काही तथ्य आहे असे ठरविणे आम्हांला अशक्य आहे.


वरील कारणास्तव आम्ही हे अपील विरुद्ध पक्षाला नोटीस न देताच (समरिली) फेटाळून लावतो.

(महाराष्ट्र को. ट्रायब्यूनलचा निवाडा)

---

**उसाच्या पिकाला धोका**—महाराष्ट्र सरकारच्या पाणी-पुरवठा खात्याने उसाला देण्यात येणाऱ्या पाण्यात कपात केल्यामुळे नगर जिल्ह्यातील उसाच्या पिकाला धोका उत्पन्न झाला आहे. उसाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे बहुतेक साखर कारखाने नेहमीपेक्षा लवकर बंद करण्यात आले आहेत. भारतामध्ये उसाच्या लागवडीखाली असलेल्या एकूण जमिनींपैकी ५ टक्के जमीन महाराष्ट्रात आहे. देशातील साखरेच्या एकूण उत्पादनापैकी २० टक्के उत्पादन महाराष्ट्र करतो.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –**

(विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र)



# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

(दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित)

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. | महाल नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४, २५४७८१ | फार्मर बँक |

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,९८,३८,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,५२,७१,००० |
| ठेवी | ... रु. | ४८,२९,९५,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,१८,८९,६२ ००० |

**: बृहन् मुंबईतील शाखा :**

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

**: नागपूर विभागातील शाखा :**

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. बा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

# दत्तात्रय इंडस्ट्रीज प्रा. लि.



कंपनीचे चेअरमन व मॅ. डायरेक्टर
**श्री. डी. आर. नाईक**

पुण्यातील दत्तात्रय इंडस्ट्रीज प्रा. लि. ह्या संस्थेने पुणे-सातारा रस्त्यावरील स्वतःच्या प्रशस्त व सुंदर इमारतीत १४ मे रोजी स्थलांतर केले.

सुमारे वीस वर्षांपूर्वी, १९४८ च्या ऑगस्टमध्ये 'दत्त इंडस्ट्रीज' या नावाने संस्थेने व्यवसायाला पुण्यात प्रारंभ केला. दत्त इंडस्ट्रीजने प्रथम लोटे बनवायला सुरुवात केली. घाटदार गायछाप लोटे अल्पावधीत लोकप्रिय झाले.

दत्त इंडस्ट्रीजने १९५२ मध्ये फ्यूज बॉक्सेस तयार करण्याची कल्पना काढली व ती अमलातही आणली. या फ्यूज बॉक्सेसना पहिली ऑर्डर सहा हजार बॉक्सेसची मुंबईच्या बेस्ट कंपनीने दिली. आता ही ऑर्डर लाखापर्यंत गेली आहे. पहिल्याच खेपेस बेस्ट कंपनीला दत्त इंडस्ट्रीजचा माल पसंत पडल्याने साहजिकच बोलबाला झाला व इतर काही कंपन्यांनी त्यांना ऑर्डर दिली.

फ्यूज बॉक्सेस निर्मितीच्या यशाने संस्थेला साहजिकच उमेद आली. विद्युत्-व्यवसायात संस्थेने आणखी प्रगती करायचे ठरविले. लाईन्स कनेक्टर्स, पॉवर प्लग्ज, सॉकेट्स, स्विचेस यांसारख्या विद्युत्व्यवसायातील हरघडी लागणाऱ्या वस्तू सुबक बनवून बाजारात आणल्या. या वस्तूही इतक्या ग्राहकप्रिय झाल्या की त्यांची मागणी सतत वाढती आहे.

दत्त इंडस्ट्रीजची नवीन नवीन निर्मितीची धडपड लक्षात घेऊन, अमेरिकेत स्थायिक झालेल्या संस्थेच्या एका हितचिंतकांनी भारतीय वैशिष्ट्य असलेल्या काही वस्तू तयार करून नमुन्यादाखल पाठवायला सांगितल्या. संस्थेच्या कल्पक मंडळींनी नागावरचे ॲशट्रेज, फ्रुट डिशेस, कँडल होल्डर्स, ड्रायनट, डिशेस करून पाठविल्या. नागाबद्दल तिकडे विशेष कुतूहल आहे हे जाणूनच नागाचा आकार ठेऊन त्यावर अशा वस्तू बसविल्या. नमुने तिकडे आवडले पण काही अडचणीस्तव ही कल्पना त्या वेळी मागे ठेवावी लागली. विचारपूर्वक तयार केलेले नागाचे डिझाइन संस्थेने व्यर्थ दवडले नाही. त्यावर समई बसविण्यात आली व नागराजांनी देवघरात प्रवेश मिळविला. नाग आपल्या इकडे पूज्य मानतात. त्याला पौराणिक महत्त्वही आहे. त्यामुळे ज्योती समईला नागाचा पाय चपखल बसला, शोभून दिसला. समईतून तेल ओघळत खालची जमीन खराब होऊ नये व तेलही वाया जाऊ नये म्हणून ज्योती समईची रचनाच अशी बनविण्यात आली की 'फक्त ज्योती-समईतूनच तेल ओघळत नाही,' अशी ख्याती मिळाली. त्या वर्षी मुंबईच्या औद्योगिक प्रदर्शनात ज्योती समई प्रथमच ठेवण्यात आली होती व ज्योती समईच्या वैशिष्ट्यांची ग्राहकांना खात्री पटल्याने आपोआपच भरपूर प्रसिद्ध झाली. अर्थात ज्योती-समईला वाढती मागणी मिळू लागली. मग ग्राहकाला परवडेल अशा निरनिराळ्या किमतीच्या १२ वेगवेगळ्या आकारांतील पितळी व क्रोमियमच्या समया बनविण्यात आल्या. ज्योती-समईची मागणी पुरी करता येत नाही, अशी आजची स्थिती आहे. १९५४ मध्ये दत्त इंडस्ट्रीजला नागावरील ज्योती समईचे पेटंट व रजि. डिझाईन मिळाले.

दत्त इंडस्ट्रीजकडून स्वस्तिक रबर प्रॉडक्टसने आपल्या खास गमबूटस्चे विविध मॉडेल्स बनवून घेतले. तसेच केसल (मॅचवेल) पेरण्यांचे कास्टिंगहि दत्त इंडस्ट्रीजकडून करून घेण्यात आले. अशा रीतीने निरनिराळ्या नामवंत संस्थांच्या सहकार्याने दत्त इंडस्ट्रीज आपली प्रगती करून घेत होती.

दत्त इंडस्ट्रीजने १९५५ मध्ये जस्त व पितळी इंक स्टँडस् व कॉल बेलसची निर्मिती करून निरनिराळ्या सरकारी खात्यांच्या खूप मोठ्या आर्डर्स मिळविल्या. अर्थात या ऑफिसयुक्त वस्तूंची जडणघडण मोठी सुबक व टिकाऊ केल्याने ही मागणीदेखील वाढली. दत्त इंडस्ट्रीजच्या विद्युत्व्यवसायातील मालाला सतत मागणी होतीच. त्यामुळे दत्त इंडस्ट्रीजला साहजिकच आर्थिक स्थैर्य आले.

संस्थेच्या निर्मितीचा व्याप आणखी वाढविण्याच्या दृष्टीने १९६० मध्ये दत्त इंडस्ट्रीजचे रूपांतर "दत्तात्रय इंडस्ट्रीज प्रा. लि." असे करण्यात आले. निर्मितीसाठी नवे क्षेत्र शोधण्यात आले. डिप्रोस्वीच फ्यूजेसबरोबरच ६ फुटांपासून ५० फुटांपर्यंत जलसिंचन करता येईल असे पेटंट घेतले. दत्तात्रय इंडस्ट्रीज प्रा. लि. त्यांचे प्रसिद्ध 'रेनचो स्प्रिंकलर' व 'जलधारास्प्रिंकलर' दत्तात्रय इंडस्ट्रीज बनवू लागले व ही एक आघाडी संपादन केली.

संस्थेचा वाढता व्याप व पसारा लक्षात घेऊन संचालकांनी स्वारगेट औद्योगिक विभागात विस्तृत जागा घेऊन तिथे आता प्रशस्त व अद्ययावत इमारत उभारली आहे. तरी सध्याच्या कसबा पेठेतील जागेत ग्राहकांच्या सोयीसाठी छोट्या यंत्र-सामग्रीचा विभाग व नॉन फेरस फौंड्री ठेवण्यात येणार आहे.

फक्त एका लेथवर व्यवसाय सुरू करणाऱ्या दत्तात्रय इंडस्ट्रीजचे आता अत्याधुनिक सामग्रीने सुसज्ज असलेले स्वतःचे वर्क-

शॉप आहे. प्रारंभी असलेली १०-१२ कर्मचाऱ्यांची संख्या आता ५० पर्यंत गेली आहे.

आणखी काही नवीन निर्मितीच्या योजना संस्थेसमोर आहेत. शेती—बागायतीसाठी एक नावीन्यपूर्ण स्प्रिंकलर तयार करण्यात येत असून देशाच्या अन्नोत्पादन योजनांसाठी हा स्प्रिंकलर खूपच उपयुक्त ठरणार आहे. तसेच एक बहुउपयोगी स्प्रेअरची निर्मिती चालू आहे. या स्प्रेअरने जंतुनाशक औषधे शिंपडता येतील, घरगुती वापराला उपयोगी पडेल, बागबगीच्यांवर पाणी मारता येईल, मोठ्या समारंभात सुगंधी पाण्याचा फवारा उडवायलाही उपयुक्त ठरेल. पुण्याचे श्री. फ्रामजी पी. पोचा यांचे बागायती हत्यारे उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

दत्तात्रय इंडस्ट्रीजच्या निर्मितीसाठी पहिल्यापासून पितळाबरोबरच अल्युमिनियम ॲलायचा वापर मोठ्या दूरदृष्टीने केल्यामुळे 'नॉन फेरस' धातूची आपल्या देशात चणचण भासत असताही संस्थेच्या निर्मितीत खंड पडला नाही, हे लक्षात घेण्या सारखे आहे. तऱ्हेतऱ्हेच्या इलेक्ट्रिकल वस्तू तयार करून दत्तात्रय इंडस्ट्रीजने परकीय चलन वाचविण्यास अल्पसा हातभार लावला आहे.

महाराष्ट्रातले प्रख्यात उद्योगपती श्री. डी. आर. नाईक या संस्थेचे मॅ. डायरेक्टर व चेअरमन आहेत. त्यांनी परदेशात संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने बराच प्रवास केला असून त्यांचा प्रदीर्घ अनुभव, ज्ञान, मार्गदर्शन व प्रोत्साहन संस्थेच्या भरभराटीला कारणीभूत आहे. संस्थेच्या सध्याच्या सुस्थितीचे श्रेय त्यांनाच आहे. त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई व कन्या डॉ. इंदू नाईक या कंपनीच्या आणखी दोन डायरेक्टर्स असून कंपनीच्या कामकाजात त्या जातीने व दक्षतेने लक्ष घालतात.

संस्थेचे सेक्रेटरी व वर्क्स मॅनेजर श्री. डी. जी. नाईक प्रारंभापासूनचे हरहुन्नरी सहकारी असून संस्थेच्या सर्वांगीण उन्नतीत त्यांचा फार मोठा वाटा आहे.

### पश्चिम बंगालमधील सौंदर्यस्थळांचा विकास

पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील उत्तरेकडील जिल्ह्यांत असलेल्या सौंदर्यस्थळांचा विकास करण्याचे ठरविले आहे. हौशी प्रवाशांना आकर्षून घेण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ह्या सौंदर्यस्थळात दार्जिलिंग आणि कालिम्पांगसारखी थंड हवेची ठिकाणे आहेत, त्याचप्रमाणे वन्य प्राण्यांचे जीवन नैसर्गिक अवस्थेत पाहता यावे म्हणून राखून ठेवण्यात आलेली जंगले आहेत. नौकाविहार व जलविहार करण्यासाठी आणि मासे पकडण्यास योग्य अशी ठिकाणे आहेत. ह्या निसर्गरम्य ठिकाणी जावयाचे असेल तर परदेशीय प्रवाशांना आतापर्यंत परवाने घ्यावे लागत असत. परंतु असे परवाने मिळण्यात फार दिरंगाई होत असे, त्यामुळे प्रवासी त्या नादाला लागत नसत. परिणामी परदेशीय प्रवाशांपासून होणारी प्राप्ती बेताबाताची होत आहे. आता नव्या बंगाल सरकारने परवान्यासंबंधीचे निर्बंध सैल केले आहेत.

### * रक्तदानाने मिळालेले रक्त धोक्याचे ?

रुग्ण व्यक्तीला जरूर पडल्यास रक्त देऊन वाचविण्याचे शास्त्र चांगले प्रगत झालेले आहे. वैद्यकीय उपचारांत हा उपचार आणीबाणीच्या वेळी उपयुक्त ठरतो. परंतु लायन्स क्लबच्या अध्यक्षांनी मुंबई येथे केलेल्या एका भाषणांत रक्तदानाने मिळविलेले रक्त वापरण्याच्या कामी असलेल्या धोक्याकडे लक्ष वेधले आहे. जे. जे. हॉस्पिटलमधील रक्त-संचय विभागाचे अधिकारी श्री. शर्मा ह्यांनी ह्यासंबंधी दिलेली माहिती चिंता निर्माण करणारी आहे. श्री. शर्मा म्हणतात की गेल्या काही महिन्यांत पैसे घेऊन रक्तदान केलेल्या लोकांचे रक्त रोग्यांना देण्यात आले असता त्यांच्यावर वाईट परिणाम झाल्याचे आढळून आले. ३० टक्के लोकांना रक्तदानामुळे जोराचा ताप भरला. पैसे घेऊन रक्त देणारे लोक एका दृष्टीने धंदेवाइकच म्हटले पाहिजेत. अशा लोकांचे रक्त कमी प्रतीचे असते. पैसे घेऊन रक्त देणाऱ्या लोकांपैकी ८० टक्के लोकांना गुप्त रोगाची बाधा झालेली असते. तेव्हा रक्तदानाचा उपयोग करतांना योग्य ती खबरदारी घेण्यात आली पाहिजे. ज्या लोकानी पैसे न स्वीकारता रक्तदान केलेले असेल त्यांचेच रक्त वापरणे केव्हाही अधिक श्रेयस्कर आहे. अशा लोकांत गुप्तरोगाने पछाडलेल्यांचे प्रमाण अवघे ४ टक्के असते. श्री. शर्मा ह्यांनी निवेदन केलेली माहिती मोठ्या शहरांतील आरोग्यावर प्रकाश टाकणारीच म्हणावी लागेल. धंदेवाईक रक्तदानवाल्यांचे रक्त कमी प्रतीचे असण्याचे प्रमुख कारण त्यांची आर्थिक कुचंबणा असण्याचा फार संभव आहे. अशा लोकांच्या जीवनाची पाहणी केली तर त्यांचे रक्त कमी प्रतीचे का असते ह्याचा उलगडा होणे कठीण नाही.

**तुटीच्या अर्थभरण्याचे शस्त्र**—रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. जी. सी. भट्टाचार्य कलकत्ता येथे बोलताना म्हणाले की तुटीचा अर्थभरणा किती प्रमाणात करावा हे ठरविण्याचे स्वातंत्र्य जर देशाच्या मध्यवर्ती बँकिंग संघटनेला असते तर चलनवाढीची सध्याची परिस्थिती टाळण्यात कदाचित यश आले असते आणि किमतीच्या अस्थिरतेमुळे येणारा विस्कळीतपणाही टाळता आला असता.



**शॉप आहे. प्रारंभी असलेली १०–१२ कर्मचाऱ्यांची संख्या** आता ५० पर्यंत गेली आहे.

**आणखी काही नवीन निर्मितीच्या योजना संस्थेसमोर आहेत. शेती–बागायतीसाठी एक नावीन्यपूर्ण स्प्रिंकलर तयार करण्यात** येत असून देशाच्या अन्नोत्पादन योजनांसाठी हा स्प्रिंकलर **खूपच उपयुक्त ठरणार आहे. तसेच एक बहुउपयोगी स्प्रेअरची निर्मिती चालू आहे. या स्प्रेअरने** जंतुनाशक औषधे शिंपडता येतील, घरगुती वापराला उपयोगी पडेल, बागबगीच्यांवर पाणी **मारता येईल, मोठ्या समारंभात सुगंधी पाण्याचा फवारा उडवा**यलाही उपयुक्त ठरेल. पुण्याचे श्री. फ्रामजी पी. पोचा यांचे **बागायती हत्यारे उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.**

**दत्तात्रय इंडस्ट्रीजच्या निर्मितीसाठी पहिल्यापासून पितळा**बरोबरच अल्युमिनियम ॲलायचा वापर मोठ्या दूरदृष्टीने **केल्यामुळे 'नॉन फेरस' धातूची आपल्या देशात चणचण भासत असताही संस्थेच्या निर्मितीत खंड पडला नाही, हे लक्षात घेण्या** सारखे आहे. तऱ्हेतऱ्हेच्या इलेक्ट्रिकल वस्तू तयार करून **दत्तात्रय इंडस्ट्रीजने परकीय चलन वाचविण्यास अल्पसा हातभार** लावला आहे.

महाराष्ट्रातले प्रख्यात उद्योगपती श्री. डी. आर. नाईक या **संस्थेचे मॅ. डायरेक्टर व चेअरमन आहेत.** त्यांनी परदेशात संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने बराच प्रवास केला असून त्यांचा **प्रदीर्घ अनुभव, ज्ञान, मार्गदर्शन व प्रोत्साहन संस्थेच्या भर**भराटीला कारणीभूत आहे. संस्थेच्या सध्याच्या सुस्थितीचे श्रेय त्यांनाच आहे. त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई व कन्या डॉ. इंदू **नाईक या कंपनीच्या आणखी दोन डायरेक्टर्स असून कंपनीच्या** कामकाजात त्या जातीने व दक्षतेने लक्ष घालतात.

**संस्थेचे सेक्रेटरी व वर्क्स मॅनेजर श्री. डी. जी. नाईक प्रारंभा**पासूनचे हरहुन्नरी सहकारी असून संस्थेच्या सर्वांगीण उन्नतीत त्यांचा फार मोठा वाटा आहे.

### पश्चिम बंगालमधील सौंदर्यस्थळांचा विकास

पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील उत्तरेकडील जिल्ह्यांत असलेल्या सौंदर्यस्थळांचा विकास करण्याचे ठरविले आहे. हौशी **प्रवाशांना आकर्षून घेण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.** ह्या सौंदर्यस्थळात दार्जिलिंग आणि कालिम्पांगसारखी थंड हवेची ठिकाणे आहेत, त्याचप्रमाणे वन्य प्राण्यांचे जीवन नैसर्गिक अवस्थेत पाहता यावे म्हणून राखून ठेवण्यात आलेली जंगले आहेत. नौकाविहार व जलविहार करण्यासाठी आणि **मासे पकडण्यास योग्य अशी ठिकाणे आहेत. ह्या निसर्गरम्य ठिकाणी जावयाचे असेल तर परदेशीय प्रवाशांना** आतापर्यंत परवाने घ्यावे लागत असत. परंतु असे परवाने मिळण्यात फार दिरंगाई होत असे, त्यामुळे प्रवासी त्या नादाला लागत नसत. परिणामी परदेशीय प्रवाशांपासून होणारी प्राप्ती बेताबाताची होत आहे. आता नव्या बंगाल सरकारने परवान्यासंबंधीचे निर्बंध सैल केले आहेत.

### रक्तदानाने मिळालेले रक्त धोक्याचे ?

रुग्ण व्यक्तीला जरूर पडल्यास रक्त देऊन वाचविण्याचे **शास्त्र चांगले प्रगत झालेले आहे.** वैद्यकीय उपचारांत हा उपचार आणीबाणीच्या वेळी उपयुक्त ठरतो. परंतु लायन्स क्लबच्या अध्यक्षांनी मुंबई येथे केलेल्या एका भाषणांत रक्तदानाने मिळविलेले रक्त वापरण्याच्या कामी असलेल्या धोक्याकडे लक्ष वेधले आहे. जे. जे. हॉस्पिटलमधील रक्त–संचय विभागाचे अधिकारी श्री. शर्मा ह्यांनी ह्यासंबंधी दिलेली माहिती चिंता निर्माण करणारी आहे. श्री. शर्मा म्हणतात की गेल्या काही महिन्यांत पैसे घेऊन रक्तदान केलेल्या लोकांचे रक्त रोग्यांना देण्यात आले असता त्यांच्यावर वाईट परिणाम झाल्याचे आढळून आले. ६० टक्के लोकांना रक्तदानामुळे जोराचा ताप भरला. पैसे घेऊन रक्त देणारे लोक एका दृष्टीने धंदेवाइकच म्हटले पाहिजेत. अशा लोकांचे रक्त कमी प्रतीचे असते. पैसे घेऊन रक्त देणाऱ्या लोकां पैकी ८० टक्के लोकांना गुप्त रोगाची बाधा झालेली असते. तेव्हा रक्तदानाचा उपयोग करतांना योग्य ती खबरदारी घेण्यात आली पाहिजे. ज्या लोकानी पैसे न स्वीकारता रक्तदान केलेले असेल त्यांचेच रक्त वापरणे केव्हाही अधिक श्रेयस्कर आहे. अशा लोकांत गुप्तरोगाने पछाडलेल्यांचे प्रमाण अवघे ४ टक्के असते. श्री. शर्मा ह्यांनी निवेदन केलेली माहिती मोठ्या शहरांतील आरोग्यावर प्रकाश टाकणारीच म्हणावी लागेल. धंदेवाईक रक्तदानवाल्यांचे रक्त कमी प्रतीचे असण्याचे प्रमुख कारण त्यांची आर्थिक कुचंबणा असण्याचा फार संभव आहे. अशा लोकांच्या जीवनाची पाहणी केली तर त्यांचे रक्त कमी प्रतीचे का असते ह्याचा उलगडा होणे कठीण नाही.

**तुटीच्या अर्थभरण्याचे शास्त्र**—रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. जी. सी. भट्टाचार्य कलकत्ता येथे बोलताना म्हणाले की तुटीचा अर्थभरणा किती प्रमाणात करावा हे ठरविण्याचे स्वातंत्र्य जर देशाच्या मध्यवर्ती बँकिंग संघटनेला असते तर चलनवाढीची सध्याची परिस्थिती टाळण्यात कदाचित यश आले असते आणि किमतीच्या अस्थिरतेमुळे येणारा विस्कळीतपणाही टाळता आला असता.


पुण्यांत याल तेव्हां—

उद्यान निवास
या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्येच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७७९१
माहिती मागवा
उद्यान प्रासाद स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे-२

## खतांची मोठ्या प्रमाणावर आयात करण्याची योजना

चालू वर्षाचा शेतीचा उत्पादनाचा कार्यक्रम नीट पार पाडता यावा म्हणून भारत सरकारने रासायनिक खतांची मोठ्या प्रमाणावर आयात करण्याचे ठरविले आहे. खतांच्या आयातीसाठी २२५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. १९६७–६८ सालाच्या शेतीच्या हंगामासाठी १३ लाख, ५० हजार टन नत्रयुक्त खताची आवश्यकता आहे. अशा खताचे देशांतील उत्पादन सुमारे ५ लाख टन आहे. बाकीची गरज ८ लाख, ५० हजार टनांची आयात करून भागविण्यात यावयाची आहे. गेल्या वर्षी नत्रयुक्त खताचा एकूण खप १० लाख टन झाला असावा असा अंदाज आहे. त्यापैकी ४ लाख टन देशांत उत्पादन झाले होते आणि ६ लाख टन परदेशांतून आयात करण्यात आले होते. ह्यावर्षी ५ लाख टन फॉस्फेटयुक्त खत लागेल असा अंदाज आहे. त्यापैकी २ लाख, ७५ हजार टन खताचे उत्पादन देशांत होईल आणि २ लाख, २५ हजार टन बाहेरून आयात करावे लागेल. ३ लाख टन पोटॅशयुक्त खताची गरज मात्र सर्वस्वी आयात करूनच भागवावी लागणार आहे. खतांची आयात ज्या देशांकडून करण्यात यावयाची आहे, त्यात मुख्यतः अमेरिका, कॅनडा, पश्चिम युरोपातील देश, रशिया, पोलंड व जपान ह्यांचा समावेश आहे. परदेशांकडून खते आयात करण्यासाठी परदेशीय चलनाची गरज लागणार आहे. ८ लाख, ५० हजार टन नत्रयुक्त खताच्या संकल्पित आयातीपैकी ८ लाख, ३६ हजार टन आयातीसाठी पुरेल इतके परदेशीय चलन मध्यवर्ती सरकारच्या अर्थ खात्याने उपलब्ध करून दिलेले आहे. उरलेल्या १४ हजार टनांसाठीही परदेशीय चलन लवकरच मंजूर करण्यात येईल.

---

## पूर्व जर्मनीच्या गोव्यातील कंपन्यांशी व्यापारी वाटाघाटी

पोर्तुगीज राजवटीच्या जोखडापासून मुक्त झालेला गोवा भारतापासून अनेक शतके अलग राहिलेला होता. त्यामुळे भारतामधील औद्योगिक विकासापासूनही तो अलिप्त राहिला. पोर्तुगीज राजवटीने गोव्याच्या औद्योगिक प्रगतीकडे फारसे लक्ष पुरविले नाही. पण आता परिस्थिती बदलली आहे. गोव्यांतील खनिज संपत्तीचा उपयोग करून त्या राज्याची औद्योगिक भरभराट साधता येणे शक्य झाले आहे. गोव्यातील खनिजाची, मुख्यतः लोहयुक्त खनिजाची, जपानला निर्यात होत आहे. गोव्यातील काही कंपन्यांशी सध्या पूर्व जर्मनीच्या व्यापारी वाटाघाटी चालू आहेत. पूर्व जर्मनीचा मुंबईमधील व्यापारी प्रतिनिधी ही बोलणी करीत आहे. पूर्व जर्मनी गोव्याला खाणींत वापरण्यासाठी उपयुक्त अशी यंत्रसामग्री पुरवू शकेल अशी माहिती त्याने दिली आहे. गोव्यात आज खाणीचा धंदा प्रमुख असल्याने अशा प्रकारच्या यंत्रसामग्रीची अर्थातच सतत गरज लागत असते. गोव्यातील बंदरांचा विकास करून ह्या खनिजाची निर्यात वाढविता येण्यासारखी आहे. परंतु त्यासाठी अवजड माल चढविण्या–उतरण्याच्या सोईंनी युक्त असे धक्के बांधणे आवश्यक आहे. धक्के बांधण्यासाठी जरूर ते साहित्य पुरविण्याची तयारी पूर्व जर्मनीच्या प्रतिनिधीने दाखविली आहे. तथापि त्यासाठी आयात परवान्याची अडचण दूर करण्यात आली पाहिजे. पूर्व जर्मनी आणि गोवा ह्यांच्यांतील व्यापारी देणीघेणी रुपयाच्या चलनांत करण्यात यावयाची आहेत. गोव्याच्या मच्छीमारीच्या धंद्यासाठी अद्ययावत साधनसामग्रीची जरुरी आहे. मच्छीमारीच्या आधुनिक तऱ्हेच्या बोटी आणि मासे गोठविण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्याची तयारीही पूर्व जर्मनीच्या प्रतिनिधीने दाखविली आहे.

---

## नव्या पोस्ट ऑफिसांच्या संख्येत कपात

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात नव्याने उघडावयाच्या पोस्ट ऑफिसच्या संख्येत कपात करण्यात येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात २१ हजार नवी पोस्ट ऑफिसे उघडण्यात आली. चौथ्या कार्यक्रमात अवघी १२ हजार नवी पोस्ट ऑफिसे उघडण्यात येणार आहेत. पहिल्या दोन कार्यक्रमांत नुकसानी सोसूनही नव्या कचेऱ्या उघडण्याचे धोरण स्वीकारण्यात आले होते. परंतु आता ते बदलण्यात आले असून नुकसानी सोसून नव्या कचेऱ्या उघडण्यात येणार नाहीत. अतिशय मागासलेले भाग आणि सरहद्दीवरील ठिकाणे येथे मात्र नव्या कचेऱ्या नुकसान सोसूनही उघडण्यात येणार आहेत. नुकसानीत चालणाऱ्या पोस्टाच्या कचेऱ्यांमुळे भारत सरकारच्या पोस्ट खात्याला दरसाल १ कोटी रुपयांची हानी स्वीकारावी लागते. १२ हजार नव्या कचेऱ्यांपैकी २,५०० कचेऱ्या शहरी भागांत खोलण्यात येणार आहेत. बाकीच्या ग्रामीण भागांत उघडण्यात येतील. ग्रामीण भागांत टपालाचा बटवडा करण्याच्या वेळा वाढविण्यात येणार आहेत. दळणवळणाच्या दृष्टीने गैरसोईच्या ठिकाणी पोस्टमन लोकांना पायी जावे लागते. त्यामुळे अर्थातच बटवडा करण्यास उशीर लागतो. ही पद्धत कमी करून अधिक त्वरेने बटवडा करण्याची व्यवस्था अमलात आणण्यात येणार आहे. पोस्टातील कामे अधिक कार्यक्षमतेने आणि जलद व्हावी म्हणून तेथील कर्मचाऱ्यांना खास शिक्षण देण्यात यावयाचे आहे. त्याप्रमाणे फ्रँकिंग मशीन्स अधिक संख्येने वापरण्यात येणार आहेत. तिकिटे देणाऱ्या एका यंत्राची दिल्लीतील दोन पोस्ट ऑफिसात सध्या चाचणी सुरू आहे. मनिऑर्डर्सचा व्यवहार करण्यासाठी हिशेबाची यंत्रे वापरण्यात यावयाची आहेत. त्यामुळे वेळाची चांगली बचत होईल.

---

**संरक्षणावरील खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न**

भारत आणि पाकिस्तान दोघेही आपआपला शस्त्रसंभार वाढविण्याच्या खटपटीत आहेत. ह्या दोन्ही देशांनी आपला लष्करावरील खर्च कमी केला तर त्यांच्या विकासाला मदत होईल ह्याविषयी वाद नाही. दोन्ही देशांना सध्या अमेरिका आणि रशिआ ह्यांच्याकडून लष्करी व इतर प्रकारची मदत होत आहे. भारतीय उपखंडातील ह्या दोन देशांनी संरक्षणावरील आपला खर्च कमी करावा अशी रशिआ व अमेरिकेची इच्छा आहे. ह्या संबंधी उभयता देशांच्या दरम्यान काही अनौपचारिक बोलणी झाल्याचीही वार्ता आहे. अमेरिकेचा तर असा ग्रह झालेला आहे की दोन्ही देशांतील संरक्षण खात्याच्या खर्चापैकी बराच खर्च एकमेकांविरुद्ध लढण्याच्या हेतूनेच करण्यात येत आहे. भारत आणि पाकिस्तान काही अशा प्रकारची लष्करी सामग्री जमवत आहे की तिचा उपयोग पंजाबसारख्या सपाट प्रदेशातच करता येईल. ह्या बाबतीत भारताची बाजू अलीकडील इतिहासाच्या अनुरोधाने सबळ आहे. पाकिस्तान आणि चीन ह्यांचे सख्य असल्यामुळे पाकिस्तानची लष्करी तयारी भारताविरुद्धच करण्यात येत आहे असे मानण्यास भरपूर वाव आहे. भारताला मात्र चीनविरुद्ध संरक्षक पवित्रा घेणे भाग असून त्याचा पुष्कळसा संरक्षणविषयक खर्च चीनच्या आक्रमक धोरणामुळे होत आहे. पण, पाकिस्तान ह्या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून भारताच्या संरक्षक खर्चाचा रोख आपल्या विरुद्धच आहे अशी बतावणी करीत आहे. ताश्कंद येथील करार घडवून आणण्यात रशिआचा पुढाकार असला तरी भारत व पाकिस्तान ह्यांनी परस्परांत पुन्हा लढू नये म्हणून त्यांच्या लष्करी सामर्थ्याला लगाम घालण्याची प्रवृत्ती रशिआच्या धोरणातही दिसून येते. अमेरिकेने लष्करी साहित्याचे सुटे भाग पाकिस्तानला व भारताला देण्याचे आपले धोरण जाहीर केले आहे, ते त्या देशाच्या सध्याच्या पवित्र्याशी विसंगत व पाकिस्तानला पक्षपाती आहे, असेच भारत सरकारचे म्हणणे असून तशी त्याने आपली तक्रार नोंदविलीही आहे.

**बंगालचा तांदळाबाबत स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न**

तीन वर्षांच्या काळात तांदळाच्या पुरवठ्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी बंगाल सरकारने एक कार्यक्रम आखला आहे. दरडोई दररोज १६ औंस तांदूळ देण्याचे परिमाण ठरविण्यात आले तर बंगालला सुमारे ५२ लाख टन तांदळाची गरज दरसाल लागेल. ह्याचा अर्थ असा की बंगाल दरसाल ६० लाख टन तांदूळ उत्पादन करू शकला तर राज्याजवळ अल्प प्रमाणात तांदूळ शिल्लकच राहील. नासधूस, बियाणे आणि लोकसंख्येची अपेक्षित वाढ लक्षात घेता शिल्की तांदूळ त्या कामी खर्ची पडेल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात बंगालने दरसाल सरासरी ५० लाख टन तांदळाचे उत्पादन केलेले आहे.


तुमची जिव्हाळ्याची बँक

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

( ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

**आपल्या ११६ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध.**

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टीसेवा यांच्यासह

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

शं. ल. किर्लोस्कर,
अध्यक्ष.


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष ३३ | पुणे, बुधवार ७ जून, १९६७ | अंक ११

## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

## दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ]  ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४.  [ टेलिफोन ३५६५०१

(१) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
(२) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
(३) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★

### बंगालमध्ये भाताच्या वाहतुकीवर निर्बंध

पश्चिम बंगाल सरकारने भाताची व अन्नधान्याची चोरटी वाहतूक होऊ नये म्हणून सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत वाहतुकीवर निर्बंध जाहीर केले आहेत. ही बंदी सर्व राज्यांत एकाच वेळी लागू करण्यात येणार आहे. तांदूळ सडणाऱ्या गिरण्यांवरही असेच निर्बंध घालण्याचा विचार सरकार करीत आहे. परंतु त्यासंबंधीच्या कायदेशीरपणाविषयी अद्याप चर्चा चालू आहे. भाताचे व धान्याचे काही मोठे उत्पादक त्यांच्या जवळील साठ्यांची तपासणी करण्यास अडथळा आणीत असल्याचे सरकारच्या नजरेस आले आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी जरूर पडल्यास पोलिसांची मदत घेऊनही साठ्यांची तपासणी करण्याचे काम पार पाडावे अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पश्चिम बंगालमधून पूर्व पाकिस्तानात मोठ्या प्रमाणावर तांदळाची चोरटी निर्यात होत असते, अशी लोकांची तक्रार आहे.


### बुद्धिमंतांचा परदेशात जाणारा ओघ हानिकारक

अविकसित देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कामी भांडवलाची टंचाई तर नडतेच, पण बुद्धिवान आणि कौशल्याची कामे करणाऱ्या माणसांची वाणही नडते. म्हणूनच आशिआ-आफ्रिकेमधील हुषार विद्यार्थी अनेक प्रकारचे तांत्रिक ज्ञान मिळविण्यासाठी अमेरिका व युरोपमध्ये जातात. पण त्यांच्यापैकी कितीतरी विद्यार्थी परदेशांतच स्थायिक होतात. त्यामुळे अविकसित देशांची भरभराट घडवून आणणे अवघड होत चालले आहे, असा अभिप्राय एका अमेरिकन सिनेटरने व्यक्त केला आहे. १९६२–६६ ह्या कालावधीत आशिआमधील देशांतून अमेरिकेत शिकण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांपैकी २८ टक्के विद्यार्थी अमेरिकेतच राहिले. त्याचप्रमाणे अमेरिकेत उच्च वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी आलेल्या डॉक्टर्सपैकी २५टक्के डॉक्टर्स तेथेच स्थायिक झाले. ह्या डॉक्टरांची त्यांच्या देशातच खरी अधिक गरज होती.

### रशिआशी होणाऱ्या व्यापारात वाढती स्पर्धा

भारत आणि रशिआ ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या व्यापारात वाढ होत चाललेली आहे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने रशिआकडून अलीकडेच १·५ कोटी रुपये किमतीच्या ऑर्डरी मिळविल्या आहेत. ६० लाख रुपये किमतीचे कापड रशिआला पुरविण्याच्या करारावर नुकत्याच सह्या झाल्या आहेत. तथापि, भारताला रशिआशी होणाऱ्या निर्यात व्यापारात पाकिस्तान, जपान आणि हाँगकाँग ह्या देशांशी स्पर्धा करावी लागत आहे. ह्या बाबतीत पाकिस्तानला परिस्थिती अधिक अनुकूल आहे. पाकिस्तान अफगाणिस्तानातून जाणाऱ्या रस्त्याचा व्यापारासाठी उपयोग करू शकतो. रशिआ आणि भारत ह्यांच्यातील व्यापार प्रथम सुरू झाला त्या वेळी रशिआची बाजारपेठ जगापासून अलग पडलेली होती. परंतु आज ही परिस्थिती पालटली आहे.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'
किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.


धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण... परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व संकटेही उपस्थित होत नाहींत...

शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारी, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
३ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)
TOM & BAY

# अर्थ

बुधवार, ७ जून, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लोकशाही नियोजनाची वाटचाल आणि भवितव्य

### श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचे मॉन्ट्रिअल येथील भाषण

कॅनडाचा शताब्दी महोत्सव एप्रिल १९६७ ते ऑक्टोबर १९६७ साजरा होत आहे. त्यानिमित्त कॅनडाची व्यापारी राजधानी मॉन्ट्रिअल येथे 'एक्स्पो ६७' हे एक प्रचंड आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यात आले आहे. त्या प्रदर्शनाला जोडूनच जगातील चौदा राष्ट्रांतील निवडक उद्योगपती, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ ह्यांची खास भाषणे योजण्यात आली होती. थोर विचारवंत आणि कर्तृत्वसंपन्न श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचा त्यात समावेश केलेला होता. दि. १७ मे रोजी त्यांनी ह्या जागतिक व्यासपीठावरून लोकशाही नियोजनाबाबत आपले विचार स्पष्ट केले.

लोकशाही नियोजन ही आपल्या सामाजिक आणि आर्थिक विचारसरणीतली व विचारातली नवीन कल्पना आहे आणि तत्कालीन सामाजिक गरजा आणि प्रेरणा ह्यांना मिळालेला तो प्रतिसाद आहे, असे श्री. शंतनुरावांनी आपल्या भाषणाच्या प्रारंभी सांगून सरकारने आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रवेश केला आणि नियंत्रण मिळविले, तरच त्या त्या देशांना प्रगती झपाट्याने साधता येईल, असा विचार बळावत चालला आहे. राज्यसत्तेचा दृष्टिकोण आणि कृती सर्वंकष असली पाहिजेत, असा ह्या विचारसरणीचा थोडक्यात निष्कर्ष आहे. उद्योन्मुख राष्ट्रांतील लोकशाही नवीन असल्यामुळे आणि तेथील दारिद्र्य दीर्घकालीन व सार्वत्रिक असल्यामुळे, लोकशाही वाचविण्यासाठी लोकशाही नियोजनाचा अवलंब केला जातो. पण तो इच्छित फलदायी ठरेल काय, हा खरा प्रश्न आहे.

लोकशाही नियोजनाचा उगम दोन युद्धांच्या दरम्यानच्या काळातील गुंतागुंतीच्या सामाजिक व आर्थिक घडामोडीत आहे. त्या वेळी मार्क्सवादाचा पगडा सुशिक्षित तरुणांवर विशेष होता. युद्धोत्तर काळात ज्या वसाहती स्वतंत्र झाल्या त्यांनी युद्धकाळातील कित्येक नियंत्रणे तशीच चालू ठेवली. आर्थिक क्षेत्रात सरकारने संघटितपणे आणि सामूहिकपणे केलेले प्रयत्न आणि व्यक्तिस्वातंत्र्य ह्यांचा मेळ घालण्याचा प्रश्न त्यातून निर्माण झाला. लोकशाही आणि नियोजन ही पूर्णतः पूरक नाहीत, इतकेच नव्हे, तर ती एकमेकांविरुद्ध पवित्र्यात खडी आहेत आणि त्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न अयशस्वी होण्याचा संभव आहे, असा स्पष्ट इशारा श्री. शंतनुरावांनी दिला आहे.

श्री. शंतनुराव पुढे म्हणाले—

"जी नवोदित लोकशाही राष्ट्रे नियोजनाच्या द्वारे दारिद्र्य नष्ट करण्यास आतुर झाली आहेत, त्यात नियोजनाला धर्मवेडेपणाचे स्वरूप येण्याचा धोका खराखुरा आहे. त्याला दोन कारणे आहेत. अशा लोकशाही राष्ट्रांच्या धोरणाची घडण अजूनही बहुतांशी व्यक्तिनिष्ठ असते. राजकीय पुढाऱ्यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेनुसार बहुतेक निर्णय घेतले जातात. यापैकी फारच थोड्या राष्ट्रांनी टिकाऊ स्वरूपाची लोकशाही यंत्रणा उभारली आहे किंवा लोकशाही राबविण्यासाठी आवश्यक असलेला सत्तेचा समतोल टिकविणारे विविध हितसंबंधाचे गट संघटित केले आहेत. त्याचा परिणाम असा होतो की त्यांचे नेते राष्ट्राचा कारभार आपल्या जीर्ण झालेल्या तत्त्वांनुसार किंवा विचारसरणीनुसार चालविण्याचा संभव असतो.

राष्ट्रात जी साधनसामग्री उपलब्ध आहे तिचा विनियोग करणारे मानवी कौशल्य विकसित केले तरच दारिद्र्य घालविता येते. आपल्या नियोजनाने हे कौशल्य विकसित करता येईल, संपत्ती निर्माण करता येईल आणि विपुलता गाठता येईल याबद्दल योजनेच्या सूत्रधारांना मुळीच शंका वाटत नाही.

पण या उत्पादनवाढीच्या उद्दिष्टाचा सामाजिक न्यायाच्या मागण्यांशी संघर्ष येतो. उपलब्ध साधनसामग्रीतून जास्तीत जास्त उत्पादन करण्याऐवजी सध्याच्या दारिद्र्याची फेरवाटणी करण्याचे धोरण योजनाकार हाती घेतात. त्यांना असे वाटते की सर्वांना पुरेल इतका माल नाही अशा वेळी नियंत्रित किंमतीची पद्धत हाच सामाजिक न्याय मिळविण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग होय; सामाजिक न्याय आणि खुली किंमत एकमेकांविरुद्ध आहेत असे मानले जाते.

सरकारी निर्णयाने जेथे किंमती ठरविल्या जातात, तेथे त्यांच्या कमाल मर्यादा इतक्या कमी ठेवाव्या लागतात की त्या वस्तुस्थितीस सोडून असतात. सरकारने ठरवून दिलेल्या भावाचा त्या वस्तूच्या किंवा तिच्या उत्पादनाच्या खऱ्या खर्चाशी मेळ नसतो. पण सरकार त्याकडे दुर्लक्ष करते. ते 'कल्याण' करण्यास आतुर असते. जणू कॅन्यूट राजाचेच ते अनुकरण करते. मूलभूत आर्थिक नियम सरकारी हुकमानेही बदलता येत नाहीत.

अपेक्षित संतुलन कधीच साधत नाही. उलट, एका बाजूने मागणी कृत्रिमपणे वाढते, दुसऱ्या बाजूने पुरवठा कमी पडत जातो. आर्थिक कायदा अनिवार्यपणे आपले प्रभुत्व प्रस्थापित करतो.

त्याचा सर्वांत वाईट परिणाम असा होतो की साधनसामग्री अन्य क्षेत्राकडे वळते. टंचाई अधिकच तीव्र आणि कायम स्वरूपाची होते. त्यामुळे भावनियंत्रणाचे जे उद्दिष्ट सामाजिक न्याय, तेच साध्य होत नाही.

राजकीय स्वातंत्र्य आल्यावर त्यांना 'वाढत्या अपेक्षांच्या' क्रांतीला तोंड द्यावे लागत आहे. सर्वांना सर्वच गोष्टी हव्यात आणि त्याही एकदमच हव्यात.

मागणीतील या पिसाट वाढीला जेव्हा सरकारांना तोंड द्यावे लागते, तेव्हा त्यांना वाटते की, उपलब्ध माल नियंत्रित दराने सर्वांना वाटून ही मागणी भागविता येईल. ही प्रवृत्ती अनिवार्य दिसते. पण तिचे परिणामही उघड आहेत.

एखाद्या देशाच्या भांडवलापैकी सरकारी मालकीचे किती, त्या प्रमाणावर नियोजनाचे यश दिसून येते–यश अजमावण्याचा तो उत्कृष्ट निकष होय असे सांगणारे लोक मला अनेक ठिकाणी भेटले आहेत.

माझ्या मते सर्वांत प्रबळ उद्देश राजकीय महत्त्वाकांक्षा आहे. सत्ता राबविणे हा मानवी स्वभाव आहे. मानवाच्या हातातील सत्तांपैकी राजकीय सत्ता सर्वांत प्रभावी होय. तिच्या जोरावर अर्थव्यवस्थेतील मोक्याच्या जागा नियंत्रणाखाली आणता येतात.

दुसरा उद्देश सामाजिक न्यायाची इच्छा हा असतो. ही इच्छा सरकारी मालकीनेच पुरी होऊ शकेल असे मानले जाते. त्यातील गर्भितार्थ असा की खाजगी भांडवलाला या क्षेत्रात नेहमीच अपयश येणार !

अर्थव्यवस्थेचा मोठा आणि वाढता भाग सरकारच्या मालकीचा नसेल तर नियोजन आणि अर्थव्यवस्था दोन्ही कोलमडतील असे मला श्रद्धापूर्वक सांगणारे बरेच सरकारी अधिकारी भेटले आहेत. आर्थिक व्यवहाराच्या निरनिराळ्या भागांत एकसूत्रीपणा हवा आणि म्हणूनच नियमन हवे.

पण नियमन याचा अर्थ राज्याची मालकी असाच असला पाहिजे का ? तसे असेल तर राष्ट्राच्या आर्थिक व्यवहारातील कोणत्या क्षेत्राची मालकी हवी ? त्याचे उत्तर प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीवर आणि वस्तुनिष्ठ विचारांवर अवलंबून राहील.

मोठा आणि वाढता सरकारी विभाग आपली कामगिरी करू शकेल असा विश्वास बाळगता आला तरच हे शक्य आहे. योजनेच्या सूत्रधारांना वाटते की तसे निश्चित घडेल. कारण, सरकारी विभागाची व्यवस्था अत्युच्च दर्जाच्या मंडळीकडे म्हणजे सनदी नोकरांकडे असते.

नियोजनात सरकारी नोकरांवर जी कामगिरी येऊन पडते ती पार पाडणे त्यांच्या स्वाभाविक आवाक्याबाहेर असते. सनदी नोकरांची भिस्त पूर्वीचे पायंडे आणि कार्यपद्धती यांवर असते. ते पुढाकार घेऊ शकत नाहीत. जलद निर्णय तर मुळीच घेऊ शकत नाहीत. लोकशाहीत हे विशेषत्वाने घडते.

कोणत्याही धंद्याची वाढ, एवढेच नव्हे तर त्याचे अस्तित्वसुद्धा रोज घ्याव्या लागणाऱ्या अनेक लहानमोठ्या निर्णयांवर अवलंबून असते. यांपैकी बरेच निर्णय अनुभवांचे टक्केटोणपे खाऊन घ्यावे लागतात. सनदी नोकर आपल्या कारभारात प्रथम सुरक्षिततेवर लक्ष देतो, कारण राजकीय नेत्यांकडून खऱ्या–खोट्या चुकांबद्दल कानउघाडणी होईल अशी त्याला भीती वाटते. हे सर्व लोकशाही राष्ट्रांच्या सरकारी विभागात घडते, आणि तसे घडणे अपरिहार्य असते.

लोकशाही नियोजनात ही बाबत धोक्याची ठरल्याखेरीज राहणार नाही. विकास-योजनांतून अपेक्षित यश मिळाले नाही तर त्यातून नैराश्य येण्याचा संभव असतो. अपेक्षा भरमसाठ वाढविल्या जातात, नंतर निर्माण होणारे वैफल्य अधिक खोलवर आणि अधिक टिकावू ठरण्याचा संभव आहे. लोकांची प्रवृत्ती शिस्तबद्ध विकासावरून उडू लागते. शिस्तबद्ध लोकशाही मार्गाने जे साध्य होणार नाही ते सामर्थ्याच्या जोरावर मिळविण्याचा ते प्रयत्न करणारच हे उघड आहे. पण सामर्थ्याचा वापर हा लोकशाहीवर फिरवलेला बोळा होय. ज्या नियोजनात सरकारी धोरण लोकभ्रमानुसार ठरते त्या नियोजनात सामर्थ्याचा वापर अंगभूतच असतो.

काही देशांत आज हा धोका अगदी खराखुरा आहे. इतर देश तो टाळण्याचा सूज्ञपणा दाखवतील अशी मला आशा वाटते. लोकशाही नियोजनातील लोकभ्रमाचे वर्चस्व त्यांनी झुगारले तरच त्यांना हे शक्य आहे.

मूलभूत सामाजिक सोयींचा पाया घालून सरकार स्वातंत्र्याला आणि प्रगतीला उत्कृष्ट साहाय्य करू शकेल. अशा सोयींखेरीज कोणत्याही खाजगी व्यवहारांची भरभराट होणार नाही. त्याचबरोबर कोणत्याही खाजगी धंद्याला आपल्या जबाबदाऱ्या नाकारता येणार नाहीत. सरकारने ठरवून दिलेले मूलभूत नियम पाळणे आणि संपत्ती व कल्याण यांचा विकास करणे हे त्यांचे कर्तव्य होय. "

**FERGUSSON COLLEGE, POONA-4.**

The College will reopen on the 15th June 1967. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examinations are declared.

POONA,
20th May, 1967

T. G. Mainkar
Principal

## अमेरिकेच्या मालकीचे भारतातील निधी

भारताला अमेरिकन गहू विकून अमेरिकन सरकारला जे रुपये मिळतात त्यांचा उपयोग कसा केला जातो त्यासंबंधी अलीकडच्या काळात अनेक चुकीच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

गेल्या दहा वर्षांत अमेरिकेने भारताकडे ५ कोटी टन अन्नधान्य पाठविले आहे. शिवाय अमेरिकेने भारताकडे बऱ्याच प्रमाणात कापूस, दुधाची भुकटी, सोयबीनचे तेल व इतर शेतीमाल यांची निर्यात केली आहे.

या मालाची किंमत अमेरिका रुपयांच्या चलनात स्वीकारते. हे रुपयातील चलन भारताबाहेर खर्च करता येत नाही.

गेल्या काही वर्षांत या रकमेपैकी सरासरी ७९ टक्के रक्कम अमेरिकेने भारताच्या आर्थिक विकासाला मदत करण्यासाठी उपलब्ध करून दिली आहे. विकासासाठी ही रक्कम बव्हंशी २·५ टक्के व्याजाच्या दराने अंशतः अनुदानांच्या रूपाने दिली गेली आहे.

उरलेल्या २१ टक्के रकमेपैकी सुमारे ७ टक्के रक्कम, ज्यांना आपल्या कारखान्यांत वाढ करावयाची आणि अधिक कामगार कामावर घ्यावयाचे आहेत, अशा खाजगी क्षेत्रांतील अमेरिकन व भारतीय कंपन्यांनी सहकार्याने उभारलेल्या कारखान्यांना कर्ज देण्यासाठी बाजूला काढून ठेवली आहे.

उरलेली १४ टक्के रकम भारतातील अमेरिकन वकिलातीचा खर्च भागविण्यासाठी, शैक्षणिक भेटी-प्रतिभेटींच्या कार्यक्रमासाठी आणि भारत सरकारने मंजूर केलेल्या विकासाच्या निश्चित प्रकल्पांना मदत करण्यासाठी राखून ठेवली गेली आहे.

तिसऱ्या वर्गात रुपयाच्या चलनातील १४ टक्के उत्पन्न येते. हे उत्पन्न थेट अमेरिकन सरकारला मिळते. ही रक्कम विकासाच्या खास प्रकल्पांना पैसा पुरविण्यासाठी उपयोगात आणण्यास व भारतात अमेरिकन वकिलातीच्या काही प्रकारच्या खर्चासाठी उपलब्ध केली जाते. गेल्या दहा वर्षांत ही खर्चाची रक्कम १ अब्ज, २२ कोटी रुपये किंवा वार्षिक सुमारें १२ कोटी, २० लक्ष रुपये झाली आहे.

या तिसऱ्या वर्गातील रुपयांपैकी ठोकळ मानाने ५ टक्के रकम अमेरिकेच्या मदतीने चाललेल्या भारतातील शेती–विकासाच्या कार्यक्रमासाठी व संशोधनासाठी खर्च केली जाते. (त्या शिवाय भारतातील सात शेतकी विद्यापीठे काढण्याचा व चालविण्याचा खर्च भारत सरकारला रुपयांच्या निधीतून दिल्या जाणाऱ्या रकमेतून केला जातो. ही विद्यापीठे आज भारतातील शेतीच्या विकासाला महत्त्वाची मदत करीत आहेत.)

या वर्गातील रकमेपैकी २५ टक्के रक्कम भारत सरकारच्या संमतीने नेपाळी सरकारला त्या देशाच्या विकासकार्यासाठी कर्ज किंवा अनुदान म्हणून दिली गेली आहे.

रुपयाच्या चलनातील ज्या रकमेचा उपयोग अमेरिका करते तीपैकी साठ टक्के रक्कम अमेरिकन मालमत्तेची निगा, अमेरिकेच्या भारतीय नोकरांना पगार, आणि भारतातील अमेरिकन वकिलात चालविण्यात होणारे इतर खर्च यांसाठी उपयोगात आणली जाते.

बाकीची दहा टक्के रक्कम भारत व अमेरिका या देशांतील शैक्षणिक भेटी–प्रतिभेटींच्या कार्यक्रमासाठी आणि भारतीय विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक क्रमिक पुस्तके पुरविण्यासाठी उपयोगात आणली जाते.

धोरण म्हणून अमेरिका आपल्या मालकीच्या रुपयांचा विनियोग करताना भारताची संमती घेते.

अमेरिकन सरकारच्या मालकीच्या रुपयांच्या निधीपैकी बहुतेक निधी भारत सरकारच्या कर्जरोख्यांत गुंतविला गेला आहे. त्याचा अर्थ हे रुपये भारत सरकारला उपलब्ध होतात.

मात्र गेल्या दोन वर्षांत भारताकडे अमेरिकन गहू तातडीने मोठ्या प्रमाणावर रवाना केला जात असल्यामुळे अमेरिकेच्या मालकीच्या रुपयांचा निधी ज्या प्रमाणात खर्च होत आहे, त्यापेक्षा अधिक प्रमाणात झपाट्याने वाढत आहे.

—चेस्टर बोल्स

---

## बुभुक्षित स्त्रियांनी अन्न घेण्याचे का नाकारले?

लोकसंख्येच्या बेलगाम वाढीमुळे भारतापुढील अन्नधान्याची समस्या अधिकच बिकट झालेली आहे. उत्तरप्रदेश, बिहार आणि मध्यप्रदेशातील काही जिल्हे ह्यांतून अवर्षणामुळे गंभीर परिस्थिती उद्भवली आहे. ह्या राज्यांतील दुष्काळग्रस्तांना मोफत जेवण पुरविण्याची केंद्रे सरकारतर्फे व खाजगी साहाय्यक संघटनांतर्फे सुरू करण्यात आलेली आहेत. अन्नाला परब्रह्म म्हणून संबोधण्यात येते. भुकेने पिडलेला मनुष्य कोणत्याही पापाचरणाला सिद्ध होतो, अशा अर्थाचे सुभाषितच आहे. पण, मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यात मदतकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना विचित्र अनुभव आला. धार जिल्ह्यात आदिवासींची वस्ती बरीच आहे. त्याच्यातील अनेक स्त्रिया मोफत अन्नकेंद्रांत आल्या पण पोटात भुकेची आग भडकलेली असतानाही आदिवासींच्या स्त्रियांनी अन्न घेण्याचे नाकारले. कोठून कोणास ठाऊक, पण केंद्रांतील अन्न घेतल्यास वंध्यत्व प्राप्त होईल, अशी त्यांची कल्पना झालेली होती. मोफत अन्नकेंद्र चालविण्याच्या संघटनांचा हेतू संततिनियमन घडवून आणण्याचा आहे असा त्या स्त्रियांचा पक्का ग्रह झालेला होता. केंद्राच्या कार्यकर्त्यांना स्त्रियांची समजूत काढण्यास अतिशय प्रयास पडले. धार जिल्ह्यात ४१३ मोफत अन्नदानकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. समजूत पटल्यामुळे आता सुमारे ३० हजार आदिवासी मुलांनी आणि गर्भवती स्त्रियांनी अन्न घेण्यास प्रारंभ केला आहे. अंगावर पाजणाऱ्या स्त्रियाही केंद्राचा लाभ घेऊ लागल्या आहेत. संततिनियमनाचा प्रसार करण्याचे कार्य भारतात किती कठीण आहे, हे ह्या घटनेवरून दिसून येते.

## अपघातामुळे होणारे रेल्वेचे नुकसान

रेल्वेवाहतुकीत होणाऱ्या अपघातांमुळे होणाऱ्या नुकसानीची आकडेवार माहिती जाहीर करण्यात आली आहे. मागील वर्षाशी तुलना करता १९६५-६६ सालात रेल्वेच्या अपघातांमुळे होणारी हानी २५ टक्क्यांनी वाढली आहे. रेल्वेचे डबे, एंजिने आणि रूळ ह्यांची हानी १९६४-६५ सालात ८१ लाख रुपयांची झाली होती. १९६५-६६ सालात हानीचा आकडा १ कोटी रुपयांपेक्षाही अधिक झाला आहे. अपघातामुळे वाहतुकीत व्यत्यय येतो व नुकसान होते परंतु ह्या रीतीने होणाऱ्या नुकसानीपेक्षा रेल्वेच्या सामानाच्या मोडतोडीमुळे होणाऱ्या हानीचे प्रमाण अलीकडे वाढत चाललेले आहे. कारण, मोडतोड झालेल्या सामानाच्या जागी घ्याव्या लागणाऱ्या नव्या मालमत्तेची किंमत वाढलेली आहे. प्रवासी आणि मालवाहू डबे आणि डिझेल व विजेची एंजिने ह्यांच्या किमती फार असतात. ही हानी अर्थातच भरून काढावी लागते. १९६५-६६सालात रेल्वेच्या टकरा आणि गाड्या रुळावरून घसरण्याचे प्रकार कमी झाले. १९६४-६५ सालात गाड्यांच्या टकरा ९१ झाल्या. १९६५-६६ सालातील टकरांचा आकडा ८४ आहे. परंतु आर्थिक नुकसान मात्र अधिक झाले. डबे व एंजिने ह्यांच्या मोडतोडीमुळे झालेल्या नुकसानीचा आकडा १७.७९ लाख रुपयांवरून २५.७६ लाख रुपयांपर्यंत वाढला. गाड्या रुळावरून घसरण्याचे प्रकार कमी झाले, पण त्यामुळे होणारे नुकसान मात्र वाढले. अपघातांच्या कारणांची चिकित्सा करता असे आढळून येते की, रेल्वेवर काम करणाऱ्या लोकांनी केलेल्या चुकांमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण अजूनही मोठे आहे. अपघातांपैकी ६५.८ टक्के अपघात रेल्वे कर्मचाऱ्यांच्या चुकांमुळे झालेले आढळून आले.

---

## खताच्या कारखान्यांसाठी जागतिक बँकेची मदत

रासायनिक खताचे खाजगी मालकीचे कारखाने काढण्यासाठी जागतिक बँक मदत करण्यास उत्सुक आहे. भारतामध्ये खताचे उत्पादन त्वरित होणे अगत्याचे असल्यामुळे सार्वजनिक मालकीच्या स्वतःच्या कारखान्यानांही निराळ्या प्रकाराने मदत देण्याची तयारी बँकेने दाखविली आहे. जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. वुड्स ह्यांनी मुंबई येथे बोलताना खताच्या उत्पादनाच्या बाबतीत सरकारशी सहकार्य करण्याची तयारी दाखविली होती. कारखान्यांच्या उभारणीसाठीं इटालीकडून आर्थिक मदत मिळावयाची आहे. परंतु ती अद्याप सरकारच्या हाती आलेली नाही. हे कारखाने उभारण्याच्या बाबतीत त्यामुळे अनिश्चितता उत्पन्न झाली असून खताच्या उत्पादनाच्या कार्यक्रमात व्यत्यय निर्माण झाला आहे. भारत सरकारच्या संबंधित खात्याने ह्या बाबतीत केलेल्या अंदाजाप्रमाणे सध्या उभारण्यात येत असलेल्या कारखान्यांची जास्तीतजास्त उत्पादनक्षमता २७ लाख टनांची आहे. परंतु ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरच्या वर्षात खताचे उत्पादन १९ लाख टनांपलीकडे जाणार नाही. हे खत मुख्यतः नत्रयुक्त असेल. त्या वर्षात अशा खताची गरज मात्र २४ लाख टनांच्या आसपास असेल. चालू आर्थिक वर्षात ५.२५ लाख टन खताचे उत्पादन होईल असा अंदाज आहे. गेल्या वर्षी सुमारे ३.२५ लाख टन खताचे उत्पादन झाले होते. भारतामधील शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी खताची अतिशय गरज असल्याने सार्वजनिक मालकीच्या विभागालाही अमेरिकेची मदत मिळेल असे दिसते.

## ब्रह्मदेशाकडून तांदूळ मिळण्यास विलंब लागणार

भारत सरकार देशातील तांदळाची टंचाई दूर करण्याचे प्रयत्न करीत आहे. ब्रह्मदेशाच्या सरकारने १॥ लाख टन तांदूळ पुरविण्याचे कबूल केले आहे. हा तांदूळ जूनअखेर भारतात यावयास पाहिजे होता. परंतु अद्याप तरी तो ब्रह्मदेशाच्या बंदरातून रवाना झालेला नाही. भारत सरकारने त्या देशाच्या सरकारकडे तातडीचा संदेश पाठविला होता. त्याला उत्तर म्हणून ब्रह्मी सरकारने असे कळविले आहे की कबूल केलेला तांदूळ जून महिनाअखेर बोटीवर चढविण्यात येईल आणि जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात भारताच्या बंदरात पोचेल. आंध्र प्रदेशाकडून मिळावयाच्या तांदळालाही असाच विलंब लागत आहे. त्यामुळे केरळमधील तांदळाची वाटपव्यवस्था कोलमडण्याच्या मार्गास लागली आहे. एप्रिल व मे महिन्यांत केरळला मध्यवर्ती सरकारकडून ३७ हजार टन तांदूळ मिळाला. तो १ लाख, ४० हजार टन मिळावयास पाहिजे होता.

---

## खादीचा व सुताचा साठा साठून राहिला

अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग संघटनेने भारत सरकारला अशी विनंती केली आहे की काही प्रकारच्या कापडाचे उत्पादन फक्त संघटनेलाच करण्याची परवानगी देण्यात यावी. संघटनेतर्फे चालविण्यात येणाऱ्या खादी व सूत उत्पादनाच्या केंद्रात दोन्ही वस्तूंचे मोठमोठे साठे पडून असल्याने संघटनेपुढे गंभीर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. संघटनेच्या उत्पादनकेंद्रात दरसाल सुमारे २२ कोटी रुपयांचे खादीचे कापड निर्माण करण्यात येते. पण अलीकडील काही वर्षात खादीची विक्री घटत चालली असून ती आता वार्षिक १५ ते १६ कोटी रुपयांवर आली आहे. त्याचप्रमाणे सूत उत्पादनकेंद्रात ३ ते ४ कोटी रुपयांचे सूत गिऱ्हाइकांच्या अभावी पडून आहे.

---

## राजकीय पक्षांना देणग्या

खाजगी कंपन्यांना राजकीय पक्षांस देणगी देण्यास बंदी करण्यात यावी, अशी संथानम कमिटीने शिफारस केली होती. पण सरकारला ती मान्य नसल्यामुळे त्या शिफारसीप्रमाणे कंपनी कायदा दुरुस्ती केली जाणार नाही.

## रेल्वे खात्यात जरुरीपेक्षा अधिक माणसे

हिंदमधील रेल्वेमार्गावरील काम, त्याची लांबी, त्यावरील धावते डबे आणि कार्यपद्धती ह्यांचा विचार करता आणि परदेशांतील रेल्वेशी तुलना करता ह्या खात्यात जरुरीपेक्षा बरीच अधिक माणसे कामावर आहेत असे दिसून येते. अमेरिकेतील रेल्वेमार्गाची लांबी सुमारे ३ लाख किलोमीटर्स आहे. ह्या मार्गावर दरसाल अंदाजे १२८ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात येते. अमेरिकेमधील रेल्वेवर काम करणाऱ्या कामगारांची संख्या ६ लाख, ६५ हजार आहे. हिंदमधील रेल्वेमार्गाची लांबी अमेरिकेतील रेल्वेमार्गा पेक्षा बरीच कमी म्हणजे एक पंचमांश आहे. हिंदमधील रेल्वेवर अमेरिकन रेल्वेच्या तुलनेने एक शष्ठांशच मालाची वाहतूक करण्यात येते. असे असून सुद्धा रेल्वेतर काम करणाऱ्या लोकांची संख्या १२ लाख, ६७ हजार इतकी मोठी आहे. अमेरिकेत दर १० लाख टन वाहतुकीमागे ५१९ माणसे काम करतात. जर्मनीत हेच प्रमाण १,६३२ आहे; भारतात मात्र इतक्या वजनाची वहतूक करण्यासाठी ६,५३७ लोकांची गरज लागते. गेल्या काही वर्षात हिंदमधील रेल्वेमार्गावरून पंचवार्षिक योजनेसाठी लागणाऱ्या सामग्रीची वहातुक वाढत्या प्रमाणात होत आहे. परंतु ही वहातुक करण्यासाठी यांत्रिक साधनांचा वापर करणे फारसे वाढले नाही. रेल्वेच्या रुळांची दुरुस्ती करणे आणि इतर दैनंदिन कामे ह्यासाठी भागतात अजूनही मनुष्यबळाचाच वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. पाश्चात्य देशांतून रेल्वे मार्गावरील नेहमीची कितीतरी कामे यंत्रांच्या साह्याने झटपट उरकण्यात येतात. त्यामुळे रेल्वे मार्गाचा अधिक प्रमाणात वापर तर करता येतोच. पण, प्रवासी आणि माल ह्यांची वाहतूकही झपाट्याने व सुलभतेने होऊ शकते.

---

## खत कारखान्यांच्या उभारणीस परदेशांचे सहकार्य

भारतात खताचे व शेतीच्या मालावर संस्करण करणारे कारखाने सहकारी तत्त्वावर चालविणाऱ्या संघटनांशी सहकार्य करण्याची तयारी अमेरिकेने दाखविली आहे. पूर्व युरोपातील हंगेरी, झेकोस्लोव्हाकिआ व पूर्व जर्मनी ह्याही देशांनी अशा प्रकारच्या सहकारी कारखान्यांना मदत देण्याची तयारी दाखविली आहे. अमेरिकन को-ऑपरेटिव्ह लीग ह्या संघटनेने ४ लाख टन नत्रयुक्त खत निर्माण करू शकणाऱ्या कारखान्यांच्या स्थापनेविषयी एक योजनाच सादर केलेली आहे. संकल्पित कारखान्यांच्या उभारणीसाठी सुमारे १३ कोटी डॉलर्स अथवा ९७·५ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. पूर्व युरोपातील देशांकडून येणाऱ्या मदतीला अद्याप निश्चित स्वरूप आलेले नाही. हंगेरीने भारतामधील खताच्या सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या कारखान्यांना आर्थिक साह्य देण्याची तयारी दाखविली आहे. त्याचप्रमाणे ह्या देशाने डबाबंद फळे तयार करण्याच्या कारखान्यांस हातभार लावण्याचे मान्य केले आहे. अमेरिकेच्या सहकारी संघटनेने पुढे मांडलेली योजना नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया ह्या संघटनेने मान्य केली आहे. भारतामधील सहकारी संघटनांची ही मध्यवर्ती संस्था आहे. अमेरिकेच्या सहकारी संघटनेतर्फे दररोज १,२०० टन नत्रयुक्त खत निर्माण करणारा कारखाना उभारण्यात यावयाचा आहे. त्याशिवाय इतर काही रासायनिक खतेही कारखान्यात तयार करण्यात येतील. कारखान्यासाठी लागणाऱ्या भांडवलापैकी ७० टक्के भांडवल अमेरिकन को-ऑपरेटिव्ह लीग ह्या संघटनेमार्फत कर्जाऊ मिळणार आहे. अर्थात कर्जाची रक्कम अमेरिकन सरकार पुरविणार आहे. उरलेले भांडवल भारत सरकार आणि देशातील सहकारी संस्था ह्यांनी उभे करावयाचे आहे. अमेरिकेकडून तांत्रिक सहकार्यही मिळेल.

---

## घरबांधणीच्या पैशाचा योग्य उपयोग हवा

शहरातील राहत्या जागांचा प्रश्न सोडविण्यास मदत म्हणून भारत सरकार राज्य सरकारांना पैसा उपलब्ध करून देत असते. परंतु राहत्या घरांचा व गलिच्छ वस्त्यांचा प्रश्न अजून नीटसा सुटलेला नाही. ह्या कामी होणाऱ्या कामाची गती मंद आहे. म्हणून राज्य सरकारांनी घरबांधणीसाठी मंजूर करण्यात आलेला पैसा दुसऱ्या कामासाठी वापरू नये अशी सूचना भारत सरकारने केली आहे. कित्येक राज्यांतून घरबांधणीसाठी दिलेल्या निधीपैकी २० ते ४० टक्के रक्कम इतर कामावर खर्च झाल्याचे आढळून आले आहे. घर बांधणीचे काम आंध्र, मद्रास, महाराष्ट्र आणि पंजाब राज्यांतून समाधानकारक रीतीने होत आहे. इतर राज्यांतून मात्र निराळी परिस्थिती आहे. काही राज्यांतून घरबांधणीसाठी वापरावयाचा पैसा पूर्णतया वापरला जात नाही. इतकेच काय, मध्यवर्ती सरकारकडून मिळणारी मदतही योग्य रीतीने खर्च करण्यात येत नाही. गेल्या वर्षी मध्यवर्ती सरकारच्या साह्याने होणाऱ्या घरबांधणीच्या कामासाठी ९ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली होती. परंतु त्यापैकी अवघी ५ कोटी रक्कमच प्रत्यक्ष वापरण्यात आली. गलिच्छ वस्त्या नाहीशा करण्यासाठी ३·५ कोटी रुपयांची रक्कम मदतीदाखल मंजूर करण्यात आली होती. त्यांपैकी २·५ कोटी रुपयेच खर्च करण्यात आले. ह्या कामावर होणाऱ्या खर्चापैकी ७५ टक्के खर्च मध्यवर्ती सरकार सोसते. ह्या बाबतीत राज्यांनी काही अडचणी नमूद केल्या आहेत. मोठ्या शहरांतून घरबांधणीसाठी लागणारी जमीन सहज मिळू शकत नाही. त्याचप्रमाणे घरबांधणीसाठी लागणारे साहित्यही पुरेसे व सुलभतेने मिळू शकत नाही, अशी राज्य सरकारांची तक्रार आहे.

---

## भारताच्या लोकसंख्येच्या वाढीचा प्रचंड वेग

भारताच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन करणारांना लोकसंख्येच्या वाढीच्या वेगाने जबरदस्त आव्हान दिलेले आहे. झपाट्याने वाढणारी लोकसंख्या त्यांची डोकेदुखीच ठरली आहे. देशातील जननाचे प्रमाण दर हजारी ४ टक्के आहे, तर मृत्यूचे प्रमाण दर हजारी १·०६ टक्के आहे. ह्याचा अर्थ असा, की दरसाल २ कोटी मुले जन्माला येतात; दरसाल ८० लाख लोक मरण पावतात. म्हणजे प्रत्येक वर्षी १-२ कोटी नव्या तोंडांची भर पडत आहे. लोकसंख्या ह्याच वेगाने वाढत चालली तर २० वे शतक संपण्याच्या सुमारास भारताची लोकसंख्या १०० कोटींच्या घरात प्रविष्ट होईल. लोकांचे जीवनमान सुधारण्याचे कितीही निकराचे प्रयत्न करण्यात आले, तरी वाढत्या लोकसंख्येची धोंड ह्या प्रयत्नांना मारक ठरल्याशिवाय राहणार नाही. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी म्हटल्याप्रमाणे लोकसंख्येवर नियंत्रण न ठेवता नियोजन करणे म्हणजे पुन्हा पुन्हा पाण्याखाली जाणाऱ्या जमिनीवर घर बांधण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. भारतामधील अन्नधान्याचे उत्पादन अजिबात वाढत नाही असे नाही. १९५१-५२ साली देशात ५·५ कोटी टन अन्नाची पैदास झाली. १९६५-६६ साली अन्नपदार्थांचे उत्पादन ७·२ कोटी टन झाले. परंतु इतकी वाढ होऊनही दरमाणशी मिळू शकणाऱ्या अन्नाचे प्रमाण १२·८ औंसांवर घसरले. आता भारताची लोकसंख्या ५० कोटीजवळ आली आहे. इतक्या लोकांना दररोज १४·५ औंस अन्न पुरवावयाचे झाल्यास १० कोटी टन अन्नपदार्थांची पैदास झाली पाहिजे इतके उत्पादन न झाल्यास परदेशांतून मोठ्या प्रमाणावर अन्नधान्यांची आयात करावी लागेल. नाहीतर उपासमारीमुळे होणारे मृत्यू अटळ दिसतात.

**पर्ल बक ह्यांची मदत संघटना**—सुप्रसिद्ध अमेरिकन लेखिका पर्ल बक ह्यांनी आपल्या मिळकतीतून १० लाख डॉलर्सचा एक निधी स्थापन केला आहे. त्यांचे वय ७५ आहे. आशियातील स्त्रियांना अमेरिकन पित्यापासून झालेल्या मुलांना मदत करण्यासाठी निधीचा वापर करण्यात येणार आहे. १९६४ साली त्यांनी ह्या निधीची स्थापना केली.

**क्यूबाच्या पंतप्रधानांचे स्वप्न**--क्यूबाच्या कम्युनिस्ट राजवटीचे पंतप्रधान फिडेल कॅस्ट्रो ह्यांनी आपल्या एका भाषणात क्यूबातील अर्थव्यवस्था पैशाशिवाय चाललेली एक दिवस दिसेल असे स्वप्न रंगविले आहे. त्यांच्या मताने मनुष्य आणि त्याच्या श्रमाने उत्पन्न झालेल्या वस्तू ह्यांच्यात पैसा हा एक नीच मध्यस्थ आहे; तो नाहीसा केला पाहिजे.

**बीटच्या कंदापासून साखरेचा कारखाना**—भारतामधील सर्व साखरकारखाने उसापासून साखर तयार करतात. पंजाबात बीट ह्या गोड कंदापासून साखर तयार करण्याचा पहिला कारखाना उभारण्यात आला आहे. हा कारखाना सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणार आहे. साखरेच्या धंद्यात नव्या दिशेने टाकलेले हे पाऊल आहे.

## मँगेनिझच्या खनिजाच्या निर्यातीचा करार

जपानमधील फ्युजी आयर्न अँड स्टील कंपनी आणि भारताचे मिनरल्स अँड मेटल ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्यांच्या दरम्यान मँगेनिझच्या पुरवठ्याबाबत मोठा करार करण्यात आला आहे. जपानी कंपनीत पाच मोठ्या पोलाद कंपन्या समाविष्ट झालेल्या आहेत. कराराप्रमाणे भारताचे कॉर्पोरेशन चालू वर्षी २ लाख, ४५ हजार टन मँगेनिझचे खनिज जपानला निर्यात करणार आहे. गेल्या वर्षी भारताकडून निर्यात करण्यात आलेल्या खनिजापेक्षा चालू सालची निर्यात २५ हजार टनांनी अधिक आहे. चालू वर्षी जपानला ७ लाख टन मँगेनिझची गरज लागणार आहे. भारताखेरीज दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिआ, मलाया, आणि फिलिपाइन बेटे ह्या देशाकडून जपान ह्या खनिजाची आयात करीत असतो. जपानचे पोलादाचे उत्पादन आशियात रशिया सोडून सर्वात अधिक आहे.

## युरेनिअम खाणी कामगारांना धोका

अणुशास्त्राची प्रगती झाल्यापासून युरेनिअमच्या खनिजाच्या उत्पादनाला साहजिकच फार महत्त्व आले आहे. ह्या खाणींतून काम करणाऱ्या कामगारांच्या जीविताला असलेल्या धोक्याबद्दल अमेरिकेच्या मजूर खात्याच्या चिटणीसांनी इशारा दिला आहे. त्यांनी अशी माहिती जाहीर केली आहे की, युरेनिअमच्या खनिजाच्या खाणीत काम करणाऱ्या कामगारास फुप्फुसाच्या कॅन्सरचा प्रसार होण्याची शक्यता असते. खाणीत काम करणाऱ्या १००० कामगारांवर कॅन्सरची दाट छाया पडली असून ९८ कामगार तर मृत्युमुखीच पडले आहेत. युरेनिअमच्या खनिजाच्या खाणीत राबणाऱ्या २५०० भूमिगत मजुरांपैकी दोन तृतीयांश मजुरांना तरी फुप्फुसाच्या कॅन्सरला बळी पडावे लागेल. त्यांचे काम असेच चालू राहिले तर त्यांना कॅन्सर होण्याची भीती तिपटीने वाढेल. युरेनिअमपासून होणाऱ्या किरणोत्सर्गाचा हा परिणाम आहे.

## परदेशीय प्रवाशांपासून मिळणारे उत्पन्न

१९६६ साली भारतात परदेशांतून १ लाख, ६० हजार हौशी प्रवासी आले. परदेशांतून येणाऱ्या प्रवाशांची वार्षिक सरासरी १ लाख ५० हजार आहे. परदेशी प्रवाशांच्या संख्येत झालेली ही वाढ फारशी मोठी आहे असे म्हणता येणार नाही. सालोसाल जास्त परदेशीय चलन मिळविण्यासाठी प्रवाशांच्या संख्येत खूप वाढ होणे अगत्याचे आहे. भारतात गेली दोन वर्षे पडलेल्या दुष्काळाची व अन्नटंचाईची बरीच प्रसिद्धी परदेशांतील वृत्तपत्रांतून होत असते. त्यामुळे भारतात येऊ इच्छिणाऱ्या प्रवाशांच्या मनात किंतू उत्पन्न होतो. प्रवाशांची संख्या घटण्याचे हे एक कारण असले तरी दुष्काळग्रस्त भारताला परदेशाकडून मिळणारी मदतही टंचाईच्या प्रसिद्धीमुळेच येत आहे.

## कॅस्पिअन समुद्राची पातळी घटत आहे

रशियातील कॅस्पिअन समुद्राच्या पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. ही पातळी आहे तितकीच राखण्यासाठी रशियन एंजिनिअर्स एका महत्त्वाकांक्षी योजनेचा विचार करीत आहेत. दोन उत्तरवाहिनी नद्यांना धरणे बांधून त्यांचे पाणी व्होल्गा नदीत सोडण्याची योजना आखण्यात येत आहे. कॅस्पिअन समुद्राला मिळणारी व्होल्गा ही सर्वात मोठी नदी आहे. कॅस्पिअन समुद्रातील पाणी कमी होऊ लागल्यामुळे ह्या समुद्रात सापडणाऱ्या उत्तम प्रतीच्या मासळीच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ लागला आहे. ह्या समुद्राची पातळी इतर समुद्रांपेक्षा आजच ९२ फूट खाली आहे, व ती झपाट्याने कमी होत आहे. १९५० पर्यंतच्या २३ वर्षांच्या कालात पाण्याची पातळी काही फूट कमी झाली, व मच्छीमारीचे क्षेत्र सुमारे ११,५०० चौरस मैलांनी कमी झाले.

---

## मुंबईतील सर्वांत उंच इमारत

मुंबईमधील मलबार हिलवरील कारमायकेल रस्त्यावर २६ मजले उंच असणारी एक गगनचुंबी इमारत बांधण्यात आली आहे. इमारतीची उंची २८० फूट आहे. दिल्ली येथील सुप्रसिद्ध कुतुबमिनारची उंची २४२ फूटच आहे. इमारतीला 'उषा किरण' असे नाव देण्यात आले आहे. उगवत्या सूर्याचे मुंबईवर पडणारे पहिले किरण ह्या इमारतीचे दर्शन घेतील. मुंबईमधील 'राजाभाई मनोरा' २८० फूटच उंच आहे. ह्या इमारतीत सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयी असणाऱ्या बिऱ्हाडांच्या ५२ जागा आहेत. इमारत बांधण्यासाठी १·२ कोटी रुपये खर्च आला आहे. इमारतीत मध्यवर्ती सरकारचे प्रवासमंत्री वास्तव्य करणार आहेत. त्याशिवाय ६ माजी संस्थानिक, एक सिनेमा नटी आणि काही उद्योगपती तेथे राहतील. उद्योगपतींत काहीजण परदेशीही आहेत. इमारतीच्या मजल्यांवर जाण्यासाठी वेगाने चालणारे ३ विजेचे लिफ्ट बसविण्यात आले आहेत.

---

## पोस्टेजच्या दरात वाढ

पार्सले, नोंदलेली वृत्तपत्रे, बुक पॅकेट्स, ह्यांचे पोस्टेजचे दर आणि रजिस्ट्रेशन, एक्सप्रेस डिलिव्हरी, इन्शुअरन्स आणि एअरमेल पॅकेट्स ह्यांचेही दर वाढविण्यात येणार आहेत. त्याची तारीख लवकरच जाहीर होईल. ह्या दरवाढीमुळे सरकारला १·८४ कोटी रुपये जादा उत्पन्न होईल.

नोंदलेल्या वृत्तपत्रांना पहिल्या १०० ग्रॅम्सला ह्यापुढे ५ पैसे पोस्टेज पडेल. ४०० ग्रॅम्सच्या पार्सलला सध्याचा ६० ऐवजी ६५ पैसे पडतील. रजिस्ट्रेशन फी ५५ पैशांची ६० पैसे होईल.

---


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार- सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

## पुण्यातील नवे कॉमर्स कॉलेज

१९६३ पासून एम्. ई. एस्. कॉलेजात प्री. डिग्री कॉमर्सचे वर्ग सुरू झाले. पुढे क्रमाने एस्. वाय. बी. कॉमपर्यंतचे वर्ग निघत गेले. आता संस्थेने स्वतंत्र कॉमर्स कॉलेज सुरू करण्याचा निर्णय घेतला

### १,००० विद्यार्थ्यांची कालांतराने सोय

५५० विद्यार्थी येतील अशी अपेक्षा आहे. प्री–डिग्रीच्या तीन संकल्पित तुकड्या आहेत. एफ्. वाय्. कॉमर्सची, एस्. वाय. व टी. वाय्. कॉमर्सची प्रत्येकी एक तुकडी. तूर्त वसतिगृहानजीक बांधलेल्या एका नव्या तीन मजली इमारतीत कॉलेज सुरू होणार आहे. परंतु त्याच आवारात सभागृहाच्या पलीकडे कॉमर्स कॉलेजची स्वतंत्र इमारत बांधण्याचा निर्णय संस्थेने घेतला आहे व त्यानुसार कामास सुरुवात झाली आहे.

### प्राध्यापक वर्ग

आर्टस् व सायन्स कॉलेजमधून कॉमर्सकडील विषयांचे सर्व प्राध्यापक व इंग्रजी, अर्थशास्त्र, मराठी इत्यादी विषयांसाठी काही अनुभवी व जुने प्राध्यापक हे नव्या कॉमर्स कॉलेजकडे आले आहेत. त्याखेरीज काही प्राध्यापक दोन्हीकडे शिकविण्याचे काम करतील. काही विषयांसाठी उत्तम नवा प्राध्यापकवर्ग घेण्याचा संस्थेने कसोशीने प्रयत्न केला आहे.

### विशेष विषय

आपल्या कॉलेजला विद्यापीठाने Advanced Accounting, Advanced Cost Accountancy, Industrial Management व Rural Economics and Co-operation हे चार विषय बी. कॉमसाठी शिकविण्यास परवानगी दिली आहे. Industrial Management हा विषय पुण्यातही अलीकडेच बृ. म. कॉमर्स कॉलेजने सुरू केला. विशेषतः बी. ए. नंतर बी. कॉमकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना हा विषय जास्त उपयुक्त ठरेल व सोपा जाईल अशी आशा आहे. Rural Economics हा विषयही पुण्यात नवीन आहे.

### अभ्यासाला प्रत्यक्ष अनुभवात्मक मार्गदर्शनाची जोड

विद्यापीठातील अभ्यासक्रम व व्यापार–उद्योगांच्या गरजा यांचा मेळ बसणे ही गोष्ट कॉमर्सचे शिक्षण फलप्रद होण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. म्हणून अभ्यासक्रमाबरोबरच पुण्याच्या परिसरातील कारखानदारीच्या साहाय्याने विशेषतः बी. कॉममधील विद्यार्थ्यांना काही प्रत्यक्ष अनुभवात्मक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत.

आर्टस् कॉलेजप्रमाणेच कॉमर्स कॉलेज सकाळी ७–३० ते १२–३० च्या वेळात भरेल. मात्र प्री. डिग्रीची एक तुकडी सकाळी १०-३० ते ३–२० या वेळात भरविण्याचे ठरविले आहे. कारण, दौंड किंवा लोणावळा अशा अंतरावरून कॉलेजला विद्यार्थी येतात. त्यांना प्रवास करून ७-३० चा तास गाठणे अवघड होते.

शा. वा. चिरमुले, प्राचार्य.


## एस्. ई. एस्.
## कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे नं. ४

एम्. ई. एस्. कॉलेजातील कॉमर्स शाखेचे स्वतंत्र कॉलेजात रूपांतर करावयास पुणे विद्यापीठाने अनुमती दिली आहे. "एम्. ई. एस्. कॉलेज ऑफ कॉमर्स" या नावाने हे नवे कॉलेज १५ जून १९६७ पासून एम्. ई. एस्. कॉलेजच्या आवारातच सुरू होत आहे. या नव्या कॉलेजात बी. कॉम. पदवीपर्यंतच्या अभ्यासाची सोय करण्यात आली आहे.

बी. कॉम. साठी Advanced Accounting, Advanced Cost Accountancy, Industrial Management व Rural Economics and Co-operation.............................. हे खास विषय नियुक्त केले आहेत. या व इतर विषयांसाठी तज्ज्ञ व कळकळीचा प्राध्यापकवर्ग उपलब्ध होईल हे सांगणे नकोच.

कॉलेजचे माहितीपत्रक व अर्जाचा नमुना ऑफिसात ३० पैशांची किंवा परगावाहून ५० पैशांची तिकिटे पाठवून मिळवावा. कोणत्या वर्गात प्रवेश हवा आहे ते माहितीपत्रक मागविताना जरूर कळवावे. ५ जून १९६७ पासून प्रवेश सुरू होत आहे.

वसतिगृहात अगदी मर्यादित जागा असून त्या अभ्यासातील गुणवत्तेनुसार दिल्या जातात.

३१ मे १९६७. शा. वा. चिरमुले
प्राचार्य.



D. E. Society's

## Brihan Maharashtra College of Commerce,
POONA-4.

The College will reopen on 15th June, 1967 for the academic year 1967–68. In view of the limited accommodation, admissions to B. Com. Part–I, S. Y. B. Com., and T. Y. B. Com. classes will be given in the first instance to the students of this college. Students from other colleges will be admitted only if some vacancies are available. Provision has been made to teach the following special subjects : ( at T. Y. B. Com. )

Advanced Accounting and Auditing or Statistics or Banking or Industrial Management or Advanced Cost Accounting.

Admissions to the P. D. Commerce Class will commence from 5th June, 1967.

M. Com. Classes will begin from 1st July, 1967.

Forms of admission and copies of the prospectus are available in the college office between 11-00 a. m. and 2-00 p. m. on all working days.

N. K. Kulkarni
Principal

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

**हमारे दूसरे निर्माण है:** १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जें, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




सबल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ७११०२




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८३३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ पुणे, बुधवार २१ जून, १९६७ अंक १२

द. सा. द. शे. रुपये
७६.२/–
पर्यंत व्याज आपण मिळवू शकता
ठेवीची मुदत मोठी म्हणजे
व्याज मोठे
एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते
इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी :—सातारा
सत्तावीस शाखा

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )
: मुख्य कचेरी : ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१
: विभागीय कचेरी : महाल नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,९८,३८,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,५१,७१,००० |
| ठेवी | ... रु. | ४८,१९,९५,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,१८,८९,६२,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)
: नागपूर विभागातील शाखा :
(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.
ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### पाणीपुरवठ्याकडील दुर्लक्षाचा आर्थिक परिणाम

सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन अँड पॉवर ह्या संघटनेच्या संशोधन विभागाची बैठक भुवनेश्वर येथे भरविण्यात आली होती. आठवडाभर चाललेल्या ह्या बैठकीत ओरिसाचे गव्हर्नर डॉ. खोसला ह्यांनी भारताच्या सध्याच्या आर्थिक दुरवस्थेविषयी आपले विचार व्यक्त केले. डॉ. खोसला हे पेशाने इंजिनिअर आहेत. ते म्हणाले की, हिंदला एक प्रकारच्या आर्थिक रोगाने पछाडलेले आहे. पाण्याची साठवण आणि पुरवठा ह्या बाबतींत पुरेसे लक्ष न घातल्याने अर्थव्यवस्थेवर संकटाची छाया पडली आहे. गेली काही वर्षे भारताला अन्नधान्याच्या टंचाईने ग्रासलेले आहे. पाणीपुरवठा अधिकाधिक प्रमाणात उपलब्ध करणे हाच ह्या टंचाईवर उपाय आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून धान्याची आयात करावी लागत आहे. आतापर्यंत भारताने ८·३ कोटी टन अन्नधान्याची आयात केली असून त्यासाठी ३९०० कोटी रुपयांचे परदेशीय चलन किंमत म्हणून दिले आहे. अन्नधान्याच्या टंचाईमुळे लाखो लोकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत. त्याची किंमत पैशांत करता येणे अशक्य आहे. ती बाब सोडून दिली तरी केवळ दुष्काळी परिस्थितीमुळे देशाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. दुष्काळामुळे पिकांचे नुकसान झाले आणि दुष्काळग्रस्त लोकांना मदत देण्यासाठी फार मोठी रक्कम खर्च करावी लागली. पूर, पर्जन्याचा अभाव आणि पिकांची हानी ह्या संबंधीची पूर्वीची आकडेवार माहिती उपलब्ध होती. तिचा उपयोग करून आगामी घटनांचा थोडाफार अंदाज बांधता येणे शक्य होते. अन्नाच्या आयातीसाठी खर्च करण्यात आलेल्या पैशाचा अल्पसा हिस्सा तरी पाण्याची नीट व्यवस्था करण्यासाठी खर्चावयास पाहिजे होता.


---

### औरंगाबाद रेल्वे स्टेशनचा कायापालट

दक्षिण-मध्य रेल्वेमार्गावरील औरंगाबाद रेल्वे स्टेशनचा कायापालट करण्याचे काम पूर्ण होत आले आहे. जगप्रसिद्ध अजिंठा आणि वेरूळ येथील लेणी पाहण्यासाठी परदेशी प्रवासी फार मोठ्या संख्येने येतात. त्यांना औरंगाबाद रेल्वे स्टेशनवरच उतरावे लागते. स्टेशनातील सुखसोई वाढविण्यासाठी ४·६ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. प्रवासी येण्याचा हंगाम सामान्यतः सप्टेंबर महिन्यापासून जोराने सुरू होतो. हंगाम शिगेला पोचला म्हणजे औरंगाबाद रेल्वे स्टेशनवर रोज सरासरी दीड हजारावर प्रवासी उतरतात. त्यांच्या सोईसाठी वेटिंग रूमचा विस्तार करण्यात आला आहे. त्याशिवाय दोन झोपण्याच्या व राहण्याच्या खोल्या बांधण्यात आल्या आहेत. छोटा फराळ करण्याची अधिक चांगली सोय करण्यात आली आहे. फळे व चहाचे एक दुकान खोलण्यात आले आहे. औरंगाबादवरून जाणाऱ्या हैदराबाद-मनमाड रेल्वेचा वेग वाढविण्यात आला आहे.

---

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्





१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

पुण्यांत याल तेव्हां —
उद्यान निवास



या नवीन, आधुनिक
आकर्षक व सर्वंकष निवासामध्येच
कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर

टेलीफोन ५७७९१
माहिती मागवा
उद्यान प्रासाद
स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

# ★ अर्थ ★

बुधवार, २१ जून १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अरब–इस्राईल युद्ध आणि तेलाचा पुरवठा

मध्यपूर्वेत अरब राष्ट्रे आणि इस्राईल ह्यांच्यांत युद्ध सुरू झाल्याबरोबर त्या भागातील खनिज तेलाचे उत्पादन करणाऱ्या देशांनी पाश्चिमात्य देशांना करण्यात येणारा तेलाचा पुरवठा बंद करण्यात येईल अशा घोषणा केल्या. तेलाचे उत्पादन करणाऱ्या अरब देशांची आर्थिक घडी सर्वस्वी तेलाच्या विक्रीवर अवलंबून आहे. त्यामुळे तेलाची निर्यात दीर्घ काळ थांबविणे त्यांना शक्य होणार नाही. तेलाचा पुरवठा दीर्घ काळ बंद पडला तर आशियातील विकसनशील देशांवर मात्र त्याचा विपरीत परिणाम होईल. पण, अशी भीती बाळगण्याचेही फारसे कारण नाही. तेलाचे उत्पादन करणाऱ्या ७ अरब देशांनी जपानच्या परराष्ट्र मंत्र्यांना असे आश्वासन दिले आहे की, इस्राईलची बाजू घेणाऱ्या देशाचेच फक्त तेल तोडण्यात येईल. सुएझचा कालवा बंद करण्यात आला तर आशियातील देशांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. जपानमधील उद्योगधंद्यांवर तेलाचा पुरवठा बंद पडल्यास अनिष्ट परिणाम होईल. म्हणून जपान इंडोनेशियाकडून तेल मिळविण्याची खटपट करू लागले आहे. अरब देशांनी अमेरिकेला तेल देण्याचे बंद केले तर खुद्द अमेरिकेत बंदीचा फारसा परिणाम होणार नाही. पण व्हिएटनाममधील युद्धात अमेरिकेला अडचणींना तोंड द्यावे लागेल. ब्रिटनला लागणाऱ्या तेलापैकी ८० टक्के तेल अरब देशांकडून मिळते. तेलबंदी सार्वत्रिक झाली नाही तर ब्रिटनवर काही परिणाम होणार नाही. कारण बंदीच्या हुकमाच्या कक्षेच्या बाहेर असलेले देश तेल आयात करून त्याची ब्रिटनला पुनर्निर्यात करू शकतात. रशिया तेलाबाबत स्वयंपूर्ण आहे.

## पाकिस्तानच्या राजकारणाचे फळ

प. आशियात अरब राष्ट्रे आणि इस्राईल ह्यांच्यांत सशस्त्र संघर्ष होऊन अवघ्या ४ दिवसांत इस्राईलच्या फौजांनी निर्णायक स्वरूपाचा विजय मिळविला. ह्या युद्धाने पाकिस्तानला अरब राष्ट्रांच्या स्नेह्यांच्या गटात पाऊल टाकण्याची संधी मिळाली आहे. संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे ब्रिटनमधील हितसंबंधावर नजर ठेवण्याचे काम प्रजासत्ताकाने पाकिस्तानवर सोपविले आहे. त्याचप्रमाणे सिरीयाने आपले अमेरिकेतील हितसंबंध पाहण्याचे काम पाकिस्तानवर सोपविले आहे. ह्या वृत्ताला पाकिस्तानच्या वृत्तपत्रांतून खूप प्रसिद्धी देण्यात आली. पश्चिम आशियातील सशस्त्र संघर्षासंबंधी अनेक अलिप्ततावादी देशांनी सावधगिरीचे धोरण स्वीकारलेले होते. इराण आणि तुर्कस्तान पाकिस्तानशी मित्रभावाने वागणारी आहेत परंतु त्यांनी अरब-इस्राइल झगड्यात अरब देशांना कोरडी सहानुभूतीही दाखविली नाही. ह्या संघर्षासंबंधी पाकिस्तानी पत्रांनी बऱ्याच वार्ता प्रसिद्ध केल्या. पण त्यांतही भारताची निंदा–नालस्ती करण्याची संधी साधण्यात आली. सुरक्षितता मंडळात भारताने अरब प्रजासत्ताकाचा विश्वासघात केला असा प्रचार करण्यात आला. पाकिस्तानने युद्धाच्या वार्ता देताना अरब देशांना शाब्दिक सहानुभूती दाखविली परंतु असे करतानासुद्धा पाकिस्तानच्या व अरब देशांच्या धार्मिक एकतेवर भर देण्यात आला. सुरक्षितता मंडळात भारताने अरब राष्ट्रांची बाजू उचलून धरली, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. उलट, अरब देशांतील भारताची लोकप्रियता १९५६ सालच्या मानाने कमीच झालेली दिसत आहे. त्या वेळी पाकिस्तान अरब राष्ट्रांच्या बाजूला उभे राहिले नाही; ते संपूर्णपणे अलिप्त राहिले. त्या वेळीही भारत अरब देशांच्या बाजूने उभा राहिला होता आणि प्रजासत्ताकात लोकप्रिय झाला होता.

## विमानदळाच्या नाशामुळे विजय मिळाला

नुकत्याच झालेल्या अरब–इस्राईल युद्धात इस्राईलने पहिला प्रहार केला ही गोष्ट आता उघड झाली आहे. लष्करी तज्ज्ञांच्या मताने टीचभर प्रदेश असलेल्या ह्या देशाला स्वतंत्र अरबांचे सैन्य घुसून देणे परवडणारे नव्हते. ह्याच विचाराने इस्राईलाच्या विमानदलाने प्रथम इजिप्तचे विमानदल नष्ट करण्याचा डाव टाकला आणि तो अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. हल्ला करण्यात आला त्या वेळी इजिप्तची विमाने तळावर विखुरलेली सुद्धा नव्हती; ती पंखाला पंख लावूनच उभी होती. त्यामुळे त्यांची जबरदस्त हानी झाली. पहिल्या झटक्यात इजिप्तची सुमारे ४०० विमाने नाकाम झाली. त्यानंतर इस्राईलच्या विमानांनी आकाशात संपूर्ण वर्चस्व मिळविले.

## केसांच्या टोपांची निर्यात किफायतशीर

मध्यवर्ती सरकारच्या व्यापार महामंडळाने केसांच्या टोपांची निर्यात वाढविण्यासाठी जारीने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. केरळ व मद्रास राज्यांतील तीर्थक्षेत्रांत अनेक यात्रेकरू धार्मिक विधीच्या निमित्त मुंडन करतात. ह्या केसांपासून निरनिराळ्या प्रकारचे व आकाराचे टोप बनविण्याचा धंदा अलीकडे फोफावू लागला आहे. त्यामुळे टोप बनविण्यासाठी लागणाऱ्या केसांचा तुटवडा पडू लागला आहे. म्हणून व्यापार महामंडळाने केस जमविण्यासाठी केंद्रे उघडण्याचा निर्णय घेतला आहे. १९६२ सालात भारताने टोपांची निर्यात करून १६·५ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळविले होते. १९६५ सालात टोपांच्या निर्यातीने ९० लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळविण्यात आले. ह्यावरून ह्या धंद्याला आणखी बराच वाव असल्याचे दिसून येते. १९७० पर्यंत टोपांच्या निर्यातीने ३ कोटी रुपयांपर्यंत प्राप्ती होईल असा अंदाज करण्यात आला आहे. पाश्चात्त्य देशांत टोप वापरणे ही एक फॅशनच झाली आहे. ऑस्ट्रेलियात तर पुरुषांप्रमाणे स्त्रियाही अधिकाधिक संख्येने टोप वापरू लागल्या आहेत. टोपांसाठी लागणारे केस बरीच वर्षे चीनकडून पुरविले जात असत. परंतु राजकीय कारणांमुळे चीनकडून परदेशांत होणारी निर्यात बंद झाली आहे. अमेरिकेत आता भारतामधील लोकांच्या केसांपासून बनविलेले टोप लोकप्रिय होत चालले आहेत. हे टोप स्वस्त तर पडतातच; पण त्यांचा दर्जाही चांगला असतो. भारतात अनेक तीर्थक्षेत्रे विखुरलेली आहेत. दक्षिण भारताप्रमाणेच उत्तर भारतामधील क्षेत्रांतही मुंडन करण्याची प्रथा आहे. सर्व तीर्थक्षेत्री होणाऱ्या केसांच्या दानाचा उपयोग करण्यात आला तर टोप तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल अपुरा पडण्याचे कारण नाही. परदेशीय चलन मिळविण्याची ही नवीन दिशा चांगली किफायतशीर ठरण्यासारखी आहे.

---

## जपानच्या भरभराटीला शिक्षणप्रसार कारण

दुसऱ्या महायुद्धात झालेली हानी भरून काढून जपानने आपली भरभराट पुन्हा नव्याने साधली, ही एक आश्चर्यकारक घटना मानण्यात येते. ह्या घटनेचा कार्यकारणभाव समजून घेण्यासाठी एक ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जपानच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यास गेले होते. इतर अनेक कारणांबरोबरच शिक्षणप्रसारामुळे जपानची आर्थिक प्रगती शक्य झाली असे त्यांना आढळून आले. ह्या बाबतीत जपानने ब्रिटनच्याही पुढे आघाडी मारलेली आहे. जापानमधील विद्यार्थ्यांपैकी ७० टक्के विद्यार्थी त्यांच्या वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत शिक्षण चालू ठेवतात. ब्रिटनमध्ये हे प्रमाण ४० टक्केच आहे. त्याशिवाय कॉलेजमधील शिक्षण चालू ठेवणाऱ्या जपानमधील विद्यार्थ्यांचे प्रमाणही ब्रिटनपेक्षा बरेच अधिक आहे. जपानमध्ये रोजगार व नोकऱ्या मिळविण्याच्या बाबतीत बरीच स्पर्धा असते. तरीसुद्धा तेथील कारखादार उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेला महत्त्व देतात. नोकऱ्या मिळविण्यासाठी स्पर्धा असल्यामुळे जपानमधील एंजिनिअर्ससारख्या कुशल तंत्रज्ञालासुद्धा प्रारंभी बेताच्या पगारावर काम करावे लागते. जपान हा देश तांत्रिकदृष्ट्या प्रगत झालेला असला तरी पश्चिमेकडील देशांकडून नवी यंत्रे आयात करीत असतो. असे एखादे यंत्र आयात झाल्यावर जपानमधील इंजिनिअर्स त्याचा सामुदायिक रीतीने अभ्यास करतात, आणि त्यांच्यात आणखी काय सुधारणा करता येतील ह्याविषयी सूचना करतात. त्यांपैकी काही सूचना उपयुक्त ठरतात, आणि मग त्यांचा उपयोग करून जपानी कारखानदार नवे अधिक कार्यक्षम यंत्र तयार करतात. जपानच्या तंत्रज्ञांच्या शिक्षणाला जी व्यावहारिक बाजू आहे ती ह्या उदाहरणावरून लक्षात येते.

---

## भांडवलाचे स्थलांतर सहज होऊ शकणारे नाही

उद्योगधंद्यांचे चालक आणि त्यात राबणारा कामगार वर्ग ह्यांच्यातील तंटे, संप अगर टाळेबंदीच्या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. तंटे सोडविण्यासाठी खास कोर्टे अगर लवादाच्याही तरतुदी असतात. तरीसुद्धा उद्योगधंद्यांत अस्वस्थतेचे व अस्थैर्याचे वातावरण मधून मधून पसरते. अशा वेळी उद्योगधंद्यांचे मालक आपआपले धंदेच तेथून हलविण्याची भाषा बोलतात. बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज ह्या संघटनेपुढे बोलताना पश्चिम बंगालचे मुख्य मंत्री श्री. अजय मुखर्जी ह्यांनी आपले विचार स्पष्टपणे व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की, बंगालमध्ये मजुरांत अस्वस्थता असल्याने तेथील भांडवल स्थलांतर करील अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. बंगालमधील भांडवल बाहेर जाण्याचा धोक्याचा इषारा अगर धमकी ही फार जुनी आहे. एखाद्या ठिकाणी उद्योगधंदे स्थापन करण्यात येतात त्याला काही कारणे असतात. उद्योगधंद्यांना सोयीची जागा लागते; त्याचप्रमाणे काही तांत्रिक व आर्थिक सोईही उपलब्ध असाव्या लागतात. शिवाय कुशल कामगारही असावे लागतात. ज्या कारणांमुळे बंगालमध्ये उद्योगधंद्यांचा विकास झाला तीच कारणे अद्यापही कार्यक्षम आहेत. त्यामुळे तेथील उद्योगधंदे दुसरीकडे जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याहीपुढे जाऊन असे म्हणता येईल की, ह्या उद्योगधंद्यांच्या जाळ्यात भरच पडत जाईल. औद्योगिक विकास व प्रगतीसाठी शांततेच्या वातावरणाची गरज आहे ही गोष्ट खरी आहे. ह्या बाबतीत बंगालचे नाव बद्दू झालेले आहे हेही खरे. परंतु काम थांबविण्याच्या बाबतीत भाग घेणाऱ्या कामगारांची टक्केवारी बंगालमध्ये महाराष्ट्रापेक्षा कमी आहे. १९६३ मध्ये बंगालमधील टक्केवारी १४·४४ होती, तर महाराष्ट्रातील टक्केवारी ३७·४२ होती.

### केसांच्या टोपांची निर्यात किफायतशीर

मध्यवर्ती सरकारच्या व्यापार महामंडळाने केसांच्या टोपांची निर्यात वाढविण्यासाठी जारीने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. केरळ व मद्रास राज्यांतील तीर्थक्षेत्रांत अनेक यात्रेकरू धार्मिक विधीच्या निमित्त मुंडन करतात. ह्या केसांपासून निरनिराळ्या प्रकारचे व आकाराचे टोप बनविण्याचा धंदा अलीकडे फोफावू लागला आहे. त्यामुळे टोप बनविण्यासाठी लागणाऱ्या केसांचा तुटवडा पडू लागला आहे. म्हणून व्यापार महामंडळाने केस जमविण्यासाठी केंद्रे उघडण्याचा निर्णय घेतला आहे. १९६२ सालात भारताने टोपांची निर्यात करून १६·५ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळविले होते. १९६५ सालात टोपांच्या निर्यातीने ९० लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळविण्यात आले. ह्यावरून ह्या धंद्याला आणखी बराच वाव असल्याचे दिसून येते. १९७० पर्यंत टोपांच्या निर्यातीने ३ कोटी रुपयांपर्यंत प्राप्ती होईल असा अंदाज करण्यात आला आहे. पाश्चात्त्य देशांत टोप वापरणे ही एक फॅशनच झाली आहे. ऑस्ट्रेलियात तर पुरुषांप्रमाणे स्त्रियाही अधिकाधिक संख्येने टोप वापरू लागल्या आहेत. टोपांसाठी लागणारे केस बरीच वर्षे चीनकडून पुरविले जात असत. परंतु राजकीय कारणांमुळे चीनकडून परदेशांत होणारी निर्यात बंद झाली आहे. अमेरिकेत आता भारतामधील लोकांच्या केसांपासून बनविलेले टोप लोकप्रिय होत चालले आहेत. हे टोप स्वस्त तर पडतातच; पण त्यांचा दर्जाही चांगला असतो. भारतात अनेक तीर्थक्षेत्रे विखुरलेली आहेत. दक्षिण भारताप्रमाणेच उत्तर भारतामधील क्षेत्रांतही मुंडन करण्याची प्रथा आहे. सर्व तीर्थक्षेत्री होणाऱ्या केसांच्या दानाचा उपयोग करण्यात आला तर टोप तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल अपुरा पडण्याचे कारण नाही. परदेशीय चलन मिळविण्याची ही नवीन दिशा चांगली किफायतशीर ठरण्यासारखी आहे.

### जपानच्या भरभराटीला शिक्षणप्रसार कारण

दुसऱ्या महायुद्धात झालेली हानी भरून काढून जपानने आपली भरभराट पुन्हा नव्याने साधली, ही एक आश्चर्यकारक घटना मानण्यात येते. ह्या घटनेचा कार्यकारणभाव समजून घेण्यासाठी एक ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जपानच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यास गेले होते. इतर अनेक कारणांबरोबरच शिक्षणप्रसारामुळे जपानची आर्थिक प्रगती शक्य झाली असे त्यांना आढळून आले. ह्या बाबतीत जपानने ब्रिटनच्याही पुढे आघाडी मारलेली आहे. जापानमधील विद्यार्थ्यांपैकी ७० टक्के विद्यार्थी त्यांच्या वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत शिक्षण चालू ठेवतात. ब्रिटनमध्ये हे प्रमाण ४० टक्केच आहे. त्याशिवाय कॉलेजमधील शिक्षण चालू ठेवणाऱ्या जपानमधील विद्यार्थ्यांचे प्रमाणही ब्रिटनपेक्षा बरेच अधिक आहे. जपानमध्ये रोजगार व नोकऱ्या मिळविण्याच्या बाबतीत बरीच स्पर्धा असते. तरीसुद्धा तेथील कारखादार उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेला महत्त्व देतात. नौकऱ्या मिळविण्यासाठी स्पर्धा असल्यामुळे जपानमधील एंजिनिअर्ससारख्या कुशल तंत्रज्ञालासुद्धा प्रारंभी बेताच्या पगारावर काम करावे लागते. जपान हा देश तांत्रिकदृष्ट्या प्रगत झालेला असला तरी पश्चिमेकडील देशांकडून नवी यंत्रे आयात करीत असतो. असे एखादे यंत्र आयात झाल्यावर जपानमधील इंजिनिअर्स त्याचा सामुदायिक रीतीने अभ्यास करतात, आणि त्यांच्यात आणखी काय सुधारणा करता येतील ह्याविषयी सूचना करतात. त्यांपैकी काही सूचना उपयुक्त ठरतात, आणि मग त्यांचा उपयोग करून जपानी कारखानदार नवे अधिक कार्यक्षम यंत्र तयार करतात. जपानच्या तंत्रज्ञांच्या शिक्षणाला जी व्यावहारिक बाजू आहे ती ह्या उदाहरणावरून लक्षात येते.

### भांडवलाचे स्थलांतर सहज होऊ शकणारे नाही

उद्योगधंद्यांचे चालक आणि त्यात राबणारा कामगार वर्ग ह्यांच्यातील तंटे, संप अगर टाळेबंदीच्या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. तंटे सोडविण्यासाठी खास कोर्टे अगर लवादाच्याही तरतुदी असतात. तरीसुद्धा उद्योगधंद्यांत अस्वस्थतेचे व अस्थैर्याचे वातावरण मधून मधून पसरते. अशा वेळी उद्योगधंद्यांचे मालक आपआपले धंदेच तेथून हलविण्याची भाषा बोलतात. बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज ह्या संघटनेपुढे बोलताना पश्चिम बंगालचे मुख्य मंत्री श्री. अजय मुखर्जी ह्यांनी आपले विचार स्पष्टपणे व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की, बंगालमध्ये मजुरांत अस्वस्थता असल्याने तेथील भांडवल स्थलांतर करील अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. बंगालमधील भांडवल बाहेर जाण्याच्या धोक्याचा इषारा अगर धमकी ही फार जुनी आहे. एखाद्या ठिकाणी उद्योगधंदे स्थापन करण्यात येतात त्याला काही कारणे असतात. उद्योगधंद्यांना सोयीची जागा लागते; त्याचप्रमाणे काही तांत्रिक व आर्थिक सोईही उपलब्ध असाव्या लागतात. शिवाय कुशल कामगारही असावे लागतात. ज्या कारणांमुळे बंगालमध्ये उद्योगधंद्यांचा विकास झाला तीच कारणे अद्यापही कार्यक्षम आहेत. त्यामुळे तेथील उद्योगधंदे दुसरीकडे जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याहीपुढे जाऊन असे म्हणता येईल की, ह्या उद्योगधंद्यांच्या जाळ्यात भरच पडत जाईल. औद्योगिक विकास व प्रगतीसाठी शांततेच्या वातावरणाची गरज आहे ही गोष्ट खरी आहे. ह्या बाबतीत बंगालचे नाव बदू झालेले आहे हेही खरे. परंतु काम थांबविण्याच्या बाबतीत भाग घेणाऱ्या कामगारांची टक्केवारी बंगालमध्ये महाराष्ट्रापेक्षा कमी आहे. १९६३ मध्ये बंगालमधील टक्केवारी १४·४४ होती, तर महाराष्ट्रातील टक्केवारी ३७·४२ होती.

## शेतीच्या विकासासाठी पश्चिम जर्मनीचे साह्य

आधुनिक पद्धतींचा उपयोग करून शेतीचे उत्पादन वाढविण्याच्या भारताच्या प्रयत्नांस परदेशांकडून साह्य मिळविण्यात येत आहे. भारत आणि पश्चिम जर्मनी ह्यांच्या दरम्यान अशा सहकार्याचा एक करार ११ महिन्यांपूर्वी करण्यात आलेला आहे. दक्षिण भारतामधील निलगिरी जिल्ह्यात शेतीच्या विकासाचा कार्यक्रम पश्चिम जर्मनीच्या मदतीने अमलात आणण्यात यावयाचा आहे. कार्यक्रमामधील पहिली पावले लवकरच टाकण्यात येतील. आधुनिक शेतीच्या पद्धतींचे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक दाखविण्याचा कार्यक्रमाचा हेतू आहे. बटाट्यांची, फळझाडांची आणि भाजीपाल्यांची लागवड शास्त्रशुद्ध रीतीने कशी करावी ह्याबद्दल कार्यक्रमात प्रामुख्याने मार्गदर्शन करण्यात येणार आहे. करारातील अटींप्रमाणे पश्चिम जर्मनी ह्या कार्यक्रमासाठी खते, सुधारलेले बियाणे, कीडनाशक औषधे, शेतीची आधुनिक अवजारे ह्यांचा पुरवठा करणार आहे. ह्यापैकी ९ लाख, ५० हजार रुपयांचे साहित्य लवकरच जर्मनीतून भारताकडे रवाना करण्यात येईल. त्याशिवाय शेतीच्या आधुनिक तंत्राचे सखोल ज्ञान असणारे काही तज्ज्ञही निलगिरी जिल्ह्यातील कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी पाठविण्यात येतील. पश्चिम जर्मनीत भारतीय तंत्रज्ञांना शिक्षण देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. दक्षिण भारतात शेतीच्या विकासासाठी मार्गदर्शन करणारे हे एक मोठे केंद्र होणार आहे. उत्तर भारतातही अशाच प्रकारचे एक केंद्र आहे. शेतीच्या विकासासाठी जमिनीची प्रत व कस ह्यांची परीक्षा करणे आवश्यक असते. हे कार्य करण्यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळेची गरज असल्याने पश्चिम जर्मनी प्रयोगशाळेसाठी लागणारी उपकरणेही पुरविणार आहे.

## जपानमध्ये धूम्रपानाच्या सवयीत वाढ

जपानमध्ये धूम्रपान करणाऱ्यांची संख्या अतिशय वेगाने वाढत चालली आहे. १९६६ च्या आर्थिक वर्षात धूम्रपान करणाऱ्या लोकांनी सुमारे १८,३५० कोटी सिगारेट्स ओढून फस्त केल्या. ह्या सिगारेटसची किंमत १,१२५ कोटी रुपये होती. त्या मागील वर्षापेक्षा सिगारेट्सच्या खपात ५·८ टक्क्यांनी वाढ झाली. सिगारेटचा धूर बाधू नये म्हणून ज्या सिगारेटमध्ये दक्षता घेण्यात आलेली असते त्यांचा खप विशेष आढळून आला. अमेरिकेतील सरकारी डॉक्टरांच्या एका मंडळाने सिगारेट्समुळे फुफ्फुसाचा कॅन्सर होण्याची शक्यता वाढते असा अभिप्राय काही वर्षांपूर्वी व्यक्त केला होता. तेव्हापासून अमेरिकेतील वयस्कर नागरिकांत धूम्रपान करण्याची सवय बरीच मंदावली होती. जपानमध्ये मात्र हा धोक्याचा इशारा मानला जात नाही असे दिसते.

## पश्चिम जर्मनीतील हातावळ स्त्रियांचे गूढ

एखाद्या दुकानात जाऊन बऱ्याच वस्तू पाहण्याचा देखावा करून काहीतरी उचलून नेण्याचा प्रयत्न गिऱ्हाइकाने केल्यास त्या कृत्याला चोरीच म्हणावयास पाहिजे. अशा भुरट्या चोऱ्यांचे प्रकार वृत्तपत्रात कधी कधी वाचावयास मिळतात. पण पश्चिम जर्मनीतील मोठमोठ्या दुकानांतून निराळेच प्रकार घडून येत आहेत. जर्मनीतील कित्येक स्त्रिया दुकानांत जातात. अनेक प्रकारच्या वस्तू विकत घेऊन त्यांची किंमतही चुकती करतात. पण जाता जाता सहज एखादी वस्तू न कळत घेऊन जाण्याचा प्रयत्न करतात. ह्या स्त्रियांपैकी कित्येक स्त्रिया समाजाच्या वरच्या थरांतील असतात. त्यांत मोठमोठ्या कंपन्यांतील अधिकाऱ्यांच्या पत्नी, शिक्षिका, विद्यार्थी, न्यायाधीशांच्या आणि पोलिस अधिकाऱ्यांच्या पत्नी ह्यांचा समावेश आहे. समाजाच्या प्रतिष्ठित वर्गात मोडणाऱ्या ह्या स्त्रियांनी हातावळपणा का दाखवावा ह्याचे कोडे उलगडलेले नाही. न कळत उचलून घेतलेल्या वस्तू त्यांना पाहिजे असतात असेही नाही. कित्येकदा त्यांनाच आपल्या कृतीचे योग्य कारणही देता येत नाही. त्यामुळे अशा घटना अधिकच अनाकलनीय झाल्या आहेत. मोठी दुकाने चालविणाऱ्या मॅनेजर्सना त्यामुळे एक डोकेदुखीच झाली आहे. असे चमत्कारिक वर्तन करणाऱ्या स्त्रियांना जर असे विचारले की तुम्ही अशा का वागलात तर येणारे उत्तर मोठे मजेशीर असते. काही उचल्या स्त्रिया म्हणतात की त्यांना मोह आवरला नाही, तर काही म्हणतात की उचलेगिरीची कृती एकदम घडून गेली, इतकेच. त्याचे कारण सांगता येणार नाही. जर्मनीतील समाजशास्त्रज्ञांना स्त्रियांच्या अशा वागणुकीची कारणमीमांसा देता आलेली नाही. कारण हा सर्व प्रकार अजून तरी नवीनच आहे.

## देशी औषधपद्धतीचा विकास

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात देशी औषधपद्धतीच्या विकासासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ह्या कामासाठी ९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. आयुर्वेद आणि युनानी औषधपद्धतींचा विकास साधण्यासाठी चालू वर्षात १७·५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य खात्याचे उपमंत्री श्री. मूर्ती ह्यांनी नॅशनल मेडिकल असोसिएशनच्या वार्षिक परिषदेत बोलताना वरील माहिती सांगितली; मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या धर्तीवर सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन स्थापन करण्याची जरुरी त्यांनी प्रतिपादन केली. आयुर्वेद आणि होमिऑपाथिक औषधपद्धतीच्या शिक्षणाच्या बाबतीत एकसूत्रता आणण्याचे काम हे कौन्सिल करील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## एंजिनिअर्सच्या बेकारीची वाढती लाट

गेल्या काही वर्षांत तांत्रिक शिक्षणाच्या सोयी वाढल्या असून तरुणांत तांत्रिक शिक्षण घेण्याची ओढही वाढली आहे. स्वतंत्र भारताला उद्योगधंदे व शेती ह्या दोन्ही क्षेत्रांत उत्पादन वाढवावयाचे आहे. त्या दृष्टीने ही घटना स्वागतार्हच आहे. परंतु उत्पादन आणि शिक्षण ह्यांची सांगड अद्याप घातली गेली नसल्याने एंजिनिअर्ससारख्या कुशल तंत्रज्ञांची बेकारी अलीकडे वाढत चालली आहे. त्यामुळे एंजिनिअरिंगचे शिक्षण देणाऱ्या संस्थांत नव्या विद्यार्थ्यांना प्रवेश देताना विचार करणे भाग पडत आहे. ओरिसा सरकारने राज्यातील एंजिनिअरिंगच्या शिक्षणसंस्थांतून जितक्या विद्यार्थ्यांची सोय आहे त्याच्या निम्म्यानेच नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे ठरविले आहे. ओरिसात खाणीचा धंदा प्रमुख धंद्यांत मोडतो. अर्थात खाण एंजिनिअरांना तेथे रोजगाराची अधिक संधी असते. परंतु खाण एंजिनिअर्सची संख्या जरुरीपेक्षा अधिक झाल्याने परिस्थिती बिकट झाली आहे. एंजिनिअरिंगच्या इतर शाखांतही कमी-अधिक प्रमाणात हीच परिस्थिती उद्भवली आहे. सरकारच्या उद्योग-विनिमय संघटनांत मेकॅनिकल एंजिनिअर्सचे अनेक अर्ज पडून आहेत. सुमारे ९ हजार एंजिनिअर्सना नोकऱ्या मिळणे अवघड झालेले आहे. मेकॅनिकल एंजिनिअर्सच्या खालोखाल सिव्हिल एंजिनिअर्स आणि ओव्हरसीअर्स ह्यांच्यांत बेकारी फैलावली आहे. ह्या बेकार तंत्रज्ञांची संख्या ७,९७२ इतकी आहे. इलेक्ट्रिकल एंजिनिअर्सही बेकारीच्या तडाख्यातून सुटलेले नाहीत. बेकार इलेक्ट्रिकल एंजिनिअर्सची संख्या ६,३५४ इतकी आहे.

---


## राजदूतांच्या निवासस्थानासाठी भारी खर्च

स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत सरकारने परदेशांशी अधिक प्रमाणावर संबंध जोडण्यास प्रारंभ केला. अनेक देशांत वकिलाती उघडल्या तर काही देशांत निरनिराळ्या दर्जाचे राजप्रतिनिधी पाठविले. परदेशात पाठविलेल्या प्रतिनिधींच्या निवासस्थानासाठी सरकारने आतापर्यंत ३२ देशांत स्वतःच्या इमारती बांधल्या आहेत. त्यांपैकी काही भव्य आहेत. वास्तविक प्रत्येक ठिकाणी इतक्या भव्य इमारतींची जरूर असतेच असे नाही. फिजी येथील हिंदी कमिशनरच्या निवासस्थानासाठी २·५ लाख रुपये खर्चून मोठी इमारत बांधण्यात आली आहे. फिजी ह्या देशाच्या महत्वाच्या मानाने हा खर्च जास्त आहे अशी टीका करण्यात येत आहे. जपानमध्ये भारताने ३४ लाख रुपये खर्चून ५ इमारती विकत घेतल्या आहेत. अमेरिकेत मात्र २ इमारतीच घेण्यात आल्या आहेत. त्यासाठी १९ लाख रुपये द्यावे लागले. परदेशीय चलनाच्या टंचाईच्या काळात हा खर्च भरमसाट वाटतो.

---

## एअर इंडियाची विमानखरेदी

एअर इंडिया ही भारतीय विमान वाहतूक कंपनी बोईंग-७४७ जम्बो जेट या प्रकारची सर्वांत मोठी चार विमाने खरेदी करणार आहे. या चार विमानांची किंमत ८३·६० कोटी रुपये इतकी आहे. वरील प्रकारचे पहिले विमान अमेरिकेतील एव्हरेट (वॉशिंग्टन स्टेट) या कारखान्यात १९६८ साली तयार होणार आहे. या विमानाचे वजन सहा लक्ष ऐंशी हजार पौंड इतके आहे! त्याची लांबी २३१ फूट ४ इंच, त्याचे पंख १९५ फूट ८ इंच व विमानाची शेपटी ६३ फूट म्हणजे जवळजवळ पांच मजली इमारतीएवढी, अशी जम्बो जेटची प्रचंड मापे आहेत. हे विमान ४५,००० फुटांवरून ताशी ६२५ मैल वेगाने अंतर काढणार आहे. या विमानात चारशे उतारूंची सोय होणार आहे. १९७१ साली दोन व त्यानंतर एक वर्षाने दोन अशी चार विमाने मिळाल्यानंतर एअर इंडियाला दरवर्षी २० ते २३ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.



अल्पबचत योजनेत
पैसे गुंतवा म्हणजे
तुमच्या पैशांची वाढ होईल

तुम्ही १२ वर्षांच्या राष्ट्रीय संरक्षण सर्टिफिकिटात १,००० रु. गुंतविल्यास १२ वर्षांनी १,७५० रु. तुम्हाला मिळतील. या सर्टिफिकिटांवर ६.२५ टक्के दराने करमुक्त व्याज मिळते.

ही सर्टिफिकिटे ५, १०, १००, ५००, १,०००, ५,००० आणि २५,००० रुपये या दर्शनी किंमतीत बचत बँकेचा व्यवहार करणाऱ्या सर्व पोस्ट कचेऱ्यांत उपलब्ध आहेत.

१२ वर्षांची राष्ट्रीय
संरक्षण सर्टिफिकिटे

अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई

## स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशनचे निर्यातीचे क्षेत्र

स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशनचे अध्यक्ष श्री. बी. पी. पटेल ह्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना कार्पोरेशनच्या चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधी माहिती दिली. ते म्हणाले की परदेशांशी होणाऱ्या भारताच्या व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कार्पोरेशनने निर्यात व्यापाराच्या नव्या क्षेत्रात पदार्पण करण्याचे ठरविले आहे. ह्या निर्यात व्यापारात परंपरागत निर्यात वस्तूंपेक्षा निराळ्या वस्तू असतील. चालू आर्थिक वर्षात ४५ कोटी रुपये किंमतीच्या वस्तूंची निर्यात करण्याचे ठरविण्यात आले आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत एकूण २८७ कोटी रुपयांचा माल निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. व्यापारीवर्गाने कार्पोरेशनच्या कार्याबद्दल गैरसमजूत करून घेण्याचे कारण नाही. खाजगी व्यापाऱ्यांना निर्यात व्यापारातून उठविण्याचा कार्पोरेशनचा उद्देश आहे असे समजण्याचे कारण नाही. परदेशी व्यापारात ज्या ठिकाणी पोकळी आहे तेवढी भरून काढण्याचा कार्पोरेशनचा उद्देश आहे. खाजगी क्षेत्रातील निर्यात व्यापाराला संघटनात्मक आणि द्रव्यविषयक साह्य देऊन अधिक समर्थ करण्याचा कार्पोरेशचा उद्देश आहे. परदेशांशी होणाऱ्या व्यापारात खाजगी व्यापाराची जागा घेण्याचा कार्पोरेशनचा उद्देश नाही. त्यांचे कार्य खाजगी परदेशी व्यापाराला पूरक असेच असेल. शिवाय, शक्य त्या व्यवहारात नेहमीच्या व्यापारी पद्धतीनेच कार्य करण्याचे प्रयत्न होत राहतील. ताग, चहा, कॉफी, कापड, ह्या परंपरागत वस्तूंच्या निर्यात व्यापारात भाग घेण्यास कार्पोरेशनला फारसा वावच नाही. १९६६–६७ सालात कॉर्पोरेशनतर्फे होणारी व्यापारी देवाणघेवाण १५२ कोटी रुपयांची होईल असा अंदाज आहे.

## रशियन विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण

चीनच्या सरहद्दीवर असणाऱ्या रशियन प्रदेशांतील विद्यार्थ्यांना अवयावत् लष्करी शिक्षण देण्याची एक योजना आखण्यात आली असून तिच्या अंमलबजावणीलाही प्रारंभ झाला आहे. रशिया व चीन त्यांच्यांतील वैचारिक संघर्ष गेल्या काही वर्षांत पराकोटीला गेला आहे. पण हा संघर्ष केवळ वादंगापुरताच मर्यादित राहिलेला नाही. रशिया व चीन ह्या देशांत ४,१५० मैल लांबीची सरहद्द आहे. ह्या सरहद्दीवर गेल्या काही वर्षांत मधून मधून तंग वातावरण होते आणि उभय देशांच्या सरहद्दसंरक्षकांच्या चकमकीही उडतात. रशियात कम्युनिस्ट क्रांती होण्यापूर्वी झारच्या राजवटीने चीनचा अतिपूर्वेकडील काही मुलूख बळकावलेला आहे असा चीनचा दावा आहे. हा मुलूख सोडविण्याचा चीनचा इरादा आहे. चीनने सरहद्दीतील भागांत १७ लष्करी तुकड्या ठेवल्याच्या वार्ता आहेत.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.

**अधिक धान्योत्पादन! अधिक फायदा!! अधिक बचत!!!**


यांसाठीं

किर्लोस्कर

डिझेल एंजिन्स

यांचीच निवड आवश्यक आहे....

कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत. किर्लोस्कर एंजिनें चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चाच्या मानाने फारच कमी येतो.



**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,**

रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत).

TOM & BAY RO

### कर कापून घेण्याची नवी उत्पन्ने

पगार, रोख्यांवरील व्याज आणि डिव्हिडंड ही देतानाच सध्या त्यावरील प्राप्तीकर कापून घेण्यात येतो. ठेवीवरील व्याज, व्यावसायिक कामानिमित्त मिळणारी फी अथवा इतर मोबदला, ब्रोकरेज, कमिशन, इत्यादी देतानाही त्यावरील प्राप्तीकर कापून घेण्याची तरतूद फिनॅन्स बिलाने केली आहे. कोणत्याही एका वेळी देण्यात येणारे व्याज २०० रु. पेक्षा जास्त होत असेल, तर २२% एवढ्या दराने त्यावरील प्राप्तीकर कापला जाईल. व्यावसायिकांची फी, मोबदला, इत्यादींसही हाच दर लागू होईल. कमिशन, ब्रोकरेज, इत्यादींचो जमा ५०० रु. पेक्षा अधिक असल्यास त्यांतून १५% कर कापला जाईल.

### इंडोनेशियात ख्रिस्ती धर्मप्रसाराला ऊत

सुकार्नोंच्या सर्वाधिकाराच्या काळात ख्रिस्ती मिशनरी दबून होते. गेल्या तीस-चाळीस वर्षांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला नव्हता, तेवढा आता इंडोनेशियात होत आहे. २० महिन्यांपूर्वी कम्युनिस्टविरोधी क्रांती झाली, तेव्हापासून आतापर्यंत तेथील २,५०,००० मुसलमानांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे. बायबलच्या पुस्तकांचा तुटवडा पडू लागला आहे. कम्युनिस्ट पक्ष इंडोनेशियात आता बेकायदा ठरविण्यात आला आहे आणि आपण कम्युनिस्ट नाही हे सिद्ध करण्यासाठीच तेथील लोक ख्रिस्ती बनत आहेत, हे बहुतेक धर्मांतरांचे कारण आहे. अर्थात ख्रिस्ती धर्म पटल्यामुळेच लोक ख्रिस्ती होत आहेत, असे मिशनऱ्यांचे म्हणणे आहे.

### वाढत्या महागाईचे आकड्यांतील प्रतिबिंब

घाऊक मालाच्या किमतींचा निर्देशांक १९५२–५३ मध्ये १०० होता, असे मानले तर तो निर्देशांक कसा वाढत चालला आहे, हे खालील आकड्यांवरून दिसून येईल.

| शेवटचा आठवडा | अन्न पदार्थ | कारखान्यांत तयार होणारे जिन्नस | सर्व प्रकारचा माल |
|---|---|---|---|
| १९५५–५६ | ९४·६ | १०२·९ | ९९·२ |
| १९५६–५७ | १०१·७ | १०५·८ | १०५·१ |
| १९५७–५८ | १०३·४ | १०५·३ | १०६·१ |
| १९५८–५९ | ११२·७ | १०९·५ | ११२·१ |
| १९५९–६० | ११६·५ | ११७·० | ११८·७ |
| १९६०–६१ | ११८·१ | १२८·८ | १२७·५ |
| १९६१–६२ | ११८·४ | १२६·३ | १२२·९ |
| १९६२–६३ | १२३·५ | १२९·५ | १२५·४ |
| १९६३–६४ | १४१·० | १३२·८ | १३८·९ |
| १९६४–६५ | १५३·७ | १४१·२ | १५१·० |
| १९६५–६६ | १७५·३ | १५७·३ | १७४·० |
| १९६६–६७ | २१७·६ | १६७·५ | २०२·७ |

१९६४–६५ ते १९६६–६७ ह्या २४ महिन्यांत इंडेक्स नंबरने मारलेली उडी विशेष चिंतनीय आहे.

### डिव्हिडंडच्या उत्पन्नावर कराची सवलत

कंपन्यांच्या भागांत पैसे गुंतविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, ५०० रुपयांपर्यंतचे डिव्हिडंडचे उत्पन्न करपात्र उत्पन्नाचा आकडा ठरविण्याचे वेळी वजा केले जाईल, अशी तरतूद फिनॅन्स बिलात करण्यात आली आहे.

### बोनस शेअर्समध्ये वाढ

१९६६–६७ मध्ये ६०४ कंपन्यांनी १३४·८७ कोटी रु. किमतीचे बोनस शेअर्स दिले; १९६४–६५ मध्ये ४८ कंपन्यांनी ४·६२ कोटी रु. चे बोनस शेअर्स दिले होते.

### पंतप्रधानांच्या आवारातील गहू

पंतप्रधान श्री. इंदिरा गांधी ह्यांच्या बंगल्याच्या आवारातील गव्हाच्या पिकाचे ८४ किलो गहू त्यांनी दुष्काळग्रस्तांना वाटण्यासाठी पाटण्याला पाठविले आहेत.

### पालम विमानतळाचा नवा चेहरामोहरा

दिल्ली येथील पालम विमानतळाचा चेहरामोहरा पालटण्याची व तो अधिक आकर्षक करण्याची योजना आखण्यात आली असून प्रत्यक्ष कामालाही प्रारंभ झाला आहे. योजनेसाठी ३२ लाख रुपये खर्च येणार आहे. विमानतळावरील इमारतीचा विस्तार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे उतारूंची अधिक सोय करण्यात यावयाची आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळावर ज्या प्रकारच्या अद्ययावत् इमारती बांधण्यात येतात त्यांतील सर्व प्रमुख आकर्षणे ह्या संकल्पित इमारतीत असतील. विमानांतून येणाऱ्या जाणाऱ्या उतारूंसाठी जी प्रशस्त बसण्याची जागा असते ती वातानुकूलित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे तिची लांबी वाढविण्यात येऊन सध्याच्या दुप्पट प्रवासी तेथे बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. पालम विमानतळ हा आंतरराष्ट्रीय विमानमार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा असल्याने त्याची उपयुक्तता अव्वल दर्जाची असणे आवश्यक आहे.

### हिंदी मालाच्या खरेदीत कपात

सीलोन सरकारच्या व्यापार खात्याने हिंदी मालाच्या खरेदीत कपात करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. सीलोन व भारत ह्यांच्यामधील व्यापारात सीलोनच्या बाजूने प्रतिकूल तफावत आहे. त्यावर उपाय म्हणून सीलोन आपला चहा सुडान आणि मध्यपूर्वेतील देशांत विकण्याची कोशीस करीत आहे. भारत सीलोनला आतापर्यंत सुके मासे निर्यात करीत असे. पण आता हे मासे सुडानकडून घेण्याची खटपट करण्यात येत आहे. सुडानमधील मासे अधिक चांगल्या दर्जाचे असतात असें म्हणतात. सुडानने सीलोनकडून १३ लाख रुपयांचा चहा विकत घेण्याची आणि त्याच्याबद्दल ५०० टन कापूस पुरविण्याची तयारी दाखविली आहे.

—महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था—

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

संस्थापक : कै. प्रा. ग. कृ. भोपटकर : स्थापना—१९१८ ; टेलिफोन नं. ५४९६०

नवीन वर्षासाठी मंगळवार दि. २० जून १९६७ पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू झाले.

**महत्वाचे अभ्यासक्रम**

१. गव्हर्नमेंट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स ( जी. सी. डी. )
   मुदत :—१ वर्ष, किमान पात्रता :—एस. एस. सी.
   वेळा :—सकाळ, दुपार किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी.
   खास विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वर्ग वेळ :—सकाळी.
२. प्री–डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा
   किमान पात्रता :—इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस. एस. सी.
   वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी.
३. प्री–डिग्री आर्ट्स एक्स्टर्नल परीक्षा
   किमान पात्रता—इंग्रजी घेऊन एस. एस. सी.
   वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यमः—मराठी व इंग्रजी.

**इतर अभ्यासक्रम**

बी. कॉम. पार्ट वन व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी–मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शार्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स, वगैरे.

प्रसिद्धि पत्रक : ३० पैसे

ए. जी. भोपटकर
एम्. कॉम्., एलएल्. बी.



तुमची जिव्हाळयाची बँक

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

आपल्या ११६ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध.


विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टीसेवा यांच्यासह

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

शं. ल. किर्लोस्कर,
अध्यक्ष.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेकन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार ५ जुलै, १९६७ | अंक १३

—महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था—

## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

संस्थापक : कै. प्रा. ग. कृ. भोपटकर : स्थापना—१९१८ : टेलिफोन नं. ५४९६०

**नवीन वर्षासाठी मंगळवार दि. २० जून १९६७ पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू झाले.**

**महत्त्वाचे अभ्यासक्रम**

१. गव्हर्नमेंट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.)
मुदत :—१ वर्ष, किमान पात्रता :—एस. एस. सी.
वेळा :—सकाळ, दुपार किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी.
खास विद्यार्थिनींसाठीं स्वतंत्र वर्ग वेळ :—सकाळी.

२. प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा
किमान पात्रता :—इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस. एस. सी.
वेळा :—सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम :—मराठी व इंग्रजी.

३. प्री-डिग्री आर्ट्स एक्स्टर्नल परीक्षा
किमान पात्रता—इंग्रजी घेऊन एस. एस. सी.
वेळा :—सकाळीं, दुपारी किंवा रात्री. माध्यमः—मराठी व इंग्रजी.

**इतर अभ्यासक्रम**

बी. कॉम. पार्ट वन व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शार्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स, वगैरे.

**प्रसिद्धिपत्रक : ३० पैसे**

ए. जी. भोपटकर
एम्. कॉम्., एल्एल्. बी.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

**लोकसभेच्या सभासदांचा भत्ता**—लोकसभेचे सभासद लोकसभेचे काहीतरी काम करतील, त्या दिवसाचाच भत्ता त्यांना मिळावा, अशी दुरुस्ती करणारे एक बिल लोकसभेत एका सभासदाने मांडले आहे. सध्याच्या कायद्याप्रमाणे, १४ दिवसांतून एकदा सही केली, तरी सभासदाला त्या सर्व दिवसांचा भत्ता मिळतो.


**ज्यूंच्या स्थलांतराला तात्पुरती बंदी**—पश्चिम आशियात अरब देश व इस्राएल ह्यांच्यांत युद्ध सुरू झाल्यापासून रशियातून इस्राएलमध्ये येणाऱ्या ज्यूंवर बंदी घालण्यात आली आहे. सुमारे ४० रशियन ज्यूंना इस्राएलमध्ये सहकुटुंब जाण्याची परवानगी देण्यात आली होती. पण नंतर ती रद्द करण्यात आली. रशियातून १,५०० ज्यू दरसाल इस्राएलमध्ये येतात. आता त्यांची संख्या रोडावली आहे.

**ऑस्ट्रेलियातील तांदळाची लागवड**—ऑस्ट्रेलियाने भातशेतीला अलीकडे सुरुवात केलेली आहे. तरीसुद्धा जगातील इतर भातशेतीच्या देशांपेक्षा गेल्या ४ वर्षांत आस्ट्रेलियाने दर एकरी अधिक पीक काढण्यात यश मिळविले आहे. ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स ह्या राज्यातच फक्त भाताचे पीक घेतले जाते. काही विशिष्ट प्रकारच्या भाताचे दर एकरी ३ टन उत्पादन होऊ शकते, असे आढळून आले आहे.


**प्रेसिडेंट सुकार्नो दरिद्री झाले**—इंडोनेशिअन प्रजासत्ताकाचे पदच्युत अध्यक्ष सुकार्नो ह्यांना आता दारिद्र्याचा अनुभव घ्यावा लागत आहे. इंडोनेशिअन सरकारने त्यांना रोज अवघा ७ पौंड भत्ता खर्चासाठी मंजूर केला आहे. प्रे. सुकार्नो ह्यांनी आपल्या सद्दीच्या काळात अफाट पैसा खर्च केला. त्यांना चार पत्नी आहेत. त्यांपैकी दोघींचा खर्च चालविण्यासाठी त्यांना आपल्या धनिक मित्रांची मदत घ्यावी लागत आहे. त्यांनी आपला ६६ वा वाढदिवस साजरा केला नाही.

**अणुशक्तीची वीज स्वस्त**—अणुशक्तीच्या साह्याने वीज उत्पन्न करणारी तीन केंद्रे भारतात उभारली जात आहेत. उष्णतेवर व जलप्रवाहावर उत्पन्न करण्यात येत असलेल्या विजेपेक्षा ती थोडी स्वस्त पडणार आहे. मुंबईजवळ तारापूर येथे उभारण्यात येत असलेल्या अणुशक्तीच्या वीजकेंद्रातील विजेसाठी दर किलोवॅटमागे ४·५ पैसे खर्च येईल. टाटा कंपनीच्या ट्रॉंबे येथील उष्णताजन्य विजेचा खर्च दर किलोवॅटला ४·७ पैसे आहे.

**इजिप्तला हे परवडेल काय ?**—इस्राएल बरोबर झालेल्या युद्धात इजिप्तचा लष्करी पराभव झाल्यामुळे प्रे. नासर ह्यांच्यापुढे बिकट प्रसंग ठाकला आहे. सुएझचा कालवा वाहतुकीस बंद करून त्यांना पाश्चात्त्य देशांवर दडपण आणता येईल. पण कालवा बंद केल्यास मोठ्या उत्पन्नाला मुकावे लागेल आणि त्यामुळे इजिप्तची परदेशीय हुंडणावळीची टंचाई अधिकच तीव्र होईल.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर

वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१' ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )


अल्पबचत योजनेत
पैसे गुंतवा म्हणजे
तुमच्या पैशांची वाढ होईल

तुम्ही १२ वर्षांच्या राष्ट्रीय संरक्षण सर्टिफिकिटात १,००० रु. गुंतविल्यास १२ वर्षांनी १,७५० रु. तुम्हाला मिळतील. या सर्टिफिकिटांवर ६.२५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.

ही सर्टिफिकिटे ५, १०, १००, ५००, १,०००, ५,००० आणि, २५,००० रुपये या दर्शनी किंमतीत बचत बँकेचा व्यवहार करणाऱ्या सर्व पोस्ट कचेऱ्यांत उपलब्ध आहेत.

SMALL SAVINGS SAVE THE STATE & YOUR FAMILY

१२ वर्षांची राष्ट्रीय संरक्षण सर्टिफिकिटे

अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई ३२

★ अर्थ ★

बुधवार, ५ जुलै १९६७



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## अन्नधान्याच्या मदतीत कपात अटळ ?

पश्चिम आशियात नुकत्याच झालेल्या अरब-इस्राएल युद्धामुळे सुएझचा कालवा वाहतुकीस बंद झाला आहे. तो पुन्हा केव्हा सुरू करण्यात येईल, हे अद्याप अनिश्चित आहे. भारताला अमेरिका व कॅनडाकडून पुरविण्यात येणारे अन्नधान्य ह्याच मार्गाने येत असते. अर्थात कालवा बंद झाल्यामुळे अन्नधान्याच्या पुरवठ्याला विलंब लागणार आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन मध्यवर्ती सरकारकडून राज्य सरकारांना मदतीदाखल देण्यात येणाऱ्या धान्यात जुलै महिन्यापासून कपात करण्यात येणार आहे. फक्त बंगाल आणि केरळ ह्या राज्यांबाबत अपवाद करण्यात येण्याची शक्यता आहे. अन्नधान्याच्या आयातीची परिस्थिती तात्पुरती तरी बिकट होणार आहे. सुएझचा कालवा बंद झाल्यामुळे अन्नधान्याच्या १२ बोटींना केप ऑफ गुडहोपच्या मार्गाने भारताला येण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ह्या १२ बोटींत २ लाख, ५० हजार टन गहू आणि मका आहे. अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांकडून परस्पर येणाऱ्या धान्यालाही विलंब लागणार आहे. भारताच्या बंदरात दरमहा सुमारे ७ लाख, ५० हजार टन अन्नधान्य उतरविले जाते. आता अर्थातच दरमहा इतकी आवक होणार नाही. कालवा बंद झाल्यामुळे धान्याशिवाय इतर मालाच्या वाहतुकीलाही १० ते १२ दिवस विलंब लागणार आहे. युद्ध सुरू झाले त्या सुमारास भूमध्य समुद्रात काही बोटी होत्या. त्यांनाही आपला मार्ग बदलावा लागला. मध्यवर्ती सरकार राज्य सरकारांना दरमहा ७ लाख, ८० हजार टन धान्य देत असते. शिलकी धान्य असणाऱ्या राज्यांनी मध्यवर्ती साठ्याला मदत केली नाही तर धान्यकपात अटळ दिसते.

---

## अन्नधान्याची जागतिक गंभीर टंचाई

अमेरिकेच्या अध्यक्षांना सल्ला देणाऱ्या एका खास समितीने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, १९८५ च्या सुमारास जगातील अन्नधान्याची टंचाई गंभीर स्वरूप धारण करील. हे टाळावयाचे असेल तर जगातील श्रीमंत देशांनी दूरगामी परिणाम करणारे प्रयत्न व तेही प्रचंड प्रमाणावर करावयास हवेत. श्रीमंत देशांनी गरीब देशांना दरसाल १२०० कोटी डॉलर्सची मदत करावयास पाहिजे आणि त्याचबरोबर लोकसंख्येवर नियंत्रण घालण्याचा कार्यक्रमही जोराने पुढे गेला पाहिजे.

## बँकांची संचालकांना कर्जे

बँकांचे कर्जविषयक धोरण लहान उत्पादकांच्या हितसंबंधाकडे पुरेसे लक्ष देत नाही; कर्जे देताना बँका कर्जदारांच्या जुन्या लौकिकाकडेच जास्त लक्ष देतात; तारणापेक्षा वैयक्तिक चारित्र्य आणि पात्रता ह्यास महत्त्व द्यायला हवे; बँका आणि त्यांच्या संचालकांच्या नियंत्रणाखालील उद्योगधंदे ह्यांच्या घनिष्ट संबंधांमुळे संचालकांच्या हितसंबंधीयांनाच मोठा कर्जपुरवठा होतो, अशी तक्रार करून बँकांवरील नियंत्रणे आणखी आवळण्याची आवश्यकता प्रतिपादन केली जात आहे.

संचालक आणि संचालकांचे हितसंबंध असणाऱ्या फर्म्स व कंपन्या ह्यांना किती कर्ज दिले जाते, हे काही गुपित नाही. ताळेबंदातच बँकांना त्याचा तपशील द्यावा लागतो. पुढील तक्त्यात प्रमुख २१ बँकांचे त्याबाबत आकडे दिलेले आहेत.

स्टेट बँकेने दिलेल्या कर्जापैकी २१% कर्ज त्या बँकेच्या संचालकांना व हितसंबंधी संस्थांना दिलेले आहे. इतर २० बँकांच्या बाबतीत हे प्रमाण सरासरीने १०% पडते. दोन बँकांच्या बाबतीत ते १९% आणि २४% आहे तर एका बँकेचे बाबतीत ते फक्त १% आहे.

बँकांनी दिलेली ही कर्जे म्हणजे वशिलेबाजी होय, असे कोणी म्हटले तर त्या बाबतीत स्टेट बँक सर्वांत मोठी गुन्हेगार आहे. ह्याचा अर्थ, राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकेलाही एवढी मोठी रक्कम अशा रीतीने गुंतविणे सार्वजनिक हिताचे विरुद्ध वाटत नाही. बँकांची ही कर्जे नेहमीच्या सर्व दक्षता घेऊनच दिलेली असतात; त्यांचा तपशील कोणालाही उपलब्ध होऊ शकतो. रिझर्व्ह बँकेच्या तपासनीसांचीही ह्या सर्व कर्जांवर देखरेख असते. बँकेचे संचालक हे स्वतःच्या उद्योगधंद्यात यशस्वी असून अग्रस्थानी असतात. त्यांना कर्जे मिळण्यास कायद्याने बंदी केली, तर ते बँकेचे संचालकत्व पत्करणारच नाहीत आणि त्यांच्या अनुभवाच्या फायद्यास बँका मुकतील. सॉलिसिटर्स, चार्टर्ड अकौंटंटस, अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक, इत्यादींचीच संचालक मंडळे बनविता येतील; पण त्यांचा दृष्टिकोन व्यावहारिक नसण्याचीच फार भीती आहे. संचालकांना आणि त्यांच्या संस्थांना भरपूर तारण घेऊनच कर्जे दिलेली असतात, द्यावी लागतात.

---

**संचालकांना आणि त्यांचे हितसंबंध असणाऱ्या फर्म्स व कंपन्या ह्यांना प्रमुख बँकांनी दिलेली कर्जे**
**( ३१-१२-१९६६ चे आकडे, लक्ष रुपयांत )**

| | (१) एकूण कर्जे | (२) संचालकांना, त्यांच्या फर्म्सना, कंपन्यांना कर्जे | (३) (२) चे (१) शी प्रमाण % |
|---|---|---|---|
| १ स्टेट बँक ऑफ इंडिया ... | ५४०,६८ | १२९,५६ | २४ |
| २ सेंट्रल बँक ... | २५७,१८ | १४,७८ | ६ |
| ३ पंजाब नॅशनल बँक ... | १७८,४० | १४,६८ | ८ |
| ४ बँक ऑफ इंडिया ... | २२२,४७ | २९,२५ | १३ |
| ५ बँक ऑफ बरोडा ... | १५३,७६ | ३६,८३ | २४ |
| ६ युनायटेड कमर्शिअल बँक ... | १०२,७९ | १९,७९ | १९ |
| एकूण... | ९१४,६० | ११५,३३ | १३ |
| ७ अलाहाबाद बँक ... | ६१,५६ | ६,१३ | १० |
| ८ कॅनरा बँक ... | ६६,३९ | २,७६ | ४ |
| ९ देना बँक ... | ५५,८३ | २,४९ | ४ |
| १० इंडियन बँक ... | ४४,३७ | २,५९ | ६ |
| ११ इंडियन ओव्हरसीज बँक ... | ५१,५८ | १,७७ | ३ |
| १२ सिंडिकेट बँक ... | ४७,९१ | ५९ | १ |
| १३ युनियन बँक ऑफ इंडिया ... | ५८,८२ | ५,०४ | ९ |
| १४ युनायटेड बँक ऑफ इंडिया ... | ७९,१८ | ६,५३ | ८ |
| एकूण... | ४६९,६४ | २७,९० | ६ |
| १५ आंध्र बँक ... | २६,३२ | ६४ | २ |
| १६ बँक ऑफ महाराष्ट्र | ३५,२३ | ४,७६ | १४ |
| १७ बँक ऑफ बिहार ... | ६,७३ | २२ | ३ |
| १८ बँक ऑफ राजस्थान ... | ६,३७ | ४ | १० |
| १९ कॅनरा बँकिंग कॉर्पोरेशन ... | १०,२२ | १४ | १ |
| २० हिंदुस्थान कमर्शिअल ... | ६,५७ | १,०४ | ६ |
| २१ साऊथ इंडियन बँक ... | ३,२५ | १६ | ५ |
| एकूण... | ९४,६९ | ७,०० | ७ |
| एकत्रित... | २०,१९,६१ | २७९,७९ | १४ |
| स्टेट बँक वगळून बाकीच्या २० बँका ... | १४,७८,९३ | १५०,२३ | १० |

## आंब्यांच्या आयातीचे उत्पन्न

मुंबई कॉर्पोरेशनला आंब्यांच्या हंगामात जकातीच्या रूपाने दररोज ६ हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. हंगाम कळसाला पोचला की मुंबईला रोज ५० ते ६० हजार आंब्यांच्या करंड्या बाहेरगावांहून येत असतात. त्यात रत्नागिरी, बलसाड व इतर ठिकाणच्या बागायतदारांचा माल असतो. प्रत्येक पेटीमागे कॉर्पोरेशन १५ पैसे जकात घेते. आयात शिगेला पोचली म्हणजे फळे ठेवण्यास जागा अपुरी पडते. आंब्यांच्या पहिल्या पहिल्या पेट्यांना भावही भरपूर मिळतो. पण हंगामाच्या प्रारंभी काही लबाडीचे प्रकारही घडतात. कच्च्या पाडाच्या फळांवर रासायनिक फवारे मारून पिवळ्या व शेंदरी रंगाच्या छटा देण्यात येतात. त्यामुळे जाणकार गिऱ्हाइकांशिवाय इतर गिऱ्हाइके फसण्याचा धोका उत्पन्न होतो.

## नेपाळचा भारताबरोबरचा व्यापार

भारत व नेपाळ ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या आयात-निर्यात व्यापारासाठी आतापर्यंत नेपाळच्या सरकारच्या परवान्याची जरूर लागत नसे. दोन्ही देशांत अनिर्बंधपणे व्यापार चालावा अशी तरतूद व्यापारी करारात होती. परंतु आता नेपाळच्या सरकारने काही प्रमुख मालांची आयात करण्यासाठी परवाने आवश्यक आहे असा नियम केला आहे. तलम सुती कापड, कृत्रिम रेशीम, रेशीम, कृत्रिम धागे, रत्ने, तयार कपडे, बिअर, प्रसाधने, तंबाखू, इत्यादी मालाची नेपाळला निर्यात करण्यासाठी आता परवाने घ्यावे लागतील. परवानापद्धतीमुळे उभयता देशांतील व्यापार मंदावेल अशी भीती व्यापारी वर्तुळात व्यक्त करण्यात येत आहे.

## हिंदी तांदळाचा नेपाळद्वारा चीनमध्ये प्रवेश?

हजारो टन हिंदी आणि ब्रह्मी तांदूळ नेपाळवाटे चीनमध्ये नेला जातो, अशी विश्वसनीय वार्ता आहे. वहातुकीचे काम नेपाळ सरकारच्या ट्रक्स करतात. चीनने बांधलेल्या खाटमांडू कोदारीमार्गे दररोज ५० ते ६० ट्रक्स तांदूळ जातो. सुमारे ३०० मैलांपर्यंत शीख ड्रायव्हर्स ट्रक्स चालवितात आणि पुढे नेपाळी ड्रायव्हर्स त्यांचा ताबा घेतात. कोदारी पुलापलीकडील रस्त्याचा वापर करण्यास हिंदी लोकांना बंदी करण्यात आली, त्याचा उद्देश हा चोरटा व्यापार उघडकीस येऊ नये, हाच असावा.

## मेजवानीवरील निर्बंधांचे पालन

लग्न-मुंजीनिमित्त होणाऱ्या मेजवानींवरील निर्बंध पुणेकरांनी अत्यंत कसोशीने पाळल्याचे सरकारी दप्तर सांगते. गेल्या तीन महिन्यांच्या मोसमात नियमभंगाचेबद्दल फक्त तीनच प्रकरणे तपासासाठी आली.

## डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन

डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनला हप्त्यांचे उत्पन्न १९६५ मध्ये १४५.९६ लक्ष रु. झाले होते; १९६६ मध्ये तें १८१.६६ लक्ष रु. झाले. डिपॉझिट विमा फंड ४६६.६३ लक्ष रुपयांचा ६४८.२९ लक्ष रु. झाला. हबीब बँक लि., मुंबई आणि नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान, लि. कलकत्ता ह्यांचे क्लेम्स अहवालाचे साली द्यावे लागले. कॉर्पोरेशनच्या स्थापनेपासून सप्टेंबर १९६६ अखेर एकूण ५७.३१ लक्ष रुपयांचे क्लेम्स देण्यांत आले किंवा त्यांची तरतूद करण्यात आली.

## मंदी सुरू झाल्याची सरकारची कबुली

"आता मंदीला प्रारंभ झाला आहे, शेतीचे उत्पादन वाढत नाही, राष्ट्रीय उत्पन्नात घट झाली आहे आणि विक्रेत्यांची चलती नष्ट झाली आहे" अशी मध्यवर्ती नियोजन मंत्री श्री. अशोक मेहता ह्यांनी मुंबई येथील एका भाषणांत प्रांजळ कबुली दिली.

## नॉन-क्रेडिट सोसायटयांची आकडेवार माहिती

रिझर्व्ह बँकेने सहकारी चळवळीबाबत १९६४–६५ च्या आकडेवारीचा दुसरा भाग प्रसिद्ध केला असून त्यांत नॉन-क्रेडिट सोसायटयासंबंधी आकडेवार माहिती दिलेली आहे. ह्या सोसायटयांची संख्या १९६३–६४मध्ये १,२३,३४८ होती ती १९६४–६५ मध्ये १,२६,२१९ झाली. हातमाग विणकऱ्यांच्या १३,२२१ आणि इतर औद्योगिक सोसायटया २९,४६५ होत्या. कंझ्यूमर्स सोसायटयांची संख्या १२,५७४ आणि हौसिंग सोसायटयांची संख्या १०,९८७ होती. सर्व प्रकारच्या मिळून सोसायटयांची सभासद संख्या ३० जून १९६४ रोजी १,३७,५६,००० होती ती ३० जून, १९६५ रोजीं १,४७,४८,००० झाली; म्हणजे त्यात ७% वाढ झाली. ह्या प्रकाशनाची किंमत १२ रु. आहे.

## रेल्वेच्या सामग्रीसाठी पश्चिम जर्मनीचे कर्ज

पश्चिम जर्मनी आणि भारत ह्यांच्या दरम्यान कर्जाबद्दल एक करार करण्यात आला आहे. पश्चिम जर्मनीच्या पुनर्घटना व विकास बँकेने कराराप्रमाणे भारताला २.८२ कोटी मार्क कर्ज द्यावयाचे आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारताने रेल्वेच्या सामानाची खरेदी करावयाची आहे. १९६७-६८ साली जर्मनीकडून मिळावयाच्या मदतीचा आकडा अद्याप निश्चित झालेला नाही. डिझेल रेल्वे इंजिनासाठी लागणारी काही विजेची यंत्रसामगी कर्जाचा उपयोग करून आयात करण्यात येणार आहे. त्याशिवाय२,५००अश्वशक्तीची काही डिझेल रेल्वे एंजिनेही भारत खरेदी करणार आहे. भारतमधील रेल्वे मार्गांवर हळूहळू डिझेल रेल्वे एंजिने वापरण्याचा रेल्वे खात्याचा इरादा आहे. त्यास अनुसरूनही आयात करण्यात येत आहे.

## सहकारी औद्योगिक कर्जपुरवठ्याचा प्रश्न : समितीची नेमणूक

सहकारी बँकांच्या द्वारा सहकारी औद्योगिक संस्थांना भांडवलाचा पुरवठा पुरेसा आणि व्यवस्थित व्हावा, ह्या दृष्टीने शिफारसी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनी डेप्युटी गव्हर्नर, श्री. पी. एन्. डमरी ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली आहे. ऑल इंडिया स्टेट को. बँक्स फेडरेशनचे चेअरमन, प्रा. धनंजयराव गाडगीळ हे समितीचे एक सभासद आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे जनरल मॅनेजर श्री. व्ही. एम्. जोगळेकर आणि मद्रास स्टेट को. बँकेचे सेक्रेटरी श्री. डी. वर्धमानन् हे दोघे सेक्रेटरी ह्या नात्याने समितीस साहाय्य करतील.

## बेडूकहत्या थांबवा

राज्यातील बेडकांची संख्या कायम राखण्याच्या दृष्टीने, केरळ विद्यापीठाने सर्व कॉलेजांना १५ ऑगस्ट, १९६७ पर्यंत प्रयोगासाठी त्यांचा उपयोग न करण्याचा आदेश दिला आहे. केरळातील कॉलेजांतून दरसाल प्रयोगासाठी ३,००,००० बेडकांचा फडशा पडतो.

## परदेशांतील ठेवीची मागणी

रीवाच्या विद्यमान अधिपतीच्या आजीने (श्री. कीर्तिकुमारी देवी) रीवाच्या अधिपतीच्या परदेशांतील शिलकांचा हिशेब मागितला आहे. लंडनमधील एका बँकेत त्याचे १ कोटी रुपये आहेत ते वास्तविक आपलेच आहेत, असे श्री. कीर्तिकुमारी देवीचे म्हणणे आहे.

## अधिकाऱ्यांच्या घरांतील फोन कमी करणार

खर्चात काटकसर करण्यासाठी गुजरात सरकारने आपल्या अधिकाऱ्यांच्या घरातील फोन्सची संख्या १ जूनपासून कमी केली आहे.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचे सिलोनमधील विमेदार**—सिलोनमधील आपल्या विमेदारांच्या विम्याची रक्कम भारतीय चलनातच देण्याचे लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने ठरविले आहे, त्याबद्दल त्या विमेदारांनी नापसंती व्यक्त केली आहे. विम्याच्या रकमेच्या दोन तृतीयांशाइतकीच रक्कम त्यांना रुपयाच्या अवमूल्यनामुळे मिळणार आहे. ला. इं. कॉर्पोरेशनचे सिलोनमध्ये ३७५ विमेदार आहेत.

**सालरजंग म्युझियममधील चोरी**—हैद्राबाद येथील सरकारी मालकीच्या सालरजंग म्युझियममधून ४९ तैलचित्रे चोरीला गेली असल्याचे आढळून आले आहे. म्युझियमचा एक नोकर काही दिवसापूर्वी पाकिस्तानला गेला. त्याच्या पाठोपाठ त्याची पत्नीही गेली. त्यांचा चोरीशी संबंध असावा.

**कामगारांनी वाहण्याचे कमाल ओझे**—वयात आलेल्या कामगाराला ५५ किलोपेक्षा जास्त वजन वाहण्यास लावू नये; स्त्री-कामगारांच्या बाबतीत कमाल वजन त्यापेक्षा खूप कमी असावे, अशी शिफारस इंटरनॅशनल लेबर कॉन्फरन्सने जिनीव्हा येथे २६ जून रोजी भरलेल्या बैठकीत केली आहे.

**भारतामधील परदेशी विद्यार्थी**—मार्च, १९६७ अखेर भारतात एकूण ४,६६० परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांपैकी १,०१२ विद्यार्थी मुंबई विद्यापीठाच्या वाट्यास आले होते. मद्रास विद्यापीठात ५२१ परदेशी विद्यार्थी होते. परदेशी विद्यार्थ्यांची संख्या आता आणखी वाढली असेल.

**डिझेल रेल्वे एंजिनांचे उत्पादन**—वाराणसी येथील डिझेल रेल्वे एंजिनाच्या कारखान्यात १९६९ अखेर ४० रेल्वे एंजिने तयार करण्यात येणार आहेत. अरुंद रुळावर चालणाऱ्या गाड्यांसाठी ती वापरण्यात येतील. एंजिनांच्या घडणीचा आराखडा एका अमेरिकन कंपनीच्या साह्याने तयार करण्यात येणार आहे. एंजिनांच्या उत्पादनासाठी कॅनडाने २० लाख डॉलर्सचे कर्ज मंजूर केलेले आहे.

**पाकिस्तानला मदत नाकारली**—पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री मि. पीरजादा शस्त्रास्त्रांची मदत मिळविण्यासाठी रशियाला गेले होते. परंतु रशियाने मदत देण्याचे नाकारले असल्याची बातमी आहे. चीनकडून मिळविलेल्या मिग विमानांसाठी व रणगाड्यांसाठी सुटे भाग तरी पुरविण्याची विनंती पाकिस्तान सरकारने केली होती.

**साखरेची आयात करणार !**—साखरेची निर्यात करू शकणाऱ्या ह्या भारतात आता साखरेची आयात करावी लागणार आहे. झेकोस्लोव्हाकिया रुपयात किंमत पत्करेल म्हणून त्या देशाकडून आयात केली जाण्याचा संभव आहे. एक लक्ष टन साखरेची तूट भरून काढावी लागणार आहे.

सरदारगृह

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**
**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल, ३ तुमचे स्थान कोणते ?

द. सा. द. शे. रुपये
७.६२/—
पर्यंत व्याज आपण मिळवू शकता
ठेवींची मुदत मोठी म्हणजे
व्याज मोठे
एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते
इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी :—सातारा
सत्तावीस शाखा

## अरब-इस्राईल युद्धाचे आर्थिक परिणाम

अरब देश आणि इस्राईल ह्यांच्या दरम्यान गेल्या महिन्याच्या प्रारंभी झालेल्या युद्धामुळे कोणताही प्रश्न राजकीय पातळीवर सुटलेला नाही. इस्राईलने लष्करी विजयाच्या जोरावर आपली प्रादेशिक मजबुती मात्र निदान तात्पुरती साधली आहे. ह्या युद्धात भाग घेणाऱ्या देशांसमोर अनेक बिकट आर्थिक प्रश्न उभे राहिले आहेत. इजिप्त, जॉर्डन, सीरिआ ही अरब राष्ट्रे कमी अधिक प्रमाणात मागासलेली असल्याने त्यांना नव्याने उद्भवणाऱ्या आर्थिक समस्या बऱ्याच जाणवण्यासारख्या आहेत. युद्ध सुरू होण्यापूर्वी ह्या देशांची अर्थव्यवस्था निरोगी होती असे नाही. इजिप्तची अर्थव्यवस्था अनेकदा मंदीच्या तडाख्यात सापडलेली आहे. पण सध्या तिची अवस्था खूपच नाजूक झाली आहे. इजिप्तला १०० कोटी डॉलर्सची दीर्घ मुदतीची कर्जे परत करावयाची आहेत. मुदत भरलेली ही कर्जे परत फेडण्यासाठी इजिप्तला सोने परदेशी पाठवावे लागत आहे. गेल्या वर्षी इजिप्तला ३·५ कोटी डॉलर्सचे सोने परदेशी पाठवावे लागले. त्याशिवाय इजिप्तच्या सरकारच्या मालकीचे १०० उद्योगधंदे पूर्ण बंद पडलेले आहेत अगर अंशतः चालू आहेत. ह्या कारखान्यांना लागणारा काही परदेशी माल परदेशीय चलनाच्या टंचाईमुळे आयात करणे अशक्य झालेले आहे. खुद्द इजिप्तमधील साधनसामग्रीचा उपयोग करून ज्या कापडगिरण्या चालविण्यात येत आहेत, तेवढ्याच नीट चाललेल्या आहेत. ह्या अडचणीत सुएझच्या कालव्यापासून होणाऱ्या उत्पन्नाची घट झाल्याची अडचण नव्यानेच निर्माण झाली आहे. तिचे परिणाम दूरगामी होतील असे दिसते.

इस्राईल देशाची अर्थव्यवस्था युद्ध सुरू झाले तेव्हा नुकतीच मंदीच्या छायेतून डोके वर काढीत होती. देशात किमती एकसारख्या वाढत चाललेल्या होत्या. त्यामुळे निर्यात बाजारपेठांत स्पर्धा करण्याची शक्ती कमी होत चालली होती. त्याचा परिणाम होऊन बेकारी वाढत चाललेली होती. इस्राईल देशाची स्थापना झाल्यापासून तेथे कामाविना माणूस बेकार झाल्याचे दृश्य दिसत नव्हते. सर्वांना रोजगारी मिळत असे. परंतु अलीकडे २६ लाखांच्या ह्या देशांत १५ हजारांवर बेकारांची नोंद करण्यात आली होती. त्याशिवाय अर्धबेकार असणाऱ्यांची संख्या वेगळी आहे. जॉर्डन हा देश तुटपुंजी आर्थिक साधनसामग्री असलेला आहे. त्याची आर्थिक कुवतच बेताची आहे. अलीकडे हौशी प्रवाशांच्या धंद्याचा विकास करून जॉर्डन प्रगती साधू लागला होता. युद्धाच्या ज्वाला भडकल्याबरोबर हा धंदा डबघाईला येऊन बंद पडण्याच्या मार्गाला लागला आहे. जॉर्डनच्या ताब्यात असलेला जेरूसलेम शहराचा काही भाग तरी इस्राईलने परत केला नाही तर हौशी प्रवाशांचा धंदा पूर्णपणे बसेल. सीरियाच्या सरकारने १९६५ मध्ये उद्योगधंद्यांचे मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीयीकरण केले आहे. त्यामुळे आणि गेल्या वर्षीच्या अनावृष्टीच्या तडाख्यामुळे सीरिआ बिकट अवस्थेत सापडला आहे. सीरिआ हा देश सामान्यतः धान्याची निर्यात करणारा आहे. परंतु आता तेथे अन्नधान्याची टंचाई जाणवू लागली आहे. लोकांच्या किमान गरजा भागविण्यासाठी धान्याची आयात करावी लागत आहे. धान्याच्या एकूण आयातीपैकी मोठा भार अमेरिकेला उचलावा लागत आहे. मागासलेल्या देशांना युद्ध कसे व किती महागात पडते ह्याचे हे चित्र उद्बोधकच म्हणावे लागेल.

---

### साबणाच्या कारखान्याचा विस्तार

म्हैसूरच्या सरकारने बंगलोर येथील साबणाच्या कारखान्याचा विस्तार करून तो अधिक आधुनिक पद्धतीचा करण्याची योजना तयार केली आहे. विस्ताराचा कार्यक्रम पुरा झाल्यावर कारखान्यात दरसाल होणाऱ्या उलाढालीची किंमत ४ कोटी रुपयांपर्यंत वाढेल. सध्या कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १,५०० टनांची आहे. विस्ताराची योजना पुरी झाल्यावर वार्षिक ६,००० टन साबणाचे उत्पादन करणे शक्य होईल. ह्या कारखान्यात धुण्यासाठी लागणारी रासायनिक द्रव्येही तयार करण्यात येतील. कारखान्यात बसविण्यात येणारी नवी यंत्रसामग्री इटालीकडून आयात करण्यात आली आहे. सुवासिक साबण तयार करणारी ही सर्वात आधुनिक यंत्रसामग्री आहे. कारखान्याच्या साबणाची निर्यात वाढत चाललेली आहे. अमेरिका, कॅनडा, पश्चिम आशिया, मलेशिआ, इत्यादी देशांना साबणाची निर्यात करण्यात येते.

---

### १० वर्षांत भरपूर खनिज तेल

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या विकास कार्यक्रमात सहकार्य करण्यासाठी रशियाचा तेलधंद्यातील एक तज्ज्ञ भारतात आला आहे. खनिज तेल आणि नैसर्गिक वायू शोधून काढण्यासाठी भारत सरकारने मोठा कार्यक्रम आखला आहे. रशियन तज्ज्ञाच्या मताने भारतात अनेक ठिकाणी खनिज तेल व वायू सापडण्याचा चांगला संभव आहे. तेलाच्या पुरवठ्याबाबत भारत आज स्वयंपूर्ण नाही. परंतु येत्या १० वर्षांच्या अवधीत देशाची तेलाची सर्व गरज भागविण्याइतके उत्पादन भारतात होऊ शकेल असा अंदाज रशियन तज्ज्ञाने केला आहे. डेहराडून येथे भारत सरकारची खनिज तेल संशोधनसंस्था आहे. ह्या संस्थेत हा रशियन तज्ज्ञ काम करीत आहे. प. बंगालमध्ये तेलाच्या विहिरी खोदण्यात आल्या तर त्या बऱ्याच प्रमाणात यशस्वी होतील असा त्याचा होरा आहे. तेथील भूस्तराची पाहणी तेलाच्या दृष्टीने बरीच उत्तेजक ठरली आहे.

---

**मनिऑर्डरीची कमाल मर्यादा**— सध्या ६०० रुपयांपेक्षा जास्त रकमेची मनिऑर्डर करता येत नाही. ही मर्यादा वाढवून आता १,००० रु. करण्यात आली आहे.

## अधिक साखरकारखान्यांची मागणी

महाराष्ट्र सरकारचे सहकार मंत्री श्री. विनायकराव पाटील ह्यांनी महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या साखरेच्या अधिक कारखान्यांसाठी परवाने देण्यात यावे अशी सूचना मध्यवर्ती सरकारला केली आहे. ह्याविषयी बोलताना ते म्हणाले की महाराष्ट्रातील साखरकारखाने फार अडचणीच्या परिस्थितीत सापडले आहेत. उसाला देण्यात येणारी किंमत कमी असल्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवली आहे. राज्यातील सहकारी साखरकारखान्यांनी आपली कामगिरी चांगली पार पाडलेली आहे. भारतामधील इतर भागांतील साखरकारखान्यांशी तुलना करता महाराष्ट्रातील कारखान्यांचा साखरेचा उतारा अधिक चांगला आहे. तरीसुद्धा राज्यातील साखरेच्या किमती वाजवी ठरविण्यात आलेल्या नाहीत. त्यात वाढ होणे आवश्यक आहे.

---

## भारतामधील परदेशीयांत चिनी दुसऱ्या क्रमांकाचे

हिंदच्या कायद्याप्रमाणे परदेशीय नागरिकांची नोंद करण्यात येते. १९६६ च्या नोव्हेंबरमध्ये करण्यात आलेल्या नोंदीप्रमाणे चिनी नागरिकांची भारतामधील संख्या दुसऱ्या क्रमांकाची आहे. एकूण परदेशी नागरिकांची संख्या ६४ हजार, ८३७ आहे. त्यापैकी ७,९६५ नागरिक चिनी आहेत. तिबेटी नागरिकांची संख्या मात्र त्यांच्याहीपेक्षा जास्त म्हणजे २२ हजार आहे. इतर काही देशांच्या नागरिकांची संख्या अशी आहे. इराणी ४,३०७; अमेरिकन ३,९०८; रशियन २,८७०; अफगाण २,२५६; जर्मन १,९३६; ब्रह्मदेशीय १,९११; फ्रेंच १,२५५; ग्रीक ९८३; थाय ९७८; जपानी ७६६; आणि इटालियन ६३७. तात्पुरत्या निवासाचे परवाने असणारे परदेशीय नागरिक ह्यात नाहीत.

---

## शेतीच्या तज्ज्ञांना अमेरिकेत शिक्षण

आंतरराष्ट्रीय विकास मंडळाने पुरस्कृत केलेल्या एका कार्यक्रमाप्रमाणे गेल्या १० वर्षांत भारतामधील १,२०० शेतकी तज्ज्ञांना अमेरिकेत शिक्षण देण्यात आले आहे. त्यांपैकी ७०० तज्ज्ञांचे शिक्षण अमेरिकेच्या शेतकी खात्याने चालविलेल्या प्राथमिक केंद्रातून आणि ग्रामीण विद्यापीठातून पुरे करण्यात आले. बाकीच्या ५०० जणांचे शिक्षण इतर विद्यापीठांतून पूर्ण झाले. ह्या विद्यापीठांनी हिंदी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी त्यांना मुद्दाम पाचारण केले होते. शिक्षणासाठी गेलेल्या ह्या विद्यार्थ्यांनी अमेरिकेतील ग्रामीण समाजाचेही निरीक्षण केले. शेतीच्या विकासाला चालना देण्यासारख्या नवीन कल्पना त्यांना तेथे आढळून आल्या. बहुतेक विद्यार्थी अमेरिकन शेतकरी कुटुंबात राहात होते. त्यामुळे ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्नांची त्यांना जवळून माहिती मिळविता आली.

---

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'
किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.



# वैवाहिक हक्कांची व्याप्ती

" पतीपासून, त्याच्या इच्छेविरुद्ध, अलग राहण्यास नोकरी हे यथोचित कारण नाही; मिळवत्या पत्नीने नोकरी सोडूनही राहावयास आलेच पाहिजे; असा पतीचा हक्कच आहे—मग तो बेकार का असेना. " मध्यप्रदेश हायकोर्टाचा निवडा.


सन १९५९ मध्ये गयाप्रसादचे भगवतीशी लग्न झाले. गयाप्रसाद हा भानखेडी गावचा रहिवाशी आहे. भगवती पंचमढी येथे आपले आईवडिलांकडे राहावयास गेली. बरेच दिवस पर्यंत भगवती परत आली नाही. घरी येण्यास भगवतीने नकार दिला. त्यामुळे ता. १०-७-१९६२ ला वैवाहिक हक्कांच्या पूर्ततेबाबतचा अर्ज गयाप्रसादने भगवतीविरुद्ध पेश केला. त्या अर्जात गयाप्रसादचे म्हणणे आहे की, " कोणत्याही यथोचित निमित्त्याशिवाय भगवती ही गयाप्रसादापासून अलग राहात आहे. त्यामुळे वैवाहिक हक्कांच्या पूर्ततेत भगवती विनाकारण अडथळे निर्माण करीत आहे. गयाप्रसादला घटस्फोट घ्यावयाचा नाही. उलट भगवतीला गयाप्रसाद घरी नेण्यास तयार आहे. सबब वैवाहिक हक्कांचे पूर्ततेकरिता भगवतीविरुद्ध गयाप्रसादला डिक्री मिळावा."

गयाप्रसादच्या सदरहू अर्जाच्या प्रत्युत्तरात भगवतीने प्रतिपादन केले की, " गयाप्रसादचे मालकीची कोणतीही स्थावर इस्टेट नाही. गयाप्रसादला उपजीविकेसाठी पुरेसे उत्पन्न नाही. अर्थात गयाप्रसादची सांपत्तिक स्थिती वाईट आहे. त्यामुळे १९५९-६० मध्ये गयाप्रसादचे संमतीने भगवतीने ग्रामसेविकेच्या नोकरीकरिता अर्ज केला. एप्रिल १९६१ मध्ये भगवतीची ग्रामसेविका म्हणून नेमणूक झाली. नोकरी मिळाल्यानंतर भगवतीने गयाप्रसादला आपलेजवळ राहावयास बोलाविले. ज्या ज्या गावी भगवती नोकरी करीत राहील त्या त्या गावी भगवतीजवळ राहण्यास गयाप्रसादने विनाकारण नकार दिला. भगवतीला नोकरी सोडण्यास गयाप्रसाद जर जबरदस्ती करणार नसेल तर गयाप्रसादला वैवाहिक हक्कांची पूर्तता करू देण्यास भगवती तयार आहे."

अव्वल कोर्टाने गयाप्रसादचा अर्ज नामंजूर केला. अव्वल कोर्टाच्या ह्या निकालाविरुद्ध गयाप्रसादने सदरहू अपील हायकोर्टात पेश केले.

सदरहू अपीलमध्ये गयाप्रसादचे वकिलाने युक्तिवाद केला की, पतीच्या इच्छेविरुद्ध पतीचे राहते गाव सोडून इतर गावी पत्नीने नोकरी करणे व पत्नी ज्या ज्या गावी नोकरीनिमित्त राहील त्या त्या गावी पत्नीच्या इच्छेनुसार पतीला पत्नीजवळ राहावयास पत्नीने सांगणे, हे पत्नीने स्वीकारलेले धोरण किंवा पत्नीची अशा प्रकारची मागणी हिंदू समाजातील वैवाहिक जीवनाच्या दृष्टीने सर्वथैव गैरवाजवी आहे. सबब वैवाहिक हक्कांच्या पूर्ततेसाठी भगवतीने नोकरी सोडून गयाप्रसादचे म्हणण्याप्रमाणे गयाप्रसादचे राहते घरीच राहावयास जाणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत गयाप्रसादला वैवाहिक हक्कांच्या पूर्ततेसाठी भगवतीविरुद्ध डिक्री द्यावयास पाहिजे असे गयाप्रसादचे वकिलाचे म्हणणे आहे.

हायकोर्टाने ठरविले की, "प्राप्त परिस्थितीत वैवाहिक हक्कांच्या पूर्ततेकरिता गयाप्रसादला भगवतीविरुद्ध डिक्री देणे आवश्यक आहे. गयाप्रसादपासून अलग राहण्याकरिता भगवतीने सांगितलेले 'नोकरीचे निमित्त' हे हिंदू कायद्याच्या कलम ९ मध्ये संबोधिलेले 'यथोचित निमित्त' नव्हे. कारण हिंदुसमाजातील सर्वसाधारण प्रचलित विचारान्वये प्रत्येक हिंदू पत्नीने वैवाहिक जीवनातील आपल्या सर्व जबाबदाऱ्या पतीच्याच घरी राहून पार पाडावयाच्या असतात. वैवाहिक हक्कांच्या पूर्ततेबाबत पतीला असलेल्या हक्कांना बाध निर्माण होण्याचे दृष्टीने पत्नीला वागता येत नाही. पत्नीची तशी वागणूक गैरवाजवी ठरते. पतीच्या संमतीने किंवा दोघांच्याही सामुदायिक इच्छेने व संमतीने पतीचे राहते गाव सोडून पत्नीला नोकरीनिमित्ताने इतर गावी राहता येत असले तरी नोकरी निमित्ताने पत्नी ज्या ज्या गावी राहील त्या त्या गावी पतीने पत्नीजवळ येऊन राहावे व पतीने पत्नीजवळ येऊन राहण्यास पत्नीला हरकत राहणार नाही असाही पत्नीने स्वतःच घेतलेला एकपक्षीय निर्णय पत्नीला आपले पतीवर लादता येणार नाही. भगवतीच्या सदरहू वागणुकीमुळे भगवतीने स्वतः गयाप्रसादच्या वैवाहिक जीवनाचा संपरित्याग करून एक वैवाहिक अपराध केलेला आहे. म्हणजेच भगवतीने गयाप्रसादला वैवाहिक जीवनातून विनाकारण सोडून दिले आहे. गयाप्रसादला वैवाहिक जीवनातून भगवतीने विनाकारण वंछित केले किंवा टाकून दिले असेच आपणांस म्हणावे लागेल. तत्संबंधी भगवतीने केलेल्या विनंतीस गयाप्रसादने नकार देण्यात काहीच वावगे केलेले नाही. उलट गयाप्रसादचा नकार योग्यच आहे असे आपणांस म्हणावे लागेल. कारण भगवतीचे एकपक्षीय इच्छेनुसार भगवती नोकरी करीत असलेल्या गावी गयाप्रसादने राहावयास जाणे हे गयाप्रसादचे कर्तव्य नाही. सबब गयाप्रसादला वैवाहिक हक्काच्या पूर्ततेची डिक्री आम्ही देत आहोत."



पुण्यांत याल तेंव्हां—
उद्यान निवास
या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्येंच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७७६१ (माहिती मागवा) उद्यान प्रासाद स्काउट ग्राउंड समोर, पुणे २



नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

# ठाकरसी फॅब्रिक्स्


फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड ·SANFORIZED·

THACKERSEY FABRICS

**ठाकरसी ग्रूप**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.



TM-56 MR


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICINCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १९ जुलै, १९६७ | अंक १४

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०१

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**हिंदी लोक परत येणार**—एडन ह्या ब्रिटिश वसाहतीमधील अस्थिर राजकीय परिस्थितीला कंटाळून १ हजार हिंदी नागरिक भारताला परत येत आहेत. एडनमध्ये सुमारे ४ हजार हिंदी लोक व्यापारधंद्याच्या निमित्ताने गेलेले आहेत. ब्रिटिश लष्कराने हिंदी लोकांना बोटीपर्यंत सुखरूप पोचविण्याची कामगिरी केली. हिंदी लोक आपल्या मालमत्तेची विक्री करू लागले आहेत.

**खाजगी परदेशी भांडवलाची गुंतवणूक**—१९६६-६७ सालात खाजगी मालकीच्या ३८·७ कोटी रुपये भांडवलाची गुंतवणूक भारतात करण्यात आली. सर्वांत अधिक म्हणजे १६ कोटी रुपयांची गुंतवणूक अमेरिकेने केली. अमेरिकेच्या खालोखाल ब्रिटनकडून ४·८ कोटी रुपयांचे खाजगी भांडवल गुंतविण्यात आले.

**जागतिक शांतता आणि मैत्रीसाठी उत्सव**—मेक्सिको येथे पुढील वर्षी ऑलिंपिक सामने भरविले जाणार आहेत, त्यांना जोडून जागतिक शांतता आणि मैत्री ह्यांच्या सिद्धीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आखण्यात येणार आहेत. त्यासाठी सल्लागार नियुक्त करण्यात आले आहेत, त्यांत श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय ह्यांचा समावेश आहे.


**पश्चिम आशिया धोरणामुळे नुकसान**—अरब-इस्राएल संघर्षातील भारताचे धोरण नापसंत पडून कित्येक उतारूंनी एअर इंडियाने प्रवास करण्याची आपली तिकिटे रद्द करण्याचा सपाटा चालविला आहे; ते दुसऱ्या देशांच्या विमानांतून जाऊ लागले आहेत. एअर इंडियाच्या उतारूंपैकी ७९% उतारू परदेशी असतात.

**आन युवर टेलिफोन योजना**—ही योजना १९५० साली सुरू झाली, तेव्हापासून आतापर्यंत ह्या योजनेखाली १,००,००० टेलिफोन बसविण्यात आले आहेत. भारतातील टेलिफोन्सची एकूण संख्या ९ लक्ष, २० हजार एवढी आहे. म्हणजे, प्रत्येक नववा टेलिफोन वरील योजनेखालचा आहे.


**हेरगिरीसाठी स्थानबद्धांत हिंदू-शीख**—हेरगिरीसाठी भारत संरक्षण कायद्याखाली स्थानबद्ध केलेल्या काश्मीरमधील १२५ लोकांत पाकिस्तान्यांच्याप्रमाणे हिंदू आणि शीख लोकहि आहेत, असे सी. आय. डी. चे डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल श्री. सुरेंद्रनाथ ह्यांनी प्रकट केले.

**चीनचा अमेरिकेशी व्यापार**—व्हीएटनाम युद्धासाठी चीन अमेरिकेला पोलाद पुरवीत आहे, असा 'दि न्यू टाइम्स' ह्या रशियन मासिकाने आरोप केला आहे. चीन भांडवलदारीच्या देशांशी व्यापार करतो, त्याचप्रमाणे ऱ्होडेशिया, द. आफ्रिका ह्यासारख्या वर्णद्वेषी देशांशी व्यापार करतो, असे त्या मासिकाने म्हटले आहे. ह्या देशांशी चीनचा व्यापार दसपट वाढला आहे.

**सेनाव्याप्त प्रदेशासाठी नवे चलन**—इस्राएलने व्यापलेल्या अरब प्रदेशासाठी त्या देशाने नव्या चलनी नोटा छापण्याचे ठरविले आहे.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपलड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
( विश्रामबाग - सांगली महाराष्ट्र )

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES -
Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
MADHAVNAGAR (S.R.) INDIA

पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास

या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्येच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७७९१
(माहिती मागवा) उद्यान प्रासाद
स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

# ★ अर्थ ★

बुधवार, १९ जुलै १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उद्योगधंद्यावर मंदीची अवकळा पसरत आहे

गेल्या काही महिन्यांत भारतामधील उद्योगधंद्यावर मंदीची अवकळा पसरत चालली आहे. सरकारी मालकीच्या औद्योगिक संघटनाही त्यातून सुटलेल्या नाहीत. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून भारत सरकारच्या उद्योगखात्याने त्याच्या अखत्यारीत असणाऱ्या कारखान्यांना आपल्या उत्पादनात विविधता आणण्याची सूचना केली आहे. कारण, आतापर्यंत ह्या कारखान्यात तयार होणाऱ्या मालाला बाजारात असणारी मागणी कमी होत चालली आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागात अग्रगण्य असलेल्या हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या कारखान्याने एका जर्मन कंपनीच्या साह्याने छापखान्याची यंत्रे तयार करण्याचा विचार चालविला आहे. दुर्गापूर पोलाद कारखान्यातील एका विभागात कोळसा खणण्याची यंत्रसामग्री तयार करण्यात येते. परंतु खुद्द कोळशाचीच मागणी घटल्यामुळे अशा यंत्रसामग्रीची मागणीही उतरत चालली आहे. तेव्हा आता ह्या विभागात बंदरांना लागणारी यांत्रिक सामग्री तयार करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. मंदीचा अधिक जबर फटका रेल्वेसाठी लागणाऱ्या बांधकाम साहित्याच्या निर्मितीला बसला आहे. रेल्वेला लागणाऱ्या मालवाहू डब्यांच्या उत्पादनात कपात करण्यात आली आहे. कारण, मालवाहतूकच बेताबाताने होत आहे. परिणामी पश्चिम बंगालमधील बरेच एंजिनिअरिंगचे कारखाने पूर्णतः अगर अंशतः बंद पडले आहेत किंवा पडत आहेत. ह्या परिस्थितीवर सरकारजवळ तयार उतारा नाही. अर्थव्यवस्थेच्या नाडीचे ठोके अधिक जलद पडू लागले आणि पाऊसपाणी समाधानकारक होऊन धान्याचे व शेतीचे उत्पादन वाढले तरच ह्या परिस्थितीतून बाहेर पडता येईल.

---

## साखरेच्या धंद्यावर ओढवलेले संकट

हिंदमधील साखरेच्या धंद्यावर आणीबाणीचा प्रसंग ओढवल्याचे सांगण्यात येत आहे. साखरेच्या उत्पादनात घट होत गेली तर काही वर्षांतच भारताला साखरेची आयात करावी लागण्याचा संभवही दिसत आहे. उत्तर प्रदेशातील ७२ साखर कारखाने अपुऱ्या उसपुरवठ्यामुळे नेहमीपेक्षा लवकर बंद करावे लागले. त्यामुळे सुमारे ६० हजार साखर कामगारांना रोजगाराला मुकावे लागले. ही परिस्थिती चमत्कारिक वाटण्यासारखी आहे. कारण, उत्तर प्रदेश आणि बिहार ह्या राज्यांत साखरेचे कारखाने प्रथम स्थापन करण्यात आलेले आहेत ही दोन राज्ये साखरेच्या उत्पादनाची आद्य केंद्रे आहेत. अलीकडे इतर राज्यांतूनही साखरेचे बरेच कारखाने निघाले असले तरी अजूनही साखरकारखान्यांच्या एकूण संख्येपैकी दोनतृतीयांश कारखाने ह्याच दोन राज्यांतून आहेत. भारतात उसाच्या लागवडीखाली जितकी जमीन आहे त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक जमीन एकट्या उत्तर प्रदेशातली असे. उत्तर प्रदेशामधील शेतीच्या उत्पादनात दोन वर्षांपूर्वीपर्यंत उसाच्या उत्पादनाला मानाचे स्थान होते. कारण, उसापासून होणारा नफा भरपूर असे. परंतु गेल्या दोन वर्षांत ह्या चित्रात बदल घडून येत होता. शेतकऱ्यांना असे आढळून आले की उसाची लागवड करण्यापेक्षा संकरित मका आणि संकरित गव्हाची लागवड केली तर त्यात अधिक पैसा मिळतो. ह्या पिकामुळे शेतकऱ्यांना तिप्पट ते चौपट अधिक उत्पन्न होते. परिणामी उसाखालील लागवडीचे क्षेत्र कमी झालेले आहे. उसाच्या पुरवठ्याची टंचाई भरून काढण्यासाठी उत्तर प्रदेश शेतकी विद्यापीठाने बीट कंदाच्या लागवडीचा विकास करण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

---

## चित्रपट व्यवसायावरील असह्य बोजा

"करमणुकीवरील करात ५ ते १०% वाढ करण्याची महाराष्ट्र राज्याची योजना चित्रपट व्यवसायावर फार मोठा आघात करणारी आहे. प्रेक्षकांनी दिलेल्या पैशांपैकी ५५ ते ६५% रकम करांच्या द्वारा राज्य सरकार घेते. चित्रपटनिर्मात्याला प्रत्येक हिंदी चित्रपटासाठी मध्यवर्ती सरकारला सुमारे २.१० लक्ष रुपये द्यावे लागतात. राज्य सरकारला ८५ हजार रुपये सेल्स टॅक्सच्या स्वरूपात द्यावे लागतात. जाहिरातीवरील कराच्या रूपाने म्युनिसिपालिटचा ३० ते ४० हजार रुपये घेतात. चित्रपट अयशस्वी झाला, तरी त्याला ह्या खर्चात सूट मिळत नाही; ह्या करामुळे खर्च फक्त वाढतो. उत्पादक बुडाला, तरी सरकारची प्राप्ती थांबत नाही. फक्त चित्रपट धंद्याचेच हे वैशिष्ट्य आहे. कित्येक देशांत करमणूक कर नाहीच; ज्या देशात तो आहे, तेथे त्याचा दरही माफक आहे आणि कराचे उत्पन्न चित्रपट व्यवसायाच्या अभिवृद्धीसाठी खर्च केले जाते"——व्ही. शांताराम, फिल्म प्रोड्यूसर्स गिल्ड ऑफ इंडियाचे अध्यक्ष.

## प्रथिनयुक्त अन्न पुरविणारे सोयाबीन

भारताच्या कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च आणि अमेरिकेच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ ह्या संघटनांतर्फे म्हैसूर येथे एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादात प्रथिनयुक्त अन्नपदार्थ पुरवू शकणाऱ्या सोयाबीन ह्या धान्यासंबंधी विचारविनिमय करण्यात आला. परिसंवादात भाग घेण्यासाठी १५० प्रतिनिधी आले होते. त्यांपैकी ७० परदेशांतून आले होते. अमेरिकेतून २० प्रतिनिधी आले होते. डॉ. के. स्मिथ ह्या अमेरिकन शास्त्रज्ञाने सोयाबीनसंबंधी एक निबंध परिसंवादात सादर केला. अविकसित देशांतील लोकांचा आहार कनिष्ठ प्रतीचा असतो. त्यांच्या आहारात सत्त्वयुक्त प्रथिनांचे प्रमाण फार कमी असते. ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. अपुरा आणि तोही निकस आहार ही अविकसित देशांपुढील एक मोठी समस्या आहे. डॉ. स्मिथ ह्यांच्या मताने आहारातील ही उणीव भरून काढण्याचे कार्य सोयाबीन धान्य करू शकेल. जगातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्यामुळे सोयाबीनपासून निरनिराळ्या प्रकारचे सकस अन्नपदार्थ तयार करण्यासाठी संशोधनाला जोराची चालना मिळालेली आहे, आणि ह्या संशोधनातून चांगली फलप्राप्तीही होण्याची शक्यता आहे. वास्तविक सोयाबीन हे धान्य आहारात मोठ्या प्रमाणावर वापरता येण्यासारखे आहे. परंतु सोयाबीनच्या एकूण उत्पादनापैकी २५ टक्के उत्पादनच अन्नपदार्थ बनविण्यासाठी वापरले जाते. त्यामुळे जगातील कितीतरी गरीबगुरीब सकस अन्नाला मुकत आहेत. सोयाबीनप्रमाणेच इतर प्रथिनयुक्त अन्नपदार्थ निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अमेरिकन अन्नशास्त्रज्ञांनी माशापासून प्रथिनयुक्त अन्नपदार्थ बनविण्याची प्रक्रिया शोधून काढली आहे. समतोल आहारासाठी प्रथिनयुक्त पदार्थांची फार गरज असते.

## सुएझचा कालवा बंद ठेवल्याने इजिप्तचेच अधिक नुकसान

गेल्या महिन्याच्या प्रारंभी अरब देश आणि इस्राएल ह्यांच्यात झालेल्या युद्धामुळे सुएझच्या कालव्यातून होणारी बोटींची आंतरराष्ट्रीय वाहतूक बंद पडली आहे. इस्राएलने आपले सैन्य अरबांच्या प्रदेशातून माघारी घेतल्याखेरीज कालवा चालू करण्यात येणार नाही असे इजिप्त सांगत आहे. उलटपक्षी इस्राएल शांततेची हमी मिळाल्याशिवाय सैन्य माघारी घेण्यास तयार नाही. ह्या बिनतोड पेचप्रसंगामुळे कालवा दीर्घकाल बंद राहण्याची शक्यता दिसत आहे. कालव्याच्या दोन्ही तोंडांशी १० बोटींचा अडथळा असून १६ बोटी कालव्याच्या अंतर्भागात रखडत पडलेल्या आहेत. कालवा चालू करण्याचे ठरविल्यास इजिप्तला तो दहा पंधरा दिवसांत मोकळा करता येण्यासारखा आहे. अमेरिका आणि ब्रिटन ह्यांनी इस्राएलला अरबविरोधी लढ्यास मदत केली अशी इजिप्तची तक्रार आहे. कालव्यातून होणाऱ्या वाहतुकीत ७५ टक्के वाहतूक तेलाची असते. हे सर्व तेल पश्चिम युरोपातील देशांना पाठविण्यात येत असते. कालवा बंद झाल्यामुळे तेलाची वाहतूक थांबली आहे. पण त्याचा परिणाम पश्चिम युरोपातील देशांवर एकदम व मोठ्या प्रमाणावर होणार नाही. १९५६ मध्ये झालेल्या अरब–इस्राएल युद्धापासून पश्चिम युरोपातील देशांनी तेलसाठे भरपूर करून ठेवले आहेत. सध्या त्यांना लागणाऱ्या तेलापैकी अर्धेच तेल पश्चिम आशिआतून येत असते. त्यामुळे कालवाबंदीचा परिणाम इजिप्तलाच अधिक भोगावा लागेल. इजिप्तच्या खालोखाल भारत, पाकिस्तान, सीलोन आणि आफ्रिकेतील देश ह्यांच्या आयातीवर विपरित परिणाम होईल. ह्या देशांची अन्नाची आयात कालव्याच्या मार्गाने होत असते, आणि त्यांचा चहा, ताग व इतर कच्चा मालही ह्याच मार्गाने निर्यात होत असतो.

## लंडन बँकेतील यांत्रिक कॅशिअर

२७ जून रोजी लंडनमधील एका बँकेच्या बाहेर 'रोबो कॅशिअरचे काम सुरू झाले आहे. त्याचे नाव 'बार्कले कॅश' असे आहे. बार्कले बँकेच्या बाहेरच्या भिंतीवर हे यंत्र बसविण्यात आले असून त्यामुळे बँकेच्या खातेदारांना आपल्या चेकचे पैसे रात्रंदिवस केव्हाही मिळू शकतील. खातेदाराने प्रथम बँकेकडून प्रत्येकी १० पौंडांची व्हाऊचर्स घ्यावयाची आहेत. एका गुप्त पद्धतीने मॅग्नेटिक शाईने ही व्हाऊचर्स छापलेली आहेत. इतर व्हाऊचर्स यांत्रिक कॅशिअर स्वीकारणारच नाही. यंत्रावर आकडे छापलेला एक बोर्ड आहे, त्यावरील गुप्त, चार नंबरी आकड्यांची बटणे (हा नंबर फक्त बँक आणि खातेदार ह्यांनाच माहिती असतो) खातेदाराने दाबली, म्हणजे यंत्रातील इलेक्ट्रॉनिक उपकरण खातेदाराच्या व्हाऊचरवरील खुणा तपासून ओळख पटवून घेईल आणि व्हाऊचर 'पास' झाले की एक दिवा लागेल. दिवा लागताच ठराविक खण उघडून गिऱ्हाइकाने व्हाऊचरची रक्कम घ्यावयाची! अशा तऱ्हेचे यंत्र जगात अद्याप दुसरीकडे नाही, असे म्हणतात.

सिमेंट पाईप तयार करा.
४" ते ४८" पाईप तयार करणेची
उत्कृष्ठ दर्जाची मशिनरी
आम्ही तयार करितों
उत्पादक भिडे अँड सन्स प्रा. लि.
फोन नं ७६९ सांगली.

## जुगाराचा नवा प्रकार–मटका

मुंबईमधील रस्त्यावरून जाणारांना रस्त्यावर काही ठिकाणी खडूने लिहिलेले आकडे दररोज दृष्टीस पडतात. हे आकडे सर्व ठिकाणी सारखेच असतात. न्यूयॉर्क कॉटन फिगर्सच्या धर्तीवरचे 'मटका' ह्या नव्या जुगाराचे ते ओपनिंग आणि क्लोझिंग आकडे असतात, हे तो जुगार खेळणारांना माहीत असते. न्यूयॉर्क कॉटन फ्यूचर्समध्ये चढउतार होण्याचे थांबले, तेव्हा त्याची जागा घेणारा मटका जुगार, सुमारे तीन वर्षांपूर्वी निर्माण झाला. ह्या मटक्यामध्ये दररोज किमान १०,००,००० रुपयांची देवघेव होत असावी, असा अंदाज आहे. मटक्याचे सूत्रधार काही मातब्बर असामी आहेत, असे बोलले जाते. मटक्याचा प्रसार आता महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान येथे खूपच झाला आहे. शाळकरी मुलांपासून बडे उद्योगपती हा जुगार खेळतात. मुंबईमध्ये शेकडो जासुदांच्या द्वारा ओपनिंग आणि क्लोझिंग आकडे शहरभर शेकडो बुकीजना पोचवले जातात; परगावी फोनच्या द्वारा ते कळविले जातात. काही दैनिके हे आकडे नियमित छापतात.

मटक्याचे ओपनिंग आणि क्लोझिंग आकडे दररोज रात्री ८–३० आणि १० वाजता खेळण्याचे पत्ते पिसून काढले जातात. त्यावरील जुगाराच्या रकमा त्याआधी वसूल केलेल्या असतात. जुगाराचे दोन प्रकार आहेत. पहिल्यामध्ये, तीन पत्त्यांच्या बेरजेचा शेवटचा आकडा हा ओपनिंग आणि क्लोझिंग समजला जातो. अचूक आकडा खेळणाराला त्याच्या प्रत्येक एका रुपयाचे १८ रुपये मिळतात. दुसऱ्या प्रकारात, सहा पत्त्यांचे स्वतंत्र नंबर काढण्यात येतात, आणि ओपनिंगचे तीन आणि क्लोझिंगचे तीन आकडे अचूक खेळणाराला प्रत्येक रुपयाचे १५,००० रुपये मिळतात. रेसकोर्सवरील घोड्याच्या शर्यतीवर पैसे लावणाराला प्रवेश फी असते, तशी मटक्याला नसते. २५ पैशांपासून कितीही मोठ्या रकमेचे बेटिंग करता येते.

## इस्राईलला फ्रान्सची मदत

इस्राईल आणि अरब देश ह्यांच्यात झालेल्या सशस्त्र संघर्षात अरबांचा सपशेल पाडाव झाला. अरब देशांना रशियाकडून शस्त्रास्त्रे मिळणार असल्यामुळे इस्राईलाचा धोका अद्याप संपलेला नाही. ही परिस्थिती लक्षात घेऊन इस्राईलच्या सरकारने लढाऊ जेट विमानांचे उत्पादन करण्याचा कारखाना उभारण्याचे ठरविले आहे. विमानाचे उत्पादन करण्यासंबंधी एका फ्रेंच कंपनीबरोबर इस्राईलने नुकताच एक करारही केला आहे. इस्राईलच्या सैन्याने व्यापलेला अरबांचा मुलूख सोडून द्यावा अशी मागणी राजनैतिक आघाडीवर फ्रान्स करीत आहे. युद्ध सुरू झाल्यावर फ्रान्सने इस्राईलचा शस्त्रपुरवठा तोडल्याची घोषणाही केली होती. परंतु त्याची आडकाठी विमानांचा कारखाना काढण्याच्या कामी आलेली नाही. ह्या कारखान्यात निम्मे भांडवल इस्राईलच्या सरकारच्या मालकीचे असेल. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री लवकरच फ्रान्समधील बंदरात बोटीवर चढविण्यात येईल. मुळात ही यंत्रसामग्री पश्चिम जर्मनीसाठी तयार करण्यात आली होती. परंतु फ्रेंच कंपनीच्या अध्यक्षांचे कांहीं कौटुंबिक हितसंबंध इस्राईलमध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे ती जर्मनीऐवजी इस्राईलला पाठविली जाणार आहेत. जेरुसलेम शहराबाहेर काढण्यात यावयाचा हा कारखाना सुरू झाला की इस्राईल विमाननिर्मितीच्या बाबतीत स्वावलंबी होईल, इतकेच नव्हे तर विमानांची निर्यातही तो करू शकेल. अरब इस्राईल युद्ध सुरू होण्यापूर्वी फ्रान्सकडून विमानांच्या सुट्या भागांचा आणि रॉकेट्सचा पुरवठा इस्राईलला करण्यात आलेला होता. ह्या कामी प्रथम फ्रेंच विमानतळांचा आणि संघर्ष चालू झाल्यानंतर फ्रान्सबाहेरील विमानतळांचा उपयोग करण्यात आला.

## रासायनिक पदार्थांच्या उत्पादनवाढीचे प्रयत्न

मध्यवर्ती सरकारच्या पेट्रोलिअम आणि केमिकल्स खात्याने निरनिराळ्या प्रकारच्या रासायनिक पदार्थांचे उत्पादन व पुरवठा वाढविण्यासाठी अलीकडे काही उपाय योजण्याचे ठरविले आहे. ह्या देशांतील कृत्रिम रबराच्या धंद्याला अतिशय अडचणीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. अल्कोहलची टंचाई भासत असल्यामुळे कृत्रिम रबराचे उत्पादन घटत जाण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. टंचाई दूर करण्यासाठी ४० लाख गॅलन अल्कोहल आयात करण्याची व्यवस्था होत आहे. ह्या आयातीसाठी १·४७ कोटी रुपयांचे परदेशीय चलन द्यावे लागेल. साखरेच्या धंद्याचा गेला हंगाम फारच वाईट गेला. उसाच्या टंचाईमुळे साखरेचे उत्पादन तर घटलेच; पण अल्कोहलच्या उत्पादनालाही घसरगुंडी लागली. अल्कोहलचे उत्पादन जरुरीपेक्षा सुमारे खूपच कमी झाले. अल्कोहलचा उत्पादनात उपयोग करणारे तीन मोठे कारखाने आहेत. त्यातील एक कृत्रिम रबराचा असून तो बरेली येथे आहे. दुसरे दोन कारखाने पॉलिथीनचे उत्पादन करणारे आहेत. १९६६–६७ सालात कॉस्टिक सोड्याचे उत्पादन सामान्यतः गरज भागविण्याइतके झाले. कॉस्टिक सोड्याचे बाबतीत भारत स्वावलंबी झाला आहे; इतकेच नाही तर काही उत्पादन निर्यात करता येण्यासारखेही आहे. सोडा ॲशच्या बाबतीतही गरजेपुरते उत्पादन होत आहे. सध्या सोडा ॲशचे ४ कारखाने उत्पादन करीत आहेत. पण, त्यांपैकी ३ गुजरातमध्ये व १ उत्तर प्रदेशात आहे. ह्या धंद्याचे उत्पादन विखरून टाकण्याच्या दृष्टीने आणखी ३ नवे कारखाने काढण्यात येणार आहेत. मद्रास, महाराष्ट्र व आंध्र प्रदेश ह्या राज्यांतून ते स्थापन करण्यात येतील.

**आकाशवाणीवर संस्कृतमधून बातम्या**—आकाशवाणीवरून संस्कृतमधून बातम्या देण्याचा सरकारचा विचार असल्याचे लोकसभेत सांगण्यात आले.

### भुत्तोंनी पाकिस्तान सरकारलाही बनविले

१९६५ मधील भारत–पाक सशस्त्र संघर्षाला चिथावणी देणारे म्हणून पाकिस्तानचे माजी परराष्ट्रमंत्री मि. भुत्तो प्रसिद्धच आहेत. मि. भुत्तो ह्यांचे कुटुंब १९४७ साली पाकिस्तानची निर्मिती झाल्यावर भारतातून तिकडे गेले. पण, भारतातील आपल्या मालमत्तेवरील हक्क पाकिस्तानमार्फत मंजूर :करवून घेऊन नुकसानभरपाई मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भारत–पाक संघर्षाच्या वेळी ही माहिती उजेडात आली होती. परंतु आता तिच्या खरेपणाची ग्वाही पाकिस्तानच्या नॅशनल अॅसेंब्लीमधील प्रश्नोत्तरांत मिळाली आहे. १९४७ साली आपणास मिळालेला पासपोर्ट भारताने दिला होता म्हणून आपण भारतीय नागरिक असल्याचा दावा त्यांनी केला होता. मि. भुत्तो १९५८ साली पाकिस्तानच्या मंत्रिमंडळात घेतले गेले; मग त्यांनी भारतीय सुप्रीम कोर्टातील दावा मागे घेतला. पण, हा सर्व इतिहास पाकिस्तान सरकारला त्या वेळी माहीत नव्हता.


### हापूसच्या आंब्यांचा युरोपात प्रवेश

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने व्यापारी प्रयोगादाखल मार्से (फ्रान्स) येथे आंबे पाठविले, तेथून ते आगगाडीने लंडन, झूरिच, जिनिव्हा आणि रॉटरडॅम येथे रवाना झाले. प्रत्येकी ८ डझनांच्या २ खोक्यांतून हापूसचे आंबे निर्गत झाले. फक्त ५% आंबे खराब झाले. विमानाचा वहातुकीचा दर प्रत्येक किलोस ४ रु. पडतो. योग्य वेळी आंबे तोडले आणि ते ४२°–४८° फॅ. ह्या उष्णतामानात नीट ठेवले तर ६ ते ११ आठवडे चांगले टिकतात, असा बंगलोरच्या मध्यवर्ती अन्न संशोधन संस्थेने केलेल्या प्रयोगाचा निष्कर्ष आहे. पश्चिम युरोपात हिंदी आंब्यांच्या प्रसारास वाव आहे. तेथे सध्या जाणारे दक्षिण ऑफ्रिकेचे, मालीचे आणि काँगोचे आंबे हिंदी आंब्यांच्या मानाने खूपच बेचव असतात. हिंदी व्यापारी ह्या बाजारपेठेत उतरण्याचे धाडस करीत नाहीत, त्यामुळे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने आंब्यांची मोठ्या प्रमाणावर निर्गत करण्यास प्रारंभ केला आहे.

### चिन्यांचे बॉम्ब करणारे अमेरिकेतच शिकून तयार झालेले होते

अमेरिकेतून हाकून दिलेल्या दोन चिनी शास्त्रज्ञांच्या नेतृत्वाखालीच चिनी अॅटम बॉम्ब आणि रॉकेट तंत्राचा विकास झाला. कॅलिफोर्निया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये त्यापैकी एका शास्त्रज्ञाने हे तंत्र आत्मसात केले होते. दुसरा रॉकेट तज्ज्ञही त्याच इन्स्टिटयूटमधून बाहेर पडलेला आहे. मॅकार्थेने कम्युनिझमबद्दल आत्मीयता वाटणाऱ्या सर्वांचा बीमोड करण्याचा सपाटा चालविला होता, त्या वेळी ८० चिनी शास्त्रज्ञ चीनमध्ये गेले. त्यांना अमेरिकेत मिळालेल्या शिक्षणामुळे चीनच्या अणुविज्ञानाच्या प्रगतीच्या वेळात २० वर्षांची बचत झाली.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
**आपली चलनी नोट**
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'
किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.

**अधिक** धान्योत्पादन!
**अधिक** फायदा!!
**अधिक** बचत!!!
यांसाठीं
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे....
कारण, अत्यंत कार्यक्षम व कितकार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत.
किर्लोस्कर एंजिनें चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सना लागणाऱ्या खर्चाच्या मानानें फारच कमी येतो.

**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,**
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत).
TOM & BAY
KO 6696 M

## युरोपला पोखरणारे अमेरिकेचे आर्थिक आक्रमण

जिलेट रेझरने दाढी करणाऱ्या, न्याहारीला हिन्झची उसळ खाणाऱ्या, एसो पेट्रोलवर चालणाऱ्या फोर्ड मोटारगाडीतून कामाला जाणाऱ्या, रेमिंग्टन टाइपरायटर्स आणि आय्. बी. एम्. कॅाम्प्युटर्सवर कचेरीचे काम चालविणाऱ्या ( इकडे पत्नी हूवर यंत्राने घर स्वच्छ करणाऱ्या आणि वूलवर्थमध्ये बाजार करणाऱ्या ) इंग्रजाला माहीत आहे का, की ह्या सर्व जिनसा अमेरिकन मालकीच्या फर्म्सनी बनविलेल्या आहेत ? बहुधा नसावे; कारण गेल्या तीस वर्षांत ह्या जिनसा ब्रिटिश राहणीचा सर्वमान्य भाग होऊन बसल्या आहेत. शंभर वर्षांपूर्वी युरोपियन भांडवलाने अमेरिकेतील रेल्वे बांधल्या व कारखाने उभारले, त्यामुळे अमेरिकेचा विकास सुकर झाला. आता अमेरिकन भांडवल आणि ज्ञान ह्यांचा उलटा ओघ युरोपकडे सुरू झाला आहे. विशेषतः गेल्या दहा वर्षांतील युरोपमधील कॉमन मार्केटने ( सामाईक बाजार पेठ ) घडवून आणलेले स्थित्यंतर आणि युरोपातील राजकीय स्थैर्य ह्यामुळे अमेरिकन भांडवल युरोपकडे वळू लागले आहे. युरोपातील समृद्धीचा फायदा घेण्यासाठी व तेथील बाजारपेठ मिळविण्यासाठी अमेरिकन कारखानदार उत्सुक आहेत. अमेरिकेची युरोपातील प्रत्यक्ष गुंतवणूक गेल्या पंधरा वर्षांत तिपटीने वाढली आहे.

युरोपातील अमेरिकन गुंतवणुकीतील प्रमुख भागीदार म्हणजे एसो, फोर्ड आणि जनरल मोटर्स हे होत. आता अमेरिकेतील अग्रेसर १,००० कारखान्यांपैकी ७०० कारखान्यांनी युरोपात काहीना काहीतरी धंदा उभारलेला आहे. त्यांचे अनुकरण लहान आणि मध्यम आकाराचे कारखाने करीत आहेत. ह्या अमेरिकन कारखानदारीच्या पाठोपाठ अमेरिकन बँका, कायदे पंडित, जाहिरात एजंट, सल्लागार, हेही युरोपात आक्रमण करीत आहेत. ‘युरोपा एक्सप्रेस’ मधील अमेरिकन पद्धतीचे शब्दोच्चार अमेरिकन फर्म्सच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतीक आहेत.

अमेरिकन गुंतवणूक मुख्यतः नव्या उद्योगधंद्यात केली जाते. तेलाचे बाबतीत अमेरिकन फर्म्सनी ग्रेट ब्रिटनची आणि समाईक बाजारपेठेची २५–३०% बाजारपेठ काबीज केली आहे. मोटारींच्या बाबतीत हे प्रमाण ३०% आहे. टायर्स, शिवण्याची यंत्रे, रेझर ब्लेडस, माती हलविण्याची यंत्रे, ट्रॅक्टर्स, इंजिनिअरिंगची उपकरणे, इत्यादी बाबतींत अमेरिकेने ह्या पेक्षा जास्त आक्रमण केलेले आहे. काही जिनसांचे ( उदाहरणार्थ कार्बन ब्लॅक) उत्पादन करणारा युरोपियन मालकीचा एकही कारखाना नाही. विमाने, कॉम्प्युटर्स, इलेक्ट्रॉनिक जिनसा, ह्या संबंधांतील कारखानदारीचा शास्त्रीय प्रगतीशी घनिष्ठ संबंध असल्याने, युरोपियन बाजारपेठेपैकी निम्म्याहून जास्त बाजारपेठ अमेरिकेच्या मुठीत आहे आणि ही मूठ आणखी आवळत जाणार आहे.

अमेरिकेच्या प्रवेशाचे तात्कालिक परिणाम युरोपच्या खूपच फायद्याचे आहेत. नवीन उद्योगधंदे निघाले, नवीन पद्धतीने नवीन जिनसा निर्माण होऊ लागल्या, उत्पादन वाढले आणि युरोपात आर्थिक चलती सुरू झाली. अमेरिकन कारखानदारीच्या स्पर्धेमुळे जुने बुरसटलेले कारखानदार जागे झाले आणि ते अमेरिकन कारखानदारांच्या नव्या पद्धती स्वीकारण्यास प्रवृत्त झाले. विक्रीच्या पद्धतीत आमूलाग्र सुधारणा करणे, व्यवस्थापनास नवी दिशा देणे, हे त्यांना क्रमप्राप्त झाले; आपल्या स्वतःच्या जुन्या पद्धती आता किती कुचकामाच्या ठरतात, हे त्यांना कळून आले.

सामाजिक परिणामांचा विचार करता, वूलवर्थने कमी फायदा घेऊन खूप मोठी उलाढाल करण्याचा यशस्वी प्रयोग करून युरोपातील जनतेला राहणीचे मान सुधारण्यास शिकविले. ग्रेटब्रिटनमध्ये एसो कंपनीने ‘ब्लँट प्रॉडक्टव्हिटी बारगेनिंग’च्या पद्धतीला सुरुवात करून ब्रिटिश कारखानदारीला काबूत ठेवणाऱ्या कामगार संघांच्या जुन्या पद्धतींना चांगलाच धडा शिकविला. सामाजिक दळणवळणात वाढ, लोकशाही विचारसरणीचे बीजारोपण, ही अमेरिकेचीच युरोपला देणगी आहे.

युद्धानंतरच्या पहिल्या १५ वर्षांत सर्व युरोपियन देशांनी अमेरिकन फर्म्स व भांडवल ह्यांचे मुक्त कंठाने स्वागतच केले. पण, ह्या आक्रमणाचा जोर अनुभवाला आल्यानंतर आता त्याविरुद्ध आवाज ऐकू येऊ लागले आहेत. “युरोपीय कारखानदारांनी बनविलेल्या जिनसाच खरेदी करा” असा युरोपियन कारखानदार आपआपल्या सरकारशी हट्ट धरू लागले आहेत. कॅनडातील निम्मे कारखाने हळूहळू अमेरिकेच्या मालकीचे झाल्यामुळे कॅनडा आता तक्रार करू लागला आहे, त्याचे अनुकरण युरोपियन कारखानदारही करू लागले आहेत. स्वतःच्या गळचेपीची त्यांना भीती वाटू लागली आहे.

युरोपियन देश आणि कारखानदार ह्यांची मनःस्थिती फ्रान्सने उघडपणे जाहीर केली आहे. राजकीय आणि लष्करी बाबतींत प्रेसिडेंट डिगॉल ह्याने जशी बंडखोरी पुकारली, तशीच त्याने आता अमेरिकेच्या आर्थिक गळफासाविरुद्ध पुकारली आहे. अमेरिकन भांडवलाला फ्रान्समध्ये गुंतवणुकीस परवानगी देण्यापूर्वी त्याबाबत कसून तपास आता केला जात आहे. “फ्रान्सच्या आर्थिक क्षेत्रातील मोक्याच्या जागांचे निर्णय फ्रान्सबाहेर घेतले जाणे धोक्याचे आहे” असा त्यांचा आग्रह आहे. युरोपियन सामूहिक बाजारपेठेत ग्रेट ब्रिटनला येऊ न देण्याचा फ्रान्सचा उद्देश स्पष्ट आहे—युरोपच्या बंदिस्तीत ब्रिटिशांना येऊ दिले, तर ते आपल्यावरच कुरघोडी करतील.

अमेरिकेच्या बाबतीत फ्रान्सचे धोरण ह्याच चालीवरचे आहे. तथापि, नाइलाज होईल त्या ठिकाणी अमेरिकन भांडवलाला वाव देणे फ्रान्सला भागच पडले. कारण फ्रान्सने नकार दिला, तर पश्चिम जर्मनी होकार देई. युरोपीय समाईक बाजारपेठेतील

कोणताही एक देश अमेरिकेला रोखू लागला तर त्याचा उपयोग होत नाही हे स्पष्ट झाले. अमेरिकन उत्पादन तंत्राचे महत्त्व मान्य करणे भागच असल्यामुळें त्याचा फायदा मिळत राहणे हेही फ्रान्सला अगत्याचे वाटले.

युरोपला अमेरिकेची भागीदारी जरुरीची वाटते, पण युरोपियन भागीदार अमेरिकेच्या मानाने दुर्बल असल्याकारणाने अमेरिकेचा वरचष्मा टाळता येणे कठीण आहे. लष्करी संरक्षणासाठी युरोप अमेरिकेवर अवलंबून आहे पण त्याबाबत अंतिम निर्णय अमेरिकेवर अवलंबून राहणे युरोपियनांना खपत नाही; त्यामुळे धुसपूस चालते. औद्योगिक भागीदारीतहि अशीच अस्वस्थता आहे.

अमेरिकेच्या ह्या औद्योगिक आक्रमणावर एकच उपाय आहे; औद्योगिक बाबतीत युरोपची एकी व्हायला हवी. सबंध युरोपसाठी एकच कंपनी कायदा हवा. स्पर्धेसंबंधी कायदे सर्व देशांनी सारख्याच तत्परतेने अमलात आणायला हवेत. युरोपातील देशादेशांतील आर्थिक अडथळे दूर केले गेले पाहिजेत. सबंध युरोपसाठी एकच चलन हवे. युरोपची आर्थिक एकी होऊ शकली, ज्ञान आणि भांडवल एकत्र येऊ शकले, तरच अमेरिकन आक्रमणाला तोंड देता येईल. अमेरिकेशी युरोपची भागीदारी आज अपमानास्पद स्वरूपाची आहे, ती समान दर्जाची व्हावयाची असेल तर युरोपातील सर्व देश आर्थिक व राजकीयदृष्ट्या एकत्र यायला हवेत. प्रेसिडेंट डिगॉलचे राजकीय धोरण आणि त्याची आंतरराष्ट्रीय प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी अमेरिकेच्या अप्रिय आर्थिक आक्रमणाशी निगडित आहे.

### नगर जिल्हा सहकारी बँकेचे नवे मॅनेजर

नगर जिल्हा सहकारी बँकेचे मॅनेजर म्हणून काम करीत असलेले श्री. जी. एम. जोशी ह्यांची डेप्युटेशनची मुदत ३० जून, १९६७ रोजी संपली. त्यांना २९ जून रोजी बँकेच्या वतीने पद्मश्री विखे पाटील ह्यांच्या अध्यक्षतेखाली निरोप देण्यात आला. त्या वेळी वक्त्यांनी श्री. जोशी ह्यांच्या कार्याचा मुक्त कंठाने गौरव केला. त्यांच्या जागी बँकेतील एक वरिष्ठ अधिकारी श्री. जी. के. पाटील बी. ए. ( ऑनर्स ), बी. कॉम., एच. डी. सी. ह्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी जिल्हा बँकेतील आपल्या ७-८ वर्षांच्या काळात वरिष्ठ जागी काम करून उत्कृष्ट यश मिळविले आहे.


**Provisions of the Desai Bank Award**—as modified by the Bipartite Settlement 1966 (including those which continue to remain in force) (Rs. 3·00 each)

Available from the compiler

**B. R. Kembhavi**
940/4, Shivaji Nagar,
Poona 16.


### रजिस्ट्रार श्री. सुब्रह्मण्यम् यांचे परदेशी प्रयाण

महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार श्री. व्ही. सुब्रह्मण्यम् हे बुधवार दिनांक २८ जून, १९६७ रोजी रात्री विमानाने मुंबईहून रोमला रवाना झाले. जागतिक अन्न व शेती संघटना आणि आंतरराष्ट्रीय मजूर संघटना यांच्यामार्फत "को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग" या विषयावर आयोजित केलेल्या परिसंवादात ते भाग घेत आहेत. हा परिसंवाद रोम येथे २९ जूनपासून सुरू झाला असून तो पुढे डेन्मार्क येथे ३ ते २८ जुलै, १९६७ अखेरपर्यंत चालेल. या परिसंवादानंतर श्री. सुब्रह्मण्यम् हे ग्राहक सहकारी संस्थांच्या कामकाजाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने व ग्राहक सहकारी चळवळीची प्रगती पाहण्याच्या दृष्टीने ब्रिटन आणि स्वीडन या देशांना भेट देणार आहेत.

### दि सारस्वत को. बँक लि., मुंबई

नेहमीच्या आणि आवश्यक तरतुदी करून, सारस्वत बँकेने ३० जून, १९६७ अखेर संपलेल्या वर्षी २·२० लक्ष रु. नफा मिळविला. गेल्या वर्षी तो १·९२ लक्ष रु. होता. बँकेचे वसूल भांडवल १३·२५ लक्ष रु. असून तिचे रिझर्व्हज् वसूल भांडवलापेक्षा जास्त म्हणजे १६·८० लक्ष रु. चे आहेत. ह्या वर्षी ठेवींची रकम १०% ने वाढून ती ४७५·१९ लक्ष रु. ची ५२३·९८लक्ष रु. झाली. बँकेने दिलेल्या कर्जाची रकम २७% ने वाढून ती ती १८३·५१ लक्ष रु. ची २३३·१५ लक्ष रु. झाली. कर्जाचे ठेवींशी प्रमाण ४४% आहे. बँकेची तरती जिंदगी ३१९·१४ लक्ष रु. म्हणजे ठेवींच्या ६१% आहे. बँकेचे खेळते भांडवल ५१४·४७ लक्ष रु. चे ५७०·८७ लक्ष रु. झाले आहे. गेल्या वर्षी बँकेने ७% डिव्हिडंड दिले होते; संचालकांनी आता टॅक्स फ्री ८% ( १% बोनससह ) डिव्हिडंडची शिफारस केली आहे.

**५,००,००० टन तांदळाची आयात**—१९६७ मध्ये भारत ५ लक्ष टन तांदळाची आयात करणार आहे. ब्रम्हदेश, थायलंड, अमेरिका, कंबोडिया, नेपाळ, इजिप्त, गायना, इटली, ब्राझील आणि स्पेन ह्या देशांतून आयातीची व्यवस्था करण्यात येत आहे.


**Statistical Tables Relating to Earnings and Expenses of the first 24 Indian Scheduled Banks. 1957 to 1964** (Rs. 5·00 each)

Supplement for 1965-1966 to the above now available. (Rs. 1·00 each from the compiler

**B. R. Kembhavi**
940/4, Shivaji Nagar,
Poona 16.

### इंजिनिअर्समधील बेकारी

डिसेंबर, १९६६ मध्ये इंजिनिअरिंगचे ४,३३५ पदवीधर बेकार होते. त्याच बरोबर इंजिनिअरिंगचे १४,६१४ डिप्लोमा-वालेही बेकार होते.

### कै. अंबालाल साराभाई

अहमदाबादचे सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. अंबालाल साराभाई १३ जुलै रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी निधन पावले. ॲटॉमिक एनर्जी कमिशनचे चेअरमन डॉ. विक्रम साराभाई हे त्यांचे चिरंजीव असून कु. मृदुला साराभाई ही त्यांची कन्या होय.

### चीनमध्ये जर्मनीच्या मदतीने पोलादाचा कारखाना

दरवर्षी ३० लक्ष टन पोलाद तयार करणारा एक प्रचंड कारखाना चीनमध्ये उभारण्यास जर्मनी मदत करीत आहे. पश्चिम जर्मन फर्म कारखाना उभारण्याच्या कामी फ्रान्स आणि बेल्जम येथील फर्म्सचीही मदत घेईल. हा कारखाना सबंध आशियात सर्वात मोठा होईल.

### सिंगापूरमधील हिंदी नागरिकांवर संकट

सुएझच्या पूर्वेकडील भूभागातून आपले लष्करी तळ हलविण्याचे धोरण ब्रिटनने स्वीकारले आहे. ह्या धोरणास अनुसरून सिंगापूर येथील लष्करी तळ उठविण्यात येणार आहे. ब्रिटनच्या ह्या लष्करी तळावर कित्येक हजार परदेशीय नागरिक काम करतात. ते सिंगापूरचे नागरिक नाहीत. ब्रिटिश तळ बंद झाल्यावर हे लोक बेकार होतील. दुसऱ्या नोकऱ्या मिळू शकल्या नाहीत तर त्यांना आपआपल्या मायदेशी घालवून देण्यात येईल अशी घोषणा सिंगापूरच्या पंतप्रधानांनी केली आहे.

### संस्थानिकांचे तनखे आहेत तरी किती ?

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी एकूण ५५४ संस्थाने होती, त्यांचे क्षेत्रफळ ५,००,००० चौरस मैल होते व त्यांची लोकसंख्या ८·६५ कोटी होती. सरदार वल्लभभाई पटेल ह्यांनी दूरदृष्टीने त्या संस्थानांचे १९४७ साली भारतात त्वरेने विलिनीकरण घडवून आणले. त्यांच्याशी त्याबाबत करार करताना त्यांना सरकारने वार्षिक तनखे कबूल केले, त्यांची रक्कम ५·७० कोटी रुपये आहे. ती पुढे कमी होऊन आता वार्षिक ४·८२ कोटी रु. आहे. वार्षिक १० लक्ष रुपयांपेक्षा जास्त तनखा मिळणारे संस्थानिक खालीलप्रमाणे आहेत. हैद्राबाद ४३ लक्ष ( आता २० लक्ष ), बडोदे २६·५ लक्ष ( आता १४·५४ लक्ष ), म्हैसूर २६ लक्ष, ग्वाल्हेर २५ लक्ष ( आता १० लक्ष ), त्रावणकोर १८ लक्ष, जयपूर १८ लक्ष, जोधपूर १७·५ लक्ष, बिकानेर १७·५ लक्ष ( आता १० लक्ष ), पतिआळा ( १७ लक्ष ), इंदूर १५ लक्ष ( आता ५ लक्ष ), भोपाळ ११ लक्ष (आता ६·७ लक्ष). विद्यमान संस्थानिकांना मिळावयाचे हे तनखे आहेत; पुढे ते कमी कमी होत जावयाचे आहेत.


महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४-७५,
२५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,९८,३८,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,५२,७१,००० |
| ठेवी | ... रु. | ४८,२९,९५,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,१८,८९,६२,००० |

: बृहन मुंबईतील शाखा :
( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( पूर्व ) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :
(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. धु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–१८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**गंगा–कावेरीचा कृत्रिम संगम**— भारतामधील मोठ्या नद्या एकमेकांना कालव्यांच्या साह्याने जोडण्याची कल्पना सर सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांनी तीस–पस्तीस वर्षांपूर्वी जाहीर-रीत्या मांडली होती. त्या वेळी ती स्वप्नमय वाटण्याची शक्यता होती. परंतु अलीकडील तांत्रिक प्रगतीमुळे ती मूर्त स्वरूपात आणणे अशक्य कोटीतील वाटत नाही. ह्या कल्पनेचा पडसाद नुकताच मद्रास विधिमंडळात उमटला. मद्रासचे सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री म्हणाले की, गंगा व कावेरी जोडण्याच्या कल्पनेने अद्याप मूळ धरलेले नाही. पण गंगेचे पाणी मद्रास राज्याच्या सरहद्दीपर्यंत आणल्यास ते कावेरीत सोडण्याचे काम राज्य सरकार करीलच करील.

**मंत्र्यांच्या मालमत्तेला प्रसिद्धी नाही**—मध्यवर्ती सरकारच्या बहुतेक सर्व मंत्र्यांनी आपल्या मालमत्तेबद्दलची माहिती पुरविली आहे. अजून दोन मंत्र्यांकडून ही माहिती आलेली नाही, परंतु ती लवकरच येईल, असे लोकसभेत पंत-प्रधान इंदिरा गांधी ह्यांनी सांगितले. माहिती लोकसभेत मांडण्यात येईल काय, म्हणून विचारण्यात आले असता त्याला नकार देण्यात आला. ही माहिती वैयक्तिक आणि खाजगी स्वरूपाची असून ती पंतप्रधानांना विश्वासात घेऊन देण्यात आली आहे, असा खुलासा करण्यात आला.

**सिमेंटचे दोन नवे कारखाने**— सरकारी मालकीच्या सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्या संघटनेने सार्वजनिक मालकीच्या विभागात सिमेंटचे दोन नवे कारखाने उभारण्याचे ठरविले आहे. त्यापैकी एक म्हैसूर राज्यात आणि दुसरा मध्यप्रदेशात स्थापन करण्यात येणार आहे. प्रत्येक कारखान्याची वार्षिक उत्पादन-क्षमता २ लाख टनांची असेल. दोन्ही कारखान्यांच्या यंत्रसामग्री-साठी व इतर साधनांसाठी मागणी नोंदविण्यास परवानगी देण्यात आली आहे.

**मंत्र्यांच्या कचेऱ्या थंड राखण्यासाठी**—दिल्ली येथील मंत्र्यांच्या कचेऱ्यांतून १९६९ एअरकंडिशनर्स चालू आहेत. त्यांची किंमत १०,००,००० रुपये भरेल. त्यांची मोजदाद चालू असतानाच आणखी १५३ एअरकंडिशनर्सची मागणी पुरवठा खात्याकडे आली आहे.

**डोग्री शब्दकोश**—श्री. एच. आर. पंधोत्रा ह्या डोग्री पंडिताने डोग्री भाषेतील ३३ हजार शब्दांचा कोश तयार केला आहे.

**फिल्म इन्स्टिटयूटचे डिप्लोमा होल्डर्स**—फिल्म इन्स्टि-टयूटचा डिप्लोमा मिळालेल्या एकूण १४८ लोकांपैकी आता-पर्यंत फक्त ५९ जणांना नोकरी मिळाली आहे—मुंबईत ५५ जणांना, मद्रासमध्ये तिघांना आणि कलकत्ता येथे एकाला.


तुमची जिल्हाळयाची बँक

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

**आपल्या ११६ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध.**

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टीसेवा यांच्यासह

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

चिं. वि. जोग, जनरल मॅनेजर.

शं. ल. किर्लोस्कर, अध्यक्ष.


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ५९५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

L[illegible] NCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष ३३ | पुणे, बुधवार २ ऑगस्ट, १९६७ | अंक १५

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ]    ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४.    [ टेलिफोन ३५६५०१

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

**सरदारगृह**


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :–३८३३७ ]    सरदारगृह प्रा. लि. [ तार सर    ह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# विविध माहिती

**रशिआचे नवे विमान**—प्रवाशांची वाहतूक करणारे एक नवे विमान रशिआने बनविले असून त्याची चाचणी नुकतीच घेण्यात आली. ह्या चाचणीत विमानाने ९ हजार किलोमीटर्स अथवा ५,५८९ मैलांची झेप न थांबता घेतली. विमानात १८६ प्रवासी बसण्याची सोय आहे. रशिआच्या अंतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानवाहतुकीत त्यांचा समावेश लवकरच करण्यात येणार आहे.

**मार्टिन बोरमन हयात आहे**—युद्धगुन्हेगार म्हणून पकडण्यात आलेल्या एका नाझी अधिकाऱ्याने, मार्टिन बोरमन हा अद्याप जिवंत असून तो ब्राझिलमध्ये असल्याची माहिती दिली आहे. जर्मनीचा पराभव होण्याच्या अखेरच्या क्षणी हिटलरने बोरमन ह्याला आपला वारस म्हणून नेमले होते. पण तो पळून जाण्यात यशस्वी झाला.

**ब्रिटिश महिलेची उदार देणगी**—धुळे जिल्ह्यातील आदिवासींच्या एका भागात मि. रॉबर्ट वाल्टर्स नावाचे गृहस्थ सामाजिक कार्य करीत आहेत. त्यांनी तेथील आदिवासींच्या खडतर जीवनाची हकीकत आपल्या आईला कळविली. आदिवासींच्या दारिद्र्याची ह्या ब्रिटिश महिलेला अतिशय करुणा आली आणि तिने २० हजार रुपये जमवून पाठवून दिले. ह्या रकमेचा उपयोग पाण्याची विहीर खोदण्यासाठी व इतर कामासाठी करण्यात येत आहे.

**केरळला थायलँडचा तांदूळ**—थायलँडकडून १० हजार टन तांदूळ घेऊन एक बोट सीलोनला येत होती. परंतु भारत सरकारच्या विनंतीला मान देऊन सीलोनने हा तांदूळ केरळला पाठविण्याचे कबूल केले आहे. बोट लवकरच कोचीन बंदरात येईल. केरळमधील तांदळाची टंचाई आणखी न वाढण्यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे.

**खिस्ती मिशनऱ्यांची संख्या**—भारतात जानेवारी, १९६२ मध्ये ४,५१६ परदेशी खिस्ती मिशनरी होते; ती संख्या जानेवारी १९६७ मध्ये ३,९१५ झाली. तथापि काही सीमा विभागात त्यांचे कार्य विस्तारण्यात येत असल्याच्या बातम्या आहेत.

**भाभा सेंटरमध्ये कोबाल्ट निर्मिती**—ट्रॉम्बे येथील भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटरनें १,८०० क्यूरी कोबाल्ट ६० च्या निर्मितीचे कलश तयार करण्यात यश मिळविले आहे. अहमदाबाद येथील शेठ वाडीलाल साराभाई इस्पितळात त्याची प्रथम स्थापना होईल व त्यामुळे दररोज कॅन्सरच्या १० रोग्यांवर उपचार करता येतील. कॅन्सरची अशी ३० उपचार केंद्रे भारतात आहेत आणि ती सर्व आयात केलेल्या कोबाल्ट ६० चा सध्या वापर करीत असतात. लवकरच ह्या इस्पितळांनाही भाभा सेंटर त्याचा पुरवठा करू शकेल.

**सिंधीमध्ये रेडिओ वर बातम्या सांगणार**— सिंधी भाषेत रेडिओवर दररोज दोनदा बातम्या सांगितल्या जातील. प्रत्येक वेळेस त्यासाठी १० मिनिटे वेळ दिला जाईल. दिल्ली येथून प्रसृत होणाऱ्या ह्या बातम्या मुंबई, अहमदाबाद, भुज, जयपूर आणि इंदूर इ. केंद्रेही पुनर्क्षेपित करतील. पुणे आणि सांगली केंद्रांतून सिंधी कार्यक्रम प्रसृत करण्याबाबत विचार चालू आहे.

**फ्रेंच पोलादी पत्रे कराराप्रमाणे नव्हते**— इंटिग्रल कोच फॅक्टरीला एका फ्रेंच फर्मने विशिष्ट प्रकारचे पोलादी पत्रे पुरविले, त्यात कराराप्रमाणे ०·२ ते ०·३५% तांबे असायला हवे होते. अलिपूर प्रयोगशाळेने त्याची तपासणी केली तेव्हा त्या पत्र्यात तांबे मुळीच आढळले नाही. पत्रे २·५ मिमि. जाडीचे हवे होते, त्याऐवजी ३ मिमि. जाडीचे पुरविण्यात आले. त्यामुळे पत्र्यांचे क्षेत्रफळ कमी भरले. लंडन येथील इंडियन सप्लाय मिशनने हे पत्रे पास केले होते. फर्मविरुद्ध कायदेशीर इलाज करण्याचा रेल्वे बोर्डाचा मानस आहे.

**एकाक्ष घोड्यांना शर्यतीत परवानगी**-- घोड्यांच्या शर्यतीत अंधळ्या किंवा एकाक्ष घोड्यांना भाग घेण्यास बंदी होती. ह्यापुढे एकाच डोळ्याने पाहता येणाऱ्या घोड्यांना भारतातील घोड्यांच्या शर्यतीत भाग घेता येईल.

**अंतर्गत विमानवाहतुक महागली**— इंडियन एअर लाइन्स कॉर्पोरेशनने आपल्या भाड्यात १ ऑगस्टपासून १५% वाढ केली आहे. गेल्या वर्षी कॉर्पोरेशनला ४·६१ कोटी रुपये तोटा झाला होता. मुंबई-दिल्ली प्रवासाला आता २३२ रु. ऐवजी २६६ रु. पडू लागले आहेत; मुंबई-मद्रासचा दर २१९ रु. चा २५१ रु. झाला आहे.

**दरमाणशी उत्पन्नात घट**—१९६५–६६ मध्ये राष्ट्रीय उत्पन्न २०,१९० कोटी रु. होते, ते १९६६–६७ मध्ये २२,९५० कोटी रु. झाले. तथापि, १९६४–६५ च्या मानाने दर माणशी उत्पन्न ५·५% कमीच भरले.

**मद्रासचे तामीळनाडमध्ये रूपांतर करा**— भारताच्या राज्यघटनेत मद्रास राज्याचा जो जो उल्लेख असेल, त्या त्या ठिकाणी मद्रासऐवजी तामीळनाड म्हणण्यात यावे, असा ठराव मद्रासच्या कौन्सिलात एकमताने मंजूर झाला. घटनेत दुरुस्ती घडवून आणण्याची राज्य सरकारला ठरावाने शिफारसही करण्यात आली.

**धान्यवाहतुकीचा खर्च वाढला**— भारताकडे धान्य घेऊन येणाऱ्या आगबोटी सुएझ कालवा बंद झाल्यामुळे तेथून वळवून केप मार्गे आणाव्या लागल्या. त्यामुळे भारताला दर टनामागे सुमारे ४२ रुपये जादा खर्च सोसावा लागेल. ८,००,००० टनासाठी त्याची रक्कम १·२५ कोटी रुपये होते.

★ अर्थ ★

बुधवार, ९ ऑगस्ट, १९६७



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## धान्य आणण्यास बोटींचाही तुटवडा

अमेरिकेकडून भारताला मिळणाऱ्या अन्नधान्याची वाहतूक करण्याच्या मार्गात सुएझचा कालवा बंद झाल्याचा अडथळा आहेच. पण, त्याशिवाय इतर अडचणीही उत्पन्न झाल्या आहेत १९५६ मध्ये अरब व इस्राइल ह्यांच्यांत झालेल्या युद्धाच्या वेळीही भारतालाच सर्वांत अधिक उपसर्ग पोचला होता. वॉशिंग्टनमधील भारताचे अधिकारी बोटींनी आक्रमावयाचा मार्ग ठरवीत आहेत. गहू घेऊन जाणाऱ्या बोटींना आता आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून भारताला यावे लागेल. त्यामुळे त्यांच्या प्रवासाला १० दिवस अधिक लागतील. अन्नधान्याची वाहतूक करण्यासाठी लागणारी टँकर्स आता मिळू शकत नाहीत. पश्चिम अशियातील युद्धामुळे युरोपीय देशांना तेलाचा साठा करून ठेवण्याची तातडीची गरज वाटू लागली आहे. त्यामुळे मिळेल तेथून तेल आणण्यासाठी मोठी टँकर्स त्यांनी भाड्याने घेतली आहेत. अर्थातच ह्या मोठ्या बोटी भारताला मिळू शकत नाहीत. इतर मालवाहू बोटींची धान्याची वाहतूक करण्याची क्षमता मर्यादित आहे. अशा मालवाहू बोटीतून एका खेपेत जितके अन्नधान्य नेता येते त्याच्या तिप्पट धान्य एक टँकर बोट वाहून नेऊ शकते. त्यामुळे हिंदी महासागर आणि भूमध्य समुद्र ह्यांच्यांत व्यापार करणाऱ्या सर्वच देशांना अधिक बोटी लागत आहेत. परिणामी, बोटींची टंचाई उत्पन्न झाली असून भारताला लागणारे अन्नधान्य वाहून नेण्याच्या व्यवस्थेत गोंधळ उत्पन्न झाला आहे. रशियालाही सुएझ कालवा बंद झाल्यामुळे झळ लागली आहे व्हिएटनाममधील युद्धात उत्तर व्हिएटनामला करण्यात येणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यात व्यत्यय उत्पन्न झाला आहे. परंतु भारताला अन्नधान्याच्या वाहतुकीचा वाढता खर्च पेलण्याचे सामर्थ्य फारच अल्प आहे.

## अविकसित देशांना मिळणारी मदत घटणार

पाश्चात्त्य प्रगत देशांकडून अविकसित देशांना विकासासाठी मिळणारी मदत कमी होण्याची लक्षणे दिसत आहेत. सरळ मदत अगर व्यापारी करार ह्या दोन्ही मार्गांनी मिळणारी मदत अपेक्षेइतकी उपलब्ध होणे कठीण दिसत आहे. गेल्या वर्षी सरकारी आणि खाजगी मदत कमी झालेली आहेच. पश्चिम आशियात अरब–इस्राइल युद्ध झाल्यापासून अविकसित देशांबद्दल युरोपात एक प्रकारची कडवट भावना निर्माण झाली आहे. त्यांतच ह्या देशांत मंदीची लाट उसळल्यामुळे मदत देण्याची वृत्ती मरगळू पाहात आहे. तीन महिन्यांपूर्वी पॅरिस येथे मदत देणाऱ्या देशांच्या प्रतिनिधींची बैठक भरली होती. बैठकीत भारताला मोठी मदत देण्याची आश्वासने मिळाली. परंतु त्यानंतर पश्चिम अशियात निर्माण झालेली परिस्थिती व तीसंबंधी भारताने स्वीकारलेले धोरण ह्यांचा विपरीत परिणाम झालेला दिसत आहे. पाकिस्तान, भारत, मोरोक्को अगर ट्यूनिशियासारख्या देशांना मदत देण्याऐवजी तोच पैसा आपआपल्या देशांतच का गुंतवू नये, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. भारत आणि इतर कांही देशांतून अधिक प्रमाणात कापड आयात करण्याच्या विरुद्ध बेल्जममध्ये नुकतीच निदर्शने झाली. युरोपीय सामाइक बाजारपेठेत भारताच्या मालाला सवलती मिळण्याची आशा बेताचीच असल्याची ही चिन्हे आहेत. अविकसित देशांत भांडवल गुंतविण्यापेक्षा देशाच्या अंतर्गत विकासात ते गुंतविण्याकडे पश्चिम युरोपातील देशांचा कल होऊ लागला आहे. पाश्चिमात्य देशांकडून अविकसित देशांना मिळणारी मदत गेल्या वर्षी घटली असली तरी कम्युनिस्ट देशांकडून मात्र अधिक मदतीची आश्वासने मिळत आहेत.

## पेट्रोलजन्य पदार्थांच्या निर्यातीत वाढ

कोयाली आणि कोचीन ह्या ठिकाणी तेलशुद्धी करणारे दोन नवीन कारखाने सुरू झाल्यापासून भारतामधील पेट्रोलजन्य पदार्थांच्या साठ्यात आणि निर्मितीत समाधानकारक सुधारणा झाली आहे. हे दोन्ही कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागात आहेत. मध्यवर्ती सरकारच्या पेट्रोल आणि रसायन खात्याच्या वार्षिक अहवालात देण्यात आलेल्या माहितीप्रमाणे वरील कारखाने उत्पादन करू लागल्यापासून १६ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली आहे. पेट्रोलजन्य पदार्थांची संरक्षणखात्याची गरज आणि नागरी जीवनाची गरज त्यामुळे चांगली भागविता येत आहे. गेल्या वर्षी खनिज तेल आणि वायु मंडळाने तेलाचे साठे शोधण्याचे काम यशस्वीरीत्या पार पाडले. मुंबईच्या वायव्येला समुद्रकिनाऱ्याजवळ तेलाचा शोध लावण्यात आला. अंकलेश्वर खाणीतील तेलाचे उत्पादन वाढविण्यात आले आणि आसाममधील रुद्रसागर येथे तेलाचे चाचणी उत्पादन सुरू करण्यात आले. पेट्रोलजन्य पदार्थांच्या निर्यातीत बरीच वाढ झाली आहे.

### पेशावरजवळील अमेरिकेचा लष्करी तळ

१९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या युद्धाच्या निमित्ताने पेशावरजवळ असलेला अमेरिकन लष्करी तळ वापरण्यास अमेरिकेला बंदी केली होती. ह्या तळाचा वापर चालू ठेवण्यासाठी आता उभयता देशांमध्ये नवा करार करण्यात आला आहे. करारामधील अटी पुढीलप्रमाणे आहेत अशी माहिती मिळते. ( १ ) ह्या तळासाठी देण्यात आलेली २ चौरस मैलांची जमीन अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या ताब्यात पूर्णपणे राहावी. ( २ ) ह्या तळावर येण्यास कोठल्याही पाकिस्तानी नागरिकास हक्क नाही. ( ३ ) तळावर काम करणाऱ्या लोकांच्या हालचालीत पाकिस्तान व्यत्यय आणणार नाही आणि ( ४ ) तळाच्या वापरासाठी अमेरिका पाकिस्तानला दरसाल १०० कोटी डॉलर्स भाडे देईल. करार झाल्यानंतर काही दिवसांनी लष्करी सामग्रीने भरलेल्या अनेक पेट्या कराचीला उतरून घेण्यात आल्या आणि पेशावरजवळील तळावर रवाना करण्यात आल्या. हा तळ रशिआमधील हवाई हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आणि चीनच्या अणुशास्त्रविषयक प्रगतीची माहिती गोळा करण्यासाठी उपयुक्त आहे. चीनचे अणुशास्त्रविज्ञान सिकिअँग प्रदेशात प्रगती करीत आहे. पाकिस्तानला मिळणाऱ्या १०० कोटी डॉलर्सचा उपयोग कसा करण्यात येईल ह्याविषयी तर्क करण्यात येत आहेत. ह्या पैशाचा उपयोग शस्त्रास्त्रांच्या खरेदीसाठी होऊ शकेल. परंतु राजनैतिक गोटातील माहितीप्रमाणे पाकिस्तान ह्या रकमेचा उपयोग मुख्यतः आपल्या शेजारी देशांतील घडामोडींच्या वार्ता मिळविण्यासाठी करणार आहे. नेपाळ, ब्रह्मदेश, भारत, सीलोन आणि अफगाणिस्तान ह्या देशांत पाकिस्तानच्या राजकीय हालचाली वाढण्याचाही संभव आहे.

---


### पश्चिम बंगालमधील सेवानिवृत्तीचे वय

पश्चिम बंगाल सरकारने आपल्या नोकरांच्या सेवानिवृत्तीचे वय ५५ वरून ५८ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे ज्या नोकरांची नोकरी ५ वर्षांपेक्षा अधिक काळ झाली असेल त्यांना कायम करण्याचेही ठरविण्यात आले आहे. ज्यांची नोकरी तीन वर्षांपेक्षा अधिक झाली असेल त्यांना अर्धकायम किंवा जवळ जवळ कायम करण्यात येणार आहे. निवृत्तीचे सर्वसाधारण वय ५८ ठरविण्यात आले असले तरी काही अपवादात्मक परिस्थितीत निवृत्त झालेल्या सरकारी नोकरांना वयाची ६० वर्षे पुरी होईपर्यंत नोकरीच्या मुदतीत वाढ देण्याचे अधिकार घेण्यात आले आहे. अलीकडे मध्यवर्ती सरकारने ५० वर्षे वय अगर २५ वर्षे नोकरी झालेल्यांना सक्तीने निवृत्त करण्याचे अधिकार घेतलेले आहेत. राज्य सरकार आणि मध्यवर्ती सरकार ह्यांच्या धोरणातील विसंवादात ही नवीन भर पडली आहे.

Provisions of the Desai Bank Award—as modified by the Bipartite Settlement 1966 ( including those which continue to remain in force ) ( Rs. 3·00 each )

Available from the compiler

B. R. Kembhavi
940/4, Shivaji Nagar,
Poona 16.



## मंदीची कारणे विविध; उपायही तसेच हवेत

कारखान्यांतून तयार होणाऱ्या कित्येक प्रकारच्या मालाला पूर्ववत मागणी येत नसल्यामुळे उत्पादन आखडते घ्यावे लागत आहे आणि त्यामुळे कित्येकांचे काम सुटू लागले आहे. शेतीकडे जास्त लक्ष देण्याचे सरकारचे धोरण असल्यामुळे, शेतीला उपयुक्त असे उत्पादन (खते, जंतुनाशके, पंप, लहान इंजिने व विजेच्या मोटारी) करणाऱ्या कारखान्यांना अद्याप मंदीची फारशी झळ लागलेली नाही. पब्लिक सेक्टरमधील रेल्वेज, पोलाद कारखाने, वीजपुरवठा योजना, इत्यादींची मागणी घटली असल्यामुळे ती पुरविणाऱ्या कारखान्यांची पंचाईत होऊ लागली आहे. चवथ्या पंचवार्षिक योजनेची नियोजित वेळी अंमलबजावणी सुरू होईल, ह्या दृष्टीने त्या कारखान्यांनी जय्यत तयारी ठेवली होती, पण त्या योजना तहकूब झाल्यामुळे मागणीही थांबली आहे. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणजे सरकारने आपल्या खर्चिक योजना चालू केल्या पाहिजेत किंवा प्रायव्हेट सेक्टरला त्यातील काही योजना चालू करण्यास सवड दिली पाहिजे. प्रायव्हेट सेक्टरजवळ तरी एवढा पैसा कुठे आहे? त्याला सरकारी मदत आणि परदेशीयांची गुंतवणूक ह्यांचा आधार लागेलच.

रुपयाचे अवमूल्यन करते वेळी आयातीवरील कित्येक बंधने दूर करण्यात आली. त्यामुळे काही प्रकारच्या जिनसांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. उदाहरणार्थ, आयातीचे परवाने मुक्त हस्ताने देण्यास प्रारंभ झाल्यामुळे आणि परदेशी पोलादी कास्टिंग्जना प्राधान्य देण्याची आपल्या कारखानदारांची प्रवृत्ती असल्यामुळे स्थानिक उत्पादकांना पुरेशी मागणी नाही. मंदीच्या वेळी खुल्या बाजाराच्या अर्थव्यवस्थेत जे आर्थिक उपाय योजता येतात, ते भारतात आजच्या परिस्थितीत कठीण आहेत. त्याची कारणे राजकीय व सामाजिक स्वरूपाची आहेत. लहान लहान उत्पादकांचे एकत्रीकरण केले, तर उत्पादनखर्च कमी होतो आणि स्पर्धेत टिकाव धरता येतो, असा इतर देशांचा अनुभव असला तरी अशा एकत्रीकरणास येथे विरोध झाल्याविना राहणार नाही. लहान, आर्थिक दृष्टीने कमकुवत बँकांचे विलिनीकरण घडवून आणून फक्त मोठ्या, समर्थ बँकाच शिल्लक ठेवल्या, त्याचे अनुकरण कारखानदारीने करणे लोकमताला रुचणार नाही.

कोळशाच्या वाटपाची नियंत्रणे दूर करण्यात यावी, ह्या मागणीप्रमाणे सरकारने ती नियंत्रणे उठवली. त्यामुळे, संरक्षण उपभोगणाऱ्या छोट्या खाणींवर काम बंद ठेवण्याची पाळी आली. कारखानेच जर बंद होऊ लागले, कमी उत्पादन करू लागले, त्यांचे किफायतशीर उत्पादनासाठी एकत्रीकरण झाले नाही, तर दुसरे काय होणार? नफ्याचे प्रमाण कमी करून किमती उतरविण्यास हिंदी कारखानदार फारसे तयार होत नाहीत, असा आजवरचा अनुभव आहे. एकदा काम सुटले, म्हणजे दुसऱ्या उद्योगधंद्यांत काम मिळण्याजोगी येथील परिस्थिती नाही. येथील आताच्या मंदीस सरकारी धोरणे आणि योजना कारणीभूत असल्यामुळे, सरकार केवळ तटस्थ राहू शकत नाही.

अशा बिकट परिस्थितीत उपाययोजनाही बिकट आहे. वेगवेगळ्या तऱ्हेचे उपाय एकाच वेळी कमीजास्त प्रमाणात अमलात आणायला हवेत. करआकारणीत बदल, जकातीत दुरुस्ती, आयात करात सुधारणा, काही आयात करात वाढ, शेतीच्या उत्पादनात वाढ, इत्यादी सर्व दिशांनी हालचाल करायला हवी. सरकारी नियोजित योजना चालू ठेवायला हव्यात.

---

### संततिप्रतिबंधासाठी रेडिओच्या बक्षिसाचे आमिष

कोनारक (ओरिसा) येथील कामोत्तेजक शिल्पांचेजवळ भारत सरकारने कुटुंबनियोजनाची महती सांगणारा फलक लावला आहे. "आणखी एका निष्पाप अर्भकाला जन्म देण्यापूर्वी शंभर वेळा विचार करा" असे तो फलक सांगतो. आतापर्यंतच्या कुटुंबनियोजनाच्या प्रचाराला व पद्धतींना अपेक्षित यश न आल्यामुळे तीन किंवा तिनापेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या पुरुषांवर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेची सक्ती करण्याचा आपला विचार सरकारने जाहीर केला आहे. त्याखेरीज गती उरलेली नाही. ह्याबाबतचा कायदा होऊन तो अमलात येण्यास १९६८ उजाडेल पण तोपर्यंत सरकार गप्प बसणार नाही. तीन किंवा अधिक अपत्ये असणारा जो पुरुष स्वतःवर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करवून घेईल, त्यास ट्रॅन्झिस्टर सेट बक्षीस देण्याचा सरकारचा मानस आहे. पण ट्रॅन्झिस्टर बनविणारे भारतातील कारखाने भारतीय माणसांच्या इतके उत्पादनक्षम नसल्यामुळे जपानमधून हे ट्रॅन्झिस्टर सेट्स आयात करावे लागतील. जेम्स नॉक्स ह्या रोमन कॅथॉलिक आर्चबिशपने विचारले आहे, "ह्या योजनेच्या प्रवर्तकांपैकी कितीजणांनी स्वतःवर शस्त्रक्रिया करवून घेतली आहे?" (भारताचे आरोग्य आणि कुटुंबनियोजन मंत्री डॉ. चंद्रशेखर ह्यांनी शस्त्रक्रिया करवून घेतली आहे.) "अधिक काम, अधिक कार्यक्षमता, विवाहपूर्व संततिविषयक शिक्षण, ह्या मार्गाने भारताचा अन्नप्रश्न सोडविण्यात आला पाहिजे" असे त्या आर्चबिशपचे मत आहे सुमारे १० वर्षे भारतात पोपचे प्रतिनिधित्व केलेल्या ह्या महाशयांनी सिडने येथे वरीलप्रमाणे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

---

**ॲटलांटिस खंडाचा पुरावा** — ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो ह्यांच्या लिखाणात ॲटलांटिस खंडाचा उल्लेख आहे. क्रीटच्या उत्तरेला ६० मैलांवर एका प्राचीन शहराचे अवशेष सापडले आहेत. ह्या नष्टस्मृती शहरावर ३० ते ४० फूट जाडीचा ज्वालामुखीच्या राखेचा थर होता. हे शहर ॲटलांटिस खंडातील असण्याचा संभव आहे.

### व्हिएटनाममधील युद्धाचा एक आनुषंगिक परिणाम

उत्तर व्हिएटनाम विरुद्ध चाललेल्या युद्धात मुख्यत: अमेरिकेची जबाबदारी अधिक आहे. अमेरिकन शस्त्रसामग्री आणि लष्कर ह्यांचा वाटा सर्वात अधिक आहे. तथापि, अमेरिकेशिवाय दक्षिण कोरिआ, ऑस्ट्रेलिआ, इत्यादी देशांचे सैनिकही त्या युद्धात गुंतलेले आहेत. ह्या युद्धाचा ऑस्ट्रेलिआत ब्रिटनमधून स्थायिक होण्यासाठी येणाऱ्या तरुणांच्या संख्येवर परिणाम झाला आहे. युद्धात लढण्यायोग्य वयातील तरुणांची ऑस्ट्रेलिआत भरती करण्यात येते. तेव्हा अर्थातच ब्रिटनमधून आस्ट्रेलिआत जाऊ इच्छिणाऱ्या तरुणांची संख्या घटत चालली आहे. गेल्या वर्षी ह्या तरुणांच्या संख्येत ३० टक्क्यांनी घट झाली. ह्या वर्षीही १६ ते २० वर्षे वयातील ऑस्ट्रेलिआत येऊ इच्छिणाऱ्या तरुणांच्या संख्येत ५० टक्के घट होईल असा अंदाज आहे. ऑस्ट्रेलिआचा भूविस्तार मोठा असल्यामुळे तेथे लाखो लोकांची योगक्षेमाची सोय होऊ शकेल. पण, ऑस्ट्रेलिआच्या सरकारला प्रथम आणि कटाक्षाने गोऱ्या कातडीचे लोक हवे आहेत. त्यातही ब्रिटिश तरुणांना अधिक प्राधान्य देण्यात येते. ऑस्ट्रेलिआचा आर्थिक विकास अद्याप मोठ्या प्रमाणावर व्हावयाचा आहे. त्यासाठी माणसांची गरज अर्थातच आहे. परंतु ही माणसे गोरीच असली पाहिजेत असा अलिखित दंडकच पडला आहे. आशिआ व आफ्रिकेतील काळ्या वर्णाचे लोक तांत्रिकदृष्ट्या अप्रगत आहेत. त्यामुळे ऑस्ट्रेलिआच्या विस्तारत जाणाऱ्या आधुनिक अर्थव्यवस्थेत ते नीट बसू शकणार नाहीत असाही संभव आहे. म्हणूनही पश्चिम युरोपातील लोक तांत्रिकदृष्ट्या अधिक पसंत करण्यात येत असावेत.

---

### १०० वर्षे हवा असलेला पूल

इटली हा देश पश्चिम युरोपात असला तरी इतर पुढारलेल्या देशांच्या मानाने मागासलेला आहे. त्यातही उत्तर इटली औद्योगिकदृष्ट्या दक्षिण इटलीच्या मानाने अधिक समृद्ध आहे. सिसिली बेट तर युरोपातील सर्वात गरीब प्रदेशात मोडते. दुसऱ्या महायुद्धानंतर इटलीने मोठी आर्थिक प्रगती केली. पण त्यात सिसिलीचे काही बरे झाले नाही. सिसिली आणि इटलीची मुख्य भूमी ह्यांत अवघ्या दोन मैलांची सामुद्रधुनी आहे. तीवर पूल बांधण्यात आला तर सिसिलीचा विकास झपाट्याने होईल. आश्चर्य हे की ह्या पुलासंबंधी चर्चा गेली १०० वर्षे चालू आहे, पण तो अद्याप बांधण्यात आलेला नाही. हा पूल जर बांधण्यात आला तर तो लांबीच्या दृष्टीने जगातील तिसऱ्या क्रमांकाचा ठरेल. पूल बांधण्याचे काम मात्र फार अवघड आहे. पाण्याच्या जोरदार प्रवाहाला टिकण्यासाठी त्याचा पाया ४०० फूट खोल घ्यावा लागेल आणि पुलासाठी सुमारे ४०० कोटी रुपये खर्च करावे लागतील.

---

### मुंबईच्या हानीकडे लक्ष वेधण्याचा यत्न

मुंबई शहर भारतामधील एक सुंदर शहर म्हणून गणण्यात येते. परंतु गेल्या दहा पंधरा वर्षांत शहराच्या आसपास असलेल्या नैसर्गिक शोभेची मोठ्या प्रमाणावर हानी करण्यात येत आहे अशी तक्रार करण्यात आली आली आहे. तुलशी व विहार सारख्या तलावानजीकची रम्य वनश्री नष्ट करण्यात येत असून अशी रमणीय ठिकाणे आता उजाड व भकास होत चालली आहेत. कर्नाळा किल्ल्याजवळ असलेले अरण्य राखण्याचे सरकारने ठरविले असले तरी त्यासंबंधी अद्याप काही हालचाल दिसत नाही. दरम्यान, मुंबईतील माणसांची गर्दी वाढतच चालली आहे. मुंबईच्या दर चौरस मैलात १ लाख, १६ हजार माणसे राहतात. न्यूयॉर्क शहरातील हे प्रमाण २६ हजार आहे आणि लंडनमधील २४ हजार आहे. साहजिकच सौंदर्यशालिनी मुंबईत गलिच्छ झोपडपट्ट्यांची वाढ झपाट्याने होत आहे.


**Deccan Institute of Commerce**

**717, Budhwar Peth, Poona 2.**

(Telephone No. 51960)

BANKERS PRACTICAL TRAINING COURSE

20th Batch started on Tuesday, 1st August 1967. Good Prospects for securing lucrative service in Commercial and Co-operative Banks and Postal Saving Banks.

Duration: 3 Months.
Time : 8 A. M. to 9 P. M.

पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास



या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्ये कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर

टेलीफोन ५७७८१ माहिती मागवा उद्यान प्रासाद स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

# सांगली बँकेची ५० वर्षे

पहिला कालखंड : १९१६ ते १९४१, रौप्यमहोत्सवापर्यंत
दुसरा कालखंड : १९४१ ते १९४८, संक्रमणावस्था
तिसरा कालखंड : १९४८ नंतर आजपर्यंत

## बँकेचे महत्त्वपूर्ण कार्य

बँकेने विस्तृत प्रमाणात शेती, व्यापार व उद्योगधंद्यांना कर्जे देऊन त्यांचा उत्कर्ष साधला आहे. सुरुवातीला बँकेने मुख्यतः व्यापाराकडे लक्ष दिले व त्यानंतरच्या काळात उत्पादन व उद्योगधंदे यांनाही बँकेने मोठ्या प्रमाणांत कर्जे दिलेली आहेत. मुख्यतः ऊसउत्पादन, कापूस, साखर, कापड, इंजिनियरींग उद्योगधंदे, ट्रान्सपोर्ट इंडस्ट्री वगैरे उद्योगधंद्यांचा निर्देश करता येईल. तसेच बँकेने महाराष्ट्रातील विशेषतः दक्षिण महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांची उभारणी करण्यास हातभार लावला आहे. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या काही उद्योगधंद्यांनाही मोठ्या प्रमाणात बँकेने मदत केली आहे.

अनेक अडचणींच्या भट्टीतून तावून सुलाखून निघाल्याने "सुवर्ण महोत्सव" हे नाव सार्थ करण्यासारखे आजचे कार्य झाले आहे असे आम्ही अभिमामाने म्हणू शकतो. बँकेच्या इतिहासातील तर हा सुवर्णदिन आहेच पण याच्याही पुढे जाऊन आम्ही असे म्हटले की, महाराष्ट्राच्या-विशेषतः दक्षिण महाराष्ट्राच्या औद्योगिक व व्यापारी जीवनातलादेखील हा एक महत्त्वाचा दिवस आहे, तर ह्यात अतिशयोक्ती होणार नाही.

सांगली बँकेची स्थापना शके १८३८ च्या विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर (५-१०-१९१६) करण्यात आली. राजेसाहेबांच्या सक्रिय पाठिंब्यामुळेच हे घडून आले; त्यांचे कृपाछत्र शेवटपर्यंत या संस्थेवर होते.

### संकटकाळ

दुसऱ्या महायुद्धाचे समाप्तीनंतर परदेशी जाणाऱ्या काही वस्तूंचे भाव एकदम घसरले व त्यामुळे बँकेस नुकसानी सोसावी लागली. १९२० साली काही मालगहाणाच्या व्यवहारात खोट बसली. तथापि या दोन्ही तोट्यांचा बँकेवर मोठासा परिणाम झाला नाही. १९२१ साली बँकेचे मुंबईतील व्यवहार पाहणारी पेढी कच्ची पडली. या पेढीचे मुख्य भागीदार पूर्वी बँकेचे एक डायरेक्टर होते व त्यांचे मार्फत मुंबईचे काही व्यवहार बँक करीत असे. या पेढीवर एकदम आलेल्या संकटामुळे बँकेचे तीन लाख रुपये त्यांचेकडे राहिले. सुमारे एक महिना ठेवीदारांच्या बँकेवर एकसारख्या मागण्या येत होत्या व या संकटातून बँक कशी बाहेर पडते अशी लोकांना दाट शंका वाटू लागली. या प्रसंगी श्रीमंतांनी व त्यांचे हुकमावरून सरकारी अधिकाऱ्यांनी, शेअरहोल्डर्सनी व काही ठेवीदारांनी बँकेबद्दल जी सहानुभूती दाखविली व जी मदत केली त्यामुळे त्या संकटातून बँक निभावली. मुंबईच्या या पेढीकडील येणे रकमेपैकी सुमारे अर्धी रकम वसूल होऊन बाकी रकमेचा बँकेस तोटा सोसावा लागला. वर निर्दिष्ट केलेल्या या दोन्हीही पेढ्या सट्ट्याचा व्यवसाय करणाऱ्या होत्या. या लोकांवर त्यांच्या एकूण आर्थिक परिस्थितीपेक्षा जास्त मोठी जबाबदारी बँकेने अविचाराने टाकली. तेव्हा अविचाराने व्यापाऱ्यांना त्यांच्या ऐपतीबाहेर कर्जे देणे, सट्ट्याचा व्यवहार करणाऱ्यांवर फाजील भरवसा टाकणे, अशा सारख्या अनिष्ट प्रवृत्तीपासून बँकचालकांनी सावध राहून दूर राहिले पाहिजे. १९३६-३७ साली बँकेस कापसाच्या मालगहाणावर पुनः थोडेसे नुकसान सोसावे लागले. अशा तऱ्हेची संकटे बँकेवर येऊ नयेत म्हणून १९३७ साली बँकेने, मुंबईतील एक नामवंत अर्थशास्त्रज्ञ श्री. मनु सुभेदार यांना सल्लामसलतीसाठी बोलाविले. त्यांनी बऱ्याच उपयुक्त सूचना केल्या व त्या बँकेने अंमलात आणल्या.

### अनुभवाचे मौलिक धडे

३० सप्टेंबर, १९४१ रोजी बँकेने रौप्यमहोत्सव साजरा केला. पहिल्या २५ वर्षांचा हा काळ नवीन आर्थिक व्यवहाराचे धडे घेण्यात गेला. चांचपडत, अडखळत, वाटचाल सुरू होती. प्रगती निश्चित होत गेली पण ती सहजासहजी झाली नाही. लहानमोठी संकटे आली. संधिसाधू लोकांनी बँकेच्या अननुभवाचा फायदा उठवून बँकेस पेचात आणले. त्यातून बँक निभावली. व्याप मर्यादित होता व बँकेचे कार्यक्षेत्र मुख्यतः सांगली संस्थानच्या हद्दीतच होते. मर्यादित कार्यक्षेत्र असण्यात ज्याप्रमाणे दोष आहेत त्याचप्रमाणे त्याचे फायदेही आहेत. सुरुवातीस तरी सर्व व्यवहार आटोक्यात ठेवण्यात त्याचा उपयोग होतो. तुफानी झंझावातात मोठमोठाले वृक्ष उन्मळून पडतात पण लव्हाळे वाचतात. बँकेचा व्यवहार करताना किती जागरूक राहावे लागते, तो व्यवहार कुशल अधिकाऱ्यांच्या हातात असणे कसे आवश्यक आहे, सट्टेवाले व जे व्यापारी स्वतःच्या भांडवलापेक्षा प्रमाणाबाहेर कर्जाऊ भांडवलावर तेजीमंदीचा व्यापार करतात त्यांच्यापासून बँकेने कसे सावध राहणे आवश्यक आहे, असे कित्येक बहुमोल धडे बँकेने या काळात घेतले.

१९४१ च्या असेरीस बँकेच्या आठ शाखा होत्या. भांडवलात दोन लाखांपर्यंत वाढ झाली होती. खेळते भांडवल सुमारे २८ लाख रुपये होते. रिझर्व्ह फंडात वाढ, ठेवींची वाढ, नफ्याचे

योग्य प्रमाण व त्याचे समाधानकारक वाटप, वगैरेसारखी चांगली वैशिष्ट्ये दिसत होती व उज्ज्वल भविष्याची ग्वाही देत होती. शेअरहोल्डर्सची संख्या वाढली नाही. ती केवळ २० वरून २१ वर गेली. नोकरवर्गाची संख्या ३२ होती.

१९४८ साली बँकेने फोर्ट विभागात शाखा उघडून संस्थानच्या हद्दीबाहेर पहिले पाऊल टाकले; इतकेच नव्हे तर त्यासाठी एक उत्तम इमारत सव्वातीन लक्ष रुपयांना खरेदून तिचेवर आणखी दोन मजलेही वाढविले. त्या वेळी बँकेच्या १० शाखा होत्या. नोकरवर्गात सुमारे ४०–५० लोक होते. शेअरहोल्डर्स ३५ होते.

### बँकेचे आजचे चित्र

बँकेचे आजचे भांडवल रु. १०,८७,५०० रुपये असून लौकरच त्यात तेवढ्याच रकमेने वाढ करण्याचे ठरले आहे. आणखीही वाढ झपाट्याने होईल असे वाटते. बँकेची एकूण गंगाजळी (रिझर्व्ह) रु. १३,००,००० चे आसपास आहे. म्हणजे बँकेचे स्वतःचे भांडवल जवळजवळ २४ लाख रुपयांपर्यंत गेलेले आहे. ठेवी साडेसात कोटींच्यावर असून बँक "ब" वर्गात जाण्यास पात्र झाली आहे. आता शेअरहोल्डर्सची संख्या १४७ असून नोकरवर्गाची संख्या ४०० आहे. बँकेचे ६० ते ७० टक्के खेळते भांडवल कर्जाऊ रकमेच्या स्वरूपात असते; ३० टक्के रोकड, इतर बँकांकडील ठेवी व कर्जरोख्यांतील गुंतवणूक यात गुंतवलेली आहे. बँका कर्जरोख्यांत जी गुंतवणूक करतात त्यांच्या किंमतीत दरवर्षी फार मोठे नुकसान होत आहे व हा बँकांचेवर एक अप्रत्यक्ष कर आहे असे म्हणावे लागेल.

### बँकेचा शाखा–विस्तार

१९५५ साली सराफ बँक विलीन करून घेण्यात आली व कोल्हापूर येथे शाखा उघडण्यात आली. ही शाखा व नवीन उघडलेल्या शाखा धरून १९६० पर्यंत १५ शाखा होत्या.

१९६१ साली शाखांची संख्या २० होती. त्या वर्षी पुण्यातील बँक ऑफ पूना व फलटण येथील बँक ऑफ फलटण अशा तीन बँका, बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ सेक्शन ४५ खाली विलीन करण्यात आल्या.

१९६४–६५ साली (१) गुरु गोविंद सिपिसी बँक प्रा. लि. विजापूर (२) युनायटेड बँक ऑफ कर्नाटक व (३) युनियन बँक ऑफ विजापूर व सोलापूर या तीन बँका त्यांच्या सर्व शाखांसह स्वखुषीने बँकेत विलीन झाल्या. विलीन झालेल्या सर्वच बँकांचे मोठे गुंतागुंतीचे व्यवहार जलद गतीने व कुशलतेने सोडवण्यात बँकेस फार मोठे यश लाभले आहे. आजअखेर विलीन बँका, त्यांच्या शाखा व नवीन उघडलेल्या शाखा धरून एकूण शाखा ४३ आहेत.

---

### काश्मीरला येणारे हौशी प्रवासी

काश्मीरची आर्थिक स्थिती भरभराटीची राखण्याच्या कामी परदेशी प्रवाशांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची चांगली मदत होते. भारतामधून काश्मीरच्या सहलीला जाणाऱ्या प्रवाशांचाही ह्या कामी हातभार लागतो. ह्यावर्षी आतापर्यंत काश्मीरला ९० हजार प्रवाशांनी भेट दिली आहे. १९६६ मध्ये एकूण १ लाख, १२ हजार प्रवासी काश्मीरला गेले होते. ह्या वर्षीच्या ऑक्टोबरपर्यंत हाही आकडा मागे टाकला जाण्याची शक्यता आहे. काश्मीरच्या प्रवासी खात्याची अपेक्षा अशी आहे की कालांतराने त्यांची संख्या ५ लाखापर्यंत जाईल. परंतु ही अपेक्षा पूर्ण होणे प्रवाशांच्या सुखसोयींच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. निवासस्थाने आणि चांगले रस्ते ह्यांची अजूनही काश्मीरमध्ये पुरेशी सोय नाही. हिवाळ्यातील घसरगुंडीच्या खेळासाठी सरकारने एक ऑस्ट्रेलियन तज्ज्ञ मिळविला आहे.

---

### पश्चिम जर्मनीची भारताला मदत

कोठल्याही प्रकल्पाशी जखडलेली नाही अशी ६·३ कोटी डॉलर्सची खुली मदत भारताला पश्चिम जर्मनीकडून ह्याही वर्षी मिळणार आहे. गेल्या वर्षी इतकीच मदत मिळाली होती. भारत-मदत-संघाने जी ९० कोटी डॉलर्सची खुली मदत भारताला देण्याचे कबूल केले आहे, तिचाच भाग म्हणून वरील मदत देण्यात येणार आहे. भारताला मिळणाऱ्या मदतीचा अधिक परिणामकारक उपयोग करता यावा म्हणून कर्जाच्या परतफेडीच्या वेळापत्रकात बदल करण्याविषयी पश्चिम जर्मनीच्या सरकारशी सध्या वाटाघाटी चालू आहेत. भारताच्या सध्याच्या अडचणीच्या परिस्थितीत मदत देणाऱ्या देशांनी विधायक दृष्टिकोन स्वीकारावा अशी इच्छा जागतिक बँकेने व्यक्त केली आहे.

---

### स्थानिक लोकांना नौकरीचा अग्रहक्क

मुंबईमध्ये मराठी भाषिकांना नौकऱ्या मिळणे अतिशय कठीण झाल्यामुळे शिवसेना चळवळ सुरू झालेली आहे. ह्यासंबंधी महाराष्ट्र सरकार योग्य ती कारवाई करत नाही अशी विरोधी पक्षांची तक्रार आहे. मुंबईप्रमाणेच म्हैसूर राज्यातही ह्या प्रश्नाने डोके वर काढले आहे. म्हैसूरमधील एका कारखान्यात तामीळ लोकांनाच नौकऱ्या देण्यात येतात अशी तक्रार म्हैसूर विधानसभेत करण्यात आली. त्यावर उत्तर देताना मुख्य मंत्र्यांनी असे सांगितले की, राज्यातील मध्यवर्ती सरकारच्या मालकीच्या उद्योगधंद्यांत म्हैसूरच्या नागरिकांना प्राधान्य देण्यात यावे अशी विनंती मध्यवर्ती सरकारला करण्यात आली असून, त्याप्रमाणे मध्यवर्ती सरकारकडून संबंधितांना सूचनाही आल्या आहेत. म्हैसूर राज्यात कानडी नागरिकांना नौकऱ्याबाबत अग्रहक्क देण्यात येत नाही अशा तक्रारी सरकारकडे आलेल्या होत्या.

## पूर्व युरोपीय देशांशी व्यापार करण्यात अडचणी

ह्या साली आणि गेल्या साली भारताने परदेशाकडून होणाऱ्या आयातीवरील निर्बंध काहीसे सैल केले. त्याचा एक परिणाम असा झाला आहे की भारताच्या पूर्व युरोपातील देशांशी होणाऱ्या व्यापारात अडचणी निर्माण झाल्या आहेत. परदेशी चलनाची टंचाई उत्पन्न झाल्यामुळे पश्चिम युरोपीय देशांकडून होणाऱ्या आयातीवर निर्बंध घालावे लागले. ह्या काळात भारताने पूर्व युरोपातील देशांकडून काही कच्चा माल आणि यंत्रसामग्रीची आयात केली. आयातीची किंमत रुपयाच्या चलनात देण्यात यावयाची होती. आयात केलेल्या मालाची किंमतही अधिक होती. पण त्या वेळी दुसरा काही मार्गच नव्हता. परंतु आता भारत मदत संघातील देशांनी कोठल्याही प्रकल्पाशी न जखडलेली कर्जे देऊ केली आहेत. त्यामुळे आयातदारांना पश्चिम युरोपातील देशाकडून माल मागविणे स्वस्त पडू लागले आहे. पूर्व युरोपातील देशाकडून आयात करण्यासाठी दिलेले कितीतरी परवाने पडून आहेत. १९६६ सालातील आयातीशी तुलना करता १९६७ सालामधील पूर्व युरोपकडून होणारी आयात ३० टक्क्यांनी कमी होण्याची लक्षणे दिसत आहेत. भारत आणि पूर्व युरोपीय देश ह्याच्यांतील व्यापार समतोलपणावर आधारलेला आहे. भारत त्यांच्याकडून ज्या प्रमाणात माल घेईल त्याच प्रमाणात हे देश भारतात खरेदी करतात. शिवाय अलीकडे पूर्व युरोप आणि पश्चिम युरोप ह्यांच्यामधील व्यापारही अधिक खुला करण्यात आला आहे. काही प्रकारचा माल पूर्व युरोप भारताकडून घेत असे. पश्चिम युरोपीय देशांनी त्यांना कर्जे देऊ केल्यामुळे आता हे देश हाच माल त्यांच्याकडून घेऊ लागले आहेत.

---

## धरणीकंपाला बळी पडणाऱ्यांची संख्या

आत्महत्या करून मृत्यूला कवटाळणारांची संख्या देऊन मानसशास्त्रज्ञ अशा प्रकारच्या मरणाच्या कारणाची चिकित्सा करतात. अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनांत शेकडो माणसे दरसाल अपघातापायी मृत्युमुखी पडतात. भूकंपात दगावणाऱ्या लोकांची संख्या एका फ्रेंच भुस्तर शास्त्रज्ञाने अंदाजली आहे. त्याच्या हिशेबाप्रमाणे दरसाल सुमारे २० हजार लोक भूकंपाला बळी पडतात. जगात दरसाल कोठे ना कोठे भूकंप होत असतातच. त्यांची वार्षिक संख्या सुमारे १० लाखापर्यंत आहे. परंतु त्यातील शंभर–दोनशे भूकंपातच प्राणहानी अगर वित्तहानी होते. जगातील सर्वात मोठे दोन प्रलयकारी भूकंप चीनमध्ये झालेले आहेत. १५५६ मधील भूकंपात चीनमधील ८ लाखांवर माणसे दगावली आणि १९२० मधील भूकंपात १ लाख, ८० हजार माणसे दगावली. भूकंप आगाऊ वर्तविण्याचे अद्याप शास्त्राला जमलेले नाही. परंतु मोठ्या भूकंपाच्या आधी प्राणी आणि पक्षी बेचैन होतात असे म्हणतात.

## सिमेंट स्वस्त होण्याची शक्यता नाही

सिमेंट कारखानदारांच्या मध्यवर्ती संघटनेची ६ वी वार्षिक सभा दिल्ली येथे भरविण्यात आली होती. सभेचे उद्‌घाटन मध्यवर्ती सरकारच्या औद्योगिक विकास खात्याचे मंत्री श्री. फक्रुद्दिन अली अहमद ह्यांनी केले. उद्‌घाटनप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, सिमेंटच्या उद्योगधंद्याचा विस्तार व्हावा म्हणून सरकारने अनेक प्रकारांनी मदत केलेली आहे. तेव्हा सिमेंटच्या उत्पादकांनी आपला विस्ताराचा कार्यक्रम लवकर अमलात आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. ह्या धंद्याचा विकास व्हावा म्हणून करात सवलत दिली आहे, अबकारी करात सूट दिली आहे आणि कर्ज मिळण्यासाठी सवलती दिल्या आहेत. त्याशिवाय १९६६ च्या जानेवारी महिन्यापासून किंमतीही वाढवून दिल्या आहेत, आणि सिमेंटवरील नियंत्रणे रद्द केली आहेत. सरकारने उद्योगधंद्यावर टाकलेला विश्वास योग्य होता हे कारखानदारांनी विस्ताराचा कार्यक्रम लवकर अमलात आणून दाखवून दिले पाहिजे. ह्या प्रसंगी मंत्र्यांचे आभार मानताना श्री. एस. पी. जैन म्हणाले की, सिमेंटच्या किमती कमी होण्यासाठी वाहतुकीचा खर्च कमी करण्यात आला पाहिजे. ज्या ठिकाणी सिमेंटसाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध आहे त्या ठिकाणी नवे कारखाने काढले तर वाहतुकीचा खर्च कमी होईल. सिमेंटच्या उद्योगधंद्याला दरसाल ३ कोटी अधिक रुपये वाहतुकीसाठी द्यावे लागत आहेत. १९७०–७१ च्या सुमारास वाहतुकीचा खर्च २५ कोटीपर्यंत वाढण्याचा संभव आहे. सिमेंटच्या धंद्याची सध्याची परिस्थिती लक्षात घेता सिमेंटचा पुरवठा स्वस्त दराने करण्याची शक्यता वाटत नाही. सिमेंट निर्यात करण्याचे प्रयत्न मात्र लवकरच हाती घेण्यात येतील असे आश्वासन त्यांनी दिले.

---

## भारताच्या दालनाचा ५ वा क्रमांक

कॅनडामधील मॉंट्रील शहरी भरविण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात भारताने आपले दालन उघडले आहे. ह्या दालनाचा उत्कृष्टपणात ५ वा क्रमांक लागला आहे. प्रदर्शन २८ एप्रिलपासून सुरू झाले आहे. तेव्हापासून चालू महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत भारताच्या दालनाला १७ लाखांवर प्रेक्षकांनी भेट दिली. प्रदर्शनाला भेट देणाऱ्या एकूण प्रेक्षकांशी तुलना करता ही संख्या एकदशांश इतकी आहे. जुलैच्या १ तारखेपर्यंत २५ लाख, ५२ हजार रुपयांची व्यापारी देवाण घेवाण करण्यात आली. हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याने बनविलेली १० लाख रुपयांची घड्याळे खपली. १५ लाख रुपयांच्या मानवी केसांना गिऱ्हाईक मिळाले; १० हजार रुपयांच्या तागाच्या रंगीत कापडाचा खप झाला. त्याशिवाय अनेक प्रकारच्या मालासंबंधी चौकशी करण्यात आली.

## दुकानदाराची फसवणूक


लंड अँड ब्लॉकले ह्या सुप्रसिद्ध घड्याळाच्या फर्ममध्ये शनिवारी दुपारी स्वतःला कापड व्यापारी म्हणविणारे दोघेजण गेले. सोमवारी आम्ही आमच्या गावी परत जाणार आहोत, तेव्हा आम्ही निवडून ठेवलेली घड्याळे रोख रक्कम देऊन संध्याकाळी घेऊन जाऊ, असे त्यांनी फर्मचे मॅनेजर श्री. चंपकलाल मेहता ह्यांना सांगितले. दुकान १–३० वाजता बंद होते, असे मॅनेजरने म्हणता, मॅनेजरच्या घरीं येऊन आम्ही डिलिव्हरी घेऊ असे ते दोघे म्हणाले. ठरल्याप्रमाणे ते दोघे मॅनेजरच्या घरी गेले. मॅनेजरने त्यांना दिलेली घड्याळे त्यांनी एका पोलादी डबीत घातली आणि ती डबी इतर काही डब्यांसमवेत आपल्या कातडी बॅगमध्ये ठेवली. श्री. मेहता आपल्या ह्या बड्या गिऱ्हाइकांना चहा देण्यात गुंतले होते. त्यांनी घड्याळांच्या किमतीची रक्कम मागता, हे दोघे म्हणाले की आम्ही रक्कम आता आणलेली नाही. रात्री ती घेऊन येऊ; तोवर ही बॅग येथेच राहू द्या. मध्यरात्रीपर्यंतही ते आले नाहीत, तेव्हा श्री. मेहतांना संशय आला व त्यांनी बॅग उघडून पाहिली; घड्याळांची डबी त्यात न ठेवता तत्सम डबी त्या दोघांनी बॅगमध्ये ठेवली होती; घड्याळे असलेली डबी लांबविली होती असे श्री. मेहता ह्यास आढळून आले. त्यांनी पोलीसांकडे तक्रार नोंदविली आहे. घड्याळांची किंमत २३,८५० रु. आहे.

## पंजाबमधील तंत्रज्ञांवर बेकारीचे संकट


पंजाबमधील तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांतून अभ्यासक्रम पुरा करून अनेक तरुण कुशल तंत्रज्ञ बाहेर पडत आहेत. परंतु त्यांना रोजगारी मिळणे कठीण होत चालले आहे. एका बाजूला तांत्रिक शिक्षण घेतलेल्या कुशल कामगारांना काम मिळत नाही आणि त्याच वेळी अनेक औद्योगिक संघटनांना हवेत तसे कामगार मिळत नाहीत. ही परिस्थिती फक्त पंजाबातच आहे असे नव्हे. थोड्याबहुत फरकाने ही व्यथा भारतात सर्वत्रच दिसून येते. पण पंजाबमधील परिस्थिती विशेष बिकट झालेली आहे. कारण, पंजाब राज्यात मोठ्या प्रमाणावर चालणारे उद्योगधंदे नाहीत. त्यामुळे रोजगार मिळण्याचे क्षेत्र पुरेसे विस्तारलेले नाही.

## सरकारी मालकीच्या कारखान्यांतील भांडवल

भारत सरकारच्या अर्थखात्याने सार्वजनिक मालकीच्या ७४ व्यापारी आणि औद्योगिक संघटनाविषयीचा १९६५–६६ सालचा अहवाल तयार केला आहे. त्यावरून असे दिसते की ह्या औद्योगिक संघटनांतून अहवालाच्या साली २,४१५ कोटी रुपयांचे भांडवल गुंतविण्यात आले होते. त्या मागील साली २,०३७ कोटी रुपये भांडवल गुंतलेले होते. हिंदुस्थान स्टील ही कंपनी सोडून सरकारी मालकीच्या २९ कंपन्यांनी गुंतलेल्या भांडवलावर ४·३ टक्के नफा मिळविला. ह्या कंपन्यांतून १९६५–६६ साली ९०० कोटी रुपयांचे भांडवल गुंतलेले होते.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हॅंड पंप्स्, हॅंड रहाट, इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )


अल्पबचत योजनेत
पैसे गुंतवा म्हणजे
तुमच्या पैशांची वाढ होईल
तुम्ही १२ वर्षांच्या राष्ट्रीय संरक्षण सर्टिफिकिटांत १,००० रु. गुंतविल्यास १२ वर्षांनी १,७५० रु. तुम्हाला मिळतील. या सर्टिफिकिटांवर ६.२५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.
ही सर्टिफिकिटें ५, १०, १००, ५००, १,०००, ५,००० आणि, २५,००० रुपये या दर्शनी किमतीत बचत बँकेचा व्यवहार करणाऱ्या सर्व पोस्ट कचेऱ्यांत उपलब्ध आहेत.
१२ वर्षांची राष्ट्रीय
संरक्षण सर्टिफिकिटे
अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई ३२

**बंदर बांधण्यासाठी करार**—पूर्व पाकिस्तानात एक बंदर बांधण्यासाठी पाकिस्तान सरकारने दोन युगोस्लाव्ह कंपन्यांशी करार केला आहे. बंदर बांधून पूर्ण झाल्यावर चितगाव बंदरावर पडणारा वाहतुकीचा ताण पुष्कळ कमी होईल. बंदर बांधणीच्या कामासाठी २१ कोटी रुपये खर्च करावे लागतील. खर्चापैकी काही हिस्सा खर्च युगोस्लाव्हियाने पाकिस्तानला दिलेल्या कर्जातून भागविला जाईल.

**गरीब देशांना ब्रिटनची मदत**--चालू वर्षी विकसनशील देशांना मदत म्हणून ब्रिटन ५७·४ कोटी डॉलर्सची रक्कम देणार आहे अशी माहिती जाहीर करण्यात आली आहे. गेल्या वर्षी ब्रिटनने केलेल्या मदतीपैकी ५२ टक्के मदत देणगीच्या अगर तत्सम स्वरूपात होती. कर्जाऊ देण्यात आलेल्या नव्या कर्जापैकी ९० टक्के कर्ज बिनव्याजी होते. ब्रिटनची आर्थिक परिस्थिती सुधारल्याशिवाय ब्रिटन विकसनशील देशांना अधिक मदत देऊ शकणार नाही.

**बेडकांच्या पायांची फायदेशीर निर्गत**—बेडकांचे पाय तोडून त्यांची निर्गत केल्यामुळे महाराष्ट्र राज्याला १९६५ साली ४·८८ लक्ष रु. मिळाले.

**परदेशी चलनाची निकड**— महाराष्ट्र सरकारने मध्यवर्ती सरकारकडे यंत्रसामग्री आणि कच्चा माल ह्यांच्या आयातीसाठी १५,९१,५६,९९४ रु. च्या परदेशी चलनाची मागणी केली होती, पण प्रत्यक्ष ४,५७,५४,५९० रु. चे परदेशी चलन मिळाले. त्यामुळे पाणीपुरवठा योजनेत खंड पडला. दुधाची पूड कमी आयात झाल्यामुळे 'टोन्ड' दुधाचा पुरवठा कमी झाला.

**कालवाबंदीचा फ्रान्सवर कमी परिणाम**—इजिप्तने सुएझचा कालवा बंद ठेवल्यामुळे सर्वांत अधिक वाईट परिणाम ब्रिटनवर झाला आहे. ब्रिटनमध्ये तेल महागले आहे. फ्रान्सवर कालवाबंदीचा परिणाम अत्यल्प झाला आहे. कारण, फ्रान्सचे तेल मुख्यतः अल्जीरिआ व लिबिआमधून येते. दक्षिण आफ्रिकेतील बंदरांना मात्र तेल वाहतूक वाढल्यामुळे फायदा झाला आहे.


**लघुपटांच्या कथालेखनाचे शिक्षण**—लघुपटांच्या पटकथा लिहिण्याचे शिक्षण देणारा सहा आठवड्यांचा एक कोर्स फिल्म इन्स्टिट्यूट ७ ऑगस्ट रोजी सुरू करणार आहे. लघुपटांचे कथालेखन करणारे १६ विद्यार्थी त्यात दाखल झाले आहेत.

**प्लॅस्टिक वृत्तपत्र**—फ्रान्समध्ये २० जुलै रोजी प्लॅस्टिकवर छापलेले वृत्तपत्र सुरू करण्यात आले आहे. ते फाटत नाही आणि पावसातही वाचता येते.


**संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेस प्रोत्साहन**— संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करवून घेणारांना विमाहप्त्यांत लाईफ इं. कॉर्पोरेशनने सवलत द्यावी, असे आरोग्यखात्याचे उपमंत्री श्री. प्रतिभा पाटील ह्यांनी सुचविले आहे.

द. सा. द. शे. रुपये
७·६२/—
पर्यंत व्याज आपण मिळवू शकता
ठेवीची मुदत मोठी म्हणजे
व्याज मोठे
एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते
इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते.
दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.
मुख्य कचेरी :—सातारा
सत्तावीस शाखा

चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या
•बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
•मजबूत बांधणी
•अद्यावत् यंत्र योजना
•साईज १४", १६", १८"
फोन नं. १६९



उत्पादक—
भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80 Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्राधन:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ पुणे, बुधवार १६ ऑगस्ट, १९६७ अंक १६

**आमचे ग्राहक, आणि नाराज ?**

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★






## तांदळाची टंचाई संपण्याची लक्षणे नाहीत

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न आणि शेती उपसंघटनेच्या तांदळासंबंधी अभ्यास करणाऱ्या गटाची बैठक रोम येथे भरली होती. ह्या गटात २७ देशांचे प्रतिनिधी आहेत. त्यात तांदूळ पिकविणाऱ्या व तांदळाची आयात करणाऱ्या देशांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. अभ्यासगटाने संकलित केलेल्या माहितीप्रमाणे १९५५ नंतर ग्राहकांना सर्वांत कमी तांदूळ चालू वर्षी मिळाला. गेल्या १२ वर्षांत दरडोई मिळणाऱ्या तांदळात इतकी घट झालेली नाही. तांदळाच्या अपुऱ्या पुरवठ्याचा हा प्रसंग मुख्यतः विकसनशील देशांतील लोकांनाच सोसावा लागला आहे. आणीबाणीच्या प्रसंगी उपयोगी पडावे म्हणून निर्माण करण्यात आलेले शिलकी साठे आणि निर्यातीसाठी राखून ठेवलेले साठे घटत चालले आहेत. तांदळाच्या किमती जगाच्या सर्वच बाजारपेठांतून झपाट्याने वाढत चालल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या वेगापेक्षा तांदळाच्या उत्पादनाचा वेग अधिक झाल्याशिवाय तांदळाची टंचाई कमी होण्याची अगर त्याच्या किमती वाजवी पातळीवर येण्याची शक्यता नाही. १९६६ साली तांदळाची निर्यात करणाऱ्या देशांना आपले निर्यातीचे उत्पन्न वाढविता आले नाही. तांदळाच्या किमती चढत असतासुद्धा त्यांची परदेशीय चलनाची प्राप्ती वाढू शकली नाही. कारण, निर्यात करण्यासाठी पुरेसा तांदूळच ह्या देशांपाशी नव्हता. १९६६–६७ सालात जगातील तांदळाचे उत्पादन सुमारे १५·६ कोटी टन होईल असा अंदाज करण्यात आला आहे. गेल्या वर्षीपेक्षा हा आकडा १० लाख टनांनी अधिक आहे. तथापि, दोन वर्षांपूर्वीच्या मानाने उत्पादन १४ लाख टनांनी कमी आहे. त्यामुळे तांदळाचा आंतरराष्ट्रीय व्यापार बेताबेताने होईल असे दिसते.

---

## बुद्धिमान विद्यार्थ्यांच्या शोधाची पद्धत

शास्त्रीय विषयांत चमकणारे हुषार विद्यार्थी शोधून काढून त्यांना उत्तेजन देण्याची पद्धत अमेरिकेत गेली २७ वर्षे चालू आहे. अमेरिकेमधील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांतून अशा बुद्धिमान विद्यार्थ्यांची कसून निवड करण्यात येते. निवडीला पात्र होण्यासाठी चाचणी परीक्षेला बसावे लागते. गेल्या वर्षी ५० राज्यांतील २३,८२९ विद्यार्थी ह्या स्पर्धेच्या परिक्षेला बसले. त्यांपैकी १५ ते १८ वर्षे वयाच्या अवघ्या ४० विद्यार्थ्यांची राष्ट्रीय विजेते म्हणून निवड करण्यात आली. त्यांपैकी पहिल्या पाच विद्यार्थ्यांना ७,५०० डॉलर्सपासून ३ हजार डॉलर्सपर्यंत शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. बाकीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५० डॉलर्सच्या शिष्यवृत्त्या देण्यात आल्या. अशा विद्यार्थ्यांमधूनच कोणत्याही देशातील संशोधक शास्त्रज्ञ निपजत असतात. भारतात अशी काही पद्धत सुरू करणे इष्ट ठरेल. ह्या बाबतीत काही प्राथमिक हालचाल सुरूही झाली आहे.

---

## कांदे निर्जल करण्याचा सहकारी कारखाना

कांदे निर्जल करून टिकविण्याचा सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारा एक कारखाना नाशिक जिल्ह्यात पिंपळगाव ह्या ठिकाणी उभारण्यात येणार आहे. कारखान्यासाठी पिंपळगावच्या परिसरात १० एकर जागा मिळविण्यात आली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ४६ लाख रुपये भांडवल लागणार आहे. त्याच्या उभारणीसाठी ३५२ सहकारी संस्थांनी पुढाकार घेतला असून भांडवल जमविण्याच्या कामास प्रारंभ केला आहे. सुमारे २,५०,००० रुपये भांडवल गोळा करण्यात त्यांना यशही आले आहे. इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनकडून ३० लाख रुपयांचे कर्ज मिळविण्याची खटपट करण्यात येत आहे. कारखाना स्थापन करण्याच्या कामात एका फ्रेंच कंपनीने तांत्रिक सहकार्य देऊ केले आहे. कारखान्याच्या उभारणीसंबंधीचा अहवाल कंपनीकडून हाती आलेला आहे. त्याशिवाय कारखान्यात निर्माण होणाऱ्या निर्जल कांद्याच्या उत्पादनापैकी ८० टक्के उत्पादनाला फ्रान्समध्ये बाजारपेठ मिळवून देण्याची हमी घेतली आहे. संकल्पित कारखान्यातून दररोज ३० टन कांदे निर्जल करून हवाबंद डब्यात भरण्यात येतील. नाशिक जिल्हा कांद्याच्या उत्पादनाच्या बाबतीत भारतात अग्रेसर गणला जातो. जिल्ह्यात दरसाल सुमारे २ लाख टन कांदा पिकविला जातो. शेतीच्या मालावर संस्कार करून तो टिकाऊ स्वरूपात आणण्याचे निरनिराळ्या प्रकारचे कारखाने निघू लागले आहेत. केळ्यांची पूड तयार करण्याचा एक कारखानाही खानदेशात निघू पाहात आहे. शेतीच्या मालाच्या भावातील चढउतार कमी करण्याच्या दृष्टीने असे कारखाने उपयुक्त असले तरी लोकांच्या आहारातील साध्यासुध्या गोष्टी प्रमाणाबाहेर निर्यात होत नाहीत इकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

---

## गुजरात राज्यातील खताचा कारखाना

चालू वर्षी भारतात खताचे पाच मोठे कारखाने उत्पादन करू लागतील. त्यांपैकी गुजरातमधील कारखान्यात अलीकडेच उत्पादनास प्रारंभ करण्यात आला आहे. ह्या कारखान्यात दरसाल ९६ हजार टन नत्रयुक्त खत निर्माण करता येईल. गोरखपूर, नामरूप आणि विशाखापट्टम् येथील कारखान्यांची बांधणी पुरी झाली असून त्यांची चांचणी लवकरच घेण्यात येणार आहे. गोरखपूर आणि नामरूप येथील कारखान्यांची वार्षिक उत्पादनक्षमता प्रत्येकी ४५ हजार ते ८० हजार टनांची आहे. हे दोन्ही कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागातील आहेत. सर्व कारखाने उत्पादन करू लागले म्हणजे खताची एकूण उत्पादनक्षमता ३ लाख, ९ हजार टनांनी वाढेल. सध्या देशातील खताची उत्पादनक्षमता ५ लाख, ८५ हजार टन आहे. १९७० च्या सुमारास २८·२२ लाख टन खताची निर्मिती होऊ लागेल असा अंदाज आहे.

---

# ★ अर्थ ★

बुधवार, १६ ऑगस्ट, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यामागील अर्थकारण

१९६५ साली झालेल्या भारत–पाक युद्धाच्या वेळी पश्चिम जर्मनीने पाकिस्तानला रणगाडाविरोधी आयुधे पुरविल्याबद्दल भारताने तक्रार केली होती. त्यानंतर हा पुरवठा बंद करण्यात आल्याचे आश्वासन मिळाले होते. अलीकडे लोकसभेत पुन: अशीच चिंता व्यक्त करण्यात आली आहे. भारताच्या दृष्टीने पाकिस्तानला करण्यात येणारा शस्त्रास्त्रांचा पुरवठा शत्रुत्वाची भावना दाखविणारा असला तरी पश्चिम जर्मनी ह्या प्रकरणाकडे केवळ एक व्यापारी व्यवहार म्हणून पाहात असण्याचा संभव आहे. शस्त्रास्त्रांचा व्यापार रशिया–अमेरिकेसारखी बडी राष्ट्रे करतात; तसाच तो स्विट्झरलंड किंवा झेकोस्लोव्हाकिआ-सारखी छोटी राष्ट्रेही करतात. पश्चिम जर्मनीही ह्या व्यापारात सामील झालेला आहे. सध्या जर्मनी हा देश आर्थिक संकटात सापडलेला आहे. तेथे नवीन कर बसविण्यात येत आहेत. अशा परिस्थितीत शस्त्रास्त्रांचा व्यापार केल्यास तेथील उद्योगधंद्यांना काम मिळते. शिवाय दुसरीही एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. जर्मनीत अमेरिकन व ब्रिटिश लष्कर आहे. ह्या लष्करासाठी लागणारी सामग्री जर्मनीला अमेरिकेकडून व ब्रिटनकडून विकत घ्यावी लागते. अलीकडे अमेरिकेने १०० कोटी डॉलर्सचे लष्करी साहित्य घेण्याबद्दल पश्चिम जर्मनीवर दडपण आणले होते. अखेर हा सौदा ६० कोटी डॉलर्सवर तुटला. अशा रीतीने घेतले गेलेले रणसाहित्य जर्मनीला पाहिजेच असते असे नाही. शिवाय नव्या प्रकारची शस्त्रास्त्रे सारखी तयार होत असतात. त्यामुळे जुनी शस्त्रास्त्रे गरजूंना विकून टाकली जातात. असल्या व्यवहारात पाकिस्तानसारखा देश पश्चिम जर्मन सरकारला चांगले गिऱ्हाईक वाटल्यास त्यात नवल वाटण्याचे कारण नाही.

## साखरेच्या धंद्यासाठी नवी संशोधनसंस्था

दक्षिण भारतामधील साखरेच्या धंद्यासंबंधीच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने एक कमिटी नेमली होती. कमिटीने ह्या भागातील साखरेच्या धंद्यातील तांत्रिक प्रश्नांबद्दल संशोधन करण्यासाठी नवी संस्था स्थापन करण्यात यावी अशी शिफारस केली आहे. संकल्पित संशोधनसंस्था कानपूर येथील संस्थेपासून पूर्णपणे स्वतंत्र असावी आणि तिचा कारभार दक्षिण भारतामधील प्रतिनिधींनीच चालवावा असेही सुचविण्यात आले आहे. मद्रास, केरळ, आंध्र, म्हैसूर आणि महाराष्ट्र ही राज्ये दख्खनमध्ये मोडतात. हा भाग साखरेच्या धंद्याला उत्तर भारताच्या तुलनेने अधिक अनुकूल असा आहे. सध्या भारतात लखनौ व कोइमतूर ह्या ठिकाणी उसाच्या लावगडीसंबंधी संशोधन करण्यात येत आहे. म्हणून नव्या संस्थेत साखरेच्या धंद्यातील विशिष्ट तांत्रिक प्रश्नासंबंधी आणि साखर तयार करताना उपलब्ध होणाऱ्या उप-पदार्थांच्या विनियोगासंबंधी संशोधन करण्यात यावयाचे आहे. नवीन संस्था अखिल भारतीय स्वरूपाची राहणार असली तरी तिची संघटना आणि कार्यपद्धती दक्षिण भारतामधील साखर-धंद्याच्या प्रश्नांना प्राधान्य देईल. संस्थेच्या नियामक मंडळात मध्यवर्ती सरकारचे आणि साखरेच्या धंद्याचे प्रतिनिधी राहतील. त्याचप्रमाणे सहकारी साखरकारखान्यांचे प्रतिनिधी आणि धंद्यातील ख्यातनाम तंत्रज्ञ व एंजिनियरसही त्यात असतील. संस्थेच्या स्थापनेसाठी ५० लाख रुपयांचा भांडवली खर्च करावा लागेल. हा खर्च मध्यवर्ती सरकार देण्याची शक्यता आहे. संस्थेला नित्याचा खर्च चालविण्यासाठी पहिल्या वर्षी ५ लाख रुपये लागतील. चौथ्या वर्षापासून पुढे हा खर्च १२ लाख रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे.

## गरीब देशांची अमेरिकेला खंडणी

गेल्या वर्षी शास्त्रज्ञ, इंजिनिअर्स, डॉक्टर्स, इत्यादी मिळून ४,३९० लोकांनी अमेरिकेत इतर देशांमधून प्रवेश केला. ह्या प्रत्येकावर त्याच्या त्याच्या देशाने एकूण २०,००० डॉलर्स तरी खर्च केलेला असेल. म्हणजे, एका वर्षात अमेरिकेला इतर देशांनी ८·८ कोटी डॉलर्सची खंडणी दिली, असा अर्थ झाला. विकसन-शील देशांचे असेच सतत नुकसान होत जाणे अमेरिकेलाही चिंतनीय वाटते; कारण त्यामुळे विकासाचे काम खंडित होणार आणि अमेरिकेला त्यांना मदत देत राहावे लागणार. काही विशेष हुशार माणसे गमाविल्याने एखादी योजना हाती घेतली गेली नाही किंवा नीट पार पडली नाही, नवे तरुण शिकवून तयार झाले नाहीत, उत्साह कमी झाला, दूरदर्शी नेतृत्व उरले नाही, तर त्यामुळे केवढे तरी नुकसान होणार. अमेरिकेने विदेशी लोकाना तांत्रिक ज्ञान देऊन तरबेज करणे त्या देशांच्या हिताचे दिसले, तरी शिकून तयार होणारे हे तज्ज्ञ मायदेशी परतण्यास उत्सुक नसतात. त्यामुळे एकूण हिशेब तोट्याचाच होतो. अमेरिकन सेनेटच्या एका समितीच्या अहवालात, अशा शब्दात, गरीब अविकसित देशांतील अक्कलहुशारीच्या निर्गती-बद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

### पाणीपुरवठ्यासंबंधी अमेरिकन तज्ज्ञाचा इषारा

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळाच्या आर्थिक विभागाच्या एका माजी प्रमुखाने शेतीला करावयाच्या पाणीपुरवठ्यासंबंधी इषारा दिला आहे. अमेरिकन रिव्ह्यू ह्या नियतकालिकात त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. चालू वर्षाच्या आरंभी ते भारताच्या दौऱ्यावर आले होते. ते म्हणतात की भारताने शेतीसंबंधी स्वीकारलेल्या नव्या धोरणाने शेतीच्या मालाचे उत्पादन झपाट्याने वाढण्याची शक्यता आहे. परंतु सकस शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी योग्य उपाय योजण्यात आले नाहीत तर ५ वर्षांनंतर प्रगती खुंटण्याचा संभव आहे. भारतात शेतीच्या व्यवसायाची प्रगती दीर्घकालपर्यंत चालू राहणे आवश्यक आहे. ही प्रगती साधण्यासाठी पाणीपुरवठ्यासंबंधी योग्य असे धोरण आखण्यात आले पाहिजे. आज मात्र असे धोरण दिसून येत नाही. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची रूपरेषा प्रसिद्ध करण्यात आली आहे. ह्या रूपरेषेत पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाची निराळी पद्धत स्वीकारण्यात आली आहे. आतापर्यंत पाणीपुरवठ्याचा प्रश्न दुष्काळापासून संरक्षण करण्याशी जोडण्यात येत असे. पण आता तो सकस शेतीच्या विकासाशी निगडित करण्यात आला आहे. हा बदल इष्ट असाच आहे. तथापि, धोरणातील हा बदल अद्याप कार्यक्षम व्यवहारात उतरावयाचा आहे. पाणीपुरवठ्यासंबंधी योग्य असे धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य दीर्घकालीन संशोधनावर अवलंबून आहे. सरकारच्या कोणत्याही एकएकट्या खात्याकडून ते होण्यासारखे नाही. हे कार्य करताना राजकीय कारभारविषयक आणि तांत्रिक प्रश्नांची सोडवणूक करावी लागेल आणि तरीही प्रत्यक्ष फलप्राप्ती दिसू लागण्यास वेळ लागेल. पण केव्हातरी हे काम सुरू करावेच लागेल.

---

### अन्नमहामंडळाचा साठवणुकीचा कार्यक्रम

अन्नमहामंडळाचे अध्यक्ष श्री. के. टी. चंडी ह्यांनी पत्रप्रतिनिधीशी बोलताना अशी माहिती सांगितली की चालू वर्षात महामंडळ ३० लाख टन अन्नधान्याचा साठा करून ठेवण्याचा विचार करीत आहे. ते पुढे म्हणाले की ह्या वर्षी अन्नधान्याचे उत्पादन चांगले होईल अशी अपेक्षा आहे. साधारणपणे ९.५ कोटी अन्नधान्याचे उत्पादन होण्याची शक्यता आहे. परंतु तरीसुद्धा ३० लाखांपेक्षा अधिक अन्नधान्याचा साठा करता येणे अवघड आहे. त्यापेक्षा अधिक साठा करावयाचे ठरविले तर महामंडळापुढे पैशाचा प्रश्न उभा राहील. म्हणून कॉर्पोरेशनच्या सध्याच्या परिस्थितीत ३० लाख टनांपेक्षा अधिक साठा करून ठेवणे जमणार नाही. ३० लाख टन धान्य साठविण्याची व्यवस्था करण्यासाठी ३०० कोटी रुपये खर्च येईल.

---

**Provisions of the Desai Bank Award**—as modified by the Bipartite Settlement 1966 (including those which continue to remain in force) (Rs. 3·00 each)

Available from the compiler

**B. R. Kembhavi**
940/4, Shivaji Nagar,
Poona 16.



## रशियाचा शेती सुधारण्याचा कार्यक्रम

रशियातील शेतीचे उत्पादन अमेरिकेशी तुलना करता मागासलेले आहे. त्याची अनेक कारणे तज्ज्ञ सांगत असतात. आधुनिक शास्त्राच्या सर्व शाखांत रशिया प्रगती करीत असला तरी शेतीच्या व्यवसायात तेथील सामुदायिक अगर सरकारी शेतवाड्यांना विशेष प्रगती करता आलेली नाही. रशियन सरकारने शेती सुधारणेचा कार्यक्रम १९६५ च्या मार्च महिन्यापासून म्हणजे माजी पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह पदच्युत झाल्यानंतर हाती घेतला. रशियातील शेतीकडे कित्येक वर्षे दुर्लक्ष झालेले होते. तेथील सरकारला विशिष्ट आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे एक प्रकारच्या सक्तीच्या औद्योगीकरणाची कास धरावी लागली होती. अर्थव्यवस्थेचा समतोल त्यामुळे बिघडला होता. तो सावरण्यासाठी शेती सुधारणेचा कार्यक्रम आखण्यात आलेला आहे. १९६६ ते ७० ह्या पाच वर्षांत शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री, खते आणि इतर साधने ह्यांत अधिक पैसा गुंतविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याशिवाय उत्पादनातील वाढीला उत्तेजन देण्यासाठी शेतीच्या मालाच्या व गुरांपासून मिळणाऱ्या पदार्थांच्या किमतीही वाढविण्यात आल्या आहेत. काही पदार्थांच्या किमती तर १०० टक्क्यांनी वाढविण्यात आल्या आहेत. शेतीवर राबणाऱ्या लोकांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठीही काही महत्त्वाचे उपाय योजण्यात आले आहेत. शेती मागासलेली असली की शेतकऱ्याचे जीवनही मागासलेले असते. त्यामुळे खेड्यातील लोकांना शहराचे आकर्षण वाटू लागते व ते स्थलांतर करू लागतात. हा अनुभव फक्त विकसनशील देशांतच येतो असे नाही. रशियातील शेतकऱ्यांत व मजुरांतही ही प्रवृत्ती दिसून येते. तिला आळा घालण्यासाठी सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या सामुदायिक शेतीवर काम करणाऱ्यांना निवृत्तिवेतन देण्याची आणि मासिक वेतनाची हमी देण्यात आली आहे.

पाश्चिमात्य देशांतील काही शेतीचे तज्ज्ञ नुकतेच रशियाचा दौरा करून आले. रशियातील प्रमुख शेतीच्या प्रदेशांना त्यांनी भेटी दिल्या. त्यांच्या मताने शेती सुधारण्याचे जे उपाय योजण्यात आले आहेत त्यांची फळे आता दिसू लागली आहेत. शेतकामासाठी लागणारी अवजारे कमी पडल्यामुळे नांगरणी, पेरणी आणि कापणी ह्या कामाला वेळ लागे आणि परिणामी नुकसान होई. आता अवजारे अधिक प्रमाणात पुरविण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांवरील जबाबदारी वाढली आहे. चालू वर्षी शेतीसुधारणेचा अधिकच विस्तार करण्यात आला आहे. ३९० सरकारी मालकीची शेते नफा मिळविण्याच्या पद्धतीवर चालविण्यास देणार आहेत. ही पद्धत कितपत यशस्वी होते ह्याचा अभ्यास करण्यात येणार आहे आणि नंतर इष्ट वाटल्यास सरकारच्या मालकीची इतर १२ हजार शेतेही नव्या नफा-पद्धतीने चालविण्यात येणार आहेत. शेतीसुधारणेची ही तांत्रिक व संघटनात्मक बाजू झाली. ह्या दोन्ही बाजू नीट सांभाळण्यात आल्या तरीसुद्धा हवामानाच्या अनुकूलतेची साथ मिळाल्याशिवाय शेतीसुधारणेचा कार्यक्रम संपूर्णपणे यशस्वी होण्याची शक्यता नाही. ह्या वर्षी रशियातील हवापाण्याचा रागरंग काहीसा अनिश्चित आहे. गेल्या वर्षी बहुतेक सर्व शेतविभागात पाहिजे तसे अनुकूल हवापाणी लाभल्यामुळे रशियातील शेतकऱ्यांना १७ कोटी टन अन्नधान्य पिकविता आले. आतापर्यंतचा हा उच्चांक आहे. परंतु ह्या वर्षी हवामान तितकेसे अनुकूल नाही. पावसाळा उशिरा सुरू झाला, त्यामुळे गव्हाच्या पिकाबाबत अनिश्चितता उत्पन्न झाली आहे. गेल्या वर्षी १० कोटी टन गहू पिकला होता.

---

## श्रीमंत देशांची गरीब देशांना मदत

### "हे निर्भेळ दातृत्व नाही"

"श्रीमंत देश अविकसित देशांना मदत देण्याच्या आवरणाखाली त्यांना लुबाडीत आहेत" असा स्पष्ट आरोप लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे प्रोफेसर आर. एम. टिटमस ह्यांनी एका भाषणात जाहीरपणे केला आहे. त्यांच्या मते, अमेरिकेच्या दातृत्वाची जाहिरात अगदी फोल आहे; त्या देशाला स्वतःला परदेशी मदतीपासून भरपूर नफा मिळत आहे. अविकसित देशांत पेरायचे आणि परत येऊन उत्कृष्ट मनुष्यबळाचे पीक कापून घरी घेऊन जावयाचे, अशा शब्दांत प्रोफेसर महाशयांनी अमेरिकेच्या मदतीचे वर्णन केले आहे. अविकसित देशांच्या मनुष्यबळाची साय अशा रीतीने लुबाडली जात आहे.

१९४९ पासून आतापर्यंत अमेरिकेने परदेशांतील १,००,००० डॉक्टर, शास्त्रज्ञ व इंजिनिअर लोकांना उद्योग दिला आहे. त्यामुळे अमेरिकेची ४०० कोटी डॉलर्सची बचत झाली आहे. इतर देशांनी शिकवून तयार केलेले बुद्धिवान तज्ज्ञ अमेरिकेला आयते मिळतात; तेवढेच तज्ज्ञ अमेरिकेने स्वतः शिकवून तयार करावयाचे म्हटले, तर ४०० कोटी डॉलर्स खर्च आला असता असा हा हिशोब आहे. १९४९ पासून आतापर्यंत अमेरिकेने मदतीच्या स्वरूपात जेवढी रक्कम दिली, तिच्यापेक्षा ही बचत मोठी आहे आणि मदतीपेक्षा झालेला फायदाच जास्त आहे. अमेरिकेतील डॉक्टरांच्या संख्येत जी वाढ झाली, त्यातील एक पंचमांश तरी वाढ इतर देशांत शिकून आलेल्या डॉक्टरांच्यामुळे झाली. म्हणजे, इतर देशांनी अमेरिकेला केलेल्या वैद्यकीय साहाय्याची डॉलर्समधील किंमत अमेरिकेने इतर देशांना दिलेल्या एकूण मदतीपेक्षा जास्त भरते. श्रीमंत देशांनी गरीब देशांना कुटुंबनियोजनाचे आर्थिक फायदे शिकवावेत आणि स्वतः मात्र त्या देशांना संततिप्रतिबंधक आणि मृत्युप्रतिबंधक योजनांसाठी आवश्यक असणारे तज्ज्ञ डॉक्टर पळवून आपल्या देशात न्यावे, ही श्रीमंत देशांची नीतिमत्ता न्यारीच होय, असे प्रोफेसर टिटमस ह्यांनी म्हटले आहे.

### औषधी वनस्पतींच्या निर्यातीने परदेशी चलनाची प्राप्ती

औषधी वनस्पतींचीं संस्कारित स्वरूपात निर्यात करून भारताला दोन वर्षांच्या अवधीत परदेशीय चलनाचा प्रश्न निकालात काढता येईल असा अभिप्राय दक्षिण भारतामधील एका तज्ज्ञाने व्यक्त केला आहे. त्याच्या माहितीप्रमाणे भारतामधून दरसाल ४ हजार प्रकारच्या औषधी वनस्पती निर्यात करण्यात येतात. ह्या वनस्पतींपासून परदेशांतील कारखाने निरनिराळ्या प्रकारचे अर्क काढतात. त्यांची आयात भारताला करावी लागते. ब्रिटनमधील एक औषधी कंपनी केरळमधून हजारो रुपयांच्या औषधी वनस्पती खरेदी करते. दरसाल ४० पोती वनस्पती ब्रिटिश कंपनीला विमानाने पाठविण्यात येतात. त्यासाठी ४० हजार रुपये भाडे द्यावे लागते. औषधी कारखान्याने तयार केलेले अनेक तऱ्हेचे अर्क अमेरिकेत भरमसाठ किमतीला विकण्यात येतात.

---

### एअर इंडिआची अधिक मोठी विमाने

एअर इंडिआ कॉर्पोरेशनने प्रवासी विमानवाहतुकीची अधिक मोठी विमाने घेण्याचा सल्ला भारत सरकारला दिला आहे. कॉर्पोरेशनचे अध्यक्ष मि. जे. आर. डी. टाटा ह्यासंबंधी माहिती देताना म्हणाले की, सरकारने कॉर्पोरेशनचा सल्ला मानल्यास १९७० साली दोन 'जम्बो' विमानांची वाहतूक सुरू करता येईल. ह्या विमानांची किंमत प्रत्येकी २·६ कोटी डॉलर्स अथवा १९ कोटी रुपये आहे. प्रवासाच्या वाहतुकीत दरसाल १४ ते १५ टक्के वाढ होत असून मालवाहतुकीत दरसाल २६ टक्के वाढ होत आहे. त्यामुळे अधिक मोठ्या विमानांची गरज भासू लागली आहे. 'जम्बो' बनावटीच्या विमानात ६५० प्रवासी बसू शकतील.


---

### विमान कंपन्यांविरुद्ध दावा

एअर फ्रान्स, पॅन अमेरिकन वर्ल्ड एअरवेज आणि ट्रॅन्स वर्ल्ड एअरलाइन्स ह्या तीन मोठ्या विमानवाहतूक कंपन्यांविरुद्ध दहा फ्रेंच म्युनिसिपालिट्यांनी माणसांचे आणि मालमत्तेचे नुकसान करण्याबद्दल कोर्टात दावा लावला आहे. विमान निघतेवेळी आणि उतरतेवेळी हे नुकसान विशेष जास्त होते. ऑर्ली ह्या विमानतळाचे जवळ ह्या सर्व म्युनिसिपालिट्या आहेत. विमानांच्या प्रचंड आवाजाबद्दल आणि शाळा, इस्पितळे, सरकारी कचेऱ्या, इत्यादींना साउंडप्रुफ करण्यासाठी येणाऱ्या खर्चाबद्दल ह्या कंपन्यांना जबाबदार धरले पाहिजे, असे ह्या म्युनिसिपालिट्यांचे म्हणणे आहे. शाळेतील मुलांचे वर्गातील लक्ष ह्या विमानांमुळे विचलित होते. विमानाच्या ये–जा वेळी शिक्षकाच्या शिकवण्यात व्यत्यय येतो.

---


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –**
( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )



## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
### मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

**: मुख्य कचेरी :**
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१

**: विभागीय कचेरी :**
महाल नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,९८,३८,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,५२,७१,००० |
| ठेवी | ... रु. | ४८,१९,९५,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,१८,८९,६२,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :
( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :
(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. सु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

## मुलींच्या विवाहाचे वय २० वर्षे

मुलींच्या विवाहाचे वय सध्या १५ वर्षे आहे, ते २० वर्षे करणारे बिल संसदेच्या येत्या अधिवेशनात मांडण्यात येईल. ह्यामुळे जननाचे प्रमाण एक–शष्टमांशाने कमी होईल अशी अपेक्षा आहे. गर्भपाताचे बाबतीत उदार धोरण ठेवणारे बिलही त्याबरोबरच मांडले जाईल.

---

## किमतींच्या निर्देशांकात कमालीची वाढ

घाऊक किमतीचा निर्देशांक पं. नेहरूंच्या निधनाचे वेळी १२७ होता तो आता २१२ झाला आहे. १९५० साली तो १०० होता असे मानले, तर १४ वर्षात त्यात २७ ने वाढ झाली. म्हणजे त्यात दरसाल सुमारे २ पॉइंटसनी वाढ होत होती. पण त्यानंतर तो दरसालच २८ पॉइंट्सनी वाढत आहे.

---

## पब्लिक सेक्टरमध्ये उत्कृष्ट माणसे येत नाहीत; आलेली सोडून जातात.

खासगी उद्योगधंद्यांच्या तुलनेने सरकारी कारखान्यांतील अधिकाऱ्यांचा पगार खूपच कमी असतो. त्यामुळे ह्या कारखान्यांकडे उत्कृष्ट दर्जाची माणसे आकृष्ट करता येणे कठीण जाते; त्याचप्रमाणे असलेल्या तज्ज्ञांना प्रायव्हेट सेक्टरमध्ये जाण्यापासून परावृत्त करणे शक्य होत नाही. 'ब्यूरो ऑफ पब्लिक एंटरप्राइझेस' च्या 'लोक उद्योग' मासिकाच्या ताज्या अंकात ह्या गोष्टीकडे लक्ष वेधण्यात आले आहे. पब्लिक सेक्टरमधील कारखान्यांतील सर्वात जास्त पगार दरमहा ४,००० रुपये असला, तर त्याच पात्रतेचा मनुष्य प्रायव्हेट सेक्टरमध्ये मोठ्या कंपन्यांत दरमहा १०,००० ते २४,००० रुपये पगार मिळवितो.

---

## आताच्या काचा न फुटणाऱ्या; त्यांचे विविध उपयोग

काचेचा सर्वांना माहीत असलेला उपयोग म्हणजे द्रव पदार्थ ठेवण्यासाठी बाटल्या. पण अलीकडच्या शास्त्रीय युगात काचदेखील पोलादाइतकी कठीण, बुचाइतकी हलकी, स्प्रिंगसारखी लवचिक व कापसाप्रमाणे मऊ बनविता येऊ लागली आहे. काच आता करवतीने कापता येते, ड्रिलने तिला भोके पाडता येतात व काचेचा खिळा करून तो लाकडात ठोकता येतो. कॉर्निंग ग्लास कंपनी या अमेरिकेतल्या कंपनीने एक नवीन काच बनवली आहे. ही अलॉय स्टीलइतकी कठीण असते. घरांच्या भिंती, इमारतींच्या तुळया, मोटारीची बॉडी, अशा विविध प्रकारे ह्या काचेचा उपयोग करता येतो. निदर्शकांच्या हल्ल्यापासून बचावासाठी अमेरिकेने आपल्या काही वकीलातींच्या इमारतीदेखील काचेच्या केल्या आहेत. फायबर ग्लासची टायरदेखील बनवतात. ह्या टायर्स दीर्घ काल तर टिकतातच, पण त्याचे पंक्चर होण्याचे प्रमाण नेहमीच्या टायरपेक्षा बरेच कमी आहे.

## दुग्धव्यवसायाला डेन्मार्कची आर्थिक मदत

दुग्धव्यवसायाचे एक विकासकेंद्र उभारण्याच्या योजनेसाठी डेन्मार्कने नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाला १० लाख रुपयांची मदत देऊ केली आहे. बोर्डातर्फे देशात अनेक ठिकाणी दुग्धव्यवसाय केंद्रे स्थापन करण्यात यावयाची आहेत. केंद्रांतून लागणारा तज्ज्ञ नोकरवर्ग प्रशिक्षित करावा लागेल. त्यांना शिक्षण देण्याचे काम वरील मदतीतून करण्यात येणार आहे. ह्यासंबंधीची प्राथमिक बोलणी करण्यासाठी भारत सरकारने दोन डॅनिश तज्ज्ञ अलीकडेच आनंद येथील गौळवाड्याला पाठविले आहेत. बोर्डाने गुजरात राज्यात ४ विकासकेंद्रे स्थापन करण्याचे ठरविले आहे. केंद्रांसाठी १·७ कोटी रुपये खर्च येणार आहे. चारपैकी एक गौळवाडा असून तो सुरत शहरात काढण्यात यावयाचा आहे.

---

## विलासी बोटींचे अखेरचे प्रवास

कुनार्ड स्टीमशिप कंपनीच्या अध्यक्षांनी असे जाहीर केले आहे की 'क्वीन मेरी' आणि 'क्वीन एलिझाबेथ' ह्या दोन्ही प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटी लवकरच बंद करण्यात येणार आहेत. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या दरम्यान खेपा घालणाऱ्या विलासी बोटी म्हणून त्यांची प्रसिद्धी जगभर झाली होती. तीन महिन्यांपूर्वी ह्या बोटी विक्रीस काढण्यात आल्याची घोषणा करण्यात आली होती. त्या वेळी दर्यावर्दी जगात मोठी खळबळ माजली होती. गेल्या काही वर्षांत ह्या बोटींचा प्रवास आतबट्ट्याचा होत होता. त्या चालू ठेवावयाच्या तर दरसाल तीन कोटी रुपयांची हानी सोसावी लागणार आहे. बोटींचा रोजचा खर्चच सुमारे ३ लाख रुपयांचा आहे. तो तर डोईजड आहेच; पण अलीकडे जेट प्रवासी विमानांची स्पर्धा बोटींना जाणवू लागली होती.

---

## पावाच्या भट्ट्यांची यंत्रसामग्री आली

भारत सरकार कोलंबो मदत योजनेला अनुसरून कित्येक मोठ्या शहरांतून पाव भाजण्याच्या मोठ्या भट्ट्या स्थापन करणार आहे. त्यांपैकी काही भट्ट्यांसाठी लागणारी अद्ययावत् यंत्रसामग्री ऑस्ट्रेलियातून भारतात आली आहे. नव्या भट्ट्या मुंबई व मद्रासमध्ये उभारण्यात येणार आहेत. येत्या नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये भट्ट्या सुरू करण्यात येतील असा अंदाज आहे. एका भट्टीत रोज ३५ हजार पाव व दुसऱ्या भट्टीत रोज ७२ हजार पाव भाजण्याची सोय आहे. त्यांचे उत्पादन शाळा, इस्पितळे, वसतिगृहे आणि इतर ग्राहक ह्यांना पुरविण्यात येईल. अशाच प्रकारच्या पावभट्ट्या दिल्ली, कलकत्ता, अहमदाबाद आणि कोचीन ह्या शहरांतून उभारण्यात येणार आहेत. त्यांचे काम १९६८ मध्ये सुरू होईल. पावभट्ट्यांना लागणारा गहू राज्यसरकारकडून पुरविला जाणार नाही. त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

### योगसामर्थ्याचे प्रदर्शन

भारतामधील योगविद्येचा प्रसार पाश्चात्त्य देशांत अलीकडे बराच होऊ लागला आहे. योगसामर्थ्याचा प्रभाव दाखविणारे काही योगी आता युरोपीय देशांतही आढळून येत आहेत. कॅनडा येथे भरलेल्या एक्सपो प्रदर्शनात एका योगी जोडप्याने स्वतःला येशू ख्रिस्ताप्रमाणे क्रूसावर ठोकून घेतले. त्यापैकी पुरुषाचे वय २८ वर्षांचे होते. त्याने एक खिळा आपल्या पायात व एक हातात मारून घेतला होता. त्याच्या पत्नीने दोन्ही हातांत खिळे ठोकून घेतले होते. अशा स्थितीत हे जोडपे सुमारे ३० तासपर्यंत होते. परंतु त्यांना कसलाही अपाय झाला नाही. स्त्रीचे वय २६ वर्षांचे होते.

### तेलशुद्धीच्या कारखान्यांवर परिणाम

आर्थिक व्यवहारात सध्या आलेल्या मंदीचा सार्वजनिक मालकीच्या तेलशुद्धीच्या तीन कारखान्यांवर परिणाम झाला आहे. ह्या कारखान्यांजवळील डिझेल तेलाचा साठा दरमहा ५० हजार टनांनी वाढत चालला आहे. औद्योगिक कारखान्यांतून वापरण्यात येणाऱ्या इंधनाच्या तेलाची मागणी रोडावल्यामुळे हेही तेल साठून राहू लागले आहे. इंधनासाठी लागणाऱ्या तेलाची मागणी दरसाल ८ टक्के वाढेल अशा हिशोबावर तेलकारखान्यांचे उत्पादन करण्यात येत होते. परंतु अलीकडे सर्व प्रकारच्या इंधनाच्या तेलाची मागणी घसरत चालली आहे. ह्याला अपवाद फक्त केरोसीनचा आहे.

### अमेरिकेतील रेल्वे कामगारांचा संप

अमेरिकेतील रेल्वे कामगारांच्या सहा संघांनी एकाएकी संपाचा आदेश दिल्याने रेल्वेची वाहतूक जवळजवळ पूर्णपणे थंडावली. वाहतूक बंद पडल्यामुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था विस्कळित होण्याचा धोका उत्पन्न झाला आणि व्हिएटनाममधील युद्ध प्रयत्नातही अडथळा उत्पन्न झाला. संपामुळे ७ लाख रेल्वे कामगार घरी बसले, हजारो प्रवाशांना वाहतुकीचे इतर मार्ग शोधावे लागले, अन्नपदार्थांच्या वाहतुकीत खंड पडला आणि टपालाचा बटवडा खोळंबला. अमेरिकेच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यांच्या दरम्यानची वाहतूक बंद पडल्यामुळे व्हिएटनाममधील अमेरिकेच्या सैन्याला पाठवावयाच्या दारूगोळ्यावर व अवजड यंत्रसामग्रीवर तावडतोब परिणाम होऊ लागला.

### हिंदी कापडाची ग्रेट ब्रिटनकडील निर्यात कमी झाली

भारत आणि हाँगकाँग ह्यांच्या कापडाची ग्रेट ब्रिटन ही मोठी बाजारपेठ आहे. पण त्यांचा त्या देशांतील खप गेल्या वर्षी ३५ लक्ष पौंडांनी कमी झाला. गेल्या वर्षीच्या पहिल्या सहा महिन्यांत भारताने १ कोटी, १८ लक्ष पौंड किमतीचे कापड निर्गत केले. चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत ती निर्गत १ कोटी, ४ हजार पौंडांवर उतरली आहे; म्हणजे निर्गतीत १८ लक्ष पौंडांची घट झाली आहे.


तुमची जिव्हाळ्याची बँक

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

आपल्या ११६ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध.

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टीसेवा यांच्यासह

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

शं. ल. किर्लोस्कर,
अध्यक्ष.

## पौराणिक कथा शिकविण्याबाबत पेचप्रसंग

कोणत्याही देशाच्या शिक्षणाच्या कार्यक्रमात इतिहासाला स्थान असते. हा इतिहास सामान्यतः त्या त्या देशाचा असावा ह्याबद्दलही वाद असण्याचे कारण नाही. तरीसुद्धा इतिहासात काय असावे ह्यासंबंधी जपानमध्ये पेचप्रसंग उत्पन्न झाला आहे. जपानमध्ये शिक्षकांची मोठी संघटना आहे. जपानमधील शाळात शिकविल्या जाणाऱ्या इतिहासात पौराणिक कथांचा समावेश असावा की नसावा ह्यासंबंधी जपानी सरकार आणि शिक्षकसंघटना ह्यांच्यांत तीव्र मतभेद उत्पन्न झाले आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस जपानवर अमेरिकेचा अंमल बसला. अमेरिकेचे त्या वेळचे प्रतिनिधी जनरल मॅकार्थर ह्यांनी जपानच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून पौराणिक कथांची हकालपट्टी केली. ह्या कथा जपानच्या सम्राटाशी संबंधित आहेत आणि त्यांच्यामुळे जपानी मुलांच्या मनात राष्ट्रवादाच्या अतिरेकी कल्पना घर करतात असे त्यांचे म्हणणे होते. एक जपानी पौराणिक कथा अशी आहे की प्राचीन काळी ईश्वरांश असलेले एक जोडपे होते. ते स्वर्गात वास करीत होते. त्यांनी जपानची निर्मिती केली आणि जपानी लोकांना लाडके लोक म्हणून मानले. जपानच्या शिक्षणमंत्र्याना सल्ला देण्यासाठी एक मंडळ नेमण्यात आलेले आहे. सदर मंडळाने जपानमधील पाठ्यपुस्तके अद्ययावत करण्याच्या दृष्टीने आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींवरून पौराणिक कथांविषयीचे भांडण सुरू झाले. जपानचे शिक्षणखाते सरकारच्या अखत्यारीत असून त्याचे धोरण खात्याला पाळावे लागते.

---

## खाऱ्या पाण्याचे गोडे पाणी बनविण्याचे कारखाने

खाऱ्या पाण्याचे गोडे पाणी बनविण्याच्या प्रयत्नात अलीकडे चांगली प्रगती झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक आणि सामाजिक मंडळाने ह्यासंबंधी एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. अहवालात पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली आहे. गेल्या वर्षी जगात निरनिराळ्या ठिकाणी खाऱ्या पाण्याचे गोडे पाणी बनविणारे १७ कारखाने उभारण्यात आले. त्या सर्वांत मिळून दररोज १·१ कोटी गॅलन गोडे पाणी मिळू शकेल. अशा प्रकारचा सर्वांत मोठा कारखाना कुवेतमध्ये स्थापन करण्यात आला आहे. त्यांत समुद्राच्या पाण्यापासून रोज ५० लाख गॅलन गोडे पाणी बनविण्यात येते. गोडे पाणी बनविण्यासाठी उष्णतेचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करावा लागतो. कुवेतमध्ये नैसर्गिक गॅस विपुलतेने मिळत असल्यामुळे तेथे जळणाचा प्रश्न सुटला आहे. पण, ज्या ठिकाणी जळण स्वस्त मिळत नाही त्या ठिकाणी असा कारखाना उभारणे आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नाही. जगातील लोकसंख्या वाढत चालल्यामुळे गोड्या पाण्याचे दुर्भिक्षही वाढत आहे. तथापि लोकसंख्येची वाढ हेच दुर्भिक्षाचे एकमेव कारण नाही. उद्योगधंद्यांनाही फार मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. त्यामुळे अमेरिकेसारख्या उद्योगप्रधान देशांत पाण्याची टंचाई वाढत चालली आहे. ह्याची थोडीशी कल्पना पोलादाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या पाण्यावरून येईल. तज्ज्ञांनी केलेल्या अंदाजाप्रमाणे १ टन पोलाद निर्माण करण्यासाठी १ लाख गॅलन पाण्याचा वापर करावा लागतो. अणुशक्तीच्या साह्याने स्वस्त वीज निर्माण करता येऊ लागली म्हणजे मात्र गोडे पाणी बनविण्याचे कारखाने काढणे सुलभ होईल.

---

**संततिप्रतिबंधक चिनी गोळी**—संततिप्रतिबंधक उपाय म्हणून काही गोळ्यांचा वापर पाश्चात्त्य देशांत करण्यात येतो. संतती नको असेल तर ह्या गोळ्या स्त्रीला रोज घ्याव्या लागतात. एखाद्या दिवसाचाहि खंड चालत नाही. चिनी शास्त्रज्ञांनी ह्या बाबतीत पाश्चात्त्य शास्त्रज्ञांवर मात केल्याची वार्ता आहे. त्यांनी शोधून काढलेली गोळी एकदाच घेतली की काम भागते असे म्हणतात.

---




## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## १९६५-६६ चा कारभार

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. चा १९६५-६६ चा ५५ वा वार्षिक कारभारविषयक तपशीलवार अहवाल बँकेचे जनरल मॅनेजर, श्री. व्ही. एम्. जोगळेकर ह्यांनी सादर केला आहे. बँकेच्या परंपरेप्रमाणे हा अहवाल माहितीपूर्ण असून कारभाराच्या कार्यक्षमतेची आणि व्यापाची यथार्थ कल्पना देणारा आहे.

सहकारी बँकांना बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट लागू करण्यात आला, ही अहवालाच्या वर्षातील महत्त्वाची घटना आहे. त्यामुळे सहकारी बँका आता रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली गेल्या आहेत. प्राथमिक सहकारी बँकांचे रिझर्व्ह बँकेने कायद्याप्रमाणे करावयाचे तपासणीचे काम राज्य-सहकारी बँकांकडे सोपविता येते. बँकेने ही जबाबदारी पत्करली आहे व अशा तपासणीमुळे त्यांची धोरणे, कार्यपद्धती, परंपरा, ह्या बाबतींत एकसूत्रीपणा आणणे शक्य होईल. त्यामुळे सहकारी बँकांना अधिक ठेवी मिळण्यासही मदत होईल. स्थानिक स्वराज्य संस्था, स्टॅटयुटरी मंडळे, सरकारी कॉर्पोरेशन्स आणि कंपन्या, ह्यांचेकडून ठेवी पत्करण्याच्या बाबतीत सर्व राज्य सहकारी बँका, त्याचप्रमाणे अ किंवा ब वर्गात ओळीने किमान तीन वर्षे असलेल्या जिल्हा सहकारी बँका, ह्या स्टेट बँक ऑफ इंडिया आणि तिच्या संलग्न बँका ह्यांच्याच बरोबरीच्या समजल्या जातील. सहकारी बँकांना ठेवींच्या विमायोजनेत लवकरच प्रवेश मिळेल, अशी अपेक्षा आहे.

१९६५-६६ मध्ये बऱ्याच मुलुखात अवर्षणामुळे पिकांची परिस्थिती असमाधानकारक राहिली. त्यासाठी राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ह्यांनी दरसाल आपल्या नफ्यांतून १५ टक्के रकम आपापल्या क्रेडिट स्टॅबिलायझेशन फंडात वर्ग करावी, असे ठरले. राज्य सरकारने बँकेच्या ह्या फंडास १०० लक्ष रु. दिले. अहवालाचे वर्षी ह्या पद्धतीने तीन जिल्हा सहकारी बँकांना प्रथमच १५२ लक्ष रु. मंजूर करण्यात आले. अन्नाचे बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी राज्य सरकारने अधिक उत्पादन देणाऱ्या जातीच्या पिकांसाठी अन्नधान्याच्या लागवडीचा १९ लक्ष एकरांचा एक कार्यक्रम आखला आणि सहकारी बँकांना ह्या कार्यक्रमासाठी आवश्यक तो पैसा पुरविण्याचे आवाहन केले. बँकांनी केलेली तरतूद फारच कमी प्रमाणात उपयोगात आणली गेली.

अहवालाचे वर्ष जरा ताणाचे गेले. धान्यवसुलीसाठी, स्टेट मार्केटिंग फेडरेशनच्या मागण्यांना अग्रस्थान देण्यात आले. जिल्हा बँका, साखर कारखाने, स्पिनिंग मिल्स, इत्यादींच्या मागण्याही जरा ताण सोसून, रिझर्व्ह बँक आणि स्टेट बँक ह्यांचेकडून पैसा मिळवून, पुरविण्यात आला.

बँकेचे चेअरमन, प्रा. धनंजयराव गाडगीळ हे आता नियोजन मंडळाचे उपाध्यक्षपद स्वीकारीत असल्यामुळे त्यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाचा लाभ बँकेस ह्यापुढे मिळणार नाही. पण त्यांनी आखून दिलेली धोरणे, पायंडे, कार्यक्षमतेचे निकष ह्या सर्वांमुळे बँकेचे उपयुक्त कार्य जोमाने चालू राहील ह्यात शंका नाही.

---

## "दास कापिताल"ची शताब्दी

१६ ऑगस्ट १८६७ रोजी पहाटे २ वाजता कार्ल मार्क्स यांनी 'दास कापिताला' या जर्मन भाषेतील आपल्या महान ग्रंथाची मुद्रिते तपासून पुरी केली आणि त्यानंतर एक महिन्याने तो ग्रंथ छापून तयार झाला व त्याच्या पहिल्या आवृत्तीच्या १ हजार प्रती निघाल्या. या ग्रंथाला शंभर वर्षे पूर्ण झाली असून त्याने आतापर्यंत जागतिक क्रांतिकारक चळवळीच्या विकासात फार महत्वाची भूमिका पार पाडली आहे. कामगारवर्गाचे हे 'बायबल' आतापर्यन्त मोठ्या प्रमाणावर अभ्यासिले गेले आहे व अजूनही अभ्यासिले जात आहे. सर्व राष्ट्रांमधून 'कॅपिटल'च्या शेकडो आवृत्या निघाल्या आहेत. सोविएत युनियनमध्ये तर १८ भाषांतून १६५ आवृत्या निघण्याचे भाग्य या ग्रंथाला लाभले आहे. रशियामध्ये या मूळ जर्मन ग्रंथाची पहिली रशियन भाषांतरित आवृत्ती पीटर्सबर्गमध्ये प्रसिद्ध झाली. जर्मन आवृत्तीनंतर पाच वर्षांनी ही रशियन आवृत्ती निघाली. फ्रेंच आवृत्ती ८ वर्षांनी आणि इंग्रजी आवृत्ती २० वर्षांनी निघाली.

खुद्द रशियाच्या सत्ताधाऱ्यांना 'कॅपिटल' चे महत्त्व कळले नव्हते. त्यांनी ते पुस्तक 'शास्त्रीय' या सदरात प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली. पण ते प्रसिद्ध होताच सर्वत्र वृत्तपत्रांतून त्यावर चर्चा सुरू झाली. लेनिन यांनी लिहिले आहे की, 'कॅपिटल' च्या प्रकाशनाबरोबरच रशियातील भांडवलशाहीच्या भवितव्याचा प्रश्न निर्णित झाला. लेनिन यांना तरुणपणी आपल्या विचारांना योग्य वळण लावण्यास या ग्रंथाचा फार उपयोग झाला. त्यांनी त्याचा सखोल अभ्यास केला. लेनिन यांनी आयुष्यभर कॅपिटलचा प्रचार व प्रसार केला.

---


### इस्राइलला शेतीच्या मालाची मदत

पश्चिम आशिआतील देशांना पुन: आर्थिक मदत देण्याच्या कार्यक्रमातील पहिले पाऊल अमेरिकेने उचललेले दिसते. इस्राइलला २,७१ कोटी डॉलर्स किंमतीचा शेतीचा माल पुरविण्यासाठी अमेरिका त्या देशाशी लवकरच एक करार करणार आहे. अरब देशांशी झालेल्या युद्धामुळे इस्राइलची अर्थव्यवस्था विस्कळित झाली होती. अमेरिका पुरविणार असलेल्या मालात मुख्यत: अन्नधान्य आहे. धान्याची किंमत काही डॉलर्समध्ये व काही इस्राइली पौंडात द्यावयाची आहे. ह्या मदतीमुळे इस्राइलला जवळचे परदेशीय चलन भांडवली मालाची आयात करण्यासाठी वापरता येईल.

# श्री. बाळासाहेब पवार, एम. एल्. ए.

## चेअरमन

## औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., औरंगाबाद



श्री. बाळासाहेब पवार यांचा जन्म ३५ वर्षांपूर्वी शिवछत्रपतींच्या पूर्वजांच्या वेरूळ गावच्या आसमंतातील कन्नड या गावी सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. वयाच्या अठरा-वीस वर्षांपर्यंत कन्नड, औरंगाबाद आणि ग्वाल्हेर येथे हायस्कूलपर्यंतचे शिक्षण घेतले. बालपणापासूनच सार्वजनिक कार्य आणि राजकारणासंबंधी जिज्ञासा आणि आवड असल्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष करून या विशीच्या तरुणाने स्थानिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय स्वरूपाच्या कामात लक्ष घालण्यास सुरुवात केली. याच वेळी तेथील एक ज्येष्ठ नेते कै. रामचंद्र पाटील यांनी काँग्रेसला त्या भागातील खेड्यापाड्यापर्यंत नेऊन पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या सुमारास श्री. पवार यांना राजकारणाच्या धकाधकीच्या जीवनात ओढले.

श्री. पवार यांचा स्वभाव मुळचाच अभ्यासू आणि करारी, लोकसंग्राहक आणि लोकजागृती हा मूळ स्वभावविशेष. या गुणांना त्या वेळच्या पुढाऱ्यांचा सहयोग आणि मार्गदर्शन त्यामुळेच श्री. पवार हे आपोआपच राजकारणात आले व तेव्हापासूनच त्यांनी लोकसेवेचे असाधारण व्रत स्वीकारले. ऐन तारुण्याच्या उमेदीच्या काळात एका शिपायासारखे श्री. पवार यांनी कन्नड भागातील डोंगराळ भागात विकास, शिक्षण, सहकार आणि काँग्रेसचा प्रचार केला. त्यांनी निर्भयपणे स्थानिक प्रश्नांना वाचा फोडून त्याची पूर्तता करून घेतली.

या तरुणाची कन्नड नगरपालिकेचे सदस्य म्हणून निवड झाली आणि श्री. पवार हे पूर्ण वेळ लोकसेवक म्हणून ओळखले जाऊ लागले. आपल्या कारकीर्दीत शिवछत्रपतींचा पुतळा उभारणे वगैरेसारखी कामे तर केलीच, पण कन्नड गावची नवउभारणीची योजना आखली व ती वरपर्यंत नेऊन पोहोचविली. औरंगाबाद जिल्ह्यात विकास गट प्रथम कन्नड येथे सुरू झाला, आणि श्री. पवार यांच्यासारख्या तरुण सेवकामुळे कन्नड तालुक्यातून तीनही निवडणुकींत काँग्रेसचेच उमेदवार निवडून येऊ शकले आहेत. इतकेच नव्हे तर जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत कन्नडचे कार्यकर्ते नेते म्हणून कार्य करीत आहेत.

प्रथम जिल्हा काँग्रेसचे चिटणीस आणि नंतर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून औरंगाबाद जिल्ह्याच्या विस्तृत क्षेत्रात त्यांनी आपल्या नवीन जीवनास प्रारंभ केला. जिल्ह्यातील काँग्रेसचा एकोपा कायम ठेवण्यात फार मोठे यश मिळविले आहे. एका मागून एक मोठमोठ्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या त्यांच्याकडे आल्या. जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून ग्रामीण नेतृत्वाला वाव मिळाला आहे.

स्थानिक स्वरूपाच्या शैक्षणिक चळवळीला त्यांनी उत्तेजन दिले. जिजामाता हायस्कूल, मराठा हायस्कूल, मराठवाडा शिक्षण प्रसार मण्डळ या संस्थामार्फत शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी फार मोठा वाटा उचलला आहे.

प्रथम कै. रामचन्द्र पाटील यांचे सहकारी म्हणून व आता स्वतंत्रपणे एक प्रभावी सहकारी कार्यकर्ता म्हणून ते सुपरिचितच आहेत. राज्य सहकारी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष आणि औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून ते उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य करीत आहेत. याशिवाय ग्रामपंचायती, विकास मंडळे आणि ग्रामीण विभागातहि त्यांचे घनिष्ट संबंध आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण विकासाच्या बाबतीत त्यांचे मार्गदर्शन नेहमीच उपयुक्त ठरलेले आहे. शेती विकास, उत्पादन, दवाखाने आणि शाळांची स्थापना, सडका आणि तलावांच्या योजना पूर्ण करून घेण्याच्या बाबतीत श्री. पवार अग्रेसर आहेत.

मराठवाड्याकडे विशेष लक्ष दिल्याशिवाय महाराष्ट्राच्या बरोबरीस तो येणार नाही आणि त्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे सहकार्य घेऊन १९६४ साली श्री. पवार यांनी औरंगाबाद येथे एक विकास परिषद घेतली होती आणि औद्योगिक विकास, शेती सुधारणा, रस्ते, तलाव, लोहमार्ग, नभोवाणी इत्यादी मराठवाड्याची गाऱ्हाणी त्यांनी वेशीवर टांगली. श्री. पवार हे परिषदेचे स्वागताध्यक्ष होते.

याशिवाय जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे कार्य, स्थानिक संस्था आणि चळवळी यांच्याकडे श्री. पवार यांचे अति निकटचे संबंध आहेत. श्री. पवार हे खऱ्या अर्थानें नव्या आणि जुन्या नेतृत्वाचा दुवा आहे. ते जुन्यांना निराश करीत नाहीत आणि नव्यांच्या उत्साहावर विरजण न घालता उत्तेजन देतात. गटबाजी, जातीय भूमिका, हेवेदावे आणि दुर्गुणापासून अलिप्त असल्यामुळे श्री. पवार लहान-मोठ्यात, शहरी आणि ग्रामीण विभागांत सारखेच प्रिय आहेत. ते व्यापाऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडतील. विद्यार्थ्यांच्या प्रश्नाकडे जितक्या आत्मीयतेने पाहतील तितक्याच पोटतिडकीने लक्ष पुरवतील.

---

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार


## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।


हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



सबल सोडा वाटर यंत्र





घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.


ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष ३३ | पुणे, बुधवार ६ सप्टेंबर, १९६७ | अंक १७




पन्नास वर्षांपूर्वी, राष्ट्रनेते,
साहित्यसम्राट, श्री. न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर
यांनी ४ सप्टेंबर, १९१७ साली या बँकेचे बीजारोपण केले.
कै. तात्यासाहेबांसह कै. ल. ब. भोपटकर, कै. प्रा. वा. गो. काळे
व डॉ. धनंजयराव गाडगीळ
आदी समाजसेवक व अर्थशास्त्रज्ञांनी
आजवर आत्मीयतेने या बँकेचे संगोपन व संवर्धन करून
तिला प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्याने
त्या लहानशा बीजाचे आज एका विशाल वृक्षांत रूपांतर झाले असून
त्याच्या शाखांनी जिल्ह्यांतील सर्व परिसर व्यापला आहे.
इतकेच नव्हे तर ठेवी संचनालयाच्या बाबतीत
जिल्हा सहकारी बँकांत,
भारतांत ती एक अग्रेसर बँक आहे.
सहकारी समृद्ध संघराज्याचे, राष्ट्रनेत्यांचे स्वप्न साकार व्हावे
यासाठी सेवाभावनेने,
सहकाराची ज्योत सदैव सतेज तेवत ठेवण्यासाठी
प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन देतांना आनंद होत आहे.

ना. स. मोहोळ — अध्यक्ष
म. मो. देशमुख — कार्यकारी संचालक

## सहकाराची ज्योत सदैव सतेज तेवो.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणें

# विविध माहिती

**केरळसाठी तांदुळाची आयात**—केरळ राज्यात तांदुळाची तीव्र टंचाई भासत आहे. ती दूर करण्यासाठी भारत सरकार परदेशांकडून ४२ हजार टन तांदुळाची आयात त्वरेने करण्याच्या खटपटीत आहे. हा तांदूळ थायलँड, स्पेन आणि संयुक्त अरब प्रजासत्ताक ह्या देशांकडून आयात करण्यात येणार आहे. येत्या काही आठवड्यांतच तांदूळ भारताच्या बंदरात पोचेल.

**अक्षतांवरील संक्रांत टळली**— विवाह समारंभाचे वेळी वधूवरांवर अक्षता टाकण्यात येतात, त्यासाठी तांदुळाचा उपयोग करण्यास बंदी करण्यात यावी, अशी श्री. ए. डी. मणी ह्यांनी लोकसभेत सूचना केली, ती सरकारने फेटाळून लावली. प्रत्येक विवाहाचे वेळी दोन किलो तांदूळ अशा कारणासाठी लागतो, असे श्री. मणी ह्यांचे म्हणणे होते.

**एअर होस्टेस होण्यास दक्षिण भारतीय मुलींचा अनुत्साह**-- विमानात एअर होस्टेसचे काम करण्यासाठी दक्षिण भारतातील तरुणी पुढे येत नाहीत. देखण्या, सुशिक्षित मुलींना वास्तविक हे काम आकर्षक वाटायला हवे. दरमहा १,००० रुपये पगार मिळून शिवाय जगभर मोफत प्रवासाच्या सवलती त्यांना मिळतात. एअर इंडियामध्ये भारताच्या इतर सर्व विभागांतील एअर होस्टेसेस आहेत; दक्षिण भारतातील मात्र जवळ जवळ नाहीतच.

**शस्त्रक्रिया थोड्या; खर्चच फार**— महाराष्ट्र सरकारच्या कुटुंबनियोजन योजनेत काम करणाऱ्यांपैकी सुमारे १,६०० लोकांना कामावरून कमी करण्यात येणार आहे. कारण, ह्या पगारी लोकांचे हातून समाधानकारक काम झाले नाही. वार्षिक ७० लक्ष रुपयांच्या खर्चाचे मानाने प्रत्यक्ष काम फारच थोडे झाले. संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेसाठी लोकांना प्रवृत्त करून प्रत्येक शस्त्रक्रियेमागे त्याची प्रेरणा देणाऱ्यांना १० रुपये मिळू शकतील; त्यांचे उत्पन्न पगारापेक्षा ज्यास्त होऊ शकेल.

**सुताची सहकारी गिरणी**—श्रीरामपूर-चितळी रस्त्यावर भारतामधील पहिली सुताची सहकारी गिरणी उभारण्यात आली आहे. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी ती उभारण्यात पुढाकार घेतलेला आहे. गिरणीला कोयनेचा वीजपुरवठा करण्याची खास व्यवस्था करण्यात आली आहे. गिरणीसाठी दरसाल ३० हजार क्विंटल कापूस लागेल.

**सीलोनच्या पोलाद कारखान्याचा विस्तार**—सीलोनच्या पोलाद कारखान्याचा विस्तार करण्याचा विचार सरकारतर्फे चालू आहे. विस्ताराच्या योजनेसाठी १·५ कोटी रुपये लागणार आहेत. विस्ताराचे काम पार पाडण्यासाठी सीलोनच्या सरकारने भारताकडे सहकार्याची मागणी केली आहे. त्यासंबंधीच्या वाटाघाटी चालू आहेत.

**'इंडिया टाइम्स'चे प्रकाशन**—उत्तर अमेरिकेतील हिंदी लोकांनी 'इंडिया टाइम्स' ह्या नावाचे एक पाक्षिक प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला आहे. त्याचा पहिला अंक २० जुलै १९६७ रोजी प्रसिद्ध झाला. पाक्षिक कॅनडामधील टोरँटो येथे काढण्यात आले आहे. भारतामधील घडामोडींची व अमेरिकेतील हिंदी लोकांच्या हालचालींची माहिती देणे हा पाक्षिकाचा मुख्य उद्देश आहे.

**युगोस्लाव्हिआकडून बोटींची खरेदी**—भारत युगोस्लाव्हिआकडून ५ मालवाहू बोटी खरेदी करणार आहे. भारतामधील लोखंडाचे खनिज स्वतःच्या बोटींतून परदेशी पाठविता यावे म्हणून हा सौदा करण्यात येत आहे. भांडवली मालाची आयात करता यावी म्हणून भारताने युगोस्लाव्हिआशी पतीवर आयात करण्याचा करार केलेला आहे.

**हिंदी बोलपटांची उसनवारी**—लाहोर येथील 'पाकिस्तान टाइम्स' ह्या वृत्तपत्राने पाकिस्तानमधील चित्रनिर्मात्यांवर कडक टीका केली आहे. पाकिस्तानात तयार झालेले चित्रपट पश्चिम आशियात अगर आफ्रिकेत यशस्वी होत नाहीत. कारण, पाकिस्तानी चित्रपटात हिंदी चित्रपटांतून भरपूर उसनवारी केलेली असते. हे हिंदी चित्रपट आधीच दाखविले गेलेले असल्याने पाकिस्तानी चित्रपट साहजिकच सपशेल पडतात.

**जर्मन रेल्वे मार्गांची स्पर्धा**—पश्चिम जर्मनीमध्ये रेल्वेगाड्या, बसगाड्या आणि विमाने ह्यांच्यात अधिकाधिक प्रवासी मिळविण्यासाठी जोराची स्पर्धा चालू आहे. रेल्वेचे व्यवस्थापक दर तासाला २०० मैल प्रवास करणाऱ्या आगगाड्या चालू करण्याच्या खटपटीत आहेत. अशा गाड्यांसाठी लागणाऱ्या एंजिनाचा नमुना तयार करण्यात आला आहे.

**खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी**—कॅलिफोर्निआतील सॅन डिगो ह्या ठिकाणी समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी बनविणारी नवीन प्रकारची यंत्रसामग्री बसविण्यात आली आहे. तिच्या साह्याने गोडे पाणी बनविण्याच्या प्रक्रियेच्या खर्चात बरीच बचत करणे शक्य होणार आहे. दररोज १० लाख गॅलन गोडे पाणी ही यंत्रसामग्री तयार करू शकते.

**जागतिक बँकेने दिलेली कर्जे**—जागतिक बँकेच्या व्यवहाराचे ३० जून, १९६७ अखेरचे पत्रक प्रसिद्ध झाले आहे. त्यावरून असे दिसते की, १९६६-६७ सालात बँकेने ८७·७ कोटी डॉलर्सची कर्जे दिली आणि आपल्या भांडवलात ४२·३ कोटी डॉलर्सची भर घातली. ह्याच अवधीत बँकेने ३५ अविकसित देशांना कर्जे दिली.

**दोनच विमानांची खरेदी**— एअर इंडिया कॉर्पोरेशनने नव्या प्रकारची दोन जंबो विमाने खरेदी करण्याचे ठरविले आहे. प्रथम अशा प्रकारची ४ विमाने घेण्यात यावयाची होती. परंतु परदेशीय चलनाचा तुटवडा आडवा आला. १९७१ मध्ये मिळू शकणाऱ्या ह्या दोन विमानांची किंमत ४८·२ कोटी रुपये आहे.

# ★ अर्थ ★

बुधवार, ६ सप्टेंबर, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ' बंद 'चे गंभीर आर्थिक परिणाम

गेल्या महिन्यात पश्चिम बंगालमध्ये एक दिवसाचा हरताळ पाळण्यात आला. ह्या हरताळामुळे झालेल्या नुकसानीची कल्पना पुढे दिलेल्या आकडेवार माहितीवरून येईल. पश्चिम बंगालमधील वार्षिक औद्योगिक उत्पादनाची किंमत १३०० कोटी रुपयांच्या जवळपास आहे. ह्या हिशेबाप्रमाणे एका दिवसाच्या औद्योगिक उत्पादनाची किंमत ५ कोटी रुपये होते. हरताळामुळे इतके उत्पन्न बुडाले. राज्यातील नोंद केल्या गेलेल्या कारखान्यांची संख्या ५ हजार आहे. त्या सर्वांत मिळून ९१५ कोटी रुपयांचे भांडवल गुंतलेले आहे. कामगार संघटनांतून संघटित झालेल्या कामगारांची संख्या ८ लाखांच्या घरात आहे. त्यांना पगार व वेतनापोटी दरसाल १७२ कोटी रुपये द्यावे लागतात. हे कामगार जर एक दिवस घरी बसले तर त्यांचे ५० लाख रुपयांचे नुकसान होते. औद्योगिक उत्पादनात एका दिवसाचा जरी खंड पडला तरी किती जबर नुकसान होते ते तागाच्या उद्योगधंद्यावरून लक्षात येते. तागाच्या गिरण्यांची चक्रे एक दिवस थंडावली तर ३,८०० टन माल कमी तयार होतो. तागाच्या पदार्थांच्या निर्यातीने भारताला अत्यावश्यक परदेशीय हुंडणावळ मिळत असते हे ध्यानात घेतले म्हणजे ' बंद 'मुळे झालेल्या नुकसानीचे गांभीर्य स्पष्ट होते. निर्यातीसाठी ३,८०० टन तागाचा माल कमी उपलब्ध झाल्यास ६५ लाख रुपयांचे परदेशीय चलन बुडते. रासायनिक कारखान्यांतील एका दिवसाचे उत्पादन न झाल्यामुळे ७५ लाख रुपयांची खोट लागते. उद्योगधंद्यांप्रमाणेच रेल्वेच्या उत्पन्नावरही वाईट परिणाम झाला. रेल्वे वाहतुकीत व्यत्यय आल्यामुळे अनेक प्रकारांनी नुकसान होत असते.

प्रवाशांच्या व मालाच्या वाहतुकीने होणारे उत्पन्न तर बुडतेच पण अनेक रेल्वे नोकरांना इच्छा असूनही कामावर जाता येत नाही. तथापि त्यांचे वेतन द्यावेच लागते. कामावर असलेल्या नोकरांना घरी जाता येत नाही; म्हणून त्यांना जादा मुशाहिरा द्यावा लागतो. नाशवंत माल अडून राहिल्यामुळे निकामी होतो. त्याबद्दल नुकसानभरपाई द्यावी लागते. पश्चिम बंगालमधील रेल्वे वाहतूक एक दिवस बंद पडल्यामुळे सुमारे १ कोटी रुपयांची हानी झाली. कलकत्त्यामधील हावडा आणि सिआलढा ह्या स्टेशनांवरून रोज ४७९ उपनगरी गाड्या आणि ११० मुख्य मार्गावरील गाड्या जा-ये करीत असतात. गाड्या बंद पडल्यामुळे सुमारे ५ लाख लोकांची वर्दळ थंडावली आणि त्यांच्या दैनंदिन जीवनांत विस्कळितपणा उत्पन्न झाला. मालाच्या वाहतुकीच्या बाबतीतही अशीच कठीण परिस्थिती उद्भवली. कलकत्ता व त्याचा औद्योगिक परिसर ह्या भागांत रोज अंदाजे ५,००० मालवाहू डबे धावत असतात. ह्या आकड्यात बंदरातील मालवाहू डब्यांचाही समावेश आहे. मालाच्या वाहतुकीत अन्नधान्याची वाहतूकही धरलेली आहे. अन्नधान्याच्या वाहतुकीसाठी ७०० मालडब्यांचा रोज उपयोग करण्यात येतो. रेल्वेवरील हरताळामुळे अन्नधान्याची वाहतूक अर्थातच बंद पडली. हरताळाची झळ बंदरापर्यंत पोचलेली होती त्यामुळे बंदरांतील कामगारांचे ३ लाख, २० हजार तास वाया गेले. ह्याचा प्रत्यक्ष परिणाम असा झाला की, ३० हजार टन माल हाताळणे अशक्य झाले. त्यापैकी ६ हजार टन अन्नधान्य होते. वाहतुकीच्या अभावी अडून पडलेले हे धान्य सर्वच बंगालसाठी होते असे नाही. परंतु त्यातील निम्मे तरी धान्य बंगालमधील लोकांसाठीच उपलब्ध होणार होते.

## जागतिक बँकेने कर्जाचा हात आखडता घेतला

गरीब देशांना मदत देण्याच्या बाबतीत जागतिक बँकेने आपला हात आखडता घेण्याचे ठरविलेले दिसते. बँक आपल्या वार्षिक उत्पन्नापैकी अर्धी रक्कम इंटरनॅशनल डेव्हलपमेंट संघटनेला देत असे. ही पद्धत १९६४ सालापासून सुरू करण्यात आली. अशा रीतीने गेल्या तीन वर्षांत २० कोटी डॉलर्सची रक्कम संघटनेकडे कर्ज देण्यासाठी बदला करण्यात आली आहे. परंतु ह्या वर्षी सवलतीच्या दराने कर्जे देण्यासाठी बँकेकडून अवघी १० कोटी डॉलर्सची रक्कम संघटनेच्या हवाली करण्यात येणार आहे. वास्तविक ह्या वर्षी म्हणजे ३० जून १९६४ अखेर संपलेल्या वर्षी बँकेला १७ कोटी डॉलर्स वाटण्यासाठी देता आले असते. बँकेच्या आजवरच्या परिपाठाप्रमाणे ह्यापैकी ८·५ कोटी डॉलर्स रक्कम संघटनेकडे जावयास पाहिजे होती. अविकसित देशांचा विकास साधण्यासाठी सवलतीच्या अटीवर कर्जे देण्यासाठी ह्या रकमेचा उपयोग संघटना करीत आली आहे. अशा कर्जावर व्याज आकारण्यात येत नाही आणि त्यांच्या परतफेडीची मुदत ५० वर्षांची असते. दुर्दैवाने संघटनेकडे जमा होणाऱ्या पैशाचे उगम ह्या वर्षीच नेमके आटले आहेत. येत्या तीन वर्षांसाठी आखावयाच्या कार्यक्रमाबाबत ह्या देशांत मतैक्य होऊ शकले नाही.

## ॲग्रिकल्चरल फायनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना

हिंदी बँकिंग कंपन्यांनी ॲग्रिकल्चरल फायनॅन्स कॉर्पोरेशन नावाची एक नवीन संस्था स्थापन केली आहे. शेतकऱ्यांना अल्प व मध्यम मुदतीची कर्जे पुरविणे हा ह्या संस्थेचा हेतू आहे. संस्थेसंबंधी काढलेल्या पत्रकात पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली आहे. कॉर्पोरेशनचे अधिकृत भांडवल १००कोटी रुपयांचे असेल. त्यापैकी प्रत्येकी १०,००० रुपयांचे एक लाख भाग तूर्त विक्रीस काढण्यात येतील. ह्या भागांवर सध्या प्रत्येकी ५ हजार रुपये प्रारंभी द्यावे लागतील. कॉर्पोरेशनच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटला जशी जरूर भासेल त्याप्रमाणे उरलेल्या ५ हजार रुपयांची मागणी करण्यात येईल. विक्रीला काढलेले भांडवल फक्त शेड्यूल्ड बँकांनाच भरणा करण्याची परवानगी राहील. ३१ डिसेंबर १९६६ रोजी ह्या बँकांच्या भारतात असलेल्या ठेवींच्या प्रमाणात त्यांना भागभांडवलात हिस्सा देण्यात येईल. कॉर्पोरेशनचे उद्देश असे आहेत :—(१) बियाणांच्या उत्पादनासाठी चालविण्यात येणाऱ्या शेती केंद्रांना मध्यम व अल्प मुदतीची कर्जे देणे. (२) शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी मध्यम मुदतीची कर्जे देणे. (३) शेतीच्या उत्पादनाचा, शेतमालावर संस्करण करणाऱ्या उद्योगधंद्यांशी मिलाफ घडवून आणण्यासाठी पैसा उपलब्ध करून देणे. (४) माल साठविण्यासाठी लागणारी गुदामे बांधण्यासाठी पैसा पुरविणे. (५) शेतीच्या मालाच्या वाहतुकीसाठी लागणारा पैसा पुरविणे. (६) शेतीच्या मालापासून माल बनविण्याच्या उद्योगधंद्यांना मदत करणे. (७) त्यांचे आधुनिकीकरण करण्यास साह्य करणे. (८) नियंत्रित बाजारपेठांची उभारणी करणे. (९) अन्नपदार्थांचे उत्पादन करणाऱ्या कोंबड्या पाळण्यासारख्या इतर व्यवसायांना आर्थिक साह्य करणे; शेतीस सहायक उपधंद्यांत डुकरे पाळणे, मासे पकडणे इत्यादींचा समावेश आहे. (१०) खत पुरविणाऱ्या संस्थांसारख्या संघटनांमार्फत अल्प मुदतीची कर्जे देणे. (११) पंपांच्या खरेदीसाठी, लिफ्ट इरिगेशनसाठी, नलिकाकूप खोदण्यासाठी, जमिनीची पातळी सारखी करण्यासाठी, विहिरी खोदण्यासाठी व अशाच स्वरूपाच्या इतर कामांसाठी मध्यम मुदतीची कर्जे देणे. (१२) पिकावरील कीड मारण्यासाठी कर्जे देणे आणि कीडनाशक औषधे तयार करणाऱ्या कंपन्यांना भांडवल पुरविणे. कॉर्पोरेशनची कचेरी मुंबई शहरात ठेवण्यात येणार आहे.

भारतामधील शेतीचे उत्पादन त्वरित वाढविण्याची गरज सर्वमान्य झालेली आहे. तथापि ह्या कामासाठी शेतीचा विकास घडवून आणण्याची तातडीची गरज आहे. शेतीच्या विकासासाठी लागणारा पैसा पुरविण्याच्या कामी व्यापारी बँका दाखवावा तितका उत्साह दाखवीत नाहीत, अशी टीका अलीकडे जोराने करण्यात येत होती. ह्या टीकेला उत्तर म्हणून इंडिअन बँक्स असोसिएशनने वरील प्रकारची एखादी संघटना स्थापन करण्याचे ठरविले होते. ह्या निर्णयास अनुसरून कॉर्पोरेशनची उभारणी करण्यात आली आहे. भारत सरकारने तीन वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँकेच्या आधिपत्याखाली ॲग्रिकल्चरल फायनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना केली होती. परंतु ह्या कॉर्पोरेशनने फारशी प्रगती केली नाही असे आढळून आले. शेतीचा विकास करण्याच्या कार्यात सहकारी संघटनाही हातभार लावीत आहेत. परंतु, ह्या संघटनांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते.

---

## उद्योगपतींची जपानला भेट

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष, श्री. एल. एन. जैन ह्यांच्या नेतृत्वाखाली सात उद्योगपतींचे एक शिष्टमंडळ जपानला जाण्यासाठी ११ सप्टेंबर रोजी येथून निघेल. हिंदी-जपानी व्यापाराची वृद्धी आणि त्यात विविधता आणणे, हा त्या भेटीचा उद्देश आहे. शिष्टमंडळात श्री. शंतनुराव किर्लोस्करांचा समावेश आहे.


स्थापना १९४५

टेलिफोन नं. ३५६५०२

# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

७, तात्या घारपुरे पथ, मुंबई–४.

(१) बचत खाते :—व्याजाचा दर : दरसाल दर शे. रु. ४ = ००

(२) खास बचत योजना :—घरी बसून पैसे भरता येतात

(३) कायम ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर

(४) महाराष्ट्र, म्हैसूर आणि गुजरात राज्यांतील प्रमुख शहरांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

**खेळते भांडवल सुमारे १३ लाख रुपये**

अधिक माहितीसाठी अवश्य भेटा :—

बा. य. वेलींकर
असि. मॅनेजर

# पुणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## सुवर्णमहोत्सवाचे निमित्ताने सिंहावलोकन

लेखक : श्री. पं. शं. शेळके

### बँकेची स्थापना

१९२० च्या राष्ट्रीय आंदोलनातील राष्ट्रनेते व साहित्य सम्राट कै. श्री. तात्यासाहेब केळकर यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भांडवल उभारणी केली. पहिल्या महायुद्धाच्या आखिरीचा काळ तो ! मंदीची लाट पसरत होती. इतर ठिकाणची गोष्ट तर राहोच, पण खुद्द पुण्यात २ बँका बंद झाल्या होत्या. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचा बँकिंग व्यवसायावरील विश्वास उतरणीला लागला होता. अशा परिस्थितीतही या बँकेची उभारणी कै. तात्यासाहेब केळकर व त्यांचे सहकारी ४ सप्टेंबर १९१७ रोजी करू शकले. यावरून हे स्पष्ट होत आहे की या नेत्यांच्या नेतृत्वावर, त्यांच्या शुद्ध व निष्कलंक चारित्र्यावर जनतेचा अमाप विश्वास होता. याचे साक्षात प्रतीक म्हणजे ही बँक. संकटे काही एकटी येत नाहीत असे म्हणतात हे काही खोटे नाही. बँक रजिस्टर करण्याकरिता आवश्यक शेअरभांडवल तर जमा होत होते. पण त्याच सुमारास पुण्याला प्लेगच्या साथीने पछाडले व लोक पुणे सोडून जाऊ लागले. परंतु या जनसेवकांच्या दुर्दम्य आशावादाला तोड नव्हती. अशाही परिस्थितीत त्यांनी बँक रजिस्टर करून एका लहानशा जागेत दोन कर्मचाऱ्यांसह या बँकेची स्थापना केली. आज या संस्थेस ५० वर्षे होत आहेत. १९१७ साली या संस्थेचे बीजारोपण झाले. आज या संस्थेचा सुवर्ण महोत्सव साजरा होत आहे. ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

### संगोपन आणि संवर्धन

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या काळात पुण्यांतील मध्यमवर्गीय, सुशिक्षित व प्रतिष्ठित समाजात या बँकेला अत्यंत मानाचे स्थान होते. ही बँक म्हणजे पुणे शहर व जिल्ह्यांतील ग्रामीण समाज यांना सांधणारा दुवाच होता. बँकेच्या प्रारंभापासूनच राजकारणात व सामाजिक जीवनात ज्यांनी आपल्या त्यागांनी व सेवेने जनजीवनात एक आदराचे स्थान प्राप्त केले होते असे दे. भ. तात्यासाहेब केळकर, श्री. आण्णासाहेब भोपटकर, श्री. दा. वि. गोखले, प्रा. वा. गो. काळे, श्री. बापूसाहेब गुप्ते, श्री. धोंडूमामा साठे, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. दा. वा. पोतदार, श्री. रावबहादूर ठुबे व नियोजनमंडळाचे उपाध्यक्ष डॉ. ध. रा. गाडगीळ, आदी महनीय व्यक्तींचे मार्गदर्शन सौभाग्याने लाभले व आजवर आत्मियतेने त्यांनी या बँकेचे संगोपन व संवर्धन करून तिला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. म्हणूनच त्या लहानशा बीजाचे आज एका विशाल वृक्षात रूपांतर झाले असून त्याच्या शाखांनी जिल्ह्याचा सर्व परिसर व्यापला आहे. इतकेच नव्हे तर ठेवी संचनालयाचे बाबतीत, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ही भारतातील अग्रेसर म्हणून लौकिकास प्राप्त झाली आहे.

### लहान ग्रामीण घटकांना मानाचे स्थान

या जिल्ह्याचा परिसर १५५० गावांचा असून भिमा, मुळा-मुठा, इंद्रायणी व घोड या जगवाहिन्यांनी पोसलेला आहे. एका बाजूला सह्याद्रीची अभेद्य भिंत असल्याने १८ इंचांपासून १७० इंचांपर्यन्त पावसाची विविध दर्शने आढळून येतात. त्यामुळे जिल्ह्यांतील आर्थिक परिस्थितीत तफावत आढळून येते. असे असले तरी या जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांची हिंमत हिमालया-सारखी असल्याने अमर्यादित उत्साहाने त्यांनी सहकाराची कास धरून या जिल्ह्याचा विकास करण्याची प्रतिज्ञा केली आहे. माननीयांचे धुरीणत्व वा आशीर्वाद आरंभासच लाभले असल्याने त्यांचा उत्साह द्विगुणीत होणे स्वाभाविकच आहे. पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळ समाजातील दुबळ्या घटकांचे सामर्थ्य वाढवून त्याची ऐपत वाढविणे हा सहकारी चळवळीचा जो प्रधान उद्देश आहे, त्याच्या सिद्धीसाठी आज बद्धपरिकर झालेली आढळून येत आहे. अर्थव्यवस्थेतील लहान ग्रामीण घटकांना सहकाराद्वारे मानाचे स्थान मिळाले पाहिजे अशी बँकेचे विद्यमान अध्यक्ष श्री. मामासाहेब मोहोळ, उपाध्यक्ष श्री. अण्णासाहेब मगर व त्यांचे सहकारी श्री. शिवाजीराव काळे, श्री. सा. मा. सातकर, श्री. शंकरराव भेलके, श्री. भुगुटराव काकडे, श्री. बापूसाहेब धुले, श्री. शेळके आदींची निष्ठा असल्याने ते त्या दृष्टीने कार्यप्रवीण असल्याचे जिल्ह्यांतील सहकारी प्रगतीकडे दृष्टिफेक केली असता आपणांस सहज आढळून येईल. पुणे जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रांत स्पर्धा असावी पण तिला शत्रुत्वाची झळ लागू नये अशी या कार्यकर्त्यांची मनोमन भावना आहे. सहकारी चळवळीचा तोंडावळा केवळ सहकारी असून चालणार नाही, तर त्यातील कामाची रीत व नीती ही सहकारी हवी. या दृष्टीनेच दलित व शोषित समाजास सहकारी संघटनेचा अधिकाधिक लाभ मिळावा म्हणून ते कार्यतत्पर आहेत. स्वार्थसाधू सामुदायिक हिताबाबत विचार करण्याची त्यांची दृष्टी ही खरोखरच समाजवादी समाजरचनेचा मूलभूत पाया आहे. एका विशिष्ट ध्येयाने महात्माजींनी स्वराज्य मिळविले. स्वातंत्र्य मिळाले. पण महात्मा गांधी यांना जे स्वातंत्र्य अभिप्रेत होते ते प्रत्यक्षात अवतरण्यासाठी सहकार्याच्या भावनेने, प्रामाणिक-पणाने, निष्ठेने कार्यरत राहून लोकशाही रुजविण्यासाठी सहकारी तत्त्वाचा प्रसार करणे हा आपला धर्म मानून या जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्ते सतत कार्य करतील असा विश्वास वाटतो.

शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीचे परिवर्तन करणारी व देशाची आर्थिक शक्ति वाढवणारी अशी ही सहकारशक्ती आहे. स्वराज्य हे सर्वांच्या सुखासाठी व स्वास्थ्यासाठी आहे. अर्थहीन समाज अर्थपूर्ण होत आहे. तो सहकारी संघटनेनेच !

आज पुणे जिल्ह्यातील प्रत्येक गाव हा सहकारी चळवळीने व्यापलेला आहे. त्यामुळेच जिल्ह्यातील आर्थिक चित्र बदलत आहे. समृद्धीच्या छटा त्यावर उमटू लागल्या आहेत.

### सहकारी चळवळीचे केंद्र

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही या सहकारी चळवळींच्या हालचालीचे एकमेव केन्द्र आहे. आज तिच्या २९ शाखा व ५ पे-ऑफीसेस आहेत. शेतकऱ्याला सत्वर अर्थ साहाय्य लाभावे हे उद्दिष्ट ध्यानात ठेवूनच हा शाखाविस्तार करण्यात आला आहे. ५० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या बँकेची सभासद संख्या आज ४६०८ व्यक्ति सभासद असून १८०२ सहकारी संस्था तिला संलग्न आहेत. या बँकेचे वसूल भाग भांडवल ७६·८९ लक्ष रुपये असून गंगाजळी व अन्य संचितनिधी यांची रक्कम रु. ३५·०४ लक्ष रुपये आहे. या बँकेच्या एकूण ठेवी ७॥ कोटींच्या वर असून भारतातील जिल्हा सहकारी बँकांत हा एक उच्चांक आहे. चालू वर्षात बँकेने २ कोटी ४२ लक्ष रुपयांची कर्जे दिली. जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांना अचूक वेळी अर्थ साहाय्य करून त्यांचे जीवन समृद्ध करण्याचे कार्य ही बँक करीत आहे. या जिल्ह्यात ३ सहकारी साखरकारखाने असून चौथा या बँकेचे उपाध्यक्ष श्री. अण्णासाहेब मगर यांच्या अविरत प्रयत्नाने हवेली तालुक्यात लवकरच आकार घेणार आहे. आज जिल्ह्यात २२ खरेदी-विक्री संघ काम करीत असून त्यांचे भाग-भांडवल २५ लक्ष रुपयांचे आहे. महाराष्ट्राच्या एकाधिकार धान्य खरेदी कार्यक्रमात या संघांनी महनीय कार्य करून महाराष्ट्रात आघाडीवर आहेत. पत आणि वाणिज्य यांचा सुयोग्य सुमेळ या संस्थांच्या कार्यपद्धतीत आढळून येत आहे. विशेषतः पुणे जिल्हा खरेदी-विक्री संघाचे कार्य प्रशंसनीय आहे. याशिवाय या जिल्ह्यात १ भातगिरणी, २ तेल गिरण्या, ३ गूळ व खांडसरी गिरण्या अशा १० प्रक्रिया संस्था आहेत. या जिल्ह्यातील सहकारी ग्राहक भांडारांचे जाळे हे कार्य अनुकरणीय करेल असेच आहे. ग्राहक भांडाराचे कार्य सहकारी संस्थेद्वारे व्हावे ही मूळ कल्पना अर्थशास्त्रज्ञ डॉ. ध. रा. गाडगीळ यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी प्रतिपादून ती त्या वेळी यशस्वी रीत्या अमलांत आणली. त्यामुळेच सहकारी ग्राहक भांडारे यशस्वी कार्य करून जनसेवेद्वारे समाजात विश्वासाचे स्थान प्राप्त करू शकतात हे सिद्ध झाल्याने चिनी आक्रमणाच्या वेळी भारत सरकारने या संघटनांना जोरात चालना दिली. यामुळे आज या जिल्ह्यात ८२ सहकारी ग्राहक संस्थांनी आपला पसारा मांडलेला दिसत असून त्यांची विक्री २ कोटीहून जास्त आहे. जिल्ह्यातील घरबांधणी संस्था, औद्योगिक वसाहती, दूध सोसायटया, मच्छीमारी संस्था, नागरी बँका, आदि सर्व संस्थांना या बँकेच्या सहकार्याने आपापल्या क्षेत्रांत कार्य करण्यास आवश्यक तो वाव मिळत असल्याने त्या प्रगतिपथावर आहेत.

### दमदार नेतृत्व

शेतकऱ्यांना सावकाराच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी सहकारी चळवळीचा उगम झाला पण आज तिचे स्वरूप तेवढ्यासाठीच मर्यादित नाही. किंबहुना कर्ज पुरवठा करणे एवढेच कार्य सहकारी चळवळीचे राहिले नाही. जीवनावश्यक सर्व क्षेत्रांत त्याचप्रमाणे औद्योगिक व उत्पादन क्षेत्रांत सहकाराचे जाळे विणण्यात येत असून समाजपुरुषाचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न होत आहे. सहकारी चळवळीत ग्रामीण भाग अग्रेसर आहे. सहकारी चळवळ वाढते आहे. समृद्धीचे नवीन चित्र दिसत आहे. सहकारी अर्थक्षेत्र वाढल्यास राष्ट्रीय विकास योजनांस नवीन कलाटणी मिळेल. अर्थात यासाठी आवश्यक असलेले दमदार नेतृत्व तिला लाभावयास हवे. ते नेतृत्व श्री. मामासाहेब मोहोळ व त्यांचे जिल्ह्यात विखुरलेले इतर कार्यकर्ते यांच्या स्वरूपात लाभल्याने सहकाराने साधणारे अश्रुहीन आर्थिक परिवर्तन या जिल्ह्यात घडत असल्याचे आढळून येईल. या नेत्यांच्या आकांक्षा व ध्येयधोरणे कार्यान्वित करून खेडोपाडी विखुरलेल्या शोषित व दलित समाजास सहकारी संघटनेचा लाभ होऊन त्याची उन्नती व्हावी म्हणून त्यांची योग्य ती अंमलबजावणी करण्याचे कार्य करण्याची परंपरा सांप्रतचे कार्यकारी व कार्यदक्ष संचालक श्री. म. मो. देशमुख हे योग्य रीतीने करत असल्याने समृद्ध संघराज्याचे स्वप्न या जिल्ह्यात सत्वर साकार होण्यास फारसा अवधी न लागता सर्व समाजास सुखी व संपन्न करून ही बँक 'सत्फलाय सहकारिता' हे तिचे अंगीकृत उद्दिष्ट गाठण्यास यशस्वी होवो, हीच आजच्या सुवर्ण महोत्सवाच्या शुभ प्रसंगी इच्छा.

---

### उत्तर प्रदेशाचे अर्थमंत्री रिझर्व्ह बँकेला फक्त हिंदीमध्येच लिहिणार

"रिझर्व्ह बँकेला माझी हिंदीमध्ये लिहिलेली पत्रे स्वीकारण्यास भाग पाडेन; नाहीतर माझ्या जागेचा मी राजीनामा देईन. २ ऑक्टोबरपासून माझे खाते फक्त हिंदीमधून व्यवहार करील; इतर कोणत्याही भाषेत मी रिझर्व्ह बँकेशी पत्रव्यवहार करणार नाही. फक्त इंग्रजीमधूनच पत्रे पाठवावीत; इंग्रजी पत्राबरोबर त्यांचे हिंदी भाषांतर धाडले, तर इंग्रजी पत्रच अधिकृत मानले जाईल, असे रिझर्व्ह बँकेने कळविले होते. परंतु असे भाषांतर पाठविण्याचा प्रश्नच उपस्थित होणार नाही; कारण मुळांतच हिंदी भाषेत लिहिलेलेच पत्र पाठविले जाईल." असे उत्तरप्रदेशाचे अर्थमंत्री श्री. रामस्वरूप वर्मा ह्यांनी जाहीर केले आहे.

# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

## संक्षिप्त माहिती



अध्यक्ष
**मा. ना. स. तथा मामासाहेब मोहोळ**



प्रमुख कार्यकारी अधिकारी
**श्री. मधुकर मोहिनीराज देशमुख**
बी. एस्सी., एलएल. बी.

कै. न. चिं. केळकर, कै. ल. ब. भोपटकर, प्रा. शं. रा. भागवत, कै. न. वि. गाडगीळ, कै. प्रा. वा. मो. काळे, डॉ. ध. रा. गाडगीळ, इत्यादी मान्यवर व्यक्तींनी या बँकेचा कारभार आस्थेने, आत्मीयतेने केलेला आहे. बँकेने गेल्या ५० वर्षांत केलेल्या प्रगतीचे बोलके आकडे खालीलप्रमाणे आहेत.

( आकडे रुपयांचे )

| अनु. | तपशील | पहिले वर्ष | पंचविसावे वर्ष | सुवर्ण महोत्सवी वर्ष (५० वे) |
|---|---|---|---|---|
| १) | सभासद | १३७ | २,८७४ | ६,१४० |
| २) | वसूल भाग–भांडवल | १०,८०० | ३,९०,७०० | ७६,८८,५५० |
| ३) | एकूण निधी | १०० | ३,४८,६८० | ३५,३९,६२१ |
| ४) | ठेवी | ३९,२०० | ५४,७६,२७३ | ६,४०,०१,२९४ |
| ५) | पीक कर्ज | ४९,५०० | १६,२४,००० | ३,६९,६८,१८८ |
| ६) | खेळते भांडवल | ५०,१०० | ६०,१७,६०० | ८,३२,९३,६९६ |
| ७) | निव्वळ नफा | ३५५ | ३५,००७ | ७,४२,५५६ |
| ८) | शाखा | — | ७ | ३४ |

### रेडिओवरील जाहिरातींचे दर जाहीर झाले

१ नोव्हेंबरपासून ऑल इंडिया रेडिओच्या मुंबई–पुणे–नागपूर केन्द्रांवरून जाहिराती ध्वनिक्षेपित करण्यास प्रारंभ होणार आहे. ३० शब्दांच्या १५ सेकंदांच्या जाहिरातीस रविवारी जास्तीत जास्त लोक ऐकतात त्या वेळी ८० रुपये, मध्यम गर्दीच्या वेळी ५० रुपये आणि इतर वेळी २० रुपये, असा आकार पडेल. इतर दिवशी हाच आकार अनुक्रमे ५० रुपये, २७ रुपये आणि १५ रुपये असा राहील. ३० सेकंदांच्या आणि एक मिनिटाच्या जाहिरातींचे दरही प्रसिद्ध झाले आहेत. शनिवारी दुपारी २–३० ते ३–३० च्या दरम्यान १०% जादा आकार पडेल. कार्यक्रमात खास वेळेसाठी आणि ठराविक जागेसाठी २५% जादा आकार घेतला जाईल. वार्षिक आकाराची बेरीज ४९,९९९ रु. झाली, तर जाहिरातदाराला ०%, त्यापुढील ९९,९९९ रुपयांपर्यंतच्या धंद्याला २% त्यापुढील १,४९,९९९ रुपयांच्या धंद्याला ३% आणि १,५०,००० रुपयांवरील धंद्याला ४% डिस्कौंट मिळेल. ऑल इंडिया रेडिओच्या संबंधित खात्याने मान्यता दिलेल्या जाहिरातदार एजन्सीजना १५% कमिशन मिळेल.

### केरळमधील नव्या जलविद्युतकेंद्राचे उद्घाटन

हिंदी संघराज्यात केरळ हे राज्य सर्वात छोटे आहे. पण त्यामधील लोकसंख्या मात्र दाट आहे. अर्थात तेथील रोजगारीच्या संधीही मर्यादित आहेत. रोजगारीच्या संधी वाढविण्यासाठी उद्योगधंद्यांची वाढ करणे आवश्यक आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी औद्योगिक कारखान्यांना लागणारी शक्ती सुलभतेने उपलब्ध व्हावी लागते. त्या दृष्टीने केरळ राज्यातील साबरीगिरी जलविद्युतकेंद्राची उभारणी अर्थपूर्ण आहे. ह्या केंद्राच्या उभारणीमुळे राज्यातील विजेची निर्मिती एकदम दुप्पट झाली आहे. पूर्वी ती २०० मेगॅवॅटपेक्षाही कमी होती. केरळमध्ये विजेचा पुरवठा हंगामानुसार कमीअधिक होत असतो. आता विजेच्या पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे पुरवठा अधिक नियमितपणे करता येऊ लागेल, आणि नवीन उद्योगधंद्यांची स्थापना करणे सुलभ जाईल. ह्या केंद्रामुळे शेतीला अधिक प्रमाणात पाणीपुरवठा करणे साधणार आहे. विजेचा उपयोग करून ३० हजार अधिक एकरांत भातशेती नव्याने चालू करता येईल. साबरीगिरी जलविद्युतकेंद्राचे एक खास वैशिष्ट्य आहे. भारतामधील सर्वात कमी लांबी असलेल्या दोन नद्यांचा उपयोग ह्या केंद्रासाठी करण्यात आला आहे. केंद्राची सर्व योजना हिंदी एंजिनियरांनीच आखली आणि तिची अंमलबजावणीही त्यांनीच केली. तथापि, ह्या केंद्रासाठी जवळजवळ सर्व भांडवल अमेरिकेने पुरविलेले आहे. त्याशिवाय केंद्रासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी अमेरिकेने १५.१५ कोटी रुपयांचे परदेशी चलनातील कर्ज दिलेले आहे. २१ कोटी रुपये रक्कम पी. एल. ४८० मदतीच्या फंडातून देण्यात आलेली आहे.

---

### तागाच्या गिरण्यांची पीछेहाट : निर्यातीत घट

हिंदमधील तागाच्या गिरण्यांची अलीकडे पीछेहाट होऊ लागली आहे. कच्च्या मालाच्या किंमती आणि पक्क्या मालाच्या किंमती ह्यांच्यात फार मोठी तफावत पडल्यामुळे गिरण्यांना दरमहा १.५ कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत आहे. इंडियन ज्यूट मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री सिंघानिआ ह्यासंबंधी बोलताना म्हणाले की, ह्या परिस्थितीमुळे गिरण्यांचे भांडवल घटत चालले आहे, आणि धंद्याच्या भवितव्याविषयी चिंता वाटू लागली आहे. गेल्या वर्षाच्या अवधीत गिरण्यांना एकसारखा तोटा सोसावा लागला. त्यामुळे त्या चालविणे परवडेनासे झाले. ह्याच कारणासाठी आणखी काही गिरण्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. भारतामधून निर्यात केला जाणारा तागाचा माल जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेत कसा टिकवून धरावा हा खरा प्रश्न आहे. तो सोडविल्याशिवाय तागाच्या धंद्याला ऊर्जितावस्था येणे कठीण आहे. हिंदी मालाला पाकिस्तानमधून निर्यात झालेल्या मालाशी आणि कृत्रिम रीतीने बनविण्यात आलेल्या मालाशी टक्कर द्यावी लागते. तसे पाहिले तर माल सुरक्षितपणे पाठविण्याच्या कामी ताग फार उपयुक्त असून स्वस्तही आहे. परंतु प्रत्यक्ष विक्रीच्या वेळी त्याची किंमत वाढत असल्यामुळे ती महाग पडते. भारताने तागाच्या मालावर जबर निर्यात कर बसविला असल्यामुळे पाकिस्तानच्या मालाशी तो टिकाव धरू शकत नाही. शिवाय अलीकडे तागाच्या मालाची मागणी इतकी कमी झाली आहे की पोत्याच्या बारदानांच्या एकूण उत्पादनापैकी ४० टक्के मालच सध्या निर्यात करण्यात येत आहे. त्यातही ६० टक्के माल रुपयाच्या चलनाच्या देशांना निर्यात करण्यात येतो.

---

### टेलिव्हिजनच्या साहित्याचे उत्पादन

टेलिव्हिजनचे साहित्य तयार करण्यासाठी लागणारे तांत्रिक ज्ञान युगोस्लाव्हिआने भारताला मोफत देण्याची तयारी दाखविली आहे. भारत, युगोस्लाव्हिआ आणि अरब प्रजासत्ताक ह्यांच्या औद्योगिक सहकार्याची देवाणघेवाण करण्याबद्दल बोलणी चालू होती. त्या बोलण्यातून वरील उपक्रम सिद्ध होणार आहे. तिन्ही देशांपैकी फक्त युगोस्लाव्हिआतच टेलिव्हिजनची यंत्रसामग्री तयार करण्यात येते. त्या देशात टेलिव्हिजनची संपूर्ण यंत्रसामग्री तयार होऊ शकते. युगोस्लाव्हिआचे टेलिव्हिजनचे वार्षिक उत्पादन ३ लाख सेटस्चे आहे. अरब प्रजासत्ताक दुसऱ्या देशांकडून आयात केलेल्या सुट्या भागांचा उपयोग करून टेलिव्हिजन सेटस्ची जुळणी करतो. यंत्रसामग्रीच्या भागांचे स्वतंत्र उत्पादन फार करीत नाही.

---

### संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेची सक्ती

तीनपेक्षा जास्त अपत्ये झालेल्या पुरुषांवर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया सक्तीने करण्याचा कायदा करावा, असा भारत सरकारचा विचार आहे. दोन वगळून बाकी सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी त्याला आपला पाठिंबा व्यक्त केला आहे.

### अमेरिकन विधवा स्त्रीने भारतासाठी १० टन तांदूळ जमवून पाठविला

भारतामधील अन्नान्न दशेची वर्णने ऐकून सँटा बारबरा (कॅलिफोर्निया, अमेरिका) येथील मिसेस लुई इव्हॅन्स ह्या विधवा स्त्रीने स्थानिक शेतकऱ्यांकडून तांदळाच्या देणग्या एकटीने मिळवून दहा टन तांदूळ जमा केले. एका शिपिंग कंपनीला त्याची भारताकडे मोफत वहातूक करण्यास प्रवृत्त केले. १६ सप्टेंबर रोजी हा तांदूळ भारतात उतरवून घेतला जाईल, ते समक्ष पाहाण्यासाठी मिसेस इव्हॅन्स ह्या विमानाने येथे येणार आहेत.

---



**श्री. गंगाधर सिद्रामप्पा कुचन**

**चेअरमन, सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक लि.**

जन्मदिनांक १५ नोव्हेंबर, १९३४ रोजी. मूळ घराणे आंध्र प्रांतातील तेलंगण विभागातील. १००–१२५ वर्षांपूर्वी धंद्यानिमित्त लगतच्या महाराष्ट्र राज्यातील सोलापूर येथे पूर्वज आले. तेलगू भाषिक. हातमागाचा धंदा. शिक्षण मॅट्रिक पर्यंत झाले. १९५३ साली मॅट्रिक झाल्यानंतर सामाजिक कार्यात प्रवेश. १९५६ साली पूर्व भागातील एकमेव अशा पद्मशाली शिक्षणसंस्थेच्या जनरल सेक्रेटरीची जबाबदारी स्वीकारली. सतत १० वर्षे त्या पदावर राहून कार्य केले. कारकीर्दीत ३५० मुलांमुलींची कुचन हायस्कूलची प्रगती १,४०० मुलामुलींच्या पर्यंत वाढविली. नारायणराव कुचन प्राथमिक शाळेची स्थापना करून ८०० मुलांच्या शिक्षणाची सोय केली. भूदेवीबाई कटकम बालक मंदिराची स्थापना केली. शिक्षणसंस्थेच्या स्थानावर जंगम मालमत्तेत सुमारे रु. ३ लाखांची भर घालण्यात प्रामुख्याने भाग घेतला. इ. स. १९६१ साली गांधी विणकर कॉलनीच्या सहकारी संस्थेच्या चेअरमनपदाची प्रथम जबाबदारी उचलली. १९६२ साली सोलापूर जिल्हा विणकर सहकारी फेडरेशनचे चेअरमन म्हणून निवड झाली. त्याच वर्षी त्या संस्थेच्या कॅलें-डरिंग-ब्लिचिंग-प्रोसेसिंग प्लँटच्या कामाला सुरुवात केली. सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेचे डायरेक्टर, पश्चिम महाराष्ट्र मध्यवर्ती विणकर सहकारी संस्थेचे डायरेक्टर, वगैरे अनेक सहकारी संस्थांच्यावर निवड झाली. त्या त्या संस्थेच्या कार्यात आपल्यापरीने जबाबदारी उचलली. १९६४ साली सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून निवड झाली; गेल्या तीन वर्षांच्या कारकीर्दीत हातमाग, यंत्रमाग विण-कर संस्था, लेबर कॉंट्रॅक्ट संस्था वगैरेंच्या वाढीमध्ये मोठा भाग घेतला. शिवाय, सोलापूर नागरी औद्यो. सहकारी बँक, यशवंत सहकारी सूतगिरणी, सोलापूर जिल्हा लेबर कॉंट्रॅक्ट सोसायटीज फेडरेशन, सहकारी रुग्णालय, वगैरेसारख्या मध्यवर्ती संस्थांची स्थापना करून त्या कार्यवाहीत आणल्या. एक कोटीच्या सोलापूर सहकारी सूतगिरणीच्या उभारणीची प्रमुख सूत्रे हाती घेऊन दीड वर्षाच्या कालावधीत सूतउत्पादनापर्यंतचे कार्य पूर्ण केले. सध्या त्या गिरणीत तिन्ही पाळ्यांतून तलम सुताचे उत्पादन समाधानकारकपणे चालू आहे.

तीन वर्षांच्या कालावधीत बँकेचे शेअर भांडवल रु. ११·८२ लाखांवरून रु. ३९·१२ लाखांपर्यंत, एकूण खेळते भांडवल रु. ६३·११ लाखांवरून रु. १६५·०६ लाखांपर्यंत, निव्वळ नफा रु. १·३४ लाखांवरून रु. ३·०७ लाखांपर्यंत नेऊन प्रगती साधली. महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्ह्यांमधील औद्योगिक सहकारी संस्थांना भरपूर भांडवलाची उपलब्धता व्हावी व त्यांचा विकास घडावा म्हणून सोलापूर बँकेचे कार्यक्षेत्र पुणे रिजनमधील सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सातारा, अह-मदनगर व मराठवाडा रिजनमधील उस्मानाबाद जिल्हा येथपर्यंत वाढवून तिला 'रिजनल बँकेचा' दर्जा प्राप्त करून देण्याची योजना हाती घेतली आहे. त्यास त्या सर्व जिल्ह्यांतील प्रमुख कार्यकर्त्यांनी हार्दिक व सक्रिय पाठिंबा दर्शविल्याने त्याच्या प्राथमिक अम्मलबजावणीच्या कामास सुरवात केली आहे. महा-राष्ट्र राज्य सहकारी बँकेचे डायरेक्टर असल्याने त्या बँकेच्या वतीने, नागपूर विणकर सहकारी सूतगिरणीच्या डायरेक्टर बोर्डावर गेल्या तीन वर्षांपासून आहेत. त्याच्या उभारणीत विशेष भाग घेत आहेत. सध्या सोलापूर जिल्हा औद्योगिक बँक, यशवंत सहकारी सूतगिरणी, सहकारी रुग्णालय, आणि सोलापूर डिस्ट्रिक्ट लेबर सोसायटीज् को-ऑप. फेडरेशनचे चेअरमन आहेत. तसेच सोलापूर सहकारी सूतगिरणी, सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे डायरेक्टर आणि सोलापूर जिल्हा परिषदेच्या सहकार व बांध-काम समितीचे सदस्य, महाराष्ट्र राज्य हातमाग विणकर संघाचे जनरल सेक्रेटरी, वगैरे अनेक संस्थांवर काम करीत आहेत. या-शिवाय सामाजिक व शैक्षणिक कार्यातदेखील ते हिरीरीने भाग घेत असतात. जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे व श्री. मल्लप्पण्णा पुल्ली, श्री. व्यंकप्पण्णा कोटा, श्री. आमदार रामकृष्णपंत बेत वकील, ह्यांच्या मार्गदर्शनामुळेच हे सर्व कार्य घडून येत असल्याचे ते कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत असतात. शेती व्यवसायाच्या खालोखाल औद्योगिक व्यवसायाकडे सर-कारने लक्ष द्यावे व शेतीच्या विकासाचे कार्य सहकाराच्या माध्यमातून व्हावे याकरिता महाराष्ट्र सरकार व राज्यातील कार्यकर्ते मंडळींनी मनापासून प्रयत्न करावेत; तरच भारताच्या सर्वांगीण विकासाच्या कामी हातभार लावता येईल. महाराष्ट्राचे नव्हे तर भारताचे थोर अर्थशास्त्रज्ञ मा. डॉ. धनंजयराव ऊर्फ नानासाहेब गाडगीळ यांच्या नियोजनमंडळाच्या कार्यक्रमाच्या यशस्वितेकामी झटून एकदिलाने त्यांचे हात बळकट करण्याची अवघड कामगिरी विशेषेकरून महाराष्ट्र राज्यातील सहकारी कार्यकर्त्यांवर येऊन पडली आहे, असे त्यांचे ठाम मत आहे.

### युरोपमधील बुद्धिवंतांना अमेरिकेचे आकर्षण

युरोपच्या सामाजिक बाजारपेठेत सामील झालेल्या देशांतील बुद्धिवंतांना अमेरिकेत मिळणाऱ्या लठ्ठ पगाराचे जबरदस्त आकर्षण वाटत आहे. ह्यासंबंधी प्रसिद्ध करण्यात आलेले आकडे उद्‌बोधक आहेत. १९५६ ते १९६३ ह्या कालांत वरील देशांतून ३४,५७२ इंजिनिअरांनी आणि शास्त्रज्ञांनी अमेरिकेचा आश्रय घेतला. भरगच्च पगाराच्या लालसेने युरोपमधून १५,२४८ तंत्रज्ञांनी अमेरिका गाठली. कॅनडातून ८,५१५, आशिआतून ४,११४ आणि दक्षिण अमेरिकेतून २,८०८ लोकांनी अमेरिकेत नोकऱ्या पत्करल्या. १९६३नंतर ब्रिटनमधून अमेरिकेत जाणाऱ्या बुद्धिवंतांची संख्या अधिकच वाढत चालली आहे. १९६४-६५ सालात ब्रिटनमध्ये शिक्षण घेतलेल्या पदार्थ विज्ञानाच्या शास्त्रज्ञांपैकी ३५ टक्के आणि डॉक्टरांपैकी व जीवशास्त्रज्ञांपैकी ४० टक्के लोकांनी अमेरिकेला प्रयाण केले असावे असा अंदाज आहे.


### पश्चिम जर्मनीकडून एंजिनांची खरेदी

हिंदी रेल्वे मार्गावर वापरण्यासाठी पश्चिम जर्मनीमधील एका कारखान्याकडे ८ डिझेल हैड्रॉलिक रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविण्यात आली आहे. रुंद रुळावर धावणाऱ्या ह्या रेल्वे एंजिनांची अश्वशक्ती २,५०० असून त्यात श्री. सुरी ह्या हिंदी एंजिनिअराने लावलेल्या एका शोधाचा उपयोग करण्यात येणार आहे. पश्चिम जर्मनीत ह्या शोधाचा उपयोग ६५० अश्वशक्तीच्या रेल्वे एंजिनात करण्यात आला आहे. अधिक शक्तीच्या एंजिनात हा शोध आता प्रयोगादाखल वापरण्यात येणार आहे. संकल्पित एंजिने मालवाहू अगर उतारूंच्या गाड्या ओढू शकतील. मालवाहू गाड्यांचा वेग दर तासाला ८० किलोमीटर्स राहू शकेल आणि उतारूंच्या गाड्यांचा वेग दर तासाला १२० किलोमीटर्सपर्यंत राहू शकेल. एंजिने यशस्वी झाल्यास त्यांचे उत्पादन देशातच करण्यात येईल.

### गोव्यामधील लोकप्रिय मद्य 'फेनी'

गोव्यात 'फेनी' ह्या नावाने ओळखले जाणारे देशी मद्य फार लोकप्रिय होऊ लागले आहे. पोर्तुगीज अंमल जारी होता त्या वेळी ह्या दारूच्या उत्पादनाला उत्तेजन देण्यात येत नसे. कारण पोर्तुगालमध्ये तयार झालेल्या दारूच्या विक्रीला सरकारला हुकमी बाजारपेठ मिळवून द्यावयाची होती. गोवा हिंदी संघराज्यात आल्यापासून ह्या दारूचे उत्पादन वाढू लागले. १९६४-६५ सालात दारूवरील अबकारी कराचे उत्पन्न ६ लाख रुपये झाले. १९६५-६६ सालांत ह्या उत्पन्नाचा आकडा एकदम २३ लाखांपर्यंत आला. १९६७-६८ सालात २६ लाख रुपयांचे उत्पन्न होईल असा अंदाज आहे. गोवा मुक्त होण्यापूर्वी 'फेनी'चे गुत्ते फक्त ग्रामीण भागांतच असत. सध्या १८ परवानेदार ह्या दारूचे उत्पादन करीत असतात.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
( विश्रामबाग — सांगली महाराष्ट्र )



द. सा. द. शे. रुपये
७.६२/—
पर्यंत व्याज आपण मिळवू शकता
ठेवींची मुदत मोठी म्हणजे
व्याज मोठे
एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते
इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते.

दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.

मुख्य कचेरी :—सातारा
सत्तावीस शाखा

### इजिप्तला युद्धाची पुनः तयारी करण्यास विलंब लागेल

जून महिन्याच्या प्रारंभी अरब देश आणि इस्राइल ह्यांचे युद्ध होऊन त्यात अवघ्या ५–६ दिवसांत अरब देशांचा पराभव झाला. अरब देशांनी अनेक प्रकारची रशियन बनावटीची शस्त्रास्त्रे गमावली. त्यांची भरपाई करण्यास रशियाने ताबडतोब सुरुवात केली. परंतु केवळ नवी शस्त्रास्त्रे मिळवून इजिप्तला पुन्हा युद्ध करण्याचे सामर्थ्य येणार नाही. शस्त्रास्त्रे मिळाली तरी ती वापरण्याचे शिक्षण घेऊन तरबेज झालेली माणसे एकदम तयार करणे अर्थातच अशक्य आहे. अरब–इस्राईल युद्धात इस्राइलने हजारो कैदी पकडले. त्यांत बरेचसे कैदी वरच्या दर्जाचे लष्करी अधिकारी आणि तंत्रज्ञ आहेत. त्यांची संख्या अजूनही जवळ जवळ ५ हजार तरी आहे. इस्राईलने परत केलेले कैदी लष्करी दृष्ट्या फारसे मोलाचे नाहीत. इस्राइलच्या ताब्यात असलेले कैदी म्हणजे इजिप्तच्या लष्कराचा गाभाच आहे. त्यात प्रत्यक्ष रणांगणावरील हालचाली करणारे सेनापती आहेत, त्याचप्रमाणे रणगाडा दलाचे प्रशिक्षित सैनिक व अधिकारीही आहेत. त्याशिवाय आधुनिक रणसाहित्याची देखभाल करून ते कार्यक्षम ठेवणारे कुशल तंत्रज्ञही आहेत. इजिप्तला इस्राइलशी पुन्हा लढा द्यावयाचा असेल तर अशा माणसांना शिक्षण देऊन तयार करावे लागेल. हे काम सोपे तर नाहीच, पण कालावधीचे आहे. इस्राइलच्या बलसंपन्न लष्कराशी टक्कर देण्यास समर्थ अशी सैनिक संघटना नव्याने उभारण्यासाठी इजिप्तला निदान २ वर्षांचा तरी अवधी लागेल, असा अंदाज आहे. काही अमेरिकन लष्करी निरीक्षकांच्या मताने तर हाही काळ अपुराच आहे. त्याहीपेक्षा अधिक काळ लागण्याची शक्यता आहे.

---

### पाकिस्तानचा पोलादाचा पहिला कारखाना

पाकिस्तानचे अध्यक्ष अयूबखान ह्यांनी पूर्व बंगालमधील चित्तगाव ह्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या पोलादाच्या कारखान्याचे उद्घाटन केले. पाकिस्तानातील हा पहिला पोलादाचा कारखाना आहे. कारखाना जपानमधील कोबे स्टील कंपनीने उभारला असून त्यासाठी ६·६ कोटी डॉलर्स खर्ची पडले आहेत. आणखी २·२ कोटी डॉलर्स खर्च करून त्याचा विस्तार करण्याची योजना तयार ठेवण्यात आली आहे. वस्तूंच्या ऐनजिनसी बदला करण्याची पद्धत स्वीकारून कारखान्यासाठी लागणारे कच्चे लोखंड रशिआ, बल्गेरिआ आणि उत्तर व्हिएटनाम ह्यांच्याकडून मिळविण्यात येणार आहे. त्याशिवाय ऑस्ट्रेलिआ आणि अमेरिका ह्या देशांकडून जुने निकामी लोखंडही आयात करण्यात येणार आहे. कारखान्याची उभारणी कर्णफुली नदीच्या तीरावर २४० एकर जागेवर करण्यात आली आहे. कारखान्यात प्रथम दरसाल १,५०,००० टन पोलाद तयार करण्यात येईल.

---

**Provisions of the Desai Bank Award**—as modified by the Bipartite Settlement 1966 (including those which continue to remain in force) (Rs. 3·00 each)

Available from the compiler

**B. R. Kembhavi**
940/4 Shivaji Nagar,
Poona 16.



### खनिज तेलाच्या अधिक शोधाची गरज

ऑइल इंडिया लि. ह्या कंपनीची ८ वी वार्षिक सभा कंपनीचे अध्यक्ष श्री खंडुभाई देसाई ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. ह्या प्रसंगी बोलताना श्री. देसाई म्हणाले की, खनिज तेलाचे अधिक साठे हुडकून काढण्याची गरज अजूनही कायम आहे. कारण, देशातील खनिज तेलाचा खप वाढत चाललेला आहे. १९७१ च्या सुमारास तेलाची गरज इतक्या प्रमाणात वाढेल की, १·३ कोटी अशुद्ध तेलाचा तुटवडा भासेल. भारतात सध्या जितके अशुद्ध तेल निर्माण करण्यात येते त्याच्या निम्म्यापेक्षा थोडे कमी तेल ऑइल इंडिया कंपनीने गेल्या साली निर्माण केले. १९७१ च्या सुमारास देशातील खनिज तेलाचे उत्पादन १ कोटी टनापर्यंत जाण्याची शक्यता आहे. परंतु त्याच सुमारास तेलाची मागणी २·३ कोटी टनापर्यंत वाढेल. खनिज तेलाच्या उत्पादनाचे काम दीर्घकालीन आहे. तेलाचे साठे शोधून काढून प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करण्यास बराच अवधी लागतो. म्हणून आतापासूनच तेलाचे नवे साठे शोधून काढण्याचे काम हाती घेण्यात आले पाहिजे. ह्या बाबतीत ऑइल इंडिआ कंपनी कार्यशील राहणार आहे. १९६६ ते ६९ ह्या चार वर्षांच्या अवधीत कंपनी तेलाच्या शोधाच्या कामावर ४·१७ कोटी रुपये खर्च करणार आहे. त्याचप्रमाणे नव्या विहिरी खोदण्यासाठी कंपनीने एक पाच वर्षांचा कार्यक्रम आखला आहे. कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी १५ कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात येणार आहे. कंपनीच्या नोकरीतील हिंदी लोकांचे प्रमाण अधिक करण्यात येत आहे. १९६२ साली कंपनीत ६९ परदेशीय नागरिक काम करीत होते. आता त्यांची संख्या अवघी ९१ इतकीच राहिली आहे.

### बँक ऑफ बरोडाचे नवे संचालक

दि बँक ऑफ बरोडा लि.ने आपल्या संचालक मंडळात तीन व्यावसायिक तज्ज्ञांचा समावेश करून नवा पायंडा घातला आहे. (१) श्री. केकुश्र सोराबजी इंजिनिअर, सोराबजी एस. इंजिनिअर अँड कं. ह्या फर्मचे ज्येष्ठ भागीदार; सुप्रसिद्ध चार्टर्ड अकौंटंट. (२) श्री. गणेश बाळकृष्ण नेवाळकर, महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे चेअरमन, आणि महाराष्ट्र मिनरल्स कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर (ह्या दोन्ही संस्था महाराष्ट्र सरकारच्या आहेत.) (३) श्री. व्हर्गेसी कुरिअन, खेडा जिल्हा मिल्क प्रोड्यूसर्स यूनियनचे जनरल मॅनेजर.

### सिगारेटच्या थोटुकाचा मोह टाळा

सिगारेट ओढणारांनी शेवटचे काही झुरके घेण्याचे टाळले तर धूम्रपानामुळे होणाऱ्या कॅन्सरचा संभव बराच कमी होईल, असे न्यूयॉर्क येथील तज्ज्ञांचे मत आहे. सिगारेटवर त्यासाठी तांबड्या किंवा वेगळ्या रंगाच्या रेघा मारण्यात याव्या असे एका तज्ज्ञाने सुचविले आहे.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'
किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.

पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास

या नवीन, आधुनिक
आकर्षक व सर्वकष निवासामध्येंच
कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७७९१
माहिती मागवा
उद्यान प्रासाद
स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्या


उत्पादक—
भिडे अँन्ड सन्स, प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ | पुणे, बुधवार २० सप्टेंबर, १९६७ | अंक १८

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★




पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास

या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्येच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७७९१ | माहिती मागवा | उद्यान प्रासाद स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

### तांदळाचे भरघोस पीक येण्याची शक्यता

महाराष्ट्रातील भंडारा जिल्हा हा भाताच्या पिकासाठी प्रसिद्ध आहे. ह्या जिल्ह्यातील भातशेती ह्या वर्षी चांगली बहरली आहे. चालू वर्षी जिल्ह्यात ठिकठिकाणी व वेळेवर पाऊस पडल्याने तांदळाचे उत्पादन भरघोस येईल अशी अपेक्षा आहे. गेली दोन वर्षे ह्या जिल्ह्यात कमी-जास्ती प्रमाणात अवर्षण पडले होते. भाताची रोपे लावण्याचे काम आता पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी भात लावणीची आधुनिक पद्धत स्वीकारावी आणि रासायनिक खते वापरावी म्हणून करण्यात आलेल्या प्रयत्नांना आतापर्यंत फारसे यश आले नव्हते. परंतु ह्या वर्षी भात पिकविणाऱ्यांनी चांगला साद दिला आहे. भंडारा जिल्हा हा मध्यप्रदेशाच्या सीमेवर असून त्यात १,४०० खेडी आहेत. लोकसंख्या १२ लाख असून त्यांतील ९० टक्के लोक शेतीवर जगतात.

---

### अल्जीरियाला कुशल तंत्रज्ञांची गरज

अल्जीरियाचे आठ जणांचे एक प्रतिनिधिमंडळ चालू महिन्याच्या अखेरीस भारतात येणार आहे. अल्जीरियाचा औद्योगिक विकासाचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी कुशल तंत्रज्ञांची फार गरज आहे. पण त्यांचा तेथे अतिशय तुटवडा आहे. भारत हा प्रश्न सोडविण्यासाठी काय करू शकेल हे जाणून घेण्याचा प्रतिनिधिमंडळाचा प्रयत्न आहे. अल्जीरियाची सध्याची लोकसंख्या १·२० कोटी असून त्यातील १२ लाख तरी बेकार आहेत. देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग नीट करण्यात आला तर ५ कोटी लोकांचा योगक्षेम तेथे चालू शकेल. परंतु ७० टक्के लोक निरक्षर असून त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा गंधही नाही. भारत व अल्जीरिया ह्यांच्यातील व्यापार भरभराटीला येण्यासारखी परिस्थिती आहे.

### गुजरातच्या नव्या राजधानीची उभारणी


अहमदाबादपासून १५ मैलांवर गांधीनगर ही गुजरात राज्याची नवी राजधानी वसविण्यात येणार आहे सध्याच्या किंमती लक्षात घेता नव्या राजधानीच्या उभारणीसाठी सुमारे ४५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज गुजरातच्या सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी व्यक्त केला आहे. राजधानीची बांधणी दोन हप्त्यात पूर्ण करण्यात यावयाची आहे. पैकी पहिल्या हप्त्यात सुमारे २९ कोटी रुपयांचा खर्च करावा लागेल. बांधकामाला लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती वाढत चालल्या असल्यामुळे बांधकाम शक्य तितक्या लवकर पूर्ण करणे अगत्याचे झाले आहे. पूर्वीच्या मुंबई राज्यांतील प्रदेशाची विभागणी करून महाराष्ट्र व गुजरात ही दोन नवी राज्ये करण्यात आल्यावर गुजरातला नव्या राजधानीची गरज भासू लागली. गांधीनगरची रचना दाखविणारे एक प्रदर्शन अहमदाबादमध्ये अलीकडे भरविण्यात आले होते.

**Provisions of the Desai Bank Award—as modified by the Bipartite Settlement 1966 (including those which continue to remain in force) (Rs. 3·00 each)**

Available from the compiler

**B. R. Kembhavi**
940/4 Shivaji Nagar,
Poona 16.

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठी
किर्लोस्कर
डिझेल
एंजिन्स



यांचीच निवड आवश्यक आहे...
कारण, अत्यंत कार्यक्षम व विनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिने, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत.
किर्लोस्कर एंजिने चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सना लागणाऱ्या खर्चाच्या मानाने फारच कमी येतो.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत).

★ अर्थ ★

बुधवार, २० सप्टेंबर, १९६७



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## शेती व उद्योगधंद्यांची सांगड आवश्यक

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. एल. एन्. बिर्ला ह्यांनी एका प्रसंगी बोलताना आर्थिक विकासासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. आर्थिक विकासासंबंधी भरविण्यात आलेल्या एका परिसंवादात ते भाग घेत होते ते म्हणाले की हिंदुस्थानात अजूनही ७० टक्के लोक शेतीच्या व्यवसायात गुंतलेले आहेत. देशाचा आर्थिक विकास समतोल होण्यासाठी शेतीच्या व्यवसायाची उद्योगधंद्यांच्या बरोबरीने प्रगती झाली पाहिजे. शेती पासून उद्योगधंद्यांना कच्चा माल मिळतो आणि देशाच्या निर्यात व्यापारातही शेतीच्या मालाला महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे आर्थिक विकासावर शेतीच्या व्यवसायाचा बरावाईट परिणाम होत असतो. म्हणून शेतीचा व्यवसाय भक्कम पायावर उभारण्यात आला पाहिजे. तसे करण्यात आले नाही तर आर्थिक व्यवहारात अनिश्चितपणा उत्पन्न होईल आणि त्यांना वेडीवाकडी वळणे मिळतील. शेती आणि उद्योगधंदे ह्यांत असलेला निकटचा संबंध अलीकडे जी दीर्घकालीन अनावृष्टी झाली त्यामुळे दिसून आला आहे. अन्नपदार्थांची व बिगर-अन्नपदार्थांची निर्मिती एकदम खूप घटली. त्यामुळे उद्योगधंद्यांवर मंदीची छाया पसरली. ह्या परिस्थितीमुळे एक गोष्ट विशेष स्पष्टपणे दिसून आली ती अशी कीं शेतीचा विकास हा उद्योगधंद्यांपासून अलग राहून होणार नाही. शेतकऱ्यांच्या अनेक प्रकारच्या गरजा भागविण्यासाठी विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांची मदत घेण्यात आली पाहिजे. आर्थिक जीवनावर आलेली मरगळ झटकून टाकण्यासाठी अन्नधान्यांचे विभाग रद्द करण्यात आले पाहिजेत. त्याचप्रमाणे शेतीच्या मोठ्या कंपन्या स्थापन करण्यात आल्या पाहिजेत. तरच शेती जुन्या चाकोरीतून बाहेर पडून नव्या दिशेने वाटचाल करू लागेल.

---

## आर्थिक मंदी अंती हिताची ठरेल

नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संघटनेचे उपसंचालक डॉ. नटराज ह्यांनी बंगलोर येथे बोलताना सध्याच्या आर्थिक मंदीविषयी काहीसे निराळे विचार व्यक्त केले आहेत. बंगलोर स्टॉक एक्सचेंजच्या विद्यमाने भरविण्यात आलेल्या एका सभेत 'चलनवृद्धीतील आर्थिक मंदी' ह्या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले की, सध्या उद्योगधंद्यात मंदी आलेली आहे. पण ही मंदी प्रथमदर्शनी अपकारक वाटली तरी अंती उपकारकच ठरेल. कारण, तीमुळे जे कारखाने आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसतील ते आपोआप बाजूला फेकले जातील. त्याचप्रमाणे, चांगल्या प्रतीचा माल निर्माण केला पाहिजे ह्या भावनेचा कारखानदारांत प्रादुर्भाव होण्यास मदत होईल. परदेशांतील बाजारपेठांत हिंदी मालाला गिऱ्हाइकी मिळविण्यास सध्याची वेळ अगदी योग्य आहे. मालाची निर्यात करण्यास निर्यातदारांना सरकारने अनेक प्रकारांनी उत्तेजन दिले पाहिजे. उत्पादित मालाच्या किंमती परदेशांतील स्पर्धेत टिकण्यासाठी सरकारने आर्थिक मदतही द्यावयास पाहिजे. काही काळ असे उपाय योजण्यात आले तर आर्थिक परिस्थिती स्थिरस्थावर होऊ शकेल. ह्याच वेळी उत्पादनाची किंमत कमी करण्याचे आणि मालाचा दर्जा चांगला राखण्याचेही प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. कामगारांचे वेतन गोठविण्याच्या उपायाचा फारसा उपयोग होणार नाही. कारण, कारखानदारीच्या मालाच्या उत्पादनाच्या खर्चात, कामगारांचे वेतन एवढी एकच बाब नसते. देशांत आर्थिक स्थैर्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी अन्नधान्य आणि सामान्य माणसांना लागणाऱ्या नेहमीच्या वस्तू ह्यांच्या किमती माफक राखल्या पाहिजेत. त्यासाठी आर्थिक मदत देणे हिताचे ठरेल.

---

## पश्चिम जर्मनीत खासगी विमानांच्या वाहतुकीचा प्रसार

पश्चिम जर्मनीतील रस्त्यावर अलीकडे इतकी गर्दी होऊ लागली आहे की ज्यांना त्वरेने प्रवास करण्याची गरज आहे असे लोक विमानप्रवासाकडे मोठ्या प्रमाणात आकृष्ट होत आहेत. रस्त्यावरील गर्दीमुळे नाहक जाणारा वेळ त्यांना फार मोलाचा असतो. विमानप्रवास नियमितपणे करणाऱ्या कंपन्या अर्थातच आहेत. पण, कंपन्यांच्या विमानाने जाणेही अनेकदा गैरसोईचे ठरते. म्हणून आता खाजगी विमाने वापरण्याची वृत्ती वाढत चालली आहे. अशा खाजगी विमानांची नोंदणी जर्मनीत युरोपातील इतर देशांच्या मानाने झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे वापरलेल्या विमानांची विक्री दरसाल करणारी बाजारपेठच निर्माण झाली आहे. ही विक्रीला आलेली विमाने ४–५ वर्षांपेक्षा जुनी नसतात, आणि गंमत अशी की त्यातली ८० टक्के विमाने अमेरिकन बनावटीची असतात. काही लोक केवळ इभ्रतीसाठी खाजगी विमान घेतात. पण, पुष्कळांना त्याची खरोखरच गरज असते.

## बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या मागणीला चोख उत्तर

### इंडियन बँक्स असोसिएशनचे चेअरमन श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी ह्यांची स्पष्टोक्ति

" बँकांच्या राष्ट्रीयीकरणासाठी त्यांचेवर खोटेनाटे आरोप करून निमित्त शोधणे, हाच कित्येकांचा धंदा होऊन बसला आहे. ग्रामीण विकासाच्या बाबतीत स्वतःचे अपयश झाकण्यासाठी बँकांना दूषण दिले जात आहे. शेती आणि लघुउद्योग ह्यांना बँकांनी काही कमी मदत केलेली नाही. स्वतः काहीही न करता, कोणतीही जबाबदारी न पत्करता, सर्व अधिकार मात्र स्वतःकडे घेणे, हाच राष्ट्रीयीकरणाच्या मागणीचा अर्थ आहे. " अशा स्पष्ट शब्दांत इंडियन बँक्स असोसिएशनचे चेअरमन, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी ह्यांनी मुंबईच्या प्रोग्रेसिव्ह ग्रुपच्या सभेत बोलताना बँकांची बाजू समर्थपणे मांडली; राष्ट्रीयीकरण आणि सामाजिक नियंत्रण ह्यांच्या मागणीचा फोलपणा आणि त्यातील धोके हेही निदर्शनास आणले. त्यांच्या भाषणातील महत्त्वाचे उतारे येथे देत आहो :—

मोठ्या बँका केवळ मोठ्या आहेत आणि त्यांच्याजवळ एकूण ठेवींच्या दोन तृतीयांश ठेवी आहेत, म्हणूनच बँकांकडे काहीही दोष नसता, त्यांचेवर वेडीवाकडी टीका केली जात आहे. त्या बँकांनी कर्तृत्व दाखविले आणि देशभर आपल्या शाखा काढल्या; म्हणून त्या मोठ्या झाल्या आहेत. मोठ्या बँकांमुळे लहान बँकांना कोणताच धोका नाही; उलट त्यांनी हिंदी बँकिंग स्थिरस्थावर करून चांगल्या तऱ्हेने चालविण्यात येणाऱ्या लहान बँकांना वाव करून दिला आहे. बँकांचे नफे ठेवींच्या प्रमाणात वाढत नाहीत, असा आक्षेप घेण्यात येतो. असे घडले नसते तर बँकांना नफेबाज म्हणून उलटीकडून दूषण देण्यात आले असते. चलनवाढ आता अशा अवस्थेपर्यंत पोचली आहे, की सर्वच उद्योगधंद्यांचे नफे उतरु लागले आहेत; बँकिंग त्याला अपवाद कसे असू शकणार ? बँकांची नफा- तोटा पत्रके नीट अभ्यासली, तर बँकांच्या कारभाराचा खर्च किती प्रचंड वाढला आहे, ह्याची कल्पना येईल.

बँका शेतकऱ्यांना पुरेसा कर्जपुरवठा करीत नाहीत, असा बँकांच्यावर आक्षेप आहे; उद्योगधंद्यांच्या मानाने शेतकऱ्यांना बँका कर्ज देत नाहीत हे खरे आहे. पण, स्पष्ट सांगावयाचे म्हटले तर, ह्या बँकांनी शेतकऱ्यांना कर्जे देऊ नयेत असेच सरकारचे आजवरचे धोरण होते; सहकारी चळवळीसाठी सरकारने हे क्षेत्र राखीव म्हणूनच ठेवले होते. शेतीमध्ये अनिश्चितता असतानाही बँकांनी त्यासाठी बरेच कार्य केलेले आहे. मळ्यांना त्या कर्ज पुरवठा करतात; काही प्रमाणात धान्याच्या आणि इतर पिकांनाही कर्जे पुरवितात; साखर-कारखाने, कपाशीचे जिनिंग प्रेसेस, ह्यांच्याद्वारे शेतीला मदत करतात. खते, ट्रॅक्टर्स, पंप, जंतुनाशके, इत्यादींच्या उत्पादनाला त्या मदत करतात आणि जमीन गहाणाच्या बँकांच्या डिबेंचसमध्ये पैसे गुंतवितात. शेतीच्या उत्पादनाच्या विक्रीस बँकांचा कर्जपुरवठा, ही तर त्यांची फार मोठी कामगिरी आहे. प्रमुख बँकांच्या मालकीची, त्यांनी चालविलेली, त्यांनी भांडवल पुरवठा केलेली ॲग्रिकल्चरल फिनॅन्स कॉर्पोरेशन लवकरच स्थापन होत आहे.

शेतीचा प्रश्न सरकारला आणि सहकारी बँकिंगला सोडवता आला नाही, म्हणून व्यापारी बँकांना विनाकारण दोष दिला जात आहे. ग्रामीण भागाच्या विकासाच्या सर्वंकष कार्यक्रमाची आजची खरी गरज आहे; केवळ स्वस्त व्याजाच्या दराने आणि सौम्य अटींवर पैसे ओतणे म्हणजे असा कार्यक्रम नव्हे.

मार्च, १९६७ अखेरचे आकडे पाहिले, तर आठ मोठ्या आणि १६ लहान बँका ह्यांनी मिळून अगदी ताज्या व्याख्येच्या लघुउद्योगांना ११४ कोटी रुपयांची कर्जे मंजूर केलेली होती. स्टेट बँकेने ९३ कोटी रुपयांची कर्जे मंजूर केली होती; म्हणजे तिच्या मानाने इतर बँकांची कामगिरी उठूनच दिसते.

" काहीही भरपाई न करता, कोणतीही जबाबदारी न पत्करता केलेले राष्ट्रीयीकरण, " असाच काही राजकारणी लोकांनी आग्रहाने प्रतिपादन केलेल्या सामाजिक नियंत्रणाचा अर्थ होतो. राष्ट्रीयीकरणापेक्षा हे नियंत्रण वाईट होईल, कारण सरकार सर्व अधिकार घेईल पण कोणतीही जबाबदारी मात्र घेणार नाही.

पब्लिक सेक्टरमधील उपक्रमांचे उदाहरण जनतेपुढे आहेच. सरकारने त्यांच्यांत भागभांडवलाच्या रूपाने १,३०० कोटी रुपये गुंतवले असून १,१०० रुपयांची दीर्घ मुदतीची कर्जे दिली आहेत, तरी त्यांनी १९६५-६६ मध्ये फक्त आठ कोटी रुपयांचा नफा दाखविला आहे.

औद्योगिक मक्तेदाऱ्या निर्माण करण्यास किंवा आर्थिक सत्ता केंद्रित करण्यास बँकांची कर्जविषयक धोरणे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्याही, बुद्धिपुरःसर किंवा मुळीच नकळताही जबाबदार नाहीत. बिनहिशेबी पैसा दडविण्यास आणि परदेशी हुंडणावळीवरील निर्बंध चुकविण्यास बँका मदत करतात, हा आरोप सर्वस्वी निराधार आहे. बँका ह्यासंबंधातील कोणत्याही निःपक्षपाती चौकशीस केव्हाही तयार होतील; अशा तऱ्हेचे निंदात्मक आरोप करणाऱ्यांचा हेतु राष्ट्रीयीकरणासाठी निमित्त काढणे, हाच असतो.

---

### पाच पैशांचे ४२ लक्ष रुपये होणार

ब्रिटिश गिआनाचे १८५६ चे एका सेंटचे दुर्मिळ पोस्टाचे तिकीट एका अमेरिकन कोट्याधीशाने १९४० साली ३,१५,००० रुपयांना विकत घेतले आणि न्यूयॉर्कच्या बँकेच्या व्हॉल्टमध्ये ठेवले. त्या तिकिटाचा आता लवकरच लिलाव करण्यात येईल, तेव्हा ते ४२,००,००० रुपयांना विकले जाईल, अशी अपेक्षा आहे. एवढ्या छोट्या वजनाचा, इतका किंमतवान कागदाचा तुकडा जगात दुसरा कुठेही नसेल.

### वैद्यकीय शिक्षणाच्या विस्ताराविषयी इशारा

मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया ह्या संघटनेचे ६७ वे वार्षिक अधिवेशन डॉ. सी. एस. पटेल ह्यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे भरले होते. अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. पटेल ह्यांनी हिंदमधील वैद्यकीय शिक्षणाविषयी आणि त्याच्या संकल्पित विस्ताराविषयी आपले विचार प्रगट केले आहेत. भारत सरकारने देशांतील मेडिकल कॉलिजांची संख्या वाढवून ११० करण्याचे ठरविले आहे. सध्या त्यांची संख्या ९१ आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक कॉलेजात दरसाल प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढविण्यात यावयाची आहे. वैद्यकीय शिक्षणाबाबतच्या सरकारी धोरणाविषयी बोलताना डॉ. पटेल म्हणाले की, वैद्यकीय शिक्षणाच्या सोई अशा वाढविण्यात आल्या तर दरसाल १५ हजार नवे विद्यार्थी वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेश करतील. इतक्या मोठ्या संख्येने शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेल्या डॉक्टर्सचा उपयोग करून घेता येईल किंवा काय ह्याची शंका वाटते. आजच काही राज्य सरकारांची अशी तक्रार आहे की, त्यांना राज्यांतील डॉक्टर्सना नोकरीत घेता येत नाही. वैद्यकीय शिक्षणाच्या विस्ताराच्या योजना अमलात आणण्यापेक्षा शिक्षणाचा कस वाढविणे आणि पदवीनंतरच्या प्रशिक्षणास व संशोधनास अधिक उत्तेजन देणे इष्ट होईल. वैद्यकीय शिक्षणाचा प्रसार करताना लोकसंख्येचे आकडे आणि प्रगत देशांतील वैद्यकीय सोईसवलतींशी तुलना ह्यांचा आधार घेण्यात येतो. पण, प्रत्येक देशातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती वेगळी असते. तिचा विचार करणे आवश्यक असते. भारतात खाजगीरीत्या वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांचे क्षेत्र आकुंचित होत चालले आहे. शिवाय ॲलोपॅथीखेरीज इतर औषधपद्धतींचे व्यावसायिकही आहेतच.

---

### पश्चिम जर्मनीत बचतीची मोहीम

पश्चिम जर्मनीने युद्धोत्तर कालात बरीच वर्षे आर्थिक भरभराटीचा अनुभव घेतला. पण, आता तेथे बचत करण्याची मोहीम सुरू झाली आहे. जर्मनीमधील स्त्रिया ह्या कामी आघाडीवर आहेत. पावाच्या अगर अंड्यांच्या किमतीवर त्या बारीक लक्ष देत आहेत. पश्चिम जर्मनीचे चॅन्सेलरही बचत करण्याच्या मोहिमेत सामील झाले आहेत. ते वॉशिंग्टनला गेले त्यावेळी नेहमीच्या विमान मार्गावर धावणाऱ्या कंपनीच्या विमानाने गेले. त्यांच्या पूर्वीच्या चॅन्सेलरनी प्रवासासाठी खास विमानाचा वापर केला होता. जर्मनीच्या सरकारने लोकांना काटकसरीने राहून बचत करण्याचे आवाहन एकसारखे चालविले आहे. त्याचा परिणाम जर्मन लोकांच्या मनावर खूपच झाला आहे. वास्तविक लोकांचे उत्पन्न आर्थिक भरभराटीच्या कालाइतकेच राहिले आहे.


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

---

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.**

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७१,४२,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६५,९६,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.

श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

### साखरेचा बंद कारखाना पुन्हा चालू होणार


मंड्यामधील म्हैसूर शुगर कंपनी येत्या हंगामात साखर तयार करण्याचे काम पुन्हा चालू करणार आहे. सुमारे दीड वर्षापूर्वी ह्या भागात अवर्षण पडल्यामुळे उसाच्या लागवडीत मोठी घट झाली होती आणि त्यामुळे कारखाना बंद ठेवावा लागला होता. ह्या कंपनीत म्हैसूर राज्य सरकारचे भांडवल नियंत्रण ठेवण्याइतके मोठे आहे. ह्या साखर कारखान्याची गणना भारतामधील पहिल्या १० मोठ्या साखर कारखान्यात करण्यात येते. बंद कारखान्याच्या यंत्रसामग्रीची चाचणी लवकरच घेण्यात येणार आहे. कारखान्यात राज्य सरकारचे ५५ टक्के भांडवल असून ४० लाखांचे कर्जे उभारण्यासाठी राज्य-सरकारने हमी देण्याचे ठरविले आहे. आतापर्यंत कारखान्यात २·३० कोटी रुपयांचे भांडवल गुंतलेले आहे. दरसाल ६ लाख टन ऊस गाळण्यासाठी कारखान्याचा विस्तार करण्यात येत आहे.


### व्हिएटनामचा भारताला पोलादी ठोसा

दक्षिण व्हिएटनामने भारताकडून पोलाद आयात करण्याचे जवळजवळ पूर्णपणे थांबविले आहे. त्यामुळे भारताला ही फायदेशीर परदेशी बाजारपेठ गमवावी लागली आहे. १९६२ च्या मानाने १९६६ साली भारताची ही निर्गत दहा पटीने वाढली होती; अमेरिकेच्या कर्जातून ह्या पोलादाची किंमत दिली जात होती; विकसनशील देशांकडूनच पोलाद आयात केले पाहिजे, अशी अमेरिकेने व्हिएटनामला अट घातली होती. त्यामुळे हिंदी पोलादाला भारी किंमत तेथे मिळू शकत होती. सध्याच्या मंदीच्या परिस्थितीत निर्गतीवर होणारा हा परिणाम फारच दुःसह ठरेल. चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत भारताने ६·५ लक्ष टन पोलाद निर्गत केले; पण आता निर्गतीचा ओघ रोडावला आहे.

### रेल्वेच्या कारभारात करण्यात येणारी बचत

रेल्वेच्या कारभारात काटकसर करून खर्चात बचत करण्याचे अनेक उपाय योजण्यात येत आहेत. उपाय अमलात आणण्यास प्रारंभ झाल्यावर दरसाल सुमारे १५ लाख रुपयांची बचत होईल असा अंदाज करण्यात आला आहे. रेल्वे बोर्डावरील २० राजपत्रित जागा रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ३·१२ लाख रुपयांची बचत होईल. ह्या जागांत ६ जागा जॉइंट डायरेक्टर्सच्या हुद्याच्या आहेत. प्रत्येक जागेचा पगार दरमहा १३ ते १८ शे रुपयांपर्यंत आहे. रेल्वेच्या निरनिराळ्या विभागात मिळून ३२ राजपत्रित जागा रद्द करण्यात आल्या आहेत. ह्यात तीन जागा प्रशासकीय स्वरूपाच्या आहेत. प्रत्येक जागेचा पगार दरमहा १६ शे अगर त्यापेक्षा अधिक आहे. रेल्वेच्या विभागात करण्यात येणाऱ्या अशा बचतीमुळे ४ लाख रुपयांचा खर्च कमी होणार आहे.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
(विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र)

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. बा. काळे, संपादक 'अर्थ'.
किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.



## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन

# श्री. मामासाहेब मोहोळ

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात मुठे नावाचे छोटेसे खेडे आहे. या खेड्यातील दीड खणाच्या झोपडीत दिनांक ५ फेब्रुवारी १९०५ रोजी नामाचा जन्म झाला. गरीब शेतकऱ्याच्या घरात जन्मलेल्या त्या अर्भकाच्या डोक्यावरील पित्याचे छत्र लगेच नाहीसे झाले. दुर्दैवात भर पडली. दारिद्र्य, कर्जबाजारीपणा यामुळे मालकीची पाच सहा भात खाचरे सावकाराच्या घशात गेली, आणि नामाची आई, नामाचे दोन थोरले भाऊ व नामा हे चार जीव, मुंबईतील अफाट जनसागरात असाह्य अवस्थेत जाऊन पडले. लोकांची धुणी धुणे, भांडी घासणे, असली कामे करून तीन मुलग्यांना मोठे करण्याची धडपड नामाची आई करीत होती. हात धुऊन मागे लागलेले दुर्दैव पिच्छा सोडीत नव्हते. महिना पंचवीस पैसे शुल्क देऊन शिकण्याची ऐपत नव्हती. नामाचे वयाच्या ९ व्या वर्षी जेमतेम आठ दहा महिने शाळेत जाणे झाले आणि गरिबीमुळे नामाला शाळेला रामराम ठोकावा लागला.

चार भिंतीत कोंडून घेऊन शिक्षण घेणे नशिबात नव्हते. या विशाल, दुष्ट दुनियेत जे अनुभवजन्य, अधिक उपयुक्त, खरे शिक्षण मिळते ते घेत घेत हा जीवन-प्रवाह पुढे सरकत राहिला.

शील, शरीर व शिर या क्रमाने संवर्धन होत होते. तेरा वर्षांचा असता नामदेवाने पहिली जाहीर कुस्ती जिंकली. तालमीतील मेहनतीला निदान मीठ-भाकरी तरी भरपूर मिळाली पाहिजे. त्याकरिता जास्त पैसा पाहिजे होता. म्हणून दरमहा अकरा रुपयांची ऑफिस बॉयची नोकरी सोडून नामदेव गिरणीत दाखल झाला. त्यामुळे त्याचे मासिक उत्पन्न दुप्पट झाले.

कुस्तीत वाढते यश मिळत गेले. नोकऱ्या बदलत राहिल्या. पण त्याच बरोबर पैशाची आवकही वाढत गेली. बदललेली परिस्थिती व नामाचे झालेले वय त्यामुळे मुलाचा विवाह उरकावा असा आईचा विचार बळावला. विवाह विधिकरिता कर्ज काढलेल्या चारशे रुपयांचा बोजा घेऊन नामदेवाने एकोणिसाव्या वर्षी संसारास सुरुवात केली.

मोठा पैलवान होण्याचे स्वप्न साकार करण्याकरिता संसारी नामदेव झटत होता. संधि मिळताच मुंबई सोडून तो कोल्हापूरला गेला तेथे कीर्ती संपादून तो पुण्यास आला. पुण्यातही त्याच्या कीर्तीत भर पडत राहिली. पण कुस्त्या करून मिळणारा पैसा संसारास पुरत नसे. म्हणून नामदेव कडब्याचा व्यवसाय करू लागला तो फारसा फायदेशीर नाही म्हणून नामदेवाने शनीच्या पाराजवळ पानपट्टीचे व सोडा लेमोनेडचे दुकान काढले.

पोटाचा व्यवसाय संभाळीत असता कुस्ती कीर्ती मिळवून देत होती. मिळवायचे ते मिळविले ही भावना १९३२ साली झाल्यावर कुस्तीच्या आखाड्यातून निघून नामदेव व्यवसायाच्या आखाड्यात पूर्णपणे उतरला. पुढे पानपट्टीचे दुकान विकून 'महाराष्ट्र टुरिंग टॉकीज' ची एक हजार रुपयांची भागिदारी नामदेवाने पत्करली. १७ भागिदारातील तो एक झाला. या धंद्यात जम बसला. हाती पैसा खेळू लागला, वाढू लागला.

१९३२ ते १९३६ ह्या अवधीत नामदेवरावांनी फिरत्या सिनेमाची धुरा हिमतीने व कौशल्याने हाकली. परंतु १९३६ सालीं ही कंपनी फुटली. ह्या काळात नामदेवरावांना जो अमोल अनुभव मिळाला, तोच पुढील सार्वजनिक कार्याचा पाया ठरला.

पैसा मिळू लागल्याबरोबर पाहिली गोष्ट जर नामदेवरावांनी कुठली केली असेल, तर मुठ्याचे आपले घर दुरुस्त करण्याची आणि आईला मुंबईहून गावी आणून ठेवण्याची ! ज्या गावांतून आईला रातोरात बाहेर पडावे लागले होते, त्याच आपल्या गावात मानाने ती परत आली. तिला फार आनंद झाला. पुढे गावांतील वाण्याचे घर विक्रीस निघाले, ते नामदेवरावांनी विकत घेतले, जुनाट घर पाडून छानपैकी दुमजली घर बांधले आणि आईसह ह्या घरात प्रवेश केला. प्रवेश करताच आईला झोपाळयावर बसविले आणि स्वतः झोके दिले. नामदेवरावांची आईवरील नितांत भक्ती पाहून गावकरी देखील गहिंवरले. आईच्या कष्टाचे सार्थक झाले; त्याच समाधानांत तिने इहलोकीची यात्रा संपविली.

कामाची हातोटी, चिकाटी, सचोटी, ज्ञानाची आच, यामुळे जीवनप्रवाह विशाल होत राहिला. सिनेमाधंद्याने पैसा आणला. भोर संस्थानचा कारभार लोकनियुक्त कायदेमंडळामार्फत चालविण्याकरिता १९४० साली झालेल्या निवडणुकीत सिनेमा व्यवसायामुळे वसईकर झालेल्या नामदेवरावांची प्रचंड बहुमताने निवड झाली. आणि नामदेवरावांनी राजकीय जीवनात प्रवेश केला.

नामदेवरावांच्या राजकीय कार्याची माहिती येथे विस्ताराने

देता येणे अशक्य आहे. वसई तालुक्याच्या काँग्रेस कमिटीची सूत्रे त्यांनी हाती घेतली. १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीत ते सामील झाले आणि एक वर्षभर त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. पुढे त्यांनी पुनः सिनेमा धंद्याकडे लक्ष दिले, वसईच्या प्रभात टॉकीजचे ते एकमेव संचालक झाले. पुढे ते त्यांनी विकत घेतले. पुढे त्यांनी १९५४ मध्ये वाईचे थिएटर 'न्यू चित्रा टॉकीज खरेदी केले. फिरत्या सिनेमाबरोबर पोटापाठीमागे भटकत फिरणाऱ्या नामदेवरावांनी कष्टसायास करून, संकटांशी मुकाबला करून, चिकाटीने कष्ट करून, चतुराईने, तीन थिएटरे मालकीची केली.

कुस्ती, क्रीडा, राजकारण, शिक्षण अशा अनेक क्षेत्रांतून अंगी असलेल्या असाधारण गुणांमुळे कीर्ती संपादीत १९६४ च्या सुरवातीस नामदेवराव पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आले. त्यावेळी ते आमदार नामदेवराव सदाशिवराव तथा मामासाहेब मोहोळ झालेले होते. पुणे जिल्ह्यातील काँग्रेसचे मान्यवर पुढारी झालेले होते. बँकेच्या अडचणीच्या काळात मामासाहेबांनी तिला सावरावे असे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. ध. रा. गाडगीळ यांनी सुचविले म्हणून मामासाहेबांनी बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी पत्करली. बँकेतील ऱ्हास थांबवून सुधारणा होत आहे, याच्या श्रेयातील सिंहाचा वाटा मामासाहेबांच्या प्रभावी नेतृत्वाचा आहे.

सुप्रसिद्ध क्रिकेटपटु सदानंद मोहोळ हे नामदेवरावांचे चिरंजीव होत. त्यांनी नामदेवरावांची परंपरा राखली आहे; वाढविली आहे.

शून्यातून नव्हे तर उण्यातून सुरू झालेल्या जीवन प्रवाहास प्रतिकूल परिस्थितीत टाकीचे घाव सोशीत आज आश्चर्यकारक विशालत्व, खोली, संथपण, संपन्नता प्राप्त झालेली आहेत. आणखी लोकोपयोगी कामे मामासाहेबांच्या प्रबल हातून होण्याकरिता परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य देवो.

**स्वस्त मजूर पुरविण्याची तयारी**—कॅनडामधील टोरोंटो शहरातील एका वृत्तपत्रात एका पाकिस्तानी एजन्सीने अशी जाहिरात प्रसिद्ध केली आहे की पाकिस्तान कॅनडामधील कंपन्यांना, उद्योगधंद्यांना, कचेऱ्यांना अगर व्यक्तींना कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कामगार पुरविण्यास तयार आहे. ह्या कामगारांना अल्प वेतन पुरेल, असे मुद्दाम नमूद करण्यात आले आहे. पाकिस्तानात अलीकडेच उघडकीस आलेल्या गुलामांच्या छावण्यांशी ह्या जाहिरातीचा संबंध जोडण्यात येत आहे.

**स्वस्त खाद्यपदार्थांची दुकाने**—पश्चिम बंगाल सरकारने १० जिल्ह्यांत मिळून खाद्यपदार्थांची २१० दुकाने उघडण्याचे ठरविले आहे. ह्या दुकानांतून स्वस्त दराने खाद्यपदार्थ पुरविण्यात येतील. राज्यातील धान्याची टंचाई व चढत्या किंमती ह्यांची तीव्रता कमी करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.


पत्याचा खेळ जेंव्हा निघाला तेंव्हा त्या खेळांत कालमान दर्शनाचीही कल्पना अंतर्भूत होती. त्याचे चार रंग, चार ऋतु (भारताबाहेर बऱ्याच ठिकाणी चार ऋतु मानतात) किंवा चार तिमाह्या दर्शविणारे होते. १३ पानांचा एक रंग अशारितीने प्रत्येक तिमाहीचे १३ आठवडे कल्पिले होते, व एकुण ५२ पत्ते ५२ आठवड्याचे निदर्शक होते. एक्का ते दश्श्यापर्यंत प्रत्येक पत्यावरील ठिपक्याप्रमाणे त्याचे गुणांची बेरीज करून गुलाम ११, राणी १२, व राजा १३ अशी त्यांत बेरीज धरल्यास ५२ आठवड्याचे ३६४ दिवसांचा उलगडा होतो. जोकर (विदूषक) चा पत्ता धरून सर्व बेरीज संपूर्ण वर्षाच्या ३६५ दिवसा इतकी होते. हा खेळ खेळतांना ही कालगणना कायम डोळ्यासमोर रहावी हा त्यांत उद्देश होता.

दि बँक ऑफ महाराष्ट्रशी जेंव्हा तुमचा संबंध येतो तेंव्हा तो वर्षभरासाठीं, चारी तिमाहीसाठीं, ५२ आठवड्यासाठीं आणि ३६५ दिवसांसाठीं यावा असाच आपला उद्देश असावा असे आम्हाला नम्रपणें वाटतें. महाराष्ट्र बँकेत योग्य ते खाते उघडून तुम्ही वर्षभर पैसे वाचवूं शकतां व त्यावर व्याज मिळवूं शकतां, तसेच आमच्या वस्तु-रक्षा-गृहांत तुम्ही मौल्यवान वस्तु ठेवूं शकतां, विदेशीय व्यवहारासाठीं विदेशविनिमय खात्याचा फायदा घेऊं शकतां, किंवा तुमच्या व्यवसायवृद्धीसाठीं अर्थसहाय्य घेऊं शकतां. लहान उद्योगधंदे ऊर्जितावस्थेला आणणे हे तर स्थापनेपासून गेली ३२ वर्षे महाराष्ट्र बँकेचे ध्येय आहे.




तुमच्या कुटुंबाही बँकींग व्यवहारासाठीं आमच्या नजिकच्या शाखेला भेट द्या. तेथे तुमचें सस्मित स्वागत होईल.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

# साखरेचे नवे धोरण व ऊसउत्पादकांना आवाहन

लेखक :-श्री. भाऊसाहेब संतुजी थोरात, अध्यक्ष,
अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अहमदनगर.

साखरधंद्यामध्ये गेले काही दिवस मोठा पेचप्रसंग निर्माण झाला होता. महाराष्ट्रामध्ये तर या पेचप्रसंगाला अधिकच तीव्र स्वरूप प्राप्त झाले होते. केंद्र सरकारने उसाचे व साखरेचे जे भाव ठरवून दिले होते, ते इतर राज्यांच्या मानाने फारच कमी असल्यामुळे त्याचा अनिष्ट परिणाम ऊसउत्पादन आणि साखरउत्पादन या दोन्हींवर होऊ लागला. ऊसपिकासाठी आवश्यक असणारी खते, तेले, औषधे व मजुरी आदींच्या किमती महागाईमुळे बऱ्याच वाढल्याने पूर्वीपेक्षा ऊसउत्पादनाचा एकरी खर्च वाढला आणि उत्पादक शेतकऱ्यांना एकरी खर्चाच्या मानाने उसाची किंमत फारच अपुरी येऊ लागल्याने शेतकरी या पिकामध्ये तोट्यात येऊ लागला. त्याचा परिणाम ऊसउत्पादनावर होऊन उसाखालील क्षेत्र हळू हळू कमी होऊ लागले. अपुऱ्या होणाऱ्या ऊसउत्पादनामुळे काही साखरकारखाने बंद पडतात की काय, अशी अवस्था निर्माण झाली होती. १९६५-६६ सालात साखरेचे उत्पादन ३५ लाख टनांचे घरात होते, पण त्यानंतर सन १९६६-६७ मध्ये मात्र साखरउत्पादनामध्ये घट येऊ लागली आणि उत्पादन २२ लाख टनांवर आले. साखर भावासंबंधीची ही परिस्थिती जर पुढे अशीच चालू राहिली असती तर हे उत्पादन आणखी खाली घसरून १५ लाख टनांवर आले असते. परिणामी साखर दुर्मिळ झाली असती.


साखरउत्पादन आणि गूळउत्पादन यामध्ये फार मोठा फरक आहे. एक टन ऊस जर साखर कारखान्यामध्ये गाळला तर त्यापासून महाराष्ट्रांत ११० ते १२५ किलो साखर मिळू शकते. साखरेसाठी गाळण्यात येणाऱ्या उसामधून ९७ टक्क्यांपर्यंत रस मिळू शकतो आणि कमीत कमी म्हणजे २ ते ३ टक्केच फक्त नुकसान होऊ शकते. याउलट गूळउत्पादनाची स्थिती आहे. उसापासून गूळ तयार केला तर ऊस गाळून शिल्लक राहिलेल्या उसाच्या चिपाडामध्ये जवळ जवळ ३० ते ४० टक्क्यांपर्यंत शर्करांश शिल्लक राहतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय हानी होते.

१९६५-६६ मध्ये, ३५ लाख टन साखर उत्पादनामुळे सरकारला अबकारी कराच्या रूपाने १४० कोटी रुपये उत्पन्न मिळाले. २२ लाख टन साखर उत्पादनामुळे ८८ कोटी रुपयांचे उत्पन्न कराच्या रूपाने सरकारला गतवर्षी मिळाले. हाच ऊस जर साखरेऐवजी गूळ उत्पादनाकडे गेला असता तर सरकारला मिळणाऱ्या अबकारी करामध्ये सुमारे ५० कोटी रु. तूट आली असती.

आपण अशी कल्पना करूया की, चालू वर्षी तितक्याच उसाचा जर सर्वच गूळ केला गेला असता तर सरकारला ८८ कोटी रुपये कर तर मिळालाच नसता परंतु आणखी ८८ कोटी रुपयांचे नुकसान (राष्ट्रीय नुकसान) गूळउत्पादनामुळे सोसावे लागले असते. कारण ३० ते ४० टक्के घट (लॉस) ही गूळ उत्पादनामुळे येत असल्याने हे जादा नुकसान (लॉस) सोसावे लागले असते आणि म्हणून केंद्र सरकारने साखरेच्या भावासंबंधी जो नुकताच निर्णय घोषित केला आहे, तो अतिशय योग्य वेळेवर, योग्य असाच घेतला आहे.

महाराष्ट्र राज्यातील ऊसउत्पादकांची अशी मागणी होती की, ९.४ उताऱ्याला ३ रु. मणाप्रमाणे भाव द्यावेत. परंतु केंद्र सरकारने मणाला २.७५ रु. भाव मंजूर केला आहे. मंजूर केलेल्या या नवीन भावामुळे महाराष्ट्रातील ऊसउत्पादक शेतकऱ्यांना साधारणपणे २० रु. एका टनामागे जादा किंमत वाढून मिळेल. त्याचप्रमाणे साखरकारखान्यांना ४०टक्के साखर खुल्या बाजारामध्ये विकण्याची मुभा दिली असल्याने चालू वर्षी प्रत्येक टनामागे ३० ते ४० रुपये भाव वाढून मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवाय जे साखरकारखाने ६७-६८ सालामध्ये ८० टक्केपेक्षा जादा साखरउत्पादन करतील अगर कारखाना कार्यक्षमपणे चालवून जादा ८० टक्के उत्पादन घेतील अशा कारखान्यांना साखरउत्पादनावरील अबकारी करामध्ये ५० टक्के सूट देण्याचे धोरण सरकारने जाहीर केले आहे. कारखाने अधिक कार्यक्षमपणे चालवून उत्पादनामध्ये जादा वाढ करून करातील सवलतीचा अधिकाधिक फायदा साखरकारखान्यांनी उठवला तर ऊसउत्पादक सभासदांना टनाला रु. १२५ पेक्षा अधिक भाव सहजपणे मिळण्याची शक्यता आहे.

उत्तर भारतामध्ये साखरेची फार मोठी कारखानदारी आहे. दुष्काळामुळे तेथील ऊसउत्पादनावर परिणाम झाल्याने तेथील साखरधंदा संकटात सापडला. तशातच मेक्सिकन गव्हासारख्या एकरी अधिक उत्पादन देणाऱ्या पिकाला उसापेक्षा चांगली किंमत मिळू लागल्याने उसाऐवजी या पिकाचे उत्पादनाकडे शेतकरी वळू लागल्याने तेथील ऊसउत्पादनामध्ये कमालीची घट होऊ लागली व तेथील साखरकारखानदारी धोक्याच्या उंबरठ्यावर आली. उत्तर भारतातील एकरी टनेज १०–१५ आहे व उतारा ९ ते १० टक्क्यांवर नाही. याउलट महाराष्ट्रामध्ये सरासरी टनेज जरी ४० पडत असले तरी पण चांगल्या प्रकारचे उत्पादन घेतल्यास ते एकरी आडसाली ७० पासून १२५ टनांपर्यंत होऊ शकते. शिवाय महाराष्ट्रातील उतारा १० टक्क्यांपासून १२ टक्क्यांपर्यंत आहे. ऊस व साखरउत्पादनाला पोषक अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये आहे. म्हणून केंद्र सरकारच्या या नवीन निर्णयामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपुढे एक नामी संधी चालून आली आहे. ती त्यांनी न दवडता अधिक ऊसउत्पादन करून तो साखरकारखान्यांना पुरवून आपल्या कष्टाचा पुरेपूर मोबदला पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करावा असे त्यांना कळकळीचे आवाहन आहे.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80, Licence No. 175

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष ३३ पुणे, बुधवार ४ ऑक्टोबर, १९६७ अंक १९

## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

## दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

स्थापना १९४५

टेलिफोन नं. ३५६५०२

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

७, तात्या घारपुरे पथ, मुंबई–४.

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : दरसाल दर शे. रु. ४ – ००
( २ ) खास बचत योजना :—घरी बसून पैसे भरता येतात
( ३ ) कायम ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर
( ४ ) महाराष्ट्र, म्हैसूर आणि गुजरात राज्यांतील प्रमुख शहरांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध


खेळते भांडवल सुमारे १३ लाख रुपये

अधिक माहितीसाठी अवश्य भेटा :—

बा. य. वेलींकर
असि. मॅनेजर

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★




नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

# ठाकरसी फॅब्रिक्स्

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

SANFORIZED

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड



**ठाकरसी ग्रूप**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

# ★ अर्थ ★

बुधवार, ४ ऑक्टोबर, १९६७



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पोलाद कारखान्यांचा कारभार सुधारण्याचे प्रयत्न

सार्वजनिक मालकीच्या पोलाद कारखान्यांच्या कारभारात सुधारणा घडवून आणण्यासाठी भारत सरकारच्या पोलाद खात्याने आणि हिंदुस्थान स्टील कंपनीच्या चालकांनी त्वरित उपाय करण्याचा निर्णय घेतला आहे. पांडे कमिटी आणि कमिटी ऑन पब्लिक अंडरटेकिंग्ज् ह्यांनी केलेल्या शिफारसींना अनुसरून उपाय योजण्याचा विचार चालू आहे. भारत सरकारच्या मालकीच्या अनेक व्यापारी आणि औद्योगिक संघटना आहेत. ह्या संघटनांतून २,५०० कोटी रुपयांपेक्षाही अधिक भांडवल गुंतविण्यात आलेले आहे आणि त्यापैकी जवळजवळ ९०० कोटी रुपये भांडवल हिंदुस्थान स्टील अगर तिच्या उप-कंपन्या ह्यांमध्ये गुंतलेले आहे. सार्वजनिक मालकीच्या तिन्ही पोलाद कारखान्यांतून जास्तीत जास्त उत्पादनाची मर्यादा गाठण्यात आली आहे. ह्या कारखान्यांचा विस्तार करण्यात येत असून ते विस्ताराच्या पहिल्या अगर दुसऱ्या टप्प्यापर्यंत आलेले आहेत. देशाची पोलादाच्या मालाची गरज आता भागविता येऊ लागलेली आहे. कारखान्यांच्या विस्तार योजना पूर्ण झाल्या म्हणजे भारताला पोलादाच्या मालाची आयात करण्याची थोडीसुद्धा गरज वाटणार नाही. परंतु सध्या काहीशी चमत्कारिक परिस्थिती उत्पन्न झाली आहे. उद्योगधंद्यात पसरलेल्या मंदीमुळे काही प्रकारचा पोलादाचा माल पडून राहू लागला आहे. ह्यातून मार्ग काढण्यासाठी हिंदुस्थान स्टील कंपनी हा माल परदेशी बाजारपेठेत विकण्याच्या खटपटीत आहे. १९६६-६७ साली एकूण ४ लक्ष ७० हजार टन पोलादाचा माल निर्यात करण्यात आला. त्यापैकी ५५ टक्के माल हिंदुस्थान स्टीलने पुरविला होता. कंपनीच्या मालाची किंमत मात्र फार आहे.

## औद्योगीकरणामुळे उत्पन्न होणारे सामाजिक प्रश्न

औद्योगीकरणामुळे नव्याने उत्पन्न होणाऱ्या सामाजिक प्रश्नांची पाहणी करण्यासाठी दक्षिण भारतामधील कापड संशोधन संस्थेने पुढाकार घेतला होता. ह्या पाहणीच्या कामात कामगार संघटनांचे, मालकांचे आणि शैक्षणिक तज्ज्ञांचे सहकार्य घेण्यात आले होते. पहाणीत उघड झालेली परिस्थिती उद्बोधक आहे. गेल्या काही वर्षांत राहणीच्या खर्चाचे मान एकसारखे वाढत असून कामगार वर्गाला इतरांच्या प्रमाणेच ह्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचे प्रयत्न एकसारखे करावे लागत आहेत. ह्या प्रयत्नांमुळे त्यांची कार्यक्षमता तोकडी पडण्याची अवस्था जवळजवळ येऊ लागली आहे. महागाईशी मुकाबला करता यावा म्हणून ३३ टक्के कामगारांनी खर्चात कपात करण्याचे उपाय योजले आहेत. २३ टक्के कामगार कुटुंबांनी अनावश्यक खर्चाला कात्री लावली आहे. १० टक्के कुटुंबांनी आपल्या आहाराच्या संवयी बदलून टाकल्या, आणि ७ टक्के कुटुंबांनी जेवणातील आजूबाजूचे पदार्थ कमी केले, आणि खाद्य तेलाच्या वापरात कपात केली. काही कुटुंबांनी स्वस्त भाजीपाला व डाळी घेण्यावर भर दिला, आणि नारळाला सोडचिठ्ठी दिली. नवे कपडे घेण्याचे बऱ्याच कुटुंबांनी पुढे ढकलले आणि आहेत तेच कपडे दुरुस्त करून वापरण्यास प्रारंभ केला. कोइमतूरमधील कामगार-जीवनाच्या ह्या पाहणीत असे आढळून आले की, एकत्र कुटुंबपद्धती जवळ जवळ नष्टच झाल्यासारखी आहे; आणि त्यामुळे दुसऱ्यावर अवलंबून राहणाऱ्या वृद्धांची संख्या वाढत आहे. खेडेगावातील लोक शहरात येण्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे महागाईला आळा घालण्याचे काम अधिकच तातडीचे परंतु तितकेच बिकट होत चालले आहे.

## रेल्वेमार्गांवर आधुनिक पद्धतीची एंजिने

हिंदमधील रेल्वेमार्गांवर वाफेच्या एंजिनांच्या जागी विजेची व तेलावर चालणारी एंजिने हळूहळू वापरण्यात येऊ लागली आहेत. रेल्वे व वहातुकीचे आधुनिकीकरण करण्याच्या मार्गावरील हे महत्त्वाचे पाऊल आहे. चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्यात ५ वर्षांपूर्वी विजेची एंजिने तयार करण्यास प्रारंभ झाला. तेव्हापासून आतापर्यंत ८६ एंजिने तयार करण्यात आली आहेत. वाराणसी येथील कारखान्यात तेलावर चालणारी १३० एंजिने निर्माण करण्यात आली आहेत. १९७२ पासून चित्तरंजन येथील कारखान्यात वाफेवर चालणारी एंजिने तयार करण्याचे बंद होणार आहे. त्यापुढे फक्त विजेची एंजिनेच येथे तयार होतील. हिंदमधील रेल्वेमार्गांची लांबी सुमारे ५८,००० किलोमीटर आहे. त्यापैकी एक तृतीयांश मार्गांवर विजेची अगर तेलाची एंजिने आजच वापरण्यात येत आहेत. चौथ्या पंचवार्षिक योजनेत आणखी १३,००० किलोमीटर मार्गांवर तेलाची एंजिने आणि ३,३०० किलोमीटर मार्गांवर विजेची एंजिने वापरण्यात येऊ लागतील. मग रेल्वेमार्गांपैकी अर्ध्या मार्गांवर आधुनिक पद्धतीची एंजिने धावू लागतील. ह्या कार्यक्रमाच्या अखेरीस विजेची आणखी ५०० एंजिने आणि तेलावर चालणारी आणखी ६५० एंजिने उपलब्ध होऊ शकतील. स्वातंत्र्यानंतर सरकारी मालकीच्या व खाजगी मालकीच्या रेल्वेचे एकत्रीकरण करण्यात आले. त्या वेळी वाफेवर चालणारी ६,००० एंजिने वापरण्यात येत होती. तेव्हापासून ४,७०० नवीन एंजिनांची भर घालण्यात आली. त्यापैकी २ हजारांवर एंजिने चित्तरंजन येथील कारखान्यात तयार झालेली होती. २,६०० एंजिने आता निकामी झाली आहेत.

## भारताच्या भवितव्याचे चिंताजनक चित्र

लखनौ विद्यापीठाच्या अर्थशास्त्रीय विभागाने भरविलेल्या एका परिसंवादात उत्तरप्रदेशचे मुख्य मंत्री श्री. चरणसिंग ह्यांनी भाषण केले. ह्या भाषणात त्यांनी रेखाटलेले भारताच्या भवितव्याचे चित्र चिंताजनक असून त्याकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखे नाही. कारण भारताची आर्थिक भरभराट घडवून आणण्याची शक्यताच त्यांच्या भाषणामुळे शंकास्पद वाटू लागते. श्री. चरणसिंग आपल्या भाषणात म्हणाले की, भारत हा देश सर्व दृष्टींनी खुरटलेल्या व खुज्या लोकांचा होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. आज अशी स्थिती आहे की, कोठल्याही क्षेत्रात श्रेष्ठ दर्जाची माणसे पुढे येत नाहीत लोकांत उद्योगशीलता आणि कष्ट करण्याची सवय ह्यांचा अभाव असल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. बहुसंख्य लोक अन्याय्य मार्गाने यश मिळविण्याच्या खटपटीत गुंतलेले दिसतात. उत्तरप्रदेशापुरते बोलावयाचे झाले तर ह्या राज्याची लोकसंख्या १९८१ च्या सुमारास ११.९ कोटी होईल, असे दिसते. लोकसंख्येची ही वाढ मनःस्वास्थ्य नाहीशी करणारी आहे. हे राज्य भौतिक साधनसंपत्तीच्या दृष्टीने दरिद्री आहे. राज्यातील प्रचंड लोकसंख्येला मागासलेपणाच्या दलदलीतून बाहेर खेचून काढणे हे अतिशय अवघड काम आहे. भारताची तुलना अमेरिका, रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलँड ह्या देशांशी होऊ शकत नाही. कारण, ह्या देशांना नैसर्गिक साधनसामग्रीची देणगी जशी मिळालेली आहे, तशी ती भारताला मिळालेली नाही. ह्या देशांना जी आर्थिक समृद्धी लाभली आहे ती भारताला प्राप्त होणे अशक्य आहे.

भारताची तुलना ब्रिटन, फ्रान्स, जपान आणि पश्चिम जर्मनी ह्या देशांशीही होऊ शकत नाही. हे देश साम्राज्य मिळविलेले होते. त्यामुळे त्यांच्या अंकित असलेल्या वसाहतींची पिळणूक करून त्यांना भांडवलाचा संचय करता आला आणि उद्योगधंद्यांचा विकास साधता आला. त्यांच्यापाशी तंत्रज्ञांची संख्याही मोठी आहे. ह्यांपैकी कोणतीच गोष्ट भारताला अनुकूल नाही. चीन हा एकच देश असा आहे की ज्याची भारताशी तुलना होऊ शकेल. परंतु दोन बाबतींत चीन भारतापेक्षा अधिक चांगल्या अवस्थेत आहे. चीनमधील राजकीय सत्ता हुकूमशाही पद्धतीची आहे. त्यामुळे चीनच्या सरकारला लोकांच्या उपभोगाच्या वृत्तीवर कडक बंधने लादता येतात; आणि त्यांना सक्तीची बचत करण्यास भाग पाडता येते. अशा रीतीने केलेली बचत चीनला भांडवल गुंतवणुकीसाठी उपयोगी पडते. भारताला मात्र बचतीची ही पद्धत अनुसरता येण्यासारखी नाही. कारण, भारत हा लोकशाही देश असल्याने बळाचा वापर करून लोकांकडून बचत करविण्याची सक्ती त्याला जमण्यासारखी नाही. दुसरी बाब अशी की, चीनमध्ये जातिसंस्था मुळीच नाही. भारतात मात्र जातींचा बुजबुजाट झालेला आहे. हिंदमधील सर्वच राजकीय पक्ष मतदारांना लाच देत असतात. लोकांना अनेक प्रकारच्या सोईसवलतींची आमिषे दाखविण्यात येत असतात. शाळा, दवाखाने, कॉलेजे, अधिक प्रमाणात उघडण्यात येतील असे त्यांना सांगण्यात येते. पण, हा सर्व विकास साधनसंपत्तीच्या अभावी कसा घडवून आणता येईल हे समजणे अवघड आहे. दरम्यान लोकसंख्या वाढतच आहे. १९६१ ते १९८१ पर्यंतच्या कालखंडात उत्तरप्रदेशाची लोकसंख्या दरसाल २० लाखांनी वाढेल असा अंदाज तज्ज्ञांनी केला आहे.

---

## आपल्या आंब्यात भरपूर व्हिटॅमिन्स आहेत

आंबा हा 'ए' व्हिटॅमिन देणारे सर्वोत्कृष्ट नैसर्गिक साधन आहे. गोव्याच्या मांडकूर जातीच्या आंब्यात व्हिटॅमिन सर्वात जास्त प्रमाणात आढळते (रसाच्या प्रत्येक ग्रॅममध्ये २५९.४ इंटरनॅशनल युनिट्स). इतर जातींच्या आंब्यांतील व्हिटॅमिन्सचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| हापूस | १००.१ |
| लंगडा | ५१.५ |
| नीलम | ३२.२ |
| मलगोवा | २८.१ |

लंगड्यामध्ये 'सी' व्हिटॅमिन सर्वात अधिक असते (१०० ग्रॅम्स: १७६–२०० मिग्रॅ.). इतर जातींच्या आंब्यांतून फक्त ते ७८ ते १३०.८ मिग्रॅ. आढळते.

दक्षिण अमेरिकेतील आंब्याच्या मानाने आपल्या आंब्यांत प्रथिनाचा अंश कमी असतो.

व्हिटॅमिन्सप्रमाणे इतरही अनेक द्रव्ये पिकलेल्या आंब्यांत भरपूर प्रमाणात असतात. (ॲमिनो ॲसिडस, कॅलशियम, मॅग्नेशियम, तांबे, मँगेनीज, सिलिकॉन, लोखंड आणि गंधक).

---

## प्रगत देशांच्या वृत्तीबद्दल खेद

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सरचिटणिसांनी अशी सूचना केलेली आहे की प्रगत देशांनी आपल्या ठोक राष्ट्रीय उत्पन्नाच्या १ टक्का हिस्सा अविकसित देशांना मदत देण्यासाठी द्यावा. ह्या सूचनेसंबंधी बोलताना मध्यवर्ती सरकारचे व्यापारमंत्री श्री. दिनेशसिंग ह्यांनी खेद व्यक्त केला आहे. आतापर्यंत कोणत्याही प्रगत देशाने आपली जबाबदारी पूर्ण केलेली नाही. आपले विचार व्यक्त करताना श्री. दिनेशसिंग म्हणाले की, प्रगत व अप्रगत देशांतील तफावत भरून काढण्याचे काम मुख्यतः अप्रगत देशांनी स्वतःच करावयास पाहिजे. परंतु प्रगत देशांनी मदत केल्यास ती लवकर भरून निघेल. काहीही करून ती तफावत भरून काढण्यात आलीच पाहिजे.

## दारिद्र्य दूर करण्यास जीवशास्त्रज्ञांची मदत

बंगलोर येथे जीवरसायन शास्त्रज्ञांची एक आंतरराष्ट्रीय बैठक भरविण्यात आली होती. बैठकीचे काम ४ दिवस चालले. तीत भाग घेण्यासाठी अनेक देशांतील शास्त्रज्ञ आले होते. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ह्या संघटनेचे डायरेक्टर डॉ. एस. ढवण बैठकीत बोलताना म्हणाले की, शास्त्रज्ञांनी संशोधनाच्या क्षेत्रात आतापर्यंत मोलाची कामगिरी केलेली आहे. आता त्यांनी लोकसंख्येचे नियंत्रण आणि अधिक अन्नाचे उत्पादन ह्या क्षेत्रात काम करण्यास पुढे आले पाहिजे. अर्थात देशातील दारिद्र्य आणि भूक ह्यांचा उपशम होण्यास फक्त शास्त्रज्ञ पुरे पडणार नाहीत तरीसुद्धा शास्त्रज्ञांच्या साह्याने हा प्रश्न सोडविण्यास मदत होऊ शकेल. भारतात जीवरसायन शास्त्राच्या व्यावहारिक बाजूकडे लक्ष देण्यात आलेले नाही, ही दुःखाची गोष्ट आहे. भारत आज दारिद्र्यात खितपत पडलेला आहे. उपासमारीच्या उंबरठ्यावर तो उभा आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा अन्नपदार्थांचे उत्पादन अधिक प्रमाणात करण्याची गरज आज अतिशय तीव्रतेने भासत आहे. हे साध्य करण्याच्या कामी जीवरसायन शास्त्रज्ञ काय करू शकतील? जीवरसायन शास्त्रज्ञांचा विषयच असा आहे की त्याचा संबंध आहार आणि लोकसंख्येचे नियंत्रण ह्या विषयाशी जोडलेला आहे. गेल्या दोन दशकांत शास्त्रज्ञांनी मती गुंग करण्यासारखी प्रगती केलेली आहे. जीवशास्त्रातील प्रगती आता अशा एका टप्प्यावर आली आहे की येथून पुढे त्या शास्त्रात फार मोठी क्रांती होईल अशी लक्षणे दिसत आहेत. जीवशास्त्रात नव्याने होऊ पहाणाऱ्या प्रगतीचा उपयोग मनुष्यजात स्वतःच्या कल्याणासाठी करून घेईल किंवा नाही, हा खरा प्रश्न आहे.

---

## हिंदी बोलपटांचे पाकिस्तानातील चोकी

भारत व पाकिस्तान ह्यांच्यातील तेढ राजकीय आणि आर्थिक क्षेत्रापुरतीच मर्यादित नाही. भारताच्या वर्चस्वाची खरीखोटी भीती पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना वाटत असून बोलपटासारख्या सांस्कृतिक क्षेत्रातही तिची छाया पडलेली आहे. लाहोरमधील एका वृत्तपत्राने नुकतीच अशी वार्ता प्रसिद्ध केली की शहरातील दोन चित्रपटगृहांत काही निवडक हिंदी बोलपट दाखविण्यात आले. सिनेमाचे हे खेळ मध्यरात्री काही खास प्रेक्षकांनाच दाखविण्यात आले आणि त्यासाठी भरमसाठ तिकिटांचे दर आकारण्यात आले. हिंदी बोलपटांचे पाकिस्तानातील लोकांना जबरदस्त आकर्षण वाटते. त्यामुळे चोरट्या मार्गाने हिंदी बोलपटांची आयात करून पैसे मिळविण्याचा धंदा चांगला भरभराटला आहे. काही चित्रपटवितरक अशा रीतीने बोलपट मिळवून ते गुप्तपणे दाखवितात. काही धनसंपन्न लोक आपल्या मित्रांना खाजगी जागेत हिंदी चित्रपट दाखवितात, अशा तक्रारी पाकिस्तानातील वृत्तपत्रात करण्यात आल्या आहेत. अगदी अलीकडे मोगल दरबारातील प्रणयकथेवर आधारलेला एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचा बोलपट खाजगी रीत्या दाखविण्यात आला, त्यासाठी माणशी ५० रुपयांचे तिकीट ठेवण्यात आले होते. केवळ पश्चिम पाकिस्तानात नव्हे तर पूर्व पाकिस्तानातही अशीच प स्थिती आहे. काही वर्षांपूर्वी पूर्व पाकिस्तानातील ढाका ह्या शहरात सत्यजित रे ह्यांच्या बोलपटाचा एक खेळ खास परवानगी काढून दाखविण्यात आला होता. चित्रपटाला इतकी गर्दी लोटली की उत्सुक प्रेक्षकांना पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. पाकिस्तान फिल्म सोसायटीने अशी मागणी केली आहे की चित्रपटसंस्था व क्लब ह्यांना तरी हिंदी बोलपट दाखविण्याची परवानगी देण्यात यावी.

---

## विवाह ५ वर्षांच्या मुदतीचा असावा

कौटुंबिक संबंधाविषयी अधिकारवाणीने बोलणाऱ्या एका अमेरिकन महिला मानसशास्त्रज्ञाने विवाहाविषयी काही क्रांतिकारक स्वरूपाचे विचार व्यक्त केले आहेत. त्या म्हणतात की विवाह हा प्रथम ५ वर्षे मुदतीचा करार असावा आणि त्या कराराची मुदत वाढविण्याची मुभा संबंधितांना असावी. विवाहित दांपत्याला पाच वर्षांनंतर आपला विवाह यशस्वी झाला आहे असे वाटले, तर कराराची मुदत आणखी पाच वर्षांनी वाढविण्याचे त्यांच्या मर्जीवर सोपविण्यात यावे. विवाह अयशस्वी झाल्यास फारसा त्रास न होता व कोर्टकचेरीपायी होणारा खर्च न होता तो रद्द करण्याची संधी त्यांना मिळेल. करार मुळातच हंगामी स्वरूपाचा असल्याने त्याची मुदत संपल्यावर तो रद्दबातल करण्यास कोणत्याही प्रकारची सामाजिक दूषणाची भीतीही आड येण्याचे कारण नाही. ख्रिश्चन समाजात विवाह हा एकच असा करार आहे ज्याला मुदत नाही. ह्या कराराची तपासणी होऊ शकत नाही आणि तो रद्द करण्याचा समाजाला मान्य असा मार्गही ठेवण्यात आलेला नाही. पती अगर पत्नी ह्यांना एकमेकांची निवड अचूकपणे करता येईल अशी अपेक्षा करणे त्यांच्या शहाणपणाच्या पलीकडचे आहे. ज्यांना विवाहबद्ध होण्याची इच्छा आहे त्यांनी काही काळ उमेदवारीचा म्हणून घालवावा आणि एकमेकांच्या स्वभावाचे नीट परीक्षण करावे. म्हणजे त्यांना परस्परांच्या अनुरूपतेविषयी योग्य कल्पना येऊ शकेल. विवाहाच्या पावित्र्याविषयी काही कल्पना बाळगल्याने अनुरूपता अजमावण्याची संधीच सध्या मिळत नाही. विवाहित स्त्रीपुरुष एकमेकांशी एकनिष्ठ राहण्याचे प्रमाण हल्ली घटत चाललेले आहे, हे लक्षात घेणे जरूर आहे.

---

**चीनने मदत थांबविली**—पश्चिम आशियात अरब देश व इस्राएल ह्यांच्यात झालेल्या युद्धाच्या वेळी चीनने अरब देशांना आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले होते. चीनने इजिप्तला दीड लाख टन गहू आणि १ कोटी पौंड कर्ज देऊ केले होते. परंतु अरब देशांचे धोरण पुरेसे क्रांतिकारक नसल्याचे कारण सांगून चीनने ही मदत रद्द केली आहे.

## पूर्व युरोपातील देशांना अधिक मुले हवीत

आशिआ खंडातील बहुतेक देशांना लोकसंख्येच्या भरमसाट वाढीची चिंता वाटत आहे; तर पूर्व युरोपातील देशांना अधिक मुले हवी आहेत. तेथील सरकारांनी विवाहितांना अपत्यांच्या बाबतीत उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. पोलंड आणि अल्बानिआ हे दोन देश सोडले तर पूर्व युरोपातील देशांची दर हजारी जननसंख्या फारच घटलेली आहे. रुमेनिआच्या सरकारने अधिक मुले प्रसवणाऱ्या जोडप्यांना अनेक प्रकारच्या सवलती देऊ केल्या आहेत. तेथे घटस्फोट अवघड करण्यात आला आहे आणि घटस्फोटितेला मिळणारी पोटगी सक्तीची करण्यात आली आहे. काही विशेष अपवाद सोडून भ्रूणहत्येवर बंदी घालण्यात आली आहे. अपत्यहीन जोडप्यावरील आणि अविवाहितांवरील करात वाढ करण्यात आली आहे. आईबापांना मुलांचे ओझे वाटू नये म्हणून मुलांच्या आरोग्याचे रक्षण करणारी अनेक केंद्रे काढण्यात आली आहेत. हंगेरी ह्या देशातील दरहजारी जननसंख्येचे प्रमाण अवघे १२ पर्यंत खाली आले आहे. युरोपमध्ये हे सर्वांत कमी प्रमाण आहे. ह्याचा परिणाम असा झाला आहे की तरुण कामगारवर्गाची संख्या घटत असून निवृत्ति-वेतन घेणाऱ्या वृद्धांची संख्या मात्र वाढत चालली आहे. म्हणून हंगेरीच्या सरकारने अधिक मुले जन्मावीत म्हणून जोराची मोहीम चालू केली आहे. मुलांमुळे जीवनात सौख्याची फुलबाग फुलते आणि कुटुंबसंस्था स्थिरावते असा प्रचार करण्यात येत आहे. झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारने लहान मुले असणाऱ्या स्त्रियांना नोकरीची शाश्वती दिली आहे. त्याचप्रमाणे मातांना पगारी सुट्या देण्याचा उपक्रमही चालू केला आहे. ह्या बाबतीत विवाहित माता अगर अविवाहित माता असा भेदसुद्धा केला जात नाही. धनोत्पादनासाठी लागणारा तरुणवर्ग ह्या देशांतून अपुरा पडत आहे.

## भाक्रा येथील धरणाची व्यथा

हिंदमधील शेती पावसाच्या लहरीवर अवलंबून असल्याने अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याच्या कामी मोठी अडचण निर्माण झालेली आहे. ह्या अडचणीचे निवारण करण्यासाठी लहानमोठी धरणे बांधून शेतीसाठी निश्चित पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा मोठ्या धरणांपैकी भाक्रा-नांगल धरण हे एक आहे. जगातील सर्वच गोष्टींना आयुर्मान असते तसे ते धरणांनाही असते. अपघात वगळता एखादे धरण किती वर्षे टिकेल ह्याचा काही अंदाज करण्यात आलेला असतो. भाक्रा येथील धरण ५८५ वर्षे काम देऊ शकेल असा अंदाज ते बांधताना केलेला आहे. परंतु धरणाची उपयुक्तता जेमतेम २०० वर्षेपर्यंतच टिकून राहील अशी भीती अलीकडे व्यक्त करण्यात येत आहे. ह्या धरणात दरसाल जो गाळ साठत आहे त्याचा वेग पाहिल्यावर वरील भीतीला पुष्टी मिळाली आहे. सध्यापेक्षा अधिक प्रमाणात गाळ साठू लागला तर धरण ६० वर्षांच्या अवधीतच भरून जाण्याचा संभव दिसू लागला आहे. गाळ साठण्याचे प्रमाण बेताचे राखण्यासाठी धरणात पाणी साठण्याचा जो प्रदेश आहे तेथील जमिनीची धूप थांबविण्याच्या योजना तातडीने अमलात आणण्याची गरज आहे. धरणाच्या पाणलोट विभागापैकी मोठा भाग हिमाचल प्रदेशात आहे. पावसाच्या पाण्याने येणाऱ्या गाळाला अटकाव करण्यासाठी ह्या भागात जंगलाची वाढ मोठ्या प्रमाणावर करण्यात आली पाहिजे. पण पंजाबचे विभाजन होऊन नवीन राज्ये निर्माण करण्यात आल्यावर धरणाची मालकी कोणाची हा वाद उत्पन्न झाला आहे. ह्या वादंगात भाक्रा धरणाची गाळाची व्यथा दुर्लक्षित झाली आहे.

## भुकेल्या देशांना प्रचंड मदतीची जरूरी

अमेरिकेतील एका संघटनेने जगातील भुकेच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक परिसंवाद भरविला होता. ह्या परिसंवादात संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेचे डायरेक्टर जनरल श्री. बी. आर. सेन ह्यांचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, जगातील गरीब देशांची लोकसंख्या वाढत चाललेली आहे. वाढत्या तोंडांना अन्नाचा पुरवठा करण्यासाठी शेतीच्या व्यवसायात फार प्रचंड प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक करणे अगत्याचे आहे. गरीब देशांमधील शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी खाजगी उद्योगधंद्यांनी कसून प्रयत्न करण्याची वेळ आता आली आहे. अमेरिकेमधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांची अमाप साधनसंपत्ती लक्षात घेता त्यापैकी अत्यल्प हिस्सा अविकसित देशांची भरभराट साधण्याच्या कामी वापरला जात आहे ही गोष्ट लक्षात येते. अविकसित देशांची भांडवलाची भूक फार मोठी आहे. ही भूक भागविण्याच्या कामी खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना कार्य करता येईल. अविकसित देशांतील दर एकरी उत्पादनाचे प्रमाण अतिशय त्वरेने वाढविणे अगदी आजची गरज आहे. कारण, येत्या २० वर्षांच्या अवधीत तरी लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्याच्या प्रयत्नांना म्हणण्यासारखे यश मिळेल अशी आशा करण्यास जागा नाही. लोकसंख्येला आळा घालण्याचे काम धोरणाचा पुनरुच्चार करून होणार नाही. त्यासाठी लाखो लोकांचे मन वळविण्यात आले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने अपत्यांच्या संख्येबाबतचे निर्णय स्वतःच घ्यावयाचे असतात आणि ते अमलात आणावयाचे असतात. व्यक्तींच्या निर्णयानेच हा प्रश्न सुटू शकेल.

### वाचकांस सूचना

**अर्थाचा येता, दि. १८ ऑक्टोबरचा अंक बंद राहून त्यापुढील १ नोव्हेंबरचा अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल.**

## महागाईत वाढ कशी होत गेली ?

| | मार्चअखेर | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १९६५ (१) | १९६६ (२) | १९६७ (३) | (१) च्या मानाने (२) मध्ये % वाढ (४) | (२) च्या मानाने (३) मध्ये % वाढ (५) |
| १. सर्व पदार्थ | १५१·० | १७४·० | २०२·७ | +१५·२ | +१६·५ |
| २. अन्न पदार्थ | १५३·६ | १७५·३ | २१७·६ | +१४·१ | ÷२४·१ |
| (अ) धान्ये | १४०·३ | १५६·२ | १९३·५ | +११·३ | +२३·९ |
| (ब) डाळी | १५२·२ | १५५·४ | २३४·४ | + २·१ | +५०·८ |
| ३. दारू, तंबाखू | १३८·४ | १३७·५ | १२८·० | − ७·९ | + ०·४ |
| ४. सर्पण, दिवाबत्ती, वंगण | १४८·२ | १६०·३ | १७२·९ | + ८·२९ | + ७·९ |
| ५. औद्योगिक कच्चा माल | १६३·३ | २१०·० | २३६·१ | +२८·६ | +१२·४ |
| ६. पक्का माल | १४१·२ | १५७·३ | १६७·५ | +११·४ | + ६·५ |

### कॅशिअर्सच्या तंट्यामुळे गिऱ्हाइकांचे नुकसान

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोईमतूर मुख्य शाखेतील हेड कॅशिअर आणि त्याच्या हाताखालील कर्मचारी ह्यांच्यामधील तंट्यामुळे २६ सप्टेंबर रोजी सरकारी खाती, व्यापारी फर्म्स, स्थानिक बँका व इतर गिऱ्हाइके ह्यांची फारच गैरसोय झाली. टेंपररी कॅशिअरचे अडीच महिने काम केलेल्या एका कर्मचाऱ्याला कायम करण्यास हेड कॅशिअरने संमती दिली नाही, कारण त्याचा त्या कर्मचाऱ्यावर विश्वास नव्हता. इतर कॅशिअर्स व कारकून ह्यांनी ह्या घटनेला विरोध दर्शविण्यासाठी बँकेबाहेर निदर्शने केली. नंतर ते बँकेत आले. पण कॅशिअर्सनी हेड कॅशिअरच्या द्वारा कॅशला हात लावण्यास नकार दिला. बँकेच्या एजंटने किंवा डेप्युटी कॅशिअरने हे काम आम्हास वाटून द्यावे, असा त्यांनी आग्रह धरला. ह्या तंट्यामुळे कॅशचेस्ट उघडलीच गेली नाही आणि सर्व कॅशिअर्स आपआपल्या जागी असताही सबंध दिवसात पैशाचा काहीच व्यवहार होऊ शकला नाही. रोखीच्या व्यवहाराची एजंटने किंवा दुसऱ्या कुणी काहीच सोय केली नाही. हेड कॅशिअरने आपले म्हणणे सोडले नाही, बाकीच्यांनी आपला विरोध कायम ठेवला.

कारकुनांनी आपली चळवळ २७ सप्टेंबर रोजी चालू न ठेवल्यामुळे त्या दिवशी नेहमीप्रमाणे काम सुरू झाले. आपल्या युनियनच्या आदेशाची ते आता वाट पाहात आहेत. वादाचा विषय झालेल्या टेंपररी कॅशिअरला कोईमतूरमधील बँकेच्या दुसऱ्या शाखेत काम करावयाला सांगितले आहे.

---

### रुपयाचे अवमूल्यन केले तरी निर्गतीत घट

रुपयाच्या अवमूल्यनामुळे भारताच्या निर्गत व्यापारात खूप वाढ होईल, ही अवमूल्यनाच्या वेळी व्यक्त केलेली अपेक्षा फोल ठरली आहे. अवमूल्यनानंतरच्या १२ महिन्यांत निर्गत वाढली तर नाहीच, उलट ती त्यापूर्वीच्या १२ महिन्यांच्या मानाने ११% घटली आहे. अवमूल्यनामुळे आयात घटण्यास मदत होईल, ही अपेक्षा मात्र पूर्ण झाली आहे. कारण, ह्या १२ महिन्यांत आयात १०% ने कमी झाली आहे. जून १९६६ ते मे १९६७ ह्या मुदतीत ११४० कोटी रुपयांची निर्गत झाली आणि २०३८ कोटी रुपयांची आयात झाली. लोखंड, पोलाद, कातडी जिनसा, ताग, फळे, इत्यादींची निर्गत वाढली; पण त्यामानाने चहा, तागाच्या जिनसा, कपास कापड, ह्यांची निर्गत बरीच घटली. अमेरिकेकडे होणाऱ्या निर्गतीत ३० कोटी रुपयांची घट झाली. ग्रेटब्रिटनकडे होणारी निर्गतही तेवढ्याच किमतीने घटली; जर्मनीने ४·५ कोटी रुपयांचा कमी माल घेतला, रशियाकडील निर्गतीतही ३० कोटी रुपयांची घट झाली. जपान, इंडोनेशिया, सिलोन, मलेशिया, इत्यादीकडील निर्गतीत २० कोटींची वाढ झाली.

---

### जपानकडे केळ्यांची प्रायोगिक निर्गत

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन लवकरच ९०० टन बसराई केळ्यांची जपानकडे प्रायोगिक निर्गत करणार आहे. वहातुकीला १४ दिवस लागतील. सुएझ कालवा बंद झाल्यापासून रशियाकडील केळ्यांची निर्गत थांबली आहे. गेल्या वर्षी ५८ लक्ष रु. किमतीच्या ५,३०० टन केळ्यांची निर्गत झाली होती.

---

## अभिनव विमा-योजना

अल्जीरियाच्या सरकारने काँगोचा भूतपूर्व पंतप्रधान ज्या विमानात होता त्या विमानातील परदेशी उतारूंना डांबून ठेवले होते. अशा आपत्तीचा विमा उतरण्याची योजना लंडनच्या लॉइडसने सुरू केली आहे. परदेशाच्या सरकारने बेकायदा अटक केल्या जाणाऱ्या व्यापाऱ्यांना ह्या योजनेचा फायदा मिळेल. दरसाल किमान ६,००,००० ब्रिटिश व्यापारी परदेशी प्रवास करतात आणि त्यांपैकी किमान १०,००० असा विमा उतरतील, अशी अपेक्षा आहे. तीन आठवडे मुदतीच्या विम्याचा हप्ता ३० शिलिंग असून एका वर्षाच्या विम्यास ५ पौंड पडतात. खोट्या कारणासाठी अटक केली गेली, तर विमेदाराला बचावासाठी व इतर खर्चासाठी मिळून ५,००० पौंड मिळतील अशी ह्या विम्याची तरतूद आहे.

## प्रेसिडेंट जॉन्सननी धूम्रपान-मद्यपान सोडले

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांना १९६५ साली हृदयाचा झटका आला होता तेव्हापासून त्यांनी धूम्रपान बंद केले आहे. आता त्यांनी मद्यपानही थांबविले आहे. दररोज दुपारी ते दोन तास बिछान्यात पडून विश्रान्ती घेतात. झोप आल्यामुळे कधी कधी ठरलेल्या गाठीभेटी पुढे ढकलाव्या लागतात. फायलींचे काम त्यांनी संपविण्याचा कितीही प्रयत्न केला तरी साचत जाते.

## परदेशी जाणारे भारतीय डॉक्टर

एकूण १६०० पेक्षा अधिक भारतीय डॉक्टर्स परदेशांत आहेत. त्यांपैकी ७०% ग्रेटब्रिटनमध्ये, २०% अमेरिकेत, आणि ४०% कॅनडात आहेत. परदेशी जाणाऱ्या डॉक्टरांपैकी ४६% मायदेशी परत येतात. परदेशी गेलेल्या डॉक्टरांपैकी १५% स्वतःच्या पैशाने किंवा कौटुंबिक साहाय्याने गेले आणि ७५% परदेशी मदतीने जाऊ शकले. फक्त तिघांना भारतीय सरकारची किंवा संस्थांची मदत मिळाली. डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता जेवढी जास्त, तेवढा ते भारताकडे येण्याचा संभव अधिक असा अनुभव आहे. परदेशी जाणारे डॉक्टर्स तेथे सरासरीने ४·२ वर्षे राहतात. परंतु ही मुदत वाढत जाण्याची लक्षणे अलीकडे दिसू लागली आहेत.

## किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लि.

किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लि. ने मार्च १९६७ अखेर संपलेल्या वर्षी १३·४३ कोटी रु. ची विक्री करून १·८२ कोटी रु. करपात्र नफा मिळविला. त्यापूर्वीच्या वर्षाच्या विक्रीचा आकडा ८·७१ कोटी रु. होता आणि करपात्र नफ्याचा आकडा ९४ लक्ष रु. होता. वाढविलेल्या भाग भांडवलावरही १६% डिव्हिडंड कायम ठेवले आहे. कंपनीची जुनी सबसिडिअरी, शिवाजी वर्क्स, हिचे ९% डिव्हिडंड कायम आहे. नवी जर्मन सबसिडिअरी एफ एच शूले हिने १०% डिव्हिडंड जाहीर केले आहे.

पत्याचा खेळ जेंव्हा निघाला तेंव्हा त्या खेळांत कालमान दर्शनाचीही कल्पना अंतर्भूत होती. त्याचे चार रंग, चार ऋतु (भारताबाहेर बऱ्याच ठिकाणी चार ऋतु मानतात) किंवा चार तिमाह्या दर्शविणारे होते. १३ पानांचा एक रंग अशारितीने प्रत्येक तिमाहीचे १३ आठवडे कल्पिले होते, व एकुण ५२ पत्ते ५२ आठवड्यांचे निदर्शक होते. एक्का ते दश्श्यापर्यंत प्रत्येक पत्यावरील ठिपक्याप्रमाणे त्याचे गुणांची बेरीज करून गुलाम ११, राणी १२, व राजा १३ अशी त्यांत बेरीज धरल्यास ५२ आठवड्यांचे ३६४ दिवसांचा उलगडा होतो. जोकर (विदूषक) चा पत्ता धरून सर्व बेरीज संपूर्ण वर्षाच्या ३६५ दिवसा इतकी होते. हा खेळ खेळतांना ही कालगणना कायम डोळ्यासमोर रहावी हा त्यांत उद्देश होता. ●

दि बँक ऑफ महाराष्ट्रशी जेंव्हा तुमचा संबंध येतो तेंव्हा तो वर्षभरासाठीं, चारी तिमाहीसाठीं, ५२ आठवड्यासाठीं आणि ३६५ दिवसांसाठीं यावा असाच आपला उद्देश असावा असे आम्हाला नम्रपणें वाटतें. महाराष्ट्र बँकेत योग्य ते खाते उघडून तुम्ही वर्षभर पैसे वाचवूं शकतां व त्यावर व्याज मिळवूं शकतां, तसेच आमच्या वस्तु-रक्षा-गृहांत तुम्ही मौल्यवान वस्तु ठेवूं शकतां, विदेशीय व्यवहारासाठीं विदेशविनिमय खात्याचा फायदा घेऊं शकतां, किंवा तुमच्या व्यवसायवृद्धीसाठीं अर्थसहाय्य घेऊं शकतां. लहान उद्योगधंदे उर्जितावस्थेला आणणे हे तर स्थापनेपासुन गेली ३२ वर्षे महाराष्ट्र बँकेचे ध्येय आहे. ●




तुमच्या कुठल्याही बँकींग व्यवहारासाठीं आमच्या नजिकच्या शाखेला भेट द्या. तेथे तुमचें सस्मित स्वागत होईल.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## हवाई सुंदरींना अकाली गर्भपाताचा धोका

युद्धोत्तर काळात विमानांचा प्रवास झपाट्याने वाढला आहे. विमाने अधिकाधिक वेगाने जाऊ लागली आहेत. प्रवाशांची संख्याही खूपच वाढलेली आहे. विमानाचा प्रवास हा वेळेची बचत करणारा असला तरी त्यामुळे प्रवाशांवर होणाऱ्या परिणामांची दखल घेतली जात नाही. मोठमोठे उद्योगपती अगर वरिष्ठ सरकारी नोकर ह्यांना विमानाने प्रवास करण्याचा प्रसंग वारंवार येतो. बदलत्या हवामानामुळे व प्रवासात पडणाऱ्या ताणामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर तात्पुरता परिणाम होतो असे आढळून आले आहे. मधूनमधून प्रवास करणाऱ्यांवर जर असा परिणाम होतो तर हवाई सुंदरींसारख्या नेहमीच्या प्रवाशावर परिणाम होणे सहजच आहे. विमान प्रवासाच्या वैद्यकीय बाजूचा विचार करताना एका जर्मन डॉक्टरने असे सांगितले आहे की, आधुनिक जेट विमानाचा गर्भवती स्त्रियांवर परिणाम होऊन त्या अकाली प्रसूत होण्याचा धोका असतो. हवाई सुंदरी नेहमीच प्रवासात असल्याने त्यांना तर हा धोका विशेष आहे. ह्या धोक्याची कारणे सांगताना ते म्हणतात की, विमानाला बसणारे धक्के, हवेत एकदम होणारे बदल, भावनांची खळबळ, इत्यादी अनेक कारणांनी बाका प्रसंग गुदरण्याचा संभव असतो. त्याशिवाय जेट विमानांनी दीर्घ प्रवास करणाऱ्या स्त्रियांना इतर आपत्तींना तोंड द्यावे लागते. ऋतुप्राप्तीची पाळी अनिश्चित होणे, झोप न येणे, मानसिक अस्वस्थता येणे, मनाची एकाग्रता न होणे, सारखे दमल्यासारखे वाटणे, इत्यादी अनेक शारीरिक व मानसिक दोष त्यांना जडल्याचे आढळून आले आहे. विमान प्रवासाच्या वैद्यकीय बाजूकडे अद्याप नीटसे लक्ष देण्यात येत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

**समुद्राने गिळलेली मनगटी घड्याळे**—अलिबागच्या समुद्रकिनाऱ्याजवळ एका अरब होडीचा अबकारी खात्याच्या बोटीने पाठलाग केला, तेव्हा होडीतील लोकांनी ५० लाख रुपयांची घड्याळे समुद्रात फेकून दिली. ती घड्याळे हस्तगत करण्यासाठी अबकारी अधिकारी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या व नाविक दलाच्या पाणबुड्यांची मदत घेणार आहेत.

**भिकाऱ्यांचा उपद्रव टाळण्यासाठी**—दिल्ली राज्यात भिकाऱ्यांपासून होणाऱ्या त्रासापासून हौशी प्रवाशांची सुटका करण्यासाठी एक खास पोलिस दल उभारण्यात येणार आहे. दिल्लीमधील व राज्यांतील इतर प्रेक्षणीय ठिकाणी ह्या दलाची गस्त ठेवण्यात येणार आहे. भिकारी आणि त्यांची मुले ह्यांच्यामुळे परदेशी प्रवाशांवर विशेष वाईट परिणाम होतो.

**जकातमुक्त दुकान**—इंडिया टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन-तर्फे दिल्ली येथील पालम विमानतळावर जकातमुक्त दुकान उघडण्यात आले आहे. अशा प्रकारचे भारतामधील हे पहिलेच दुकान आहे. काही निवडक आयात केलेल्या वस्तू आणि हस्तोद्योगाच्या वस्तू ह्या ठिकाणी वाजवी किंमतींना विकण्यात येतील.


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**
**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.
: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६१,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६१,९६,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रुझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

### भ्रूणहत्येवरील कायद्याची बंधने सैल होणार

कायदेशीर रीत्या भ्रूणहत्या करण्यावरील सध्याचे कायद्याचे निर्बंध सैल करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे अशी माहिती मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य व कुटुंबनियोजन खात्याचे मंत्री डॉ. एस्. चंद्रशेखर ह्यांनी त्रिवेंद्रम येथे बोलताना सांगितली. ते म्हणाले की, ह्या उपक्रमामागे लोकसंख्येस आळा घालण्याची कल्पना नसून नवजात अर्भकाचे व मातेचे जीवन सुरक्षित राखण्याचा विचार आहे. हिंदमध्ये दरसाल २·१ कोटी मुले जन्मास येतात. त्यापैकी ५० लाख मुले अपुऱ्या दिवसांची असतात. अशा प्रत्येक ४ मुलांमागे १ अपुरे मूल मुद्दाम घडवून आणलेल्या भ्रूणहत्येचा परिणाम असते. कुटुंबनियोजनाला धार्मिक आक्षेप आता राहिलेले नाहीत. ह्याला अपवाद फक्त कॅथॉलिक धर्मपंथीयांचा आहे. पण अलीकडे कॅथॉलिक धर्मपीठही ह्यासंबंधी विचार करू लागले आहे.

### शास्त्रीय शोधांचा उपयोग करावा तसा होतो

अमेरिकन नागरिकांना अलीकडे एक नवी भीती ग्रासू लागली आहे. शास्त्रीय शोधांच्या दुरुपयोगामुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर घाला पडू लागला आहे. खाजगी जीवनाचे पावित्र्यही काही नव्या शोधामुळे नष्ट होण्याच्या मार्गास लागले आहे. काही विशिष्ट प्रकारचा मालमसाला वापरून भिंतीच्या एका बाजूनेच कॅमेऱ्याने चित्र घेण्याचे साध्य करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अति सूक्ष्म ध्वनिलहरी टिपणारे यंत्र गुप्तपणे ठेवून रस्त्यापलीकडील इमारतीत चाललेले संभाषण मुद्रित करता येऊ लागले आहे. ज्या खोलीत संभाषण चाललेले असेल त्या खोलीच्या खिडक्यांच्या काचांना बसणारे आवाजाचे धक्के ह्या कामी उपयोगात आणता येतात. अशा प्रकारचे शोध गुप्त पोलिसांनी गुन्हेगारांना पकडण्यासाठी केले तर ते योग्यच होईल. परंतु ही सूक्ष्म यंत्रे सरकारच्या अगर गुप्त पोलिसांच्याच हाती राहतात असे नाही. ती आता बाजारातच मिळू लागली आहेत.

### रेल्वे खात्याला १२ कोटी रुपयांची तूट येणार

१९६६–६७ च्या आर्थिक वर्षात रेल्वे खात्याला १२ कोटी रुपयांची तूट येण्याचा संभव दिसत आहे. तुटीची दोन मुख्य कारणे आहेत. रेल्वेला कोळसा खरेदी करण्यासाठी ५ कोटी रुपये जादा खर्चावे लागले आणि रेल्वे कामगारांना अधिक महागाईभत्ता देण्यासाठी ७ कोटी रुपये अधिक खर्च करावे लागले. गेल्या मे महिन्यात रेल्वेमंत्र्यांनी रेल्वेचे अंदाजपत्रक सादर केले त्या वेळी महागाईभत्त्यातील वाढीसाठी १२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती परंतु आता भत्त्यासाठी २० कोटी रुपये द्यावे लागतील असे दिसत आहे. रेल्वे खात्याच्या अंदाजपत्रकात १·२८ कोटी रुपयांची किरकोळ शिल्लक दाखविण्यात आली होती. परंतु नंतर रेल्वे भाड्यात काही सवलती देण्यात आल्या. परिणामी ही शिल्लक कोठल्या कोठे नाहीशी झाली आहे. तूट कमी होण्यासाठी खाते आता अधिक काटकसर करणार आहे.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

आपली चलनी नोट

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक ' अर्थ '

किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.



पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास
या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वंकष निवासामध्येच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७७९१ माहिती मागवा उद्यानप्रासाद स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २



चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या
• बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
• मजबूत बांधणी
• अद्यावत् यंत्र योजना
• साईज १४", १६", १८"
फोन नं. १६९
उत्पादक—
भिडे अ‍ॅन्ड सन्स, प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

## विविध माहिती

**साड्यांचा चोरटा व्यापार**—सीलोनच्या सरकारने भारतामधून साड्यांची आयात करण्यास बंदी केलेली आहे. तरीही चोरूनमारून कितीतरी माल सीलोनमध्ये पाठविण्यात येतो. साड्यांना सीलोनमध्ये फार मोठी मागणी असल्यामुळे त्यांच्या मूळ किंमतीच्या तिप्पट-चौपट किंमती देऊनही त्या खरेदी केल्या जातात. सीलोनच्या उत्तर किनाऱ्यावर हा माल गुप्तपणे आणण्यात येतो. त्याशिवाय सीलोनचे नागरिक भारताला आले की परतताना साड्या घेऊन जातात.

**प्राप्तिकराची वसुली**—१९६६-६७ साली एकूण ६३० कोटी रुपयांची प्राप्तीवरील कराची वसुली करण्यात आली. त्यापैकी ५५ टक्के कर कंपन्यांकडून वसूल झालेला होता. प्राप्तीकराच्या कक्षेत येणाऱ्या लोकांची संख्या २७ लाख आहे व त्यापैकी २३ लाख लोकांचे उत्पन्न दरसाल १५ हजारापेक्षा कमी आहे. १ एप्रिल १९६७ रोजी प्राप्तिकराची ५४० कोटी रुपयांची थकबाकी होती.

**दवाखान्यांसाठी स्त्री डॉक्टर्स**—मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य योजनेमार्फत दिल्ली येथे चालविण्यात येणाऱ्या दवाखान्यांतून स्त्री डॉक्टर्सची नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ५० वर्षापर्यंतच्या डॉक्टर्सची एका वर्षासाठी नेमणूक करण्यात येईल. ह्या डॉक्टर्सना खाजगी व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**प्राचीन संस्कृत ग्रंथाचे प्रकाशन**—भारत सरकारने महाकाल संहिता ह्या प्राचीन संस्कृत ग्रंथाचे प्रकाशन करण्याचे ठरविले आहे. हा ग्रंथ १० खंडांत प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रकाशनाचे काम अलाहाबाद येथील एका संस्थेकडे सोपविण्यात आले आहे. ह्या कामासाठी १.२५ लाख रुपये खर्च येणार आहे.

**संततिनियमन व बढती**—म्हैसूर राज्यातील एका कारखान्याच्या चालकांनी संततिनियमनासाठी कामगारांची वार्षिक बढती तात्पुरती रद्द करण्याचे ठरविले आहे. ज्या कामगारांना तीन किंवा अधिक मुले असतील त्यांची बढती रद्द करण्यात येते. ह्या नियमाचा अपेक्षित परिणाम होऊन कामगार वाढत्या संख्येने निर्बीजीकरणाची शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी तयार होत आहेत.

**धूम्रपानाचा परिणाम**—अतिरिक्त धूम्रपानामुळे पुरुषांच्या लैंगिक जीवनावर वाईट परिणाम होतो असा इशारा एका रशियन डॉक्टरने दिला आहे. धूम्रपान करणाऱ्यांवर निकोटिन ह्या विषारी द्रव्याचा विपरीत परिणाम होऊन शरीरातील लैंगिक प्रक्रिया मंदावतात असा निष्कर्ष त्याने प्रयोगाअंती काढला आहे. रशियन पुरुषांत नपुसकत्वाचे प्रमाण वाढण्यास धूम्रपान हे एक कारण त्याने दिले आहे.

**Provisions of the Desai Bank Award**—as modified by the Bipartite Settlement 1966 (including those which continue to remain in force) (Rs. 3·00 each)

Available from the compiler

B. R. Kembhavi
940/4 Shivaji Nagar,
Poona 16.

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठी
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे....
कारण, अत्यंत कार्यक्षम व विनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिने, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत.
किर्लोस्कर एंजिनें चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सना लागणाऱ्या खर्चापेक्षा मानाने फारच कमी येतो.



किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत).
TOM & BAY

**आंध्र राज्यातील प्रवासाच्या सोयी**—आंध्र राज्यातील हौशी प्रवासाच्या सोयी वाढविण्याच्या हेतूने राज्य सरकारने दोन आराम मोटार गाड्या खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी १·२ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्याच-प्रमाणे राज्य सरकारचे पर्यटन खाते हैदराबादहून काश्मीरला जाण्यासाठी एका खास रेल्वेगाडीची व्यवस्था करीत आहे.

**वृद्ध रोग्यांना वाचवू नका**—जे वृद्ध रोगी ६५ वर्षे वयाच्या पुढे असतील, किंवा छातीचा विकार असलेले अगर मूत्रपिंडाची व्यथा असलेले असतील आणि मरणोन्मुख असतील तर त्यांना वाचविण्याचे आटोकाट प्रयत्न करू नका अशा सूचना लंडन-मधील एका इस्पितळात देण्यात आल्या आहेत. ह्या सूचनांसंबंधी ब्रिटनच्या आरोग्यमंत्र्यांनी चौकशीचा हुकूम दिला आहे.


**संरक्षणविषयक स्वयंपूर्णता**—१९६५ मध्ये भारत व पाकिस्तान ह्यांच्यात युद्ध सुरू झाल्यावर परदेशांकडून मिळणारी लष्करी सामानाची मदत बंद झाली आणि भारताचे परावलंबन स्पष्ट झाले. तेव्हापासून लष्करासाठी लागणाऱ्या अनेक प्रकारच्या मालाचे देशातच उत्पादन करण्याकडे लक्ष देण्यात येऊ लागले. आता लष्कराला लागणाऱ्या ७ हजार प्रकारच्या वस्तू तयार करण्यात येतात. ह्या वस्तू लष्कराला पसंत पडल्या आहेत.

**तनखे बंद झाले तर**—संस्थानिकांचे तनखे बंद करण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ते बंद करण्यात आल्यास माजी राजे, महाराजे आणि त्यांचे नातेवाईक ह्यांनाच फक्त बाधा होईल असे नाही. देवस्थाने, धर्मादाय खर्च, ह्यावरही परिणाम होईल. त्रावणकोरच्या महाराजांचा तनखा बंद झाल्यास त्रिवेंद्रम येथील प्रसिद्ध पद्मनाभस्वामी मंदिराची व्यवस्था ठेवणे अवघड होणार आहे.

**मोठ्या नद्या जोडण्याची कल्पना**—खादी आणि ग्रामो-द्योग मंडळाचे अध्यक्ष श्री. धेबर ह्यांनी राजकोट रोटरी क्लबपुढे बोलताना अशी सूचना केली की भारतामधील मोठ्या नद्या कालव्यांच्या साह्याने परस्परांना जोडण्यात याव्या. गंगा, यमुना गोदावरी, नर्मदा, कृष्णा आणि कावेरी ह्या नद्या जोडण्यात आल्यास पाण्याचे दुर्भिक्ष टळू शकेल असा विचार त्यांनी व्यक्त केला.

**काजूची निर्यात**—काजूच्या निर्यातीत व काजूच्या टरफलापासून तयार केलेल्या तेलाच्या निर्यातीत भारताने १९६६–६७ साली उच्चांक गाठला आहे. निर्यातीमुळे ४४ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळाले. पुढच्या वर्षी ह्या मालाची निर्यात वाढवून ५० कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळविता येणे शक्य आहे.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —

( विश्रामबाग – सांगली महाराष्ट्र )



द. सा. द. शे. रुपये

७·६२/–

पर्यंत व्याज आपण मिळवू शकता

ठेवीची मुदत मोठी म्हणजे व्याज मोठे

एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते
इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी :—सातारा
सत्तावीस शाखा

# विदेशी तज्ज्ञांच्या दृष्टीला दिसलेले ब्रिटिश बँकर्स

## अमेरिकन व इतर बँकांच्या मानाने ब्रिटिश बँका अप्रगत

ब्रिटिश बँकर्सना अद्याप आधुनिक व्यवस्थापनाचे शास्त्र शिकावयाचे आहे, असा एका विदेशी तज्ज्ञ बँकरचा, ब्रिटिश बँकांची काळजीपूर्वक पाहणी केल्यानंतरचा, अभिप्राय आहे. त्यांचे जनरल मॅनेजर्स उत्कृष्ट बँकर्स असले, तरी ते कारभारी ह्या दृष्टीने फारच मागासलेले आहेत. बँकेतील अधिकारी व कर्मचारी, नव्या शाखांच्या जागांची निवड, कोणत्या सेवेला किती सर्व्हिस चार्ज लावावयाचा, इत्यादि बाबतीत त्यांना पुरेशा तपशीलवार माहितीचे अभावीच निर्णय घ्यावा लागतो. ह्या बाबतीत काही व्यवस्थापनाची तंत्रे निर्माण झालेली आहेत, त्यांची कित्येक बँकांना अद्याप माहितही नाही. कामाची आखणी व पद्धती, काम्प्यूटर्सचा उपयोग, कॉस्ट अकाउंटिंग, आकडेवारी माहितीची जुळणी व संशोधन, इत्यादी बाबतींत कित्येक विदेशी बँका खूपच पुढे गेलेल्या आहेत.

कॉस्ट अकाउंटिंग, नव्या शाखा, इत्यादींसाठी खास खाती उघडण्यात आली असली, तरी त्यांचा उद्देश इतर बँकांशी बरोबरी दाखविण्याइतपतच मर्यादित असतो. ह्या खात्यांकडून नेमकी कशाची अपेक्षा करावयाची, ह्याची बँकेच्या चालकांनाच नीटशी कल्पना नसते, कारण तेच स्वतः त्या बाबतीत अनभिज्ञ असतात. ह्या खात्यांतील तज्ज्ञहि स्वतःचे निष्कर्ष पुढे मांडण्यास धजावत नाहीत; कित्येक वेळा हे तज्ज्ञ म्हणजे दुसऱ्या खात्यातून बदली केलेले मामुलीच लोक असतात.

परसोनेल खाती बँकांतील नोकरांची निवड व त्यांचे प्रशिक्षण व्यवस्थित करतात. परंतु सर्वच बाबतींत स्पेशलायझेशनची आवश्यकता असते, हे अद्याप नीट उमगलेले नाही; त्यामुळे उत्तम प्रकारे निवडलेल्या ह्या लोकांचा पुढे काय उपयोग करावयाचा, ह्याच्या ज्ञानाचा अभावच आहे.

ब्रिटिश बँका कॉस्ट अकाउंटिंगमध्ये फारच मागे आहेत; अमेरिकन बँका खूपच पुढे गेलेल्या आहेत. आपल्या खातेदारांना कशासाठी किती चार्ज आकारावा, हे त्यामुळे त्यांना नीट समजते. बँकिंगच्या विविध अंगांचा किफायतशीरपणा त्या जाणतात. एखादी सुधारणा घडवून आणली तर तीपासून होणाऱ्या फायद्याची त्यांना अगाऊ कल्पना येऊ शकते. ब्रिटिश बँका कॉस्ट अकाउंटिंगमध्ये मागे असल्यामुळे त्यांना सर्व गोष्टी चाचपडतच कराव्या लागतात.

नव्या शाखा उघडण्याच्या बाबतीत हाच प्रकार आहे. इतर देशांतील बँका जशी तपशीलवार पाहणी करतात, तशी ब्रिटिश बँका करीत नाहीत. त्यामुळे त्या बँकांची संबंधित खाती स्वतः काहीही न सुचवता इतरांच्या सूचनांची वाट पाहात बसतात.

ब्रिटिश बँका कॉम्प्यूटर्स वाढत्या प्रमाणावर उपयोग करू लागल्या आहेत, पण ह्याही बाबतीत अमेरिकन बँका खूपच पुढे आहेत. ब्रिटिश बँकांच्या ग्रेटब्रिटनमधील सर्व शाखांतील चालू खात्याचे काम ही यंत्रे करू लागण्यास कित्येक वर्षे लागतील. जगातील कित्येक देशांतील कित्येक बँकांतून चालू खात्यांचीच नव्हे, तर कितीतरी विविध प्रकारच्या बँकिंगची कामे यंत्रे करू लागली आहेत.

हजारो कर्मचारी नोकरीवर असणाऱ्या प्रचंड बँकांच्या चालकांना व्यवस्थापक ह्या दृष्टीने आपण काय काय करायला हवे, ह्याची जाणीवच नाही हेच खरे. ते स्वतः नामांकित बँकर्स असले तरी त्यांना योग्य प्रकारचा पुढाकार घेताच येत नाही. कारण त्यांनी आधुनिक व्यवस्थापन शास्त्राचे पुस्तकी ज्ञानही मिळविलेले नाही आणि त्याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभवहि नाही.

---

### रशियातील विद्यार्थ्यांचे सुटीतील श्रमदान

शाळा–कॉलेजांतील विद्यार्थ्यांना सुटीचा काळ घालविण्याची कधी कधी पंचाईत पडते. भारतात अलीकडे सुटीच्या काळात विद्यार्थी श्रमदान करू लागले आहेत. परंतु त्याचे प्रमाण फार अल्प आहे. रशियातील विद्यार्थी सुटीच्या फावल्या वेळात आर्थिक विकासाच्या अनेक कामांत भाग घेतात. अलीकडे एक लाख रशियन विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या ह्या मोहिमेत उत्साहपूर्वक भाग घेतला. श्रमदानाची संघटना करताना विद्यार्थ्यांचा कल आणि तो घेत असलेले शिक्षण ह्याचा विचार केला जातो व मगच त्याला काम देण्यात येते. कझकस्तानात इंजिनिअरिंगचे विद्यार्थी एक वसाहत वसविण्याचे काम करीत आहेत. ह्या वसाहतीत ८,००० कुटुंबांची सोय करण्यात येत आहे. पश्चिम सायबेरिआतील एका धरणावरही रशियन विद्यार्थी काम करीत आहेत. मध्य आशियातून मॉस्कोपर्यंत तेलाचे नळ टाकण्याच्या कामातही विद्यार्थी खपत आहेत.

---

### प्रथिनांच्या दुर्भिक्षाचा मेंदूवर परिणाम

" भारताच्या लोकसंख्येपैकी ४०% पंधरा वर्षांखालील आहे. त्यांच्या आहारांत प्रथिनांचा तुटवडा पडत असल्यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीवर अतिशय विपरीत परिणाम होणार आहे. चवथे वर्ष लागण्याच्या आधी मानवी मेंदूची ८० ते ९० % वाढ पुरी होते आणि ह्या काळात मुलांना प्रथिनयुक्त अन्न पुरेसे मिळाले नाही तर त्यांच्या मेंदूची वाढ नीट होणार नाही." इंडियन ॲग्रिकल्चरल रीसर्च इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर डॉ. एम. एस. स्वामिनाथन् ह्यांनी दिलेला इशारा.

---

### आकाशयानासाठी हैड्रोजन बाँब

पश्चिम जर्मनीत राहणाऱ्या एका अमेरिकन शास्त्रज्ञाने छोट्या हैड्रोजन बाँबच्या स्फोटातून उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा वापर आकाशयानासाठी करण्याचा विचार चालविला आहे. दोन ग्रहांमधील प्रवास करणे अशा प्रकारच्या आकाशयानाने सुलभ होण्याची शक्यता आहे, असा त्याचा दावा आहे.

# नहीं—
# यह कोई साधारण कार्य नहीं!


# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

**हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ**

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.


मूल्य रु. २
( वा. वर्गणी ६ रु. )

Licence No. ..
Licenced to post
without prepayment

# अर्थ

नोव्हेंबर
१९६७

दिवाळी
विशेषांक


**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी, जि. सांगली.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरवी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

# दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना ३७६१०२


दीपावली शुभचिंतन
दिवाळी व नूतन वर्ष आमच्या ग्राहकांस व हितचिंतकांस सुखसमृद्धीचे व आनंदाचे जावो.
किर्लोस्कर
दर्जेदार डिझेल एंजिनांचे भारतातील अग्रेसर उत्पादक,
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड
रजि. ऑफिस एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणे-३ ( भारत ).
TOM & BAY KQ: 6751M

## दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना : १९४२ ] तालुका : बेळगांव [ फोन नं. ५३५

२६ व्या वर्षाची प्रगतिपर वाटचाल :—

| प्रगतिपर आलेख | | १९४२ | १९६० | १९६५ |
|---|---|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. | ३,४२५ | १,१०,६०५ | २,४२,८०० |
| राखीव व इतर निधी | रु. | १,४४ | १,०७,००४ | ३,१२,४९० |
| गुंतवणूक | रु. | — | ४,१६,०१८ | १७,३८,७१३ |
| ठेवी | रु. | — | १३,८४,६०३ | ३२,७८,९२१ |
| एकूण खेळते भांडवल | रु. | ३,५१६ | १६,७७,६४१ | ४०,३३,२७४ |

उल्लेखनीय बाबी :—

१] सन १९५९ साली शहरात ऑफिससाठी भव्य इमारतीची खरेदी.
२] सन १९६१-६६ व ६६-६७ साली शे. ९ टक्के करमुक्त डिव्हिडंड वाटप.
३] सन १९६७ साली गोडाऊन व कर्मचारी निवास यासाठी शहरातील एका भव्य वाड्याची खरेदी.
४] उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्तीची तरतूद.
५] कायम ठेवीवर शें ४½ ते ८ टक्के व्याज.
६] आरंभापासून बँकेचा " अ " वर्ग.
७] माफक व्याजाच्या दराने गोडाऊन व इतर तारण कर्जे.
८] सर्व प्रकारच्या बँकिंगच्या व्यवहाराची व्यवस्था. आजपासून आपला व्यवहार या बँकेत सुरू करून आपली सेवा करण्याची

सुसंधी द्या.

अर्जुनराव गोविंदराव घोरपडे,
चेअरमन.



[ स्थापना १९२१ ]

## गरगट्टी अँड सन्स

शहापूर-बेळगाव

धोबी, फॅमिली व शिंपी
पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे देश-
बांधवांस हे वर्ष
सुखाचे जावो !



दीपावली व नूतन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना
सुखाचे व भरभराटीचे जावो !

सेवा – सहकार – सचोटी

हे आमच्या बँकेचे आधारस्तंभ होत.

## दि बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

हेड ऑफिस : १५० भांदुर गल्ली, बेळगाव.

प्र ग ती चे पा ऊ ल

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ८५,००,००० | ठेवी | रु. ३,३१,२२,५०० |
| वसूल झालेले | रु. ४२,५५,७०० | खेळते भांडवल | रु. ५,९५,६४,६०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. १७,९०,४०० | दिलेले कर्ज | रु. ४,३६,०९,९०० |

ही बँक शहरी व ग्रामीण जीवन सुधारणेच्या कामी, त्याचप्रमाणे अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दराने कर्जे देऊन सर्वतोपरी साहाय्य करीत आहे. तसेच, त्यांच्या मालास योग्य किंमत येऊन त्यांचा धंदा किफायतशीर व्हावा यासाठी सेल सोसायट्या व विविधोद्देश संघामार्फत विक्री करून देण्याच्या कामी त्यांना मदत करीत आहे.

या बँकेच्या सर्व शाखांमध्ये चालू व सेव्हिंज बँक ठेवी, एक महिन्यापासून पाच वर्षांवरील मुदती ठेवी व तसेच रिकरिंग ठेवी स्वीकारण्यात येतात. तसेच सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहारही केले जातात.

बेळगाव बझार, बैलहोंगल व सौंदत्ती येथील शाखांमध्ये मौल्यवान जिनसांच्या सुरक्षिततेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था आहे. जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये आमच्या २१ शाखा आहेत.

जी. व्ही. घोडगेरी, व्हाईस प्रेसिडेंट.

विशेष माहिती बँकेचे ऑफिसमध्ये मिळेल.

एम्, एस्. होसमनी, प्रेसिडेंट.

# अर्थ

**दिवाळी अंक**

१ नोव्हेंबर १९६७





स्थापना : १९३५

*संस्थापक :*

प्रो. वामन गोविंद काळे

*संपादक :*

श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

## हो दिवाळी व नवें वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांना व वाचकांना सुखाचे जावो !

### अ नु क्र म णि का


१ साप सोडून दोरखंड झोडपू नका. ५

२ बँकिंगची सर्वांगीण पाहणी होण्याची आवश्यकता. ७

३ बँकेच्या मॅनेजरची तारेवरची कसरत. ९

४ भारतामधील अर्थसत्तेच्या केंद्रीकरणावर प्रकाश. १७

५ आशिया–आफ्रिकेतील देशांचे दारिद्र्य. २७

६ सहकारी संस्थांच्या काही समस्या. २९

७ हिंदी कारखानदारीतील फॉरिन कोलॅबोरेशन. ३१

८ आयुर्विमा कॉर्पोरेशनचा खर्चिक कारभार. ३३

९ मागासलेल्या देशांचा विकास. ३५

१० उद्योगधंद्यांतील अधिकाऱ्यांपुढे उभ्या राहणाऱ्या अडचणी. ३९

११ व्याजाच्या रकमेतून इन्कमटॅक्स. ४३

१२ परदेशस्थ लक्षावधी हिंदी लोकांवर गडांतर. ४७



*दिवाळी आणि नवे वर्ष आपणांस सुखाचे जावो !*

# दि बेळगांव बँक लिमिटेड

**रजिस्टर्ड ऑफिस : ६५९।३० रविवार पेठ, बेळगांव**

स्थापना : १९३० ] ★ [ शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | : | रु. ८ लाखांचे वर |
| रिझर्व्हज् | : | रु. ७·८४ लाख |
| ठेवी | : | रु. ४ कोटी, ८ लाखांचे वर |

—संचालक मंडळ—

(१) श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

(२) श्री. एस. एम. मुनूर, व्यापारी, व्हाइस चेअरमन

(३) श्री. एम. जी. हेरेकर, लँडलॉर्ड व बँकर

(४) श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस.सी., एलएल. बी.

(५) श्री. एस. व्ही. कलघटगी, व्यापारी

(६) श्री. एच. एस. कुलकर्णी, बी. ए. ( एक्स–जनरल मॅनेजर )

★ म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्य व गोवा प्रदेश ह्यांची ३८ शाखांच्या द्वारा बँकिंग सेवा करीत आहो. ★

आमच्या महाराष्ट्रातील शाखा—चिपळूण, देवगड, कणकवली, मालवण, शिरोडा, सावंतवाडी, वेंगुर्ला, मिरज, माधवनगर ( सांगली ), बार्शी, जयसिंगपूर, गडहिंग्लज, कोल्हापूर, मुंबई ( मांडवी ).

श्री. आर. आर. कुलकर्णी

जनरल मॅनेजर

# दि मिरज स्टेट बँक लि., मिरज

( रजिस्टर्ड ऑफिस : मिरज )

## खेळते भांडवल : दीड कोटीचे वर

*मुदत ठेवींचे दर .*

| मुदत ठेव | दरसाल दरशेकडा व्याज |
|---|---|
| ( १ ) मुदत ९१ दिवस ... ... | ६ % |
| ( २ ) मुदत सहा महिने ... ... | ६¼% |
| ( ३ ) मुदत नऊ महिने ... ... | ६½% |
| ( ४ ) मुदत एक वर्ष ... ... | ७ % |
| ( ५ ) मुदत दोन वर्षे ... ... | ७¼% |
| ( ६ ) मुदत तीन वर्षे } ( ७ ) मुदत चार वर्षे } ... ... | ७½% |
| ( ८ ) मुदत पाच वर्षे ... ... | ७⅝% |
| ( ९ ) मुदत सहा वर्षे, सात वर्षे, आठ वर्षे | ७¾% |

रिकरिंग डिपॉझिट योजना चालू केलेली आहे.

बँकेच्या शाखा : **सांगली** (गणपती पेठ), **सांगली** (मार्केटयार्ड),

**पंढरपूर, बार्शी, कुर्डुवाडी, करमाळा, सांगोला, माढा व लक्ष्मेश्वर** ( जि. धारवाड )



**ही दिवाळी व नूतन वर्ष बँकेचे सभासदांस व खातेदारांस**
**★ सुखसमृद्धीचे व उत्कर्षाचे जावो. ★**

# दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., पंढरपूर

**सेवा—सहकार्य—तत्परता हीच आमची वैशिष्ट्ये**

*स्थापना १९१२*

हेड ऑफिस : पंढरपूर ] ऑडिट वर्ग "अ" [ शाखा : सांगोला

| | | |
|---|---|---|
| स्वतःचे भांडवल ( शेअर, रिझर्व्ह फंड, वगैरे ) | ... | रु. ४,९२,५०० |
| ठेवी | ... | रु. ३४,०१,००० |
| एकूण खेळते भांडवल | ... | रु. ४०,१०,१०० |

सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारल्या जातात. सभासद प्रॉ. ठेव, रिकरिंग ठेव, अल्पबचत ठेव, इत्यादी ठेवींच्या अभिनव योजना कार्यवाहीत आहेत. सवलतीच्या दराने सर्व प्रकारची कर्जे दिली जातात. सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम सोय असून नाइट सेफ डिपॉझिटरीची योजना कार्यान्वित आहे. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

| पं. रा. कुलकर्णी जी. डी. सी. अँड ए. | प्र. दा. पुरंदरे | पां. द. आराध्ये |
|---|---|---|
| मॅनेजर | चेअरमन | अध्यक्ष |



**दिवाळीनिमित्त आमच्या हार्दिक शुभेच्छा !**

**शेकडो शेतकऱ्यांनी वापरून अत्युत्कृष्ट असल्याचा अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच प्रगतिपर शेतकरी**

टे. फो.—बँक-२२ ऑइल मिल-५० मिश्रखत गोडाउन-५६

# दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरी ( जि. कोल्हापूर ) निर्मित

| | | |
|---|---|---|
| १४:५:५ | **पैसाफंड** | १२:६:० |
| १०:५:२ | **मिश्रखत** | ६:१२:० |
| ९:९:५ | ट्रेड मार्क | ९:९:० |

सर्व पिकांकरिता वापरणे पसंत करतात. आपण एक वेळ अनुभव घेतल्यास कमी पैशात भरपूर मोबदला मिळाल्याचे समाधान आपणासही लाभेल. खात्री करून घ्या.

| आ. बा. नाईक | एल. वाय. पाटील |
|---|---|
| मॅनेजिंग डायरेक्टर | चेअरमन |

दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरी



# सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा

निधर्मी सहकारी समाजवादाचे ध्येय उराशी बाळगून सातारा जिल्ह्याचा आर्थिक कायापालट करणेस सदैव सिद्ध असणारी ही बँक आपल्याही सेवेस सिद्ध आहे.

**बँकेचा आर्थिक पसारा**

| | | |
|---|---|---|
| १ ] भाग भांडवल | रु. | ७६,२०,००० |
| २ ] ठेवी | रु. | ३,८२,००,००० |
| ३ ] दिलेली कर्जे | रु. | ५,०७,००,००० |
| ४ ] खेळते भांडवल | रु. | ७,३५,००,००० |

**य्यं. ज्ञा. भोसले, बी. कॉम., जी. डी. सी. ए.,**
**व्यवस्थापक**

| मु. रा. भोईटे, बी. ए., एलएल. बी., | किसन महादेव वीर, एम. एल. सी. |
|---|---|
| उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# साप सोडून दोरखंड झोडपू नका!

## हे तात्कालिक-स्लंप-डिप्रेशन नव्हे; भिनलेले रिसिजनच आहे.

लेखक : बिंदुमाधव कानेटकर, किर्लोस्कर उद्योग समूहाचे आर्थिक सल्लागार

काही आठवड्यांपूर्वी हैद्राबाद येथे बोलताना उपपंतप्रधानांनी प्रचलित गंभीर आर्थिक समस्येला केवळ 'स्लंप' संबोधून तिची तीव्रता कमी भासविण्याचा प्रयत्न केला. रिसिजन (ओहोटी) हा शब्द वापरणे त्यांना परवडणारे नव्हते; तो शब्द फार परखड आणि भयसूचक त्यांना वाटला असावा; कारण, हिंदी आर्थिक परिस्थितीचे अतिनिराशजनक वर्णन करणारा तो शब्द आहे.

कदाचित हे सर्व असे असेलही; आपण फक्त 'मर्यादित मंदी' मध्ये सापडलेले असूही. पण अर्थशास्त्रामध्ये काही शब्दांना विशिष्ट अर्थ असतात आणि त्यांच्या दीर्घकाळ वापराने त्यांना ते अर्थ चपखल चिकटून राहिलेले असतात. आजच्या हिंदी आर्थिक परिस्थितीपेक्षा खूपच गंभीर आणि उलथापालथ करणाऱ्या प्राप्तदशेला स्लंप हा शब्द बहुधा लावला जातो. स्लंप ह्या शब्दाची डिप्रेशन ह्या शब्दाशीच बरोबरी होऊ शकते; १९३० नंतरच्या त्या भयानक आणि निराशाजनक दहा वर्षांचे वर्णन करताना अर्थशास्त्रज्ञ ह्या दोन्ही शब्दांचा आलटून पालटून उपयोग करीत असत. मराठीमध्ये हे फरक दाखविणारे प्रतिशब्द अद्याप तयार व्हावयाचे आहेत.

सध्याच्या अगतिकतेला स्लंप न म्हणता रिसिजनच म्हणणे मी पसंत करतो, कारण त्यामुळे परिस्थितीचे यथार्थ वर्णन होऊ शकेल; अनुरूप नसलेला वेगळा शब्द वापरून अप्रिय गोष्टी झाकण्याचा प्रयत्न करण्यात काय अर्थ आहे? किंमती, वैयक्तिक, कौटुंबिक आणि धंद्याच्या मिळकती, विक्री, नफे, रोजगार, शेअर्सच्या किंमती आणि त्यामागोमाग व्याजाचे दर, हे सर्व अतिशय गतीने घसरगुंडीला जेव्हा लागतात, तेव्हा त्याला स्लंप असे म्हणावयाचे. पण, तशी आज परिस्थिती नाही. ह्या परिस्थितीपासून आपण फार दूर आहो आणि दैव अनुकूल झाले, तर असेच दूर राहूही. रिसिजनमध्ये स्लंपची आणि डिप्रेशनची भर पडली, म्हणजे गंडस्योपरि पिटिका संवृत्ता अशी आपत्ती ओढवायची!

समाजाच्या एकूण आर्थिक मागणीमध्ये निःसंदिग्ध प्रचंड प्रतिकूल फरक पडतो, तेव्हा ती रिसिजनची परिस्थिती आहे असे सामान्यपणे म्हटले जाते. एकाद्या जिनसाची किंवा सेवेची मागणी वाढत जाते, पण ह्या वाढीची वाटणी अशी होते की काहींचा खप वाढतो तर काहींचा उतरतो; अशा परिस्थितीला अर्थातच रिसिजन म्हणता येणार नाही. सायकली, शीट ग्लास, डिझेल इंजिने, इत्यादींच्या बाबतीत १९६२ पासून असे घडले आहे. पण गेल्या पाच वर्षांत रिसिजनची ओरड कुठे ऐकू आली नाही; आताच ती ऐकू येत आहे.

खरे सांगावयाचे म्हणजे, काही इंजिनिअरिंगच्या कारखान्यांची एकूण विक्री घटत आहे, हे स्पष्ट दिसून येत असले तरी इतर काहींच्या बाबतीत तशी फारशी लक्षणे दिसत नाहीत; त्यांच्या ऑर्डरींची संख्या पूर्वीच्या मानाने कमी झाली असेल एवढेच. हे दुसरे-तिसरे काही नसून केवळ स्पर्धेचा परिणाम आहे आणि स्पर्धेचे स्वागतच करायला हवे. रिसिजन आणि स्पर्धा (विक्रेत्यांच्या बाजारपेठेची खरेदीदारांच्या बाजारपेठेकडे वाटचाल) ही एकमेकांशी आता इतकी निगडित झालेली आहेत, की वैयक्तिक उद्योगधंद्यांची तपशीलवार पाहणी केल्याखेरीज परिस्थितीचे वास्तव दर्शन आपणास घडणे कठीणच आहे.

युरोपचा किंवा अमेरिकेचा कालच दौरा करून परतलेले कित्येक नामवंत उद्योगपती सांगतात की आज आपल्या देशात जे घडत आहे, ते जागतिक घडामोडीपेक्षा वेगळे काही नसून केवळ त्यांचाच तो एक भाग आहे. युरोप-अमेरिकेवर आणि पश्चिम आशियावर रिसिजनची छाया पसरलेली आहे, हे मी अमान्य करीत नाही. त्याची आपल्या निर्गत व्यापाराला झळ लागलेली असणारच. त्याचप्रमाणे, आयातीवरील बंधने कमी करण्याच्या धोरणामुळे अंतर्गत उत्पादनाच्या मागणीवरही प्रतिकूल परिणाम झालेला असणार. निर्गतीला प्रोत्साहन देणारी एक्सपोर्ट इन्सेन्टिव्हजची जागा भरून काढण्यात रुपयाचे अवमूल्यन यशस्वी होऊ शकलेले नाही, त्याचेही कारण जागतिक रिसिजन हे असू शकेल.

हे सर्व खरे असूनही, तेवढ्याने पुरेसा उलगडा होत नाही. कारण, भारताच्या आजच्या आर्थिक दुरावस्थेचे मूळ भारताच्या अर्थकारणातच मुरलेले आहे. आपल्या उत्पादनाचे कर्ते भागीदार, आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाची घडण व त्याचे घटक, त्याचप्रमाणे उपभोक्त्या गिऱ्हाइकीचे स्वरूप, ह्यांचा प्रस्तुत रिसिजनशी अत्यंत निकटचा संबंध आहे.

(१) आज उद्योगधंद्यांची कितीही वाढ झालेली वाटली, तरी राष्ट्रीय उत्पन्नापैकी सुमारे ४५% उत्पन्न शेतीपासून प्राप्त झालेले असते.

(२) आपल्या शेतीच्या उत्पादनापैकी सुमारे ६५% उत्पादन अन्नधान्याने व्यापलेले असते.

( ३ ) अन्नधान्याचे आणि औद्योगिक कच्च्या मालाचे वार्षिक उत्पादन ह्यांचा एकूण मागणीवर जो प्रचंड परिणाम होतो, त्यामानाने त्या उत्पादनाच्या दीर्घकालीन प्रवृत्तीचा काहीच होत नाही, हे स्पष्ट करायला हवे.

१९६५–६७ ह्या कालात ह्या गोष्टीची जाणीव अगदी स्पष्टपणे, तीव्रतेने झाली. त्या मुदतीत अन्नधान्याचे उत्पादन २०% ने कमी झाले, अन्नधान्याच्या किंमती ४२% ने वाढल्या, औद्योगिक कच्चा माल ४५% ने महागला; म्हणजे अन्नधान्याच्या उत्पादनातील तुटीच्या मानाने कितीतरी भारी प्रमाणात ही सर्व महागाई झाली. अन्नधान्याच्या उत्पादनात इकडे घट होत असताना लोकसंख्या भरमसाठ फुगत चालली आणि खाणाऱ्या तोंडांत दरसाल ५० लाखांची भर पडत गेली. आर्थिक समस्येच्या ह्या दुसऱ्या गंभीर बाजूचा विचार येथे केलेला नाही.

इकडे, १९६६–६७ मध्ये, अन्नधान्याचे प्रत्यक्ष उत्पन्न ४२% वर उतरले, तरी त्याचा पैशातील मोबदला ५१% अधिक झाला. ह्याचा अर्थ, एकूण राष्ट्रीय उत्पन्न आणि व्यापारी देवघेव ह्यांची फेरवाटणी होऊन ती शेतीच्या क्षेत्रालाच उपकारक झाली.

शेतीला नव्याने हाती आलेल्या ह्या पैशापैकी बराच मोठा भाग बड्या शेतकऱ्यांच्याच वाट्याला आला असणार. म्हणजे, अन्नधान्याचे उत्पादन घटल्यामुळे भरभराटीत असलेल्या शेतकऱ्यांचीच आणखी भरभराट झाली असणार असे बव्हंशी म्हणता येईल; उतू गेलेला काही पैसा इतर शेतकऱ्यांच्या वाट्यास काही अंशीं आला असला, तरी त्यामुळे सर्व शेतकऱ्यांचा फायदा झाला असे सरसकट विधान करता येणार नाही.

काहीही असो, कारखान्यांनी उत्पादन केलेल्या जिनसा विकत घेण्याची सर्वसाधारण शेतकऱ्याची सरासरी आर्थिक पात्रता अद्यापही अत्यंत मर्यादित आहे; तशी त्याची प्रवृत्तीही नाही. सोने, शेतीची अवजारे, ह्यावर आणि प्रतिष्ठेच्या परंपरागत कल्पनांवर आधारलेल्या गोष्टींवरच खर्च करणे तो पसंत करतो. कारखान्यात तयार होणाऱ्या जिनसांना अद्याप शहरवासीयांच्या मागणीवरच मुख्यतः अवलंबून राहावे लागते, आणि शहरी लोकांना तर पूर्वीइतकेच खाद्य मिळविण्यासाठी पूर्वीच्या मानाने दुप्पटतिप्पट खर्च करावा लागत आहे. त्यामुळे त्यांच्या ऐच्छिक खर्चाला, विशेषतः १९६५ पासून, वावच उरलेला नाही.

आकड्यात सांगितले तर हे अधिक स्पष्ट होईल. आपल्या येथील अर्थ अवस्थेत 'गरजेखातर' आणि 'ऐच्छिक' खर्चाच्या क्षेत्रांचे दरम्यान खूप मोठा अडसर आहे आणि तो ओलांडणे शेकडा ९५ लोकांना अशक्यप्राय आहे; त्या सर्वांना गरजा भागविता भागविताच नाकी नव येतात; मग ऐच्छिक खर्चाला वाव कोठून राहणार? शेतीच्या उत्पादनाच्या पातळीवर जिनसांचा उपभोग व त्यासाठी केला जाणारा खर्च अवलंबून राहतो; बचतीचे मानही त्यावरच अवलंबून राहते; त्यामुळे शेतीचे उत्पादन कमी-अधिक होईल त्याप्रमाणे ह्या दोन्ही गोष्टी बदलत राहतात. १९६५-६७ ह्या काळाप्रमाणे शेतीच्या उत्पादनात एकाएकी खूप घट झाली म्हणजे उद्योगधंद्यांत रिसिजन येणार, हे ठरल्यासारखेच आहे. शेतीचे उत्पादन सुधारले म्हणजे लोकांना खायला, पांघरायला अधिक उपलब्ध होऊ लागते, पण अजून अन्न आणि अगदी प्राथमिक गरजा ह्यांवरच ते एवढ्या मोठ्या प्रमाणावर अपरिहार्यपणे उपयोगात आणले जाते, की त्याचा इतर उपभोग्य जिनसांकडे फारसा कल जाऊ शकत नाही.

राष्ट्रीय उत्पन्नापैकी फार तर २०% उत्पन्न गिऱ्हाइकांच्या खुषीच्या खरेदीला पात्र होऊ शकते. जनतेला ठराविक किंमतीला अन्नधान्य मिळू शकत नाही, हे माझ्या मते सध्याच्या रिसिजनचे मध्यवर्ती कारण आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे अन्नधान्याच्या किंमतीत फार चढ-उतार झाला, तफावत पडली, म्हणजे आपले सर्व गलबतच हादरू लागते; आपण बुडून जाऊ की काय, अशी भीती वाटू लागते. अन्नधान्य आघाडीवर जरा मोठा गोंधळ उडाला, की लागलीच ऐच्छिक खर्चाला आवश्यक ती कूसच उरत नाही आणि कापडासारख्या अगदी प्राथमिक गरजेच्या जिनसांच्याही खपावर त्याचा परिणाम दिसून येतो.

भारतासारख्या विकसनशील देशातील माणसांचा ( ठराविक किंमतीला मिळणाऱ्या ) अन्नाचा दरमाणशी उठाव वाढल्याखेरीज भरपूर प्रमाणात स्कूटर्स, मोटार सायकली, शिवणाची यंत्रे, पंखे, मोटारी, प्रवास, इत्यादी अधुनिक सुखसोयींच्या जिनसांच्या उठावावर फार मोठे दडपण राहणे अपरिहार्य आहे.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, भारतासारख्या विकसनशील देशांना शेतीच्या आणि अन्नधान्याच्या उत्पादनात मोठा, विसंबून राहता येईल असा आणि विविधतापूर्ण वाढावा निर्माण करता आल्याखेरीज त्यांच्या ऐच्छिक उपभोगाच्या पद्धतीत मोठा फरक घडवून आणण्यास आवश्यक ती साधनसमृद्धी अथवा बाजारपेठ ते देश उपलब्ध करून देऊ शकणारच नाहीत. ह्या अर्थाने, भारताच्या अर्थकारणात रिसिजन भिनलेले आहे व ते तसेच काही काळ मुरलेले राहणार.

दुर्दैवाने, ह्या साध्या, मूलभूत गोष्टीची व्यापार–उद्योगधंद्यांतीलही फारच थोड्यांना जाणीव आहे. हिंदी अर्थव्यवस्थेला स्वयंपूर्ण विकासप्रत नेण्यास औद्योगिक अस्त्राचाच वापर करायला हवा, हे त्यांना सांगितलेले सहज पटते. कारखानदारी अस्त्र मानले, तर त्याचे प्रक्षेपण शेतीच्या पायठ्यावरूनच करायला हवे, ह्याचे मात्र क्वचितच आकलन होते.

# बँकिंगची सर्वांगीण पाहणी होण्याची आवश्यकता

## चौकशी मंडळ नेमण्याची वेळ आली आहे

ब्रिटिश राजवटीच्या अखेरच्या ५० वर्षांत तज्ज्ञांची अनेक चौकशी मंडळे नेमण्यात आली. ह्या मंडळांनी देशातील सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनाविषयी अनेक अंगांनी पाहणी केली. भारतामधील चलनाचा व परदेशीय हुंडणावळीविषयीचा इतिहास पाहिला तर अशा प्रकारच्या अनेक कमिट्या आणि कमिशन्स नेमण्यात आल्याचे आढळून येते. ही सर्व कमिशन्स अगर कमिट्या ब्रिटनमधील ब्रिटिश रॉयल कमिशनच्या धर्तीवर नेमण्यात आल्या होत्या. त्यांपैकी सेंट्रल आणि प्रॉव्हिन्शिअल बँकिंग इन्क्वायरी कमिट्या ही अखेरची होत. त्यांनी तयार केलेले अहवाल आणि त्यांच्यापुढे देण्यात आलेला पुरावा ही नजरेखालून घातली तर हिंदी बँकिंगविषयी आणि चलन पद्धतीची संघटना आणि यंत्रणा ह्यासंबंधी अहवालातून माहितीची कोठारे असल्याचे आढळून येते. एका अर्थाने दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या कालावधीत चलन आणि हुंडणावळ ह्यांच्याबद्दल जी चौकशी करण्यात आली तिचीच परिणती नव्या कमिशन्समध्ये झाली असे म्हणता येईल. परंतु इतकेच सांगून थांबता येणार नाही. हिंदी बँकिंगच्या धंद्याची व्याप्ती, त्याचे स्वरूप, त्याची रचना आणि यंत्रणा ह्यासंबंधी व्यापक व विस्तृत पाहणी करण्याचा पहिला प्रयत्न म्हणूनही त्यांना महत्त्व आहे.

आजच्या बँकिंगच्या धंद्याची कोठलीही बाजू घेतली तरी त्याची पाळेमुळे वरील कमिशन्सनी केलेल्या चौकशीपर्यंत पोचतात. ह्यावरून त्यांचे महत्त्व उघड होत आहे. १९५० साली नेमण्यात आलेली रूरल बँकिंग इन्क्वायरी कमिटी प्रथमच्या कमिशन्सना पूरक म्हणून नेमण्यात आली होती. १९५२ ची रूरल क्रेडिट सर्व्हे हाही रूरल बँकिंगबद्दल अधिक माहिती मिळविण्याचा एक प्रयत्न होता. पण सर्व्हेने सादर केलेल्या अहवालाला नंतर ग्रामीण व सहकारी पतपेढ्यांच्या दृष्टीने वेगळेच स्वरूप प्राप्त झाले. १९५४ साली खाजगी मालकीच्या विभागातील कंपन्यांच्या भांडवल पुरवठ्यासंबंधी श्रॉफ कमिटी नेमण्यात आली. तिने पूर्वीच्या कमिशन्सचा धागा उचलून तो पुढे चालविला. अखेर १९६१ साली डिपॉझिट इन्शुरन्सची योजना चालू करण्यात आली परंतु त्यासंबंधीच्या मूळ कल्पनेचा धागा १९३२ सालापर्यंत पोचविता येतो. बँकांचे एकत्रीकरण, बँकिंग संबंधीचे कायदे, बँकिंगच्या पद्धती, ह्या व इतर कल्पनांचे बीज १९३१ मधील चौकशी मंडळांत सापडते. हिंदी बँकिंगच्या धंद्याचे आधुनिकीकरण करण्याची जी प्रक्रिया सुरू झाली तिची सुरुवात ह्या कमिशन्सनी केली ह्यात शंका नाही.

ह्या कमिशन्सचे अहवाल सुमारे ३५ वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेले आहेत. एवढ्या अवधीत हिंदी बँकिंगच्या रचनेत मूलभूत आणि विस्तृत स्वरूपाचा बदल झालेला आहे. १९३१ साली अस्तित्वात असलेल्या व्यापारी बँका आणि १९६७ साली अस्तित्वात असलेल्या व्यापारी बँका ह्यांच्यात संख्येच्या दृष्टीने फारसा फरक नाही. पण युद्धकालात मात्र व्यापारी बँकांची संख्या ७५० पेक्षाही अधिक झालेली होती. रिझर्व्ह बँकेने बँकांची मजबुती साधण्याचे, त्यांचे एकत्रीकरण करण्याचे, आणि दुबळ्या व दर्जाहीन बँकांचे निर्मूलन करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे आता व्यापारी बँकांची संख्या १००.पर्यंत खाली आली आहे. परंतु गेल्या काही वर्षांत व्यापारी बँकांचे कार्य, त्यांचे स्वरूप आणि स्थान ह्या बाबतींत ओळखू न येण्याइतका बदल घडून आलेला आहे. शिवाय, रिझर्व्ह बँकेच्या पुढाकाराने आणि बँकिंग रेग्युलेशन कायद्याने त्यांच्या धंद्यांत आणि कार्यपद्धतीत अर्थपूर्ण बदल झालेला आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी काही एक प्रकारचा सरकारी व निमसरकारी बँकिंगचा धंदा स्वातंत्र्यानंतरच्या कालात अस्तित्वात आला असून त्याची वाढही झालेली आहे. अल्प बचतीची मोहीमही विस्तार पावत आहे. देशी पद्धतीच्या बँका आणि को-ऑपरेटिव्ह बँका ह्यांच्या कार्यक्षेत्रांत आणि स्थानांत मूलभूत बदल झालेले आहेत. भांडवल बाजाराची रचना आणि कार्यपद्धती ह्यांच्यात सरकारी नियंत्रणे व नव्या संस्था ह्यांमुळे बदल झालेला आहे. देशाच्या द्रव्यविषयक यंत्रणेत प्रॉव्हिडंट फंड्स, एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन, युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, आणि खाजगी व सार्वजनिक पैसे गुंतविणाऱ्या कंपन्या ह्यांनी महत्त्वाचे स्थान मिळविले आहे. बऱ्याच बिगर बँकिंग कंपन्या व बँकसदृश कंपन्या बँकांच्या कार्यक्षेत्रात पदार्पण करीत आहेत. त्यांच्या कारभाराची तर नोंदसुद्धा नाही. १९३१ च्या बँकिंग इन्क्वायरी कमिट्यांनी देशातील पैशाच्या व भांडवलाच्या बाजारांचा अभ्यास केलेला होता. आता ह्या बाजाराचे स्वरूप वरील कारणांनी बरेच पालटलेले आहे. हे बदल सर्वांना माहीत आहेत आणि त्याची जाणीवही सर्वांना होत आहे. बँकिंगच्या धंद्यासंबंधीच्या नव्या पाठ्यपुस्तकातून ह्या बदलाची माहितीही देण्यात आलेली आहे. परंतु ह्या बदलाची चिकित्सा अजून कोणाही तज्ज्ञाच्या मंडळाने केलेली नाही. म्हणून हे कार्य करण्यासाठी उच्चाधिकार असलेले एक बँकिंग इन्क्वायरी कमिशन नेमण्याची वेळ आता प्राप्त झाली आहे.

बँकवाल्यांनी अशा बँकिंग व मॉनेटरी कमिशनची मागणी केलेली आहे. ब्रिटन, अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांत अशा

प्रकारची कमिशन्स नेमण्यात आली असून त्यांनी आपले अहवालही सादर केलेले आहेत. हिंदमध्ये निदान दोन बँकांच्या अध्यक्षांनी तरी अशी मागणी केलेली आहे. अलीकडे बँकवाल्यांनी ही मागणी अर्थमंत्र्याकडे केली असल्याची वार्ता आहे. परंतु ह्या प्रयत्नांना अद्याप यश आलेले नाही; उलट अशा प्रकारच्या चौकशी मंडळाच्या मागणीचा आग्रह बँकवाल्यांनी सध्या धरू नये असा सल्ला त्यांना मिळाल्याचे समजते. कारण, राज्यकर्त्या पक्षामध्ये सध्या अतिरेकी मनोवृत्तीचा प्रभाव असल्याने, चौकशी मंडळावर बसणाऱ्या लोकांकडून करण्यात येणाऱ्या संभाव्य शिफारशीमुळे बँकवाल्यांची परिस्थिती अधिकच अडचणीची होण्याचा संभव आहे. अर्थमंत्र्यांच्या मताने आताच एखाद्या कमिशनची नियुक्ती केल्यास असे कमिशन बँकिंगच्या धंद्याचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण अगर त्यांच्या कारभारावर अधिक कडक नियंत्रणे सुचवील ह्याविषयी शंका बाळण्याचे कारण नाही. अर्थातच सध्याच चौकशी मंडळाचा आग्रह बँकवाल्यांनी सोडून दिलेला दिसतो. तथापि बँकांवर अधिक सामाजिक नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार काही करो अगर न करो, बँकिंग धंद्यासंबंधी चौकशी मंडळ नेमण्याची जरुरी अगदी स्वतंत्रपणे योग्य ठरणारी अशी आहे. बँकिंगच्या धंद्याच्या भवितव्याविषयी राजकीय निर्णय घेण्यासाठी मात्र अशा चौकशी मंडळाची गरज नाही.

देशाच्या पतपुरवठ्याच्या गरजा बँकिंगच्या विकासामुळे कितपत भागविल्या जातात, सध्याच्या बँकिंगच्या पद्धतीचे आणि चलनपद्धतीचे स्वरूप, त्यांचा ढंग आणि यंत्रणा ह्यांची मीमांसा करण्याच्या दृष्टीने अशा चौकशीमंडळाची गरज आहे. तात्त्विक आणि व्यावहारिक दृष्टिकोणातून अशा पाहणीची आवश्यकता आहे. शिवाय, भावी विकासाची दिशाही अशा पाहणीमुळे ठरविता येईल. ठेवी जमविण्याची आणि शाखा विस्ताराची नवी तंत्रे शोधून काढण्यासाठी आणि त्यांची कार्यक्षमता अजमावण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा आणि बँकर्सच्या व्यावहारिक कुशलतेचा संचय करणे आवश्यक आहे. बँकांच्या शाखांवरील देखरेख आणि त्यांचे हिशेब ह्या गोष्टी गुंतागुंतीच्या असतात. त्यासंबंधी नव्याने विचार करण्यात आला पाहिजे. गेल्या दोन दशकांपुरता विचार केला तर असे दिसून येते की, बँकिंगच्या धंद्याचा विकास कोणत्याही आखीव कार्यक्रमाप्रमाणे न होता यदृच्छया झालेला आहे. आर्थिक विकास साधण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांमुळे बँका काहीशा जोमाने मार्गक्रमण करीत आहेत. परंतु स्वतःचा विकास नियोजित पद्धतीने करण्याचे अगर त्यावर नियंत्रण ठेवण्याचे मात्र त्यांना जमलेले नाही.

गेल्या दोन दशकांत देशी पद्धतीच्या बँकिंगची जागा सहकारी व व्यापारी बँकांनी घेतलेली आहे. परंतु, त्या पद्धतीमधील काटकसर, सरलता आणि कुशलता मात्र त्यांना शिकता आलेली नाही. त्याचप्रमाणे औद्योगिक बँकांनी भांडवल बाजाराची जागा भरून काढण्याचे प्रयत्न केले आहेत. भांडवल बाजाराचे मुख्य कार्य बचतीला उत्तेजन देण्याचे आणि ती गोळा करण्याचे आहे. परंतु हे कार्य औद्योगिक बँकांना जमलेले नाही. सुमारे २५ वर्षांपूर्वी त्या वेळच्या व्हाइसरॉयच्या कौन्सिलचे फडणीस सर बेसिल बॅकेट ह्यांचे दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थ्यांपुढे भाषण झाले होते. त्यांत त्यांनी असे सांगितले होते की पडून राहिलेला पैसा गोळा करणे आणि उत्पादनासाठी त्याचा वापर करणे हे दोन हिंदी बँकिंगच्या धंद्यापुढील प्रमुख प्रश्न आहेत. अजूनही हेच दोन प्रश्न बँकिंगच्या धंद्यापुढे तसेच राहिले आहेत.

त्यानंतर हिंदी बँकिंगच्या धंद्याची रचना आणि यंत्रणा ह्यांच्या बाबतीत काही प्रगती करण्यात आलेली आहे. बँकिंगच्या पद्धतीचे सूत्रीकरण आणि वैशिष्ट्यीकरण काही प्रमाणात साधण्यात आले आहे परंतु त्यांनी आपली गरज पुरेशी भागविली किंवा किंवा नाही हे अजून स्पष्ट झालेले नाही. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या विभागांत आणि भांडवल बाजारात पैसा मोकळेपणाने खेळतो की नाही हेही समजावयाचे आहे. ह्याबाबतची पाहणी चौकशी मंडळ करू शकेल. बँकांच्या कार्यांत अनेक प्रकार आहेत; त्यांची कार्यक्षेत्रे व कार्यपद्धती भिन्न आहेत; आणि त्यानुसार त्यांच्या रचनाही वेगवेगळ्या असतात. ह्या बाबतीत सध्याचीच परिस्थिती चालू ठेवावी, की तिला अधिक उत्तेजन द्यावे, की तीत फरक करावा हेही चौकशी मंडळाला तपासून पाहता येईल. बँकिंगच्या धंद्याविषयी अनेक प्रश्न साहजिकच उपस्थित होतात. त्यांपैकी काही असे आहेत—पैसे काढणारे आणि पैसे देणारे ह्यांचा दुवा जुळवून देण्याच्या कामी आपली बँकिंगची व चलनाची पद्धत कितपत कार्यक्षम ठरली आहे ? बँकिंगच्या व्यवहाराबद्दल व तदनुषंगिक आर्थिक प्रश्नांबद्दल संशोधन करण्यात येते की नाही ? बँकांच्या कारभारात यांत्रिकीकरण करण्यात यावे की नाही ? इत्यादी. काही बँकांनी ह्या बाबतीत महत्त्वाचे काम केले असेलही. पण, एकंदरीने बँकांचे अशा प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले आहे. बँकांचा अनुभव व ज्ञान ह्यांचा संचय कसा करता येईल, हे चौकशी मंडळ सांगू शकेल. काही उणिवा असल्या तर त्या कशा दूर कराव्या हेही चौकशी मंडळ सांगू शकेल. थोडक्यात, बँकिंगच्या व चलन पद्धतीच्या रचनेविषयी व यंत्रणेविषयी सर्वंकश चौकशी करणे अतिशय जरुरीचे आहे.

---

# बँकेच्या मॅनेजरची तारेवरची कसरत

( एकांकिका )

[ मुख्य भूमिका :

श्रीकांत : चाळिशीच्या सुमाराचा बँक-मॅनेजर. त्याचा चेहरामोहरा अनुभवाची व कर्तव्यनिष्ठेची साक्ष देत आहे. तो बँकेला वाहिल्यासारखा दिसला तरी प्रेमळ कुटुंबप्रमुखही आहे.

प्रेमा : श्रीकांतची पत्नी. जरा तक्रारी स्वभावाची, पण तिची तक्रार बरीचशी मानसिक आहे.

सुरेश : मुलगा } शाळकरी मुले ]
लीला : मुलगी

प्रवेश पहिला

( स्थळ : मॅनेजरच्या घरातील झोपण्याची खोली; सकाळी ६ चा सुमार )

श्रीकांत : ( स्वप्नातून एकदम जागा होऊन ) कोण आहे ? प्रेमा ! माझी कॉफी तयार झाली का ? ( थोडा वेळ शांतता. )

लीला : दादा, तुम्ही आईला हाक मारलीत का ? ती अजून झोपलेलीच आहे काय करावं ! अर्धा तास झाला. आता कॉफी कधी मिळणार ! खरंच दादा, तुम्हीच-म्हणजे आपण सर्वांनीच कॉफी करून घेतली तर काय हरकत आहे ?

सुरेश : वा ! छान कल्पना ! दादा, तुमची हरकत नसेल तर मी सुद्धा मदत करीन.

श्रीकांत : ( वर्तमानपत्र हातात घेत ) पण, तुमच्या आईने उठून कामाला का लागू नये ? जा, तिला उठवा. बँक मॅनेजरने काय काय करावं ! कॉफी करावी, की न्याहारीची तयारी करावी, की आणखी काही करावं !

सुरेश : दादा, तुमचं बरोबर आहे; आम्ही आईला कालच तसं म्हणालो.

लीला : पण आई म्हणाली, तुमचे दादा बँकेत मॅनेजर आहेत, घरी नाहीत. आईचं म्हणणं खरं आहे, नाही का ?

श्रीकांत : ( स्वतःच्या श्रेष्ठत्वाची इतरांना जाणीव नसल्या-बद्दल काहीसा चिडून ) अरे ! म्हणजे गोष्टी इतक्या थराला आल्या का ? मला वाटतं, आता मला तिच्याशी ह्याविषयी बोललंच पाहिजे.

प्रेमा : ( काहीशी दचकते आणि स्वतःबद्दल दया दाख-विण्याच्या आविर्भावात ) खरं आहे तुमचं ! तुम्ही काय वाटेल ते करू शकता. ह्या घरात माझी काय अवस्था होते, ह्याचा कोण विचार करणार ?

श्रीकांत : अग पण काय झालं ! आता काय बिघडलं आहे बाईसाहेबांचं ? ( सुरेश आणि लीला हळूच खोलीबाहेर जातात. )

प्रेमा : तुम्हाला काय माहीत ? तुमच्या डोक्यात सदा न् कदा बँकेचे विचार. तुम्हाला बँकेने मॅनेजरच्या गादीवर बसविले आहे ना ! तुम्हाला आमच्या सारख्यांचा विचार करण्याचे कारणच काय ! पण खरंच, काल रात्री तुम्ही केव्हा परत आला ? मुलं नि मी १० वाजेपर्यंत वाट पाहात थांबलो होतो. बिच्चारी ! तुम्ही जेवायच्या वेळी नव्हता तर त्यांना कसं चुकल्याचुकल्यासारखं झालं.

श्रीकांत : ते जाऊ दे; पण तुझी काय तक्रार आहे ती तर सांग.

प्रेमा : माझं जाऊदे हो. मुलांचं काय आणि तुमचं तरी काय ? तुम्ही काही बँकेतील एकटेच एकनिष्ठ मॅनेजर नाही. बँकेच्याच आवारात तुम्हाला राहण्याची जागा मिळाली असली तरी दिवसाचे चोवीस तास ताबेदार राहावं असं का आहे ? धड अन्न नाही, धड झोप नाही, बायकोकडे लक्ष नाही; आणि मुलांच्या हिताकडेही लक्ष द्यायला फुरसत नाही. सुरेशला गेल्या परीक्षेत दोन विषयांत शून्य मार्क मिळाले. बहुधा स्वारी मुक्काम करणार ! आणि लीला ! तिला शाळेत धाडायचं म्हणजे एक दिव्यच आहे. इकडं माझी प्रकृती बेताचीच आहे. अलीकडे माझा रक्तदाब बरोबर आहे का नाही कुणास ठाऊक.

श्रीकांत : तरी मला वाटलंच ! असं करतेस का, काही दिवस तू लिमिकल विरिकटावर राहा.

प्रेमा : थट्टा पुरे झाली हं. ( लीला आणि सुरेश न कळत खोलीत प्रवेश करतात. )

लीला : दादा,...दादा ! तुम्ही रागावणार नसला तर तुम्हाला एक गंमत सांगते.

श्रीकांत : सांग बेटा !

लीला : माझी मैत्रीण राधा परवा वर्गात सांगत होती की तिच्या आत्याला तुम्हाला बढती मिळाल्याचं कळलं आहे. खरंच दादा ?

श्रीकांत : अरे मग त्यात एवढी गंमत ती काय ?

लीला : वा दादा ! गंमत तर पुढंच आहे. आईच्या स्वाथ्या-वरून तिच्या आत्यानं हे ताडलं म्हणे.

प्रेमा: फाजील कुठली. ( श्रीकांतकडे वळून ) तुमच्या दुर्लक्षाचा हा परिणाम आहे.

श्रीकांत: तुझ्या लठ्ठपणावरून नाही; पण तुझ्या अलीकडील

तक्रारीवरून मात्र माझी बढती सांगता येईल. मी सरकारकून होतो तेव्हा तुझे डोके दुखत असे; मी हिशेबनीस झालो तेव्हा तुला जवळचे कमी दिसू लागले; निदान तसे तुला वाटू लागले; आणि आता मी मॅनेजर झाल्यावर तुला रक्तदाबाची शंका येऊ लागली. आता माझ्या पुढच्या बढतीची खबर कोणत्या आजाराने सुचविणार आहेस, ते तरी सांग. ( प्रेमा हुंदके देऊ लागते; लीला व सुरेश गालातल्या गालात हसू लागतात. श्रीकांत काही क्षण स्तब्ध बसतो आणि मग एकदम भानावर आल्यासारखा म्हणतो ) काय वेळ गेला हा ! साडेसात वाजले ! एव्हाना ऑफिसमध्ये हजर असायला पाहिजे होते ! सहामाही अखेरचे काम झपाट्याने उरकले पाहिजे; व्याजाचे हिशेब अजून पुरे व्हायचे आहेत; इतर कामे वाट पाहात आहेतच; काय करावं ! अजून किती काम राहिलं आहे ! ( श्रीकांत तोंड धुतो, केसावरून ब्रश फिरवतो आणि ठीकठाक होऊन खालच्या मजल्यावरील ऑफिसात घाईगर्दीने जातो. )

### प्रवेश दुसरा

( वेळ : सकाळची ९. स्थळ : मॅनेजरचे बिऱ्हाड )

( श्रीकांत स्नान आणि नास्ता उरकण्यासाठी घाईघाईने घरी येतो. )

श्रीकांत : अरे ९॥ होत आले; माझा टॉवेल कुठं आहे? सगळी तयारी आहे ना ? मला आता घाई केली पाहिजे.

लीला : काय करावं, माझं इंग्रजीचं पुस्तक सापडत नाही. दादा, बघा की ज़रा; मला शाळेला उशीर होतो आहे. अन् त्यात आई रागावलेली !

सुरेश : दादा, माझे बूट नीट बसत नाहीत पहा. बघा की जरा.

श्रीकांत : प्रेमा, अग मुलांना काय पाहिजे ते पहा ना ! इतक्या-बारीक सारीक गोष्टीत सुद्धा मीच लक्ष घालू का ? मी कोण घाईत आहे !

( दरम्यान मुले कशीबशी तयार होतात आणि शाळेला पळतात. )

श्रीकांत : ( प्रेमाने ) मॅनेजर म्हणून माझ्यावर पडणाऱ्या जबाबदारीच्या ओझ्याची तुला कल्पना तरी आहे का ? आता तर सहामाही हिशेबाची तोंडमिळवणी करण्याची वेळ !

प्रेमा : सदान् कदा, आपल्या जबाबदारीचे तुणतुणे वाजवून मला गप बसवू नका. त्या तोंडमिळवणीचे एक प्रस्थच आहे. बँकेने तुम्हाला कामात मदत करण्यासाठी माणसे दिली आहेत की ! त्यांनी आपली कामे चोख करावी. त्यांच्यावर विसंबून राहायला काय हरकत आहे ? जबाबदारीचे पुराण पुरे झाले. तुम्हाला बायको व मुले आहेत ह्याची आठवण तरी आहे का ? असंच चालू राहिलं तर......

श्रीकांत : ( हलक्या आवाजात ) बरं जाऊ दे; आता युद्धबंदी करू. वेळ नाही मला; बँकेतले नौकर कामावर येऊ लागलेले दिसतात.

( श्रीकांत झटपट स्नान उरकतो आणि कपडे करतो. सकाळची ही कामे हा हा म्हणता उरकण्यात तो चांगलाच तरबेज झालेला दिसतो. )

श्रीकांत : ( घड्याळाकडे पाहात ) १० तर वाजले; आता न्याहारीला वेळ नाही. ( गर्दीने कचेरीला निघून जातो; प्रेमा वाकडे तोंड करते. )

### प्रवेश तिसरा

( वेळ : १० चा सुमार. स्थळ : बँक मॅनेजरची खोली )

सहकाऱ्यांचे अभिवादन स्वीकारीत श्रीकांत प्रवेश करतो. त्याच्या मागोमाग कॅशिअर येतो.

कॅशिअर : गुड मॉर्निंग, सर.

श्रीकांत : गुड मॉर्निंग. काय कमी-जास्त ?

कॅशिअर : अकौंटंटचा निरोप आहे की तो जरा उशिरा येणार आहे. त्याच्या मुलीला शाळेत प्रवेश मिळविण्याचा खटपटीत आहे तो. पाच–सहा शाळांत त्याने प्रयत्न केला. पण जमले नाही; आता तो अगदी घायकुतीला आला आहे,

श्रीकांत : ही गोष्ट खूपच अवघड झाली आहे खरी; यशस्वी होवो बिचारा ! चला, कॅशचे व्यवहार सुरू करू. ( स्वतः अकौंटंटच्या जागी बसतो; आणि बुके मागवितो. आज रजेचे ४ अर्ज आलेले आहेत. एक अधिकाऱ्याचा, दोन कारकुनांचे आणि एक शिपायाचा. प्रत्येकाला जरुरीचे खाजगी काम आहे. श्रीकांत कामाची झटपट व्यवस्था लावतो. त्याच्या अनुभवाचा त्याला फायदा होतो. बँकेतील व्यवहार सुरू होतात. )

लेजर कीपर : मोठ्या रकमेचे कॅश बुक देता का ?

एक गिऱ्हाइक : नमस्ते, मॅनेजर साहेब ! माझ्या खात्यातील शिल्लक जरा सांगता का ?

श्रीकांत : नमस्ते ! बसा जरा ! आत्ता सांगतो.

बिल्स क्लार्क : बी. पी. सँक्शन रजिस्टर द्या जरा. कॅश चेक वटविण्यास उशीर होत आहे.

अकौंटंट : ( मुलीला शाळेत प्रवेश देण्याच्या खटपटीने श्रमलेला ) गुड मॉर्निंग सर ! मला जरा उशीर झाला हं. माफ करा, मला आधी परवानगी घेता आली नाही. पण मी निरोप पाठविला होता.

श्रीकांत : ठीक आहे. तुझे काम झाले की नाही ?

अकौंटंट : झालं बुवा एकदाचं !

श्रीकांत : मला बी. पी. आणि आय. बी. सी. बुके पाठवून द्या. मि. राव उद्या रजेवर आहे.

अकौंटंट : चार्ली चॅपलिन अँड कंपनीची एक ३ लाखांची टी. टी. आहे, आपल्याजवळ रोख रक्कम नाही आणि स्टेट बँकेत तितकी शिल्लकही नाही.

श्रीकांत : हेड ऑफिसच्या स्टेट बँकेकडील खात्यावर

५ लाखांचा टी. टी. डिस्कौंट करा. आज क्लिअरिंग विरुद्ध जाईलसे दिसते.

( आपल्या खोलीत जातो–टेलिफोन खणखणतो. ) कुबेर बँक ! बोला. टेलिफोनच्या दुसऱ्या टोकाशी–मी जमाल अँड कंपनीचा, जमाल बोलत आहे; गुड मॉर्निंग. )

श्रीकांत : गुड मॉर्निंग ! बोला, काय काम आहे आपलं. ?

जमाल : तसं विशेष नाही. मी आताच राज नांवाच्या एका गृहस्थाला तीन हजारांचा चेक दिला आहे. उद्या प्रेझेंट करा असं मी त्याला सांगितलं आहे : पण, चुकून आजच वटविण्यास आला, तर मला फोन करा.

श्रीकांत : लक्ष ठेवतो; पण तसं नक्की सांगता येत नाही. म्हणजे मला ते शक्य नाही. ( एक गिऱ्हाईक प्रवेश करते. श्रीकांत त्याला शेटजी म्हणून संबोधितो. )

शेटजी : माझी लिमिट वाढविण्याचं काय झालं ? एका महिन्यांत मंजुरी मिळेल असं तुम्ही म्हणाला होतात. महिना तर होऊन गेला. जमत नसलं तर तसं सांगा. दुसऱ्या बँका मला खाते उघडण्यासाठी गळ घालीत आहेत.

श्रीकांत : शेठजी, तुम्हांला आमच्या अडचणी माहीत आहेत. मी मुख्य कचेरीला लिहिल्याचेही तुम्ही जाणता. पण, वर्ष-अखेरचे हिशेब आणि बोर्डाची सभा ह्यांची गर्दी आहे. माझ्या सूचनेचा लवकरच विचार होईल. गिऱ्हाइकांचा खोळंबा करणे आमच्या मुख्य कचेरीला मुळीच आवडत नाही. तुमच्याबद्दल तर प्रश्नच नाही. खरं म्हणजे, आतापर्यंत मंजुरी यायला पाहिजे होती. तरी पण मी आज तार करतो. ( शेठजी खूष होऊन जातात. ( दुसरे एक बडे गिऱ्हाईक प्रवेश करते. )

श्रीकांत : या, या, गोवर्धनलालजी ! औपचारिक वागू नका. आम्ही तुमच्या सेवेला सदैव तयार असतो. ( कॉफी सांगतो ) बोला, काय हुकूम आहे.

गोवर्धनलाल : तसं काही नाही; पण मला १० हजारांची गरज आहे.

श्रीकांत : मग त्यांत काय आहे ? तुम्ही तुमच्या माणसाला पाठविले असते तरी चालले असते. कितीच्या नोटा देऊ ? १०० च्या ?

गोवर्धनलाल : नको, मला ५ हजारांच्या नोटा तरी १० च्या पाहिजेत. ( श्रीकांत कॅशिअर्सशी टेलिफोनवरून बोलतो. कॅशि-अरजवळ फक्त २ हजारांच्या १० च्या नोटा आहेत. )

श्रीकांत : अरे, तुमच्यासारख्या बड्या लोकांजवळ १०० पेक्षा कमीच्या नोटा असणे शोभत नाही. ( स्वतः जाऊन पैसे घेऊन येतो. ) घ्या. मोजून पाहा हं.

गोवर्धनलाल : काही नको. तुमच्यावर व बँकेवर आमचा विश्वास नाही की काय ?

श्रीकांत : आम्ही काळजी घेतोच; पण त्याचा काय नेम; एखाद्या वेळी चूक व्हायची !

गोवर्धनलाल : बरं, असू द्यात ( नोटा मोजून पाहतो. ) नमस्ते.

श्रीकांत : नमस्तेजी ( कॅशिअर आत येतो. )

कॅशिअर : तुम्ही वर गेला होता तेव्हा परेरा अँड फर्नांडिझचे फर्नांडिझ आले होते. काही थोड्या दिवसांसाठी त्यांना ओव्हर ड्रॉफ्ट पाहिजे आहे. ते घाईत होते; नंतर आपली गांठ घेईन असे म्हणाले.

श्रीकांत : क्लिअरिंगचे चेक्स आले का ? जरा आत पाठवा बरं.

## प्रवेश ४ था

( स्थळ : मॅनेजरचे बिऱ्हाड. वेळ : दुपारी १·१५ )

लीला व सुरेश जेवणासाठी घरी आली आहेत. )

लीला : आई, मला फार भूक लागली आहे.

सुरेश : आई, तुझी तबेत बरी दिसत नाही. काय होतंय तुला ?

प्रेमा : काही नाही रे ! चला, जेवून घ्या लवकर. तुमच्या दादांनी तर नास्ता सुद्धा घेतलेला नाही. मला चैन पडत नाही अगदी.

सुरेश : तू सुद्धा जेवलेली नाहीस ! ते काही नाही, आई. तू जेवल्याशिवाय आम्ही पण बसत नाही.

लीला : दादांना बोलाव की.

सुरेश : थांब, मी फोन करतो.

प्रेमा : नको नको; दादांना आवडणार नाही ते.

( लीला आणि सुरेश टेलिफोनपाशी जातात आणि लीलाने फोन लावावा आणि सुरेशने बोलावे असे ठरवितात.

श्रीकांत : कुबेर बँक.

सुरेश : ( फोन हाती घेऊन ) मला दादांशी बोलायचंय.

श्रीकांत : कोण बोलतंय ?

सुरेश : मी बोलतोय ? दादा का ?

श्रीकांत : हो सुरेश ! काय गडबड आहे ? तुमची जेवणं झाली का ? लीला कुठंय ?

लीला : ( फोन हिसकाऊन घेऊन ) दादा, मला किती भूक लागली आहे !

श्रीकांत : आई घरी नाही का ?

लीला व सुरेश : तुम्ही आल्याशिवाय आम्ही बसणार नाही.

श्रीकांत : ते ठीक आहे. पण, हे पाहा. सध्या मी फार कामात आहे. तुम्ही माझी वाट पाहू नका. तुम्ही जेवण उरकून परत शाळेला जा.

# इचलकरंजी जनता सहकारी बँक लिमिटेड

स्थापना : ७ फेब्रुवारी १९६३ ] इचलकरंजी [ फोन नंबर २१३

पाच वर्षांचे अल्पावधीत इचलकरंजीचे जनतेत विश्वासाचे प्रतीक झालेल्या या संस्थेची भरभराट खालील आकड्यांवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३,६२,०००-०० |
| ठेवी | रु. | २१ लाखांवर |
| खेळते भांडवल | रु. | ३० लाखांवर |

सभासदांचे सेवेसाठी अल्प हप्तेबंदीने रेडिओ, सायकल, घरगुती फर्निचर, इलेक्ट्रिक मोटार, ह्युमिडीफायर्स, रिफ्रिजेटर्स, शिवणयंत्रे. इत्यादी वस्तू आता बँक पुरवीत आहे.

ठेवीदारांना आकर्षक व्याजाचे दर

| | |
|---|---|
| मुदतबंद ठेव : | ७ ते ८½ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव : | ४ टक्के |
| चालू ठेव : | १ टक्का |
| कॉल डिपॉझिट : | ५½ ते ७ टक्के |
| बचतगृह पेटी ठेव : | ५ टक्के व मुदतीनुसार त्यात वाढ केली जाते. |

ह्याखेरीज कंपलसरी सेव्हिंग्ज व रिकरिंग डिपॉझिटस् ह्या आकर्षक व्याजाचे दरातील ठेवी स्वीकारल्या जातील.

परपेठ हुंड्या सवलतीचे दरात डिस्कौंट केल्या जातात व वसुलीसाठी घेतल्या जातात.

अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

के. बी. आवाडे, चेअरमन. आर. पी. कुळकर्णी, मॅनेजर.

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.

भारतात प्रथम श्रेणीत व महाराष्ट्रात अग्रेसर असलेला

★ अद्ययावत व सुसज्ज साखर कारखाना ★

राष्ट्राच्या औद्योगिक उत्पादनात मोलाची भर घालीत आहे.

शुभ्र दाणेदार साखरेचे निर्माते,

अद्ययावत डिस्टिलरीतून प्रथम श्रेणीच्या रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिटचे मोठ्या प्रमाणात उत्पादन, ॲबसोल्यूट अल्कोहोलचे महाराष्ट्रातील एकमेव निर्माते.

★ या विक्रमानंतर ★

आपल्या नवीन सुसज्ज कारखान्यातून उत्कृष्ट प्रतीचे

ॲसेटिक ॲसिड (आय. एस्. आय. ग्रेड), एन्. ब्युटेनॉल, ब्युटाईल ॲसिटेट, यांचे उत्पादक.

मॅनेजिंग एजंटस् :

दि युनायटेड एजन्सीज (प्रायव्हेट) लिमिटेड.

एम्. बी. लोहिया, जनरल मॅनेजर.

लीला : (निराश होऊन) आपण असं करूया का? दोघंही जाऊन दादांना घेऊनच येऊ. (दोघेही जिन्याने धडधड खाली येतात)

### प्रवेश ५ वा

(स्थळ : मॅनेजरची खोली)

श्रीकांत चेक्सचे क्लिअरिंग करीत आहे. मधून मधून फोन येतच आहेत. टेलिफोनची घंटा वाजते

श्रीकांत : कुबेर बँक.

टेलिफोन करणारा : मी जमाल आहे.

श्रीकांत : तुमचा चेक आला आहे.

जमाल : कृपा करून परत करू नका; माझा माणूस रोख रकम घेऊन निघाला आहे.

श्रीकांत : लवकर पाठवा. (वळून पाहतो तो मुलगा व मुलगी आलेली दिसतात.)

श्रीकांत : तुम्ही इथं कशाला आलात?

लीला : आम्हाला भूक लागली आहे; तुम्ही चला ना.

श्रीकांत : मी सांगितलं ना मला काम आहे म्हणून. तुम्ही इथं येऊन माझ्या कामात व्यत्यय आणलात; बरोबर नाही ते.

लीला : (ओशाळून) सॉरी दादा! पण तुम्हाला भूक नाही का लागली? आई म्हणाली, तुम्ही नास्तासुद्धा घेतला नाही.

श्रीकांत : खरं बाळ! पण मी कामात अगदी बुडून गेलोय बघ; मला मान वर करायला सुद्धा फुरसत नाही.

लीला : (पडलेल्या चेहऱ्याने डोळ्यात पाणी आणून) ते काही नाही. तुम्ही आलंच पाहिजे. आईपण जेवली नाही अजून. तुम्ही आल्याशिवाय आम्ही कुणीच जेवणार नाही.

बँकेत आलेले एक गिऱ्हाईक ह्या देखाव्याने गहिवरून श्रीकांतचे मन वळविण्याचा प्रयत्न करते. मग न राहवून श्रीकांत लीला व सुरेशच्या साह्याने उठतो. लीला व सुरेश आनंदतात.)

लीला : दादा, तुम्ही कित्ती कित्ती चांगले आहात.

### प्रवेश ६ वा

(वेळ : दुपारी २ वाजता. स्थळ : मॅनेजरचे जेवणघर)

सुरेश : दादा, आई सारखी चिडचिड करते आताशा. ती सदा आपल्याच नादात असते. आम्ही काही केलं तरी ती खुष होत नाही.

श्रीकांत : प्रेमा, खरं का हे? तू मजेत असावंस असं मुलांना वाटतं; दुर्मुखलेलं राहून तुझं तरी काय चांगल होतंय.

प्रेमा : तुम्हाला दुसऱ्याला उपदेश करायची सवयच आहे. तुम्ही तरी मुलांसाठी काय करता, सांगा पाहू. रात्रंदिवस त्यांच्याकडे लक्ष देताना माझी मात्र त्रेधा उडते; तुम्हाला काय! (लीलाकडे वळून) बघ, लीला कसा वेंधळ्यासारखा धरला आहेस चमचा!

सुरेश : दादा, बघा. आई सारखं हे करा ते करू नका असं सांगत असते. आमचे आम्हांला करू दे की काही तरी.

श्रीकांत : हे पाहा, तुम्ही लहान आहात; तुम्हाला वडिलधाऱ्या माणसांनी वाट दाखविली पाहिजे. तुम्ही जर नीट वागलात तर आई कशाला त्रासिकपणा करील? आईचं तुमच्यावर किती प्रेम आहे. तुमच्या भल्यासाठीच ती सांगत असते ना? अर्थात् तिला आईची भूमिकाही चांगली करायाची आहे. हो का नाही प्रेमा? बरं, जरा कढी इकडं कर बघू!

प्रेमा : मी आदर्श वागते की नाही कुणास ठाऊक! पण तुम्ही मात्र माझ्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आदर्श घालून देतात खरे. तुम्ही आणि तुमचे ऑफिस........

श्रीकांत : हरदासाची कथा आली का मूळपदावर?

प्रेमा : येणारच! तुम्ही आपली बदली दुसरीकडे करून घ्या आणि हे पाहा, बदलीच्या ठिकाणी बिऱ्हाडापासून कचेरी निदान १० मैल तरी दूर असली पाहिजे, समजलं.

श्रीकांत : खरंच, काय छान कल्पना! ऑफिसला जाणं अन् येणं म्हणजेच एक डोकेदुखी होऊन बसेल, त्याचं काय? अन् शिवाय काम कसं उरकणार?

लीला : दादा, गाडी घेतली तर?

श्रीकांत : तूं, आई आणि सुरेशच काय ते ठरवा. मला आता उशीर झालाय; मी जातो ऑफिसात.

### प्रवेश ८ वा

(वेळ : दुपारी २॥ नंतरची, स्थळ : बँकेची जागा. आता बँकेतील वर्दळ थांबली आहे. नौकर दिवसातील व्यवहार पुरे करायच्या मागे आहेत. काहीजण जेवणासाठी बाहेर गेले आहेत.)

श्रीकांत : (प्रवेश करून) डे बुक व जनरल लेजर तयार आहे ना?

अकौंटंट : ही आहेत सर.

श्रीकांत : माझ्याकडे काही बुक पाठवा. मुख्य कचेरीच्या व्याजाचे काय? (तेवढ्यात एक तार येते.)

अकौंटंट : हेड ऑफिसची तार. व्याज १ लाख, १० हजार, २४४ आहे. मला वाटतं ह्या सहामाहीचा नफा सर्वात अधिक होईल.

श्रीकांत : आपण अर्ध्या कोटीपर्यंत मजल मारली आहेच. मोहनने १० लाख रुपये देण्याचं कबूल केलं आहे. त्यानं आपला शब्द पाळला तर आपल्याकडील ठेवी गेल्या वर्षीपेक्षा दुपटीने अधिक होतील. मग, आपल्याला पुन्हा बक्षीस मिळेल! (शाखेला बक्षीस मिळण्याची भाषा निघताच नौकरवर्गही उल्हसित होतो.)

# कुलकर्णी इन्डस्ट्रीज

डायमेकर्स,
फोर्जिंग्ज
व
प्रेसवर्क
प्रॉडक्शन

रजिस्टर्ड ऑफिस : ६३० सदाशिव पेठ, पुणे २
फोन : ५६४३०



# ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे

दि वा ळी नि मि त्त

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शुभेच्छा

: मुख्य कचेरी :

दूरध्वनी क्रमांक ५९१६१८ — १५/४ शिवाजी पथ, ठाणे.

तालुक्याच्या ठिकाणी व इतरत्र २२ शाखा

ठेवींबाबत निश्चित सुरक्षितता

बँकिंगची सर्व कामे केली जातात.

श. ह. भिडे, मॅनेजर — वि. द. खाडे, व्हा. चेअरमन — पद्मश्री ह. गो. पाटील, चेअरमन



# दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बीड

तारः—'बीड बँक' ] मुख्य कार्यालय, बीड—' चंपावती ' [ फोन नंबर–३५

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वैभवस्थान

दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बीड

ग्रामीण जीवनातील सहकारी चळवळीचा प्रसार, प्रचार, शेती उत्पादन क्षेत्रात वाढ, आणि सहकारी उद्योगधंदे यांना प्रोत्साहन देत असलेली जिल्ह्यातील एकमेव बँक

[ आकडे लाखात ]

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. १०० = ०० |
| वसूल भाग भांडवल | रु. ६६ = ८८ |
| गंगाजळी व इतर निधी | रु. १० = ०४ |
| ठेवी | रु. १७२ = ६५ |
| खेळते भांडवल | रु. ४२१ = ४० |

आपल्या २२ शाखांच्यामार्फत बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार करीत असलेली ही बँक
म्हणजे
शेतकऱ्यांचे एकमेव आधारस्थान

मुख्य कार्यालय, चंपावती, बीड.

ना. वि. पांडे, बी. ए., व्य व स्था प क

श्रीपतराव कदम, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, अ ध्य क्ष

नौकर : आम्ही सर्व तुमच्या मागे आहोत. उत्तम काम करून आम्ही संपूर्ण सहकार्य देऊ. आपल्या शाखेला प्रत्येक सहामाहीला बक्षीस मिळाले पाहिजे.

श्रीकांत : मी तुमचा आभारी आहे. आपण सहामाही अखेरचे काम शक्य तितक्या लवकर संपवू. ( अकौंटंटकडे वळून ) ही बी. पी. व आय. बी. सी. व्हौचर्स आहेत ना ? ती माझ्याकडे पाठवा. ( श्रीकांत जनरल लेजर पाहून रिव्हर्सल व्हौचर्स तपासत आहे. पत्रव्यवहाराकडे लक्ष देत आहे. इतक्यांत कॅशियर येतो व कॅश तयार असल्याचे सांगतो. )

श्रीकांत : आलोच मी; आज काय कॅश बॅलन्स आहे ?

कॅशियर : जवळजवळ ३ लाख; पण त्यातली निम्मी रक्कम छोट्या नोटांची आहे.

श्रीकांत : बर, मग उद्या त्या बदलून घ्या.

कॅशियर : होय; स्टेट बँकेला पाठवायचे पत्र तयार आहे. ( कॅश मोजली जाते. दिवसाचे काम पूर्ण होते. सहामाहीच्या व्याजाचा हिशेब तयार होतो. ६ वाजण्याच्या सुमारास सर्व जण निघून जातात. )

श्रीकांत : ( अकौंटंटला ) तुम्ही काय करताय ?

अकौंटंट : व्याजाच्या नोंदी तपासतोय.

श्रीकांत : माझ्याकडे पाठवा; मी तपासतो. तुम्ही फार लांब राहाता आणि तुमच्याजवळ वाहनही नाही.

अकौंटंट : आभारी आहे ( जातो. ) ( श्रीकांत तपासणी सुरू करतो. काम संपते तेव्हा ९ वाजलेले असतात. इतक्यात लहान मुलांची चाहूल लागते. तिकडे वळून पाहातो )

श्रीकांत : कोण आहे तिकडे ? ( उत्तर येत नाही. ) अरे कोण आहे ? ( चाहुलीच्या दिशेने जातो. हलक्या आवाजात तू जा पहिली; नाही लीला, तू जा. तुला प्रथम पाहिली तर दादा रागावणार नाहीत, अशी कुजबुज ऐकू येते. )

श्रीकांत : ( मुले पाहून ) तुम्ही कशाला आलात इथे ? ( लटके रागावून ) पहारेकरी कुठाय ? थांबा, तुम्हांला बाहेरच हुसकतो.

लीला : दादा, आम्ही त्याला विचारूनच आत आलो. तो किती चांगला आहे. त्यानं आम्हांला आत सोडलं.

श्रीकांत : हो का ? मग त्याच्याकडे पाहिलेच पाहिजे मला.

सुरेश व लीला : दादा, त्याला शिक्षा करू नका. तो फार चांगला आहे.

श्रीकांत : ( हसू दाबीत ) बरं बरं ! पण मला सांगा; तुम्ही का आलात.

सुरेश व लीला : ( त्याचा हात ओढून ) तुम्हांला घरी न्यायला. तुम्हांला जेवणाची आठवणच नाही. दादा, ९॥ वाजून गेले.

## प्रवेश ८ वा

( मॅनेजरच्या घरातील खोली. जेवण झाल्यावर बैठकीच्या खोलीत येऊन सुरेश व लीला श्रीकांतच्या बाजूला बसतात. )

लीला : ( बोलावे न बोलावे अशा आविर्भावात ) दादा बँकेपासून दूर बिऱ्हाड करण्यास आईनं सांगितलं आहेना तुम्हाला ?

श्रीकांत : बरं, मग !

सुरेश : लीला म्हणते, मग तुम्ही अधिक वेळ घरी असाल; अन् तुम्हाला ऑफिसात सारखं सारखं जाता येणार नाही.

लीला : ( लाडांत येऊन ) दादा, आम्हांला गोष्ट सांगता का ? किती दिवस सांगितलेली नाही.

श्रीकांत : खरंच ! ( गोष्ट नेहमीप्रमाणे सुरू होते. ) ' कोणे एके काळी बुधु नावाचा राजा राज्य करीत होता. ' ( गोष्ट सांगत असताच मुले झोपतात आणि श्रीकांत त्यांना बिछान्यात आणून ठेवतो. तेवढ्यात दारावरील घंटा वाजते. श्रीकांत दार उघडतो व एक तार घेतो. )

प्रेमा : ( दिवसाचे काम नुकतेच संपलेले असते तेवढ्यात तार येते. ) आता काय आहे ? ऑफिसची नेहमीची तार ?

श्रीकांत : हो, पण तू काळजी करू नको.

प्रेमा : ( मुलांना जाग येईल म्हणून हलक्या आवाजात बोलत श्रीकांतकडे येते. ) अहो, तुम्ही दुसरीकडे बदली का करून घेत नाही ? तुम्हाला मॅनेजरपेक्षा कमी दर्जाची जागा दिली तरी चालेल मला. बँकेपासून बिऱ्हाड मात्र दूर पाहिजे. मला अगदी वीट आलाय आता.

श्रीकांत : तू उगीच त्रास करून घेऊ नकोस. तुझा रक्तदाब आधीच वाढला आहे. जरा शांत कर मन.

प्रेमा : हो, मला माहीत आहे. म्हणूनच मी तुम्हाला सांगत होते. (दारावरची घंटा पुन्हा वाजते. दुसरी तार येते. ' अकौंटंट-वर शाखेचे काम सोपवा. झांशी येथील शाखेत कायमची बदली केली आहे. बँकेच्या आवारातच बिऱ्हाडाची जागा मोफत ' )

प्रेमा : आता नवी तार आली ? ऑफिसचीच दिसते.

श्रीकांत : ( शांत होत ) होय; माझीच तार !

( बिचारी प्रेमा गोंधळून जाते. )

( लेखक : पी. जयरामन्, युनायटेड कमर्शिअल बँक लि. च्या ' टॉवर ' त्रैमासिकावरून )

# राजकीय मतभेदांचे बँकांवर दडपण

फर्स्ट नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क ही अमेरिकेतील एक मोठी बँक आहे. ह्या बँकेत मेथॉडिस्ट बोर्ड ऑफ मिशन्स ह्या धार्मिक संघटनेची सुमारे १ कोटी डॉलर्सची गुंतवणूक आहे. बँक दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला कर्जाचा पुरवठा करीत असते. दक्षिण आफ्रिकन सरकारचे वर्णविद्वेषाचे धोरण वरील धार्मिक संघटनेला पसंत नाही. त्यामुळे संघटनेने बँकेमधील आपली गुंतवणूक परत घ्यावयाचे ठरविले आहे. दक्षिण आफ्रिकन सरकारच्या वर्णविद्वेषी धोरणाविरुद्ध संयुक्त-राष्ट्र-संघटनेने ठराव केलेले आहेत. त्या सरकारविरुद्ध आर्थिक दंडयोजना जाहीर करावी असा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु, आतापर्यंत तरी जागतिक बँक अगर खाजगी अमेरिकन बँका ह्यांनी आदेशाकडे दुर्लक्षच केलेले आहे. जागतिक बँकेचे ह्याबाबत असे म्हणणे आहे की संयुक्त राष्ट्र-संघटनेने ठराव करताना बँकेचा आगाऊ सल्ला घेतलेला नव्हता. खाजगी अमेरिकन बँका दक्षिण आफ्रिकेशी होणाऱ्या व्यवहारातून मिळणारा नफा सोडण्यास तयार नाहीत. आफ्रिकेतील खंडात दक्षिण आफ्रिकेतील राहाणीचा दर्जा सर्वात उच्च प्रतीचा आहे. शिवाय अमेरिकेतील व्यापारी बँकांनी तेथील उद्योगधंद्यांत खूप भांडवल गुंतविलेले आहे. ह्या बँकांनी मिळून दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला जवळजवळ ४ कोटी डॉलर्सचे कर्ज दिलेले असून त्याची मुदतवाढ ठराविक पद्धतीने करण्यात येत असते. गेल्या महिन्यातच त्यांनी कर्जाची मुदत वाढवून दिलेली आहे.

बँकांच्या ह्या धोरणाविरुद्ध अनेक धार्मिक व राजकीय गटांनी कडक टीका केलेली आहे. काही नागरिक संघटनांनी व विद्यार्थ्यांच्या संघटनांनीही बँकांची निर्भत्सना केलेली आहे. परंतु आतापर्यंत तरी बँकांवर त्याचा काही परिणाम झालेला नाही. एका प्रसिद्ध बँकेच्या अध्यक्षांनी दक्षिण आफ्रिकेचे वर्णविद्वेषी धोरण बँकेला पसंत नाही असे जाहीर केले आहे. परंतु बँकेने दिलेला पैसा सर्व वंशांच्या लोकांसाठी वापरला जातो अशी ग्वाही दिली आहे. तथापि त्यांचे हे म्हणणे ॲफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या संघटनेला मान्य नाही. त्यांच्या मताने वर्णविद्वेषाचे धोरण इतके भयंकर आहे की कोठल्याही आंतरराष्ट्रीय समाजाने अशा धोरणाशी संबंध ठेवता कामा नये. दक्षिण आफ्रिकेवर आंतरराष्ट्रीय आर्थिक बहिष्कार टाकला तर त्यामुळे वर्णविद्वेषाचे बळी असणाऱ्यांनाच अधिक तडाखा प्रथम बसेल. तरीसुद्धा ॲफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या संघटनेला आर्थिक दंड-योजना हवी आहे.

ही दीपावली व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !

सुखी व समृद्ध भारतीय जीवनाचे स्वप्न साकार करण्याच्या कार्यात सदैव तत्पर असलेली व लोकादरास आणि विश्वासास पात्र ठरलेली

कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पेण

तार : सागर बँक ] मुख्य कचेरी पेण [ फोन : पेण ५२

| | | |
|---|---|---|
| एकूण ठेवी | रु. | १ कोटी ५४ लाख |
| दिलेली कर्जे | रु. | २ कोटी १५ लाख |
| खेळते भांडवल | रु. | ३ कोटीपर्यंत |

आपली ठेव ह्या बँकेत ठेवा, कारण आपल्या ठेवीचा उपयोग शेती व औद्योगीक विकासासाठी होत आहे. ही गोष्ट आपणास निश्चितच अभिमानास्पद आहे.

जिल्ह्यात एकूण २१ शाखा

व. त्र्यं. अग्निहोत्री — मॅनेजर
ना. य. नेने — चेअरमन

ही दिवाळी
साठे
बिस्किटस्
कोको व
चॉकोलेटस्
घेऊन अधिक उत्साहानें व आनंदानें साजरी करा.

साठे बिस्किट ॲण्ड चॉकोलेट कं. लि., पुणें-२

# भारतामधील अर्थसत्तेच्या केंद्रीकरणावर प्रकाश

## मक्तेदारी टाळून जनहित साधण्याची समस्या

हिंदमधील बड्या उद्योगपतींच्या आर्थिक सामर्थ्याचा अनुभवाच्या आधाराने अभ्यास करण्याच्या बाबतीत, श्री. आर. के. हजारी ह्यांनी लिहिलेल्या पुस्तकाने एक नवा टप्पा गाठला आहे. खाजगी मालकीच्या विभागांत जी बडी धंदे वावरत आहेत त्यांच्या कार्यपद्धतीची समजूत येण्यासाठी जरूर असणारा मालमसाला ह्या पुस्तकाने जितका पुरविला आहे तितका इतरत्र कोठेही उपलब्ध होण्यासारखा नाही. महत्त्वाच्या उद्योगगटांनी अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या विभागांतील कारखानदारीवर जे नियंत्रण ठेवले आहे त्यावर श्री. हजारी ह्यांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे. अर्थात 'उद्योग गट' अगर 'नियंत्रणाची कक्षा' ह्या संबंधींच्या व्याख्या साहजिकच सुस्पष्ट नाहीत आणि असणे शक्यही नाही. एखादे प्रमुख धंदेवाले कुटुंब अगर त्याचे सहकारी म्हणजेच धंदेवाले गट असेच त्यांनी गृहीत धरलेले आहे. धंद्यांवरील नियंत्रणाच्या मर्यादा सूचित करण्यासाठी कंपन्यांचे दोन विभाग करण्यात आलेले आहेत. एका विभागात आतल्या वर्तुळातील कंपन्या आणि दुसऱ्या विभागात बाहेरच्या वर्तुळातील कंपन्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. उद्योग गटांकडून होणाऱ्या नियंत्रणाच्या मर्यादानुसार वरील विभागणी करण्यात आलेली आहे. आतल्या वर्तुळातील कंपन्यांवर संबंधित गट कार्यक्षम रीतीने नियंत्रण चालवू शकतो. हा गट अगर त्याच्याशी संबंधित असलेले सहकारी भागभांडवलापैकी मोठ्या हिश्शाच्या भांडवलाचे मालक असतात; त्यामुळे त्यांना नियंत्रण ठेवता येते, किंवा भागभांडवलाची मालकी फार विभागलेली असते, किंवा भागभांडवलाची मालकी अशा धनिकांकडे असते, की त्यांना कंपनीच्या व्यवहाराविषयी काही आस्था नसते. अशा परिस्थितीत भागभांडवल धारण करणारा जो गट प्रमुख असेल त्याला नियंत्रण ठेवण्यासाठी अल्पमताचे भागभांडवलही पुरेसे होते. बाहेरच्या वर्तुळात अशा कंपन्या असतात की ज्यांच्या व्यवहारात एखाद्या गटाला अगर त्यांच्यातील निर्णय घेणाऱ्यांना महत्त्वाचे स्थान असते. परंतु ते स्थान नियंत्रण करण्याइतके मोक्याचे नसते. अशा एखाद्या गटाच्या मालकीचे भागभांडवल ४९ टक्क्यांपासून अगदी दुर्लक्ष करण्याइतकेही कमी असू शकते. कधी कधी आतल्या वर्तुळातील आणि बाहेरच्या वर्तुळातील कंपन्या एकवटल्याचे दृश्यही पाहावयास सापडते.

श्री. हजारी ह्यांनी ह्या तात्पुरत्या व्याख्यांचा आणि सार्वजनिक व खाजगी कंपन्यांतील भांडवलाच्या मालकीच्या व कारभारविषयक नियंत्रणाच्या माहितीचा उपयोग करून घेतला आहे. १९५१ ते १९५८ ह्या कालामधील माहितीच त्यांनी विचारात घेतली आहे. (१९५६ चा कंपनी कायदा मंजूर झाल्यावरच भाग भांडवलाच्या खाजगी कंपन्यांबाबतची १९५८ पर्यंतची तपशीलवार माहिती उपलब्ध होऊ शकली.) ह्या माहितीच्या आधाराने त्यांनी असा ठाम निष्कर्ष काढला आहे की ह्या दोन सालांमधील काळांत कंपन्यांच्या क्षेत्रात आर्थिक सामर्थ्याच्या केंद्रीकरणाची निश्चितपणे वाढ झालेली आहे. कंपन्यांच्या आतल्या गटात टाटा, बिर्ला, मार्टिन बर्न आणि डालमिआ–साहू ह्या प्रमुख कंपन्यांचा समावेश आहे. १९५१ मध्ये सरकारी मालकीच्या बाहेरील सार्वजनिक कंपन्यांच्या एकूण भाग भांडवलापैकी १७·९१ टक्के भागभांडवल ह्या कंपन्यांच्या मालकीचे होते. १९५८ मध्ये भागभांडवलाच्या मालकीचे त्यांचे प्रमाण २२·३४ टक्के इतके झाले. त्यांच्या गटातील सर्व कंपन्यांचे मिळून भागभांडवलाचे प्रमाण २१·८५ टक्क्यांपासून २६·६० टक्क्यांपर्यंत वाढले. बिगर सरकारी मालकीच्या सार्वजनिक कंपन्यांच्या एकूण ठोक भांडवलातील ह्या आतल्या वर्तुळातील कंपन्यांचा हिस्सा १६·९५ टक्क्यांपासून २२·१४ टक्क्यांपर्यंत वाढला, आणि त्यांच्या गटांतील सर्व कंपन्यांचा हिस्सा २०·४४ टक्क्यांपासून २५·६६ टक्क्यांपर्यंत वाढला. १९५८ मध्ये, टाटा आणि बिर्ला ह्या दोन मोठ्यात मोठ्या गटांतील कंपन्यांचा बिगर सरकारी सार्वजनिक मालकीच्या एकूण ठोक भागभांडवलातील वाटा जवळजवळ एक पंचमांश इतका झाला. १९५१ ते १९५८ ह्या कालातील २० उद्योगधंद्यांच्या गटांचा अभ्यास श्री. हजारी ह्यांनी केला आहे. ह्या गटांच्या वाढीचे निर्देशांक १ क्रमांकाच्या कोष्टकात दिले आहेत. ह्या कोष्टकावरून असे स्वच्छ दिसते की बर्ड हायजर्स आणि अॅन्ड्रयू यूल ह्या परदेशनियंत्रित कंपन्या सोडल्या तर वरील गटांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सार्वजनिक कंपन्यांचे ठोक भांडवल निदान ५० टक्क्यांनी तरी वाढले. त्याचप्रमाणे टाटा, बिर्ला, मार्टिन बर्न आणि डालमिआ साहू ह्या ४ मोठ्या गटांतील सार्वजनिक कंपन्यांचे भागभांडवल १०० टक्क्यांपेक्षाही अधिक वाढले. ह्याच म्हणजे १९५१ ते १९५८ च्या कालखंडातील हिंदी राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या दराशी अगर राष्ट्रीय भांडवलाच्या वाढीच्या दराशी तुलना करता वरील वाढीचा दर कितीतरी पटींने अधिक आहे. भारत सरकारने १९५३–५४ पासून औद्योगीकरणाला जोराची चालना देण्याचे धोरण स्वीकारले. ह्या धोरणाचा परिणाम म्हणून वरील चार कंपन्यांच्या विस्ताराला हातभार लागला असणे शक्य आहे. (ह्या धोरणाचा परिणाम असा झाला की अर्थव्यवस्थेच्या इतर भागांपेक्षा औद्योगिक विभाग अधिक वेगाने फोफावला.) सरकारच्या धोरणाचा फायदा खाजगी मालकीच्या विभागातील कंपन्यांनी अर्थातच घेतला.

असे असले तरी त्यांच्या विस्ताराचे काही श्रेय ह्या गटांनी आधीच अस्तित्वात असलेली औद्योगिक मालमत्ता मिळविण्याचे जे यशस्वी प्रयत्न केले त्यालाही दिले पाहिजे. हे विधान डालमिआ–साहू–जैन, बनगूर ह्या कंपन्यांना आणि काही अल्प प्रमाणात बिर्ला ह्यांच्या गटांना लागू पडते. ह्या चार मोठ्या गटांच्या खालच्या श्रेणीतील काही गटांचा विस्तार तर आश्चर्यकारक वेगाने झालेला दिसतो. उदाहरणार्थ, बनगूर, शापुरजी, मफतलाल, रामकृष्ण आणि महिंद्र. १९५१ साली बनगूर आणि शापुरजी गटांतील कंपन्यांचे ठोक भांडवल ९.०६ कोटी रुपये होते ते १९५८ साली २२.५६ कोटी रुपये झाले. आपआपल्या गटांतील कंपन्यांवर हुकमत मिळविण्यासाठी आणि ती टिकविण्यासाठी ह्या निरनिराळ्या उद्योग गटांनी काय तंत्र वापरले असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. ह्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या कामी श्री. हजारी ह्यांनी जे तपशीलवार माहितीचे भांडार जमविले आहे त्याचा उपयोग होतो. नेहमीच्या दैनंदिन कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुष्कळशा ठिकाणी मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचा वापर झालेला दिसतो. एकाच औद्योगिक गटातील कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याच्या बाबतीत कंपन्यांनी परस्परात केलेली भांडवल गुंतवणूक आणि ट्रस्टनी केलेली गुंतवणूक हा दुवा बऱ्याच ठिकाणी उपयोगात आलेला दिसतो. कंपन्याकंपन्यांमधील गुंतवणूक अनेक तऱ्हांनी होत असलेली दिसते.

श्री. हजारी ह्यांच्या अभ्यासात कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्याची अनेक तंत्रे पाहावयास मिळतात. पण त्यामुळे भारतीय अर्थ व्यवस्थेत मक्तेदारीपद्धती निर्माण करणाऱ्या ज्या प्रवृत्ती दिसतात त्यांना आळा कसा घालावा ह्यासंबंधी काही अडचणींचे प्रश्न उत्पन्न होतात. उद्योग गटांच्या हाती असलेले एखादे शस्त्र काढून घेण्यात यश आले तरी लोकसभेत ह्या विषयाची चर्चा चालू असताना ते नवीनच शस्त्रे परतू लागतील असे वाटू लागते. मोठ्या सार्वजनिक कंपन्यांतील भांडवलात बँकांच्या नावाने मोठमोठ्या रकमा गुंतविण्याची एक पद्धत आहे. ह्या बँका कंपन्यांच्या नॉमिनी, गहाणदार, ट्रस्टी अगर एक्झिक्यूटर्स म्हणून वावरतात. त्याशिवाय दुसऱ्याच्या नावाने घेतलेले भागभांडवल अगर ब्लँक ट्रान्स्फर्स ही हत्यारे आहेतच. ह्या हत्यारांचा उपयोग करून नियंत्रणाच्या केंद्रीकरणाला शह देण्याचे प्रयत्न फोल ठरविता येणे शक्य आहे. बँका आपल्या गिऱ्हाइकांचे व्यवहार गुप्त ठेवीत असतात आणि त्यांच्यावर गिऱ्हाइकांनी टाकलेला विश्वास पवित्र मानीत असतात. बँकांना ही भावना सोडण्यास तयार केले तरीसुद्धा हा उपाय परिणामकारक ठरणार नाही. (व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरणही अपुरेच पडेल.) बिनामी व्यवहार आणि ब्लँक ट्रान्स्फर्स बेकायदा ठरविले तरीसुद्धा हिंदी उद्योगधंद्यांतील बड्या गटांच्या हाती दोन प्रभावी हत्यारे उरतातच. त्यापैकी पहिले हत्यार अविभक्त हिंदू कुटुंबपद्धती. दुसरे म्हणजे भारताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वापरात असलेला असंघटित पण परिणामकारक नाणेबाजार. हा बाजार बेकायदा आणि मामुली व्यवहारांच्या पलीकडचा आहे. कंपन्यांच्या व्यवहारात सुधारणा घडवून आणण्यासाठी एखादा उपाय योजावा न योजावा तोच कायद्यात सुधारणा करणाऱ्यावर निराळ्याच परिस्थितीला तोंड देण्याची पाळी येते. उद्योगधंदे अगर जमीन ह्यांच्या खाजगी मालकीवरच आघात करावे लागतात; अगर बड्या उद्योगधंद्यांचा गट जी नवी हत्यारे शोधून काढील त्यांच्यापुढे मान तुकवावी लागते. बड्या उद्योगधंद्यांच्या कक्षेत मालकी आणि नियंत्रण ह्यांचे एकीकरण अगर विभक्तीकरण कसे होते ह्यासंबंधीची माहितीही पुस्तकात आढळून येते. कोष्टक नं. २ मध्ये त्यांचे निष्कर्ष दिलेले आहेत.

कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी बहुतेक कंपन्यांनी त्यांच्या गटांचे बहुमत असलेले अगर जवळजवळ बहुमत असलेले भागभांडवल आपल्या हाती एकवटल्याचे ह्या कोष्टकावरून दिसून येते. ह्या बाबतीत फक्त पुढील कंपन्यांचे अगर गटांचे अपवाद लक्षात घेण्यासारखे आहेत. टाटा, मार्टिन बर्न, शेषशायी, कस्तुरभाई, रामकृष्ण, महिंद्र आणि किर्लोस्कर. एकंदरीने असे सर्वसामान्य विधान करण्यास हरकत नाही की, एखाद्या उद्योगगटातील कंपन्यांत अद्यावत तंत्राच्या महत्त्वाच्या कंपन्या ज्या मानाने अधिक असतील, त्या मानाने तो नियंत्रणासाठी हुकमी बहुमत असलेल्या भागभांडवलाचा कमी आधार घेतो. (उदाहरणार्थ पोलाद, जीप्स, यंत्रसामग्री, इत्यादी). ज्या कित्येक उद्योगधंद्यांत अगर गटात अत्याधुनिक तंत्राचा बराच वापर करण्यात येत असतो त्यांना नावलौकिकावर, परदेशीय सहकार्यावर अगर सरकारी पाठिंब्यावर विसंबून राहाता येते. कधीकधी एखाद्या गटाला ह्या सर्वांचा फायदा मिळत असतो. ह्याचा अर्थ इतर गट परंपरागत उद्योगधंद्यांवरच अवलंबून असतात असा नाही. बिर्ला, डालमिया-साहू, जैन, बनगूर, वालचंद, मफतलाल, इत्यादी गटांत अनेक प्रकारचे उद्योगधंदे आहेत. त्यापैकी काहीत अत्याधुनिक उत्पादन तंत्र वापरले जात आहे. काही ठिकाणी नियंत्रण असलेल्या कंपन्यात हुकमी बहुमताचे भाग भांडवल असणे ही गोष्ट त्या गटाच्या प्रारंभीच्या द्रव्यविषयक बळकटीचीच केवळ द्योतक असते. ह्या गटांनी व्यापार आणि स्थावर मालमत्ता ह्यांच्या तेजीमंदीचा फायदा घेऊन पैसा मिळविलेला असतो. उदा. बिर्ला, डालमिआ–साहू–जैन आणि बनगूर. शेषशाई, किर्लोस्कर, महिंद्र, रामकृष्ण हे गट तुलनेने छोटे आहेत, आणि त्यांनी प्रथमपासूनच उद्योगधंद्यावर आपले लक्ष केंद्रित केलेले आहे. पण ह्या गटाच्या हुकमतीखाली असलेल्या कंपन्यात त्यांचे भागभांडवल अल्पमतात आहे ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. ही घटना पुढे होणाऱ्या अशाच घटनांची नांदी आहे

किंवा कसे हे सांगता येणे अवघड आहे. परंतु, उद्योगधंद्यांचे नियंत्रण धंदेवाईक कारभाऱ्यांच्या हाती जाण्याचे क्रांतियुग हिंदमधील काही उद्योगधंद्यांत तरी आजच सुरू झाले आहे ह्यात मात्र शंका नाही. श्री. हजारी ह्यांना काय वस्तुस्थिती आढळून आली ह्याची रूपरेषा आपण पाहिली. हिंदी अर्थव्यवस्थेच्या त्यांनी केलेल्या अभ्यासात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु, ह्या केंद्रीकरणाच्या परिणामांचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही हे मात्र लक्षात घेतले पाहिजे. तथापि, त्यांनी धोरणाविषयी काही निष्कर्ष काढले आहेत. त्यांनी स्वतःच असे म्हटले आहे की धोरणाविषयी दाखविलेली दिशा ही त्यांच्या मतांची निदर्शक आहे आणि म्हणूनच वादातीत नाही.

ह्या धोरणाची चर्चा दोन दृष्टींनी करता येईल. उद्योगधंद्यांची खाजगी मालकी ही कायम स्वरूपाची आहे असे मानून हे उद्योगधंदे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जास्तीत जास्त कसे वापरता येतील ते पाहाणे, हा पहिला दृष्टिकोन. हा दृष्टिकोन स्वीकारून ब्रिटन आणि अमेरिका ह्या देशांत मक्तेदारीवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सरकारमार्फत करण्यात येत आहेत. दुसरा दृष्टिकोन असा की खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांची कसोटी पाहाणे आणि मग मक्तेदारीच्या नियंत्रणाचा प्रश्न अधिक व्यापक भूमिकेवरून तपासणे. तपासणीत जर असे आढळून आले की मक्तेदारी अपायकारक आहे आणि खाजगी मालकी नष्ट केल्याखेरीज मक्तेदारीवर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे तर उद्योगधंद्यांच्या खाजगी मालकीला तिलांजली देणे भाग पडेल. मक्तेदारीवर नियंत्रण ठेवण्याबाबत एखादी विशिष्ट भूमिका पत्करून त्याचवेळी उत्पादन साधनांच्या व वाटणीच्या साधनांच्या खाजगी मालकीबद्दल मात्र कोणतेही बंधन स्वीकारण्याचे टाळता येईल असे मानणे ढोंगीपणाचे होईल. काही समाजवाद्यांना असे वाटते की मक्तेदारीवरील हल्ला ही फक्त सलामीची चकमक आहे. त्यानंतर लोकांच्या जीवित साधनांवर खाजगी मालकी गाजविणाऱ्यावर दुसरा हल्ला चढविता येईल. पण, त्यांना असे समजून येते की सलामीच्या चकमकीतच ते पुरे गुंतले जातात. कारण मक्तेदारी केंद्रीकरणाचा रोग हा सर्व देशभर पसरत चाललेला आहे. अर्थव्यवस्थेला झालेला हा रोग जुन्या पद्धतीच्या स्पर्धेपेक्षा जोरदार असल्याचे त्यांना आढळून येते.

श्री. हजारी हे खाजगी मालकी नष्ट करण्याच्या उद्दिष्टाने प्रेरित झालेले समाजवादी नाहीत. सध्या प्रचलित असलेल्या खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचा कारभार अधिक कार्यक्षम कसा करता येईल हे पाहाण्याचा त्यांचा हेतू आहे. अर्थव्यवस्थेमधील मक्तेदारीकंपन्या उत्पादन कमी करण्याच्या प्रवृत्तीच्या असतात अशी टीका उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ नेहमी करीत असतात. पण ही टीका मुद्द्याला सोडून आहे. कारण, ही प्रवृत्ती आज सर्वत्रच सर्वंकष होऊन बसली आहे. सरकार करीत असलेल्या खर्चामुळे भारतात आज विकणाऱ्याला सर्वस्वी अनुकूल अशी बाजारपेठ निर्माण झाली आहे. तिचाच हा परिणाम आहे. पण ह्या परिस्थितीपासून श्री. हजारी ह्यांनी काढलेला निष्कर्ष मात्र बरोबर नाही. उत्पादन कमी करण्याच्या प्रवृत्ती सर्वत्र बोकाळल्या आहेत म्हणून त्यांच्यावर टीका करू नये हा निष्कर्ष बरोबर नाही. उलट, विकणाऱ्यांना अनुकूल अशी बाजारपेठ आणि उत्पादन कमी करण्याच्या प्रवृत्ती ह्यांच्यामुळे फक्त धंदेवाल्यांचा फायदा होत आहे, की सर्व लोकांचा फायदा होत आहे हे शोधून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे. ( उद्योगधंद्यातील व्यावसायिक, शिक्षणक्षेत्रातील वरिष्ठ आणि सरकार ह्यांनाही हा फायदा होत आहे काय, ते तपासण्यात आले पाहिजे.) ह्याचाच अर्थ असा की हिंदमधील नियोजनाच्या धोरणाचा व उद्दिष्टांचाच फेरविचार करावा लागणार आहे. भांडवली माल आणि ग्राहकोपयोगी माल ह्यांच्या उत्पादनासाठी भांडवलाची गुंतवणूक किती करावी, अगर सार्वजनिक मालकीच्या व खाजगी मालकीच्या विभागांत ती किती करावी, एवढ्यापुरताच हा फेरविचार मर्यादित करून चालणार नाही. मूठभर श्रीमंत आणि बहुसंख्य दरिद्री जनता ह्यांच्यात अर्थसत्तेची वाटणी कशी करावी ह्याचासुद्धा पुन्हा विचार करावा लागेल. परिणामतः मक्तेदारी ही उत्पादनावरच बेकायदा निर्बंध घालते आणि ग्राहकांची पिळणूक करते अशी टीका अर्थशास्त्रज्ञ नेहमीच करीत असतात. उदाहरणार्थ, मोटारीच्या किंमती घ्या. ह्या बाबतीत खरा प्रश्न मोटारवाल्यांची पिळणूक होत आहे किंवा काय हा नसून मोटारीच्या उत्पादनात गुंतलेली साधनसामग्री सामाजिक हिताच्या दृष्टीने अधिक चांगल्या रीतीने उपयोगात आणता येईल की नाही हा आहे.

मक्तेदारीचे परिणाम चार वेगवेगळ्या कसोट्यांवर पारखून पाहिले पाहिजेत :— ( १ ) गिऱ्हाइकांची पिळणूक ( २ ) कामगारांची पिळणूक ( ३ ) भांडवल गुंतविणाऱ्यांची पिळणूक आणि ( ४ ) नागरिकांची पिळणूक. सनातनी अर्थशास्त्रज्ञ फक्त ग्राहकांच्या पिळणुकीपुरताच विचार करतात. कामगार चळवळीतील पुढारी कामगारांच्या पिळणुकीपुरताच विचार करतात. ह्या दृष्टीने विचार करतांना पुष्कळदा भलतीच उत्तरे मिळतात. आधुनिक मक्तेदाराला भरमसाठ नफा होत असल्यामुळे त्यातील काही भाग आपल्या कामगारांना देणे त्याला परवडते. पण त्यामुळे परंपरागत उद्योगधंद्यांत राबणाऱ्या कामगारांचे राहणीचे मान सुधारत नाही. कंपन्यांचे वकील बहुधा भांडवल गुंतविणाराच्या पिळणुकीची दखल घेतात. मॅनेजिंग एजन्सी पद्धतीसंबंधी अलीकडे खूप गरम चर्चा झालेली आहे. कारण, पैसे गुंतविणाऱ्या लोकांना असे वाटत होते की आपला न्याय्य नफा आपल्याला देण्यात येत नाही. हिंदमध्ये कंपनी

आमचे भागीदार व असंख्य खातेदार यांना ही दिवाळी आनंदाची व सुखाची जावो !

सांगली जिल्ह्यातील सहकारी संस्थांमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविलेली—

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

दूरध्वनी क्रमांक ५३ ] स्थापना–१९३५ [ तारेचा पत्ता-अर्बनबँक

— शाखाविस्तार —

१. माधवनगर २. खणभाग, सांगली ३. गावभाग, सांगली ४. बुधगाव ५. विश्रामबाग, सांगली व मराठवाड्यात ६. बीड व ७. परभणी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ३,७१,११० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ८,०६,११३ |
| ठेवी | रु. | १,१५,२३,११७ |
| निव्वळ नफा | रु. | १,०१,५५४ |

सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची सोय, बचतनिधी, रिकरिंग डिपॉझिट या आकर्षक व्याजाच्या बचत योजना.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ग. का. दांडेकर, D. M. E. & E. चेअरमन

ल. थ. लागू, B. A., LL. B. मॅनेजर



४३ वर्षांची अविरत सेवेने सर्वांच्या विश्वासपात्र झालेली

# सन्मित्र

## को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

१२, तात्या घारपुरे पथ, मुंबई ४

स्थापना : २१-१०-१९२४ वेळ : सकाळी ८ ते ९॥ सायंकाळी ६ ते ८

खास मध्यमवर्गीयांच्या बँकिंगविषयक गरजा पुरविणारी " अ " वर्गातील बँक

अधिक माहितीसाठी लिहा अगर भेटा.

श्री. शं. ना. कानडे, M. A. चेअरमन

श्री. स. वि. कुलकर्णी, M. Com., LL. B., मॅनेजिंग डायरेक्टर



ही दिवाळी आमच्या भागीदारांना, ठेवीदारांना आणि हितचिंतकांना

—: सुखसमृद्धीची जावो :—

अल्पावधीत जनता–जनार्दनाचे अंतःकरणात मानाचे स्थान पटकावलेली आणि प्रगतिपथावर असलेली

# जनता सहकारी बँक लि., सांगली

हेड ऑफिस ( कराळे बिल्डिंग, हायस्कूलरोड, सांगली ) शाखा मार्केट यार्ड

फोन २४४ फोन ४८४

—: प्रगतिपथावरील बोलके आंकडे :—

| | | |
|---|---|---|
| ( ज ) अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| ( न ) वसूल झालेले शेअर भांडवल | रु. | ३,१६,८०० |
| ( ता ) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,९३,०११ |
| ( बँ ) एकूण ठेवी | रु. | ११,०६,०२७ |
| ( क ) एकूण खेळते भांडवल | रु. | ४०,१४,११४ |

( सां ) आकर्षक व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात.

( ग ) बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

( ली ) बँक ५ टक्के डिव्हिडंड देत असून सुरुवातीपासून "अ" वर्गात आहे.

बा. ए. कचाडे असि. मॅनेजर

रमणलाल म. शहा व्हा. चेअरमन

आण्णासाहेब कराळे चेअरमन

कायद्यात ज्या सुधारणा करण्यात आल्या त्यापैकी बऱ्याच सुधारणांचा उद्देश ह्या वर्गाचे जीवन अधिक सुखकर करण्याचा होता असे म्हणता येईल. (श्री. हजारी ह्यांनी सुचविलेल्या काही सुधारणा ह्याच स्वरुपाच्या आहेत.) हिंदमधील फुटकळ पैसे गुंतविणारांच्या कृतीमुळे भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण आणि दिशा ठरते असे दाखविता आले, तरच ह्या प्रकारच्या सुधारणा मक्तेदारीचे सर्वसामान्य मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने लक्षात घ्याव्या लागतील. १९५७ पूर्वी कशीही परिस्थिती असो; पण त्यानंतर परदेशीय चलनाच्या टंचाईने कायमच्या संकटाचे स्वरूप धारण केलेले असल्याने ही गोष्ट खरी नाही. काही प्रकारच्या उत्पादक धंद्यात पुरेशी भांडवल गुंतवणूक होत नसेल तर त्याचे कारण सरकारच्या व खाजगी कारखानदारांच्या यादीत त्या धंद्यांना अग्रहक्कांच्या बाबतीत खालचे स्थान हे आहे. किंवा खाजगी भांडवल त्या धंद्यात येण्यास तयार नाही असे दिसल्यावर सुद्धा सरकार पुरेशी साधनसामग्री गुंतविण्यास तयार नाही हे तरी आहे.

ह्या सर्व वादात खरा प्रश्न वेगळाच आहे. मक्तेदारी संघटना नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने चांगल्या आहेत किंवा नाही, आणि खाजगी मालकीवर आधारलेल्या हिंदसारख्या देशाच्या अर्थव्यवस्थेत त्या टाळता येतील काय? श्री. हजारी ह्यांनी ह्या प्रश्नाचे स्वच्छ उत्तर दिलेले नाही. त्यांचा असा विश्वास आहे की खाजगी उद्योगधंद्यांनी बांधलेली संघटना ही मोलाची आहे. पण, त्याचबरोबर प्रचंड औद्योगिक घराण्यांनी हिंदी अर्थव्यवस्थेवर (आणि राजकारणावर व समाजावर) प्रभुत्व गाजवावे ही कल्पना त्यांना बेचैन करते. त्यांनी असा उपाय सुचविला आहे की मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यात यावे. त्यामुळे अवाढव्य संघटनेपायी उद्भवणारे दोष टळतील आणि विकासही खुंटणार नाही अशी त्यांची धारणा आहे. आता ह्या सूचनेला उचलून धरणे कठीण आहे. मोठ्यात मोठी औद्योगिक संघटना आणि छोट्यात छोटी संघटना ह्यांच्यातील सुवर्णमध्य चांगलाच ठरेल असे मानावयाचे झाल्यास गोष्ट वेगळी. काही मध्यम आकाराचे उद्योगधंद्यांचे गट झपाट्याने वाढले म्हणून त्यांना तसे वाटत असावे. पण ही गोष्ट काही आर्थिक कार्यक्षमतेचे द्योतक नाही. कारण सावध सट्टेबाजी करून माल, जमीन आणि अलीकडे परदेशीय चलन ह्यांचे व्यवहार केल्यास भारतात चमत्कार करून दाखविता येतो हे आता उघड झाले आहे. भारतामधील बड्या उद्योगधंद्यांच्या बाजूने पुष्कळदा असे सांगण्यात येते की भूतकालात नवनव्या उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्यास त्यांनी उत्तेजन दिले आहे. छोट्या उद्योगधंद्यांना हे जमलेले नाही. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या कालापुरते हे विधान कोणत्याही मोठ्या उद्योग गटासंबंधाने खरे नाही. ह्याला अपवाद फक्त टाटा संघटनेचा.

दुसऱ्या महायुद्धानंतर विकणाराला अनुकूल अशी बाजारपेठ अस्तित्वात आली. कारण परदेशाकडून होणारा मालाचा पुरवठा थांबला आणि संरक्षक जकातीची उंच भिंत उभारण्यात आली. एकदा विक्रेत्याला अनुकूल बाजारपेठ निर्माण झाल्यावर एखादा नवीन माल निर्माण करण्यासाठी विशेष प्रकारची औद्योगिक कार्यक्षमता असण्याची जरूरीच नाहीशी झाली. दुसरे असे की, पुष्कळशा उद्योगधंद्यांना अडचणीच्या प्रसंगी सरकारपुरस्कृत द्रव्यसाहाय्यक संघटनांकडून कर्जे मिळण्याची सोय झाली. त्याचा फायदा मोठ्या उद्योग गटांनाही मिळाला. जागतिक बँकेने खाजगी मालकीच्या विभागाला जी कर्जे दिली त्याची हमी सरकारने घेतली. तेव्हा हिंदमधील बड्या उद्योगधंद्यांनी मोठे साहस केले आणि दूरदृष्टी दाखविली असा दावा करता येणे कठीण आहे. श्री. हजारी ह्यांच्या मताने मॅनेजिंग एजन्सी पद्धतीमुळे कारभारात विशेष काटकसर करता येणे शक्य झाले नाही. बड्या उद्योगधंद्यांची संघटना ही त्यांच्या मालमत्तेच्या यादीवरून सूचित होते त्यापेक्षा अधिक मोलाची आहे असे ते म्हणतात. पण मग वरील विधानाचा मेळ कसा घालावयाचा? कारभारात निपुण असलेल्या धंदेवाइकांकडून कारभार चालविणे चांगले हे खरे असेल तर, उदा. केसोराम कॉटन मिल्स आणि शिरपूर पेपर मिल्स ह्यांचा कारभार एकाच मॅनेजिंग एजन्सीतर्फे चालविणे काटकसरीच्या दृष्टीने कसे इष्ट ठरते? दुसरे उदाहरण सिजुआ झरिआ वीज कंपनी आणि युनिअन ज्यूट कंपनी ह्यांच्या मॅनेजिंग एजन्सीचे देता येईल. दुसरे असे की मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यामुळे जर उत्पादनाच्या खर्चात बचत होत असेल तर श्री. हजारी ह्यांनी मोठ्या उद्योगगटांविरुद्ध मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांची बाजू का घ्यावी हे कळत नाही.

मध्यम आकाराच्या उद्योगधंद्याचा कोणता आकार सर्वांत अधिक चांगला हे अद्याप ठरलेले नाही. मोठ्या उद्योगधंद्यांना काटशह देण्यासाठी त्यांचा उपयोग होईल अशी तर कल्पना नाही ना? मोठ्या उद्योग गटातील कंपन्या आणि मध्यम उद्योगधंद्यांतील कंपन्या ह्यांचे हितसंबंध बहुधा पूर्णपणे परस्परविरोधी नसले तर उभय गटाच्या कंपन्यांत सहकार्य साधणेच अधिक सुखप्रद होईल. त्यांचे हितसंबंध बिनतोड विरोधाचे आहेत असे दाखवून देणे कठीणच आहे. मोठ्या उद्योग गटांची व्याप्ती मर्यादित करण्यासंबंधी काही धोरणवजा निर्णय घेण्यात आला तर त्याची अंमलबजावणी करणे फार अवघड जाईल. मालमत्तेसंबंधी असलेले कायदे मानण्याची प्रथा आहे तोपर्यंत तरी तसे करणे बिकट जाणार आहे. मोठ्या उद्योगपतींनी आपल्याला होणारा सर्व नफा वाटून टाकावा अशी अपेक्षा आहे काय? का सरकारी कर्जरोखे विकत घेऊन त्यांनी फक्त व्याज गोळा करीत बसावे? ह्या प्रश्नाचे उत्तर होय असे असेल तर बचत करण्यास आणि उद्योगधंद्यात पुढाकार घेण्यास उत्तेजन देण्याच्या धोरणाचे काय? कंपन्या एकूण नफ्यातून जितकी बचत करतात त्यापेक्षा

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे २.

( स्थापना : १९०६ )

★

कामाची वेळ—
सकाळी ८–४५ ते १०–४५. सायं. ५–०० ते ७–००
शनिवारी सकाळी ८–४५ ते १०–४५ फक्त

★

हप्तेबंद ठेवींची आकर्षक योजना चालू आहे

★

प्रा. डॉ. न. का. घारपुरे — अध्यक्ष
ह. गो. महाजन — कार्याध्यक्ष
भा. ग. खांडेकर, एम. ए., एच. डी. सी. — व्यवस्थापक
दूरध्वनी ५६२८३

दि कोल्हापूर मराठा मंडळाच्या विद्यमाने चाललेली

## दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि,, कोल्हापूर

स्थापना १९३३ ] ऑडिट वर्ग " अ " [ फोन ७१३

| | | |
|---|---|---|
| १ ) अधिकृत शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| २ ) खपलेले शेअर भांडवल | रु. | १,९९,९९५ |
| ३ ) रिझर्व्ह फंड | रु. | १,०८,५९६ |
| ४ ) इतर फंडस् | रु | ६०,६४७ |
| ५ ) खेळते भांडवल | रु. | १६,६९,५६७ |
| ६ ) एकूण व्यवहार | रु | ८८,६१,१३८ |
| ७ ) सभासद संख्या | | ३,५६७ |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

ही दीपावली बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना सुखाची व समृद्धीची जावो

डी. के. पाटील — मॅनेजर
दत्तात्रय परशराम माने — प्रेसिडेंट

**शुभेच्छा !** उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा जास्तीत जास्त उपयोग ऊस आणि धान्य पिकांकरिता करून एकरी जास्तीत जास्त उत्पादन काढणाऱ्या शेतकऱ्यांनी सहकारी तत्त्वावर एकत्रित येऊन चालविलेला शेतकऱ्यांच्या मालकीचा भारतातील एकमेव साखरकारखाना

## दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर

तारेचा पत्ता :— " माळीशुगर " माळीनगर.
स्थापना : सन १९३२
रजिस्टर्ड ऑफिस : माळीनगर, जि. सोलापूर
मुंबई ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई नं. १

आपले ऊस उत्पादक सभासद, कामगार आणि संचालक मंडळ यांच्या वतीने सर्व भारतीयांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा व्यक्त करीत आहे !

श्री. पंढरीनाथ हणमंत गिरमे, चेअरमन * श्री. जगन्नाथ गणपत रासकर, व्हा. चेअरमन

संचालक मंडळ

श्री. हरिभाऊ बळवंत गिरमे, श्री. शंकरराव मारुतराव गिरमे, श्री. चंद्रकांत शंकरराव कुदळे, B. Sc., Agri (Hon)
श्री. भगवंत गेणूजी गिरमे, श्री. भाऊसाहेब तथा शंकरराव भाऊराव राऊत,
श्री. कृष्णकांत लक्ष्मण गिरमे, श्री. रा. ब. नारायणराव सोपानराव बोरावके,
श्री. के. एन्. पाटील, बी. ए., बी. एससी., बी. कॉम., एल्‌एल्. बी., मॅनेजर

वाटण्यात आलेल्या नफ्यातून व्यक्ती अधिक बचत करतील असे मानण्यास काहीच जागा नाही.

सरकारने मोठ्या उद्योगधंद्यांच्या खाजगी मालकीविरुद्ध ठाम भूमिका घेतली नाही, तर मोठ्या उद्योगधंद्यांच्या गटाच्या विस्ताराला निरुत्साह करण्यासाठी कोणतेही उपाय योजले तरी त्यांची मात्रा चालणार नाही, ह्याविषयी शंका बाळगण्याचे कारण नाही. जी क्षेत्रे सार्वजनिक मालकीच्या विभागासाठी राखून ठेवण्यात आलेली होती अशाही क्षेत्रात खाजगी उद्योगधंद्यांनी यशस्वी आक्रमण केलेले आहे. १९५८ पासून तर हे आक्रमण विशेष लक्षात भरण्यासारखे होत आहे. त्याचप्रमाणे खाजगी उद्योगधंद्यांनी परदेशी सहकार्याविषयी असलेल्या उत्सुकतेचा फायदा घेऊन आपआपल्या क्षेत्रात भक्कम पाय रोवण्यास प्रारंभ केला आहे. आपल्या क्षेत्रात नवे उमेदवार शिरू नयेत म्हणूनही त्यांचे प्रयत्न चालूच आहेत. ज्या परदेशी कंपन्यांकडून चांगल्या दर्जाचे तान्त्रिक साह्य आणि परदेशीय चलनातील द्रव्यसाह्य मिळण्याची शक्यता आहे त्या भारतामधील कंपन्यांच्या मानाने खूपच बड्या असतात आणि त्यांना भारतामधील मोठ्या कंपन्यांशी सहकार्य करणेच अधिक पसंत पडते.

काँग्रेसछाप समाजवादाच्या डळमळत्या डोलाऱ्यावर परदेशी आणि देशी बड्या उद्योगधंद्यांनी चालविलेल्या हल्ल्याबरोबरच हिंदी उद्योगपतींनी बऱ्याच राज्यसरकारांवर आणि मध्यवर्ती सरकारवरही दडपण आणण्याचे प्रयत्न आरंभिले आहेत. श्री. हजारी ह्यांनी असे दाखवून दिले आहे की, बड्या उद्योगधंदेवाल्यांना होणाऱ्या विरोधाच्या बऱ्याच मोठ्या विरोधाचा उगम भाषिक, प्रादेशिक आणि जातीय भावनांतून झालेला असतो. ह्याचा अर्थ बडे उद्योगधंदे स्थानिक, आर्थिक हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या कामी संकुचित वृत्तीचा उपयोग करून घेत नाहीत असा मात्र नाही. ह्या बाबतीत त्यांची भूमिका तटस्थाची अगर बघ्याची आहे असे सुचविणे बरोबर होणार नाही. एखाद्या प्रादेशिक, भाषिक अगर जातीय गटाशी आर्थिक सत्तेची असमान वाटणी जर संलग्न झालेली असेल तर अशा परिस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही. मग असे समर्थन न करण्याने जातीय अगर संकुचित भावना जागृत करण्याचा धोका असला तरी तो पत्करला पाहिजे. अशा तऱ्हेच्या युक्तिवादाने भूतकाळात अनिष्ट मर्यादा गाठलेली आहे आणि तिचा फायदा घेऊन स्थानिक असंतोषाच्या आधाराने जातीय अगर प्रादेशिक गटांनी आपली पोळी भाजून घेतलेली आहे. आर्थिक सत्तेच्या विभागीय केंद्रीकरणामुळे धोकादायक राजकीय परिणाम घडून येणे शक्य आहे ह्याची जाणीव समंजस धोरणाने ठेवली पाहिजे आणि त्याविरुद्ध खास उपायांची योजना केली पाहिजे.

आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणामुळे सर्वसामान्य हिंदी लोकांचे दीर्घकालीन हित साधले जाईल किंवा नाही हा खरा मूलभूत प्रश्न आहे. बड्या खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांविरुद्ध जर भूमिका घेण्यात आली तर असेरीस औद्योगिक विभागातील खाजगी मालकीविरुद्ध भूमिका घेणे अटळच होईल. कारण, ज्या नव्या उद्योगधंद्यांत भारत आज तौलनिक दृष्टीने पुढारलेला आहे त्या सर्वांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणेच आवश्यक आहे. उदा.—पोलाद, वाहतुकीची साधने, औद्योगिक रसायने, खते, वगैरे. असे धंदे फारच थोडे आहेत की ज्यात मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाने फायदा होत नाही. तेव्हा शेवटी असे निष्पन्न होते की, उद्योगधंद्यांतील खाजगी मालकीला पाठिंबा देऊन पुन्हा मक्तेदारीविरुद्ध ठाम भूमिका घेणे जमण्यासारखे नाही. तसे केल्याने देशाची कुचंबणा अधिकच वाढण्याचा संभव आहे आणि त्यामुळे त्याच्या आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याला अधिक भयानक धोके उत्पन्न होण्याची शक्यता आहे. इतकेच काय पण देशाचे ऐक्यही भंग पावण्याची भीती आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागातील बऱ्याच उद्योगधंद्यांच्या अकार्यक्षमतेबाबत बऱ्याच लोकांनी निराशा व्यक्त केलेली आहे.

त्यांनी हे लक्षात घेतलेले नाही की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालातील खाजगी उद्योगधंद्यांची सुद्धा कार्यक्षमता काही फारशी आशादायक नाही. आधीच मर्यादित असलेल्या आणि जबर संरक्षण असलेल्या बाजारपेठेतील गरज भागविण्यासाठी बऱ्याच खाजगी उद्योगधंद्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. त्यातल्या त्यात दीर्घकाल टिकणाऱ्या ग्राहकोपयोगी मालाची अशी उदाहरणे प्रसिद्धच आहेत. उदा.–मोटरगाड्या. परदेशी स्पर्धेचे पूर्ण उच्चाटन झालेले असल्यामुळे आणि विकणाऱ्याला अनुकूल अशी बाजारपेठ असल्यामुळे बहुतेक सर्व ग्राहकोपयोगी मालाचे उत्पादन कमीतकमी खर्चात करण्यास काही प्रेरणाच राहिली नाही. ह्याच कारणामुळे परदेशी भांडवलाचे सहकार्य म्हणजे बऱ्याच वेळा भांडवलाचा व तंत्रज्ञांचा अपव्यय असा अर्थ होऊन बसला आहे. शिवाय बऱ्याच परदेशी सहकाऱ्यांनी आणि त्यांच्या देशी भाऊबंदांनी भारतामधील परिस्थितीला साजेल अशा रीतीने उत्पादनाची पद्धत बदलण्याचा खराखुरा प्रयत्नच केलेला नाही. मोठ्या औद्योगिक गटांच्या बाजूने असा एक मुद्दा पुष्कळदा मांडण्यात येतो की, परदेशी कंपन्यांशी फक्त तेच भागीदारी करू शकतात. हे खरे असले तरी त्यापासून होणारा फायदा शंकास्पद आहे. कारण, हिंदी भागीदारांनी आपल्या परदेशीय बाजारपेठेत पाय रोवावा अशी बहुतेक आंतरराष्ट्रीय परदेशी कंपन्यांची इच्छाच नसते. त्यामुळे अंगी कुवत असूनसुद्धा त्या कंपन्या भारतात अद्ययावत उत्पादनपद्धती स्वीकारण्याविषयी बेपर्वा असतात. भांडवलशाही देशांतील अगदी प्रगतिशील कंपन्या जरी घेतल्या तरी त्यांना गरीब आणि अविकसित भारत जी प्रलोभने दाखवू शकेल ती आकर्षक वाटतील अशी फारशी चिन्हे दिसत नाहीत. अलीकडील काही

आमचे सभासद संचालक व शेतकरी बंधूस, व्यापारी ग्राहक व हितचिंतक यांना दिपवाळी (नुतन वर्ष) सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ही शुभेच्छा !

## गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी विक्री संघ लि., कोपरगाव

जि. अहमदनगर

मुख्य कार्यालय : कोपरगाव ] [ शाखा : श्रीरामपूर

—डेपो—

राहाता, पुणतांबा, कोळपेवाडी व कोल्हार, मुंबई वाहतूक विभाग

—संघाचा व्याप—

शेती माल खरेदी विक्री, अडत विभाग, ग्राहक भांडार, कापड विभाग, मेडिकल स्टोअर्स; मशिनरी स्टोअर्स, प्रिंटिंग प्रेस, ऑईल व तेल विभाग, पेट्रोल पंप, लक्ष्मी मिश्रखत कारखाना, इत्यादी.

**स्थापना : १९२२**

आर्थिक स्थिती : सभासद संख्या : २६२०

उभारलेले भांडवल : ५ लाख, वसूल झालेले भांडवल : ४,०४,८६५

गंगाजळी ६,०९,३३३, इतर निधी १४,२६,७१३

खेळते भांडवल : ७२,००,१३५

शास्त्रशुद्ध निर्मिती, अगदी माफक दर, हमखास उत्पादन म्हणजे संघाने तयार केलेले लक्ष्मीछाप मिश्रखत. कृषी उत्पादन वाढीची दुसरी आघाडी जिंकण्यासाठी लक्ष्मी छाप मिश्रखते अवश्य वापरा.

## दि धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे

**स्थापना : १३-९-१९५७**

मुख्य कचेरी :–गरुड बाग, धुळे ( पोस्ट बॉक्स नं. ३ )

चेअरमन – श्री. पुरुषोत्तम काळू पाटील, बी. कॉम., एलएल. बी.

व्हा. चेअरमन––श्री शिवसिंग हाटेसिंग राजपूत

ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतिसाठी वापरला जातो.

बँक अल्पमुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारते.

बँकेत वाढत्या प्रमाणात ठेवी ठेवून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना साहाय्य करण्यास आम्हांला मदत करा.

ता. २५-८-१९६७

| | |
|---|---|
| ( १ ) अधिकृत भांडवल | १ कोटी, ५० लाख |
| ( २ ) भरपाई झालेले भाग भांडवल | ८२ लाख |
| ( ३ ) ठेवी | २ कोटी, ६४ लाख |
| ( ४ ) कर्जे | ५ कोटी, २४ लाख |
| ( ५ ) खेळते भांडवल | ६ कोटी, ७९ लाख |

जिल्ह्यात ह्या बँकेची मुख्य कचेरी व ३४ शाखा अविरत कार्य करीत आहेत.

जी. क्यू. शेख, मॅनेजर — एम्. एस्. कुळकर्णी, ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी

ही दीपावली आमच्या सर्व सभासदांस, ठेवीदारांस व ग्राहकांस आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो हीच शुभेच्छा.

# नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नासिक

बँकिंगची सवय ही आजच्या अर्थव्यवस्थेत एक अत्यावश्यक बाब आहे.

तुमच्या हाती केव्हाही येणारे पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी व हवे तेव्हा काढण्यासाठी—

**जिल्ह्यातील ४२ शाखांमार्फत शेतकी व औद्योगिक संस्थांच्या विकास कार्यात मदत करीत असलेल्या...**

## नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतच ठेवा.

तेथे ते तुमच्याच विकासात कार्यशील असतात व तुम्हाला पुरेसे व्याजही मिळवून देतात.

**बँकेची सांपत्तिक स्थिती**

| | | |
|---|---|---|
| १] भरपाई झालेले भाग भांडवल | रु. | ९९.५० लाख |
| २] ठेवी | रु. | ४५०.०० लाख |
| ३] दिलेली कर्जे | रु. | ७५०.०० लाख |
| ४] खेळते भांडवल | रु. | ९६५.१० लाख |

**व्याजाचे आकर्षक दर**

| | | |
|---|---|---|
| १] सेव्हिंग्ज | द. सा. द. शे. | ४ टक्के |
| २] मुदतीच्या ठेवी | ,, | २½ टक्के ते ७ टक्के |

तु. मो. सोनवणे, मॅनेजर — मा. त्र्यं. पाटील, व्हा. चेअरमन — व्यंकटराव मा. हिरे, चेअरमन

वर्षांत परदेशी भांडवलाला ज्या सवलती देण्यात आल्या आहेत त्यामुळे पदरात पडलेली फळे तीव्र निराशा उत्पन्न करणारीच ठरली आहेत. उलट, भारतामधील बड्या उद्योगगटांशी आपले नशीब बांधण्याची परवानगी परदेशी कंपन्यांना दिल्यामुळे बड्या गटांचे राजकीय दडपण अधिक सर्वगामी आणि यशस्वी होण्याचा मात्र संभव आहे आणि शिवाय जगाच्या बाजारपेठांतून आपल्या गरजा भागविण्याची संधीही आपण गमावून बसलो आहो. समाजवादी देश, खाजगी व्यापारी कंपन्यांशी उभयतांना लाभदायक असे व्यापारी सौदे जाहीर रीत्या करू शकतात ह्याविषयी जर काही शंका शिल्लक राहिल्या असल्या, तर सोव्हिएट रशियाने ब्रिटिश, इटालिअन आणि जपानी कंपन्यांशी केलेल्या व्यापारी देवघेवीचा इतिहास त्यांचे निरसन करण्यास पुरेसा आहे.

तात्पर्य, भारतासारख्या गरीब देशात मोठ्या प्रमाणावरील भांडवलाच्या साह्याने खाजगी उद्योगधंद्यांची वाढ होत राहिल्यास ग्राहकोपयोगी उद्योगधंद्यांच्या उभारणीला उत्तेजन मिळते. पण, हे उद्योगधंदे अकार्यक्षम राहतात. कारण ते छोटे असतात आणि त्यांना प्रगत देशांतील अंगभूत तांत्रिक प्रगतीचा लाभ मिळू शकत नाही. ग्राहकोपयोगी उद्योगधंद्यांच्या अशा तऱ्हेच्या वाढीमुळे बचतीमध्ये जी घट होते त्यामुळे साधनसंपत्तीची वाटणी वेडीवाकडी होते. त्यातच कारखान्यांच्या अकार्यक्षमतेमुळे तिच्या अपव्ययात भर पडते. ह्या कंपन्यांवर खाजगी मालकीचे नियंत्रण असल्यामुळे त्या कशातरी जिवंत ठेवण्याची धडपड सुरू होते. झाले ते गेले असे समजून नवीन आर्थिक धोरणे अवलंबिण्याचे ठरविले आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टीने उपयुक्त अशा काही थोड्या मालाच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले, तरी साधनांचा अपव्यय करणारे खाजगी मालक ह्या धोरणाला पाठिंबा देणार नाहीत. चैनीच्या वस्तूंचे उत्पादन बंद करून केवळ भागणार नाही. कारण, अर्थव्यवस्थेत काही व्यक्तींच्या अगर काही गटांच्या हाती जर चैनीच्या वस्तू खरेदी करण्याइतके उत्पन्न साठत असेल तर त्यापैकी काही उत्पन्न अशा वस्तूंवर खर्च होणारच. हा माल गुप्त रीतीने कुटिरोद्योगात तयार केलेला असो अगर परदेशांतून चोरट्या मार्गाने आणलेला असो, तो घेणे म्हणजे बहुमोल साधनसंपत्तीचा अपव्यय करणेच होय. म्हणून जे सरकार अपव्ययात्मक उपभोगाला उत्तेजन मिळू नये म्हणून फक्त नियमन करते त्याचे धोरण अडचणीत सापडते. उद्योगगटांच्या तीव्र वैरभावाला तोंड देऊन ते टिकले तर नशीबच बरे म्हणावयाचे. कारण, त्याने जारी केलेल्या नियमनामुळे ह्या

**कोष्टक नं. १ : बड्या उद्योगगटांच्या वाढीचे निर्देशांक : १९५१ = १००**

| | भाग भांडवल | ठोक भांडवल | निव्वळ किंमत + कर्जे | निव्वळ किंमत |
|---|---|---|---|---|
| (१) टाटा ... | १५९.१४ | २४३.८१ | २४८.९० | १६३.७९ |
| (२) बिर्ला .. | १७१.२१ | २३३.१३ | १६७.२९ | १५१.४० |
| (३) मार्टिन बर्न ... | १३४.६५ | २२७.२१ | २५५.६१ | २११.०२ |
| (४) दालमिआ साहु जैन ... | १०७.५१ | २३५.२८ | १३०.३२ | १११.११ |
| (५) बनगूर ... | २२७.१० | ५७१.७४ | २६६.४९ | २०८.७० |
| (६) थापर ... | १६७.३१ | २६६.१४ | १९५.४१ | १६३.३८ |
| (७) जुगीलाल कमलापत ... | १३८.१७ | २५७.९९ | १६९.८५ | १६१.८१ |
| (८) श्रीराम ... | १४०.८३ | १९६.९१ | १९६.०५ | १६१.०७ |
| (९) बर्ड हायलजर्स ... | १०५.९७ | १२५.७६ | १२०.४४ | १०८.४१ |
| (१०) अॅन्ड्र्यू यूल ... | ८४.४९ | १०२.१४ | ९४.५० | ९८.५२ |
| (११) शापूरजी ... | २०२.९४ | ३११.३८ | २३५.७९ | २०६.०७ |
| (१२) खटाव ... | १५८.१८ | २२९.९३ | १८६.५४ | १५०.९४ |
| (१३) वालचंद ... | १४०.२६ | १७०.४४ | १३३.९० | ११२.५० |
| (१४) मफतलाल ... | ३२८.८५ | ३५७.९० | ३४५.९६ | २५०.६९ |
| (१५) कस्तुरभाई ... | २५१.०७ | १९७.३१ | १७५.१० | १३८.०४ |
| (१६) शेषशायी ... | ११.०० | १५६.३९ | १२३.९२ | १२७.३५ |
| (१७) रामकृष्ण ... | १८१.६७ | ४२६.१२ | ४४०.६४ | १९५.५६ |
| (१८) इंद्रसिंग ... | ९६.३९ | २१०.१९ | १५०.८८ | १३७.२५ |
| (१९) महिंद्र ... | ३९२.०० | ७००.९५ | ७८४.४८ | ६१८.९७ |
| (२०) किर्लोस्कर ... | १९८.८० | २३६.१२ | २१४.०५ | १८६.२३ |

गटाच्या मूलभूत शक्तीला थोडासुद्धा धक्का लागलेला नसतो. वस्तुतः खुजे असणारे पण आपणास मोठे वाटणारे उद्योगधंदे गेली २० वर्षे संरक्षित बाजारपेठेत माल विकत आहेत. परिणामकारक औद्योगिक संशोधन करण्याइतका पैसा अगर ते करण्याची इच्छा ह्या दोन्हींपैकी एकही बहुतेकांजवळ नाही. असे उद्योगधंदे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अद्ययावत मालाच्या बाबतीत स्पर्धा करू शकतील असे मानणे म्हणजे मूर्खांच्या सृष्टीत वावरण्यासारखे आहे. म्हणून उद्योगधंद्यांत खाजगी मालकीला उत्तेजन देण्याचे जर चालू ठेवण्यात आले आणि पर्यायाने खाजगी मालकीच्या आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाला जर पाठिंबा देण्यात आला, तर भारताची अर्थव्यवस्था एका अकार्यक्षम आर्थिक स्वयंपूर्णतेच्या आहारी जाईल. सर्व उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञांनी ह्याचा निषेध केलेला आहे. अशा तऱ्हेची परिस्थिती देशाच्या दीर्घकालीन विकासालाही मारक ठरणारी आहे ही गोष्ट भारतामधील सर्व समाजवाद्यांनी समजून घेतलेली नाही.

**कोष्टक नं. २**

अंतर्वर्तुळातील कंपन्यांच्या भागभांडवलात नियंत्रक गटाच्या भागभांडवलाचा हिस्सा

| गट | १९५१ | १९५८ |
|---|---|---|
| (१) टाटा | २७ | २४ |
| (२) बिर्ला | ६२ | ५८ |
| (३) मार्टिन बर्न | २२ | २० |
| (४) दालमिआ साहु जैन | ६२ | ५३ |
| (५) बर्ड हायलजर्स | ३७ | ४१ |
| (६) ॲन्ड्र्यू यूल | ५६ | ५० |
| (७) बंगूर | ७९ | ६४ |
| (८) थापर | ५३ | ५८ |
| (९) जुगीलाल कमलापत | ७३ | ७२ |
| (१०) श्रीराम | ५४ | ४६ |
| (११) शापूरजी | ९२ | ५६ |
| (१२) खटाव | ५९ | ६९ |
| (१३) वालचंद | ४९ | ४४ |
| (१४) मफतलाल | ७० | ७४ |
| (१५) कस्तुरभाई | २८ | २३ |
| (१६) शेषशायी | २० | १३ |
| (१७) रामकृष्ण | ३० | २९ |
| (१८) इंद्रसिंग | ६८ | ५१ |
| (१९) महिंद्र | ३२ | २९ |
| (२०) किर्लोस्कर | ३१ | २८ |


तार :– SANCOSOP फोन :–नं. २३२१५ २३५८८

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ, लिमिटेड

१२५, भवानी पेठ, पुणे २

*आमच्या शेतकरी बंधूंस, ग्राहकांस, हितचिंतकांस दिपावलीनिमित्त शुभेच्छा !*

आमची वैशिष्ट्ये :––

शीतगृह :–नाशवंत माल साठविण्यासाठी अद्ययावत शीतगृह.

मिश्रखते :–भरघोस पिकासाठी " सहकार " छाप सर्व प्रकारची मिश्रखते.

लोखंडी माल :–ॲंगल्स, सळई, आंख, वगैरे, ऑईल इंजिन्स, इलेक्ट्रिक मोटर्स, वगैरे.

के. डी. शिंदे, मॅनेजर

सं. सा. काकडे, मॅनेजिंग डायरेक्टर

पुणे जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि., पुणे.

वरील संधीचा शेतकरी बंधूंनी अवश्य फायदा घ्यावा.

इचलकरंजीच्या वाढत्या उद्योगधंद्यास गेली ३७ वर्षे सतत भांडवल पुरविणारी व सार्वजनिक विश्वस्त निधीच्या ठेवी स्वीकारण्यास सरकारमान्य असलेली इचलकरंजीतील एकमेव नागरी सहकारी बँक

दि इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँक लि.

स्थापना : १९३० ] इचलकरंजी [ फोन नं. ३६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| भरलेले भांडवल | रु. | ५,४६,४२५ |
| रिझर्व्ह फंड | रु. | २,७०,९६५ |
| इतर फंडस | रु. | ३,४७,४३५ |
| खेळते भांडवल | रु. | ७०,६३,९०० |

ठेवीचे दर :– चालू १ टक्का
सेव्हिंग्ज ४ टक्के
मुदत ठेव ५ ते ८ टक्के
कॉलडिपॉझिट ५ ते ६॥ टक्के
कर्जाचा दर ७ ते ११ टक्के

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्र. ज. दांडेकर, मॅनेजर

सदाशिव मारुती मुरदंडे, चेअरमन

# आशिआ-आफ्रिकेतील देशांचे दारिद्र्य

## अन्नधान्य घेण्यास पुरेसा पैसा नाही

माल्थस हा अर्थशास्त्राचा एक निराशावादी पंडित म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु आता त्याने प्रतिपादलेल्या अर्थशास्त्रीय सिद्धान्तांना नवा उजळा मिळाल्याचे दिसत आहे. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांत जी वाढती भरभराट दृग्गोचर होत आहे तीमुळे त्याच्या अर्थशास्त्रीय विचारांकडे अधिकाधिक लक्ष जाऊ लागले आहे. १८ व्या शतकातील अर्थशास्त्रज्ञांनी जगात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडण्याची भीतिदायक भाकिते वर्तविलेली आहेत. परंतु अलीकडील तांत्रिक प्रगतीमुळे ही भाकिते आतापर्यंत तरी खरी ठरलेली नाहीत. आज मात्र परिस्थिती बदलत चालली आहे. सर्वच जगात गेल्या काही वर्षांत जननाचे प्रमाण वाढत आहे आणि मृत्यूचे प्रमाण घटत आहे, असे अधिकारी अभ्यासकांचे म्हणणे आहे. लोकसंख्येच्या वाढीची आणि जगातील शेतीच्या विकासाची सांगड घालू लागले तर असे स्वच्छ दिसते की, बहुतेक अविकसित देशांत दुष्काळ पडण्याचे भय आहे. अविकसित देशांत आशिआ, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्या भूभागातील देशांचाच अधिक भरणा आहे. अमेरिकेत मात्र तिच्या गरजेपेक्षा अधिक अन्न आहे. भुकेल्या जगाच्या पोटात दोन घास घालण्यात अमेरिकेचे हितसंबंध गुंतलेले आहेत. त्याच प्रमाणे मोठ्या प्रमाणावर शेतीची अवजारे आणि खते उत्पन्न करणाऱ्या कंपन्या ह्यांनाही भुकेल्या जगाविषयी स्वार्थाधिष्ठित आस्था आहे. अर्थातच अमेरिका आणि ह्या व्यापारी कंपन्या अन्न आणि लोकसंख्या ह्यामधून उद्भवलेल्या गंभीर आर्थिक समस्यांचा आता काळजीपूर्वक सतत विचार करू लागल्या आहेत.

अलीकडे अमेरिकेतील नॅशनल कॉनव्होकेशन ऑफ वर्ल्ड हंगर ह्या संघटनेची बैठक वाल्डॉर्फ–आस्टोरिआ हॉटेलमध्ये भरविण्यात आली होती. ह्या बैठकीसाठी नामवंत व्यापारी, कृषितज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि सरकारी अधिकारी हजर राहिले होते. बैठकीत जगातील अन्नाच्या तुटवड्याचा तांत्रिक आणि राजकीय दृष्टिकोनांतून विचार करण्यात आला. ह्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी उपलब्ध असणाऱ्या संधी आणि अडचणी ह्यांचा साकल्याने आढावा घेण्यात आला. टोरोंटो शहरात ह्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी १०० देशांचे प्रतिनिधी जमले होते. जगातील अन्नाची टंचाई आणि तिला तोंड देण्यासाठी तरुणांना करता येण्यासारखे काम ह्या विषयाची चर्चा तेथे करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शेती व अन्न उपसंघटनेतर्फे आणि मॅसे–फर्ग्युसन ह्या शेतीच्या अवजाराच्या कंपनीतर्फे चर्चेचा उपक्रम योजण्यात आला होता. जगातील अन्नधान्याच्या प्रश्नाची उकल करण्यासाठी तरुणांच्या संघटनांनी कंबर कसावी असा विचार तेथे व्यक्त करण्यात आला आणि १० वर्षांचा एक कार्यक्रम आखण्याची योजनाही मांडण्यात आली. शांततेसाठी अन्न पुरविण्याच्या अमेरिकेच्या कार्यक्रमात ढिलाई उत्पन्न झालेली असतांनाच वरील चर्चा चालू होती. त्याच वेळी ह्या विषयातील तज्ज्ञांनी अन्नधान्याच्या टंचाईच्या तीव्रतेबद्दल परस्परविरोधी मते व्यक्त केलेली होती.

संयुक्त राष्ट्र संघटनेने ह्या विषयाची जी माहिती जमविलेली आहे तीवरून प्रश्नाचे स्वरूप चांगले स्पष्ट होते. पूर्व आशिआ, दक्षिण आशिआ, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्या भूभागातील लोक भुकेने पिडलेले आहेत. ह्या देशांची एकूण लोकसंख्या १९६५ ते १९७५ च्या कालावधीत २४० कोटीवरून ३०० कोटीपर्यंत वाढेल असा अंदाज करण्यात आलेला आहे. इतक्या लोकांची खाण्याची सोय करावयाची म्हणजे जगातील अन्नधान्याच्या उत्पादनात २६ टक्क्यांनी वाढ होणे जरूरीचे आहे. अन्नधान्याची वाढ आणि लोकसंख्येची वाढ ह्यांचा प्रश्न इतका बिकट आहे काय आणि तो सोडविता येईल काय ह्याविषयी शेतीच्या तज्ज्ञांत मतभेद आहेत. इंटरनॅशनल मिनरल्स अँड केमिकल कॉर्पोरेशन ह्या कंपनीचे शेतीतज्ज्ञ मि. क्लॅरेन्स डावन ह्या बाबतीत निराशावादी आहेत. १९८० च्या सुमारास जगाला सध्याच्या दुप्पट अन्नाच्या पुरवठ्याची गरज लागेल; पण इतके अन्न उत्पादन करता येईल किंवा नाही ह्याविषयी त्यांना जबर शंका आहे. त्यांच्या मताने अविकसित देशांनी १९८० पर्यंत अन्नधान्याचे उत्पादन ९० टक्क्यांनी जरी वाढविले तरी त्यांच्या वाढलेल्या गरजेच्या ४० टक्के गरजच ते भागवू शकतील. अन्नधान्याची गरज आणि पुरवठा ह्यांच्यामधील तफावत भरून काढण्यात अमेरिका कितपत हातभार लावू शकेल ह्याबद्दलही त्यांना शंका आहे. खुद्द अमेरिकेलाच स्वदेशीयांची अन्नाची गरज भागविण्यासाठी १९८३ च्या सुमारास अन्नधान्याची निर्यात थांबवावी लागेल असा हिशेब त्यांनी केला आहे. दुसऱ्या एका तज्ज्ञाने काहीसा आशावादी सूर काढला आहे. राजकीय व आर्थिक कारणांचा विचार करता मि. डावन ह्यांचे म्हणणे बरोबर असण्याची शक्यता कबूल करून तो म्हणतो की तांत्रिक दृष्टीने हा प्रश्न सोडविता येण्यासारखा आहे. शेतीच्या उत्पादनाचे सध्या जे तंत्र उपलब्ध आहे त्याच्या साह्याने उत्पादनात तिपटीपासून १० पटीपर्यंत उत्पादन वाढविणे शक्य आहे. निदान ५ टक्के उत्पादन तरी वाढविता येईल ह्यात शंका नाही. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी

शेतीच्या अत्याधुनिक अवजारांकडे आणि रासायनिक खतांकडे बोट दाखविले आहे. उष्ण कटिबंधातील देशात अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यास फार मोठा वाव आहे असेही मत त्यांनी व्यक्त केले आहे. दुसऱ्या एका शेतीतज्ज्ञांचे मत असे आहे की, समशीतोष्ण देशांतील व्यवसाय म्हणून शेतीकडे बरेच लक्ष देण्यात आले आहे. परंतु उष्ण कटिबंधातील देशांना उपयुक्त ठरेल अशा तंत्राचा विकास अद्याप झालेला नाही. जगात अन्नधान्याचा तुटवडा आहे आणि माल्थससारखे निराशावादी अर्थशास्त्रज्ञही आहेत ही गोष्ट ते कबूल करतात. पण ह्या प्रश्नाचा मुद्दाम अधिक गाजावाजा करण्यात आलेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात की, अन्नाच्या गरजा कशा रीतीने अजमावण्यात येतात ह्यावर अन्नधान्याच्या टंचाईची तीव्रता अवलंबून आहे. योग्य आहार कोणता ह्यासंबंधी अनेक कल्पना प्रसृत आहेत. शिवाय लोकसंख्येचे अंदाजही खात्रीलायक म्हणता येत नाहीत. संततिनियमनाबद्दलची वृत्तीही अलीकडे बदलत चालली आहे. जगाची अन्नाची गरज भागविता येईल; अर्थात तसे करतांना नवीन प्रश्नही उत्पन्न होतील. भारतासारख्या देशात अपुऱ्या आहारावर राहणारे लोक आहेत ह्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. तथापि, अन्नाची खरी गरज आणि अर्थशास्त्रीय गरज ह्यात फरक आहे आणि जगातील भुकेल्या भागांतल्या लोकांजवळ अन्नासाठी खर्च करण्यास लागणारा पैसा नाही, ह्याविषयी मात्र तज्ज्ञांचे एकमत आहे.




विविध प्रकारच्या कापडाच्या 'क्वालिटी' व 'गॅरेंटी' मुळे,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेले पुण्यातील अग्रेसर कापडदुकान
**ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स**
'होम ऑफ क्वालिटी अ‍ॅण्ड व्हरायटी'
पेरुगेट रोड, पुणे २. (फोन नं. ५७३१८)

# सहकारी संस्थांच्या काही समस्या

## भांडवल पुरवठ्याचे सातत्य कर्जवसुलीवर अवलंबून

लेखक :—द. दि. चितळे, पुणे.

महाराष्ट्रात सहकारी संस्थांची दिवसेंदिवस वाढ होत असून त्या आपआपल्या सभासदांची यथाशक्ती सेवा करीत आहेत हे पाहून कोणाही सहकारी कार्यकर्त्यास समाधान वाटेल यात संशय नाही. या संस्था आपल्या ग्रामीण व नागरी सभासदांना लागणारे रोख भांडवल व इतर सामग्री वेळचेवेळी पुरवून त्यांना अन्नधान्य व दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या इतर वेगवेगळ्या वस्तू यांचे उत्पादन वाढत्या प्रमाणावर करण्यास मदत करीत आहेत. या उत्पादनात ज्या मानाने वाढ होत आहे त्या मानाने त्या सभासदांची सांपत्तिक परिस्थिती दिवसेंदिवस सुधारत आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. सभासदांना लागणारा हा भांडवलाचा पुरवठा त्यांना सातत्याने व वेळच्या वेळी मिळत राहिला पाहिजे असे वाटत असेल तर त्यांना देण्यात आलेली व येणारी कर्जे त्यांनी कबूल केल्याप्रमाणे त्यांचेकडून वेळच्यावेळी परत फेडली जात आहेत याकडे सदर सभासदांनी व त्यांच्या संस्थांनी बारकाईने लक्ष देणे फार जरुरीचे आहे. जे सभासद आपली कर्जे, विशेष कोणतीही नैसर्गिक अडचण निर्माण झालेली नसताही, वेळचे वेळी परत फेडणार नाहीत त्यांचेवर कायदेशीर व योग्य ते इलाज करून ती कर्जे त्यांचेकडून ताबडतोब व सक्तीने वसूल करण्याची तजबीज त्यांच्या संस्थांनी केली पाहिजे आणि या कामी सहकारी खात्याने त्यांना वेळोवेळी हरतऱ्हेची मदत दिली पाहिजे. या दृष्टीने विचार करता असे दिसून येते की आपल्या राज्यातील अनेक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांना दिलेली कर्जे वेळचे वेळी परत फिटत नाहीत व त्यामुळे त्यांच्या थकबाकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. या परिस्थितीस अनेक भिन्न भिन्न कारणे असू शकतील. तथापि त्यांपैकी काही कारणांची त्रोटक चर्चा याखाली आम्ही करीत आहो.

### मालविक्रीतून कर्जवसुली

आपल्या सभासदांना वेगवेगळ्या प्रकारच्या मालाच्या उत्पादनासाठी सहकारी संस्थांनी दिलेली कर्जे सदर कर्जाऊ दिलेल्या रकमेतून निर्माण केलेल्या अगर निर्माण झालेल्या मालाच्या विक्रीतून प्रथम वसूल झाली पाहिजेत अशी अपेक्षा असते; आणि म्हणून तो माल सहकारी खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थेमार्फत अगर संघामार्फत विकला गेला पाहिजे अशी अट हे कर्ज देतानाच कर्जदारावर घातलेली असते. परंतु माल हाती आल्यानंतर संबंधित उत्पादक आपला माल सामान्यतः सहकारी संस्थेमार्फत न विकता तो खाजगी दलालामार्फत किंवा अडत्यामार्फत विकून त्याचे पैसे त्यांच्याकडून परस्पर घेऊन जातो. त्यामुळे ही मालविक्रीची अट केवळ कागदावरच पडून राहाते. तिची अंमलबजावणी प्रत्यक्षात होऊ शकत नाही, असाच अनुभव अनेक ठिकाणी दिसून येतो. ही अडचण दूर कशी करता येईल हा मुख्य प्रश्न आहे. सभासदांची नीतिमत्ता सुधारल्यास ही अडचण आपोआपच दूर होईल हे खरे आहे. परंतु तो सुदिन कधी उगवणार हे एक परमेश्वरच जाणे.

### नाठाळ कुळे व लवाद निवाडे

जे सभासद आपले कर्ज फेडण्याची टाळाटाळ जाणूनबुजून करतात असे दिसून येईल त्यांचेवर तात्काळ लवाद दावे करून त्यांच्याविरुद्ध लवाद निवाडे मिळवावेत व त्या निवाड्यांची कठोरपणे व सत्वर बजावणी करावी म्हणजे मग कर्जफेडीची टाळाटाळ करण्याच्या या साथीचा फैलाव इतरत्र होणार नाही असा पोक्त सल्ला अनेकांकडून बरेच वेळा दिला जातो. परंतु या कामी व्यावहारिक दृष्टीने काय काय अडचणी येतात त्यांचा येथे थोडक्यात उल्लेख केल्यास ते अस्थानी होणार नाही असे वाटल्यावरून त्याबाबतचे आमचे काही विचार आम्ही या खाली देत आहो.

कर्जाची बाकी जाणूनबुजून थकविणारे सभासद हे सामान्यतः कार्यकारी मंडळावर असलेल्या एकाद्या संचालकाचे नातेवाईक अगर इष्ट मित्र असतात व त्यामुळे त्या सभासदावर लवाद दावा करण्याचा ठराव सहजी होऊ शकत नाही. बाहेरून दडपण पंचकमिटीवर आले अगर आणले गेले तरच असा ठराव होऊ शकतो असे दिसून येते. असा ठराव होऊन जरूर ते कागदपत्र संस्थेच्या कचेरीकडून तयार केले गेल्यानंतर ते सर्व सहकारी खात्याच्या संबंधित अधिकाऱ्याकडे सहकारी कायद्याच्या कलम ९१ अन्वये रवाना केले जातात. त्या नंतर या बाबतची चक्रे हळूहळू फिरू लागतात. सन १९६१ पर्यंत असे प्रकरण संबंधित अधिकाऱ्याकडे दाखल झाल्यावर त्याची रीतसर चौकशी सदर अधिकारी आपण स्वतः करून त्याचा निकाल जाहीर करीत असे; किंवा ते प्रकरण एकाद्या नॉमिनीकडे पाठवून त्याची रीतसर चौकशी करून त्याचा निकाल जाहीर करावा असा त्यास हुकूम करीत असे. परंतु सन १९६० च्या सहकारी संस्थांच्या कायद्यान्वये या पद्धतीत आता बराच फरक झाला आहे. लवाद दाव्याचे प्रकरण आता संबंधित अधिकाऱ्याकडे दाखल झाले म्हणजे मग तो अधिकारी

या प्रकरणाची प्राथमिक चौकशी कलम ९३ अन्वये करून आपणाकडे दाखल करण्यात आलेला वाद हा सहकारी कायद्याचे कलम ९१ खाली पडणारा वाद आहे ना याबाबत आपला निर्णय देतो. आपणाकडे दाखल झालेला वाद हा कलम ९१ मध्ये सांगितल्याप्रमाणेच असून त्याची पुढील चौकशी सहकारी कायद्यान्वये झाली पाहिजे असा त्याने आपला निर्णय देऊन तो जाहीर केला असेल तरच मग पुढे या दाव्याची रीतसर चौकशी त्या कायद्यान्वये सुरू होते. ही पुढील रीतसर चौकशी तो अम्मलदार स्वतः तरी करून आपला निकाल जाहीर करतो किंवा ते प्रकरण पुढील चौकशीसाठी व निकालासाठी एखाद्या नॉमिनीकडे पाठवितो. कलम ९३ अन्वये हा अम्मलदार जी प्राथमिक चौकशी करतो त्या वेळी तो दाव्याशी संबंधित असणाऱ्या सर्व पक्षकारांना नोटिसा करून आपणापुढे हजर राहण्यास सांगून त्यांचे जाबजबाब घेतो, तसेच दाव्याबाबतचे सर्व कागदपत्र, पुरावे, वगैरे पाहून तेही तो विचारात घेत असतो. हे जाबजबाब व कागदपत्र वगैरे पाहून आपणाकडे दाखल झालेला वाद हा सहकारी कायद्याच्या कलम ९१ अन्वये त्या कायद्याखाली येणारा वाद आहे किंवा कसे व त्यासंबंधी आपले समाधान झालेले आहे किंवा नाही याबाबत आपला निकाल देऊन तो संबंधित पक्षकारांना कळवितो. आपले समाधान झाले असल्याने त्या वादाची चौकशी आता सहकारी कायद्यान्वये करून त्याचा निकाल जाहीर केला पाहिजे असे त्याने ठरविले म्हणजे मग त्या दाव्याची रीतसर चौकशी आपण स्वतः करून त्याचा निकाल जाहीर करतो किंवा ते प्रकरण दाव्याची रीतसर चौकशी करून निकाल जाहीर करण्यासाठी एकाद्या नॉमिनीकडे पाठवितो.

या नवीन पद्धतीमुळे प्रत्येक दाव्याची चौकशी दोन वेळा होत असते; कलम ९३ अन्वये होणारी प्राथमिक चौकशी; व कलम ९६ अन्वये होणारी दुसरी रीतसर चौकशी. या दोन्ही चौकशींचे स्वरूप बहुतेक सारखेच असते; परंतु निकाल मात्र दोन वेळा जाहीर करणे भाग पडते. पहिला निकाल हा कलम ९३ अन्वये जाहीर केलेला असतो व दुसरा कलम ९६ अन्वये जाहीर केलेला असतो. कलम ९३अन्वये दिलेल्या निकालाविरुद्ध वरिष्ठाकडे दाद मागणे झाल्यास ती सदर कायद्याचे कलम १५४ अन्वये मागावी लागते. परंतु कलम ९६ अन्वये जाहीर केलेल्या निकालाविरुद्ध अपील महाराष्ट्र स्टेट को—ऑपरेटिव्ह ट्रॅब्यूनलकडे करता येते. हल्लीच्या पद्धतीमुळे दाव्याचा अखेरचा निकाल लागण्यास फारच कालावधी लागतो असा अनुभव आहे.

### कलम ९३ ची दुरुस्ती

कोणत्याही दाव्याचा निकाल देणाऱ्या व्यक्तीस त्या दाव्याबाबतची काहीही पूर्व माहिती असता कामा नये असे सामान्यतः मानण्यात येत असते व ते योग्यही दिसते. कारण तो दावा प्रत्यक्ष ऐकण्यापूर्वी त्या व्यक्तीने त्या प्रकरणी आपले काहीही मत बनविलेले नसते अगर त्याबाबतचा त्याचा काहीही पूर्वग्रह झालेला नसतो. परंतु हल्लीच्या पद्धतीप्रमाणे ज्या व्यक्तीने एकाद्या दाव्याची प्राथमिक चौकशी कलम ९३ अन्वये केलेली असेल त्यानेच त्या वादाची पुन्हा कलम ९६ अन्वये चौकशी करून दाव्याचा निकाल जाहीर करणे योग्य होईल असे आम्हांस तरी वाटत नाही. कारण कलम ९३ अन्वये त्याचेपुढे झालेल्या चौकशीअंती त्या प्रकरणी त्याचे बनलेले मत किंवा त्याचा झालेला पूर्वग्रह यांचे पडसाद कलम ९६ अन्वये त्याचेपुढे होणाऱ्या रीतसर चौकशीचे वेळी त्याचे मनावर होणारच नाहीत असे मानणे कठीण आहे.

वरील परिस्थितीत आम्हांस असे वाटते की कलम ९३ हेच दुरुस्त करण्यात यावे. रजिस्ट्रार अगर त्यांचा नॉमिनी यांनी त्यांचेकडे निकाळासाठी येणाऱ्या दाव्याची चौकशी करताना तो वाद सहकारी कायद्याखाली येतो किंवा नाही याही मुद्द्याचा विचार करण्याचा व त्याबाबतचा निर्णय देण्याचा अधिकार त्यास असावा व त्याने याबाबत घेतलेल्या निर्णयावर अपील ट्रॅब्यूनलकडेच चालावे, अशी तरतूद या कलमात करण्यात यावी. तसे झाले म्हणजे मग दाव्याची चौकशी दोन वेळा करण्याची जरुरीच राहाणार नाही. तसेच सदर वाद सहकारी कायद्याखाली पडतो किंवा नाही हे अपिलात ठरविण्याचा अधिकार ट्रॅब्यूनलकडे राहिला म्हणजे मग त्याबाबत कोणासही अन्याय होण्याची शक्यता राहाणार नाही.

### दुसरी एक अडचण

आणखी एक अडचण सहकारी संस्थांना नेहमीच भासते; ती म्हणजे त्यांनी मिळविलेल्या लवाद निवाड्याची बजावणी होऊन कुळाकडील येणे वसूल होऊन मिळण्यास फारच कालावधी लागतो ही होय. लवाद निवाड्याची बजावणी होण्यास अनेक वर्षे लागतात याची जाणीव ज्या सभासदांना असते ते आपल्याकडील कर्जाची बाकी वसूल होण्यासाठी संस्थेने वेळोवेळी पैशाची मागणी करून आपणास त्रास देण्याऐवजी तिने आपणावर एकदमच लवाद दावा दाखल करावा अशी ते उघड उघड मागणी आपल्या संस्थेकडे करीत असतात. कारण त्यांची अशी खात्री झालेली असते की असा दावा दाखल करून त्याची प्रत्यक्ष बजावणी होण्यास अनेक वर्षे, नव्हे तपे, सहजी निघून जातात, व त्या कालखंडात आपणाकडे कोणीही पैशाची मागणी करू शकणार नाही असा अयोग्य प्रकारचा विश्वास सभासदांत निर्माण होणे हे सदर संस्थांच्या वाढीस फार विघातक ठरणारे आहे. सहकारी संस्थांनी मिळविलेल्या लवाद निवाड्याची बजावणी सन १९२५ सालापर्यंत फक्त सिव्हिल कोर्टामार्फत होत असे. परंतु ही बजावणी होण्यास फारच उशीर होतो अशी त्या वेळी अनेकांकडून तक्रार

आल्याने सन १९२५ च्या सहकारी सोसायटयांच्या कायद्यात अशा निवाडयांची बजावणी सिव्हिल कोर्टाशिवाय मुलकी खात्यामार्फतही होऊ शकेल अशी तजवीज करण्यात आली. त्या वेळी असा समज ( अगर गैरसमज म्हणा ) होता की सहकारी सोसायटयांच्या नाठाळ कुळांकडील त्यांचेवर मिळविलेल्या लवाद निवाडयाप्रमाणे त्यांचेकडून येणे होत असलेली रक्कम मुलकी खाते संबंधित कुळांकडून शेतसाऱ्याप्रमाणे झटपट वसूल करून ती ज्या त्या संस्थांना देईल. परंतु लवकरच असे अनुभवास आले की सहकारी कार्यकर्त्यांना त्यावेळी वाटत असणारा समज हा चुकीचा होता एवढेच नव्हे तर तो केवळ भ्रम होता. कारण सिव्हिल कोर्टामार्फत लवाद निवाडयाच्या रकमा काही वर्षांत तरी वसूल होऊन मिळत असत. परंतु मुलकी खात्याकडे बजावणीसाठी पाठविलेले लवाद निवाडे त्या खात्याच्या अम्मलदाराच्या कचेरीत अनेक वर्षे केवळ धूळ खात पडून राहात व काही वर्षांनी त्या प्रकरणाचा आढळही होत नसे असे अनेकदा दिसून आलेले आहे. ही परिस्थिती अत्यंत असमाधानकारक आहे असे दिसून आल्यावरून व लवाद निवाड्यांची बजावणी शक्य तितक्या लवकर आणि झटपट व्हावी यासाठी सन १९६० च्या सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत व कानूंत कलम नंबर १५६ व कानू नंबर १०७ हे मुद्दाम दाखल करण्यात येऊन निवाड्यांच्या बजावणीचा हा अधिकार सहकारी खात्याच्या अम्मलदारांनाही देण्यात आलेला आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की या कलमाची अम्मलबजावणी केली जाण्याच्या दृष्टीने जरूर असणारी इतर तजवीज त्या-खात्याकडून अद्यापही झालेली नाही. अशा परिस्थितीत सहकारी संस्थांनी आपल्या नाठाळ कुळावर लवाद निवाडे मिळविले असले तरीही ते फक्त कागदावरच पडून राहतात, व त्यांत नमूद असलेली रक्कम त्या संस्थांच्या हाती प्रत्यक्षपणे कित्येक वर्षेही पडत नाही. जोपर्यंत या परिस्थितीत काहीही सुधारणा होत नाही तोपर्यंत या संस्थांकडून आपल्या सभासदांची दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणात सेवा घडत जावी अशी जी आपण अपेक्षा करीत आहोत ती नजीकच्या भविष्यकाळात तरी त्यांचेकडून पुरी केली जाईल असे आम्हांस वाटत नाही.

## हिंदी कारखानदारीतील ‘ फॉरिन कोलॅबोरेशन ’

जाने. १९५७ ते मार्च १९६७

| | देश | १९६७ जाने.–मार्च | १९५७ | १९५८ | १९५९ | १९६० | १९६१ | १९६२ | १९६३ | १९६४ | १९६५ | १९६६ | जाने. १९६७–मार्च १९६७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रेटब्रिटन | १८ | १७ | ३४ | ५२ | १२० | १२६ | ७९ | ७० | १०५ | ६० | ४४ | ७२५ |
| २. | अमेरिका | १० | ६ | ४ | १० | ६१ | ७७ | ५७ | ६७ | ७८ | ४८ | ४२ | ४६० |
| ३. | प. जर्मनी | ६ | २ | ६ | १३ | ५८ | ६७ | ४२ | ४८ | ६८ | ४४ | ४१ | ३९५ |
| ४. | जपान | ९ | १ | ३ | ८ | ३९ | ३० | २४ | ३२ | ३५ | २६ | १८ | २२५ |
| ५. | स्वित्झरलंड | २ | — | २ | १ | १३ | १९ | १९ | १९ | १९ | १८ | १० | १२२ |
| ६. | फ्रान्स | २ | २ | १ | २ | ९ | १६ | १४ | १६ | ११ | १२ | ११ | ९६ |
| ७. | इटली | ४ | ४ | ४ | ४ | ९ | १३ | ११ | ६ | ८ | ७ | ३ | ७३ |
| ८. | पु. जर्मनी | — | — | — | १ | ५ | ४ | ५ | १० | २४ | ६ | ३ | ५८ |
| ९. | हॉलंड | १ | १ | — | — | ६ | १० | ७ | ४ | ५ | २ | ३ | ३९ |
| १०. | स्वीडन | ५ | १ | — | १ | १३ | — | ६ | १ | ६ | ३ | ५ | ४१ |
| ११. | डेन्मार्क | १ | — | — | २ | ६ | ४ | २ | ३ | ९ | १ | १ | २९ |
| १२. | झेकोस्लोव्हाकिआ | — | — | — | — | ६ | ५ | १ | ५ | ४ | ३ | ३ | २७ |
| १३. | ऑस्ट्रिया | — | — | — | १ | ३ | ५ | ४ | २ | ५ | १ | २ | २३ |
| १४. | बेल्जम | १ | — | — | २ | ४ | २ | ४ | ३ | ५ | — | ३ | २४ |
| १५. | पोलंड | — | — | — | — | १ | ६ | — | ३ | ३ | २ | २ | १८ |
| १६. | कॅनडा | — | — | १ | — | १ | ३ | ६ | — | ३ | १ | २ | १७ |
| १७. | हंगेरी | — | — | — | — | १ | २ | २ | — | ३ | १ | ४ | १३ |
| १८. | युगोस्लाव्हिआ | १ | — | — | — | — | १ | १ | ३ | २ | १ | ३ | १२ |
| १९. | फिनलंड | — | — | — | — | २ | १ | १ | — | — | — | Nil | ४ |
| २०. | पनामा | — | — | २ | १ | — | — | — | — | — | — | — | ३ |
| २१. | पाकिस्तान | — | — | २ | — | — | — | — | — | — | — | — | २ |
| २२. | इतर | ५ | ४७ | ४४ | ५२ | २३ | १२ | १३ | ६ | ९ | ६ | ३ | २२० |
| | एकूण | ६५ | ८१ | १०३ | १५० | ३८० | ४०३ | २९८ | २९८ | ४०३ | २४२ | २०३ | २६२६ |

एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ

## कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लिमिटेड

हेड ऑफिस : बिंदू चौक, कोल्हार

**दीपावलीनिमित्त शुभेच्छा**

सहकारी समाजरचनेच्या ध्येयवादाने प्रेरित होऊन जिल्ह्यातील शेती, कामकरी, मजूर, कारागीर वगैरे अनेकविध सहकारी संस्थांना अधिक उत्पादनाकरिता पतपुरवठा करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य ही जिल्हा बँक करीत आहे आणि हीच आज भारताची अत्यंत निकडीची गरज आहे.

आपली अल्पस्वल्प ठेव या बँकेत ठेऊन आपला पैसा वरील सत्कार्यासाठी सत्कारणी लावून आपणही सहभागी व्हा.

**ठेवीचे आकर्षक दर**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ महिने व त्यावर २४ महिन्यांपेक्षा कमी मुदतीची ठेव | | | | | ६½ |
| २४ | ,, | ,, ४८ | ,, | ,, | ६¾ |
| ४८ | ,, | ,, ६० | ,, | ,, | ७ |
| ६० | ,, | ,, ८४ | ,, | ,, | ७½ |
| ८४ महिने व त्यावरील मुदतीचे ठेवीस | | | | | ८ |

मा. ह. भडभडे, मुख्य व्यवस्थापक.

बी. एस. पाटील, चेअरमन.

बँकेचे भागीदार व ठेवीदार व हितचिंतक यांना यंदाची दीपावली सुखाची जावो.

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जमखंडी [ जि. विजापूर ]

स्थापना : १९४० ] मुख्य कचेरी : जमखंडी [ शाखा : बनहट्टी

*लोकांच्या विश्वासास पात्र असलेली ग्रामीण भागातील जुनी बँक.* [ ३० जून १९६७ चे आकडे ]

| | | |
|---|---|---|
| * वसूल भाग भांडवल | रु. | १,९८,३८० |
| * गंगाजळी व इतर निधी | रु. | ४,५९,२४३ |
| * ठेवी सर्व प्रकारच्या | रु. | २७,१०,१६० |
| * कर्जव्यवहारातील गुंतवणूक | रु. | १६,३२,४३३ |
| * सरकारी रोखे वगैरेंतील गुंतवणूक | रु. | ६,७५,८११ |
| * ठेवीवरील व्याजाचे दर | रु. | १ ते ७॥ द. द. |
| * डिव्हिडंड | रु. | ६½% |
| * ऑडिट वर्ग | | "अ" |

मध्यवस्तीत स्वतःचे मालकीची भव्य इमारत. सेफ-डिपॉझिट व्हॉल्टसची उत्तम सोय व भाड्याचे आकर्षक दर, मार्केट यार्डात स्वतःचे मालकीची प्रशस्त व पुरेशी गोडाऊन्स.

ठेवीवर आकर्षक व्याज व कर्जावर व्याजाचा माफक दर हेच आमचे ध्येय.

*बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.*

म. द. खाडलकर, मॅनेजर पी. एम. बंगी, चेअरमन

## श्रीपंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.

गंगानगर–इचलकरंजी ( जि. कोल्हापूर )

**चालू सन १९६७–६८ सालातील शुभ संकल्प :**

२,१०,००० टन ऊस गाळप व २,५२,००० पोती साखरउत्पादन.

सध्याचे दैनिक १,००० टन ऊस गाळप शक्तीचें २,६०० टनांपर्यंत विस्तारणेचे काम चालू आहे. विस्तारित गाळप शक्ती पुढील हंगामात कार्यान्वित होईल.

कार्यक्षेत्रात ४४ जलसिंचन योजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे सुमारे ३५,००० एकर जमीन नव्याने पाण्याखाली येईल.

*नूतन वर्ष व दीपावली आमचे सभासद, कामगार, ग्राहक व हितचिंतक यांना सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !*


★

बी. एन. गरगटे, मॅनेजिंग डायरेक्टर

एम. व्ही. सुलतानपुरे, व्हा. चेअरमन.

रत्नाप्पा कुंभार, चेअरमन


महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा.



४, ६ व ८ बैली

फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

## – न्यु विजय इंडस्ट्रीज लि. –

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# आयुर्विमा कॉर्पोरेशनचा खर्चिक कारभार

## धंद्याच्या मानाने खर्चात भरमसाठ वाढ

१९५६ साली आयुर्विम्याचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले, तेव्हा खर्चात कपात होईल अशी सर्वांची अपेक्षा होती. २४५ वेगवेगळ्या विमा कंपन्या एका छत्राखाली आल्यामुळे कारभारात सुधारणा होऊन स्पर्धा अनावश्यक झाल्यामुळे खर्चाचे मान उतरेल, असा अंदाज होता. लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनवर लोकांचा अधिक विश्वास बसून धंदा द्रुत गतीने वाढेल, अशी आशा होती, ती मात्र सफल झाली आहे. १९५६ साली १,२२० कोटी रुपयांचे काम पुरे झाले होते; ते १९६६ मध्ये ४,३८७ कोटींवर गेले; म्हणजे कामात २५९% ने वाढ झाली. त्यामुळे खर्चाच्या प्रमाणात घट व्हावयास हवी होती. मग, खर्चाचे प्रमाण हप्त्यांच्या उत्पन्नाशी २७.५% इतके भारी का पडावे ?

पृ. ३४ वरील तक्त्यावरून स्पष्ट होईल की ला. इं. कॉर्पोरेशनला मोठ्या प्रमाणावरील एकत्रित धंद्यामुळे कित्येक बाबतींत प्रत्यक्ष फायदा झालेला आहे. उदाहरणार्थ, हप्त्यांचे उत्पन्न १०४% ने वाढले तरी ऑडिटरांचा मेहनताना फक्त १८% ने वाढला आहे. कोर्ट आणि वकील खर्चहि फक्त ४१% ने वाढला आहे. पोस्टेज, तारा आणि पावती तिकिटे ह्यांचा खर्चहि त्याच प्रमाणात वाढला आहे. छपाई व स्टेशनरी ह्यांच्या खर्चातील वाढ २४% आहे. बँक चार्जेसमध्ये सर्वांत जास्त काटकसर झालेली आहे. ते २९% ने उतरले. जनरल चार्जेसमधील वाढ ( ६६% ) सयुक्तिक दिसते.

एजंटांना दिलेल्या कमिशनमध्ये मात्र १११% ने वाढ झाली आहे. हप्त्यांच्या उत्पन्नाच्या वाढीपेक्षा दिलेल्या कमिशनच्या वाढीची गति जास्त का असावी, हे समजत नाही एजंटांना दिलेले कमिशन कॉर्पोरेशनच्या एकूण व्यवस्था खर्चाच्या ४१% भाग व्यापते, तेव्हा ह्या कमिशनमध्ये थोड्या प्रमाणांत वाढ झालेली दिसली तरी प्रत्यक्ष रुपयांच्या आकड्यांत ती मोठी भरते.

पगार खर्चातील वाढहीं ( १२३% ) भरमसाठ वाटते. १९५७ साली कॉर्पोरेशन पगारापोटी दर महिना ५५.९७ लक्ष रु. खर्च करीत असे; १९६६ साली त्याची दरमहा रकम १९५.२७ लक्ष रुपये होऊ लागली; म्हणजे त्यांत २५०% वाढ झाली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्येकाच्या सरासरी दरमहा वेतनांत फारच थोडी वाढ झालेली आहे. १० वर्षांत ७% वाढ म्हणजे काहीच नाही. ह्या मुदतीत राहणीच्या मानाचा इंडेक्स नंबर ५७% ने वाढलेला आहे.

तथापि, दुय्यम कर्मचाऱ्यांच्या वेतनात मात्र खूपच वाढ झालेली आहे. १९५७ मध्ये प्रत्येकाला दरमहा सरासरीने १७७ रु. मिळत होते; दहा वर्षांत ते वेतन ३४१ रु. वर गेले. म्हणजे त्यांत ९३% वाढ झाली. म्हणजे राहणीचा खर्च वाढला, त्या मानाने त्यांचा पगार वाढून वर पुनः आणखी ३६% ने वाढला. ह्याचा अर्थ, कर्मचाऱ्यांच्या संघटनेने ला. इ. कॉर्पोरेशनला महागाईचे मानाने कितीतरी जास्त पगार द्यावयास भाग पाडले आहे. त्यामुळे यंत्रापेक्षा हाताने काम करणे फारच खर्चिक झाले आहे. त्यावर तोडगा म्हणजे इलेक्ट्रिक कॉम्प्यूटर्स कचेऱ्यांत बसविणे हा होय. पण त्याला कर्मचाऱ्यांचा विरोध आहे.

पहिल्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांची १९५७ मध्ये संख्या ९०३ होती ती १९६७ मध्ये २,९४१ एवढी झाली; म्हणजे त्यांची संख्या ३२६% ने वाढली. १९५७ मध्ये ह्या अधिकाऱ्यांचे इतर कर्मचाऱ्यांशी प्रमाण १ : ३० असे होते, ते आतां १ : १७ असे पडू लागले आहे. ह्याचा अर्थ पूर्वी प्रत्येक ३० कर्मचाऱ्यांवर एक वरिष्ठ अधिकारी होता; आता प्रत्येक १७ कर्मचाऱ्यांवर एक वरिष्ठ अधिकारी आहे ! आयुर्विम्याच्या राष्ट्रीयीकरणामुळे सर्वच नोकरांचा अशा रीतीने फायदा झाला आहे आणि आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या खर्चिक कारभाराचे ते प्रमुख कारण आहे. एवढ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुकीची आवश्यकता होती का आणि त्यांना पुरेसे काम आहे का, ह्याची पाहणी मोरारका कमिटीला करावी लागेल. प्रवास खर्चहि ११४% ने वाढला आहे आणि ही वाढ कितपत समर्थनीय आहे ह्याचीहि चौकशी करावी लागेल.

### ला. इं. कॉर्पोरेशनचा नोकरवर्ग व त्याचा पगार

| | जाने., १९५७ | | | मार्च, १९६७ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | एकूण दरमहा पगार रु. | प्रत्येकाचा सरासरी पगार रु. | संख्या | एकूण दरमहा पगार रु. | प्रत्येकाचा सरासरी पगार रु. |
| पहिल्या श्रेणीचे अधिकारी | ९०३ | ८५० हजार | ९४१ | २९४१ | २९६२ हजार | १००७ |
| इतर | २६,७५९ | ४,७४७ हजार | १७७ | ४८६३५ | १६५६५ हजार | ३४१ |

वरिष्ठ अधिकारी वाढले की तपासण्या वाढतात, आणि त्यांचे प्रवास भत्तेही वाढतात.

आपले खर्च कमी करून दाखविण्याचा एक मार्ग म्हणजे घसारा शक्य तेवढा कमी काढणे. फर्निचर, इत्यादि वरील घसाऱ्यांत १४०% वाढ झालेली आहे. वास्तविक, १९६७ मध्ये कॉर्पोरेशन ९.५% ह्या दराने घसारा काढीत असे; १९६६ मध्ये तो फक्त ५% ह्या दराने काढण्यात आलेला आहे. शक्य तेवढ्या जास्त दराने घसारा काढल्यामुळे गुप्त रिझर्व्ह निर्माण करता येतो; व्यापारी कंपन्या नेहमीच असे करीत असतात. हा रिझर्व्ह अडी-अडचणीचे वेळी उपयोगी पडतो. पण तसे न करता कॉर्पोरेशनने खर्च कमी दाखविण्यासाठी घसारा कमी काढण्याचा अविवेक दर्शविला आहे.

फर्निचर, इत्यादींची किंमत १९५७ मध्ये फक्त १.९२ कोटी रु. होती, ती आता ९.१० कोटी रु. वर गेली आहे. पूर्वीच्या दरानेच घसारा काढला असता, तर त्याने ३५५% वाढ दर्शविली असती!

पूर्वी २४५ कंपन्या स्वतंत्रपणे जाहिराती देत होत्या. आता सबंध भारतासाठी एकच विमा संस्था असताना जाहिरात खर्च १७८% ने का वाढला? ह्याचीहि तपासणी व्हायला हवी. विमेदारांच्या सेवेच्या बाबतीत कॉर्पोरेशनने बरीच सुधारणा घडवून आणायला हवी. ही सेवा म्हणजेच खरी जाहिरात होय.

## ला. इं. कॉर्पोरेशनच्या खर्चाचे तुलनात्मक आकडे

( आकडे कोटी रुपयांचे )

| खर्चाची बाब | १९५७ | १९६६ | % वाढ |
|---|---|---|---|
| १ एजंटांना कमिशन | ७.३४ | १५.५० | १११ |
| २ पगार, अलावन्स, इ. | ११.०९ | २४.७३ | १२३ |
| ३ ग्रॅच्युइटी, प्रॉ. फंड, इ. | ०.७८ | १.७१ | १२० |
| ४ प्रवास खर्च | ०.२९ | ०.९१ | ११४ |
| ५ जाहिरात खर्च | ०.०९ | ०.२५ | १७८ |
| ६ फर्निचर, इ. वरील घसारा | ०.२० | ०.४८ | १४० |
| ७ ऑडिटरांचा मेहेनताना | ०.०३ | ०.०४ | १८ |
| ८ कोर्ट, वकील खर्च | ०.०५ | ००.८ | ४१ |
| ९ छपाई, स्टेशनरी | ०.७० | ०.८७ | २४ |
| १० पोस्टेज, तारा, इ. | ०.५९ | ०.८७ | ४१ |
| ११ बँक चार्जेस | ०.१७ | ०.१२ | –२९ |
| १२ जनरल चार्जेस | ०.८३ | ०.१०४ | ६६ |


सहकार—सेवा—सुरक्षितता

उत्पादन वाढ या राष्ट्रीय महत्त्वाच्या बाबीकडे जागरूकतेने लक्ष पुरविणारी; खरेदी-विक्री, प्रक्रिया, औद्योगिक, वगैरे सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना मार्गदर्शन व पतपुरवठा करणारी

—जिल्ह्यांतील अग्रगण्य सहकारी बँक—

—शेतकऱ्यांचे वैभवस्थान—

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी

मुख्य कार्यालय—गुरुकृपा, महात्मा गांधी रोड, रत्नागिरी.

—नेत्रदीपक प्रगतीचे बोलके आकडे—

| | | ३०–६–१९६६ | ३०–९–१९६७ |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | १६,०२,४०० | २७,३३,०५० |
| एकुण निधी | रु. | २,८१,५३९ | ४,१०,८७८ |
| ठेवी | रु. | १,५२,४६,२५२ | १,७५,७१,३०० |
| खेळते भांडवल | रु. | २,०८,३०,६१६ | २,४०,०५,००० |
| शाखा विस्तार | | १८ | १९ |

पां. वा. चिटणीस, व्हा. चेअरमन

शां. ल. पेजे बी. ए. ( एम्. एल्. ए. ) चेअरमन

म. चिं. सांखळकर बी. ए. (ऑनर्स), एल्. डी. सी., जी. डी. सी. अँड ए. मनेजर

॥ श्री ॥

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.,

९८० सदाशिव पेठ, पुणे २

*तुम्ही देवाते भजाल । देव तुम्हां तुष्टतील ।*
*ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ॥ —श्री ज्ञानेश्वरी*

साखरेचा नवीन हंगाम दिवाळीनंतर सुरू होईल

साखर व स्पिरिटच्या उत्पादनाच्या जोडीला मद्यार्क उत्पादनाची योजना हाती घेणार आहोत.

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

गो. श्री. वांळिंबे, बी. कॉम., *मॅनेजर*

शं. ल. लिमये, बी. एससी., एलएल. बी. *अध्यक्ष*

# मागासलेल्या देशांचा विकास

## परदेशी भांडवलाला भरपूर वाव

१९६० पासून सुरू झालेल्या दशकाला संयुक्त राष्ट्र संघटनेने 'विकासाचे दशक' असे नाव दिलेले आहे. पण सध्याची परिस्थिती लक्षात घेता ह्या दशकाला 'निरुत्साहाचे दशक' म्हणावे असे कधीकधी वाटते. माल्थसने गणितागत पद्धतीने असे दाखवून दिले की मनुष्यजातीला स्वतःला पुरेसे अन्न निर्माण करण्याचे फार काळ जमणार नाही. ह्या निराशावादाला कधी नव्हती इतकी धार आता आली आहे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशांचे राहणीचे मान आणि अप्रगत देशांचे राहणीचे मान ह्यात इतका फरक आहे की अर्थशास्त्रज्ञांना, समाजशास्त्रज्ञांना, पत्रकारांना आणि लोकसंख्या शास्त्राच्या तज्ज्ञांना त्यासंबंधी मोठी चिंता लागून राहिली आहे. त्यांचे म्हणणे असे की हा फरक जर अतिशय त्वरेने आणि नाट्यमय रीतीने कमी केला नाही, तर अतिशय मोठी आपत्ती कोसळल्याशिवाय राहणार नाही. ह्या लोकांचे म्हणणे अगदीच निराधार आहे असे म्हणता येणार नाही. राहणीच्या मानातील हा फरक मनास क्लेश देणारा आहे आणि त्यात वाढ होत गेली तर त्याचे परिणाम फार भीषण होतील ह्यात शंका नाही. परंतु चित्र अगदी संपूर्णपणे निराशाजनक आहे असे मात्र नाही. आशेचा क्षीण का होईना, पण किरण दिसत आहे. निराशावाद्यांचे भाकित 'जरतारी' पद्धतीचे आहे. 'भूतकालातील आर्थिक प्रवृत्ती तशीच चालू राहिली तर' हे त्यांच्या भाकितामधील शब्द महत्त्वाचे आहेत.

विकसनशील देशांची विकासाच्या आतापर्यंतच्या अनुभवाची चाकोरी पुढेही तशीच चालू राहील असे गृहीत धरण्याचे कारण नाही; मग मागचा अनुभव निराशाजनक असला तरी हरकत नाही. लोकसंख्येच्या वाढीची गती झपाट्याची आहे, हे खरे; पण शिकागो विद्यापीठातील डॉ. डोनाल्ड बोग ह्यांचे तरी मत असे आहे की ही गती आता मंदावत चालली आहे. अलीकडे अनेक देशांच्या सरकारांनी संततिनियमनाला जोराचा पाठिंबा देण्यास सुरुवात केली आहे. त्याशिवाय संततिनियमनाच्या पद्धतीही अधिक सुधारल्या आहेत. परिणामी जगाच्या पुष्कळ भागांत लोकसंख्येच्या वाढीची गती उलट होऊ लागल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अर्थात ह्या बदलासंबंधीचा आंकडेशास्त्रावर आधारलेला पुरावा अजून फारसा उपलब्ध नाही. ह्याचे एक कारण असे आहे की लोकसंख्येविषयीचे आकडे कधीच आजतागायतचे नसतात. तरी पण १९८० च्या सुमारास ज्या शिरगणत्या होतील त्यांतून लोकसंख्येच्या वाढीची गती कमी होऊ लागल्याचे दिसू लागेल, असा अंदाज आहे. डॉ. बोग ह्यांचा आशावाद सर्वच तज्ज्ञांनी दाखविला आहे, असे मात्र नव्हे. काही तज्ज्ञ हे कबूल करतात की, जननाचे प्रमाण भावी कालात घटण्याची शक्यता आहे. पण ते असेही म्हणतात की संततिनियमनाच्या पद्धतीचा जास्तीत-जास्त परिणामकारी उपयोग करण्यात आला तरीसुद्धा जगाची लोकसंख्या सन २००० च्या सुमारास ५०० कोटीपेक्षा थोडी अधिकच होईल. हा आकडा छाती दडपून टाकणाराच म्हणावा लागेल. तेव्हा सध्या लोकसंख्येच्या वाढीविषयी जास्तीत जास्त चांगले इतकेच सांगता येईल की ही बाब धोक्याची आहे. पण आज तरी अज्ञात आहे. परंतु विकासाच्या प्रक्रियेच्या आर्थिक बाजूविषयीच फक्त बोलावयाचे झाले तर अधिक निश्चितपणे बोलता येईल, आणि मग निराशेच्या काळ्या ढगांनाही रुपेरी कडा अगदींच नाहीत असे नाही हे लक्षात येते.

गेल्या दशकाचा साकल्याने विचार करता अविकसित देशांनी बरीच अर्थिक प्रगती केलेली आहे. ह्या अवधीत त्यांचे औद्योगिक उत्पादन दुपटीने वाढलेले वाढले असून त्यांच्या खाणींचे उत्पादनही तितकेच वाढले आहे. त्यांचे पोलादाचे उत्पादन तिप्पट झाले आहे आणि गेल्या दोन वर्षांत निर्यातीपासून त्यांना होणाऱ्या प्राप्तीत दरसाल ८ टक्क्यांनी वाढ झालेली दिसत आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या वाहतूक व्यवस्थेचाही खूप विस्तार झाला आहे. पण त्याहीपेक्षा एक विशेष लक्षात घेण्यासारखी घटना घडली आहे. तैवान, कोरिआ आणि मेक्सिको सारख्या काही विकसनशील देशांनी आर्थिक वाढीच्या वेगाच्या बाबतीत औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांच्याही पुढे बरीच दौड मारली आहे. येत्या काही वर्षांत विकसनशील देशांत अशा प्रकारची वाढ होऊ शकणार नाही असे मानण्यास जागा नाही. म्हणजे अशी वाढ अपवादात्मक आहे असे मानण्याचे कारण नाही. उलट तज्ज्ञांनी केलेल्या एका अहवालात एक आश्चर्यकारक निष्कर्ष काढण्यात आला आहे. तो असा की, चालू शतकाच्या अखेरीपर्यंत दारिद्र्याने गांजलेल्या औद्योगिक युगपूर्व जमान्यांत जीवन कंठणाऱ्या लोकांची संख्या खूपच कमी होईल. अशा लोकांची संख्या सध्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या दोन तृतीयांश इतकी मोठी आहे. ती एक अष्टमांशाइतकी कमी होईल अशी अपेक्षा आहे. प्रथम दर्शनी ही अपेक्षा आशावादी स्वप्नमय सृष्टीतील वाटेल. पण तसे नाही; आर्थिक विकासाच्या नव्या शास्त्राने अलीकडे जी विलक्षण प्रगती केली आहे तिचा वरील अपेक्षेला आधार आहे. निराशावादी अभ्यासक तिकडे दुर्लक्ष करतात. आता आर्थिक विकासाच्या शास्त्राला 'नवे' म्हणणे जरा चमत्कारिक वाटेल. पण वस्तुस्थितीच तशी आहे.

औद्योगिक युगपूर्व समाजाचे औद्योगिक समाजात रूपांतर

# दि मुंबई सहकारी भू-तारण बँक मर्यादित

## दीपावली अभिष्ट चिंतन


| श्री. रा. गो. गोखले | श्री. ये. स. बोरगांवकर | श्री. नी. स. कल्याणी |
| --- | --- | --- |
| व्यवस्थापक | कार्यकारी संचालक | अध्यक्ष |

शेपिंग, आणि मिलिंग मशीनवरील झटपट आणि कौशल्यपूर्ण काम म्हणजे [illegible] नाकारला जाण्याचें कमी प्रमाण आणि भरपूर कमाईची खात्रीच!

**शिवाजी शेगडे (व्हाइसेस)** कौशल्याची आणि संतोषकारकतेची गरज असणाऱ्या [illegible] कामगिरीत उत्तम पकड मिळण्यास मदत करतात आणि त्यामुळें तुमचें काम उत्तम दर्जाचें होऊन, अधिक कमाई होऊ शकते. तुमच्या मशीन्सकरितां हेच शेगडे बसवून घ्या.

**स्विवेल बेस मशीन शेगडा (व्हाइस)** शेपिंग आणि मिलिंग मशीन्ससाठी खास करून बनविलेला. समांतर पातळीवर कोणत्याही कोनांत उत्तमपैकी बसवतां येतो. छान पकड घेतो. त्याचे जॉज देखील कठीण बनविलेल्या स्टीलचे असून जरूर पडली तर बदलतां येतात. हे शेगडे अगदीं बळकट, कमालीचे टिकाऊ असूनहि माफक किंमतींत मिळतात. त्यांच्यामुळें तुमचें काम अधिक झटपट, काटेकोर, आणि संतोषजनक होतें. परिणामीं अधिकाधिक कमाईचा मार्ग मोकळा होतो.

# कौशल्यपूर्ण काम म्हणजे भरपूर कमाईची खात्रीच!



**शिवाजी वर्क्स लिमिटेड**
शिवशाही, जि. सोलापूर (महाराष्ट्र)

SON & BAY/SWL: 6635 M

करण्याच्या तंत्राला आधुनिक आंतरराष्ट्रीय विचारात महत्त्वाचे स्थान मिळाले, ते दुसऱ्या महायुद्धानंतर. १९४९ साली जागतिक बँकेने विकसनशील देशांना भरीव कर्जे देण्यास प्रारंभ केला. तोपर्यंत आर्थिक विकासाबद्दल बहुधा फक्त चर्चाच होत असे. त्यानंतर मात्र आर्थिक विकासाचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहाराच्या क्षेत्रात येऊ लागले. तेव्हापासून विकासाची कामे करणे हा एक स्वतंत्र वाढता धंदाच झालेला आहे. जागतिक बँकेच्या जोडीला इंटर अमेरिकन डेव्हलपमेंट बँक व एशिअन डेव्हलपमेंट बँक ह्याही आल्या आहेत. त्याशिवाय परदेशांना मदत देण्याचेच फक्त काम मुख्यतः करणाऱ्या संघटना राष्ट्रीय पातळीवरही अस्तित्वात आल्या आहेत. त्या सर्वांत अमेरिकन सरकारची एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट ही संघटना मोठी आहे. त्याशिवाय युरोप आणि अमेरिकेतील मोठमोठ्या विद्यापीठांतून विकासाच्या तंत्रशास्त्राची सुधारणा करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पाकिस्तानचा विकासाचा कार्यक्रम यशस्वी रीतीने पार पाडण्यात हारवर्ड विद्यापीठातील तज्ज्ञांनी व अर्थशास्त्रज्ञांनी महत्त्वाचा वाटा उचललेला आहे. ह्याशिवाय अनेक खाजगी निधिसंस्था विकासकार्यात मग्न झालेल्या आहेत. त्यापैकी फिलिपाइन्समधील आंतरराष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्थेचे उदाहरण मुद्दाम सांगण्यासारखे आहे. जगातील पिकांपैकी तांदुळाचे पीक हे सर्वांत व एकच एक महत्त्वाचे पीक आहे. फिलिपाइन्समधील संशोधन केंद्रात अनेक देशांचे शास्त्रज्ञ सहकार्याने काम करीत आहेत तांदुळाचे दर एकरी उत्पादन वाढविणे आणि त्याच्या अधिक चांगल्या व रोगाला दाद न देणाऱ्या जाती शोधून काढणे ह्यासाठी केंद्रात संशोधन करण्यात येत आहे. त्यांच्या संशोधनाला आता भरघोस यश आले आहे.

(१) गट ह्या दृष्टीने विकसनशील देशांचा विचार करताना असे लक्षात येते की, त्या देशांपाशी साधन-संपत्तीचा अभाव आहे असे नाही. पण उपलब्ध असलेल्या साधनांचा पुरेसा उपयोग मात्र करून घेण्यात येत नाही. (२) साधनांच्या अपुऱ्या वापराचे एक प्रमुख कारण असे आहे की विकसनशील देशांना भांडवलाचा पुरवठा अत्यल्प आहे. अर्थात प्रत्यक्ष किती अपुरा पुरवठा आहे ह्यासंबंधी मतभेद होऊ शकतील. ह्यासंबंधी जागतिक बँकेने एक अंदाज अलीकडे केलेला आहे. बँकेच्या अंदाजाप्रमाणे विकसनशील देशांना सध्या देण्यात येणाऱ्या मदतीहून दरसाल ३०० ते ४०० कोटी अधिक डॉलर्सची मदत करण्याची गरज आहे. (३) विकसनशील देशांना भरपूर प्रमाणावर भांडवल उपलब्ध करून दिले तरीसुद्धा त्यांची आर्थिक प्रगती साधेलच अशी ग्वाही देता येत नाही. भांडवलाचा हुषारीने उपयोग करून घेण्यात आला तरच प्रगती होईल. ह्या तिसऱ्या मुद्याचा विचार करताना विकासाच्या प्रक्रियेत खाजगी भांडवलाचे महत्त्व लक्षात येते.

विकसनशील देशांपैकी बरेच देश ज्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र झाले त्या पुढाऱ्यांवर समाजवादी आर्थिक विचारसरणीचा जबरदस्त प्रभाव पडलेला होता. त्याला काही ऐतिहासिक कारणे आहेत आणि ती सर्वांना माहीत आहेत. ह्याचा परिणाम असा झाला आहे की, उत्पादन साधनांची सार्वजनिक मालकी हाच काय तो आर्थिक वाढीचा मार्ग आहे अशी त्यांची दृढ भावना झाली आहे. असे काही देशही खाजगी भांडवलाची आळवणी करतात; परंतु ते केवळ धोरण म्हणून; त्या बाबतीत त्यांना फारसा उत्साह नसतो. दुर्दैवाने, मदत देणाऱ्या देशांनी खाजगी भांडवलाच्या कार्याविषयी नीटशी कल्पना देण्याच्या कामात कसूर केलेली आहे. विकासकार्यात खाजगी भांडवल गुंतविण्याविषयी पश्चिम युरोपातील देशांच्या अधिकाऱ्यांनी जी निवेदने केली आहेत ती बऱ्याच वेळी बोलघेवडेपणाचीच साक्ष देतात. अलीकडे मात्र त्यात थोडा फरक पडू लागला आहे. हा सर्व इतिहास दुर्दैवीच म्हणावा लागेल. कारण गेल्या वीस वर्षांतील घडामोडींचा विचार करता असा निष्कर्ष निघतो की, आर्थिक आधुनिकीकरणात खाजगी मालकीचे परदेशी भांडवल किमया करू शकणारी चीज आहे. काही महिन्यांपूर्वी एक प्रसिद्ध अमेरिकन पत्रकार आफ्रिका व आशिया खंडाचा दौरा करून परतला. तो काहीसा उद्वेगाने म्हणाला की नवीनच उदयास येणाऱ्या देशांच्या आर्थिक विकासात समाजवादी क्रांतीचा टप्पा अटळ असल्याचे माझे मत होते. परंतु तसा अनुभव आलेला नाही. त्याचा हा अभिप्राय चुकीचा म्हणता येत नाही. कारण, विकसनशील देशांपैकी ज्यांनी परदेशी भांडवलाबद्दल अविश्वास दाखवला त्यांची आर्थिक प्रगती नेहमी अल्प झालेली दिसून येते. क्यूबाचे उदाहरण पाहा. तेथे मार्क्सवादावर आधारलेली नियोजित अर्थव्यवस्था एक दशक तरी चालू आहे. पण अजूनही रशियाला तेथे रोज १० लाख डॉलर्स खर्च करावा लागतो; तरच क्यूबाची अर्थव्यवस्था कशीबशी सुरळीत चालते. पूर्व युरोपातील देशांनी गिनीला आर्थिक मदत केलेली आहे व करीत आहेत. तरीसुद्धा तेथील आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. ब्रह्मदेशात राष्ट्रीय अर्थव्यवस्था लष्करी खात्यासारखी चालविण्याचे प्रयत्न झाले. परिणामी तेथे जवळजवळ संपूर्ण आर्थिक कुचंबणा झाली आहे. उलट, ज्या देशाची आर्थिक प्रगती झाली आहे त्यांचे चित्र पाहा. तैवानमधील आर्थिक प्रगति आता अशा अवस्थेप्रत पोचली आहे की, अमेरिकेच्या मदतीची गरज राहिलेली नाही. मेक्सिको व थायलँड ह्यांच्या आर्थिक वाढीचा दर दरसाल ७ टक्के आहे. दक्षिण कोरिआत चलनवृद्धीने दारिद्र्याची सीमा गाठली होती पण आता तेथील औद्योगिक प्रगती जोराची मुसंडी मारत आहे. ह्या सर्व देशांनी असे वातावरण निर्माण केले होते की ज्यात तेथील उद्योगपती व परदेशी खाजगी भांडवलदार ह्यांना आत्मविश्वासाने काम करता येणे शक्य झाले.

अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे स्फूर्तिस्थान

# अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## अ ह म द न ग र

स्टेशन रोड, अहमदनगर

टेलिफोन नं. १२३-१८६ पोस्ट बॉ. नं. ४२ तार : "सहकार बँक"

## दीपावली अभीष्ट चिंतन

: देशसेवा हेच ब्रीद : : लोक कल्याण हेच ध्येय :

कृषी औद्योगिक विकासाचे कंकण हाती बांधून कृषी विकासार्थ बद्धपरिकर असलेली जिल्हा सहकारी बँक.

कृषी औद्योगिक नियोजन, संशोधन व विकास मंडळाची स्थापना आणि त्या दिशेने निश्चयात्मक प्रयास यामुळे भारतांतील सर्व जिल्हा सहकारी बँकांमध्ये या बँकेने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

जिल्हाभर पसरलेल्या विस्तृत शेतीची उत्पादनक्षमता वाढवून देशाच्या संपत्तीचे तत्परतेने संवर्धन करणारी भारतांतील अग्रगण्य जिल्हा सहकारी बँक.

या बँकेच्या ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या दरांचा फायदा घेऊन स्वार्थाबरोबर परमार्थही साधा.

| | | |
|---|---|---|
| १ ] | अधिकृत भाग भांडवल | रु. २५० लक्ष |
| २ ] | वसूल भाग भांडवल | रु. १३६ लक्ष |
| ३ ] | गंगाजळी व इतर फंडस् | रु. ४२ लक्ष |
| ४ ] | शेती उत्पादन कर्जे | रु. ७५० लक्ष |
| ५ ] | ठेवी | रु. ६०० लक्ष |
| ६ ] | बिगर शेती कर्जे | रु. ३१६ लक्ष |
| ७ ] | खेळते भांडवल | रु. १४ कोटी |

जिल्ह्यात निरनिराळ्या गावी असलेल्या या बँकेच्या ४७ शाखांमधून

बँकिंगचे सर्व व्यवहार अत्यंत दक्षतेने व काळजीपूर्वक केले जातात.

नूतन वर्ष आमच्या सर्व ग्राहकांस, हितचिंतकांस, ठेवीदारांस आणि भागधारकांस सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

जी. के. पाटील, मॅनेजर

खा. ल. वाबळे, व्हा चेअरमन

भा. सं. थोरात, चेअरमन

# उद्योगधंद्यांतील अधिकाऱ्यांपुढे उभ्या राहणाऱ्या अडचणी

## समस्यापूर्तीसाठी तारतम्याची आवश्यकता

आपल्यापैकी पुष्कळांना असे वाटत असते की, आपल्या सध्याच्या कामापेक्षा अधिक उच्च दर्जाच्या कामाला आपण लायक आहो. अधिकाराच्या जागांवर काम करताना तारतम्याला फार महत्त्व आहे. तुमच्या तारतम्याची परीक्षा पाहावयाची असेल तर उद्योगधंद्यांच्या नेहमीच्या कामात उद्भवणाऱ्या पुढे दिलेल्या प्रश्नांची सोडवणूक कशी कराल, ते स्वतः अजमावा. म्हणजे त्यांची सोडवणूक वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कशी केली त्याच्याशी आपली उकल तुम्हांला ताडून पाहता येईल.

प्रथम समस्या वाचा, आपला निर्णय ठरवा आणि मग समस्येचे दिलेले उत्तर वाचा. सर्व समस्यांच्या बाबतीत हीच पद्धत स्वीकारा म्हणजे लक्षपूर्वक उकल करणे सुलभ होईल.

**समस्या १ ली** – तुम्ही एका कारखान्याचे मालक आहात. तुमचा कारखाना तुम्हाला देशातच दुसऱ्या ठिकाणी हलवावयाचा आहे. कारण हे ठिकाण वाहतूक, कच्च्या मालाची उपलब्धता आणि कराची आकारणी ह्या दृष्टीने अधिक अनुकूल आहे. परंतु दुसरीकडे कारखाना हलविण्यास तुमच्या कारखान्यातील निरनिराळ्या खात्यांच्या प्रमुखांचा विरोध आहे. तुम्ही तुमच्या दृष्टीने ४ जागांची निवड केली आहे. सर्वच जागा एकंदरीने सोईच्या आहेत. त्यांपैकी एका जागेची निवड केली तर कारखान्यातील एका महत्त्वाच्या नौकराच्या ज्ञानाचा फायदा तुम्हास मिळणार नाही. अशा परिस्थितीत तुम्हीच जर मालक असता तर काय निर्णय घेतला असता ?

**समस्या २ री** – देशभर पसरलेल्या एका कंपनीचे तुम्ही शाखाधिकारी आहात. तुमच्या शाखेतील कामगारांना कामावर घेणे, काढणे आणि त्यांच्या कामाची नोंद करणे ही जबाबदारी तुमच्यावरच आहे. कामगारांपैकी एक पुन्हा पुन्हा उशिरा येणारा आहे. हा कामगार दर वेळी काहीतरी सबब सांगतो. पण तुम्हाला असे कळते की उशिराचे खरे कारण वेगळेच आहे. ह्या कामगाराला सकाळी लवकर उठणे आवडत नाही, त्यामुळे त्याला उशीर होत असतो. हा कामगार कामसू आहे. इतर कामगार सर्व दिवस खपून जेवढे उत्पादन करतात त्यापेक्षा अधिक उत्पादन हा उशिरा येणारा कामगार करीत असतो. कामगार जबाबदारीने काम करणारा व समंजस आहे. परंतु त्याच्या उशिरा येण्याने इतर कामगारांवर परिणाम होत असतो. ह्या कामगाराला तुम्हाला कामावर तर ठेवावयाचे आहे. पण हे कसे जमणार ? तुम्ही स्वतःच मालक असला तर ह्यातून काय मार्ग काढाल ?

**समस्या ३ री** – तुमच्याकडे काम करणारा एक चांगला नौकर दुसरीकडे अधिक पगार मिळतो म्हणून काम सोडण्याचा विचार करीत आहे. त्याने तुम्हाला तसे सरळच सांगितले आहे. तो तुमच्याकडे अनेक वर्षे काम करीत आहे आणि त्याला त्याच्या जागेवरचा अधिकात अधिक पगार मिळत आहे. इतर नौकरांना ही संभाव्य घटना माहीत नाही. परंतु ती फार वेळ गुप्त राहणे शक्य नाही. ह्या परिस्थितीत मालक म्हणून तुम्ही काय ठरवाल ?

**समस्या ४ थी** – तुमच्या कंपनीचा विस्तार वाढत आहे, आणि तुम्हाला एका पर्यवेक्षकाची नेमणूक करावयाची आहे. तुमचे सध्याचे नौकर आपापली कामे कार्यक्षमतेने करीत आहेत.पण त्यांच्यापैकी कोणीही पर्यवेक्षकाचे काम करण्याच्या लायकीचा नाही. तुम्ही बाहेरच्या माणसाला नेमण्याचे ठरविता ह्यामुळे सध्याच्या नौकरांत अस्वस्थता निर्माण होण्याचा संभव आहे. कारण, पर्यवेक्षकाच्या जागेसाठी आपण लायक आहोत असे त्यांच्यापैकी अनेकजणांना वाटण्याची शक्यता आहे. ह्या परिस्थितीतून तुम्ही काय मार्ग काढाल ?

**समस्या ५ वी** – तुमच्याकडे असा एक कामगार आहे की जो अंग मोडून काम करणारा आहे. पण, त्याचे प्रशिक्षण मर्यादित असल्यामुळे त्याला अधिक जबाबदारी पेलण्याची पात्रता नाही. ह्या कामगाराचा उत्साह टिकविण्यासाठी तुम्ही स्वतः काय कराल ?

**समस्या ६ वी** – तुमची स्वतःच्या मालकीची कंपनी आहे. तिचे भागभांडवल तुम्ही लोकांना विकलेले नाही. अर्थातच तुम्ही किती धंदा करता आणि त्यात किती नफा अगर तोटा होतो ते सरकार सोडून इतरांना सांगण्याची आवश्यकता नाही. पण तुमचे कामगार वेतनाबाबत आणि सुट्यांबाबत तुमच्या निर्णयाशी सहमत नाहीत. तुमच्या निर्णयांना त्यांचा विरोध आहे. तुम्ही वाजवी वेतनवाढ करण्यास तयार आहा, परंतु हिशेबावरून असे स्वच्छ दिसते की जादा खर्च कंपनीला झेपणार नाही. ह्या परिस्थितीला तुम्ही कसे तोंड द्याल ?

**समस्यापूर्ती १ ली**—मालकाने आपल्या नौकर वर्गातील प्रमुख लोकांची एक कमिटी नेमली आणि स्वतः निवडलेल्या ४ जागांपैकी एका जागेची अखेरची निवड करण्याचे काम कमिटीवरच सोपविले. कमिटीच्या सभासदांना आणि काही वेळा त्यांच्या कुटुंबांनाही निवडलेल्या ४ जागांची पाहणी करण्यासाठी पाठविण्यात आले. त्यांनी फक्त जागेचीच पाहणी केली असे नाही तर तेथील शाळा व इतर सामाजिक जीवन ह्यांचीही पाहणी केली. कंपनीच्या अध्यक्षांनी असे सुचविले की कमिटीच्या अखेरच्या निवडीबरोबर प्रत्येक सभासदाने व्यक्तिगत

द. सा. द. शे. रुपये

७.६२/-

पर्यंत व्याज आपण मिळवू शकता

टेवीची मुदत मोठी म्हणजे

व्याज मोठे

एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते

इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते

दि युनायटेड

वेस्टर्न

बँक लि.

मुख्य कचेरी :—सातारा

२९ शाखा

सहकाराची ज्योत सदैव तेवत राहो !

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड,

—मुंबई—

स्थापना १९४५

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

टेलिफोन नं. ३५६५०२

७, तात्या घारपुरे पथ, मुंबई-४.

(१) बचत खाते :—व्याजाचा दर : दरसाल दर शे. रु. ४-००

(२) खास बचत योजना :—घरी बसून पैसे भरता येतात

(३) कायम ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर

(४) महाराष्ट्र, म्हैसूर आणि गुजरात राज्यांतील प्रमुख शहरांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

खेळते भांडवल सुमारे १३ लाख रुपये

अधिक माहितीसाठी अवश्य भेटा :—

बा. य. बेलींकर

अधि. मॅनेजर

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

सूचनाही द्याव्या.त्यामुळे असमाधान उत्पन्न करणाऱ्या काही बाबी असल्यास त्यावर उपाय करणे शक्य झाले असते. ह्या धोरणाचा परिणाम असा झाला की अधिकारी वर्गापैकी व तंत्रज्ञांपैकी १००टक्के नौकरांनी कंपनीच्या नव्या जागी जाण्याचे मान्य केले.

**समस्यापूर्ती २ री** – हा कामगार महत्त्वाचा आहे. ह्यातच सोडवणुकीचे बीज आहे.इतर कामगारांना पेलणार नाहीत अशा जादा जबाबदाऱ्या त्याच्यावर टाकण्यात आल्या होत्या. जी कामे उशिरा केली तरी चालते असते ती आयत्या वेळी ह्या कामगाराकडे नेहमीच सोपविण्यात आली होती. परंतु त्याला अधिक मुशाहिरा मात्र देण्यात आला नाही.इतर कामगारांना ह्या गोष्टीची जाणीव होती. ह्या कामगारावर मेहेरनजर करण्यासाठी हा बनाव घडविण्यात आला होता असेही नाही. काम उरकण्यासाठी त्या कामगाराची गरजच होती. तसे नसते तर उशिरा येण्याबद्दल त्याला काढून टाकावेच लागले असते. कारण, उशिरा येण्यामुळे शिस्तभंग होत होता. अर्थातच सर्वसामान्य शिस्तीच्या नियमांचे हे उल्लंघन तसेच चालू देणे इष्ट ठरले नसते.

**समस्यापूर्ती ३ री** – आपण ज्यांच्याबरोबर यशस्वी रीत्या काम केलेले असते त्यांच्याबरोबरच पुढेही काम करीत राहण्याचा प्रयत्न आपण सर्वजणच करीत असतो. परंतु कधी कधी त्यांना नौकरीस ठेवणे शक्य होत नाही. ह्या समस्येत मालकाने नौकराला समाधानी ठेवण्यासाठी जेवढे करता येणे शक्य होते तेवढे केले होते. तरीही नौकर काम सोडून दुसरीकडे जाणार म्हणत होता. म्हणून मालकाने त्याला यश चिंतिले आणि त्याच्या खालच्यांना बढती देण्याची तयारी केली. मालकाला दुसरा मार्गच नव्हता. त्याने नौकराला दुसरीकडे मिळणारा पगार देऊ केला असता तर इतर नौकरांबरोबर कटकटी निर्माण झाल्या असत्या. त्यांनी आपल्या पगारश्रेणीबाबतही अपवादात्मक फरक करण्याची रास्त इच्छा व्यक्त केली असती. दुसरे असे की, संबंधित नौकर आपल्या खास पगारश्रेणीला साजेल अशा पगारवाढीची अपेक्षा करू लागला असता आणि त्यामुळे इतर नौकरांमधील असंतोष अधिकच वाढीस लागला असता. प्रारंभी अवघड गेले तरी वरची जागा पुनः भरण्यात काही फायदे असतात. ह्या जागेवर काम करण्याची ईर्षा इतर नौकरांत उत्पन्न होते आणि त्यामुळे सर्वच नौकर संघटनेची कार्यक्षमता वाढते. तेव्हा आपल्याला आलेल्या नव्या मागणीची बातमी सरळसरळ सांगण्याबद्दल मालकाने त्याला धन्यवादच दिले. नंतर त्या नौकराला कळवून आणि त्याची संमती घेऊन मालकाने तो दुसरीकडे जाणार असल्याचे जाहीर केले आणि दुसऱ्या माणसाला त्या जागी नेमण्याची तयारी केली.

**समस्यापूर्ती ४ था** – कारखान्यात अगर कंपनीत आधीच असणाऱ्या कामगारांना अगर नौकरांना बढती देण्याचे धोरणच चालक ठेवू इच्छितात. त्यामुळे सर्वच पातळीवर कार्यक्षमता सुधारण्यास मदत होते. परंतु कधी कधी असे होते की कामावर असलेल्यातून योग्य लायकीचा माणूस मिळणे अशक्य होते. जगातल्या अगदी पहिल्या दर्जाच्या विक्रेत्यांतही अधिकाऱ्याला उपयोगी अशी कार्यक्षमता असेलच असे नाही. असा विक्रेता विक्रीखात्याचा मॅनेजर म्हणून यशस्वी होणे शक्यच नसते. ही समस्या अशीच आहे. कंपनीतील कामगारांतून पर्यवेक्षकाचे काम करू शकेल असा अनुभवी व लायक माणूस नेमण्यासारखा नव्हता. म्हणून मालकाला अशा माणसाचा शोध बाहेर करावा लागला. म्हणून त्याने प्रथम नव्या माणसाच्या नेमणुकीचा मनोदय जाहीर करून टाकला. कामाचे स्वरूप आणि त्याबद्दलची लायकी त्याने स्पष्ट केली. ह्या जागेला लायक असणारी व ती स्वीकारण्यास तयार असलेली माणसे कामगारांना माहीत असतील तर त्यांची नावे कामगारांनी सुचवावी असे सांगण्यात आले. अर्थातच असे करण्यात एक हेतू होता; कामावर असलेल्या कामगारांपैकी एखाद्याला जर आपण संबंधित जागेला लायक आहो असे वाटत असले तर त्याने पुढे यावे अशी अपेक्षा होती. पण कोणीच पुढे आले नाही. साहजिकच कोणालाही तो सदर जागेला लायक नाही असे सांगण्याची पाळी मालकावर आली नाही. त्यामुळे नवा मनुष्य नेमला गेला, व त्याबद्दल काही धुसपूस अगर तक्रारी झाल्या नाहीत.

**समस्यापूर्ती ५ वी** – कामाबद्दलची उत्साही मनोवृत्ती ही उद्योगधंद्यांत एक महत्त्वाची बाब आहे. एखाद्या माणसात ती असेल तर वरिष्ठ म्हणविणाऱ्या अधिकाऱ्याने त्याला उत्तेजन दिले पाहिजे, आणि त्याची कार्यक्षमता विकास करण्यासाठी संधी दिली पाहिजे. तरच तो अधिकारी वरिष्ठ म्हणवून घेण्यास योग्य ठरतो. प्रस्तुतच्या माणसाला अधिक प्रशिक्षण घेण्याची सूचना कंपनीला करता येईल. प्रशिक्षणाचा खर्च पूर्णतया अगर अंशतः सोसण्याची तयारीही कंपनीला दाखविता येईल. उत्साही मनोवृत्तीच्या एखाद्या माणसाला कौशल्याचे काम शिकविण्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करावा लागेल. पण ह्या खर्चासारखी उत्तम भांडवल गुंतवणूक क्वचितच होऊ शकेल.

**समस्यापूर्ती ६ वी** – आपल्याशी स्पर्धा करणाऱ्यांना उपयोगी पडेल अशी माहिती कोणत्याही कंपनीने देऊ नये हे रास्तच आहे. पण तेवढा अपवाद वगळून प्रत्येक कंपनीने आपल्या नौकरांना जास्तीत जास्त माहिती देणे नेहमीच चांगले असते. दर सहा महिन्यांनी अगर तीन महिन्यांनी पत्रकद्वारा अगर सभेच्या द्वारा ही माहिती देण्यात यावी. कंपनीच्या स्थानाचा दर्जा राखण्यासाठी प्रत्येक नौकराची वागणूक कशी उपयुक्त ठरते ते अशा रीतीने त्यांच्या ध्यानात आणून देता येते. अशा वेळी योग्य माणसांची प्रशंसा करण्याचा मोका जसा मिळतो तशीच शिस्त राखण्याचे महत्त्व सांगण्याचीही संधी मिळते. माहीतगार कामगाराला त्यामुळे आपण एकाच संघटनेचे घटक आहोत ह्याची जाणीव उत्पन्न होते, आणि तो धंद्यात सुधारणा करण्यास आपण होऊन पुढाकार घेतो.



तुमच्या मुलीचें
भवितव्य
तुमच्याच हातीं

पुढील अनिश्चिततेपासून
तिच्या रक्षणाची तरतूद करा.
स्टेट बँकेत
नियमित बचत करा.

**सेवेसाठीं**
**स्टेट बँक**

S-273 MRA

" दीपावली शुभचिंतन "

**गणेश सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गणेशनगर**

तालुका कोपरगाव, जि. अ. नगर

आमचे कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, असंख्य
ग्राहक व हितचिंतक यांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक
शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣

" सहर्ष घोषणा "

*गणेश सहकारी साखर कारखान्याचा ११ वा गळित हंगाम विजयादशमी दिनांक १२ ऑक्टोबर १९६७ रोजी सुरू झाला आहे. देशातील साखर टंचाई व उत्पादन वाढीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी कारखाना प्रयत्नाची पराकाष्ठा करीत आहे. चालू हंगामात २ लाख टन गळित करण्याचा संकल्प असून सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, आदी सर्वांनी हंगाम यशस्वी करण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन करीत आहोत.*

**पांढरी दाणेदार व उत्कृष्ट साखर उत्पादन हेंच आमचे वैशिष्टय**

गणेश सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गणेशनगर

# व्याजाच्या रकमेतून इन्कमटॅक्स कसा कापून घेतला जाईल ?

## बंधने, माफी आणि सवलती

व्याजाचे रकमेतून इन्कमटॅक्स कापून घेण्याबाबत नवीन योजना जाहीर झाल्यानंतर त्याबाबत बरीच चर्चा झाली. ही योजना इन्कमटॅक्स कापून घेणारांना व ज्यांच्या व्याजातून तो कापला जाईल त्यांना, दोन्ही पक्षांना, गैरसोईची असल्याबद्दल बऱ्याच तक्रारी प्रसिद्ध झाल्या होत्या. कर कापला न जाता व्याज मिळण्याची सवलत मिळविणे करपात्र नसणारांना अगदी सोपे केलेले आहे, असे योजनेच्या तरतुदीवरून दिसून येते. "माझे उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी होईल." असे ठराविक पद्धतीने लिहून दिल्यास कर कापून न घेता व्याज मिळू शकेल. अर्थात, असे लिहून देणारांची यादी इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना अधिक चौकशी करायला आयतीच उपयोगी पडेल! आज मध्यमवर्गातील कित्येक लोक करातून सुटू शकतात, ते आयतेच जाळ्यात सापडतील आणि ठेवीच्या रूपाने बचतीचा पैसा सरकारला आणि बँकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने वापरण्यासाठी देणारे लोक नव्याने कर देऊ लागतील. खालील तपशील इन्कमटॅक्स कापून घेण्याची जबाबदारी ज्यांचेवर टाकण्यात आली आहे त्यांना, त्याचप्रमाणे टॅक्स कापला जाण्याची भीती असणारांना मार्गदर्शक होईल.

कंपन्या, कॉर्पोरेशन्स, स्थानिक संस्था, भागीदारी आणि व्यक्तिसमूह यांनी १-१०-१९६७ पासून भारताचे रहिवासी यांना देण्यात येणाऱ्या व्याजाचे रकमेतून इन्कमटॅक्स कापून घेतला पाहिजे. सरकारकरिता कराची रक्कम कापून घेऊन ती भरण्याची जबाबदारी नवीन तरतुदीप्रमाणे भारतातील रहिवाशांना कर देण्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीवर टाकलेली आहे.

व्यक्ती अगर हिंदू अविभक्त कुटुंबांनी इतरांस व्याज देताना वरीलप्रमाणे कर कापून घेण्याची जरुरी नाही. सरकार, कंपन्या, कॉर्पोरेशन्स, स्थानिक संस्था, भागीदारी, जनसंघ आणि व्यक्तिसमूह यांनी व्यक्ती अगर हिंदू अविभक्त कुटुंबाला व्याजाची रक्कम देताना मात्र कराची रक्कम कापून घ्यावी लागेल.

३० सप्टेंबर १९६७ नंतर देण्यात येणाऱ्या अगर खात्यात जमा करण्यात येणाऱ्या व्याजाच्या रकमेतून कराची रक्कम कापून घेतली पाहिजे. व्याजाची रक्कम जेव्हा प्रथम खात्यात जमा केली जाईल, त्याच वेळी कराची रक्कम कापून घेतली पाहिजे. अशा परिस्थितीत व्याजाची रक्कम प्रत्यक्ष दिली जाईल तोपर्यंत कराची रक्कम कापून घेण्याचे लांबणीवर टाकता येणार नाही. परंतु प्रथम व्याजाची रक्कम जमा करण्याऐवजी रोख व्याजाची रक्कम ३०-९-६७ नंतर दिल्यास व्याज देताना कराची रक्कम कापून घ्यावी लागेल.

१ ऑक्टोबर १९६७ पूर्वी खात्यात जमा झालेल्या व्याजाचे रकमेतून कराची रक्कम कापून घेण्याची आवश्यकता नाही. सदरची रक्कम जरी मागाहून केव्हाही देण्यात आली तरी ती करपात्र धरली जाणार नाही. परंतु ३०-९-६७ नंतर व्याजाची रक्कम जमा न करता परस्पर व्याजावरील कर कापून घेण्याची तरतूद सिक्युरिटिज वरील व्याजाचे रकमेस लागू होत नाही. कर्ज (तारणावरील अगर विनतारणावरील), सर्व प्रकारच्या ठेवी, भागीदारीमध्ये भागीदारांच्या नावावर जमा असलेल्या रकमा, धंद्यातील किरकोळ उसनवारी, अन्य प्रकारची देणी, यांनाच फक्त वरील तरतूद लागू होईल. कंपन्यांनी काढलेली डिबेंचर्स, रोखे, तसेच कॉर्पोरेशन्स अगर स्थानिक संस्थांचे रोखे यांना वरील तरतूद लागू नाही. सरकारचे व्याजावर वेगळ्या कलमाखाली पूर्वीप्रमाणेच कराची रक्कम कापून घेतली जाईल.

एका वेळी जमा केलेली अगर दिलेली व्याजाची रक्कम ४०० रुपयांच्यावर होत असल्यास कराची रक्कम कापून घ्यावी लागेल. ४०० रुपये अगर त्यापेक्षा कमी देण्यात येणाऱ्या व्याजाचे रकमेतून कराची रक्कम कापून घेण्याची आवश्यकता नाही.

कंपन्यांना देण्यात येणाऱ्या व्याजाच्या रकमेतून २० टक्के आणि भारतीय रहिवाशांना देण्यात येणाऱ्या व्याजाच्या रकमेतून १० टक्के कराची रक्कम कापून घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(१) बँकिंग कंपन्या, (२) सहकारी बँका, (लँड मॉरगेज बँका धरून), (३) कायद्याने स्थापन केलेली आर्थिक कॉर्पोरेशन्स, (४) लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, (५) विम्याचा धंदा करणाऱ्या कंपन्या आणि सोसायट्या, (६) भारत सरकार आणि राज्य सरकार यांनी राजपत्रात जाहीर केलेल्या संस्था, यांना देण्यात येणाऱ्या व्याजाच्या रकमेतून कर कापून घेता येणार नाही.

रजिस्टर्ड भागीदारीखेरीज अन्य व्यक्तींनी त्यांचे अंदाजे वार्षिक उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी आहे, असे मॅजिस्ट्रेट अगर नोटरी पब्लिक यांच्यापुढे ॲफिडेव्हिट केल्यास अगर गॅझेटेड ऑफिसर, तहसीलदार किंवा मामलेदारच्या समोर सही करून माझे उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी होईल, असे लिहून दिल्यास कर कापून न घेता व्याज मिळण्याची सवलत मिळू शकेल. वरील अधिकाऱ्यांनी सदर व्यक्ती त्यांचे माहितीची आहे, असे लिहिले तरी ते पुरेसे आहे. नॉन कॉर्पोरेट कर भर-

सोलापूर शहरातील नागरी सहकारी बँक

## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

सोलापूर. स्थापना ६-६-१९२९

हेड ऑफिस—नवी पेठ, फोन नं. ३१७

शाखा : १] साखर पेठ, फो. नं. १४२ : २] अक्कलकोट फो. नं. ६१

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,१३,३६०=०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,४०,५६६=०० |
| ठेवी | रु. | २२,३३,९८५=३० |
| एकूण खेळते भांडवल | रु. | २६,८४,३२०=०० |

*डिव्हिडंड सन १९६६-६७ सालाकरिता ७½ टक्के प्रमाणे.*

आकर्षक दराने ठेवी स्वीकारल्या जातात.

सोने-चांदीच्या जिनसांच्या, व्यापारी मालाच्या व मुदत ठेव व गव्हर्नमेंट सिक्यु. तारणांवर सभासदांना कर्जे देण्याची सोय केली आहे.

—: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :—

(१) श्री. वा. द. आराध्ये, ऑ. मॅ. डायरेक्टर. (२) श्री. म. रा. बाळी, डायरेक्टर (३) श्री. कृ. गो. जानकर, (४) श्री. म. रा. खडकीकर, (५) श्री. सि. आ. अच्युगट्ला, (६) श्री. ना वि. दुरगीकर, ( ७ ) श्री. सा. ह. साळुंके, ( ८ ) श्री.ति. बा. भोळा.

कृ. ल. सिद्धम, मॅनेजर. श्री. मा. ह. कोंतम, प्रेसिडेंट.

इनचार्ज—एस. वाय. शिरसीकर



## सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक नियमित

५२, साखर पेठ, सोलापूर-२

स्थापना १९६५ ] [ फोन नं १३२२

आमच्या बँकेत लहान-मोठ्या ठेवी ठेवून छोट्या उद्योग-धंदांना सक्रिय पाठिंबा देण्यास मदत करा !

### मुदत ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर

मुदतीप्रमाणे ५½% पासून ८%

संक्षेप ठेव ( पिग्मी ) कमीत कमी २५ पैसे पासूनच्या ठेवी ठेवीदारांच्या घरीमुद्दा स्वीकारल्या जातील व ५ वर्षांनी ४॥ टक्के दराने सव्याज रक्कम दिली जाते.

याशिवाय आकर्षक व्याजाचे दराने कॉल डिपॉझिटस् स्वीकारली जातात व सर्व तऱ्हेची बँकिंगची कामे करण्यात येतात. जास्त माहितीसाठी चौकशी करा.

व्ही. आर. दंडी, मॅनेजर एस. एम. आडम, चेअरमन



आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, ठेवीदार व सभासद यांना ही दीपावली व आगामी वर्ष सुखाचे व समृद्धीचे जावो.

## दि आष्टा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., आष्टा

जिल्हा : सांगली

*र. नं. ११९८] ऑडिट वर्ग 'अ' [स्थापना : २०-१-१९४७*

ता. ३०-६-६७ ची बँकेची अर्थव्यवस्था

| | | |
|---|---|---|
| १ ] वसूल भाग भांडवल | रु. | २,११,२५० |
| २ ] निधी | रु. | ९२,१४२ |
| ३ ] ठेवी | रु. | ७,९५,७३० |
| ४ ] खेळते भांडवल | रु. | ११,१४,००० |
| ५ ] गुंतवणूक | रु. | १,२८,३३५ |
| ६ ] कर्जे | रु. | ९.७९,५४२ |
| ७ ] इमारत व जागा | रु. | १,१०.३५० |
| ८ ] वार्षिक नफा | रु. | ४१,५०० |

ग्रामीण भागात सन १९४७ साली स्थापन झालेली व सन १९६५ मध्ये स्वत:ची वास्तू असलेली वाळवा तालुक्यातील अग्रेसर बँक. या बँकेत आकर्षक व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात. सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार केले जातात; आणि लाईफ इन्शु. कॉर्पोरेशनचे सर्व प्रकारचे हप्ते स्वीकारले जातात.

शंकर महादेव पाटील, मॅनेजर एन् ए. दकडे, मॅनेजिंग डायरेक्टर कल्लाप्पा नाना बांडे, चेअरमन



## पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन

### सव्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे

७३, बुधवार पेठ, पुणे २

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. | ४,९२,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,६०,००० |
| ठेवी | रु. | ५६,८०,००० |
| इन्व्हेस्टमेन्टस् | रु. | ९,५०,००० |
| खेळते भांडवल | रु. | ६५,५०,००० |

*अध्यक्ष :—मा. ना. पो. भोकरे*

*कार्याध्यक्ष :—मा. वा. रा. हरेकर*

बँक गेली १७ वर्षे 'अ' वर्गात आहे.

कायम ठेवींचे दर खालीलप्रमाणे आहेत

| मुदत | १ वर्ष | २ वर्षे | ३ वर्षे | ४ वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|---|---|
| दर द. | ६ | ६-२५ | ६ ५० | ६-७५ | ७-०० |

सेव्हिंग्ज ठेवी:—दरसाल दरशेकडा चार टक्के.

हप्तेबंद ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातात.

नारायण कृष्ण कुलकर्णी,
मॅनेजर.

णारा किंवा रजिस्टर्ड भागीदारीची इच्छा असल्यास त्यांनी इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांचा दाखला हजर केला तरी त्यांनाही माफीची सवलत मिळेल. त्यासाठी त्यांना ठराविक नमुन्यात आपल्या हद्दीच्या इन्कमटॅक्स ऑफिसरकडे अर्ज करावा लागेल.

रजिस्टर्ड भागीदारी अगर अन्य संस्था यांनी इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडून कमी दराने कर कापून घेण्याबद्दल दाखला हजर केल्यास त्याच्याकडून कमी दराने कराची रक्कम कापून घेण्याची सवलत त्यांना मिळविता येईल.

वरीलप्रमाणे कापून घेतलेले व्याज सरकारखाती केव्हा भरावे या बाबतीत सरकारने नियम केले आहेत. सरकारतर्फे कापून घेतलेली कराची रक्कम त्याच दिवशी सरकारखाती भरली पाहिजे. इतर बाबतीत पुढील महिन्याचे सात तारखेपर्यंत इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांकडून चलने मागवून घेऊन त्याप्रमाणे रक्कम भरली पाहिजे. १५ जुलै, १५ ऑक्टोबर, १५ जानेवारी आणि १५ एप्रिल अशा तिमाही हप्त्याने रक्कम भरण्याची सवलत देण्याचे अधिकार इन्कमटॅक्स ऑफिसर्सना देण्यात आले आहेत.

वरीलप्रमाणे मुदतीत रक्कम न भरल्यास त्यांना ९ टक्केप्रमाणे सरळव्याज द्यावे लागेल. रक्कम वेळेवर भरण्यास उशीर झाल्यास योग्य कारण दाखवावे लागेल. योग्य कारण न दाखविल्यास अधिकारी कापलेल्या कराच्या रकमेइतका दंड करू शकतील व खटलाही भरू शकतील.

कापून घेतलेले व्याज प्रत्येक तिमाहीस १५ जुलै, १५ ऑक्टोबर, १५ जानेवारी व १५ एप्रिलच्या आत भरण्याची परवानगी इन्कमटॅक्स अधिकारी योग्य बाबतीत देऊ शकतील.

जबाबदारी कायद्याने ज्यांच्यावर टाकली आहे, त्यांनी त्याप्रमाणे कराची रक्कम कापून न घेतल्यास त्यांस सरळव्याजाने वार्षिक ९ टक्क्यांप्रमाणे व्याज भरावे लागेल. व्याजातून कराची रक्कम का कापून घेता आली नाही, याचे योग्य कारण दाखविता आले नाही, तर त्यास दंडही होण्याची शक्यता आहे. असा दंड इन्कमटॅक्स अधिकारी वेळोवेळी ठरवितील. मात्र अशा दंडाची रक्कम कराच्या रकमेपेक्षा जास्त होणार नाही. या गुन्ह्याबद्दल खटलाही भरला जाईल व तो दंडास पात्र होईल.

इन्कमटॅक्सची रक्कम कापून घेण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने रक्कम कापून घेतल्याबद्दल दाखला दिला पाहिजे. सदरचा नमुना सरकारने ठरवून दिलेला आहे. सदरचा दाखला आकारणीचे वेळी हजर केल्यास इन्कमटॅक्स ऑफिसर त्याप्रमाणे होणाऱ्या कराच्या रकमेतून सदर कापलेला कर वजा करतील.

इन्कमटॅक्सची रक्कम कापून घेण्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीने प्रत्येक तिमाहीस १५ जुलै, १५ ऑक्टोबर, १५ डिसेंबर आणि १५ एप्रिल या तारखांस मागील तिमाहीत कापून घेतलेल्या रकमेचा तक्ता इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडे पाठविला पाहिजे.

ॲफिडेव्हिट अगर लेखी दाखला हजर केला असल्याने जेव्हा कराची रक्कम व्याजाच्या रकमेतून कापून घेतली नसेल अशा लोकांचा संपूर्ण तपशीलाचा एक तक्ता साल संपल्यापासून तीस दिवसांच्या आत इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडे पाठविला पाहिजे.

इन्कमटॅक्स कायद्यात अशी तरतूद केली आहे की, ॲडव्हान्स टॅक्सची रक्कम ठरविण्यासाठी जे उत्पन्न धरले जाते, त्यात जर व्याजाचे उत्पन्न असेल आणि त्यातून जर कराची रक्कम कापून घेतली जाणार असेर तर ॲडव्हान्स टॅक्सच्या रकमेतून सदरची रक्कम वजा केली पाहिजे, व बाकी राहिलेली रक्कम फक्त ॲडव्हान्स टॅक्स म्हणून भरावी लागेल. त्यासाठी अधिकाऱ्यांनी चालू सालातील व्याजातून वजा होणारी कराची रक्कम, त्यांचे माहितीवरून आणि करदात्याने काही अंदाजपत्रक हजर केले असल्यास त्या माहितीवरून लक्षात घ्यावी. करदात्याने जर स्वतःचे उत्पन्नाचे अंदाजपत्रक हजर केले असेल तर त्यांनी स्वतःच होऊन आपल्या कराच्या रकमेतून भराव्या लागणाऱ्या कराची रक्कम वजा करून बाकी राहिलेली रक्कम भरावी.

पोस्टातील डिपॉझिट ( सेव्हिंग्ज खाते ), क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट, नोकरांचे प्रॉव्हिडंड फंडातील डिपॉझिट, ज्यांना प्रॉव्हिडंड फंड कायदा लागू असतो, व जे व्याज इन्कमटॅक्स कायद्याचे कलम १० खाली करमाफ जाहीर केलेले आहे, अशा प्रकारचे व्याजाचे रकमेवर कराची रक्कम कापून घेऊ नये.

कापून घेतलेल्या कराच्या रकमेचा फायदा प्रत्येक करदात्यास त्याचे आकारणीचे वेळी दिला पाहिजे व त्याची वजावाट केली पाहिजे. एकूण उत्पन्नावर जी कराची आकारणी होईल, त्यापेक्षा जास्त कराची रक्कम कापून घेतली गेली असेल तर जादा कापून घेतलेली रक्कम करदात्यास परत देण्यात येईल.




### रेल्वेवरील माल वाहतुकीत घट

१९६७–६८ मध्ये रेल्वेवरील मालवाहतुकीत ८६ लक्ष टनांची वाढ होईल, अशी रेल्वे अंदाजपत्रकातील अपेक्षा आहे. पण, १९६७–६८ च्या पहिल्या चार महिन्यांत ३,९,०००० टनांची घट झाली आहे.

— —

### पालम विमानतळावर १०० रुपयांची व्हिस्की १८ रुपयांना

इंडियन टूरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे पहिले जकात-मुक्त दुकान दिल्ली येथील पालम विमानतळावर १ सप्टेंबर, रोजी उघडण्यात आले. कलकत्ता, मुंबई आणि मद्रास येथील विमानतळांवरही अशीच दुकाने उघडण्यात येणार आहेत. काही निवडक विदेशी आणि स्वदेशी जिनसा तेथे विकल्या जातील. उदाहरणार्थ, बाजारात ज्या विलायती व्हिस्कीच्या बाटलीला १०० रु. पडतात ती तेथे फक्त १८ किंवा १९ रुपयांस मिळू शकेल.

———

### आवाजामुळे आरोग्याला उत्पन्न होणारा धोका

मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरांतून आवाजामुळे होणारा त्रास कमी करण्यासाठी शांतता-विभाग जाहीर केलेले असतात. ह्या विभागातून जाताना मोटारींना हार्न वाजविण्याससुद्धा बंदी असते. अलीकडे सर्व जगात हवा आणि पाणी दूषित होत चालल्याच्या तक्रारी वाढत आहेत. लंडन, टोकिओसारख्या मोठ्या शहरांतून धुके आणि धूर ह्यांचा संयोग होऊन हवा दूषित होते हे प्रसिद्धच आहे. भारतातही उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर अशा प्रकारचे प्रश्न उत्पन्न होत आहेत. सांगली शहराच्या पाणीपुरवठ्यावर साखरकारखान्यातील दूषित पाण्याचा विपरीत परिणाम होत असतो. कारखान्याचे पाणी नदीत सोडल्यामुळे कृष्णा नदीतील मासे मेल्याचे वृत्तही एकदा येऊन गेलेले आहे. पुण्याजवळ लोणी येथे खताचा एक कारखाना उभारण्यात आला आहे. ह्या कारखान्यातील गंधकमिश्रित धूर आसपासच्या बागायती शेतीवर पसरून त्यामुळे पिकांची हानी झाल्याचे वृत्त अलीकडेच आले होते. भारतामधील औद्योगीकरण प्रगत देशांच्या मानाने अद्याप बरेच मागे आहे. तरीसुद्धा त्यापासून उत्पन्न होणारे प्रश्न मधून मधून डोके वर काढू लागले आहेत. ह्याचा अर्थ असा की, औद्योगीकरणामुळे समाजस्थितीवर होणाऱ्या परिणामांचा आगाऊ विचार करून विकास कार्यात सुधारणा घडवून आणण्याची दृष्टी भारतात अद्याप आलेली नाही. आता औद्योगिक उपयोगांमुळे नद्यांचे पाणी दूषित होऊ नये म्हणून कायदा करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. औद्योगीकरण केंद्रित झाल्यामुळे मुंबईसारख्या शहरात अनेक प्रकारचे प्रश्न उत्पन्न झाल्याचे स्पष्टच झाले आहे.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार- सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.,

श्रीशिवाजीनगर

तालुका--राहुरी, जिल्हा--अहमदनगर

दूरध्वनी क्रमांक १०३ श्रीरामपूर. तार : छत्रपती-राहुरी, श्रीरामपूर
स्थापना : १९५४ | सभासद संख्या २६९१

वैशिष्ट्ये — आमचे आम्ही --

( १ ) कारखान्याच्या उत्पादक सभासदांनी स्वखुषीने ठेवलेल्या ठेवी, शेअर्स भांडवल जमवून व कारखान्याचे स्वतःचे भांडवलातून भारत सरकारने दिलेल्या लायसन्सनुसार १५०० टन मशिनरी वाढीचे काम पूर्ण झालेले आहे. मशिनरी वाढीसाठी कारखान्याने कोणत्याही प्रकारचे बाहेरील कर्ज घेतलेले नाही. चालू सिझनमध्ये कारखाना १५०० टन क्रशिंग सुरुवातीपासून प्रतिदिनी करील.

( २ ) प्रतिदिनी ३,००० टन गळिताच्या उत्पादनक्षमतेची विस्तारयोजनाही भारत सरकारकडून इंडस्ट्रिअल लायसन्स मिळनाच पूर्ण करण्याचा निर्धार कारखान्याच्या मा. संचालक मंडळाने जाहीर केलेला आहे हे जाहीर करण्यास आम्हास अत्यानंद होत आहे.

चालू हंगामाची उद्दिष्टे

ऊस गाळित टन साखर उत्पादन पोती
२,५०,००० २,९०,०००

दीपावलीच्या मंगल प्रसंगी सर्वांना प्रणाम

पां. वा. पवार, मा. बा. पाटील, बी. बी. तनपुरे,
मॅनेजिंग डायरेक्टर व्हा. चेअरमन चेअरमन

# परदेशस्थ लक्षावधी हिंदी लोकांवर गंडांतर

## नव्या निर्वासितांमुळे भारताचीही कुचंबणा

गेल्या काही महिन्यांत परदेशी वास्तव्य करणाऱ्या हिंदी लोकांविषयी चिंता उत्पन्न करणाऱ्या वार्ता आल्या आहेत. त्यांच्यापैकी बऱ्याचजणांना मायदेशी परत यावे लागेल अशी लक्षणे दिसत आहेत. परदेशी राहणाऱ्या हिंदी लोकांची संख्या ४० लाखांच्या जवळपास आहे. त्यांच्यापैकी कितीजणांनी तद्देशीय नागरिकत्व मिळविले आहे अगर कितीजणांना ते नाकारण्यात आले आहे ह्याची नक्की माहिती मिळणे अवघड आहे. ज्यांनी असे नागरिकत्वाचे हक्क मिळविले आहेत अशांची संख्या खूपच मोठी आहे. भावी कालात त्यांचाही काळ सुखाने जाईल असे सांगता येत नाही. अलीकडे बऱ्याच देशांना नव्यानेच स्वातंत्र्य मिळालेले आहे. त्यांच्यापैकी अनेकांच्या स्वातंत्र्याचा भारताने पुरस्कार केलेला आहे. तरीही अशा बऱ्याच देशांतून हिंदी लोकांना भेदभावाने वागविले जाते अगर त्यांना परत पाठविण्याचे प्रयत्न करण्यात येतात ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

सगळ्यात मोठा प्रश्न सीलोनमधील हिंदी लोकांचा आहे. भारत आणि सीलोन ह्यांच्यात १९६४ साली झालेल्या कराराप्रमाणे सीलोनमधील हिंदी लोकांपैकी ३ लाख लोकांची सीलोनचे नागरिक म्हणून नोंदणी करण्याचे ठरले; आणि ५ लाख, २५ हजार जणांना १५ वर्षांच्या अवधीत टप्प्याटप्प्याने भारतात परत पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु आता कराराच्या योग्य व जलद अमलबजावणीच्या कामी काही विशेष अडचणी उत्पन्न झालेल्या दिसत आहेत. कराराच्या अमलबजावणीसाठी करावयाच्या कायदेशीर तरतुदी लवकरच सीलोनच्या प्रतिनिधीगृहाला मंजुरीसाठी सादर करण्यात यावयाच्या आहेत. परंतु करारासंबंधीचा कायदाच घटनाबाह्य आहे असा अर्थ सीलोनच्या सुप्रीम कोर्टात करण्यात आला आहे. पण एवढ्यानेच संपले नाही. प्रतिनिधीगृहातील विरोधी पक्षाने जरूर त्या कायदेशीर तरतुदी मंजूर करण्यास अथडळा आणण्याचे अगर मंजुरीस विलंब लावण्याचे धोरण स्वीकारले आहे. ३ लाख भारतीय लोकांना सीलोनचे नागरिकत्व देण्याची कल्पना काही राजकारण्यांच्या अद्यापही गळी उतरलेली नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की ज्या ५ लाख, २५ हजार भारतीय लोकांना परत घेण्याचे भारताने कबूल केले आहे त्यांना हिंदचे नागरिकत्व मिळेपर्यंत सीलोनच्या नागरिकत्वाला पात्र असलेल्या हिंदी लोकांना ते हक्क देण्याचे स्थगित करण्यात यावे. ह्याचा अर्थ व्यवहारतः असा होतो की हजारो हिंदी लोकांना नागरिकत्वाचे हक्क न मिळताच सीलोनमध्ये १५ अधिक वर्षे रावावे लागणार. विरोधी पक्षांना त्यांच्या प्रयत्नात यश आले तर हिंदी लोकांना सीलोनच्या नागरिकत्वाचे हक्क मिळण्यास अनिश्चित कालपर्यंत थांबावे लागेल, आणि त्याचा परिणाम म्हणून नागरिकत्वाच्या अनेक हक्कांना व सवलतींना मुकावे लागेल. अशा हक्कांत, व्यावसायिक शिक्षणापर्यंतचे सर्व शिक्षण मोफत मिळण्याच्या, मोफत वैद्यकीय सल्ल्याच्या, मोफत तांदूळ मिळण्याच्या, जरुरीच्या वस्तूंचे शिधावाटप मिळण्याच्या व इतर हक्कांचा समावेश आहे.

ब्रह्मदेशामधून १ लाख हिंदी लोक आतापर्यंत परत आलेले आहेतच. आता कीनिया आणि सिंगापूर ह्यांतील हिंदी लोकांचाही प्रश्न पुढे येऊ लागला आहे. कीनियात सुमारे १ लाख, ८० हजार हिंदी लोक आहेत. त्या देशाच्या सरकारने आफ्रिकेच्या रहिवाशांनाच सर्व क्षेत्रात घ्यावयाचे ठरविले आहे. ह्या संबंधीचा कायदा आता तेथे अमलात आला आहे. त्यातील तरतुदीप्रमाणे पूर्वी दिलेले वास्तव्याचे दाखले रद्द करण्यात आले असून राहण्याचे व काम करण्याचे नवे परवाने देण्यात येत आहेत. त्यामुळे असे परवाने मिळविण्यासाठी निदान १ लाख, ३० हजार हिंदी लोकांना अर्ज करावे लागतील. कारण, नागरिकत्वाचे हक्क मिळविलेल्यांची संख्या ४० ते ५० हजारांपेक्षा अधिक नाही. कीनियांतून हिंदी लोक परतण्यास सुरुवात झालेली आहे. येत्या ५ वर्षांत ५० हजार लोकांना तरी भारतात यावे लागेल असे दिसते.

सिंगापूरमधील १ लाख, ५० हजार हिंदी लोकांपैकी बहुतेकांनी नागरिकत्वाचे हक्क मिळविलेले आहेत. त्यांच्यापैकी १० हजार बिगर-नागरिकांवर मात्र आपत्ती कोसळणार आहे. १९७५ पर्यंत सिंगापूरमधील नाविक तळ आणि लष्करी केंद्रे हळूहळू बंद करण्यात येणार आहेत. त्यामुळे वरील लोक बेकार होणार आहेत. सिंगापूरच्या सरकारने ह्या लोकांना नोकरी संपल्यावर परत भारतात जाण्यास सुचविले आहेच. परंतु ज्यांनी नागरिकत्वाचे हक्क मिळविले आहेत, त्यांनाही मायदेशी परत पाठविण्याचे प्रयत्न सिंगापूरचे सरकार करीत आहे. सिंगापूरमधील स्थायिक हिंदी नागरिकांच्या निष्ठेबद्दल संशय व्यक्त करण्यात येऊ लागला आहे. सिंगापूरचे नागरिकत्व सोडण्याची तयारी दाखविली तर त्यांना नोकरीची मुदत संपण्याच्या आधीच प्रॉव्हिडंट फंड व ग्रॅच्युइटी देण्याची आमिषेही दाखविण्यात येत आहेत. अलीकडे ही आमिषे दाखविण्याचे बंद करण्यात आले असले तरी पुन्हा हे धोरण डोके वर काढणारच नाही, असे नाही.

मलेशिआत सुमारे ८ हजार हिंदी लोक असून त्यांपैकी बहुतेकांनी नागरिकत्वाचे हक्क मिळविलेले आहेत. त्यांच्या बाब-

तही काहीशी अस्थिर परिस्थिती उद्भवली आहे. मद्रास राज्यातील द्रविड मुन्नेत्र कळहम् पक्षाच्या काही पुढाऱ्यांनी मलेशिआला दिलेल्या भेटीचा हा परिणाम आहे. मलेशिआतील हिंदी लोकांना मात्र बाहेरच्या राजकारण्यांचा हस्तक्षेप स्वागतार्ह वाटत नाही. कारण, त्यामुळे मलेशिआविषयीच्या त्यांच्या निष्ठेविषयी तद्देशीयांच्या मनात शंका उत्पन्न होतात. फिजी बेटांच्या समुहातील लोकसंख्येत हिंदी लोक बहुसंख्य असून ते तेथे कायमचे स्थायिक झालेले आहेत. तथापि त्यांची स्थितीही मोठीशी चांगली नाही. मग कीनिया अगर युगांडासारख्या आफ्रिकेमधील देशांतील हिंदी लोकांची अवस्था अधिक चांगली असेल असे मानण्याचे कारणच नाही. एका मागून एका देशातील हिंदी लोकांचा प्रश्न बिकट होत चालला आहे. परदेशांतील हिंदी लोकांना अनेक प्रकारच्या भेदभावाच्या वागणुकीला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे अडचणीची परिस्थिती उद्भवत असून भारत व संबंधित देश ह्यांच्यातील संबंध बिघडत जाण्याचा संभव आहे. खुद्द भारत वाढती लोकसंख्या आणि अन्नाचे दुर्भिक्ष ह्यांच्या कात्रीत सापडला असतानाच परदेशांत गेलेल्या हिंदी लोकांना भारतात परत यावे लागत आहे. त्यामुळे भारताच्या अडचणीत आणखीच भर पडणार आहे.

---

### भारताची लोकसंख्या सांगितली जाते त्यापेक्षा जास्त आहे!

भारताची लोकसंख्या आता ५० कोटी असल्याचे अधिकृतरीत्या सांगितले जाते; वास्तविक ती ५५·५ कोटी भरेल असे मत पॉप्युलेशन क्रायसिस कमिटीचे नॅशनल चेअरमन, जनरल विल्यम एच. ड्रेपर ह्यांनी व्यक्त केले आहे. हिंदी आणि अमेरिकन शिरगणती तज्ज्ञांशी विचारविनिमय केल्यानंतर झालेले त्यांचे हे मत आहे. भारताची लोकसंख्या दरसाल २·५% गतीने वाढत आहे असे म्हटले जाते; खरोखर वाढीची गती ३% आहे. "जननाचे प्रमाण निम्म्याने तरी कमी व्हायला हवे; भारताची ही समस्या जगाची महाभयंकर समस्या झालेली आहे" असेही ते म्हणाले.

भारताच्या लोकसंख्येच्या खऱ्या आकड्याचे महत्त्व असे की चालू वर्षी धान्याचे उत्पादन ९·५ कोटी टन झाले, तरी भारताला मोठ्या प्रमाणावर धान्याची आयात करावी लागेल. मित्र-देशांच्या मदतीने भारतीयांची उपासमार तेवढ्यापुरती टळेलही; पण अतिशय कडक उपाय योजल्याखेरीज प्रश्न सुटणार नाही. कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम एका स्वतंत्र संघटनेकडे सोपविण्यात यावा, म्हणजे त्याला कार्यक्षमतेने कार्य करता येईल आणि संघटनेला सरकारने भरपूर द्रव्य-साहाय्य करावे, असे जनरल ड्रेपर ह्यांनी सुचविले आहे. कुटुंबनियोजनाच्या सर्व उपलब्ध पद्धतींचा उपयोग करण्यात यावा; तरच दरमहाच्या १५ लाखांच्या वाढीस अटकाव करणे शक्य होईल.

नूतन वर्ष आमच्या सर्व ठेवीदारांना व हितचिंतकांना सुखाचे व समृद्धीचे जावो!

*सहकार तत्त्वप्रणाली अनुसरून*

शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे, औद्योगिक क्षेत्रांत प्रगती करणे आणि त्यायोगे समाजवादी समाजरचनेच्या मार्गावर यशस्वी वाटचाल करणे, हे आमचे ध्येय आहे. या ध्येयाने प्रेरित होऊन मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात सहकारी चळवळीचा प्रसार करणारी एकमेव बँक

**नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.**

*मुख्य कार्यालय–स्टेशन रोड, नांदेड*

जिल्ह्यात एकूण ३१ शाखा

चेअरमन : श्री. शामराव कदम

३० जून १९६७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भागभांडवल | रु. | १,००,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ८३,४८,१५० |
| गंगाजळी | रु. | ११ ४२,७६२ |
| ठेवी | रु. | ३,०७,६१,८६४ |
| कर्जे ( बँकेने घेतलेली ) | रु. | २,८९,८३,३३३ |
| गुंतवणूक | रु. | ७५,८८,२४२ |
| खेळते भांडवल | रु. | ७,७२,५०,३४६ |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बा. न. संत, मॅनेजर

आपल्या बँकेचे बोधचिन्ह

उत्कर्ष, संचय आणि सुरक्षा यांचे प्रतिक

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

सारस्वत बँकगृह, मुंबई ४

खेळते भांडवल रु. ५॥ कोटींचेवर

## कर्ज वसुलीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे

( ना. वसंतराव नाईक ह्यांचे सहकारी चळवळीला आवाहन )

" देशातील गरीबी दूर करण्याचे सहकार हे अतिशय प्रभावी शस्त्र आहे– तो एक अ‍ॅटम बॉम्ब आहे, व या लढाईत शेतकरी हे बिनीचे सेनापती आहेत. देश स्वावलंबी व स्वयंपूर्ण होण्यासाठी देशातील शेती सुधारली पाहिजे. देशासमोरचे मोठे कार्य उत्पादनाचे आहे. उत्पादित मालाची, प्रक्रिया केलेल्या मालाची विक्री करण्याचे कार्य फारच महत्त्वाचे आहे. या सर्व क्रिया आणि प्रक्रिया एकमेकांत गुंतलेल्या आहेत. ऊस कमी पिकला की साखर कमी होते. साखर कमी झाली की गुळाचे भाव वाढतात. थोडक्यात, शेती उत्पादन कमी झाले की लगेच त्याचे सर्वत्र दूरगामी परिणाम होतात.

येत्या चार महिन्यांच्या काळात प्रचाराचा धूमधडाका उडवून वसुलीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. वसुलीवरच वाढीव भांडवल पुरवठा आणि संस्थांची प्रगती व अधिक भांडवल निर्मिती अवलंबून आहे. सर्व कार्यकर्त्यांनी येत्या ४ महिन्यांचा काळ हा चातुर्मासासारखा धार्मिक भावनेने पाळला पाहिजे व कर्जाची व धान्याची वसुली केली पाहिजे. संकरित पीक उत्पादनाचा कार्यक्रम ५०% विफल झाला त्याला कारण काही असेल तर ५०% वर कर्ज मागणी करणारे सभासद स्वतः थकबाकीदार ( डिफॉल्टर ) होते.

सहकारी चळवळ अजूनही सामान्य माणसापर्यंत पोहोचली नाही. सामान्य माणसाला आस्था वाटावी असे वातावरण निर्माण केले पाहिजे. प्रत्यक्षात खरे गरजू लोक मागे राहतात व संधिसाधू पुढे घुसतात. अशा संधिसाधूंपासून संस्थांना–चळवळीला वाचविले पाहिजे. चांगल्या लोकांची निवड केली पाहिजे. अतिरिक्त विचार संस्थेत आला की सहकाराला बगल मिळते, कोर्टकचेऱ्या होतात, संस्थेचे अनहित होते, चळवळ बदनाम होते. हे टाळले पाहिजे. "

---

### महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे नवे अध्यक्ष

#### संस्था मतदार संघांतून प्रथमच निवड

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या नव्याने निवडून आलेल्या संचालक मंडळाची सभा मंगळवार दि. १० ऑक्टोबर रोजी भरून तीत नव्या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून श्री. वसंतराव दादा पाटील यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी आमदार श्री. मामासाहेब मोहोळ हे निवडून आले.

श्री. वसंतराव दादांच्या निवडीने बँकेच्या ५६ वर्षांच्या इतिहासात नवीन पान उघडले आहे. गेली ५६ वर्षे बँकेचे अध्यक्ष व्यक्ति मतदार संघातून निवडून येत असत. ५७ व्या वर्षात श्री. वसंतराव दादा हे प्रथमच संस्था मतदार संघातून अध्यक्षपदावर निवडून येत आहेत.

### अमृतसरपासून थोड्याच मैलांवरील चोरटा व्यापार

अमृतसरपासून काही मैलांवरील हिंद-पाकिस्तान सरहद्दीवरून चोरटी आयात-निर्यात सतत चालू असते. फाळणीनंतरच्या लागलीचच्या काळात कापड आणि हिंदी चलन ह्यांची चोरून निर्गत केली जाई. रुपयाच्या अवमूल्यनानंतर हिंदी चलनाची निर्गत बंद झाली आहे. अरब देशांतून येणारे सोनेही आता पूर्वीइतके येत नाही. चीनमधून येणारी अफू सध्या मोठ्या प्रमाणावर चोरून आयात केली जाते. स्विस घड्याळेही आणली जातात. अमृतसरमधील ७० ते ८० मोटरगाड्या ह्या चोरट्या व्यापारात भाग घेत असाव्यात, असा अंदाज आहे.

---

### साक्षरतेचे प्रमाण वाढले; निरक्षरही अधिक झाले

भारतामधील साक्षरांचे प्रमाण वाढले असले, तरी निरक्षरांची संख्याही वाढली आहे, असे नियोजन मंडळाने म्हटले आहे. १९६५–६६ मध्ये साक्षरांचे प्रमाण २९% होते, ते १९७१ मध्ये ३४·२% होईल. पण त्या सुमारास लोकसंख्या ५५·९ कोटी झालेली असेल आणि निरक्षरांची संख्या ३६·८ कोटी झालेली असेल. १९६५–६६ मध्ये ३५·३ कोटी लोक निरक्षर होते. १९६१–७१ ह्या दहा वर्षांतील प्रगती पाहिली, तर साक्षरतेचे प्रमाण २४% चे ३४·२% एवढे वाढूनही निरक्षरांची संख्या २·७ कोटींनी वाढलेली असेल.


शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र राय यांनी सर्टिफिकेट दिलेले
रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीसाठी

**चमन**

चिमूटभर तोंडांत टाकताच मुख सुगंधमय होते.

बाटली किंमत रु. १·२५

*याचे सेवनाने तहान भागून आवाज खुलतो; करिता वक्ते, गवई, नटनटी, वगैरे लोकांना अत्यंत उपयोगी आहे. चमन तोंडात टाकताच लाळेबरोबर मिश्र होऊन श्वास सुगंधित होतो. लहान-थोरांस, तसेच गरोदर स्त्रियांनाही उपयुक्त.*

इंग्लिश औषधे आणि अत्तरे बनविणार

**स्टार कंपनी, बेळगांव**

१. भारतीय सहकारी साखर कारखानदारीच्या उज्ज्वल यशाचे प्रतीक.
२. सांगली जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा मानबिंदू.
३. अर्थप्रधान शेती विकासातील स्फूर्तिस्थान.
४. शेतकरी–कामगार–जवान यांच्या कल्याणकारी जीवनाचे आशास्थान.
५. दक्षिण महाराष्ट्रांतील वाढत्या औद्योगिक वैभवाचे केंद्रस्थान.
६. सहकारी उद्योगधंद्यांना महामंत्र देणारी ध्येयवादी संस्था

म्हणजेच

**शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली**

जिल्हा सांगली – महाराष्ट्र राज्य

**खास वैशिष्टये**

१. विस्तार योजनेतून प्रतिदिनी २,६०० मे. टन ऊस गाळित करण्याची क्षमता.
२. मळीपासून ३,५०० गॅलन स्पिरिटचे उत्पादन व ऑक्टोबर ६७ पासून मद्यनिर्मितीच्या क्षेत्रात पदार्पण.
३. भारतातील पहिल्या भव्य सहकारी कागद कारखान्याचे प्रवर्तक.
४. पाणीपुरवठा योजनाद्वारे २४ हजार एकर जमिनीला अखंडित पाणी देणारी शेती संजीवनी योजना.
५. दहा हजार एकर कमर्शिअल हायब्रिड ज्वारी उत्पादन योजनेद्वारे अन्नधान्योत्पादनाच्या प्रयत्नांत अखिल भारतात अग्रेसर. कृषी औद्योगिक समाजरचनेच्या उभारणीसाठी अविरत वाटचाल करीत आहे.

आ. र. उपाध्याय, मॅनेजिंग डायरेक्टर.
दिनकरराव हिंदुराव पाटील, व्हाइस चेअरमन.
पद्मभूषण वसंतराव पाटील, चेअरमन.






# चितळे बंधू


## -मिठाईवाले-

श्रीखंड, बासुंदी, पेढे, बर्फी, गुलाबजाम व जिलेबी
मेवा-मिठाई व लोणी चक्क्यासाठी सुप्रसिद्ध.

कुंटे चौक, पुणे २.
बाजीराव रोड, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, पुणे २,
डेक्कन जिमखाना, पुणे ४.


BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS




नयनरम्य
## आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रदर्शनाला
सहकुटुंब सहपरिवार भेट द्या।
क्रॉस मैदान, मुंबई

नवीन माल : : : : : योग्य किंमत

★ जरीची लुगडी, ★ फॅन्सी साड्या, ★ सुंदर बनारसी शालू

व

-- सर्व मिलचा माल --

याकरिता

# शाहाडे आठवले प्रा. लि., दादर

(टे. नं. ४५४५५४) मुंबई २८.

विजय शाहाडे, मॅनेजिंग डायरेक्टर.

### आखूड स्कर्टचा अभिनव उपयोग


प्रेक्षकांच्या दंगेखोरपणावर बर्मिंगहॅम सिटी फुटबॉल क्लबाने एक अभिनव उपाययोजना केली आहे. त्या क्लबाने १२ तरुणींची नेमणूक करून त्यांच्याकडे खेळाच्या मध्यंतरात आखूड स्कर्ट घालून मैदानाभोवती चकरा घालण्याचे काम दिले आहे. प्रेक्षकांना कंटाळा आला, म्हणजे करमणूक म्हणून ते दगडफेक करतात, अशी क्लबच्या अधिकाऱ्यांची कल्पना आहे. आपल्या आखूड स्कर्टने चित्त वेधून घेणाऱ्या पोरींकडे त्यांना पहात राहू द्या; त्यांचे मन त्यात रमून दंगे होणारच नाहीत, अशी क्लब अधिकाऱ्यांची अपेक्षा आहे.

### अवर्षणामुळे प्रचंड नुकसान

गेल्या दोन वर्षांत अवर्षणामुळे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे ५,००० कोटी रुपये नुकसान झाले, असा अंदाज फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष, श्री. मोदी, ह्यांनी व्यक्त केला आहे.

### प्लॅस्टिकच्या वस्तूंचे अभिनव प्रदर्शन

जर्मनीमधील डुसेलडॉर्फ ह्या शहरी प्लॅस्टिकच्या वस्तूंचे एक अभिनव प्रदर्शन भरविण्यात आले आहे. ह्या प्रदर्शनात प्लॅस्टिकच्या अनेक प्रकारच्या वस्तू मांडण्यात आल्या आहेत. प्लॅस्टिकचे किती अनेक उपयोग होऊ शकतात हे प्रदर्शनात स्पष्टपणे दिसून येते. ह्या वस्तूंत प्लॅस्टिकची एक मोटर गाडीच ठेवण्यात आली आहे. मोटरगाडीचे एंजिन, गिअर-बॉक्स आणि चाकेच काय ती धातूची बनविलेली आहेत. प्लॅस्टिकपासून बनविण्यात आलेली तेलाची टाकीही ठेवण्यात आली आहे. तिचे वजन नेहमीच्या टाकीपेक्षा दोन तृतीयांशाने कमी आहे. टाकी गंजत नाही; आग लागल्यास तिचा स्फोट होत नाही. प्लॅस्टिकच्या वस्तू वजनात हलक्या असल्यामुळे आणि गरजेप्रमाणे वळकट करता येत असल्यामुळे त्या वस्तूंच्या औद्योगिक उपयोगाचे प्रमाण झपाट्याने वाढू लागले आहे.

पन्नास वर्षांपूर्वी, राष्ट्रनेते,
साहित्यसम्राट, श्री. न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर
यांनी ४ सप्टेंबर, १९१७ साली या बँकेचे बीजारोपण केले.
कै. तात्यासाहेबांसह कै. ल. ब. भोपटकर, कै. प्रा. वा. गो. काळे
व डॉ. धनंजयराव गाडगीळ
आदी समाजसेवक व अर्थशास्त्रज्ञांनी
आजवर आत्मीयतेने या बँकेचे संगोपन व संवर्धन करून
तिला प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्याने
त्या लहानशा बीजाचे आज एका विशाल वृक्षांत रूपांतर झाले असून
त्याच्या शाखांनी जिल्ह्यांतील सर्व परिसर व्यापला आहे.
इतकेच नव्हे तर ठेवी संचनालयाच्या बाबतीत
जिल्हा सहकारी बँकांत,
भारतांत ती एक अग्रेसर बँक आहे.
सहकारी समृद्ध संघराज्याचे, राष्ट्रनेत्यांचे स्वप्न साकार व्हावे
यासाठी सेवाभावनेने,
सहकाराची ज्योत सदैव सतेज तेवत ठेवण्यासाठी
प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन देतांना आनंद होत आहे.

ना. स. मोहोळ — अध्यक्ष
म. मो. देशमुख — कार्यकारी संचालक

सहकाराची ज्योत सदैव सतेज तेवो.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

भूविकासो हि राष्ट्रस्य जीवितोपाय उच्यते

स्थापना ९-३-१९६०
रजिस्टर नं. १४९१४८
टेलिफोन नं. ३३३
तार : भूविकास

जिल्ह्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बँकेची शाखा आहे. बँक आपल्या तेरा शाखांमार्फत शेतकरी बंधूंची दीर्घ मुदतीच्या कर्जाची गरज भागवीत आहे.

# दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि., अहमदनगर

*ता. ३०-६-१९६७ अखेरची स्थिती*

| | | |
|---|---|---|
| सभासद संख्या | | २५१८८ |
| अधिकृत भाग भांडवल | रु. | १००·०० लाख |
| वसूल भाग भांडवल | रु. | ४८·८० लाख |
| सभासदांकडील कर्जे | रु. | ४·१६ कोटी |
| खेळते भांडवल | रु. | ५·२७ कोटी |

मुख्य कचेरी :
भूविकास भवन, कोर्टगल्ली
अहमदनगर

शेती उत्पादन वाढवून
आपली भूमी सुजलाम्, सुफलाम्
करण्यास सिद्ध व्हा.

शांततेचा काळ असो वा आणीबाणीची युद्धजन्य परिस्थिती असो, अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे हाच राष्ट्रधर्म होय !

द. पं. भागवत
बी. कॉम्, एच. डी. सी.
मॅनेजर

बा. पं. मुकाळकर
व्हाइस चेअरमन

रामराव चव्हाण
एलएल. बी.
चेअरमन





हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचेमालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 86, Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३३ | पुणे, बुधवार १५ नोव्हेंबर, १९६७ | अंक २०





नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

**ठाकरसी फॅब्रिक्स्**

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड 'SANFORIZED'



THACKERSEY FABRICS

**ठाकरसी ग्रूप**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

TM-56 MR

## जयपूरमधील रत्नबाजाराला चांगले दिवस

हिंदच्या निर्यात व्यापारात चहा, ताग, कापड, इत्यादी वस्तूंना असलेले महत्त्व महशूर आहे. मधून मधून ह्या व्यापारात एखाद्या नव्या पदार्थाचाही उल्लेख करण्यात येतो. मानवी केसांची निर्यात हा असाच एक नवा पदार्थ आहे. परंपरागत निर्यातीच्या पदार्थांत रत्नांच्या निर्यातीचाही अंतर्भाव आहे. परंतु रत्नांची निर्यात ही फारशी प्रकाशात येत नाही. भारत सरकारच्या निर्यातवाढीस उत्तेजन देण्याच्या धोरणामुळे रत्नांच्या बाजारालाही अलीकडे भरभराटीचे दिवस लाभले आहेत. त्यामुळे रत्नबाजारात काम करणाऱ्या कसबी कामगारांची संख्या गेल्या १० वर्षांत दुपटीने वाढली आहे. राजस्थानातील जयपूर शहर जवाहर बाजारासाठी प्रसिद्ध आहे. रत्नांच्या जागतिक बाजारात जयपूरचे नांव सर्वांच्या मुखी झालेले आहे. रत्नबाजारासारख्या बाजारात रोजची उलाढाल किती होत असेल हे सांगणे अर्थातच कठीण आहे. परंतु ह्या धंद्यातील जाणकारांच्या मताने रोज ५ लाख रुपये किंमतीच्या मालाची उलाढाल होत असावी. स्वातंत्र्यपूर्व काळात रत्नबाजाराला सामान्यतः बरे दिवस लाभत असत. परंतु नंतर हिंदमधील संस्थाने संघराज्यात विलीन झाली आणि रत्नांचे राजेरजवाड्यांचे गिऱ्हाईक तुटले. त्यामुळे ह्या धंद्यातील व्यापाऱ्यांना व कामगारांना बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागले. सध्या जयपूरच्या रत्नबाजारात सुमारे १५ हजार कुशल कामगार काम करतात. त्याशिवाय सुमारे ५ हजार लोक रत्नांची विक्री करण्यात गुंतलेले आहेत. कामगारांत बहुसंख्य मुसलमान आहेत. बहुतेक कामगार खड्यावर संस्कार करण्याचे काम आपल्या घरीच करतात. त्यांच्यापैकी काहीजण दरमहा १५० रुपयांपर्यंत कमाई करतात, तर काहीजण १,००० रुपयांपर्यंतही मिळवितात.

## एक्स्पो प्रदर्शनातील भारताचे दालन

मॉंट्रिल येथे भरविण्यात आलेले एक्स्पो–६७ हे भव्य प्रदर्शन १८५ दिवस खुले ठेवण्यात आले होते. प्रदर्शनात भारताने आपले दालन खोलले होते. ह्या दालनाला सुमारे ५१ लाखांवर लोकांनी भेट दिली. प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या एकूण प्रेक्षकांपैकी १० टक्क्यांपेक्षा अधिक लोकांनी भारताच्या दालनाला भेट दिली. दालनामध्ये आणि त्याच्याजवळ असलेल्या महाराणी रेस्टॉरॉंमध्ये अनेक वस्तूंची विक्री करण्यात येत होती. विक्रीची रक्कम जवळजवळ १५ लाख डॉलर्स इतकी झाली. कच्चे रेशीम, साड्या, गळपट्टे आणि हस्तोद्योगाच्या वस्तू ह्यांना विशेष मागणी दिसून आली. त्याशिवाय हस्तिदंताच्या वस्तू, जडजवाहीर आणि निष्कलंक पोलादाच्या वस्तू ह्यांनाही चांगली गिऱ्हाइकी मिळाली.

Provisions of the Desai Bank Award—as modified by the Bipartite Settlement 1966 (including those which continue to remain in force) (Rs. 3·00 each)

Available from the compiler

B. R. Kembhavi
940/4 Shivaji Nagar,
Poona 16.



# ★ अर्थ ★

बुधवार, १५ नोव्हेंबर, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## औद्योगिक मंदी पुढील वर्षी हटण्याची चिन्हे

भारताच्या उद्योगधंद्यातील काही विभाग अलीकडे मंदीच्या चक्रात सापडले आहेत. अशा विभागातील परिस्थितीचा अभ्यास करून मध्यवर्ती सरकारच्या औद्योगिक विकास खात्याने असा कयास केला आहे की पुढील वर्षाच्या प्रारंभी उद्योगधंद्यातील ओहोटी हटू लागेल. शेतीच्या उत्पादनात सुधारणा झाल्यामुळे त्याचा परिणाम उद्योगधंद्यावर झाल्याशिवाय राहणार नाही ह्याचा अर्थ सर्वसाधारणपणे आर्थिक व्यवहारांची गति वाढेल इतकाच आहे; अर्थव्यवस्थेतील सर्व विभाग एकदम भरभराटीकडे झुकू लागतील असा नव्हे. उद्योगधंद्यातील सर्वच विभागांची चक्रे पुन्हा जोराने सुरू होण्यास अर्थातच अवधी लागणार आहे. आर्थिक घडामोडींचा वेग वाढविण्यासाठी नियोजनाच्या उद्दिष्टात स्वाभाविकच तात्पुरता फेरबदल करावा लागेल. ह्या बाबतीत सरकार दोन मुद्यांवर जोर देणार आहे. आतापर्यंत परदेशांतून आयात करण्यात येणाऱ्या मालाच्या जागी शक्य तितक्या अधिक प्रमाणात देशी माल वापरण्यावर कटाक्ष ठेवण्यात येईल आणि त्याचबरोबर औद्योगिक मालाच्या निर्यातीत अधिक विविधता आणण्याचे कसून प्रयत्न करण्यात येतील. १९६२–६३ आणि १९६४–६५ ह्या कालखंडात आर्थिक वाढीचा वेग दरसाल ८ टक्के होता. परंतु नंतर तो मंदावून १९६५–६६ मध्ये ५·५ टक्के इतका खाली आला. १९६६–६७ सालांत तर तो आणखी कमी होऊन २·८ टक्के इतका घरंगळला. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ह्या परिस्थितीत विशेष सुधारणा दिसून आली नाही. ज्या उद्योगधंद्यांत उत्पादन घटले ते पुढीलप्रमाणे आहेत:— पक्के पोलाद, बिडाचे लोखंड, तांबे, सुती कापड, साखर, वनस्पती आणि प्लायवुड. या उद्योगधंद्यांत चांगलीच मंदी आली.

उलट, काही उद्योगधंद्यांत उत्पादन वाढले पण वाढीचा वेग मात्र कमी झाला. अशा उद्योगधंद्यांत पुढीलांचा समावेश आहे. कोळसा, कच्चे लोखंड, काही यांत्रिक व विजेची यंत्रे, काही रासायनिक माल, सिगारेट्स, कातडे आणि पायतणे. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी जरूर असणारे उद्योगधंदे एकंदरीने बऱ्या स्थितीत राहिले. अर्थव्यवस्थेत उद्भवलेल्या मंदीच्या धारणेत तीन वेगवेगळ्या पण परस्परांशी संबंधित अशा प्रवृत्ती दिसून येतात. हिंदमध्ये दोन वर्षे लागोपाठ अवर्षण पडल्यामुळे लोकांच्या खरेदी शक्तीत बरीच घट झाली. परिणामी मागणी खूपच कमी झाली. काही विशिष्ट प्रकारच्या भांडवली मालाची मागणी कमी झाली. कारण, उद्योगधंद्यात पैसा गुंतविण्याचे प्रमाण घसरले होते. सार्वजनिक व खाजगी मालकीच्या अशा दोन्ही विभागांत अनेक कारणांनी कमी प्रमाणावर नव्या भांडवलाची गुंतवणूक करण्यात आली. ह्यावर काही प्रकारचे उपाय योजण्यात आले आहेत. भांडवली मालाची विक्री व्हावी म्हणून उद्योगधंद्यांना कर्ज मिळण्यासाठी जादा सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. अशा सवलती निर्यात मालासाठी आणि अंतर्गत बाजारपेठेसाठी देण्यात येत आहेत. कापड व साखर अशा सारख्या काही उद्योगधंद्यांत आधुनिकीकरणाला बराच वाव असून ते घडवून आणणे शक्यही आहे. ह्या धंद्यांची यंत्रसामग्री व इतर उपकरणे आता देशातच तयार होऊ लागली आहेत. त्यामुळे त्यांची पुनर्घटना संपूर्णपणे देशी सामग्रीने होईल.

## प्रचलित मंदीच्या कारणाचे संशोधन

इकॉनॉमिक अँड सायंटिफिक रिसर्च फौंडेशन ह्या संघटनेने भारतामधील सध्याच्या आर्थिक मंदीविषयी संशोधन करून असा निष्कर्ष काढला आहे की, मध्यवर्ती सरकारने चलनवृद्धीचे जे धोरण स्वीकारले त्याचाच हा मुख्यतः परिणाम आहे. 'मंदी आणि नंतर' ह्या शीर्षकाच्या एका प्रबंधात वरील निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. प्रबंधात असे म्हटले आहे की, अर्थशास्त्राच्या तत्त्वाप्रमाणे शेतीच्या उत्पादनात एकदम बरीच घट झाली तर व्यवहारात फिरणाऱ्या पैशाचे प्रमाण घटले पाहिजे. पण प्रत्यक्ष मात्र तसे झालेले नाही. सरकारने फिरत्या पैशाचे प्रमाण कमी केलेले नसून त्याच्या अभिसरणाचा वेग काहीसा कमी केला आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, उत्पादनाची बिगरशेतीची आघाडी एक प्रकारच्या कात्रीत सापडली आहे. एका बाजूला ह्या विभागाला लागणारा पैसा अपुरा पडत आहे आणि दुसऱ्या बाजूला किंमती मात्र झपाट्याने वाढत चाललेल्या आहेत. एकूण मागणीच्या मानाने किंमती ह्या नेहमीच अधिक वेगाने वाढत असतात, हे लक्षांत घेतले तर ह्या कोंडींतून फुटण्याचा एकच मार्ग उपलब्ध दिसून येतो, आणि तो म्हणजे बिगर शेती विभागांतील उत्पादनात एकाएकी खूप घट करणे अगर होणे. सध्या हीच परिस्थिती उद्भवली आहे. व्यवहारात असलेल्या चलनाचे प्रमाण कमी करण्याचे धोरण स्वीकारल्याशिवाय परिस्थितीत सुधारणा होणार नाही. म्हणून पैशाच्या पुरवठ्यावर घट्ट मूठ ठेवण्याचे दीर्घकालीन धोरण सरकारने ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे नियोजन मागणी लक्षात घेऊन न करता उत्पादनाला उत्तेजन मिळेल असे केले पाहिजे.

## जागतिक स्त्री-स्पर्धक स्त्रीत्वाच्या तपासणीत नापास

स्त्रियांच्या १०० मीटर्सच्या पळण्याचे जागतिक रेकॉर्ड धारण करणारी पोलंडची इवा क्लोबुकोवास्का, हिला आगामी युरोपियन ॲथलेटिक्स कपाच्या शर्यतीत भाग घेण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे; डॉक्टरी तपासणीत तिचे स्त्रीत्व सिद्ध होऊ शकले नाही. सर्वच स्त्री-स्पर्धकांची सहा डॉक्टरांनी ( तीन रशियन आणि तीन हंगेरियन ) तपासणी केली. अशी तपासणी गेल्या वर्षापासून अमलात आहे; त्यात नापास होणारी ही पहिलीच स्त्री-स्पर्धक आहे. काही स्त्री-स्पर्धकांचे स्त्रीत्व संशयास्पद असल्याची शंका आल्यामुळे, गेल्या वर्षी अशी तपासणी सुरू करण्यात आली, तेव्हा बुडापेस्ट येथील स्पर्धेचे वेळी तीन रशियन स्त्री-स्पर्धक डॉक्टरी तपासणीस आल्याच नाहीत आणि त्यामुळे त्या स्पर्धेत भागही घेऊ शकल्या नाहीत.

इवा क्लोबुकोवास्काच्या शरीरात स्त्रियांत असणाऱ्या क्रोमोसोम्सपेक्षा एक क्रोमोसोम अधिक आढळला, त्यामुळे स्पर्धेच्या संदर्भात तिला स्त्री म्हणता येत नाही, असा डॉक्टरांच्या बोर्डाचा अभिप्राय पडला. शारीरिक गुणधर्मावरूनच केवळ हे तपासणी-बोर्ड कुणालाही पुरुष किंवा स्त्री ठरवीत नाहीत; प्रत्येकाच्या त्वचेचा छेद घेऊन तो सूक्ष्मदर्शक भिंगाखाली पाहून पेशीतील क्रोमोसोम्स (अनुवंशकतेचे धारक ) मोजले जातात. ठरवून दिलेले क्रोमोसोम्स आढळले नाहीत, तर स्पर्धकाला स्पर्धेतून काढून टाकण्यात येते. इवा क्लोबुकोवास्का स्पर्धेत भाग घेणार नाही असे जाहीर करण्यात आले; पण त्याचे कारण सांगण्यात आले नाही. " बरीच वर्षे ह्या पोलिश मुलीबद्दल कुरबूर ऐकू येत होती " असे लंडनच्या ईव्हिनिंग न्यूजने म्हटले आहे. "पुरुषाची किंवा स्त्रीची वैशिष्ट्यपूर्ण लक्षणे ज्या अर्भकांत आढळत नाहीत, अशांची मुलींत गणना केली जाते आणि त्याप्रमाणेच त्या वाढतात" असे ह्यावर डॉ. क्रिस्ताइन पिकर्ड ह्यांनी भाष्य केले आहे. क्रोमोसोम्सच्या जोड्यांपैकी एका जोडीत स्त्री-पुरुषांतील फरक स्पष्टपणे दिसून येतो.

---

### गुळाच्या तारणावरील कर्जावर नियंत्रण

गेल्या काही महिन्यात गुळाच्या किमती भरमसाठ वाढल्या आहेत तेव्हा गुळाचा साठा करून ठेवण्यास प्रोत्साहन मिळू नये ह्यासाठी रिझर्व्ह बँकेने गुळाच्या तारणावर व्यापारी शेड्युल्ड बँकांनी द्यावयाच्या कर्जावर बंधने घातली आहेत. तारण दिलेल्या गुळाच्या किमतीच्या ५०% पेक्षा जास्त कर्ज देता येणार नाही. १९६६-६७ च्या नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये गुळाच्या तारणावर जेवढे एकून कर्ज दिलेले होते त्याच्या ७०% पेक्षा जास्त कर्ज १९६७-६८ च्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये दिलेले असता कामा नये. गूळ परठिकाणी पाठविणारांनी काढलेल्या हुंड्यांवर कर्ज देण्यास हरकत नाही.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३२३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.
: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६५,९६,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

### हिंदूंच्या अध्यात्मशास्त्राचा अमेरिकेत वाढता प्रभाव

हिंदू धर्माच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा प्रभाव सध्या अमेरिकेत झपाट्याने वाढत चालला आहे. न्यूयॉर्कमध्ये तर ह्या तत्त्वज्ञानाची लोकप्रियता विशेष दिसून येते. न्यूयॉर्कमधील हिंदी वकिलातीच्या कचेरीत अनेक अमेरिकन नागरिकांचे फोन नेहमीच येत असतात. त्यातील बहुतेकांना योगशास्त्राचे धडे घेण्याची तीव्र इच्छा असते अगर हिंदूंच्या आध्यात्मिक केंद्राची माहिती तरी हवी असते. अमेरिकेमधील जीवनाची गती अनेक अमेरिकन लोकांना असह्य होऊ लागलेली आहे. जीवनातील आनंद आणि शांती लुप्त झाल्यामुळे त्यांचा शोध घेण्यासाठी त्यांची घडपड चालू असते. अशा लोकांत उद्योगधंद्यांतील यशस्वी अधिकारी, वकील, डॉक्टर्स, प्राध्यापक ह्यासारख्या बुद्धिमानांचाही मोठा भरणा आहे. जीवनातील शांती गमावून बसलेले हे लोक समाधानाचे हरपलेले श्रेय मिळविण्यासाठी हिंदू स्वामींकडे धाव घेत आहेत. स्वामी सच्चिदानंद नावाचे दक्षिण भारतामधील एक स्वामी सध्या न्यूयॉर्कमध्ये बरेच प्रसिद्धी पावले आहेत. हे स्वामी ५४ वर्षांचे आहेत. गेल्या मे महिन्यातच ते अमेरिकेत आले आणि त्यांनी योग शास्त्राचा प्रसार करण्यास प्रारंभ केला. दर आठवड्याला ते १३ वर्ग शिकवितात. प्रत्येक वर्गात २५ ते ४० विद्यार्थ्यांचा समावेश असतो. स्वामीजी विद्यार्थ्यांकडून फी घेत नाहीत. पण आर्थिक देणग्या मात्र स्वीकारतात. स्वामींना राहण्याच्या जागेसाठी ४५० डॉलर्स द्यावे लागतात. ही रक्कम स्वामी मिळालेल्या देणग्यांतून देतात. काही अमेरिकन स्त्रिया स्वामींच्या अनुयायी झाल्या असून त्यांच्या कामात त्यांना मदत करीत असतात. अमेरिकन जीवनाविषयी बोलताना स्वामी म्हणतात की अमेरिकन लोकांना शांती आणि आनंद हवा आहे. त्यांच्या सध्याच्या जीवनात त्यांना त्यांची प्राप्ती होत नाही. सुखसाधने आणि औषधे ह्यांनी त्यांना आनंद मिळत नाही. म्हणून ते योगाकडे वळतात आणि त्यामुळे त्यांना काही विपरीत परिणाम न होता शांतीची प्राप्ती होते.

अमेरिकेत हिंदूंच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारी अनेक केंद्रे आहेत. स्वामी निखिलानंद नावाच्या एका स्वामींनी असेच एक केंद्र चालविले आहे. सध्या निखिलानंदांचे वय ७३ वर्षांचे असून अमेरिकेतील हिंदू स्वामींत ते प्रमुख म्हणून गणले जातात. न्यूयॉर्क शहरात गेली ३६ वर्षे ते वास्तव्य करीत आहेत. तेथील रामकृष्ण विवेकानंद केंद्राचे काम तेच पाहात असतात. न्यूयॉर्क शहरात हिंदूंच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारी ९ केंद्रे आहेत. त्याशिवाय अमेरिकेत इतरत्र पसरलेल्या अशा केंद्रांची संख्या वेगळीच आहे. वॉशिंग्टन शहरातही हिंदूंचे एक मंदीर आहे. सध्या भारतीय संगीताची अमेरिकेतील लोकप्रियता वाढीस लागलेली आहे. भारतामधील अव्वल दर्जाचे सतारिए मधून मधून अमेरिकेच्या दौऱ्यावर जातात. त्यांच्या अप्रतिम वादनकौशल्याने हिंदी संगीत लोकप्रिय होण्यास फार मदत झालेली आहे. हिन्दी संगीताच्या ह्या लोकप्रियतेचा फायदा हिंदूंच्या तत्त्वज्ञानासही चांगलाच मिळत आहे. ज्या अमेरिकन लोकांनी हिंदू तत्त्वज्ञानाची कास धरली आहे त्यांचा अनुभव असा आहे की ह्या तत्त्वज्ञानामुळे मानसिक स्वास्थ्याची प्राप्ती होते. हिंदू तत्त्वज्ञानाच्या प्रभावाने आकर्षित झालेले काही सिनेमानटही अमेरिकेत आहेत. त्यांच्यापैकी काहीजण भारताच्या दोन महिन्यांच्या दौऱ्यावर येणार आहेत. हिमालयातील एखाद्या आश्रमात राहून स्वर्ग-प्राप्तीचा एखादा झटपट मार्ग सापडतो की काय ह्याच्या शोधात ते आहेत.

---

### सायबेरिआचा औद्योगिक युगात प्रवेश

रशियातील सायबेरियाचा प्रदेश परवापरवापर्यंत म्हणजे १९५५ पर्यंत औद्योगिकदृष्ट्या अत्यंत मागासलेला होता. त्यापूर्वी तर राजकीय विरोधकांना आणि गुन्हेगारांना हद्दपार करण्याचे ठिकाण म्हणून त्याची प्रसिद्धी होती. १९५५ पासून मात्र हे चित्र पालटू लागले. त्या साली पूर्व सायबेरियातील तैगा भागाचा औद्योगिक विकास कितपत शक्य आहे ह्यासंबंधी पहाणी सुरू झाली. आता सायबेरिया औद्योगिक युगातील आवाजांनी भरून जाऊ लागला आसे. अवघ्या १२ वर्षांच्या अवधीत करण्यात आलेली हि प्रगती आश्चर्यकारक आहे. ह्या भागात बॅटस् जलविद्युत् केंद्र बांधण्यात आले आहे. १९६५ साली ह्या विद्युत्केंद्रात ३६ लाख किलोवॅट विजेची निर्मिती करण्यात आली. असेच एक दुसरे विद्युत्केंद्र अंगारा नदीवर बांधण्यात येत आहे. भू-भाग विस्ताराने एवढा मोठा आहे की त्यात अमेरिका आणि ब्रिटन सहज माऊ शकतील. शिवाय तेथे खनिज संपत्तीही विपुल प्रमाणात आढळून आली आहे. खनिज तेल आणि ज्वालाग्राही वायू ह्यांचे मोठे साठे तर तेथे सापडलेच आहेत; पण त्याशिवाय कोळसा, तांबे, जस्त, शिसे आणि इतरही अनेक प्रकारची खनिजे आढळून आली आहेत. ह्या खनिज संपत्तीचा उपयोग करून घेण्यासाठी आवश्यक असलेली वीज उपलब्ध झाल्यामुळे ह्या भागाचा कायापालट अतिशय त्वरेने घडून येत आहे. प्लॅटिनम आणि सोने ह्यासारखी खनिजेही तेथे सापडतात. दक्षिण आफ्रिका सोडली तर ह्या भागात सापडणारे हिरे संख्येने पहिल्या क्रमांकात पडतील. रशियाचा हा एक फार मोठा औद्योगिक तळच बनला आहे.

---

### पूर्व जर्मनीत ५ दिवसांचा कामाचा आठवडा

पूर्व जर्मनीत २९ ऑगस्टपासून पाच दिवसांचा कामाचा आठवडा सुरू झाला. सुमारे ७० लक्ष कामगारांना त्याचा फायदा मिळेल.

**सौराष्ट्रात अल्युमिनमचा कारखाना**—सौराष्ट्रात एक अल्युमिनमचा कारखाना काढण्यात यावयाचा आहे. कारखान्या साठी लागणारे खनिज कच्छमधून मिळण्यासारखे आहे. त्याच्या संपूर्ण उभारणीसाठी ६० कोटी रुपये खर्च येणार आहे. प्रारंभी दरसाल ५० हजार टन अल्युमिनमः उत्पादन करण्यात येईल. कारखान्यासाठी लागणारी स्वस्त वीज गुजरात राज्य वीजमंडळ पुरविणार आहे.

**योगशास्त्राचे परदेशी भक्त**—गोंदिआ येथे भरविण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय योगपरिषदेस काही परदेशी भक्तही आले होते. त्यांतील एका झेकोस्लोव्हाकिअन योगभक्ताने 'श्रीराम जयराम जयजय राम' ह्या भजनात प्रामुख्याने भाग घेतला. साथीसाठी त्याने स्वतःच्या 'गिटार' वाद्याचा उपयोग केला. त्याच्याशिवाय अमेरिकन उद्योगपतीच्या एका मुलीने व जपानमधील एका महिलेनेही परिषदेत भाग घेतला.


**नेपोलिअनने वापरलेली खुर्ची**— १८१२ साली नेपोलिअन बोनापार्टने रशिआवर स्वारी केली. त्यावेळी त्याचा मुक्काम काही थोडे दिवस मॉस्कोमधील एका सरदाराच्या वाड्यात होता. तेथे असताना त्याने वापरलेली एक आरामखुर्ची अलीकडे उघडकीस आली आहे. ह्याच घरात त्याने वापरलेल्या इतर वस्तूही सापडल्या आहेत. आता त्यांची रवानगी पदार्थ संग्रहालयात करण्यात आली आहे.

**कुमार्गाला लागलेली ब्रह्मी मुले**— भारताप्रमाणेच ब्रह्मदेशातही कुमार्गाला लागलेल्या बेवारशी मुलांचा प्रश्न अवघड होऊन बसला आहे. ब्रह्मदेशातील विद्यार्थ्यांत बेशिस्तीची लागण बरीच झालेली आहे. त्यापैकी काहीजण तर सरकारविरुद्ध बंड करणाऱ्या जंगलातील बंडवाल्यांना जाऊन मिळाले आहेत. अशा मुलांना योग्य वातावरणात शिक्षण देऊन जबाबदार नागरिक बनविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

**अंतरिक्ष प्रवासाची तयारी**— अंतरिक्ष प्रवासाची तयारी करणाऱ्या दोन रशिअन युवकांना दोन महिने स्वतःच्या पाठीवर पडून राहावे लागले. त्याच्या प्रशिक्षणात वजनरहित अवस्थेचा अनुभव घेण्यासाठी असे करणे आवश्यक होते. प्रशिक्षण संपल्यानंतर त्यांना पायावर उभे राहाणे अगर बसणे अशक्य झाले. दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळी त्यांना बसता येऊ लागले. तिसऱ्या एका युवकाला तीन आठवड्या नंतर स्थळकाळ कळेनासे झाले. मग त्यांचे प्रशिक्षण थांबविण्यात आले.

**पाकिस्तान-चीन करार**—पाकिस्तान आणि चीन ह्यांच्या दरम्यान एक नवा व्यापारी करार करण्यात आला आहे. उभयता देशांतील व्यापाराची वृद्धी व्हावी असा त्याचा हेतू आहे. करारास अनुसरून चीन पाकिस्तानकडून अधिक प्रमाणावर कच्च्या मालाची आयात करणार आहे. चीन पूर्व पाकिस्तानला पुढील वर्षी १॥ लाख टन सिमेंट पुरविणार आहे.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपलड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)



द. सा. द. शे. रुपये
७.६२/–
पर्यंत व्याज आपण मिळवू शकता
ठेवीची मुदत मोठी म्हणजे
व्याज मोठे
एकतीस वर्षांची तपश्चर्या सांगते
इथे ठेवींना पूर्ण संरक्षण मिळते.

दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.

मुख्य कचेरी :—सातारा
२९ शाखा

## औद्योगिक अणि व्यवस्थापकीय सल्ला व मार्गदर्शन ह्यांची सोय

### किर्लोस्कर कन्सल्टंटस् लिमिटेड, पुणे

कंपनीचे प्रमुख विभाग तीन: मार्केट सर्व्हे व फीजिबिलिटी स्टडी डिव्हिजन, मॅनेजमेंट डिव्हिजन आणि टेक्निकल डिव्हिजन. फीजिबिलिटी स्टडीज, मार्केट सर्व्हेज, प्रॉजेक्ट रिपोर्टस, मशीन लेआऊट, इंडस्ट्रिअल इंजिनियरिंग, ऑर्गनायझेशन्स स्टडीज, इन्व्हेंटरी कंट्रोल, फिनान्शिअल प्रोजेक्शन, बजेटरी कंट्रोल, याबाबतचा सल्ला कंपनीमार्फत देण्यात येत आहे. मूलतः कंपनीकडे आलेल्या प्रश्नांचा कामकाजाच्या सर्व शाखांचा विचार करून शिस्तबद्ध आराखडा तयार करण्यात येतो आणि हाती घेतलेले प्रत्येक काम निष्णात तज्ज्ञांच्या गटाकडे सोपविले जाते.

महत्त्वाचे असे कार्य म्हणजे लॅबोरेटरीची योजना, खनिज रसायने इ. ची तपासणी, नमुने व पृथःकरण वगैरे कामे हाती घेण्याचे कंपनीने योजिले आहे. त्यासाठी एक संशोधनशाळा स्थापन करण्याचे ठरविले आहे. जपानमधील एका सुप्रसिद्ध व्यवसायिकांच्या सहकार्याने जरूर ती साधनसामग्री व सेवकांना जरूर ते शिक्षण यांची सोय करण्यात आली; जानेवारी १९६८ मध्ये या प्रयोगशाळेतील कामास सुरुवात होईल अशी आशा आहे.

गेल्या वर्षातील कामकाज समाधानकारक आहेच. शिवाय नजीकचा भविष्यकाळही आशादायक असल्याचे मी खात्रीपूर्वक म्हणू शकतो. आपल्याला विशेष समाधान वाटेल अशी घटना म्हणजे झांबिया, सीलोन, इराण व जपानसारख्या परदेशांतही आपल्याला मार्केट सर्व्हेची कामे मिळालेली आहेत. व्यावसायिक सल्ला देण्याच्या क्षेत्रात आपण केवढे नाव मिळविले आहे त्याचे हे निदर्शक आहे असे म्हणण्यास काहीच हरकत नाही.

खालील दोन निकषांवर या व्यवसायातील यशाचे मोजमाप करावयास हवे असे माझे स्वतःचे मत आहे.

(१) अशा तऱ्हेच्या व्यावसायिक शास्त्रीय सल्ला देणाऱ्या संघटनेला एका विशिष्ट ग्राहकांकडून पुन्हा पुन्हा किती प्रमाणात कामे मिळतात.

(२) व अशा सल्ल्यापासून त्या ग्राहकाला किती प्रमाणात प्रत्यक्ष फायदा होतो.

मला आपणाला सांगताना फार संतोष होतो की, त्याच त्याच ग्राहकाकडून आपणास पुन्हा पुन्हा कामे मिळत आहेत.

भारतात अशा प्रकारचा व्यवसाय हा नव्यानेच आहे हे आपण जाणताच. आणि त्याचा आणखी विकास करण्यास पुष्कळच वाव आहे. व्यावसायिक सल्ला देणाऱ्या अशा संघटनेने अद्ययावत शास्त्रीय शोध व तंत्र यांची परिपूर्ण माहिती करून घेणे आवश्यक आहे. कारण त्यामुळेच त्यांच्या सल्ल्याचा ग्राहकांना खरा फायदा मिळू शकेल.

औद्योगिक आणि व्यवस्थापकीय सल्ला व मार्गदर्शन यांची उपयुक्तता अधिकाधिक प्रमाणात मान्य करण्यात येऊ लागली असली तरी संबंधित क्षेत्रांतील जबाबदार व्यक्तींना त्याची जाणीव करून देण्याची अजून खूपच आवश्यकता आहे. उद्योगधंद्यातील किंवा व्यापारातील यश हे काही ठराविक ठोकताळ्यावर अवलंबून आहे असे मानण्याकडे अजून पुष्कळच कल दिसून येतो. अशा ठोकताळ्यांची जागा आधुनिक काळात निश्चित माहितीच्यावर आधारलेली शास्त्रीय पद्धतीची अनुमाने व धोरणे घेतात. इतर प्रगत देशांप्रमाणेच आपल्या देशातही उद्योग, व्यवसाय व व्यापार या क्षेत्रांत या व्यवसायाला योग्य ते महत्त्वाचे स्थान मिळेल अशी मला खात्री आहे.

अध्यक्ष,-श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचे वार्षिक सभेत भाषण

---

### साखर उत्पादन फार होणार नाही

हिंदमधील साखरेचे उत्पादन वाढविण्यासाठी मध्यवर्ती सरकारने अनेक उपायांची योजना केली आहे. साखर कारखान्यांना जरूर तितका ऊस पुरविण्यासाठी कोशीस करण्यात येत आहे. परंतु तरीही चालू सालच्या गळिताच्या हंगामात २२ लाख टनांपेक्षा अधिक साखरेचे उत्पादन होईल असा फारसा संभव नाही. गेल्या साली हंगामाच्या प्रारंभी ३५ कारखान्यांनी गळित सुरू केले होते. यंदा ३९ कारखान्यांनी गळित सुरू केले आहे. तरीसुद्धा कारखान्यांना उसाचा भरपूर पुरवठा होणे अवघड आहे. कारण, गुळाला चढ्या किमती मिळत आहेत आणि गुळाच्या व खांडसारी साखरेच्या उत्पादनावर कसलेही नियंत्रण नाही. लवकरच ६० साखर कारखाने गळितास प्रारंभ करतील. महाराष्ट्रात मात्र सहकारी साखर कारखान्यांना उस घालण्याचे बंधन शेतकऱ्यांनी पतकरले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील परिस्थिती जरा बरी आहे.

---

### योगशास्त्राचा उत्पादन वाढीसाठी वापर

भारतामधील योगशास्त्र युरोप-अमेरिकेत गेल्या काही वर्षांत बरेच प्रसिद्ध पावले आहे. सामान्यपणे हिंदी माणूस संसारतापापासून मुक्त होण्याच्या दृष्टीने ह्या शास्त्राकडे वळतो. युरोप-अमेरिकेतील लोक त्याचा व्यावहारिक जीवनात उपयोग करण्यास अधिक उत्सुक दिसतात. एका फ्रेंच नागरिकाने दारू सुटण्यासाठी योगाची कास धरली. पण जर्मनीतील एका कारखान्यातील कामगारांनी ध्यानाचा उपयोग उत्पादन वाढविण्यासाठी होईल काय अशी पृच्छा जर्मनीत आलेल्या एका हिंदी योग्याकडे केली. त्यांनी ध्यानाचा अभ्यासक्रम पुरा केला त्यामुळे त्यांना नव्या उत्साहाची प्राप्ती झाली आणि कारखान्यातील त्यांची उत्पादनक्षमता १० टक्यांनी वाढली.

## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

# दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

स्थापना १९४५

# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

टेलिफोन नं. ३५६५०२

## ७, तात्या घारपुरे पथ, मुंबई–४.

(१) बचत खाते :—व्याजाचा दर : दरसाल दर शे. रु. ४ – ००
(२) खास बचत योजना :—घरी बसून पैसे भरता येतात
(३) कायम ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर
(४) महाराष्ट्र, म्हैसूर आणि गुजरात राज्यांतील प्रमुख शहरांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

**खेळते भांडवल सुमारे १३ लाख रुपये**

अधिक माहितीसाठी अवश्य भेटा :—

बा. य. वेलींकर
असि. मॅनेजर




पुण्यांत याल तेव्हां—
# उद्यान निवास


या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वकष निवासामध्येंच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर

टेलीफोन ५७७९१ (माहिती मागवा) उद्यान प्रासाद
स्काऊट ग्राउंड समोर, पुणे २

## गुळाच्या किंमतीविषयी शेतकऱ्यांचा दृष्टिकोण

महाराष्ट्र सरकारने गुळाच्या खुल्या व्यापारावर घातलेले निर्बंध तसेच गूळ बाहेर जाऊ नये म्हणून घातलेली जिल्हा आणि प्रांत-बंदी यामुळे गूळ उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय झाला असून सरकारने हा हुकूम काढण्याचे अगोदर गूळ उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या विचारात घेतल्या नाहीत, अशा आशयाचे एक निवेदन आमदार श्रीपतराव बोंद्रे प्रभृती कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध केले आहे.

गेल्या एक वर्षात देशात सर्वच मालाच्या दराची दरवाढ होत आहे. त्याबाबत अद्याप पाहिजे तसे दर कमी करणेबाबत सरकारला यश आले नाही. मात्र शेतीमालाचे दर वाढतात त्यास विरोध होत आहे. परंतु शेतकऱ्यांना लागणाऱ्या खत, इलेक्ट्रिक मोटर्स, इंजिन्स, तेले वगैरे मालाचे दर भरमसाठ वाढले असता कोणीही हाकाटी केली नाही, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

गूळ करणाऱ्या शेतकऱ्यांची तक्रार अशी आहे की, साखर-कारखान्यांना सरकारी दरांचे संरक्षण आहे तसे गूळ तयार करणाऱ्या शेतकऱ्यांना कधीच संरक्षण मिळालेले नाही व मिळत नाही. चालू साली अनेक वर्षांच्या कर्जातून गूळ करणारा शेतकरी मुक्त होणार असताना मात्र लगेच हाकाटी चालू झाली आहे. हे चित्र बरोबर दिसत नाही.

ऊस उत्पादकास सध्या एकरी उत्पादन खर्च किती येतो व त्याला लागणाऱ्या लागवडीकरिता बाजारात त्याला कोणते जिन्नस कमी दरात मिळतात याचाही विचार व्हावा व तो विचार करूनच भारत सरकारने उसाचे दर वाढविले आहेत; व सध्या उतारा ९·४ ला जो रु. २·७५ पैसे दर मिळतो त्याप्रमाणे आमच्या कोल्हापूरच्या सर्व फॅक्टरींचा उतारा ११॥ ते १२॥ पर्यंतचा आहे. म्हणजे या हिशेबाने गुळाचा दर १३५ ते १५० पर्यंतचा होत आहे.

उसाच्या लागणीपासून गूळ तयार करणाच्या प्रक्रियेपर्यन्त शेतकऱ्यांस दर एकरी सरासरी खच रु. ४५६३–०० येतो. ज्या वेळी शेतकऱ्यांना उत्पादनाचा इतका खर्च करावा लागतो त्या वेळी दर एकरी सरासरी ३० टन ऊस निघतो. मात्र या ३० टनांपासून गुळाचे उत्पादन सरासरी ३॥ गाडीपर्यंत होते. गुळाचा सरासरी भाव क्विंटलला रु. १५०–। धरल्यास या ३॥ गाडीचे ( २४॥ क्विंटलचे ) रु. ३६७५ होतात. म्हणजे यावरून क्विंटलला १५० रुपये दर मिळून देखीलही शेतकऱ्यांस त्याच्या उत्पादनाचा खर्च विचारात घेता ( सरासरी खर्च ४५६३ रु. वजा सरासरी उत्पन्न ३६७५ रु. = ८८८ रु. ) रु. ८८८ तोटा येतो.

दर क्विंटलला रु. २०० दर धरल्यास वरील ३॥ गाडीचे (२४॥ क्विंटलचे ) रु. ४९००।– होतात. वजा उत्पादन खर्च रु. ४५६३।– गेल्यानंतर शेतकऱ्यास दर एकरी रु. ३३७ उत्पन्न मिळते. आणि या एवढ्या अल्पशा उत्पन्नात त्याच्या कुटुंबाचा खर्च विचारात घेतल्यास त्यास नेहमी आपले जीवन अत्यंत कष्टमय परिस्थितीत जगावे लागते. म्हणून किमान त्यास दर क्विंटलला रु. २०० चे वर दर मिळाल्याशिवाय उसाचे उत्पादन फायदेशीर होणार नाही.

शेतकऱ्यांस दर क्विंटलला रु. १५०।– दर राहिल्यास फक्त कोल्हापूर जिल्ह्यातील उस उत्पादकांस सुमारे ५ कोटी पर्यंतचे नुकसान येणार आहे. यावरून महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांस किती मोठे नुकसान येईल याचा विचार होणे अत्यंत जरूर आहे. म्हणून किमान रु. २०० चे वर दर मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च भागणार नाही.

उसाचे लागणीपासून ते गाळपापर्यंतचा खर्च ( एकरी )

| | | |
|---|---|---|
| १ ) | उसाचे जमिनीत नांगरट, खोलगट तीन वेळा करावी लागते. त्याचा खर्च. | २००–०० |
| २ ) | उसाच्या लावणीचे अगोदर सऱ्या ( ट्रेंची ) उजरणे वगैरे | ५०–०० |
| ३ ) | उसाचे बी बियाणे ( सरकारी ऊस संशोधन केंद्रावरील दराप्रमाणे ) एकरी दर रु. ३० प्रमाणे | ३६०–०० |
| ४ ) | उसाचे एकूण भांगलणी ( तण घाण काढणे ) दर भांगलणीस १०० रु. प्रमाणे ५ भांगलणीचे | ५००–०० |
| ५ ) | उसास तीन महिन्यानंतर खत घालणे, सऱ्या भरणे वगैरेचा खर्च | १००–०० |
| ६ ) | खते घालणे. | |
| | पहिला डोस सुपर फॉस्फेट ३ पोती | ४८–०० |
| | दुसरा डोस सल्फेट ३ पोती | १२०–०० |
| | तिसरा डोस मिक्स्चर १० पोती | ५७५–०० |
| | खत घालणेची मजुरी | १००–०० |
| ७ ) | इरिगेशन पाणी सरकारी दराप्रमाणे किमान | ४६०–०० |
| ८ ) | पाणी पट्टी | २०–०० |
| ९ ) | शिक्षण कर | ३०–०० |
| १० ) | जमिनीचा खंड | ३००–०० |
| ११ ) | भांडवली व्याज ( १०% प्रमाणे ) | २००–०० |
| १२ ) | गाळप्याचा खर्च गाडीस रु. २०० प्रमाणे एकरी ३॥ गाडी होणार गुळावर | ९००–०० |
| १३ ) | स्वतः शेतकऱ्याचे कष्ट व मॅनेजमेंटबद्दल मासिक रु. ५० प्रमाणे वर्षासाठी | ६००–०० |
| | एकूण खर्च | ४५६३–०० |

## मॉंट्रिअल येथील यशस्वी जागतिक प्रदर्शन

मॉंट्रिअल ( कॅनडा ) येथील एक्स्पो जागतिक प्रदर्शन नुकतेच, ऑक्टोबर अखेर, बंद करण्यात आले. आजवर भरविण्यात आलेल्या अशा जागतिक प्रदर्शनांत हे प्रदर्शन सर्वांत यशस्वी झाले. एकूण तीन कोटी लोक प्रदर्शन पाहण्यास येतील अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात त्यांची संख्या पाच कोटी भरली. प्रदर्शनातील रशियाच्या विभागाने सर्वांत जास्त प्रेक्षक ( १ कोटी ५ लक्ष ) आकृष्ट केले. त्या खालोखाल अमेरिका ( ९२ लक्ष ), झेकोस्लोव्हाकिया ( ७० लक्ष ), कॅनडाची टेलिफोन असोसिएशन ( ६० लक्ष ), ब्रिटन ( ५० लक्ष ) असा त्या देशांच्या विभागास आलेल्या प्रेक्षकांचा अनुक्रम लागतो. कॅनडा आणि पश्चिम जर्मनी ह्या देशांच्या विभागांतही प्रेक्षकांनी गर्दी केली. ह्या प्रदर्शनात इतके चित्रपट दाखविण्यात आले, की एखाद्याने सहाही महिने ते बघण्यात खर्चिले असते, तरी त्याचे सर्व चित्रपट पाहून संपले नसते. एक्स्पो प्रदर्शन एवढे यशस्वी झाले, तरी त्याच्या हिशेबात सुमारें २०० कोटी रुपयांची तूट आली. तथापि, झालेला अप्रत्यक्ष फायदा खूपच मोठा होता. कॅनडाची श्रीमंती जगाला त्यामुळे दिसून आली.

## मोडीत निघालेल्या १० लाख मोटारगाड्या

१९७०च्या सुमारास ब्रिटनमधील जुन्या व निकामी झालेल्या मोटारगाड्यांची संख्या १० लाखापर्यंत जाईल असा अंदाज करण्यात आलेला आहे. मोटारींची खरेदी-विक्री करणाऱ्या एजंटांना ह्या जुन्या गाड्यांची जरुरी वाटत नाही. त्यामुळे मोटारींचे मालक त्या वाटेल तेथे सोडून देऊ लागले आहेत. स्वीडन आणि नॉर्वे ह्या देशांत जुन्या झालेल्या मोटारगाड्या सरळ समुद्रात बुडविण्यात येतात. पण, ब्रिटनमध्ये जुन्या झालेल्या गाड्या समुद्रात बुडविण्यासाठी लागणारा खर्च करण्यासही कोणी तयार नाही. अमेरिकेत अशा प्रकारच्या जुन्या गाड्या मोडून-तोडून नाहीशा करण्यासाठी स्वतंत्र कारखानेच आहेत. काही वेळा त्यांतील पोलादी भाग वितळविण्यासाठी पोलादाच्या कारखान्यात पाठविण्यात येतात. ह्या जुन्या गाड्यांचे आस भारतासारख्या गरीब देशांना पाठविण्यात आले तर बैलगाड्यांसाठी त्यांचा उपयोग होईल असे सुचविण्यात आले आहे.


---

## शेतीस कर्जपुरवठा ट्रेनिंग कोर्स

व्यापारी बँकांना शेतीस कर्जपुरवठा करणे सोईचे व्हावे, ह्यासाठी रिझर्व्ह बँकेने एक ट्रेनिंग कोर्स सुरू करण्याचे ठरविले आहे. पहिला कोर्स मुंबई येथे रिझर्व बँकेच्या बँकर्स ट्रेनिंग कॉलेजात १८ नोव्हेंबर रोजी सुरू होईल. हंगामी, त्याचप्रमाणे मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जपुरवठ्याची तत्त्वे आणि पद्धती ह्यांचा अभ्यासक्रमात समावेश झालेला आहे. शेतावर नेऊन प्रत्यक्ष शिक्षण देण्याची योजनाही केलेली आहे.


पत्त्याचा खेळ जेंव्हा निघाला तेंव्हा त्या खेळांत कालमान दर्शनाचीही कल्पना अंतर्भूत होती. त्याचे चार रंग, चार ऋतु (भारताबाहेर बऱ्याच ठिकाणी चार ऋतु मानतात) किंवा चार तिमाह्या दर्शविणारे होते. १३ पानांचा एक रंग अशारितीने प्रत्येक तिमाहीचे १३ आठवडे कल्पिले होते, व एकूण ५२ पत्ते ५२ आठवड्यांचे निदर्शक होते. एका ते दश्श्यापर्यंत प्रत्येक पत्त्यावरील ठिपक्याप्रमाणे त्याचे गुणांची बेरीज करून गुलाम ११, राणी १२, व राजा १३ अशी त्यांत बेरीज धरल्यास ५२ आठवड्यांचे ३६४ दिवसांचा उलगडा होतो. जोकर (विदूषक) चा पत्ता धरून सर्व बेरीज संपूर्ण वर्षाच्या ३६५ दिवसा इतकी होते. हा खेळ खेळणांना ही कालगणना कायम डोळ्यासमोर रहावी हा त्यांत उद्देश होता.

दि बँक ऑफ महाराष्ट्रशी जेंव्हा तुमचा संबंध येतो तेंव्हा तो वर्षभरासाठी, चारी तिमाहीसाठी, ५२ आठवड्यासाठीं आणि ३६५ दिवसासाठी यावा असाच आपला उद्देश असावा असे आम्हाला नम्रपणें वाटतें. महाराष्ट्र बँकेत योग्य ते खाते उघडून तुम्ही वर्षभर पैसे वाचवूं शकतां व त्यावर व्याज मिळवूं शकतां, तसेच आमच्या वस्तु-रक्षा-गृहांत तुम्ही मौल्यवान वस्तु ठेवूं शकतां, विदेशीय व्यवहारासाठी विदेशविनिमय खात्याचा फायदा घेऊं शकतां, किंवा तुमच्या व्यवसायवृद्धीसाठीं अर्थसहाय्य घेऊं शकतां. लहान उद्योगधंदे उर्जितावस्थेला आणणे हे तर स्थापनेपासून गेली ३२ वर्षे महाराष्ट्र बँकेचे ध्येय आहे.




तुमच्या कुठल्याही बँकींग व्यवहारासाठी आमच्या नजिकच्या शाखेला भेट द्या. तेथे तुमचें सस्मित स्वागत होईल.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

बँकांच्या ' मक्तेदारी ' संबंधी

## चार अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांचा अहवाल

काँग्रेसच्या संसदीय पक्षाचे चिटणीस श्री. चंद्रशेखर यांच्या सांगण्यावरून भारताच्या चार अर्थशास्त्रज्ञांनी सखोल अभ्यास करून बँकांचे राष्ट्रीयीकरण करणेच का श्रेयस्कर आहे या बाबतचा १२२ पानी अहवाल नुकताच पक्षाच्या चिटणिसांना सादर केला आहे.

पंजाब विद्यापीठाच्या अर्थशास्त्राचे प्रमुख प्राध्यापक श्री. एच. के. मनमोहन सिंग, लखनौ विद्यापीठाचे प्रमुख अर्थशास्त्रज्ञ डॉ. व्ही. बी. सिंग आणि दिल्ली विद्यापीठ व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन नवी दिल्ली यात संशोधनाचे काम करीत असलेले डॉ. एस. सी. गुप्ता व डॉ. एस. के. गोयल या मंडळींनी हा अहवाल तयार केला आहे.

सन १९५३ पासून १९६५ पर्यंत पंचवार्षिक योजनांतील ज्या प्रकल्पांवर बँकांकडून खर्च व्हावयाला पाहिजे होता तो झालेला नसून योजनेत ज्यांना स्थान नाही अशाच अनावश्यक व्यवसायांवर बँकांनी पैसा लावला असे या अर्थशास्त्रज्ञांना तपासाअंती दिसून आले आहे, आणि इतकेच नव्हे तर या खाजगी बँकांच्या डायरेक्टर मंडळींनी केवळ हितसंबंधी लोकांनाच कर्जे दिल्याचे आढळून आले आहे.

शेतीच्या विकासाकडे नुसते दुर्लक्ष नव्हे तर शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कर्जात सतत घट झाली आहे. सन १९६२ मध्ये शेतीसाठी १९ कोटी रुपये या बँकांकडून मिळाले पण १९६५ मध्ये फक्त ३ कोट, ९० लाखच मिळू शकले.

सहजगत्या मुबलक पैसा किफायतशीर व्याजाने काही विवक्षित उद्योगपतींना मिळण्याची सोय या बँकांनी केल्यामुळे ठराविक उद्योगपतींची मक्तेदारी वाढली असून अशांचा वरचष्मा वाढला आहे.

१९५४ साली बँकांच्या चालकांना ५६ कोटी रुपयांचे कर्ज होते. ही रकम डिसेंबर १९६५ मध्ये २९२ कोटी रुपये झाली. आणि या बँकांच्या चालकांना वा त्यांच्या कंपन्यांना १९६५ मध्ये ३१७ कोटींचे नवे कर्ज मिळाले. सन १९६६ मध्ये बँकांतर्फे एकूण ९ लाख व्यक्तींना २,४६५ कोटी रुपये कर्ज म्हणून दिले. पण त्यांपैकी १८०० कोटी रुपये फक्त ४,००० लोकांना मिळाले, आणि त्यातही ५७२ व्यक्तींना १४०० कोटी रुपये मिळाले.

१९६१ मध्ये बँकांमधील एकूण ठेवीची रकम ९०८ कोटी रुपये होती. पण १९६५ मध्ये ठेवींची रकम ३५०० कोटी रुपये झाली आहे. यावरून देशाच्या अर्थव्यवस्थेत या बँकांना किती महत्त्व आले आहे हे स्पष्ट होत आहे.

भारतातील वीस प्रमुख बँकांची पाहणी केली असता असे आढळून आले आहे की १८८ व्यक्ती या बँकांचे संचालक म्हणून काम करीत आणि याच १८८ व्यक्ती १४५२ कंपन्यांचे डायरेक्टर आहेत. आणि याच १८८ व्यक्तींच्या संपूर्णपणे ताब्यात ११०० कंपन्या आहेत.

देशात ज्या प्रमुख बँका आहेत त्यांच्या चालकांचा ३२ विमा कंपन्यांशी, ६ कर्जे देणाऱ्या संघटनांशी, ५८४ माल उत्पादन कारखान्यांशी, २६ व्यापारी संघटनांशी प्रत्यक्ष संबंध आहे.

( कर्ज घेणाऱ्या ह्या व्यक्ती लक्षावधी शेअरहोल्डर्सच्या वतीने स्वत:ची सही गुंतवून कर्जे घेतात; वैयक्तिक उद्योगधंद्यासाठी नव्हे; हा महत्त्वाचा मुद्दा प्राध्यापक महाशयांनी विचारात घेतलेला नाही. —संपादक )

---

## आवाजाचा आरोग्यावर दुष्परिणाम


औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशांतून हवा, पाणी दूषित होऊ नये म्हणून काळजी घेण्यात येते. पण, त्या देशांना आता एका नव्या धोक्याची जाणीव होऊ लागली आहे. काही विशिष्ट मर्यादेपेक्षा मोठ्या आवाजाचे माणसाच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात असे आता शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. ह्या-संबंधी शास्त्रज्ञांनी केलेले प्रयोग बोधप्रद आहेत. विशिष्ट मर्यादेच्या पलीकडील मोठ्या आवाजामुळे रुधिराभिसरणावर वाईट परिणाम होतो. त्याचप्रमाणे हृदयावरही प्रतिकूल परिणाम होतो असे आढळून आले आहे. बॉयलर तयार करणाऱ्या कारखान्यात कामगाराची कातडी हळूहळू स्पर्शज्ञानाच्या बाबतीत अकार्यक्षम होते. कारण त्यांच्या रुधिराभिसरणात दोष निर्माण होतो. माणसांप्रमाणेच प्राण्यावरही फार मोठ्या आवाजाचा घातक परिणाम होतो. काही मर्यादेपलीकडच्या आवाजाने प्रयोगाधीन प्राण्यांना वाताचे झटके येऊ लागले आणि काही प्राण्यांना पक्षघाताचा विकार जडला. युरोपमधील काही देशांनी आवाजाच्या ह्या धोक्याविरुद्ध उपाय योजण्यास सुरुवात केली आहे. स्विटझरलंडमधील जिनिव्हा शहरात एखाद्याने मोटारीतून उतरल्यावर दार जोराने बंद करून आवाज केला तर त्याला अटक करण्याचे अधिकार पोलिसांना आहेत. न्यूयॉर्क शहरात असा कायदा आहे की, विशिष्ट मर्यादेपर्यंतचे आवाज इमारतीत येऊ नयेत; अशाच रीतीने भिंती बांधण्यात आल्या पाहिजेत. ही खबरदारी विमानांच्या आवाजासाठी घेण्यात आली आहे. फ्रान्समध्ये मोटारीमुळे होणाऱ्या आवाजासंबंधी कांही नियम आहेत. मोटारीचे भोंगे वाजविण्याबाबत असलेले नियम वारंवार मोडण्यात आले तर मोटारी जप्त करण्याचे अधिकार कायद्याने देण्यात आलेले आहेत.

# किर्लोस्कर

शेतकी यंत्रें

# तुमच्या सेवेस हजर








नांगर, पंपिंग सेट, पेरणी यंत्रें, कल्टिवेटर, ऊसांचे चरक, स्लूस व्हाल्व, शेणयंत्रें यांसारख्या किर्लोस्कर यंत्रांवर महत्त्वाकांक्षी शेतकरी व बागाईत-दार आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं भरंवसा ठेवतात. शेती व बागाईत यांचें उत्पादन वाढविण्यांत हीं यंत्रें महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत.

## किर्लोस्कर ब्रदर्स लि.

किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली



हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.

ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३३ पुणे, बुधवार ६ डिसेंबर, १९६७ अंक २३



**भारताच्या निर्यातीत घट**— रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यानंतरच्या तेरा महिन्यांच्या अवधीत भारताची निर्यात घटली आहे. त्यापूर्वीच्या इतक्याच कालावधीतील निर्यातीशी तुलना करता घट ११ टक्के झाली असल्याचे दिसते. १९६६ च्या जूनपासून १९६७ च्या मे अखेरच्या निर्यातीची किंमत १५२ कोटी डॉलर्स अथवा ११४० कोटी रुपये झाली. त्या मागील ह्याच कालावधीतील आकडे १७०·९ कोटी डॉलर्स अथवा १२८१·७५ कोटी रुपये असे आहेत.

**अणुशक्तीचे वरदान**—किरणोत्सर्जासंबंधीच्या संशोधनात पहिले पाऊल टाकणाऱ्या मॅडम क्यूरी ह्यांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी वॉरसा येथे शास्त्रज्ञांचा एक मेळावा भरविण्यात आला होता. मेळाव्याला आलेल्या पदार्थशास्त्रज्ञांच्या मताने अणुशक्तीच्या साह्याने रेताड वाळवंटांचे सुपीक जमिनीत रूपांतर करण्याची किमया येत्या १० वर्षांत अगर त्यापूर्वीही हस्तगत होऊ शकेल.

**हिंदी अणुशास्त्रज्ञांची प्रगती**—हिंदी अणुशास्त्रज्ञ आणि एंजिनिअर्स हे कोणत्याही परदेशाची मदत न घेता मद्रास येथील अणुविद्युत केंद्र उभारण्यास समर्थ झाले आहेत. तारापूर आणि राणा प्रतापसागर येथील अशा प्रकारची विद्युत केंद्रे उभारल्यामुळे त्यांना आता चांगला अनुभव आलेला आहे.

**मद्रास राज्यात नव्या भात गिरण्या**—मद्रास राज्यात भात सडण्याच्या नव्या १२ गिरण्या लवकरच स्थापन करण्यात येणार आहेत. त्यांची यंत्रसामग्री अद्ययावत असून त्या सर्व सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणार आहेत. प्रत्येक गिरणीसाठी ७ ते ९ लाख रुपये भांडवल लागणार आहे. राज्यातील भाताचे पीक चालू हंगामात बरेच वाढणार आहे.

**नायजेरिआसाठी हिंदी एंजिन ड्रायव्हर्स**—नायजेरिआत चाललेल्या यादवी युद्धामुळे तेथील रेल्वे एंजिनांचे काही ड्रायव्हर्स काम सोडून गेले आहेत. हिंदी रेल्वेने त्या देशातील रेल्वे चालविण्यासाठी २० ड्रायव्हर्स एक वर्षासाठी पाठविण्याचे कबूल केले आहे. सुमारे १ महिन्यात ते तिकडे जावयास निघतील. सर्व ड्रायव्हर्स डिझेल एंजिनांवर काम करणारे आहेत.

**विजेच्या चोरीबद्दल अटक**—बिहार राज्याच्या वीजबोर्डाने विजेचा अनधिकृत वापर करणारांविरुद्ध मोहीम उघडली आहे. ह्या मोहीमेत त्यांनी १५० लोकांना अटक करविली आहे. अटक झालेल्या लोकांत दोघेजण लक्षाधीश असून, उद्योगपती आहेत.

**भारताची इस्राइलशी स्पर्धा**—इस्राइलमधील हिऱ्याच्या धंद्याला भारताकडून जोराची स्पर्धा होत आहे. अलीकडे इस्राइलमधून निर्यात होणाऱ्या हिऱ्यात बरीच घट झाली आहे. ही घट होण्यापूर्वी इस्राइलच्या एकूण निर्यातीपैकी ५० टक्के निर्यात पैलू पाडलेल्या हिऱ्यांची होत असे. भारतामधील हिऱ्याच्या धंद्यातील कामगारांना कमी वेतन मिळते म्हणून भारत स्पर्धा करू शकतो, असे सांगण्यात येते.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०–२–६७ रोजी प्रसिद्ध झाले.




★ अर्थ ★

बुधवार, ६ डिसेंबर, १९६७



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिली । अर्थशास्त्र


# ब्रिटिश पौंडाची शरणागती

मूक चित्रपटांच्या जमान्यातील मिस् झुबेदा ही नटी कित्येकांना आठवत असेल. कड्यावरून धोकादायक रीतीने ती कधी लोंबकाळलेली असायची किंवा धावत्या आगगाडीच्या इंजिनापुढे रूळावरून ती फेकली जायची. पण त्यातून ती वाचली जायची. ब्रिटिश पौंडाचा बचाव अशाच रीतीने आंतरराष्ट्रीय बँकर्सनी गेली चार वर्षे केला. पण दोन आठवड्यापूर्वीच्या संकटकाळी ह्या 'पर्ल व्हाइट'ला वाचविण्यासाठी कुणीच मास्टर 'विठ्ठल' पुढे येईना आणि ब्रिटिश पौंडाला त्या आघातातून निसटता येईना. अखेर ब्रिटनने पौंडाचे १४·३० टक्क्यांनी अवमूलन केले.

प्रत्येक देशाला आपल्या उद्योगधंद्यांचे व राहणीचे मान टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी काही परदेशी मालाची आयात करावीच लागते. त्या आयातीची किंमत आपला माल निर्यात करून द्यावी लागते. निर्यातीचा माल किती चांगला, स्वस्त आणि इतर देशांना हवासा असतो ह्यावर ही निर्यात अवलंबून राहाते.

आयात चालू राहिली पण त्यामानाने निर्यात करता आली नाही, म्हणजे परराष्ट्रीय व्यापारात तूट यायला सुरुवात होते. ही तूट भरून काढण्यासाठी तात्कालिक उपाय म्हणून परदेशांतच कर्जे मिळवून त्यातून आयातीची किंमत चुकती करावयाची. ही कर्जे फेडण्यासाठी पूर्वीपेक्षा जास्त निर्यात करायला हवी. पण ते जमत नाही आणि नवी नवी कर्जे घ्यावी लागतात आणि जुनी कर्जे फेडण्यासाठीही नवी कर्जे मागावी लागतात. अशी कर्जे बभ्रा न होता, पत राखून मिळत राहतात, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापारातील दिवाळखोरीचे दुष्परिणाम लपविता येतात. पण शेवटी अशी वेळ येते की, सर्व मदती एकदम बंद होतात आणि स्वतःच्या परिस्थितीची जाहीर कबुली देणे भाग पडते. स्वतःच्या चलनाचे अवमूलन स्वीकारावे लागते आणि त्यास कायदेशीर स्वरूप द्यावे लागते. भारताच्या बाबतीत असेच घडले. ब्रिटनच्या बाबतीतही असेच घडले आहे.

१९६६ च्या नोव्हेंबरखेरीज बाकी सर्व काळ ब्रिटनने निर्यातीपेक्षा आयात जास्त केलेली आहे, म्हणजे मिळकतीपेक्षा चांगल्या राहणीचा हट्ट टिकविला आहे, असे दिसून येईल.

### पौंडाच्या अवमूलनाचा भारतावर परिणाम

भारत व ब्रिटन यांचे व्यापारी संबंध फार पूर्वीपासून आहेत. अशा परिस्थितीत ब्रिटनने आपल्या पौंडाचे अवमूलन केल्यामुळे त्याचा काही प्रमाणात भारताच्या अर्थव्यवस्थेवर बरा-वाईट परिणाम होणार हे उघड आहे.

भारताची मुख्य निर्यात चहा व ताग. ब्रिटनला या दोन्ही जिनसा पूर्वीपेक्षा महाग दराने खरेदी कराव्या लागणार शिवाय सिलोन व पाकिस्तान हे देश आपले प्रमुख स्पर्धक आहेत. त्यांनी त्यांच्या चलनाचे अवमूलन केले तर ब्रिटनला त्यांच्याकडून माल घेणे फायदेशीर होईल व भारताची या दोन जिनसांची निर्यात कमी होत जाईल. आपल्या निर्यात व्यापारात १७ टक्के निर्यात ही ब्रिटनला असते.

ब्रिटनच्या सर्वच जिनसा आपल्याला पूर्वीपेक्षा स्वस्त दराने मिळतील. कारखान्याकरता लागणारी यंत्रसामग्री व काही कच्चा माल आपण ब्रिटनकडून घेतो. त्यामुळे भारताच्या कित्येक उद्योगधंद्यांना अवमूलनाचा फायदा मिळेल. आपली १० टक्के आयात ही ब्रिटनकडून असते.

ब्रिटनला होणारी निर्यात कमी होऊ लागल्यावर निर्यात कराचे उत्पन्नही घटत जाईल. सरकारला ही उत्पन्नातील तूट भरून काढण्याकरता अन्य करांचा अवलंब करावा लागेल; अगर निर्यात करात सूट देऊन निर्यातीची पातळी कायम ठेवण्याचा प्रयत्न करावा लागेल.

ब्रिटनच्या अनेक कंपन्यांनी भारतातही कंपन्या सुरू केल्या आहेत. अशा भारतातल्या ब्रिटिश कंपन्या आपला फायदा पौंडाच्या रूपाने ब्रिटनकडे धाडतात. आजपर्यंत एक पौंड फायदा मिळवण्यासाठी भारतीय ब्रिटिश कंपन्यांना २१ रुपये मिळवावे लागत होते. यापुढे मात्र एक पौंड फायद्याकरता फक्त १८ रुपयेच मिळवावे लागणार. पर्यायाने ब्रिटिश कंपन्यांना भारताच्या कंपन्यांत मिळणारा फायदा वाढत राहणार. भारताचे पुष्कळसे परकीय चलन ब्रिटिश कंपन्यांच्या फायद्याच्या रूपाने ब्रिटनकडे भरण्याकरता खर्च होत असे. बाहेर जाणारे चलन रोखून धरावे असा एक हेतू रुपयाचे अवमूलन करण्यामागे होता. पण आता पौंडाच्या अवमूलनामुळे भारताचा हेतू तितकासा साध्य होणार नाही.

भारतात तयार होणारे कापड मोठ्या प्रमाणावर ब्रिटनला

निर्यात होते. परंतु हा व्यापार ' कोटा सिस्टिम ' वर आधारलेला आहे. आपला ठराविक कोटा ब्रिटनकडे आपण निर्यात करू शकलो तर अवमूलनामुळे आपल्या उत्पन्नात वाढच होणार आहे.

ब्रिटनमध्ये अगर ' स्टर्लिंग एरिया ' मध्ये जाणाऱ्या प्रवाशांना प्रवासखर्च कमी येणार आहे. भारतातल्या मातापित्यांची जी मुले ब्रिटनमध्ये शिक्षण घेत आहेत, त्यांचा शिक्षणखर्चही कमी होणार आहे.

पौंडाच्या अवमूलनामुळे भारताला कर्जाच्या बाबतीत काहीसा फायदा झालेला आहे. आपल्या पौंडांतील कर्जाचा बोजा, अवमूलनाच्या निर्णयामुळे १४·३ टक्क्यांनी कमी झाला आहे. सध्या भारताला ५१४ कोटी रुपयांचे ( म्हणजेच २४५ दशलक्ष पौंडांचे ) कर्ज आहे. कर्जाचा हा बोजा ७३ कोटी रुपयांनी कमी होणार आहे.

पौंडाच्या अवमूलनामुळे जरी पौंड व रुपाया यांच्या दरात बदल झाला असला तरी रुपयाचे सोन्याशी व डॉलरशी असणारे प्रमाण पूर्वीचेच राहणार आहे.

पूर्वीच्या विनिमय दराने ७१ कोटी रुपये इतक्या किंमतीची भारताची गंगाजळी ब्रिटनकडे आहे. या गंगाजळीची किंमत पौंडाच्या अवमूलनामुळे १४·३ टक्क्यांनी कमी झाली आहे.

### सोने खरेदी करणाऱ्यांची भाऊगर्दी

ब्रिटिश सरकारने आपल्या चलनाचे म्हणजे पौंडाचे अवमूलन केल्यानंतर लंडनच्या बाजारात सोने खरेदी करणाऱ्यांची भाऊगर्दी उसळली. आंतरराष्ट्रीय चलनपद्धतीत पौंडाला पूर्वीइतके महत्त्व राहिले नसले तरी त्याच्या अवमूलनामुळे ही पद्धतीच कोसळून पडेल किंवा काय अशी चिंताही व्यक्त करण्यात आली. अमेरिकेचा डॉलर हा सोन्यावर आधारलेला आहे, आणि कम्युनिस्ट देशांखेरीज इतर कित्येक देशांचे चलन डॉलर्सशी जोडलेले आहे. त्यामुळे डॉलर्स आणि सोने ह्यांच्यातील संबंधाला जर धक्का लागला तर त्याचे परिणाम सर्व जगभर एखाद्या लाटेप्रमाणे पसरण्याची शक्यता आहे. एकामेकांशी निगडित असलेल्या आंतरराष्ट्रीय चलनपद्धतीत हे परिणाम त्वरित पसरू लागतात. गेल्या काही दिवसात सोने खरेदी करणारांची संख्या एकदम वाढली आहे. त्यामुळे सोन्याचा संचय करून त्याची खरेदी-विक्री करणाऱ्या १० देशांजवळील सोन्याच्या साठ्यावर चांगलाच ताण पडला आहे. सध्या सोन्याची किंमत दर औंसाला ३५ डॉलर्स अशी ठरविण्यात आलेली आहे. सोन्याच्या बाजाराचे लंडन हे आंतरराष्ट्रीय केंद्र आहे. लंडनच्या बाजारात दररोज सुमारे ५ ते १० टन सोन्याची मागणी असते. परंतु गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मागणी ३० ते ७० टनांपर्यंत वाढली होती. काही दिवशी तर ती १०० ते २०० टनांपर्यंतही वर गेली होती. दर औंसाला ३५ डॉलर्स ह्या दराप्रमाणे अमेरिकेजवळ सुमारे १,३०० कोटी डॉलर्सचे सोने आहे. परंतु परदेशांतील मध्यवर्ती बँकांजवळ सोन्यात रूपांतर करता येण्यासारखी डॉलर्सची १,४०० कोटींची रक्कम आहे. त्याशिवाय परदेशी खाजगी खात्यात असलेली डॉलर्सची रक्कमही खूप मोठी आहे.

### देना बँकेचे नवे चेअरमन

बँकेचा चेअरमन बँकेच्या कामाकडे पूर्ण वेळ देणारा असावा ह्या सरकारी आगामी नियंत्रणास अनुसरून देना बँकेचे चेअरमन, श्री. ललितचंद्र सी. डी. नानजी ह्यांनी आपण होऊन आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे. ते देना बँकेचे २५ वर्षे संचालक आणि १९५६ पासून चेअरमन होते. त्यांच्या जागी सध्याचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी ह्यांची नेमणूक झाली आहे. १९३९ साली श्री. गांधी प्रथम बँकेत दाखल झाले आणि १९४१ सालापासून आतापर्यंत ते बँकेचे मुख्याधिकारी होते.

### ब्रिटनने काढलेली कर्जामागून कर्जे

| दिनांक | रकम ( लक्ष पौंड ) | कुणाकडून | कशासाठी | परतफेडीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर १९६५ | २००० | इं. मॉ. फंड | सुएझ प्रकरणानंतर | ऑक्टोबर १९६० |
| ऑक्टोबर १९५७ | ८९० | यु. स्टे. एक्सपोर्ट इं. बँक | पौंडाची तारांबळ | ऑक्टोबर १९५९ |
| ऑगस्ट १९६१ | ५३५० | इं. मॉ. फंड | बजेटाला आधार | ऑगस्ट १९६२ |
| ऑक्टोबर १९६४ | ३५७० | इं. मॉ. फंड | ८००० लक्ष पौंडांची तूट | डिसेंबर १९६७ मध्ये द्यावयाचे देणे |
| नोव्हेंबर १९६४ | १०७१० | सेंट्रल बँका | वरील कर्जानेही पौंडाचा बचाव होईना | मे १९६५ |
| मे १९६५ | ५००० | इं. मॉ. फंड | वरील बँकांची परतफेड | मे १९६८-७० |
| ऑक्टोबर १९६७ | ५३० | स्विस बँका | पौंडाला आधार | ऑक्टोबर १९६८ |
| नोव्हेंबर १९६७ | ८९० | इंटर नॅशनल बँक | इं. मॉ. फंडाचा डिसेंबर १९६७ मध्ये द्यावयाचा हप्ता भागविणे. | { जून १९६८ मे १९६९ |

## आयुर्विमा कॉर्पोरेशनचे गेले वर्ष

आयुर्विमा कॉर्पोरेशनचा १० व्या वर्षाचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यावरून आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या गेल्या वर्षातील कामाची माहिती मिळते. ३१ मार्च, १९६७ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षात कॉर्पोरेशनकडे १४·९२ लाख विम्याचे अर्ज आले. त्यांची विम्याची रकम ८१६·१३ कोटी रुपये होती. आलेल्या अर्जांपैकी १४·१२ लाख अर्ज मंजूर करून पॉलिसी देण्यात आल्या. त्यांची किंमत ७७० कोटी रुपये होती. कॉर्पोरेशनकडे चालू असलेल्या पॉलिसींची दर्शनी किंमत ४,७३६ कोटी रुपये होती. त्याशिवाय वर्षासनाच्या पॉलिसींवर दरसाल २·९४ कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. अहवालाच्या वर्षी जितक्या नव्या पॉलिसी देण्यात आल्या त्यापैकी ७०·५ टक्के पॉलिसीज प्रथमच विमा उतरणाऱ्या व्यक्तींना देण्यात आल्या. ३६·५ टक्के पॉलिसीज ग्रामीण भागातील विमेदारांना देण्यात आल्या. अशा पॉलिसींची एकूण संख्या ५·०७ लाख आणि त्यांची दर्शनी किंमत २१७·२२ कोटी रुपये आहे. पॉलिसींच्या पोटी द्यावे लागणारे क्लेम्स, सोडकिंमत, इत्यादी बाबींवर ७०·६५कोटी रुपये खर्ची पडले आहेत. हप्ते न भरण्यात आल्यामुळे रद्द-बातल होणाऱ्या पॉलिसींचे प्रमाण कमी व्हावे म्हणून कॉर्पोरेशन प्रयत्नशील आहे. ह्या प्रयत्नांना यश येत असून ते रद्द होण्याचे प्रमाण फारसे घसरलेले नाही. अहवालाचे वर्ष एकंदरीने आर्थिक तंगीचे गेले, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. देशातील घरटंचाईचा प्रश्न बराच बिकट झालेला आहे. तो सोडविण्यास मदत करण्याच्या दृष्टीने कॉर्पोरेशनने घरबांधणीसाठी राज्य सरकारांना आणि इतर संबधित संस्थांना कर्जे देण्याचे धोरण पूर्वीप्रमाणे चालू ठेवले आहे.

---

## पृथ्वीवरील पाणीपुरवठा

पृथ्वीचा अन्नपुरवठा लवकरच कमी पडू लागेल, त्याप्रमाणे पाण्याचा पुरवठाही अपुरा पडू लागेल, असे तज्ज्ञांचे मत आहे. पृथ्वीवर एकूण १३६ कोटी घन किलोमीटर पाणी आहे, त्यापैकी फक्त ३·५ कोटी घन किलोमीटर पाणी पिण्यास लायक आहे आणि त्यापैकी ८०% पाणी बर्फाच्या स्वरूपात दगड होऊन बसले आहे. खाऱ्या पाण्यातील खार काढून ते पाणी पिण्याजोगे करणे आणि घाण होणारे पाणी शुद्ध करून पुनः वापरणे, ह्यास ह्यापुढे अधिकाधिक महत्त्व प्राप्त होणार आहे.

## डॉ. रविकुमार हजारी

डॉ. हजारी ह्यांनी नियोजन मंडळाच्या सूचनेवरून आपले अभ्यासपूर्ण अहवाल तयार केले, त्यामुळे पुंजीपतींत खूप खळबळ उडाली आहे. त्यांचे ह्यापुढील अहवालही औद्योगिक व आर्थिक परिस्थितीच्या कित्येक अंगावर भेदक प्रकाशझोत टाकणारे ठरतील, अशी अपेक्षा आहे. हे डॉ. हजारी आहेत तरी कोण?

त्यांचे संपूर्ण नाव रविकुमार हजारी असून ते काश्मिरी आहेत. तथापि ते मुंबईकरच आहेत. त्यांचे शिक्षण मुंबईत होऊन ते झेव्हिअर कॉलेजात लेक्चरर म्हणून काम करू लागले. पुढे ते विद्यापीठाचे प्राध्यापक झाले. त्यांचा खरा विषय आहे शेतीविषयक अर्थशास्त्र. परंतु ते अत्यंत अभ्यासू म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे वय सुमारे ४० वर्षांचे असेल. त्यांचे बोलणे-चालणे मोहक असून त्यांची विनोदबुद्धीही तरल आहे. त्यांची पत्नी झेव्हिअर कॉलेजात इंग्रजीची प्राध्यापिका आहे. गेल्या सप्टेंबरपासून ते 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली'चे संपादक म्हणून काम करीत आहेत.

---

## जपानकडून बोटी मिळविण्याचे प्रयत्न

मध्यवर्ती सरकारचे वाहतूक आणि जहाज मंत्री डॉ. राव ह्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, चौथ्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आलेले ३० लाख टन वजनाच्या बोटींचे उद्दिष्ट भारत निश्चितपणे गाठू शकेल. तथापि हे उद्दिष्ट गाठूनही भारताला आपल्या परदेशांशी होणाऱ्या सागरी वाहतुकीपैकी ३० टक्के वाहतूकच स्वतःच्या मालकीच्या बोटीतून करता येईल. निदान ५० टक्के वाहतूक तरी हिंदी बोटीतून करता यावी अशी आकांक्षा ठेवण्यात आली आहे. डॉ. राव पुढील वर्षी जपानला जाणार असून जपानकडून मागाहून किंमत देण्याच्या अटीवर बोटी मिळू शकतील काय, ते पाहणार आहेत. सध्या भारत सागरी वाहतुकीसाठी लागणाऱ्या बोटी पश्चिम युरोपातील देशांकडून मुख्यतः घेतो. जपानचा बोटी बांधण्याचा धंदा पाश्चात्त्य देशांशी तुलना करता खूपच प्रगत झालेला आहे.

---

## टेलिफोनची थकबाकी

१ जानेवारी, १९६७ रोजी टेलिफोन वापरणारांकडून ५ कोटी रुपयांची बिले वसूल झालेली नव्हती.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

# दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

**आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.**

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.



स्थापना १९४५

# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

टेलिफोन नं. ३५६५०२

**७, तात्या घारपुरे पथ, मुंबई-४.**

( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : दरसाल दर शे. रु. ४ – ००
( २ ) खास बचत योजना :—घरी बसून पैसे भरता येतात
( ३ ) कायम ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर
( ४ ) महाराष्ट्र, म्हैसूर आणि गुजरात राज्यांतील प्रमुख शहरांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

**खेळते भांडवल सुमारे १३ लाख रुपये**

अधिक माहितीसाठी अवश्य भेटा :—

बा. य. वेलींकर
असि. मॅनेजर



चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या
बॉल बेअरिंग बसविलेल्या
फोन नं. १६९



भिडे अँड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य



पुण्यांत याल तेव्हां—



# उद्यान निवास

या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वकष निवासामध्येच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर

टेलीफोन ५७७२१ (माहिती मागवा) उद्यान प्रासाद
स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे २

## रशिआत अकार्यक्षम कारखान्यांना शिक्षा

रशिआतील आर्थिक नियोजनात अलीकडे नव्या सुधारणा करण्यात येत आहेत. आतापर्यंतच्या नियोजनात कारखान्यांना मालाचा दर्जा चांगला राखण्यासाठी फारशी प्रेरणाच नव्हती. फक्त उत्पादनातील आपला वाटा निर्माण केला म्हणजे भागत असे. ह्या पद्धतीमुळे कारखाने कार्यक्षमतेकडे लक्ष देईनासे झाले होते. परंतु पुढील वर्षापासून कमी दर्जाचा माल निर्माण करणाऱ्या कारखान्यांना आपल्या गिऱ्हाइकांना २० टक्के दंड द्यावा लागणार आहे. रशिआतील आर्थिक नियोजनात केंद्रीकरणामुळे पुष्कळ दोष निर्माण झाले होते, ते नाहीसे करण्यासाठी गेल्या वर्ष–दीडवर्षात अनेक उपाय योजण्यात आले आहेत. ह्या उपायांना अनुसरून १,००० च्या वर कारखान्यांची कार्यपद्धती बदलण्यात आली आहे. नव्या पद्धतीप्रमाणे कारखान्यांना जो भांडवली मालाचा पुरवठा करण्यात येतो त्याच्या रकमेवर ठरलेले व्याज त्यांना द्यावे लागते. कारखान्यांना आपला उत्पादन खर्च कमी करून आणि आपली विक्री वाढवून अधिक नफा मिळविण्यास प्रोत्साहन देण्यात येते. जे कारखाने अशा रीतीने आपला नफा वाढवितील त्यातील कामगारांना बोनस आणि इतर सवलती देण्याची मुभा देण्यात आली आहे. उत्पादनाची वाढ होण्यासाठी योजण्यात आलेल्या ह्या उपायांचा फायदाही दिसून येऊ लागला आहे. नफा मिळविण्यास प्रेरणा मिळाल्यामुळे ह्या कारखान्यातील उत्पादनात ८.२ टक्के वाढ झाली आहे. नियोजनातील त्यांचे उद्दिष्ट ६.७ टक्क्यांची वाढ करण्याचे होते. कार्यक्षम आणि अकार्यक्षम कारखान्यांची आता स्पर्धा निर्माण होत आहे. त्यामुळे अकार्यक्षम कारखाने मोडकळीस येऊन रशियातील कारखानदारीपुढे नवे प्रश्न उत्पन्न होऊ लागतील.

---

## केरळमधील खनिज संपत्तीचा विकास

केरळ राज्यातील लोखंडाच्या खाणींचा विकास करण्यासाठी हंगेरीच्या सरकारने मदत देऊ केली आहे. मदतीचा उपयोग कोझीकोडे येथील लोखंडाच्या खाणीसाठी आणि बिडाचे लोखंड व पोलाद तयार करण्याच्या कारखान्यांसाठी होण्याची शक्यता आहे. हंगेरी आणि भारत ह्यांच्या दरम्यान गेल्या वर्षी झालेल्या कर्जाच्या कराराप्रमाणे भारताला २५ कोटी रुपये कर्ज मिळणार आहे. कर्जाचा फायदा खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक प्रकल्पांना मिळणार आहे. रकमेचा वापर १९७९ पर्यंत करावयाचा आहे. कर्जातील काही रकमेचा उपयोग करून केरळमध्ये एक काचेचा कारखानाही उभारण्यात येण्याचा संभव आहे. काच तयार करण्यासाठी लागणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या वाळूचा चार कोटी टन साठा केरळ राज्यात उपलब्ध होण्यासारखा आहे.

---

## स्वेटलानाची इस्पितळासाठी देणगी

जोसेफ स्टॅलिन ह्यांची कन्या स्वेटलाना रशियातून पळून जाऊन अमेरिकेत स्थायिक झालेली आहे. रशियातील स्वतःच्या जीवनाविषयी तिने अमेरिकेत एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. ह्या पुस्तकामुळे मिळालेल्या पैशांतून कालाकंकर येथे एक इस्पितळ उभारण्यात यावे अशी इच्छा तिने प्रगट केली आहे. स्वेटलानाच्या हिंदी पतीचे मूळचे गाव म्हणजेच उत्तर प्रदेशातील कालाकंकर हे खेडे. ह्या खेड्यात डॉ. भगवानदास नागर हे अनेक लोकांना वैद्यकीय उपचार करीत असतात. सुमारे २५ हजार लोकांना त्यांच्या ज्ञानाचा फायदा होत आहे. परंतु खेड्यांतील वैद्यकीय सोयी वाढविण्यासाठी पुरेसा पैसा नव्हता. आता स्वेटलानाच्या देणगीमुळे अधिक वैद्यकीय सोयी उपलब्ध होऊ शकतील.

---

## कुक्कुटपालनाच्या धंद्याला धोका

उत्तरप्रदेशातील इज्जतनगर ह्या ठिकाणी कोंबड्यांना होणाऱ्या रोगांविषयी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. राज्यांतील १३० वैद्यांनी आणि संशोधक-शास्त्रज्ञांनी त्यात भाग घेतला होता. भारतात कोंबडी पाळण्याच्या धंद्यात परदेशांतून निरनिराळ्या प्रकारच्या कोंबड्या आयात करण्यात येत असतात. परंतु त्यांच्या आयातीमुळे काही प्रकारचे अज्ञात रोगही येत आहेत. शिवाय काही विशिष्ट प्रकारची विषबाधाही कोंबड्यांना भोवत आहे, असा इशारा परिसंवादात देण्यात आला. ह्या रोगांचा प्रसार झाला तर कुक्कुट पालनाच्या धंद्याला फार मोठा धोका उत्पन्न होण्याची शक्यता असल्याने रोगसंशोधनाच्या व रोगचिकित्सेच्या प्रयोगशाळांची देशभर स्थापना करण्यात यावी असे सुचविण्यात आले आहे.

---

## बिहारमधील दुष्काळाचा शेवट

बिहार राज्यातील दुष्काळी परिस्थिती संपल्याने तेथील अखेरचे दुष्काळ सहायक-केंद्र बंद करण्यात आले आहे. जून १९६८ अखेर संपणाऱ्या शेतीच्या वर्षात राज्यात ८५ लाख टन अन्नधान्याचे उत्पादन होईल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. दुष्काळ पडण्यापूर्वीच्या उत्पादनाची वार्षिक सरासरी ७३ लाख टनांची आहे. बिहारमध्ये दोन वर्षे लागोपाठ अवर्षणाची गेली. त्यामुळे राज्यातील ओलित जमिनीचे क्षेत्र वाढविण्याकडे कटाक्षाने लक्ष पुरविण्यात आले. दुष्काळापूर्वी १८ लाख एकर जमिनीलाच काय ती पाण्याच्या निश्चित पुरवठ्याची सोय होती. आता पाण्याखाली आलेल्या जमिनीचे क्षेत्र ३५ लाख एकर झाले आहे. राज्यात एकूण २.१ कोटी एकर जमीन लागवडीखाली होती. पाणीपुरवठ्याच्या सोयी वाढल्या असल्या तरी यंदाच्या हंगामाची सुबत्ता भरपूर पावसामुळेच झालेली आहे.

---

## पवित्र वस्तूंच्या चोऱ्या सर्वत्रच होतात

मंदिरामधील सोन्याच्या अगर चांदीच्या मूर्ती चोरीला गेल्याच्या वार्ता मधूनमधून येत असतात. अशा चोऱ्या फक्त भारतातच होतात असे मानण्याचे कारण नाही. इंग्लंड, अमेरिका, रशिआसारख्या प्रगत देशांतही चर्चमधील पवित्र वस्तू चोरीला जातात. रशिआतील राजवट धर्माच्या बाबतीत उदासीन आहे म्हणून तेथे चोऱ्या होतात, असेही नाही. इंग्लंडमध्येही चर्चमधील वस्तूंच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले दिसते. तेथील एका धर्मोपदेशकांनी अशी जाहीर तक्रार केली आहे की पवित्र वस्तूंची चोरी झाल्याशिवाय एकही दिवस सुना जात नाही. ह्या चोऱ्या करणाऱ्या संघटित टोळ्याच असाव्यात असा तर्क आहे. जुनी शिरस्त्राणे, चिलखते, इत्यादी वस्तूही चोरीच्या कक्षेतून सुटलेल्या नाहीत. कारण, अशा वस्तूंना चांगली किंमत येते. ज्याचा इतिहास माहीत आहे अशा प्रकारचे एक शिरस्त्राण अमेरिकेत अलीकडेच १६ हजार रुपयांना विकले गेले. इंग्लंडमधील एका चर्चमधून एक तिजोरी पळविण्यात आली. तिची किंमत १० हजार रुपये आली. ख्रिस्ती व मुसलमान राष्ट्रांत झालेल्या धर्मयुद्धांसाठी वर्गणी गोळा करण्यासाठी ह्या तिजोरीचा उपयोग करण्यात आलेला होता. सीलोनमध्येही पवित्र वस्तूंच्या चोऱ्या होत आहेतच. तेथील एका विहारात असलेली बुद्धाची सोन्याची मूर्ती अलीकडेच चोरीला गेली. धार्मिक दृष्टीने पवित्र मानल्या गेलेल्या वस्तूंकडे चोरांनी आपला मोर्चा वळवावा ही गोष्ट धर्मश्रद्धेचा झपाट्याने लोप होत असल्याची द्योतक म्हणावी काय? इजिप्तमधील पिरॅमिडच्या आतील वस्तू तर कित्येक हजार वर्षे चोरीला गेलेल्या आहेत. त्यांच्यावर घातलेल्या मंत्रांनाही चोर घाबरले नाहीत.

---

## खनिज तेलापासून अन्नाची निर्मिती

मनुष्यजातीच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रथिनयुक्त अन्नाला फार महत्त्व आहे. आहारात प्रथिनांचे प्रमाण योग्य तितके नसले तर निरोगी जीवन जगता येत नाही. जगातील लोकसंख्या वेगाने वाढत असल्यामुळे साध्या अन्नाचासुद्धा तुटवडा पडू लागला आहे; मग प्रथिनयुक्त सकस आहाराची गोष्टच नको. तथापि, तुटवडा भरून काढण्याचे अनेक प्रकारचे प्रयत्न होत आहेत. ब्रिटिश पेट्रोलिअम कंपनीने खनिज तेलापासून प्रथिनयुक्त अन्नपदार्थ बनविण्यासाठी फ्रान्समध्ये एक कारखाना काढण्याचे ठरविले आहे. १९७० च्या सुमारास कारखान्यात हा नवा पदार्थ तयार होऊ लागेल. तो रंगाने गुळी साखरेसारखा दिसेल. कारखाना दरसाल १६ हजार टन अन्नपदार्थ निर्माण करू शकेल, आणि त्याच्या उभारणीसाठी २० लाख पौंड भांडवल लागेल. अविकसित देशांतील बहुसंख्य लोकांना प्रथिनयुक्त अन्नाची फार गरज आहे.

---

## हिंदी संशोधकांना मोलाचा सल्ला

म्हैसूर विद्यापीठाने हवामान शास्त्रासंबंधी एक व्याख्यानमाला गुंफली होती. व्याख्यानमालेत सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन ह्यांनी एक व्याख्यान दिले. आपल्या भाषणात ते म्हणाले की हिंदी शास्त्रज्ञांनी आपले संशोधनाचे काम साहसी जिज्ञासूवृत्तीने केले पाहिजे. अमेरिका अगर इतर देशांतून करण्यात आलेले संशोधन १०० टक्के बरोबर आहे असे मानता कामा कामा नये. इतर देशांतील शास्त्रज्ञांनी स्वतःच्या संशोधनाविषयी आत्मविश्वास बाळगला तरी तो संपूर्णपणे योग्य असतोच असे नाही. म्हणून हिंदी शास्त्रज्ञांनी आपली तार्किक बुद्धी बाजूला ठेवणे इष्ट नाही. इतर शास्त्रांप्रमाणेच हवामान शास्त्रालाही हा मुद्दा लागू आहे. पृथ्वीवरील वनस्पतींवर व प्राण्यांवर हवामानाचा फार मोठा परिणाम होत असतो. म्हणून ह्या शास्त्राचा अधिक खोल अभ्यास होणे अगत्याचे आहे. हवामानाचा अभ्यास करण्याचे काम बहुधा सरकारी नोकरीतील हवामान शास्त्रज्ञांवरच सोपविण्यात आलेले असते. हे शास्त्रज्ञ बहुधा आपल्यापुढील दप्तरे चाळण्यातच गढलेले असतात. अर्थातच संशोधन करण्यास त्यांना पुरेसा वेळ नसतो. म्हणून हवामानाच्या संशोधनाचे काम विद्यापीठांनी आणि इतर ज्ञानसंवर्धक संस्थांनी स्वतःच्या अंगावर घेतले पाहिजे. पृथ्वीवरील हवामानाचा अभ्यास करताना विवक्षित भागांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी हवामानाचा साकल्याने अभ्यास करण्यात आला पाहिजे. कारण, एखाद्या विशिष्ट ठिकाणच्या हवामानावर फार दूर असलेल्या भौतिक परिस्थितीचाही परिणाम होत असतो. सत्याचा शोध करताना जवळचा मार्ग बरोबरच असतो, असे मानता येत नाही.

---

## नेहमीचे अन्नपदार्थ सकस केले पाहिजेत

मुंबईमध्ये अन्नप्रश्नावर एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादात संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेचे एक अधिकारी मि. विल्यम हास ह्यांनी भाग घेतला होता. ते आपल्या भाषणात म्हणाले की ज्या देशातील बहुसंख्य लोकांना प्रथिनयुक्त अन्नाचा पुरेसा पुरवठा होत नाही तेथील लोकांची बौद्धिक वाढ खुंटल्याशिवाय राहात नाही. ह्याचा परिणाम राष्ट्रजीवनावर होणे अपरिहार्यच असते. भारतात सध्या जे नेहमीचे अन्नपदार्थ वापरण्यात येतात त्यांत प्रथिनयुक्त पदार्थ मिसळून ते अधिक सकस करण्याची जरुरी आहे. तरच भारतामधील अन्नाचा दर्जा आहारशास्त्रदृष्ट्या सुधारेल. उदाहरणार्थ, आट्यात जर भुईमुगाचे पीठ काही प्रमाणात मिसळले तर तो अधिक पोषक करता येतो.

---

## किसान विद्यापीठ फौंडेशन

### स्वावलंबनावर भर देणारा एक आगळा, वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण प्रयोग

### ( "धरती" द्वारा परिचय )

किसान विद्यापीठ फौंडेशनचा अल्पसा परिचय करून द्यावा ह्या हेतूने फौंडेशनने "धरती दिवाळी प्रकाशन १९६७" प्रसिद्ध केले आहे. श्री. गजानन भोगावकर हे त्याचे संचालक असून श्री. रॉय किणीकर हे संपादक आहेत. कोणत्याही नामवंत दिवाळी अंकाची बरोबरी करणारे, नामवंत लेखकांचे उत्कृष्ट साहित्य ह्या प्रकाशनात दिलेले असून रंगीत व साध्या अशा भरपूर चित्रांनी ते विशोभित करण्यात आलेले आहे. जाहिरातींची योजनाही चातुर्याने करण्यात आली असून प्रत्येक जाहिरातीमध्ये काहीतरी मार्गदर्शनपर पण सोप्या भाषेत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने दिलेला संदेश आहे. ह्या प्रकाशनास साहित्यिकांचा आणि फौंडेशनच्या कार्यक्षेत्रातील जाहिरातदारांचा मिळालेला हार्दिक पाठिंबा आश्चर्यकारक वाटेल. परंतु ज्यांना श्री. गजानन भोगावकरांच्या कर्तृत्वाची माहिती आहे, त्यांना त्यात श्री. भोगावकरांच्या सामाजिक कार्याची वानगीदाखल केवळ पावतीच असलेली आढळेल.

### फौंडेशनचा स्वावलंबनावर भर

कोल्हापूरपासून अवघ्या अठरा मैलांच्या अंतरावर, पन्हाळा तालुक्यात कासारी नदीच्या रम्य खोऱ्यात, साध्या १५०-२०० उंबरठ्याच्या डोंगराळ खेड्यात एक नवी आगळी संस्था उदय पावत आहे. किसान विद्यापीठ फौंडेशन, बाजार भोगाव, हे त्या संस्थेचे नाव.

या सर्व संकल्पाची प्रमुख मदार, ग्रामीण जीवनात सुयोग्य असा बदल घडवून आणणे यावर आहे. ज्या शेतकरी विभागाचा विकास घडवून आणावयाचा आहे त्याचे साहाय्य मिळवावे, त्याच बरोबर स्वतःच्या पायावर शक्य तितके लौकर स्वतः उभे राहावे अशी या संस्थेची प्रयत्नशील धारणा आहे.

शेती, शेतीचे जोडधंदे, शिक्षण, आरोग्य, या आणि अशा इतर मूलभूत विषयांकडे विशेषत्वाने लक्ष द्यावे असे फौंडेशनने ठरविले आहे. या कामी 'पन्हाळा बावडा सहकारी संघाने' आपली 'एक्स्टेन्शन विंग' विधायक कामासाठी चालू करून तिचे चालकत्वात फौंडेशनला प्रमुख वाटा दिला आहे. संघामार्फत दुधापासून चीज व इतर पदार्थ तयार करण्याची योजना, त्याच बरोबर सुधारलेले बियाणे, कंपोस्टखते,इत्यादी कामे मोठ्या प्रमाणात-या विभागातील शेतकऱ्यांना हवी असलेली माहिती व सर्व साहाय्य देऊन-चालू केलेली आहेत. या कामी संघातर्फे दोन शास्त्रज्ञ काम करीत आहेत.

नव्या पिढीवर योग्य संस्कार व्हावेत या हेतूने शिक्षण-क्षेत्रात पहिले पाऊल टाकून फौंडेशनने अकरावीअखेर एक माध्यमिक विद्यालय चालू केले आहे. पन्हाळा व गगनबावडा या मागासलेल्या ग्रामीण विभागातील अत्यंत बुद्धिमान विद्यार्थ्यांची केवळ गुणवत्तेवर निवड करून त्यांच्या सर्वांगीण शिक्षणाची सर्व जबाबदारी या संस्थेने उचललेली आहे. माध्यमिक विद्यालयास पूरक म्हणून एक वसतिगृहही संस्थेने चालू केले आहे. सर्वोच्च शिक्षण घेतलेल्या ध्येयवादी अध्यापकवर्गाने ही सर्व जबाबदारी पार पाडण्याचे पत्करले आहे.

चालू आणि संकल्पित सर्व योजनांची योग्य ती नोंद घेऊन गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स, पुणे, या संस्थेने फौंडेशनच्या कार्यक्रमात सहभागी होऊन या भागातील ग्रामीण जीवनाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपाची मीमांसा करावी या उच्च उद्देशाने पदव्युत्तर शिक्षणासाठी एक संशोधनाचे प्रायोगिक केंद्र म्हणून किसान विद्यापीठ फौन्डेशनची निवड केली आहे.

श्री. ग. शं. भोगावकर हे किसान विद्यापीठ फौंडेशन या संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष असून डॉ. वि. म. दांडेकर ( डायरेक्टर, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिक्स, पुणे ), काव्यश्री ग. दि. माडगूळकर, पद्मश्री पु. ल. देशपांडे व दलित भारताचे नेते यशवंतराव ऊर्फ भय्यासाहेब भीमराव आंबेडकर हे मान्यवर सभासद फौंडेशनच्या संचालक मंडळावर आहेत.

किसान विद्यापीठ फौंडेशनच्या विकसनशील संकल्पासाठी बाजार-भोगावच्या दानशूर ग्रामस्थांनी सुमारे ४० एकर जमीन देणगी म्हणून दिली आहे.

---

## अमेरिकेत तेलगूचा अभ्यास

टेक्सस विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आता तेलगू भाषेचा अभ्यास करता येऊ लागला आहे. या विद्यापीठात यापूर्वी संस्कृत, हिंदी व मराठी या भाषांचा अभ्यास करण्याची सोय केली आहे. टेक्सस विद्यापीठातील निरनिराळ्या भाषांचा अभ्यास करून एम. ए. व पीएच. डी. या पदव्या घेता येतात. या सोईमुळे विद्यार्थ्यांना भाषांच्या अभ्यासात आधुनिक भाषाविषयक पद्धतीचा अवलंब करता येतो. या विद्यापीठात इंग्रजी व इतर पाश्चात्त्य भाषांतील ३०,००० पुस्तके आणि पौर्वात्य भाषांतील २०,००० पुस्तके आहेत. तेथे पाश्चात्त्य भाषांतील २,४०० व पौर्वात्य भाषांतील ४०० नियतकालिके येतात. संशोधन, व्यापार व उद्योगधंदे यांसाठी ज्यांना आशिआतील भाषांवर प्रभुत्व मिळविण्याची जरुरी असते अशा तज्ज्ञांनाही या विद्यापीठात भाषांचा अभ्यास करण्याची सोय केलेली आहे.

## कॅनडाची भारताला होणारी मदत

भारताच्या आर्थिक विकासाला मदत करणाऱ्या देशांत अमेरिकेचा क्रम पहिला लागतो. ह्याचा अर्थ, इतर पाश्चात्त्य देशांकडून व रशिआकडून मिळणारी मदत त्या मानाने कमी असते इतकेच. कॅनडाकडून भारताला विविध क्षेत्रांत मदत मिळत आहे. त्या देशातील शेतीविषयक तज्ज्ञांची १० जणांची एक तुकडी लवकरच भारतात येऊन काम करणार आहे. कोसी नदीच्या खोऱ्याचा विकास करण्यासाठी कॅनडाने ६० कोटी रुपयांची मदत ह्यापूर्वीच केलेली आहे. नव्याने जाहीर झालेल्या मदतीमुळे कॅनडाकडून येणाऱ्या मदतीत आणखी भर पडली आहे. भारताच्या सध्याच्या बिकट अन्नधान्य परिस्थितीत अमेरिकेखालोखाल कॅनडाने महत्त्वाचे साह्य केलेले आहे. परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीची पुष्कळदा जोराची जाहिरात करण्यात येते. पण कॅनडाकडून मिळणारी मदत गाजावाजा न करता देण्यात येत आहे. कॅनडाकडून भारताला मिळणाऱ्या मदतीचा अनेक क्षेत्रांत उपयोग झाला आहे व होत आहे. खाणींचा विकास, औद्योगिक योजना, विद्युत्निर्मितीच्या योजना ह्या क्षेत्रांत कॅनडाने परिणामकारक मदत दिलेली आहे. अणुशक्ती केंद्राबाबतही कॅनडा मदत देत आहेच. कोसी आणि गंडक नदीच्या विभागांतील अनेक मोठ्या व छोट्या योजना पूर्ण झाल्या की सुमारे १० लाख एकर जमिनीला पाणीपुरवठ्याची हमी मिळेल. पाणीपुरवठा निश्चित झाल्यामुळे ह्या भागातील शेतकऱ्यांना अनेक पिके काढणे शक्य होणार आहे. पण हे कार्य बरेच गुंतागुतीचे, खर्चाचे आहे. कॅनडाने नव्याने देऊ केलेल्या मदतीमुळे ते पार पाडता येण्यासारखे आहे. कोसी व गंडक नद्यांच्या खोऱ्यांतील शेतीवरील आपत्ती दूर करण्यासाठी नव्या मदतीचा चांगला उपयोग होईल.

---

## भरतपूरमधील उद्योगधंद्यांची पुरामुळे हानी

राजस्थानमधील भरतपूर शहराला पुराचा धोका निर्माण झाला होता, तो टळला. परंतु शहरातील औद्योगिक विभागात पाणी घुसल्यामुळे कारखाने बंद पडून उत्पादन थंडावले. त्यामुळे कित्येक कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. सुमारे ६ हजार कामगार, कारखाने बंद पडल्यामुळे, बेकार झाले आहेत. पुरामुळे कारखान्यांचे इतके नुकसान झाले आहे की ते चालू वर्षअखेर चालू न होण्याची शक्यता आहे. काही कारखान्यांचे मालक भरतपूरहून आपले कारखाने हलविण्याचा विचार करीत आहेत. शहरातील औद्योगिक भागात पुराचे पाणी शिरू नये म्हणून राज्य सरकारने पुरेसे उपाय योजले नाहीत अशी त्यांची तक्रार आहे. गेल्या काही वर्षांत मोतीसागरातून बाहेर पडलेल्या पाण्यामुळे अनेकदा पुराचा उपद्रव पोचलेला आहे. भरतपूर जिल्हा हा खालच्या पातळीवर असल्याने त्यात उत्तर, दक्षिण आणि पश्चिम भागातून पुराचे पाणी घुसू शकते.

## पाकिस्तानात हुंडा-नियंत्रण

पश्चिम पाकिस्तान असेंब्लीने हुंडा नियंत्रणाबाबत कायदा मंजूर केला आहे. ह्या कायद्यान्वये, विवाहाचे आधी, वेळी किंवा मागाहून हुंड्याच्या जिनसा व अहेर ह्यांचे प्रदर्शन करण्यास बंदी झाली आहे आणि हुंडा ही वधूची मिळकत झाली आहे.

---

## माणसाच्या वेषावरून त्याचे इंग्रजीचे ज्ञान ठरवतात!

"मनुष्य कसा दिसतो, त्यावरून त्याला इंग्रजी येते किंवा नाही ह्याचा कित्येक वेळा अंदाज केला जातो. मी रायपेठा इस्पितळात माझ्या आजारी पत्नीला भेटायला गेलो असताना तेथे कामावर असणाऱ्या नर्सने मला "इंग्रजी येते का?" असे विचारले."—मद्रास राज्याचे मुख्य मंत्री श्री. अण्णादुराई.

---

## फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनला तोटा

फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशला १९६६-६७ मध्ये ५·४४ लक्ष रु. नुकसान आले. कॉर्पोरेशनला ५·३८ लक्ष रु. ची कर्जे लिहून टाकावी लागली.

---

## एअर इंडिया व इं. ए. कॉ. ला संपामुळे नुकसान


कर्मचाऱ्यांच्या संपामुळे गेल्या तीन वर्षांत एअर इंडिया आणि इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशन ह्यांना अनुक्रमे ३४·९ लक्ष रु. आणि २३·६ लक्ष रु. नुकसान सोसावे लागले. एअर इंडियाच्या विमानांच्या मेंटेनन्स इंजिनिअर्सनी नुकताच संप केला, त्यामुळे एअर इंडियाचे दररोज ४ लक्ष रु. नुकसान झाले.

---

**मध्यवर्ती बँकांचे बँक रेट**

| | |
|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ८% |
| भारत, कॅनडा | ६% |
| जपान | ५·८४% |
| स्वीडन | ५% |
| यू. एस. ए., नेदरलंड्स | ४·५% |
| बेल्जम | ४% |
| फ्रान्स, इटली | ३·५% |
| स्वित्झरलंड, प. जर्मनी | ३% |

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

नवीन आकर्षक दर
नव्या सवलती
**संचित मुदत ठेव**
( क्युम्युलिटिव्ह डिपॉझिट )
कोणत्याही शाखेत समक्ष भेटा.

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.,
सातारा.

मराठवाडामध्ये लवकरच नवीन शाखा
सुरू होत आहे.

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
१, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

: विभागीय कचेरी :
महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. ५,७२,४२,००० |
| ठेवी | ... | रु. ५०,९५,६३,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. १,०६,६५,९६ ००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :
( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( पूर्व ) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :
(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. शु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.
श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.





हें पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केलें.


ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175


# अर्थ

वर्ष ३३ | पुणे, बुधवार २० डिसेंबर, १९६७ | अंक २४




STUSA 11/66



नांगर, पंपिंग सेट, पेरणी यंत्रें, कल्टिवेटर, ऊसाचे चरक, स्लूस व्हाल्व, शेगायंत्रें यांसारख्या किर्लोस्कर यंत्रांवर महत्त्वाकांक्षी शेतकरी व बागाईतदार आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं भरंवसा ठेवतात. शेती व बागाईत यांचें उत्पादन वाढविण्यांत हीं यंत्रें महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**
किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली

## अर्थमंत्र्यांनी बँकिंगचे नवे धोरण जाहीर केले

" शेती, लघु उद्योग आणि निर्गत ह्यांना वाजवी प्रमाणात बँकांकडून कर्जपुरवठा होत नाही, मोठ्या कारखानदारीलाच मुख्यत: कर्जे मिळतात, अशा दीर्घ काळ तक्रारी आहेत. विकासाच्या गरजा लक्षात घेऊन बँकांचा कर्जपुरवठा नियंत्रित करणे आवश्यक आहे. भारतातील बँका उद्योग-व्यापार समूहांनी स्थापन केलेल्या असून त्यांचा बँकांशी परंपरागत घनिष्ट संबंध आहे. बँकांच्या कर्जविषयक धोरणावर इतर हितसंबंधांची काहीच छाप पडू शकत नाही. बरीचशी कर्जे डायरेक्टरांना व त्यांचे हितसंबंध असलेल्या फर्म्सनाच मिळतात. बडे व्यापारी, कारखानदार व बँका ह्यांची ही साखळी तोडली पाहिजे, निदान तिचा प्रभाव कमी केला पाहिजे, बँकांचे कर्जविषयक धोरण व्यापक केले पाहिजे आणि देशाच्या आर्थिक विकासातील अग्रहक्कांना अनुसरून बँकांनी कर्जे दिली पाहिजेत, असे सरकारचे ठाम मत आहे. काही विशिष्ट लोकांनाच कर्जे मिळत राहणे बंद केले पाहिजे, बँकांचा मोठ्या उद्योगधंद्यांकडील कल इतरत्र वळविला पाहिजे आणि बँकांचे कर्जविषयक निर्णय आर्थिक विकासाच्या अग्रस्थानांना पोषक असायला हवेत.

" ह्यासाठी बँकांच्या व्यवस्थापनाला मार्गदर्शक सूचना देऊन त्याच्या अंमलबजावणीवर नजर ठेवायला हवी. आजच सर्व बँकांचे राष्ट्रीयीकरण करायचे म्हटले तर त्यासाठी आवश्यक ते अधिकारी उपलब्ध करून देणे सरकारला शक्य होणार नाही. बँकांचे भाग कोणाच्याही मालकीचे असोत, त्यांचे वजन डायरेक्टर बोर्डाच्या घटकांच्या निवडीवर किंवा कर्ज देण्यावर पडता कामा नये.

" बँक-कर्जाची मागणी वारंवार तपासून त्यांचा अनुक्रम ठरविणे हे महत्त्वाचे काम आहे. त्यासाठी नॅशनल क्रेडिट कौन्सिलची स्थापना करण्यात येणार आहे.त्यात मोठे, मध्यम व लहान उद्योगधंदे, शेती, सहकारी विभाग, व्यापारी, बँकर्स, अर्थशास्त्रज्ञ, चार्टर्ड अकौंटंट्स, इत्यादींचा समावेश असेल. अर्थमंत्री आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर हे अनुक्रमे चेअरमन आणि व्हाइस चेअरमन राहातील. ह्या कौन्सिलमधील चर्चेचा सरकारला व रिझर्व्ह बँकेला पुढील कारवायांचे बाबतीत उपयोग होईल. रिझर्व्ह बँकेचे अधिकार वाढविणारे एक बिल पार्लमेंटला सादर केले जाईल. आतापर्यंतचे अधिकार ठेवीदारांच्या हितसंरक्षणाचे दृष्टीने दिले गेले होते; आता अधिक व्यापक, विशिष्ट हेतुपूर्वक दृष्टीने दिले जातील.

" प्रत्येक बँकेचा चेअरमन व्यावसायिक बँकर असेल; आतासारखा उद्योगपती असणार नाही. ह्या नेमणुकीस रिझर्व्ह बँकेची मंजुरी लागेल आणि नेमलेल्या चेअरमनला रिझर्व्ह बँक काढूनही टाकू शकेल. बोर्ड ऑफ डायरेक्टर्समध्ये उद्योगपती अल्पसंख्यांक असतील. रिझर्व्ह बँक स्वत:चा प्रतिनिधी बोर्डावर डायरेक्टर किंवा निरीक्षक म्हणून नेमू शकेल. तूर्त हे सर्व अधिकार २५ कोटी रु. वरील बँकांचे बाबतीत अमलात येतील आणि हळूहळू इतरही बँकांना ते लागू केले जातील. डायरेक्टर्स आणि त्यांचा हितसंबंध असलेल्या फर्म्स ह्यांना कर्जे दिले जाणार नाही. बोर्डावर आहे म्हणून कोणत्याही व्यक्तीस कर्ज मिळणार नाही. कर्ज घेणाऱ्यांना बँकेच्या लोकल किंवा सल्लागार मंडळावरही राहता येणार नाही. भारतात काम करणाऱ्या विदेशी बँकांना ह्याच पद्धतीने काम करावे लागेल; त्याचा तपशील यथाकाल ठरविला जाईल.

" कोणत्याही बँकेने कायद्याच्या तरतुदींची आणि दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे कामी अळंटळं केली, तर ती बँक सरकारचे ताब्यात घेतली जाईल. सर्व बदल हळूहळू घडवून आणावा लागेल; कर्ज विषयक धोरणात तडकाफडकी बदल करणे इष्ट होणार नाही, ह्याची सरकारला जाणीव आहे. ही उपाययोजना चालू ठेवून दीर्घकालीन योजनाही आखायला हवी; त्यात बचतीच्या वाढीला महत्त्वाचे स्थान आहे. प्रादेशिक बँकिंगचे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवावे लागेल; त्यायोगे त्या त्या प्रदेशातील सर्व आर्थिक घटकांच्या गरजा भागविणे शक्य होईल. ह्यालाही अवधी लागेल. बँकिंगची प्रचलित संघटना एकाएकी बदलता येणार नाही. बँकांचा कारभारही सुधारायला आणि आधुनिक पद्धतीने व्हायला हवा. त्यासाठी सूचना करण्यासाठी एका कमिशनची नेमणूक केली जाईल. बँक अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी ट्रेनिंग इन्स्टिट्यूट स्थापन करण्यात येईल. 'डेमोक्रॅटिक सोशॅलिझम' चे उद्दिष्ट गाठण्यासाठी बँकिंगच्या फेररचनेचा हा सर्व प्रपंच करण्यात येत आहे. "

## अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांची भारताचे राजदूत श्री. बी. के. नेहरूंजवळ स्पष्टोक्ती

" तुमचा भारत अमेरिकेवर नेहमी टीका करतो. पण, अधूनमधून थोडी कृतज्ञताही दाखवीत जा, की ! टीकेला, विशेषत: उपयुक्त टीकेला आमचा विरोध नाही; पण स्तुतीचा एकसुद्धा शब्द कधी असू नये ? अमेरिकन मदतीचा आकार अमेरिकन जनमतावर अवलंबून असतो. नेहमीच टीका ऐकून घ्यावी लागली, तर अमेरिकन जनमत भारताला मदत देण्यास अनुकूल कसे राहाणार ? भारताने अलिप्ततेचे धोरण ठेवायला हरकत नाही, पण त्याचा कल मात्र बहुतेक वेळा एकाच बाजूला मनस्वी असतो. पश्चिम आशियाच्या प्रश्नावर भारताने फारच अमेरिका–विरोधी पक्षपात केला. भारत अन्नधान्याचे बाबतीत स्वयंपूर्ण का होऊ नये ? मी भारताचे आकाश बघण्यात जेवढा वेळ खर्च करतो, तेवढा अमेरिकेचे आकाश बघण्यात खर्च करीत नाही. भारताने भलेपणा दिला नाही तरी भारतातील हवामानाचे रिपोर्ट अमेरिकेच्या शेतकी खात्यानेच अभ्यासून भारतातील पावसाचे मान व त्याचा तेथील पिकांवर परिणाम हे सांगायचे, हा आहे की नाही न्याय ! "

# ★ अर्थ ★

बुधवार, २० डिसेंबर, १९६७





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## उच्च पातळीचे विचार; अंमलबजावणी हीनतेची

### बँकांच्या सामाजिक नियंत्रणाबाबत श्री. चिंतामणराव देशमुखांचे मत

बँकांवरील सामाजिक नियंत्रण अमलात आणण्यासाठी भारत सरकार लवकरच कायदा करणार आहे. अशा प्रकारची नियंत्रणाची योजना बँकांच्या राष्ट्रीयीकरणातील पहिला टप्पा ठरण्याची शक्यता आहे. बँकांवरील सामाजिक नियंत्रणासंबंधी हैद्राबाद येथे एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादाचे उद्घाटन रिझर्व्ह बँकेचे एक भूतपूर्व गव्हर्नर श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनी केले. श्री. देशमुख ह्यांनी सुमारे १० वर्षांपूर्वी आयुर्विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण सुलभतेने घडवून आणले आहे. परिसंवादात बोलताना श्री. देशमुख म्हणाले की सामाजिक नियंत्रणासंबंधीच्या संकल्पित कायद्याला कोर्टात सनदशीर आव्हान दिले जाण्याची शक्यता आहे. कारण, अशा प्रकारचा कायदा व्यक्तीच्या मालमत्ताविषयक हक्कांवर आक्रमण करणारा आहे. बँकांच्या सामाजिक नियंत्रणाविषयी जो कायदा करण्यात येणार आहे, त्यामुळे कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई न देता लोकांच्या ठेवींवर नियंत्रण ठेवण्याची सत्ता सरकारला प्राप्त होणार आहे. ही गोष्ट हिंदी राज्यघटनेच्या चौकटीत बसणारी नाही. ह्या कायद्यामुळे शेतीकडे भांडवलाचा ओघ अधिक प्रमाणात वळविण्याचा अधिकार सरकारला मिळणार आहे. भांडवलाचा ओघ अशा तऱ्हेने वळविताना बँकिंगच्या व्यवहारांची जबाबदारी पाळण्याचे बंधन मात्र सरकारवर राहणार नाही. बँकिंगच्या धंद्यावर अशा प्रकारचे नियंत्रण ज्या देशात बँकिंगचे राष्ट्रीयीकरण करण्यात आलेले आहे त्याच देशात फक्त घालण्यात आलेले आहे. इतर कोणत्याही देशात असे नियंत्रण नाही.

ह्यापूर्वी इंपीरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आलेले आहे. बँकिंगची ही पद्धत अनुसरण्यात काही गैरफायदे आहेत. ते लक्षात घेण्यात आले पाहिजेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले की त्यांच्या व्यवहारावर मंत्र्यांचे दडपण येण्याची शक्यता उत्पन्न होते. भारतात अशा प्रकारचे राजकीय दडपण आलेले आहे किंवा काय हे सांगणे मात्र कठीण आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रयोगाला हात घालण्यापूर्वी ह्या धंद्यातील तज्ज्ञांचे एक चौकशी मंडळ नेमण्यात यावे. १४ वर्षांपूर्वी स्टेट बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तेव्हापासून त्याचा कारभार कसा काय चालला आहे ह्याची चौकशी ह्या मंडळाने करावी. व्यापारी बँका शेतीला पुरेशा प्रमाणावर कर्जे देत नाहीत असा आरोप करण्यात येतो. पण, शेतीच्या व्यवसायाला कर्जे देणे ही बाब मुळातच जोखमीची आहे. कारण, खुद्द शेतीचा व्यवसायच फार मोठ्या जोखमीचा आहे. सध्या भारतापुढे खरी मूलभूत अडचण आहे ती वेगळीच आहे. उच्च पातळीवरचे विचार आणि त्यांची हीन दर्जाची अम्मलबजावणी, हा देशापुढील पायाभूत प्रश्न आहे. ह्या दोन परस्पर विरोधी गोष्टींची सांगड कशी घालावी ही खरी समस्या आहे. देशातील राजकारभाराची यंत्रणा एकसारखी घरंगळत चाललेली आहे. इतर अनेक कारणांबरोबरच राजकीय पातळीवरून घेतलेल्या निर्णयांचा खालावलेला दर्जा हे त्याचे एक प्रमुख कारण आहे. बँका आणि उद्योगधंदे ह्यांचे निकटचे संबंध लक्षात घेता राष्ट्रीयीकरणाचा प्रयोग करावयाचाच असला तर सावधगिरीने करण्यात आला पाहिजे.

ह्या वर्षीच्या मदन स्मारक व्याख्यानात बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की आर्थिक व सामाजिक विकासाच्या योजना आणि शिक्षण ह्यांची सांगड भारतात घालण्यात आलेली नाही. प्रत्येक व्यक्तीला आपल्या उद्योगव्यवसायात छापील मार्गदर्शनाचा फायदा घेता येईल इतकी साक्षरता प्राप्त झालेली असली पाहिजे. ह्या बाबतीत बँकर्सनी आपली कामगिरी बजावलेली नाही. ग्रामीण भागांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी अधिक जोरदार प्रयत्न करावयास पाहिजे होते. भारतामधील चलनव्यवस्था शहरांच्या परिसरातच मुख्यतः वावरत आहे. ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांच्या जीवनव्यवहारांशी ह्या पद्धतीचा काही संबंध असलाच तर तो अतिशय नाजूक आणि प्रयोगात्मक आहे. ह्यावरून असे दिसून येते की ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासाबाबत स्वतःच्या सामाजिक जबाबदाऱ्यांसंबंधी बँकवाल्यांनी अतिशय सकुंचित दृष्टिकोन ठेवलेला आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासासंबंधी त्यांनी अधिक आस्था दाखविली असती तर आर्थिक विकासासंबंधीचे सर्वच चित्र आता आहे त्यापेक्षा बहुधा अधिक उठावदार झाले असते. शेतीच्या मालाच्या उत्पादनाबाबत तर ते विशेष चांगले दिसले असते. निदान इतके तरी म्हणता येईल की बँकिंगच्या धंद्यावर सामाजिक नियंत्रण घालण्याच्या सरकारच्या आग्रहाला कमी आधार सापडला असता.

### बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने राष्ट्राची हानी होईल


रिझर्व्ह बँकेचे एक माजी गव्हर्नर श्री. एच्. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनी मुंबई येथे श्रॉफ मेमोरिअल ट्रस्टच्या विद्यमाने एक व्याख्यान दिले. त्यांच्या भाषणाचा विषय 'नियोजित अर्थव्यवस्थेत मध्यवर्ती बँकिंग संघटनेचे आणि व्यापारी बँकांचे कार्य' असा होता. आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याची कल्पना गैरसमजावर आधारलेली असून तिची अंमलबजावणी झाल्यास देशाच्या हिताला बाधा उत्पन्न होईल. राष्ट्रीयीकरणामुळे बँकांच्या कारभाराचा दर्जा सुधारेल अशीही शक्यता नाही. उलट, ज्या क्षेत्रांत राजकारणाला प्रवेश असू नये त्या क्षेत्रांत ते घुसण्याचा मात्र संभव आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्समधील बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. परंतु नंतर आलेला अनुभव निराशाजनक आहे. व्यापारी बँकांविरुद्ध दोन आरोप केले जातात. एक असा की कर्ज देण्याच्या बाबतीत त्यांनी अग्रहक्काची कोणतीच पद्धत अनुसरली नाही. दुसरा आरोप असा की त्यांनी शेतकऱ्यांना फारसे कर्ज कधीच दिले नाही. परंतु हे दोन्ही आरोप चुकीचे आहेत. ह्या बाबतीत खरी परिस्थिती अशी आहे की आजवर बँकांनी काय करू नये तेवढेच त्यांना सांगण्यात आले. काय करावे ह्यासंबंधी क्वचितच मार्गदर्शन करण्यात आले; कर्जे देण्याबाबत अग्रहक्कांची पद्धत अमलांत आणण्याचे काम एखाद्या मध्यवर्ती संघटनेने करावयास पाहिजे होते. पण अशी संघटनाच नव्हती. तेव्हा ह्या संबंधीचा दोष बँकांचा होऊ शकत नाही. भारतात राष्ट्रीयीकरण झालेल्या उद्योगधंद्यांतील चालक–कामगार संबंध पुष्कळदा खाजगी मालकीच्या औद्योगिक संघटनातील संबंधापेक्षाही बिघडलेले असतात ही गोष्टही लक्षात घेण्यासारखी आहे.

---

### टेलिव्हिजनच्या सेट्सचे उत्पादन

टेलेफुकेन इंडिआ लि. ह्या कंपनीने भारत सरकारकडे टेलिव्हिजन सेट्स तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठी परवाना मागितला आहे. ह्या कंपनीला जर्मन तंत्रज्ञांचे सहकार्य मिळाले आहे. परवाना मिळाल्यास दरसाल १० हजार सेट्स तयार करण्याचा कारखाना कंपनी काढणार आहे. प्रत्येक सेटची किंमत १,५०० रुपये ठेवण्यात येणार आहे. परंतु सरकारने विस्तार करण्याची परवानगी दिल्यास ह्याहीपेक्षा जास्त सेट्स निर्माण करण्याचा कंपनीचा इरादा आहे. सध्या कंपनीने दिल्लीजवळील आपल्या कारखान्यात दरसाल १ लाख, २० हजार ट्रॅन्झिस्टर रेडिओ तयार करू शकेल अशी यंत्रसामग्री बसवलेली आहे. तिचा उपयोग करून टेलिव्हिजन सेट्सचे सुटे भागही निर्माण करता येण्यासारखे आहेत. त्यामुळे येथे निर्माण करण्यात येणाऱ्या सेट्समध्ये अवघे १५० रुपयांचे परदेशी बनावटी भाग वापरावे लागतील.

समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'
किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.

अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठी
किर्लोस्कर
डिझेल
एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे...
कारण, अत्यंत कार्यक्षम व किफायतशीर चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिने, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत.
किर्लोस्कर एंजिने चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सना लागणाऱ्या खर्चाच्या मानाने फारच कमी येतो.


किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)
TOM & BAY
KO 6096 M

## माशांच्या निर्यातीने परदेशी चलनाची प्राप्ती

हिंदी महासागरात अनेक प्रकारचे मासे असल्याने पश्चिम किनाऱ्यावर मच्छीमारीचा धंदा जोराने चालत असतो. ह्या माशांपैकी काही जातींचे मासे अमेरिकेत अतिशय लोकप्रिय झालेले आहेत. गेल्या वर्षी माशांची निर्यात करून भारताने १७ कोटी रुपयांचे परदेशी चलन मिळविले. माशांच्या निर्यातीने मिळणाऱ्या परदेशीय चलनात गेली काही वर्षे सतत वाढ होत आहे. ८ वर्षांपूर्वी माशांच्या निर्यातीमुळे अवघे १ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळाले होते; १९६५-६६ मध्ये ७ कोटी रुपयांचे चलन मिळाले. हिंदी महासागरात सापडणाऱ्या माशांपैकी ३० टक्के मासेच स्थानिक कोळ्यांनी पकडलेले असतात. ह्याचे कारण परदेशीय मच्छीमारीच्या धंद्यात वापरण्यात येणारी आधुनिक उपकरणे हिंदी कोळ्यांच्या जवळ नसतात. मच्छीमारीच्या आधुनिक पद्धतीच्या बोटी, चांगली बंदरे आणि मासे गोठवून ठेवण्याच्या सोई ह्यांची ह्या धंद्याला फार आवश्यकता असते. त्यांच्या अभावी धंदा सुसूत्र चालणे कठीण जाते. गेल्या वर्षी म्हैसूरच्या पश्चिम किनाऱ्यावरील कोळ्यांनी ८६ हजार टन मासळी पकडली. पण त्यापैकी २६ हजार टन माशांचे खतात रूपांतर करावे लागले. कारण, मासे गोठवून टिकविण्याची सोय नव्हती. म्हैसूर सरकारने आता अशी १२ शीतकेंद्रे स्थापन करण्याचे ठरविले आहे. त्यांपैकी ६ लवकरच तयार होतील. म्हैसूरच्या किनारपट्टींत मच्छीमारी करणाऱ्या ३५० यांत्रिक बोटी आहेत. परंतु त्या आकाराने लहान असल्यामुळे खोल समुद्रात त्यांना संचार करता येत नाही. परिणामी, मासे पकडण्याची त्यांची मर्यादा किनाऱ्यापासून ५ ते ६ मैलांपेक्षा दूर असू शकत नाही.

---

## नाल सरोवरात पक्ष्यांसाठी आश्रयस्थान

अहमदाबाद शहरापासून सुमारे ४० मैलांवर निसर्गरम्य असे नाल सरोवर आहे. ह्या सरोवरात उत्तर गोलार्धातील अनेक तऱ्हेचे पक्षी हिवाळ्यात दरसाल येतात. पक्षी-जीवनाचा अभ्यास करणाऱ्या लोकांना व प्रवाशांना ह्या ठिकाणचे फार आकर्षण आहे. गुजरातमधील प्रेक्षणीय स्थळांना भेट देणे हिंदी व परदेशी प्रवाशांना सोईचे व्हावे म्हणून राज्य सरकार दोन हेलिकॉप्टर्स खरेदी करण्याचा विचार करीत आहे.

---

## ठेवींच्या विमासंरक्षणाची मर्यादा आता ५,००० रु.

डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने ठेवींच्या विम्याच्या संरक्षणाची मर्यादा सध्या १,५०० रु. आहे ती ५,००० रु. वर नेली आहे. १ जानेवारी, १९६८ पासून ती अमलात येईल. विम्याचा हप्ता सध्या १०० रु. स ५ पैसे आहे, तो तसाच राहील.

## कामोद्दीपक बोलपटांचा वाईट परिणाम

आधुनिक जगात बोलपटांना करमणुकीचे एक प्रभावी साधन म्हणून स्थान प्राप्त झालेले आहे. तथापि ह्या माध्यमाचा समाजाला वळण लावण्यासाठीच उपयोग केला जातो असे मात्र नाही. भारतात तयार होणारे बहुसंख्य चित्रपट तर स्त्रीदेहाच्या भल्याबुऱ्या प्रदर्शनाशिवाय पुरे होतच नाहीत. अशा प्रकारचे चित्रपट पाहण्याने तरुण लोकांवर विपरीत परिणाम होतो अशी तक्रार अनेक वेळा ऐकू येते. चित्रपटांतील मादक प्रसंगांच्या जाहिरातींचे पोस्टर्स फाडून टाकण्याच्या मोहिमाही झालेल्या आहेत. तरुण मनांना भलत्या नादाला लावण्यासारखे चित्रपट फक्त भारतातच होतात असे अर्थातच नाही. किंबहुना युरोप-अमेरिकेतील सामाजिक जीवनाच्या भ्रष्ट नकलाच हिंदी चित्रपटांत करण्यात आलेल्या असतात. पोपची राजधानी व्हॅटिकन येथील एका वृत्तपत्रानेही चित्रपटांच्या परिणामाबद्दल विदारक टीका केली आहे. त्याचे कारण म्हणजे ट्यूरीनमधील एका तरुण चित्रपट प्रेक्षकाची क्रूर वागणूक. हा तरुण एक चित्रपट पाहात होता. चित्रपटात भयाने थरकाप उडविणारे काही प्रसंग होते. त्याचा परिणाम म्हणून त्याने आपल्या प्रेयसीचा सुरी खुपसून खून केला आणि नंतर स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही वागणूक एकांतिक वाटली तरी बोलपटांतून अनेकदा लिंगविषयक गुन्हे करण्याची प्रेरणा मिळते असा अनुभव आहे. वासनांना मोकाट आवाहन करणाऱ्या चित्रपटांप्रमाणेच नियतकालिके आणि फॅशन्स ह्यांचाही तरुणांवर अनिष्ट परिणाम होतो अशी टीका वरील पत्राने केली आहे. इंद्रियसुखाच्या मागे बेहोषीने धावणाऱ्या जगात फक्त तरुणांनाच मात्र दोष देता येणार नाही. तरुणांच्या मागच्या पिढ्याही दोषातून सुटू शकणार नाहीत.

## राण्या आणि त्यांची दासी

"हिंदी ही राणी, इतर भाषा ह्या तिच्या सवती आणि इंग्रजी भाषा ही सर्व राण्यांची दासी आहे. दुर्दैवाने, काही लोक राणीपेक्षा दासीलाच अधिक मानतात."

—श्री. नाथ पै



पुण्यांत याल तेव्हां—
उद्यान निवास
या नवीन, आधुनिक आकर्षक व सर्वकष निवासामध्येंच कुटुंबासमवेत रहाण्यास या. माफक दर
टेलीफोन ५७८२१
माहिती मागवा
उद्यान प्रासाद
स्काऊट ग्राऊंड समोर, पुणे-२

### पाकिस्तानात हुंड्यावर नियंत्रण घालणारा कायदा

पाकिस्तानच्या विधिमंडळाने मुसलमानांच्या व्यक्तिगत कायद्यात काही सुधारणा केल्या आहेत. मुसलमान स्त्रिया बऱ्याच मागासलेल्या असल्याने त्यांना बऱ्याच अडचणी सोसाव्या लागतात. पाकिस्तानमधील मुसलमान समाजात विवाहप्रसंगी हुंडा देण्याची व घेण्याची पद्धत भारतासारखीच दृढमूल झालेली आहे. ह्या पद्धतीवर नियंत्रण घालणारा कायदा पश्चिम पाकिस्तानने आता केला आहे. ह्या कायद्याप्रमाणे हुंड्याप्रीत्यर्थ मिळणाऱ्या कोणत्याही वस्तूचे लग्नाच्या वेळी, आधी अगर नंतर प्रदर्शन करता येणार नाही. शिवाय, हुंड्याप्रीत्यर्थ काहीही मिळाले तरी ती सर्व मालमत्ता पत्नीच्या मालकीची करण्यात आली आहे. १९६१ साली भारतात हुंडा प्रतिबंधक कायदा मंजूर करण्यात आलेला आहे. परंतु त्याचा व्यवहारात काहीच उपयोग होत नाही असा अनुभव आहे.


### भाक्रा धरणाची आगळी कथा

भाक्रा धरणात गाळ साठण्याचे प्रमाण दिवसानुदिवस वाढत चाललेले आहे. हे धरण बांधण्यात आले तेव्हा ते ५८५ वर्षे काम देईल असा हिशेब करण्यात आला होता. परंतु गाळ साठण्याच्या क्रियेमुळे ते २०० वर्षेच उपयुक्त राहील असा दुरुस्त अंदाज करण्यात आला होता. हा सर्व हिशेब गाळ साठण्याचे प्रमाण सध्यापेक्षा अधिक वाढणार नाही अशा विश्वासावर करण्यात आलेला आहे. पण, गाळ साठण्याच्या गतीत थोडी जरी वाढ झाली तरी ते ६० वर्षांतच निकामी होईल अशी भीती वाटू लागली आहे. रशियाने पामीरच्या पठारावर बांधलेले एक धरण असे निकामी झालेले आहे. हे धरण १०० वर्षे काम देईल असा अंदाज होता. पण ते ७ वर्षांतच गाळाने भरले आणि आता निकामी आहे.

### सक्तीच्या धर्मांतराला शिक्षा देण्यासाठी कायदा

ओरिसा सरकारने सक्तीने अगर फसवून धर्मांतर घडवून आणणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी कायदा करण्याचे ठरविले आहे. असे धर्मांतर घडवून आणणाऱ्या व्यक्तीला एक वर्षाची कैद अथवा ५ हजार रुपयांपर्यंत दंड करण्याचे कलम कायद्यात घालण्यात येणार आहे. ज्याचे धर्मांतर घडविले तो माणूस जर आदिवासी अगर हरिजन असला तर ह्या गुन्ह्यासाठी २ वर्षांची कैद आणि १० हजार रुपये इतकाही दंड करता येईल. ख्रिश्चन आणि बिगर-ख्रिश्चन धार्मिक संघटनांच्या धर्मांतराच्या कारवायांमुळे ओरिसात कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आली आहे, असा खुलासा राज्य सरकारतर्फे करण्यात आला आहे.


BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES




Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## पाणथळ जमिनीच्या वाढत्या क्षेत्राचा धोका

पंजाब व हरियाना राज्यांत अलीकडे करण्यात आलेल्या पहाणीवरून असे आढळून आले आहे की, दोन्ही राज्यांत मिळून सुमारे २७ लाख एकर जमीन पाणथळ आहे. १९६४ सालाच्या तुलनेने अशा जमिनीचे क्षेत्र ३ लाख एकरांनी वाढलेले आहे. पाणथळ जमिनीत पिके घेणे अशक्य असल्याने ४० कोटी रुपयांच्या धान्याला मुकावे लागत आहे. पंजाबमध्ये अनेक ठिकाणी जमिनीपासून १ ते १० फुटावरच पाणी लागते. ह्या भूमिगत पाण्याचा निचरा वेळेवर करण्यात आला नाही तर पिकांवर वाईट परिणाम होतो. पाणथळ जमिनीप्रमाणेच अशा जमिनींचीही सुधारणा करणे आवश्यक आहे. जमिनीच्या सपाटीपासून जवळच पाणी असणाऱ्या पंजाबमधील जमिनीचे क्षेत्र जवळजवळ ४० लाख एकर आहे. जमिनीत मुरणारे हे पाणी थांबविण्यासाठी कालव्यांच्या कडा सिमेंटने बुजविणे, जमिनीवरील पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करणे, आणि निवडक ठिकाणी ट्यूब विहिरी खोदणे असे उपाय योजण्यात येतात. अर्थात त्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न करावे लागतात. १९६४ साली अशी एक योजना आखण्यात आली होती. योजनेसाठी ८० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यात आला होता. पण, ह्या कामात फारशी प्रगती झालेली नाही. जमिनीची सुधारणा करण्याचे काम असेच लांबत गेल्यास काही ठिकाणची जमीन कायमची निकामी होण्याची शक्यता आहे. पुढे जमीन सुधारणेचे उपाय योजण्यात आले तरी त्यांना खर्च फार मोठा येईल. पंजाब-हरियानामधील पाणथळ जमिनीची सुधारणा करण्यासाठी कमीत कमी ३२० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

---

## टोकिओ : जगातील सर्वात मोठे शहर

संयुक्त राष्ट्र संघटनेचे लोकसंख्याविषयक वार्षिक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यातील माहितीप्रमाणे टोकिओ हे लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील पहिल्या क्रमांकाचे शहर आहे. ३० लाखांपेक्षा अधिक लोकवस्ती असलेल्या शहरांची संख्या आता ८१ झाली आहे. १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांत दोन नव्या शहरांची भर पडली आहे: एक कानपूर आणि दुसरे मोरोक्कोमधील कॅसाब्लांका. १७ शहरांतील लोकसंख्या ३० लाखांपेक्षा अधिक आहे. काही मोठ्या शहरांची लोकसंख्या १९६५ मध्ये पुढील प्रमाणे होती. टोकिओ ८८ लाख, ९३ हजार; न्यूयॉर्क ७९ लाख, ४३ हजार; शांघाय ६९ लाख; मॉस्को ६३ लाख, ९५ हजार. त्याशिवाय कलकत्ता, मुंबई, कैरो, पेकिंग, साऊल, लेनिनग्राड, ओसाका, इत्यादी मोठी शहरे प्रसिद्धच आहेत.

## इंडियन ऑईल कॉर्पोरेशनची संथ प्रगती

इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या ताज्या अहवालांत सार्वजनिक मालकीच्या विभागांतील ह्या महत्त्वाच्या संघटनेच्या प्रगतीची माहिती देण्यात आली आहे. हिंदमधील बाजारपेठेत सर्वात अधिक प्रमाणात तेलाची विक्री करणारी संघटना, असे स्थान कॉर्पोरेशनने मिळविले आहे; कॉर्पोरेशन दरसाल ३०० कोटी रुपयांच्या मालाची उलाढाल करते. कॉर्पोरेशनची प्रगती संथपणाने चालू असून गेल्या पाच वर्षांत मालाची विक्री ८ पटीने वाढली आहे. १९४९ साली अवघे ६ लाख किलोलिटर्स तेल विकण्यात आले होते. १९६६-६७ सालात ४९ लाख किलोलिटर्स तेलाची विक्री करण्यात आली. कॉर्पोरेशन निरनिराळ्या प्रतीची १०० वंगणाची तेले विकते. ह्याशिवाय ग्रीझ, स्वयंपाकासाठी व उद्योगधंद्यांसाठी लागणारा गॅस ह्या पेट्रोलजन्य मालाचीही विक्री करण्यात येते. पदार्थांपैकी केरोसीन, इंधनाचे तेल, डिझेल तेल आणि विमानांना लागणारे जळाऊ तेल ह्यांचीही विक्री कॉर्पोरेशन करीत असते. जेट विमानासाठी लागणारे तेल विकण्यासाठी कॉर्पोरेशनला अद्ययावत साधनांचा वापर करावा लागतो. पेट्रोल आणि माल-मोटारींना लागणारे डिझेल तेल विकण्यासाठी कॉर्पोरेशनने विस्तृत संघटनेचे जाळे देशभर उभारलेले आहे. कॉर्पोरेशनतर्फे १,३०० तेल-विक्री व सर्व्हिसिंग केंद्रे चालविण्यात येतात. जळणाचे तेल, डिझेल तेल, इत्यादी माल परदेशांना पाठविण्यातही कॉर्पोरेशन यशस्वी झाले आहे. थायलँड, जपान आणि सीलोन ह्या देशांना हा माल निर्यात करण्यात येतो. त्यामुळे ४ कोटी रुपयांच्या परदेशी चलनाची प्राप्ती झाली आहे. १९७१ च्या सुमारास कॉर्पोरेशन १·३ कोटी टन मालाची विक्री करील आणि हिंदच्या एकूण गरजेपैकी ६० टक्के गरज भागवील असा अंदाज करण्यात आला आहे.

---

## दरडोई उत्पन्नात मोठी वाढ

सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशनतर्फे पुढील माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. १९६०-६१ साली भारताचे वट्ट राष्ट्रीय उत्पन्न १३,४५३ कोटी रुपये होते. १९६४-६५ साली त्यात वाढ होऊन ते २०,४२४ कोटी रुपये झाले. सध्याच्या किंमती लक्षात घेऊन १९६०-६१ मधील दरडोई उत्पन्न ३१० रुपये होते ते १९६४-६५ मध्ये ४२७·१ इतके झाले. ठोक राष्ट्रीय उत्पन्नाचा आकडा १९६०-६१ मध्ये १५,१३७ कोटी रुपये होता. तो १९६४-६५ मध्ये २३,२०८ कोटी रुपये झाला. १९६०-६१ साली वट्ट राष्ट्रीय उत्पन्नातील १,४५३ कोटी रुपयांचे उत्पन्न सार्वजनिक मालकीच्या विभागाकडून आलेले होते. १९६४-६५ साली ह्या विभागाकडून २,४२४ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. ह्याच कालखंडात प्रत्यक्ष करापासून मिळणारे उत्पन्न ४२० कोटी रुपयांपासून ७६५ कोटी रुपयांपर्यंत वाढले.


### कॅनडाकडून चीनला गव्हाचा पुरवठा

चीन आणि कॅनडा ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणे कॅनडा चीनला १९६८ च्या जानेवारीपासून ऑक्टोबरपर्यंत २० लाख टन गव्हाचा पुरवठा करणार आहे. ह्या उभयता देशांत गव्हाच्या पुरवठ्याबद्दल ३ वर्षे मुदतीचा करार करण्यात आलेला आहे. तथापि, पुढील वर्षी करण्यात येणारा पुरवठा लक्षात घेतला तरा त्रैवार्षिक करारात ठरल्यापेक्षाही अधिक गहू चीन आयात करीत आहे असे दिसते. चीन परदेशाकडून गहू आयात करीत असला तरी तेथील अंतर्गत मागणी व पुरवठा ह्यात असलेल्या तफावतीचा त्यामुळे फारसा अंदाज बांधता येत नाही. १९६० पासून १९६३ पर्यंत चीनला अन्नधान्य आयात करण्याची खरीच गरज होती. कारण, देशातील धान्याचे उत्पादन घटले होते. त्यानंतर उत्पादनात वाढ झाली. तरीसुद्धा धान्याची आयात चालूच ठेवण्यात आली. निरीक्षकांच्या मताने चीन अन्नधान्याचे राखीव साठे करीत असावा. गेल्या वर्षी चीनने १० लाख टनापेक्षाही थोडा अधिक तांदूळ निर्यात केला. तांदूळ गव्हापेक्षा महाग असल्याने त्याच्या निर्यातीने चीनला परदेशीय चलनाची चांगली प्राप्ती होते. निर्यातीने मिळालेल्या हुंडणावळीचा उपयोग करूनच चीन गव्हाची आयात करीत आहे. चीनमधील लोकांच्या खाण्यात तांदुळाचा वापर प्रामुख्याने असतो. अलीकडे मात्र लोकांच्या आहाराच्या सवयी बदलण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. देशातील लोकांची तांदुळाच्या आहाराची संवय कमी करण्याचा उद्देश ह्यामागे आहे. गव्हाची आयात आणि तांदुळाची निर्यात ह्यामागील अर्थशास्त्र असे आहे. कॅनडाखेरीज ऑस्ट्रेलिआ आणि अर्जेंटायना ह्या देशाकडूनही चीन काही प्रमाणात गव्हाची आयात करीत आहे.

---

### पौर्वात्य व पाश्चिमात्य कलाकारांची मैफल

संयुक्त-राष्ट्र-संघटनेने मानवी हक्क दिन नुकताच साजरा केला. ह्या प्रसंगी प्रसिद्ध व्हायोलिन पटु येहुदी मेनुहिन आणि हिंदी सतारिये रविशंकर ह्यांची संयुक्त मैफल झाली. संघटनेच्या मुख्य सभागृहांत झालेल्या ह्या मैफलीला २,००० संगीत रसिक हजर होते. दोन्ही कलाकारांनी हिंदी पद्धतीचा पोशाख केला होता. श्री. रविशंकर ह्यांनी मैफलीसाठी पिलू रागांतील एक रचना मुद्दाम तयार केली होती. व्हायोलिनवर व सतारीवर ती द्वंद्व कार्यक्रमात वाजविण्यात आली. कार्यक्रमातील काही भाग अमेरिकेत रेडिओवर व टेलिव्हिजनवर प्रक्षेपित करण्यात आला. द्वंद्व कार्यक्रम अवघ्या १४ मिनिटांचा होता. संयुक्त कार्यक्रम करण्यापूर्वी श्री. रविशंकर ह्यांनी दोन हिंदी रचना वाजविल्या. युरोप व अमेरिकेत अलीकडे पौर्वात्य सांस्कृतिक व धार्मिक जीवनपद्धतीविषयी आस्था वाढत आहे.

## बँकांच्या चेअरमनपदी व्यावसायिकांच्या नेमणुका

### श्री. जोग, महाराष्ट्र बँकेचे चेअरमन

भारतातील बँकांच्या सामाजिक नियंत्रणाची पहिली पायरी म्हणून त्यांच्या चेअरमनची जागा पूर्ण वेळ काम करणाऱ्या व्यावसायिकांना देण्यात यावयाची आहे. साहजिकच, प्रमुख बँकांचे जनरल मॅनेजर त्या जागी पात्र असल्यामुळे त्यांची चेअरमनच्या जागी नियुक्ती होत आहे; त्याप्रमाणे, बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे जनरल मॅनेजर श्री. चिं. वि. जोग हे आता बँकेचे चेअरमन झाले आहेत.

श्री. जोग ह्यांनी मोठ्या, नामवंत बँकांतील अधिकाराच्या वरिष्ठ जागा सोडून उद्योन्मुख महाराष्ट्र बँकेची धुरा वाहण्याचे पत्करले. त्या वेळची परिस्थिती लक्षात घेतली, म्हणजे ध्येयाने प्रेरित होऊन श्री. जोगांनी स्वतःच्या आयुष्याच्या दृष्टीने विचारपूर्वक असे साहसच केलेले होते. त्यांचा हा निर्णय बँकेला अत्यंत उपकारक तर झालाच; परंतु त्यांच्या त्यागाचे, कष्टाचे, कर्तबगारीचे उत्तम चीज झाले आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. आम्ही त्यांच्या ह्या सार्थकतेचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि चेअरमनच्या नव्या जागेवरून अधिक कार्य करण्यात त्यांना उत्कृष्ट यश येवो, असे चिंतितो.

## पूर्वीच्या भूकंपांचा तपशील

कोयनानगर आणि दक्षिण महाराष्ट्र व कोकण येथे भूकंपाने नुकताच जो अनर्थ केला, त्यामुळे फार मोठी हानी झाली आहे; भूकंपाला बळी पडलेल्यांची संख्याही फार मोठी आहे. १४ सप्टेंबर, १९६३ रोजी कोयनेला हादरा बसला होता; त्याचीच पुनरावृत्ती १७ सप्टेंबर, १९६३ रोजी दोनदा झाली होती.

भारतात गेल्या १५० वर्षांत एकूण सात मोठे भूकंप झाले. त्यातला सर्वांत मोठा १५ ऑगस्ट, १९५० चा आसामला बसलेला होता. त्यात १,५०० लोक मृत्युमुखी पडले. बनारस ते रंगूनपर्यंत तो जाणवला. आसाममधल्या दोन महत्त्वाच्या नद्यांनी (लोहित आणि दिहांग) त्यामुळे पात्र बदलून महापूर घडवून आणला.

१५ जानेवारी, १९३४ चा बिहारचा भूकंप त्याखालोखाल होता. १८ मे, १९५५ रोजी भुज जिल्ह्यातील भूकंपाचा अनुक्रम त्याचे खालोखाल लागेल. ३१ मे, १९३५ रोजी क्वेट्टा येथे झालेल्या भूकंपात सबंध क्वेट्टा शहर जमीनदोस्त होऊन ६०,००० लोक प्राणाला मुकले होते. पण त्याहीपेक्षा मोठा भूकंप झाला, तो ११ ऑक्टोबर, १९३७ रोजी कलकत्त्याला; त्यात ३,००,००० लोक मृत्यू पावले.






# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०२

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.